# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## भाग सातवा.

सवाई माधवराव साहेब पेशवे यांची कारकीर्द

([illegible] एप्रिल १७८८)

हें पुस्तक

**वासुदेव वामन शास्त्री खरे,**

मिरज हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक,

यांनी [illegible]

पुणें येथें "आर्यभूषण" छापखान्यांत छापविलें.

शके १८३४ सन १९१२ ई.

5,K.
V2315,K.M18
E2.7
194430

कि[illegible] १ रुपये

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-194430

कामास प्रवर्त उत्तम पाहतां आतां वरून कांहीं अंदेशाचा प्रवर्त नाहीं, साच दिसण्यांत. ईश्वर—संकल्प नकळे. आतां सुपेचे मसलतीस ढील न करितां कार्य उरकून मग पुढील दृष्टीस पडला प्रवर्त कळावी. मजकुरीं तालीक असे. इतके दिवसप्रमाणें हे दिवस एकंदर न मानणें. सूचना लिहिली आहे. लोभ कीजे हे विनंति.

पै॥ छ ७ माहे रबिलाखर. सन समान सबैन. वनोसीवरून माणसाबरोबर दर जागा जांबोटी.

नं. २३१८. श्री. (१० एप्रिल.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री भिकबाबावा स्वामीचे सेवेशीं.

पो बाजीराव यशवंत. नमस्कार. विनंति उपरी. येथील कुशल तागायत चैत्र शु॥ १४ जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. हल्लीं राजश्री सरदेसाई यांस पत्र राजश्रींनीं व मीं लिहिले. वरून मजकूर ध्यानीं येईल. येथील मर्जी पेशजीप्रमाणें नव्हे. आतां बहुत नाजूक ! आतां कांहीं तरी सरकारकाम जालेचें येथें निदर्शन आलेसच येथें बोलणें करणेस आसरा. न होऊन व्यर्थ. मध्यें असणारास मात्र दोनी तर्फेस बोलणेस जागा नाहीं. कां ह्मणाल तरी एक ममता एक धणी; तेव्हां संकट मात्र ! न होन कार्याचा उद्देश नाहीं असें घडण्यांत येईल. याकरितां सांगणेंत आलें तेंच ल्याहावें. कारण कां कीं येथील चर्या बहुत ह्मणजे बहुतच नाजूक; याजकरितां क्षेम व्हावें. हेच काळजी. जेणेंकडून तुमचें कल्याण तेव्हां सर्वांची इच्छा पूर्ण करितां तपशील लिहिणें. कळावें. पेशजी जासुदाबरोबर पत्रें लिहिलीं त्यांचें एकही उत्तर आलें नाहीं. जांबोटीचे मार्गाचें वगैरे

१ हें पत्र हैदरअल्लीच्या लष्करांतून लिहिलेलें आहे. ज्यास ज्यानें पत्र लिहिलें ते उभयतांही हुबळीकर सरदेसायाचे कारकून. २ अप्पाजी राम यानीं. ३ हैदरअल्लीची.

लिहिलें होतें तें वर्तमानच नाहीं म्हणत होते ! आम्हीं अजोन जोडियाच पावल्या नसतीलसें सांगितलें. सारांश यांचेंही चित्त रक्षणें. मजकूर आपणा नेणता नाहीं. कृपा कीजे हे विनंति.

पै॥ छ ७ माहे रबिलाखर. सन समान. दर जागा जांबोटी. बनोसीचे माणसाबरोबर.

नं. २३१९. श्री. ( चैत्र शु० एप्रिल प. पंधरवडा. )

विनंति उपरी. उत्तरेकडील वर्तमान तरी होळकर 'फत्तेसिंगास गुजराथ दिली, गोविंदराव यांस गुजराथीपैकीं हिस्सा नाहीं,' करितां अभिमान धरून रुसवा करून गेले होते. त्यांत पुरंदरे बजाबा व मोरोबादादा व सदाशिव रामचंद्र मिळून वगैरे सरदार व कारकून एक होऊन पुण्यास आले. तेथें श्रीमंत दादासाहिबांची द्वाही फिरवून सौभाग्यवती मातुश्री पार्वतीबाईस धणीपणानें वंदोन शिक्के तिजकडून घेऊन बंड माजवून मुंबईहून श्रीमंतांस आणावयास चिंतो विठ्ठल यास पाठविला. इतकें वर्तमान कळतांच नाना फडणीस पुरंदरास चार हजार फौजेनिशीं जातांच किल्लेंत घेतला नाहीं असें कोणी म्हणतात. कोणी किल्लेंत घेतला असें म्हणतात. त्यास सखारामपंत जाऊन मोरोबा होळकर यांजकडेस मध्यस्थीस पडोन उभयतां बंधूंचें सख्य केलेंसें वर्तमान येक. येक वर्तमान अजोन सख्य नाहीं. नानास काढून पुरंदरचे पेठेंत माचीस वेढोन होळकर वगैरे सदरीं लिहिले सरदार बसले आहेत. श्रीमंत दादा तो उभयतां बंधूंचें एक झालें तरी आणणार. नाहीं तरी आणणार. अक्षतृतीयेस पुणेंस दाखल होणारसें वर्तमान, सबब फडके माघारे गेलेसें येथील वर्तमान. तुह्मास कळावें. धौशाही गेला. यांस तो आडकाठी म्हणावयाची दिसत नाहीं. शिकंदर ताले ! अस्मानी फत्ते होत चालली आहे ! मनीं योजिलें घडत आहे. दरबारीं

१ हुबळीकर सरदेसायास त्याच्या कारकुनाचें पत्र हैदराच्या लष्करांतून. २ फडणीस बंधु—नाना व मोरोबा यांचें. ३ [illegible]

राजश्रींबराबर येक जलद येऊन पावेसा पाठवून द्यावा. आळस न कीजे. आपणास लिहिलें पत्राचें उत्तरच नाहीं. काय समजावें ! जलदी करून दरबारीं जाणार येणार असा एक अति सत्वर पाठवून द्यावा. लोभ कीजे हे विनंति.

नं. २३२०. श्री. ( चैत्र व०५—१६ एप्रिल. )

यादी बंदिवान शिरटीकर. मोजदाद सु॥ समान सबैन. माहे रबिलावल. छ १७ रोज.

३० ब्राह्मग मंडळी.

१० नि॥ वेंकटरावभिमाजी.

१ खासा वेंकटराव.

१ स्त्री कासव्वा.

२ पुत्र—

१ श्रीनिवासराव.

१ नरसिंहराव.

२

१ सून वेंकू.

२ मुली—सिती व बाळी.

१ १

१ नातू.

२ वेंकापा पावगल-

१ खासा.

१ स्त्री कावेरी.

२

१०

११ तुकापा दप्तरदार नि॥.

१ खासा तुकापा.

१ स्त्री आकव्वा.

१३ शूद्र मंडळी.

७ नि॥ केंचापा दळवाई.

१ खासा.

१ स्त्री.

१ खानसर्जा भाऊ.

३ पुत्र—नांगी शिदराव वीरभद्र

१ १ १

१ बसलिंगी.

७

१ तिमणगौडा गुडगेरीकर.

१ प्यादा सकाण्णा नि॥ दळवाई.

मयत छ २७ रबिलावल.

४ नि॥ मडिवाळाप्पा.

१ नीलव्वा.

१ गिरव्वा.

१ जायाव्वा.

१ आजाण्णा.

४

१३

४३

६ पुत्र—
१ रंगापा.
१ कासापा.
१ दादापा.
१ नारापा.
१ भास्कर.
१ गणापा.
——
६
२ सुना–गिरी व भागिर्थी.
१ १
१ कन्या पार्वती.
——
११
१ बाळाप्पा सराफ.—
५ नि॥ शिवराव——
१ कृष्णापा बुधिहाळ.
१ येकराव.
१ श्रीपतराव.
२ सुबणभट.
१ खासा.
१ स्त्री शिंगरी.
——
२
——
५
३ नि॥ ब्राह्मण सुरेराव.
१ स्त्री सुरेरावाची.
२ भाऊ.

१ भीमराव.
१ आपण्णा.
―――
२
―――
३
―――
३०

पैकीं वजा, रवाना व मयत येकूण असामी.

१ मयत.
१ येकराव. छ २० साबानीं.
१ सुबणभट. छ १३ मोहरमीं.
―――
२

१ सुबणभटाची बाइको सोडून दिली.
छ १ सफर. परवानगी श्रीमंत भाऊ.
―――
३

३ रवाना मिरजेस. आ॥ नि॥ सुरेराव.
१ स्त्री.
२ भाऊ.
१ आपाण्णा.
१ भीमराव.
―――
२
ब॥ पत्र.
―――
३

―――
६

बाकी असामी छ ४ रबिलावलीं सन समान ये॥ असामी.
बेडया सुमार ३ ३७

पोटगी बंदिवानांस दररोज.

केली.
ऽ।१। जोरी.
ऽऽ३। ब्राह्मण.
ऽऽ२ शूद्र.
―――
ऽ।१।

वजन कर्चे.
ऽऽ२ चिंच.
ऽऽ१ मिरच्या.
―――
ऽऽ३

८८॥ तांदूळ ८८॥
८८॥ दाळ तुरीची ८८॥
८।= ब्राह्मण.
८≡ शूद्र.
८≡ मीठ.

८।२।≡
पै॥ छ २ र॥ वल सन समान. चैत्र मास.

नं. २३२१. श्रीगणपति. ( चैत्र व० ९–२१ एप्रिल. )

पै॥ छ० २५ रबिलावल. सन समान सबैन. चैत्रमास. गुरुवार आठवा तास.

आशीर्वाद उपरी. तुम्ही मंगळवेढेकर माणसासमागमें पत्र राजश्री शिवाजीपंताचें चैत्र शुद्ध १५ चें पाठविलें तें काल छ० २१ रबिलावलीं पावलें. तेथें थोरले श्रीमंत आणावयाचे भाव विस्तारें लिहिले आहेत, तेव्हां पुढें कोणता विचार करावा ? लोकांस निरोप द्यावा कीं न द्यावा ? ते आल्यावर कारभारी यांचे विचारें वर्तणें हें कळतच आहे! राजश्री हरीपंतांस तो लोक कोठेंही ठरों देत नाहींत ! पोटाचा गवगवा करून भोंवतें बसून हैराण करितात ! मुक्काम करून राहूं देत नाहींत; दर कुचास मुक्कामास जाऊं देत नाहींत; तेव्हां पुढें घालून रामतीर्थावरून जरीपटकासुद्धां पुरंधरास घेऊन जातातसें वाटतें. आम्हीं असेच ढकलीत ढकलीत शिंद्याचे विचारें समीपतेस यावें, शिंद्याचे विचारें पुढें मसलत करून ठरवावें. परंतु कोणतेंही घडणें कठीण ! शिंदेही बोलतील तें शेवटास नेतील हेंही भरंवशाचें कळतच आहे ! बरें ! श्रीसत्तेनें घडतां घडेल तें खरें ! तुमचीं पत्रें दोन तीन तजविजेनें गेलीं आहेत त्याचेंही उत्तर येत[२]. सर्व

१ पत्र लष्करांतून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस. २ येईल.

भार श्रीहरीवर आहे. लोभ कीजे. भेटही लौकरच होईल. यापुढें जसें पाहूं तसें करूं. हे आशीर्वाद.

नं. २३२२. श्रीचंडिकेश. ( चैत्र व० १२–२४ एप्रिल. )

पै॥ छ० ७ रबिलाखर. सन समान सबैन. दर जागा जांबोटी.

शरणार्थी विनंति उपरी. येथील कुशल तागायत चैत्र बहुल १२ मुक्काम लष्कर. दर जागा पेठ नजीक कोपळ. दोन कोस तुंगभद्रा तीर. जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. जासुदाबरोबर पांच चार पत्रें व सवंदेकडून दोन तीन पत्रें पाठविलीं परंतु एकाही पत्राचें प्रत्युत्तर आलें नाहीं. इकडील वर्तमान तरी ( हैदरअल्लीनें ) बहादूरबिंडेस ठाणें चौक्या देतांच ( किल्लेकऱ्यांनीं ) धाशतीनें ठाणें दिलें बहुल ९ मंगळवारीं. तसेंच एक रोज तोफांचा मार सुमाराकरितां करितांच कोपळ बहुल ११ गुरुवारीं नव्वे ताशीं ठाणें दिलें. असा प्रकार ! याज उपरी कूच करून मधील ठाणीं जात बखेडे न ठेवितां नीट धारवाडास येतात. असा प्रकार आहे. उत्तर पंथीं सरदार धौशासह होते ते धौशा निमेळेकडेस व पंत फडके कृष्णापार देशास मिरजेवरून जाणें मसलत करून जाणेस गेलेसें वर्तमान. आपणास कळावें म्हणोन लि॥ असे. आपलें पत्र कोणत्या अर्थें न आलें समजेना. येथील मर्जी आपणास नेणती नाहीं. एक तो भाना ठेवून पेचांत आणावें. त्याप्रमाणें ईश्वर साह्य होऊन शर्त होत चालली आहे. कां कीं, मुलखांत आडकाठी नसावी हा अर्थ. याजकरितां असलीं बंडें मोडलीं म्हणजे मधील कांहीं लढा नाहीं. असल्या घेतल्या मुलखांत असें करणें मर्जी. यांत ईश्वरेंच रक्षावें ! अदृष्टवशात् कोणताही प्रकार धड होणेंचा. मी कांहीं दरबारास जात नाहीं. कोणी दरबारास जाणार राजश्री

---

१ हें पत्र हैदराचे लष्करांतून हुबळीकर सरदेसाई याच्या कारकुनानें सदरहू सरदेसाई यांस लिहिलें आहे. २ मोर्चे जिन्हा कारबार येथून. ३ मराठे सरदार. ४ बहुधा.

बराबर असल्यास उत्तम. कां कीं, समक्ष जाबसाल घडेल व तेथील दखलगिरी कळती. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २३२३. श्री. ( चैत्र व० १२–२४ एप्रिल. )

सेवेशीं गोविंद त्रिमळ चिकोडीकर. मोकाम लष्कर दर जागा करवीर. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम ता॥ छ २९ माहे रबिलावल रोज गुरुवार पहिला प्रहरपावेतों आपले छायेकडून जमावसुद्धां वर्तमान यथास्थित आहे. यानंतर राजश्री पाटीलबावांचे दिवाण बाळाराऊ विशाळगडास गेले होते. अद्यापि पैक्याचा निकाल नाहीं. ( कोणत्याही ) गोष्टीचा तह जाहला नाहीं. राजश्रीस यावयास आणखी दोन चार दिवस लागेल. तूर्त दहा लक्ष रुपये देणेचा करार केला आहे, ( पण ) तूर्त दहा लक्षांचा निकाल पडण्याचें दिसत नाहीं. राजश्रींस विशाळगडचे प्रतिनिधींनीं सांगितलें कीं, रुपयेचे गोष्टी आम्हांजवळ बोलूं नका. वरकड जें सांगाल तें आम्ही ऐकूं. रुपये मात्र आम्हांकडून निभावणी होत नाहीं म्हणून साफ सांगितलें. ( या ) करितां चार आठ दिवस गुंता पडला आहे. वरचेवरी राजश्री पाटीलबावांचे कागद लवकर येणें म्हणून जातात. असे दिसगतीवरी पडला आहे. पैके कांहीं थोडके नाहीं ! एकवीस लक्षांचे निकाल पडावें लागतें. तूर्त दहा लक्ष रुपये द्यावे, ( पण ) पके कोणापाशीं आहेत ! कोण देतो ! कोल्हापुरांतील सावकारांपासून खंडी तहसील लाविलें आहे. पैके समयास मिळावयाचा प्रकार तो दिसत नाहीं. येसाजी शिंदेचा इतबार कोणासीं नाहीं ! पैके देतों म्हणून करारमदार करून ( सावकारांकडून महादजी शिंद्यांचा ) शह उठ-

---

१ करवीरच्या वेढ्याकरितां मिरजेहून महादजी शिंद्याच्या लष्करास पायदळ गेलें होतें त्यावरचा हा सरदार. २ करवीरच्या तहप्रकरणीं प्रतिनिधि मध्यस्थ होते सबब त्याजकडे. ३ कर्ज देण्याबद्दल सक्त तगादा.

वावा, शह उठल्यावरी गडावरी जाऊन बसला म्हणजे मग पैका कोणापाशीं मागावें म्हणतात ! सावकार देखील कोणी हमी होत नाहीं. याकरितां आणखी किती दिवस लागत कोण जाणे ? बरें. ऋणानुबंध किती दिवस न कळे. जमातदार वगैरे रोजमरेकरितां तुह्माकडे आले होते. रोजमरेचा फडशा जाहला असलेवरी लवकरी लोकांस पाठविणें. येथें आम्हांस लोकांनीं पोटाकरितां उपद्रव करितात. तेथें तुम्हीं रोजमुरा फडशा करून दिलेवरी येथें आम्हांस उपद्रव सुटत नाहीं ! जमातदार वगैरे रोजमुरा घेऊन मिरजेंत आहेत. अद्यापि आले नाहींत. त्यांस ताकीद करून सत्वर पाठविणें. शेख हजरत याजकडील[1] ( तरी ) तूर्त रवाना करणें. येथें मोर्चा टाकून तुम्हांकडे आले आहेत. दया करून सत्वर पाठवावे. याउपर आपल्या मर्जीस येईल ते प्रमाण. लोभ कीजे हे विनंती.

नं. २३२४. श्री. ( चैत्र व० १३–२५ एप्रिल. )

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २६ रबिलावल मंदवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें आलेलीं पाठविलीं तीं पावलीं. ज्यांचीं त्यांस प्रविष्ट केलीं. उत्तरें विप्राबरोबर परभारेंच गेलीं. ' लेख द्यावयाचा नाहीं ' ह्मणून सांगितलें. इकडील वर्तमान आहे तेंच आहे. नवीन तिळमात्र नाहीं. त्रिवर्गांचें बोलणें चालणें जाहलें त्याप्रमाणेंच आहे. कार्यभाग एकत्यारी राजश्री दादा[2] फडणीस करतात. राजश्री बापूकडे वडिलपण आहे. तिसरे गृहस्थ[3] स्वस्थ बसले आहेत. फौज ज्या ठिकाणीं आहे तेथेंच आहे. छबिने[4] रात्रौ असतात. संशय निवारण अद्यापि नाहीं. कहीनें गांवखेडीं तमाम मारितात, लुटितात, बंद नाहीं ! श्रीमंत

---

१ शिवाजी बावाजीचें पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव यांस पत्र कदाचित् वाटेंत धरलें जाईल हें समजून फार जपून मोघम मोघम मजकुराचें लिहिलें आहे. २ म्हणजे नानाफडनविसांस. ३ नाना. ४ फिरते पहारे.

राजश्री दादासाहेब आहेत तेथेंच आहेत. राजश्री हरीपंत व शिंदे येतील ह्मणून लटका संशय धरणार धरितात तो प्रसंग व्हावयाचाच नाहीं. मागाहून होईल तें लिहून पाठवूं. उभयतांचें एकत्व व्हावें, कार्य-भाग सुरळीत चालावा, चित्तांतील गोष्ट शेवटास जावी, या धांवतींत आहों. ईश्वर इच्छा प्रमाण ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. यात्रीं फुटल्याचा व उर्वरित राहिल्याचा भाव कळला. तिमराव असतात तिकडील मजकूर प्रशस्त दिसत नाहीं म्हणोन इतका प्रकार जाहला. नीट जाहल्यास नीट होईल असेंही आहे. हे विज्ञापना.

नं. २३२९. श्री. (चैत्र व० १४–२६ एप्रिल.)

राजश्री महादजी शिंदे गोसावी यांसी—

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. राजश्री व्यंकटराव नारायण घोरपडे यांणीं निवेदन केलें कीं, " मौजे लाट प्रांत मिरज व मौजे रांगोळी प्रांत हुकेरी हे दोन्ही गांव पुरातन आमचे इनाम, येविशीं पेशजी राजश्री येसाजी शिंदे यांणीं फौजबंदी करून इचलकरंजी-नजीक येऊन उतरले. तेव्हां शिबंदीमुळें पांच लक्षांचे पेंचांत आलों. त्यास दोन्ही गांवांची पंचाईत सरकारांत पुरंधरीं वेदमूर्ति राजश्री महादेवशास्त्री व आपाजी शामजी यांचे समक्ष जाहली. हरदू गांव आमचें ठरलें. त्याजवर कोन्हेरराव त्रिंबक फौजसुद्धां तिकडे सरकारांतून रवाना केले. त्यांचे व जिवाजी गोपाळ यांचे विद्यमानें येसाजी शिंदे यांचा तह सरकारांतून पुरंधर मुक्कामींहून कराराची यादी होऊन गेली त्याअन्वयें जाला. तेव्हां लाट व रांगोळी हे दोन्ही गांव आमचे

१ मुंबईस. २ दोघां फडणविसांचें. ३ फडके, पटवर्धन यांची फौज. ४ तिमराव हा पटवर्धनांकडून महादजी शिंद्यांच्या फौजेंत नेहमीं राहण्याकरितां पाठविलेला कारकून. ५ ही यादी या पुस्तकाच्या पांचव्या भागांत नं. १४७२ स छापली आहे.

आम्हाकडे करून दिले. हल्लीं महादजी शिंदे करवीरचे मसलतीस गेले आहेत. येसाजी शिंदे यांचे तहाची बोली लागली आहे त्यास येसाजी शिंदे यांणीं सदरहु गांवचा आड घातला आहे. याजकारितां येविशीं आज्ञा केली पाहिजे. ". म्हणोन, त्याजवरून हें पत्र लिहिलें आहे. तरी पेशजीपासून दोन्ही गांव व्यंकटराव नारायण यांचे इनाम आहेत. त्यास तहपट करार करून पाठविला त्याप्रमाणें कोन्हेरराव त्रिंबक यांचे विद्यमानें तह जाहला आहे. त्या बमोजीब दोन्ही गांव यांजकडे आहेत त्याप्रमाणें करार करणें." गांवखेडीं व देशमुखी व सरदेशमुखी वगैरे वतनबाब जें करवीर तालुक्यांत असेल तें पूर्वरूप चालत आल्याप्रमाणें चालवें. " या बमोजीब कलम तहांत करार करून घेणें.रवाना छ० २७ रबिलावल सु॥ समान सबैन मय्या व अलफ. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २३२६. श्री. (चैत्र व० ३०–२७ एप्रिल.)

सेवेशीं गोविंद त्रिमळ चिकोडीकर मुक्काम लष्कर

दर जागा करवीर कृतानेक साष्टांग नमस्कार उपरी येथील क्षेम ता. २८ माहे रबिलावल रोज सोमवार पहिला प्रहरपावेतों आपले दयेकडून जमावसुद्धां वर्तमान यथास्थित असे. यानंतर राजश्री प्रतिनिधीची व राजश्री पाटीलबावांची भेट कालचे शुक्रवारीं संध्याकाळीं दहावे तासीं ज़ाहली. तिन्ही लक्षांचें प्रतिनिधीनें कबूल केलें. बाकी सात लक्षांचा गुंता पडला आहे. राजश्री पाटीलबावा तूर्तच रुपये मागतात. नगदी रुपयांची तूर्त निशा पडत नाहीं. साहुकार कोणी हमी भरत नाहीं. मुलकांत तो तूर्त रुपये येणेंचे दिसत नाहीं. ( करवीर ) सरकारचे खजानेस पैसा नाहीं म्हणतात. बाकीचे रुपयेमध्यें मुदतीप्रमाणें सात आठ गांव देतों म्हणतात. राजश्री पाटीलबावा ऐकत नाहीं. या-

---

१ मिरजेस नारोपंत दामले यांस पत्र. २ विशाळगडकर. ३ सात कीं आठ?

करितां बोलीचा हटतट पडला आहे. निदानास खेडीं घेतीलसें दिसतें ! लष्करचें कूच एव्हासीं होणें दिसत नाहीं. आणखी किती दिवस लागतील नकळे. कालचे शनिवारीं रात्रीं पाऊस फार पडला. लोकाची फजिती कागदीं लिहितां पुरवत नाहीं. मोर्चांत बैसले जागां कमरेबरोबरी पाणी ! बंदुक हत्यार वगैरे भिजून फार फजिती जाहली. आमचे विपत्य तो सांगतां येत नाहीं. पाऊस समग्र एक प्रहर चार तासपावेतों पडलेवरी मग माणूस कोठवरी सोसावें बरें ! साहेब चाकरी आहे, केलेवांचून सुटका नाहीं, म्हणून केलें ! बरें. काय चिंता आहे ! आवाई तवाई शिपाई लोकांवरी येऊन पडतच आहे. त्या गोष्टीस कांहीं चिंता नाहीं. परंतु आपणास कळावें म्हणून लिहिलें आहे. खर्चास सरलें. रुपये दोनशें पाठविलेपैकीं तोफखानेकडे पन्नास रुपये लागले. वरकड आमचे गुजारतीनें प्यादेकडे खर्च जाहले. लष्कर मुक्काम आणखी आठ पंधरा दिवस राहणेस जालेवरी आम्ही अक्षतृतीया-कारणें घरास येऊं म्हणतों. त्यास श्रीमंतांची आज्ञा जाहल्यावरी येऊं. नाहीं तरी येत नाहीं. विदित होय. लोभ करणें. विज्ञापना.

नं. २३२७. श्रीगणराज.( वैशाख शु० २–२८ एप्रिल. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. तुम्हीं रविवारचें पत्र पाठविलें तें काल इंदुवारीं सायंकाळीं पावलें. राजश्री बाळाजीपंत आले. पहिले मोघे आले, सविस्तर कळलें. तुम्हांसही भेटून आलेच आहेत. त्यास प्रस्तुत त्या अन्वयावर उलगडा तेथील केला, मग कसें तरी जळो; परंतु मोकळें जाहलें. राजश्री बाबूराव केशवही तेथें पावले. मग काय करतात नकळे; असो. श्रीइच्छा

१ गंगाधरराव गोविंद यांची. २ पत्र परशुरामभाऊचें. ३ हें लिहिणें नानानीं मोरोबाच्या पारिपत्याचा करार अमुक शर्तीवर महादजी शिंद्याशीं पक्का केला त्यास अनुलक्षून कीं शिंद्यानीं करवीरकराशीं तह केला त्यास अनुलक्षून ? ४ हा सखाराम-बापूनीं स्वतःकरितां शिंद्याकडे पाठविलेला वकील.

प्रमाण. बाबूराव याचें व बाळाराव याचें इट्टल बहुत आहे. ( शिंदे ) जात्या हरदमख्याली. कसें करितील याचा विश्वास नाहीं! आमची गत तर पैसा खर्चास नाहीं. पत राहिली नाहीं. सरंजाम म्हणावा तर बाकी नाहीं. राहिला त्यासही हैदरखानाचा वेध. कोपळास मोर्चे तर बसलेच होत. राजश्री नारोपंत पोंक्षे यांचे पत्राची नक्कल पाठविली ती पावली. त्यानीं पत्र लिहिलें तेव्हां तर ( कोपळ ) गेलें नव्हतें. परंतु कालपासून गेल्याची ध्वनी उठली आहे. बहुता अर्थें गेलेंच असेल! कोपळ गेलें तेव्हां मग कृष्णातीरापावेतों ( मुलूख ) राहणें कळतच आहे. श्रीइच्छा! असो. कर्नाटकची तर आशा सुटलीच आहे. मसलतीसच देशीं किती दिवस लागतील! श्रीमंत इंग्रजसुद्धां येतात त्यापक्षीं कोणाचे जीव राहतात असा अर्थ नाहीं. सर्वांसच पेंच बसेल. राज्यांत श्रीमंतांसीं घांसलें नाहीं असें कोणीच राहिलें नाहीं. सर्व त्यांचे नजरेंतच आहेत! असो. दैवानुसार घडेल. इंग्रजास छत्तीस लाख रुपये देऊं केले ते कोणते मोहिमेंत मेळवून देणार? तेव्हां गोरगरिबांपासूनच घेतील. दुसरा जागा तर नाहीं. आम्हास त्याची काळजी नाहीं. मुख्य मसलत करणें त्यापक्षीं पैका खर्च केला पाहिजे. येविशींचें बोलणें तर्य स्पष्ट बोलावें म्हणोन फिरोन बचाजीपंत यांसी पाठविले आहेत. आपणही शिवाजीपंत यांसीं ल्याहावें. मी देवस्थापनेस्तव घरास येणार होतों, परंतु बाळाजीपंत आल्यावर विचार केला कीं, मी येयून गेल्यावर फौज टिकणार नाहीं. खर्चाचें आलें तर मनस्वी खर्च होईल. कोणास पावेल, कोणी तळावरच राहतील, असे प्रकार आहेत. चार दिवस दम खातों. दामाजीपंत येतात न येतात तें समजेल तसें करीन. कारभारीही कांहीं पाठवितात असें आहे. मग काय पाठवितील पहावें. फौजेंत मोठी खर्चाचीच हलाखी. वरकड

---

१ दादासाहेब. २ मोरोबानें देऊं केले. ३ नानाफडनविसांजवळ. ४ नानाकडून खासगतरीतिनें येणारा पैका. ५ त्रिवर्ग कारभारी प्रसिद्ध रीतीनें.

जसें कळेल तसें होईल. फौज तर हुजरातीची फारकरून श्रीमंत राजश्री राव पंत प्रधान यांचेच पायावर दृढ आहे असें वाटतें. परिणाम श्रीहरीस्वाधीन आहे.जेव्हां (नानास कारस्थान) करणें तेव्हां यवनास जवळ आणून ठेवावें. सर्वत्र एक जाहल्यावर त्यांचा काटही चालणार नाहीं. मग शिंद्याच्या मनांत (विरुद्ध) असल्यासही नीट चालतील. याचीही सूचना करावी. राजश्री गोविंदपंतमामा आज लष्करास येतील. बहुत काय लिहिणें. तीर्थस्वरूप राजश्री तात्या लष्करांत होते त्यांसीं आज यादवाडास जावयासीं निरोप दिला. मुलें माणसें यादवाडाहून काढावीं ह्मणोन सांगितलें आहे. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. ३३२८ श्रीगणपति. (वै० शु० २-२८ एप्रिल.)

पै॥ छ० २ रबिलाखर गुरुवार दोन प्रहर. वैशाखमास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. बाळाजीपंत आले, बच्याजीपंत आले, त्यांतील अर्थ "दरमजल (पुण्याकडे) जाण्याची तांतड करूं नये." तुह्मी नित्य माघारे फिरलों असें कळल्यापासून असेंच लिहितां, त्यास हें वाजवीच. परंतु येथें चंदी नाहीं. दिव्यास तेल मिळत नाहीं. वरकड तपशील नाहीं हें कोठवर ल्याहावें ? तेथून खर्चास येणें त्याची वाट पहावी, त्यास तुम्ही लिहीत गेल्यापासून हलके हलके कूच करीत गलगल्यापावेतों आलों. आतां तर उभयतांचे मुखें कळल्यावर मग तांतड करितां येत नाहीं. येथें केवळ लाख दोन लाख रुपयें एक वेळ दिल्यानें फौज राहते असा अर्थ नाहीं. फौजेस खर्चास नेहमीं पाहिजे तेव्हां हरएक गोष्टी श्रीकृपेंकरून घडतील. असल्यांच्या हातून पैका निघणें हें श्रीच्या अधीन ! आणि त्यांचा भरंवसा शिंद्यावर आहे ते हरदमख्याली ! असो. इकडे आले यांचा निरोप जाऊन आज आठ दिवस जाहले. आणखी दोन चार

१ नबाब निजामअलीस. २ पत्र परशुरामभाऊचें. ३ नानाकडून. ४ नानाचा.

दिवसांची वाट आहे. कांहीं खर्चास आल्यास आठ पंधरा दिवस घालवावयासीं येतील. तोंपावेतों शिंदे करवीरास आहेत ते तेथून पुण्याकडे कधीं जातात, पुढें पाऊल कसें पडतें, श्रीमंत साष्टीस आले, इकडून गोपाळ नाईक वगैरे गेले आहेत, त्याचें कसें होतें, हेंही कळतें, त्यासारखें करावयासीं येईल. नबाबांचें लक्ष श्रीमंत राजश्री पंतप्रधान आलीं यांजकडेच आहे. काल जिवोजीपंतांचीं पत्रें आलीं त्यांत तर निखालस आहे. तेथें कृष्णरावही नानाचे ममतेंत आहेत. त्यांनीं लिहिलें आहे कीं चित्तशुद्धि त्रिवर्गांची जाहली नसल्यास आह्मास इशारा व्हावा. आम्ही पुरंधरासच येतों. परंतु याच असें लिहितां येत नाहीं. लक्ष आहे असें वाटतें. येथूनही त्यांकडे सांगून कोणी कारकून पाठवावा असी योजना आहे. रवानगी केल्यावर सविस्तर लिहितों. तिमराव शिंद्याबरोबर आहेत त्यांस तूर्त आणूं नये. रहिमतपूरपावेतों समागमेंच त्यानीं जावें. मग पुढें दिसेल तसें करावयासीं येईल. आमच्या दोहीं तिहीं पथकांकडील मिळोन चार साडेचार हजार कोन्हेरराव यांचे पथक सुद्धां होते त्यांत चिरंजीवांनीं चारशें स्वारांस निरोप दिला. गोविंदपंतमामाकडील स्वारांस आम्हीं निरोप देविला. येथें होते त्यांजपैकीं व नवे ठेविले होते त्यांस दोनशें स्वारांस निरोप दिला. या पथकांतील लोकांचा गुदस्तां नाश जाहला आहे. आतां देशीं आले आहेत. कोणी कोणी निरोप मागतात, दिलाही पाहिजे, आणि अखेरीस दिवस आले आहेत. गवार निंबार त्यासही निरोप दिला पाहिजे. तेव्हां किती राहतील नकळे ! कनिष्टपक्ष हजार बाराशें तर चांगले धडधडीत पाहिजेत. त्यांत किती

---

१ निजामअलीचें. २ हा पेशव्यांकडून हैदराबादच्या दरबारीं नेहमीं राहणारा वकील. ३ काळे बारामतीकर. कांहीं तशीच महत्वाची नाजूक कामगिरी पडे तेव्हां या मुत्सद्याची पेशव्यांकडून निजामअलीकडे वकिलीवर योजना होत असे. तूर्त हे तेथेंच होते. ४ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांनीं.

राहतील हा सुमार पाहून आणखी नवे ठेवावे असें जाहल्यास माणूस पाहून नवे तितक्या भरतीचे ठेवावे लागतील, आणि ठेवितों. खर्च जाजती असेल तो छाटून टाकितों. आम्हाकडीलही पांच सहाशें-पावेतों ठेवितों. चिरंजीवासही पांच सातशें ठेवावे असें सांगतों. कनिष्ट-पक्ष नांवासारखे तिनी पथकें मिळोन तीन हजार निदान दोन अडीच तर ( पाहिजेत. ) त्यांत गुंता नाहीं. त्यावांचून स्वरूपही राहणार नाहीं. मग तिकडील कार्यभागाचा विचार पाहून कर्तव्य तें करावयासीं येईल. अडचण आहे. कसा परिणाम लागेल तो नकळे! बरें. श्रीहरि आहे! आठ पंधरा दिवसांत सारें समजतें तसें करावयासी येईल. अनास (?) एकेकडून हैदरखान उठेल. तिकडून तसी गत असे. ते पक्षीं केवळ जमाव सोडितांही येत नाहीं. कोपळ गेल्याचे वर्तमानामुळें कृष्णा तुंगा यांतील लोक तडक पळतात. इकडे काय होतें श्रीहरि जाणे! लौकर फडशा होता तर बरें होतें, परंतु तें दिसत नाहीं. तस्मात् कालच विपरीत! दुसरा अर्थ दिसत नाहीं. शिरहट्टीच्या बंदीवानांचा मजकूर लिहिला त्यास मागाहून लिहितों. पुणतांबेकर पाटलाची वस्तभाव उद्यां पाठवून देतों. राजश्री नरसिंगराव बाबा यांस त्रिवर्ग कारभारी यांजकडे रवाना करावे असें योजिलें आहे. "आज्ञेप्रमाणें पंढरपुरच्या सुमारें येतों. परंतु कांहीं खर्चास दिल्यावांचून सुटका होत नाहीं." ( असें व ) नानाप्रकारच्या अनुपती मागती सर्व सांगून त्रिवर्गांचीं वचनें मध्यस्ती हरीपंतांस व वगैरे फौजेस वचन प्रमाण घेऊन यावें या अर्थे उद्यां रवाना करावे असें योजिलें आहे. येथें बाबा बहुता घरीं फिरतात. दादाकडील कारकून जासूद यांचे घरीं, या अर्थे तिकडे जावयासीं योजिले. त्याणीं आपले फौजेस निरोप दिला. कांहीं बाकी नाहीं. सारी फौज त्यांची गेली. बाबा मागें

---

१ धायगुडे. २ मोरोबादादाकडील.

होते ते गेल्यावर लिहीन. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद. संक्राजी घोरपडे वगैरे यांसीं पक्कें बोलणें जाहलें आहे. राजश्री हरीपंतात्यांचा व त्यांचा स्नेह आहे. राजश्री मालोजी घोरपडे यांचा त्यांचा भाऊपणा तर फारच. त्यांत अंतर करितील असा अर्थ नाहीं. बहुत लोक ममतेंतच आहेत. श्रीसत्ता प्रमाण. सर्व श्रीमंतांचे प्रतापेंकडून यथास्थितच होईल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३२९. श्रीगणपति.—(वैशाख शु० २–२८ एप्रिल.)

आशीर्वाद उपरी. बाळाजीपंत आले. मागती त्यांसच पाठवावें तर त्यांना समाधान नाहीं यास्तव येथून दुसरा कोणी पाठवावा असा योजत नाहीं. तर तेथून चांगला जसें सांगितलें तसें पुरंदरास नानाकडे जाऊन सांगून तेथील निरोप सांगतील तसा घेऊन येई असा शिवाजीपंत यांजकडे रवाना करावा. येथून बचाजीपंत पाठविले परंतु आपलेकडील जाईल त्याणें खर्चाविशीं स्पष्ट बोलावें. मसलतीचा प्रकार केवळ आठ पंधरा दिवसांचे खर्चानें कांहीं होणार नाहीं. मागील खर्चाची अडचण पडून समयास नासेल यास्तव चार महिन्यांची बेगमी करावी लागेल असें स्पष्ट सांगावें. आपला सरंजाम झाडून गेला. आजपावेतों आम्ही कांहीं बोललों नाहीं. आतांही न बोलतों, परंतु आमचा इलाज राहिला. यास्तव आम्हासही कांहीं खर्चास अनुकूलता करून द्यावी. आमचे मार्फतीचें कर्ज आहे त्याचा ऐवज द्यावा. म्हणजे येथें आणखी समयास पत राहील. असे जाबसाल सांगून पाठवून त्यांचा जाबसाल आणावा. मनसबाच करणें त्यापक्षीं (नानानीं) जिवावर उदार असलें पाहिजे. आपले लक्षांत असतील त्यांचीं लक्षें राखावीं. बाजीपंत अण्णा फौजेच्या कामास चांगले हिमतीचे. त्यांचें राहणें नानाजवळ असावें. तसाच कृष्णेराव आपाही आपलें लक्ष

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस. २ अप्पा बळवंत.

सोडणार नाहीं. सर्वांचीं लक्षें यथामतीनें राखावीं, सारांश हिंमत न सोडावी. किल्लेकोटांचे बंदोबस्त चांगले करावे. त्यांणीं करणें काय आहे! येणेंप्रमाणें परवां शिवाजीपंत यांजकडे सांगून पाठवून श्रीमंत, नाना, व किल्ला यांत अंतर असूं नये; होळकर वगैरे आहेत त्यांकडे कार्याकारण अंगें असावीं; परंतु नानानीं या मसलतींत पडणें आणि अबरूनें मेळवावें अथवा गमावावें. नासल्यास हिंमत न सोडावी. खर्चाची योजना असावी. नबाबाकडील पक्कें करावें. नबाबासही उमजलें आहे कीं, मोरोबा कारभारी जाहले तर आपलेपासीं नीट चालणार नाहींत. त्यापक्षीं नानाचें लक्ष राखावें असें आहे.तसेंच भोसले, गाइकवाड यांचें लक्ष नीट रक्षावें. असे निरोप सांगून पाठवावे. आणखी खर्चाविशीं फार फार सांगावें. त्रिवर्गांनीं मिळोन कांहीं तरतूद करून पाठवितों म्हणोन लिहिलें आहे तें पाठवावें. सुचलें तें लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. राजश्री नरसिंगराव बाबांचे रवानगीचा मजकूरही सांगून पाठवावा. कसेंही करून येथून लावून दिला इतकाच प्रकार आहे असें सांगून पाठवावें. हे आशीर्वाद.

नं. २३३०. श्रीगणपति. ( वैशाख शु० २—२८ एप्रिल. )

आशीर्वाद उपरी. " दामाजीपंत चिंचवडकर यांजबराबरच येतील अथवा अगोदर येतील. चिंचवाडकर प्रसाद मंत्राक्षता लौकरच घेऊन येतील " म्हणोन लिहिलें, त्यास दामाजीपंताचा मजकूर यजमान आले त्याणीं सांगितला कीं, दोन चार दिवसांत येऊन पावतील. त्यास पंधरा सतरा दिवस जाहले. अद्यापि कोठें ठिकाण नाहीं. लोक आम्हास मारतील अथवा फजिती होईल तेव्हां येतील! फारकरून

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव यांस. यांत ' दामाजीपंत ' म्हणजे पैका हें स्पष्ट आहे. पण ' चिंचवाडकर ' कोण व ' प्रसाद मंत्राक्षता ' म्हणजे काय हें कांहीं उमगत नाहीं. २ कोंकणचे यजमान पटवर्धनांचे बाळाजीपंत सहस्रबुद्धे राहणार कोतवडें.

हुजरातचे लोक उठोन जात आहेत. दादा आपा करून संभाळिले आहेत. त्यांनीं तरी किती दिवस वाट पहावी ? आमच्या फौजेचीही अवस्था तीच जाहली आहे. फारकरून तर उठोन गेले. पोटास नाहीं त्यापक्षीं युक्तीनेंच आब रखून निरोप दिला. याउपर कांहीं आब रहात नाहीं. आज तीन दिवस घोरपडे यांचा गवगवा आहे. कांहीं केल्यास तुटत नाहीं. असे किती म्हणोन लिहावें ! जोंपावेतों आबानें ढकलेल तंवर ढकलीतच आहों. जे दिवशीं आब जातो अथवा ज्याचें देणें त्याणें आबही घेतला तर उपाय काय ! परंतु जेयून आब गेला तेयून चाकरीची संसार करण्याची सीमा जाहली. आमची तर निष्ठा आहे कीं जेयपावेतों जीव अब्रू आहेतों पावेतों श्रीमंतांचे चरणाशिवाय वर्तणूक करूं नये. जीव गेल्यावर मग अथवा आब्र गेल्यावर मग दैवानुसार होणें तें होईल ! आम्हास तर दामाजीपंत येतात असें म्हणत असतां निमित्य घेतां येत नाहीं. मग दामाजीपंत न आले तर आम्हावर शब्द नाहीं. जीवात्मा ( आहे ) तंवर धांवत करीतच आहों. आब गेल्यावर जीवात्मा वांचून तरी काय होणें ? विस्तर काय ( लिहावा ! ) सारांश ईश्वरें आब असे तों भेट द्यावी. नाहींतर परम दुर्लभ आहे. कांहीं सुचत नाहीं असा प्रकार चहूंकडून आहे. बरें. श्रीइच्छा प्रमाण. सविस्तर कळावें यास्तव लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३३१. श्री. ( २८ एप्रिल. )

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ वैशाख शुद्ध २ सौम्यवासरे वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्रें पा॥ तीं पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. इकडील वर्त-

---

१ पत्र परशुरामभाऊस. २ सदरहू तिथीस जंत्रींत मंगळवार लिहिलेला आहे.

मान तर श्रीमंत राजश्री नाना नारायणाजवळ फौजसुद्धां आहेत. बापू भिवडीजवळ आहेत. राजश्री मोरोबादादा करेवर होळकर आदिकरून साऱ्या फौजा आहेत. त्रिवर्ग तर एक जाहले आहेत. संशय तर राहिला नाहीं. परंतु कामकारभार एकचित्तेंकरून चालीस लागला नाहीं. व सांगणाराच्या सांगितल्यावरून संशयानें संशय वाढतात. निखालसपण पुर्तेपणीं नाहीं. फौज फार जमा जाहली आहे. प्रांताची कांहीं बाकी राहिली नाहीं. दोन चार दिवसांत त्रिवर्गांचें सुरळीत व्हावें असें आहे. जहाल्यावर कामकाजें चालों लागतील. आतांही राजश्री मोरोबादादाकडे कामकारभार होतो. परंतु त्रिवर्गांच्या संमतें जाहल्यानें चांगलें. दोन चार दिवसांत तेंही होईल. मागाहून लेहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३३२. श्री. (वैशाख शु० ७—३ मे.)

विज्ञापना. ता॥ छ० ८ रबिलाखर रविवार वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळला. 'करवीराकडील गुंता उरकला. लौकरच कूच होणार' म्हणून लिहिलें तें कळलें. श्रीमंत राजश्री भाऊ देवस्थापनेसाठीं येणार म्हणोन लिहिलें, त्यास आलेच असतील. 'खर्चास नाहीं. लोकांनीं दंगा केला आहे' म्हणोन लिहिलें तें प्रमाणच आहे. लग्नांचा प्रकार दर्शविला, त्यास अवकाश थोडका राहिला. वराडी जमा जाहले पाहिजेत. समारंभ चांगला लौकिकाप्रमाणें जाहला पाहिजे. येथें लग्नाचे साहित्यांत आहेत. येथील साहित्यास गुंता नाहीं. तिकडून लग्न आलें म्हणजे कार्यसिद्धि होईल. साहित्य करून गृहस्थ वाट पाहतात. पहिलेंच नाहीं म्हटलें असतें म्हणजे निश्चित राहते. निश्चयाचें सांगोन अडचणी सांगों लागले तत्राप याणीं वचन बळकट धरून बसले आहेत.

---

१ पत्र शिवाजी बाबाजीचें मिरजेस गंगाधररावांस. २ लग्न म्हणजे मोरोबादादाचें पारिपत्य!

त्यांचें येणें न जाहल्यास आणखीकडे जसा मिळेल तसा वर पाहतील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. लाखोटे ज्यांचे त्यास प्रविष्ट केले. उत्तरें परभारेंच त्याणीं पाठविलीं. पुरोहितही[1] तिकडे गेले आहेत हे विज्ञापना.

नं. २३३३. श्रीगणपति. (वैशाख शु० ७—३ मे.)

आर्शीर्वाद उपरी. राजश्री चिंतोपंत काल आले. सविस्तर मजकूर सांगितला. सारांश (नाना) दोन रुपये खर्चास देतात. कांहीं कार्यभागी तरतूद करितात तो ऐवज येतो. विदुराचा निश्चय नव्हता यास्तव दामोदरपंताच्या सुटकेचा संशय आणि हातही जड! त्यांत वृद्धाकडीलही संधान (शिंद्याकडे) लागलें आहे, तेव्हां कोणएक थरास जाईल असे नानाप्रकारचे संशय चित्तांत. यास्तव दोहोंची तरतूद केली म्हणतात. परंतु हातास येतील तेव्हां खरे! निःसंदेह होत नाहीं. प्रस्तुत विदुरही गेले आहेत. याउपर कांय ठरेल तें पहावें. सर्व भार विदुरावर आहे! येथील भरंवसा नाहीं! असो. कोणेप्रकारें कार्य व्हावें हेच इच्छा आहे. श्रीकृपेकडून घडलें म्हणजे उत्तम जाहलें. मातुश्रीची भेट व्हावी असें फार बहुत वेळीं त्यांनीं लिहिलें. माझें येणें होत नाहीं म्हणोन लिहित गेलों. त्यास प्रस्तुत आठ चार दिवस कारभारी कांहीं खर्चास पाठवीत तों या रानांत दिवस घालवावे असें आहे. यास्तव आमचे विचारें मातुश्री सही मात्र भेटीस येतील तर आणवावी असें आहे. उद्यां लिहिल्याप्रमाणें करावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. प्रस्तुत विदुर कोठें आहेत, कधीं कोठें जाणार, हें ल्याहावें हे आशीर्वाद.

नं. २३३४. श्रीगणपति. (वैशाख शु० ७—३ मे.)

आशीर्वाद उपरी. गोविंदपंत गोखले येयून रवाना केले आहेत. येऊन पावतील. तोंपावेतों शिंदे यांचें (करवीराहून) कूच होऊन

---

१ पुरोहित कोण? २ पत्र परशुरामभाऊचें गंगाधरराव यांस मिरजेस. ३ त्रिवर्ग कारभारी मिळून. ४ महादजी शिंद्याचा. ५ मातुश्रीनीं. ६ पत्र परशुरामभाऊचें मिरजेस गंगाधरराव यांस.

एक दोन मजली गेले असले तर उत्तमच जाहलें, नसले तर राजश्री नारोपंत[1] यांजकडे गोखले यांसी रवाना करावें. येथून त्यांजवळही पत्र दिल्हें[2] आहे. देऊन पुढें पाठवावें. राजश्री नाना किल्ल्याखालीं येतात. जातात म्हणोन कळलें, त्यास येविशींची सूचना त्यांसी जरूर करावी. 'खालीं उतरूं नये. ते दगाबाज आहेत. कोणेसमयीं काय करितील नकळे. यास्तव वरूनच जो जाबसाल करणें तो करावा' अशी सूचना असावी. येविशीं नानासही चिठी पाठविली आहे. हे आशीर्वाद.

नं. २३३९. श्री. ( ३ मे. )

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ वैशाख शुद्ध ७ रविवार मुक्काम नजीक पुरंधर वर्तमान यथास्थित असे. विशेष. कृष्णाजीबरोबर पत्रें पाठविलीं तीं ज्यांचीं त्यांस प्रविष्ट केलीं, उत्तरें उदईक पाठवितों. राजश्री सखारामपंतबापू लग्नास वंदनाखालीं गोवें म्हणोन गांव आहे तेथें जावयासीं काल दोनप्रहरीं गेले. फौज नारायणाजवळच आहे. राजश्री मोरोबादादा होळकर वगैरेसुद्धां करेवरच आहेत. तिमराव यांकडील लग्नाचा निश्चय समजण्यांत आला. उत्तम आहे. वैशाखमासीं शुद्धांतचें लग्नकार्य व्हावेंसें आहे. घडेल तें प्रमाण. लग्नास विघ्नें फार; याजकरितां चिंता वाटते, येथें कारभारी यांचें त्रिवर्गांचें चित्त एक आहे. दुसरा अर्थ तिळमात्र नाहीं. किल्ल्यावर उभयतोंच्या विचारें गेले. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ नारो शिवदेव हे शिंद्याजवळ राहणारे पेशव्यांचे वकील. २ पत्र मिरजेस गंगाधररावास. ३ महादजी शिंद्यानीं मोरोबाचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला. ४ कीं वद्यांत ? ५ बापू व मोरोबा यांच्या सांगण्यावरून नाना गेले.

नं. २३३६. **श्रीगणपति.** ( वैशाख शु० ७–३ मे.

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसीं. विनंति उपरी. बाळाजीपंत आले. बहुतच त्वरा सांगितली. परंतु अद्यापि कूचं होत नाहीं. त्यास दिवसगतीस कारण काय? याउपरी दिवसगत उत्तम नाहीं. दिवसगतीचा अर्थ कळावा या अर्थे राजश्री गोविंदपंत गोखले यांसीं पाठविले आहेत. तरी राजश्री पाटीलबावांसी बोलून लौकरच कूच होऊन दरमजल जाणें व्हावें. आम्ही त्यांची वाट पहात बसलों आहों. फार काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंती. रवाना रविवार प्रातःकाल.

नं. २३३७. **श्रीगणपति.** ( वैशाख शु० ९–५ मे.)

आशीर्वाद उपरी. यजमानाचें स्मरण एक दोन वेळ केलें. म्हणोन राजश्री तिमराव यांनीं लिहिलें व राजश्री नारो शिवदेव यांचें पत्रही आम्हास होतें व. तुम्हीं लिहिलें, त्याजवरून परवां रवानगी केली ते येऊन पावलेच असतील. त्यांस पुढें रवाना केले असतील. प्रस्तुत ज्यांकडे गेले ते कोठें आहेत? फार स्तिमिताई केली! इलाज नाहीं. 'बापू गोव्यास वंदनानजीक लग्नाकरितां आले. नाना गडावर गेले.' म्हणोन लिहिलें व शिवाजीपंत यांचें पत्र आम्हास होतें तें व तुह्मास आलीं तीं पहावयास पाठविलीं व कृष्णाचे जबानीचें वर्तमान लिहिलें तें सविस्तर कळलें. येथें तर खर्चास पैसा नाहीं. होळकरानीं दगाबाजीच केली होती, परंतु क्षेमरूप किल्ल्यावर गेले ही गोष्ट मोठी जाहली. परंतु दिवसेंदिवस कलह वाढत चालला. येथें आम्हांजवळ पैसा नाहीं. लोकांनीं फजितीची बाकी ठेविली नाहीं. पहिला नानाकडून विप्र आला होता तो जाऊन आज दहा

---

१ परशुरामभाऊंचें नारो शिवदेव यांस पत्र. २ कोल्हापुराहून शिंद्यांचें कूच. ३ पत्र परशुरामभाऊचें मिरजेस. ४ आम्हाकडील कारकून बाळाजीपंत सहस्रबुद्धे याचें महादजी शिंद्यानीं स्मरण केलें. ५ गोविंदपंत गोखले. ६ महादजी शिंदे.

दिवस जाहले. अद्यापि जाबसाल येत नाहीं. तसेच गोविंदपंत गेले यांजकडून जाबसाल येत नाहीं. येथील प्रसंग आह्मी मारले जावयाचे ! त्यांत कित्येक फितुरी. खर्चास नाहीं याजमुळें लक्षांत आहेत ते देखील दिवसेंदिवस तुटतात. ईश्वरें काय योजिलें नकळे. त्यांजलां पुरतें समजावें या अर्थें राजश्री चिंतोपंताची रवानगी गडाकडे केली आहे. सुरक्षित पावल्यास आठ दहा दिवसांत उत्तर येईल. तोंपावेतों जत, डफळापूर इतक्यांत वाट पाहतों. आह्मास पुढेंही जातां नये. मागेंही राहतां नये ! खर्चास तर नाहीं. असा प्रकार आहे. किती लिहावें ! रडीसीं नित्य उठोन समंध ! उठोन एखादीकडे जाईन म्हटल्यास जातां नये, असे नाना प्रकारचे खेळ खिसारे आहेत. सोसवेल तोंवर सोशीतच आहों. नाहीं तेव्हां इलाज नाहीं ! ईश्वर बुद्धि देई तसें करावें लागेल. समय पोटाचा आला आहे. वरकड कांहीं नाहीं. राजश्री शिवाजीपंतांस पत्रें लिहिलीं आहेत. ३ यांजकडे पाहून रवाना करावीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३३८. श्री. (६ मे.)

पै॥ छ० १४ माहे रबिलाखर सन समान सबैन. दर जागा जांबोटी.

शरणार्थी विनंति उपरी. येथील ता॥ वैशाख शु॥ १० मुक्काम लष्कर दर जागा कोपळ जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. आपण वडिलांस पत्र पाठविलें तें प्रविष्ट केलें. त्यास म्हणाले जे, आम्ही कांहीं अनहित इच्छित नाहीं, ज्यांत बचाव तेथील तीच पैरवी

---

१ शिंद्याकडून. २ नानांस. ३ पुरंदरास. ४ हुबळीकर सरदेसाई यानें हैदरअलीच्या लष्करांत कोणी विश्वासू कारकून मंडळी खंडणीचें व आपल्या संस्थानाचा बचाव करून घेण्याचें बोलणें हैदराशीं करण्याकरितां पाठविली होती त्यांपैकीं एकाचें हें पत्र आहे. यांत हैदरानें कोपळ किल्ला कसा घेतला व पुढें त्यांची उमेद व बेत कसे काय होते हें सारें वर्णिलें आहे.

सवत्र कां कीं उत्तरेकडील आले सरदार निर्जीव. येथील मर्जी अनिवार. आतां कांहीं पहिल्याप्रमाणें नाहीं........सेवा घडल्या अमुक म्हणावयाचें जावसाळास शूर्पग्रांमची मसलत. कां कीं मिकारग्रामकरांचा तालुका सरदारलोक यांस दिला नाहीं आणि वतनी पेशा. काय करावें! लाचार जीव जगवणें......इतक्यांत काय होतें (ती) दिनचर्या समजते......आतां तो यथास्थित. कांहीं कोठें नाहीं. सर्वत्र वारों पाणी होऊन बेटगिरींपावेतों अंमल बसला. येळवंती वगैरे ठाणीं उठोन अंमल सुरुवात जाहला. येथील गच्चीकोट, पेठ व मातीचा कोट दोनी किल्लेकऱ्यांनीं देऊन डोंगरावरीलही (किल्ला) खालीं करोन देतों याप्रमाणें बोलोन गेले. डोंगरावर जातांच गोळी मारिली. (तेव्हां यानीं) तोफांनीं तट व तीन बुरूज मारून जमिनीबरोबर केले. हल्ला आजी होणार. किल्लेकरी कौल द्या म्हणतात. परंतु हे देत नाहींत. नाक कानावर आहेत. जेथें गोळी उडाली तेथें नाक कान कापावे व जिवें मारावें हीच चाल. हें हस्तगत होतांच गजेंद्रगडचें उरकून धारवाडास येणार. मध्यें असलीं ठाणीं जातें सर करीत जाणें हेंही आहे. यंदां धारवाडावर छावणी करावी, कृष्णेपावेतों मुलूख सर करावा. ही मसलत! आंजीच्यास ठरे जाहला आहे. नजर भारी! होनाचें नाणें! लकोंराशिवाय बोलीच नाहीं असा प्रकार!...... मुळगुंद, कुंदगोळ वगैरे ठाणीं बेहटी आदिकरून बंकापूरकरांचीं पडलीं. आज दोन प्रहरीं हल्ला करून कोपळचा डोंगरावरील किल्ला घेतला. या उपरी

---

१ हरीपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे. २ सुपें जि. कारवार, हें ठाणें काबीज करण्याची. ३ मिरजकरांचा म्हणजे पटवर्धनांचा मुलूख हैदरानें सर केला तो आपले सरदारांस जहागीर न देतां स्वतःच्या अंमलाखालीं ठेविला. ४ मराठी फौजेची दाणादाण. ५ हैदराचा अंमल बसला. ६ रिकामा. ७ हैदरानें केले. ८ नाक कान कापावयाच्या बेतांत आहेत. ९ ठाणीं जात–सर्व ठाणीं. १० आजमितीस. ११ ठराव १२ लाखाशिवाय.

कूच करून गजेंद्रगडावरून धारवाडास यावें ही मसलत आजीपावेतों आहे...... हे विनंति.

नं. २३३९. ( वैशाख शु०—मे. पहिला पंधरवडा. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस—

" राजश्री हरीपंत तात्या कूच करून रामतीर्थावर गेले. आम्हांजवळ मानकरी आहेत त्यांनीं दंगा केला याजमुळें येथें दोन तीन मुक्काम जाले. मानकरी यांची समजावीस जाल्यानंतर तात्यांकडे जाऊं. कोपळ अद्यापि लढत आहे. "

नं. २३४०. ( वैशाख व० ४—१९ मे. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस—

" राजश्री हरीपंततात्यांचें कूच जालें. जतेस गेले. आमचें कूच नाहीं. दंगा आहे, याजकरितां येथेंच मुक्काम आहे. ऐवज आल्याशिवया लज्जा राहणें कठीण! " करवीरकरांनीं शिरोळ दिलें नाहीं. दोन लक्ष रुपये जाजतीच दिले. पोत्यास दाखल जाले." म्हणून लिहिलें तें व पाटीलबावानीं तूर्त हशमांस निरोप दिल्याचें लिहिलें तें कळलें. "

नं. २३४१. ( वैशाख व० ४—१९ मे. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस रवाना छ० १७ रबिलाखर. भृगुवार. मुक्काम रामतीर्थाहून—

" आह्मी आज कूच करून हरीपंततात्या यांजकडे गेलों. "

नं. २३४२. श्री. ( वैशाख व० ४—१९ मे. )

पै॥ छ० १९ रबिलाखर.

विज्ञापना. दोन लाख रुपयांचा ऐवज द्यावासा करार जाहल्यावर ठरल्याप्रमाणें पन्नास हजार हरिभक्तीचे[2] पदरीं घातले. आणि भास्कर-

---

१ पत्र शिवाजीपंताचें परशुरामभाऊस. २ हें सावकाराचें नांव.

पंताचें पत्र आपणाकडे घेतलें. बाकी दीड एका दो दिवसांत देतों म्हणतात. हातास आले म्हणजे निघतों. पन्नास माझे पूर्वींच गेले. भक्तीची चिठी सावकारास गेली आहे. तेथें घ्यावे. हात जड ! लौकर हातास येत नाहीं म्हणोन गुंता. वरकड बंदोबस्त ठीक आहे. आपला समुदाय यथास्थित असावा. येथें आंठ नऊ संख्या आहे. नित्य क्षीण. अगोदर तिमराव याजकडील गृहस्थ यावे. त्यांचे लक्षानुरूप मार्गें आपण असावें. तिमराव यांचे गृहस्थास इकडील इशारत वरचेवरी होत आहे. तुम्हीं त्यांस लिहून जलदी करावी. आसपास निकड करावी. चार रुपये मिळवावे. अनमान करूं नये. तिकडून लंगडा व शिवाजी कांहीं रुपये घेऊन यावयाची तरतूद होत आहे. परंतु हातास आले नाहीं. देतों म्हणतात. लंगडा हेलपाटे खात आहे. वृद्धही इकडे अनुकूलच आहे. अंशेंकरून आहे. युक्तीयुक्तीनें परिणाम सुधा व्हावा या डौलांत आहे. भास्करपंताची आज दोन रोजांत गांठ पडली नाहीं. त्यास किंचित् समाधान नव्हतें. आज गांठ पडेल. ऐवज हातास आल्यावर लौकर येतों. वरकड जवानी सांगतील. हे विज्ञापना. शुक्रवार प्रातःकाळ.

नं. २३४३. श्री. (वैशाख व० ५—१६ मे.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती। ता॥ छ० १८ रविलाखरपावेतों यथास्थित असे. विशेष. छ० १३ रविलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. ' राजश्री पाटीलबावानीं सरंजाम तोफा वगैरे यांस निरोप दिला (ते) किल्ल्यास आले ' म्हणून लिहिलें, उत्तम जाहलें. ' तीर्थस्वरूप भाऊंस

---

१ असें नाना म्हणतात. २ नानाजवळ आठ नऊ हजार फौज आहे. ३ शिंदे. ४ मोरोबाकडून फौज फोडण्याकरितां. ५ पत्र शिवाजीपंताचें पुरंदराहून मिरजेस गंगाधरराव यांस. ६ मिरजेहून शिंद्याकडे गेलेला पायदळ तोफा वगैरे सरंजाम.

व हरीपंततात्यांस त्रिवर्गांचीं पत्रें गेलीं जे, फौजेस निरोप देऊन सडे हुजूर येणें; म्हणोन आलीं ' म्हणोन लिहिलें, त्यास त्रिवर्ग एकरूप जाहले. कोणेविशीं संशय नाहीं. इकडूनही हमेशा पत्रें त्रिवर्गांचीं जात असतात. ' तीर्थस्वरूपानीं सावकारांजवळून सरकारांत कर्जऐवज देविला ते सावकार व लोकांचे हवाले घेतले त्यांचीं धरणीं होतात व राजश्री हरीपंततात्यांस नित्य उपोषणें होतात. तरी सरकारांत व कारभारी यांस विनंती करून तीर्थस्वरूपांचा गळा मोकळा होऊन सावकारांची तोसीस न होय तें करावें; ' म्हणोन लिहिलें, त्यास त्रिवर्गांस व सरकारांत विनंती नित्य करितों. ' रसदेचा ऐवज जमा होईल तेव्हां जाबसाल होणें तो होईल ' असें म्हणतात ! राजश्री पाटीलबावांचें कूच छ० १३ रबिलाखरीं होणार म्हणोन लिहिलें, परंतु कूच जाहल्याचीं पत्रें सरकारांत आलीं नाहींत. ' हैदरखानानें कोपळास वेढा घातला. किल्ला जेर जाहला. कुमक न होय. तेव्हां त्यांणीं कोठपर्यंत सोसावें ? ' म्हणोन लिहिलें, व राजश्री रामचंद्रपंताकडूनही पत्रें याप्रमाणेंच आलीं. परंतु तूर्त कुमक होणें हें कळतच आहे. श्रीमंत राजश्री बापू लग्नास गेले होते ते लग्न करून येऊन आठ नव रोज जाहले. भिवडीसच आहेत. वधू चांगली थोर आहे. श्रीमंत राजश्री नाना किल्ल्यावर गेल्यापासून किल्ल्यावरच आहेत. श्रीमंत राजश्री दादा फौजसुद्धां कऱ्हेवरच आहेत. राजश्री हरीपंततात्याकडून राजश्री नरसिंगराव धायगुडे येथें मध्यस्तीस आले आहेत. त्यांचे बोलण्यांत भाव " श्रीमंत राजश्री दादासाहेबांस आणूं नये म्हणोन सर्व लोकांचें मानस. त्यास आणूं नये. " म्हणोन व " लोकांची नालबंदी व रोजमरे तटले आहेत ते द्यावे. व हरीपंतांवर रोष आहे तो टाकून कृपा करावी. लोकांस निरोप देवितां, तरी ऐवज पाठवून निरोप देवावा. व श्रीमंत राजश्री भाऊनीं कर्ज दिलें आहे. त्यांची करावयाची सोय

करून त्यांस निरोप द्यावा." याप्रमाणें बोलणें बोलत आहेत. त्यावरून दोन लाख रुपयांची तरतूद करून नरसिंगराव यांजबरोबर ऐवज पाठवून फौजेस निरोप देविणार. ऐवजाची तरतूद होत आहे. फौजसुद्धां राजश्री हरीपंततात्यानीं नाझऱ्यांवर यावें. तेथें मशारनिल्हेनीं ऐवज घेऊन यावें. तेथें लोकांस ऐवज वांटून निरोप द्यावा, आणि त्याणीं सडे हुजूर यावें; ऐसें ठरलें आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस आणीत नाहींत व आणावयाचें मानसही नाहींसें बोलण्यांत आहे. "नाझऱ्यांवरून फौजेस निरोप द्यावा, राजश्री हरीपंततात्यानीं सडे भेटीस यावें. श्रीमंत राजश्री भाऊनीं तासगांवास जावें. बोलावूं तेव्हां यावें. कर्जाचा ऐवज रसदेच्या ऐवजावर पावता होईल." येणेंप्रमाणें म्हणतात. राजश्री नरसिंगराव दोन तीन रोजांत ऐवज दोन लाख रुपये घेऊन येतों म्हणोन त्यांचीं पत्रें त्यांजकडे गेलीं. येथें फौज आल्यानें घोळ बहुत पडेल याजकरितां याप्रमाणें ठरावांत आणिलें आहे. तरतूद सावकारांस बोलावून केली. दोन लाख रुपये आज उद्यांत पदरीं पडले म्हणजे नरसिंगरावबाबा जाणार. वरणीसाठीं गांवखेडीं चाळीस चाळीस कोस खराब जाहलीं. कांहीं बाकी राहिली नाहीं. शिंदे येणार ते आल्यावरी गांवच लुटतील! अनुभव मिरज प्रांतावरून आपणास जाहलाच आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे राऊत किरकोळ जातात त्यांस धरून आणावयास चौक्या बसविल्या आहेत. प्रस्तुत कालीं बरेंच आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३४४. श्री. (वैशाख व० ५—१६ मे.)

राजेश्री तात्या स्वामीचे सेवेशीं, विनंती उपरी. आपला आजचा मुक्काम जतेवरच आहे किंवा अलीकडेस आले हें ल्याहावें. आपली व भाऊंची व माझी जरूर भेट जाहली पाहिजे. भेटीनंतर सविस्तर

---

१ हें सखारामपंत पानशे तोफखानेवाले यांचें हरीपंत फडके यांस पत्र.

कळण्यांत येईल. त्यास जरूर जरूर भेट व्हावी. मीं नाझरें येथें मुक्काम केला आहे. आपला सुमार येईल त्यासुमारें मी येतों. सारांश त्वरा करावयाचा अर्थ आहे. तांडवकृष्णाकडे ही चिठी पाहतांच पत्रें पाठवावीं कीं, 'तुम्ही कोणत्या सुमारें आलेत ? आम्हीं तुम्हीं एक कोणत्या स्थळीं व्हावें ?' येणेंप्रमाणें एक पत्र जलद सांडणीस्वारासमागमें पाठवावें. मी उदईक रविवारीं जवळ्याचे सुमारें येतों. आपणही त्याच सुमारें यावें. रवाना छ० १८ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती. चिठी माझी आली हे उघडीस एकंदर न आणावी. राजश्री भाऊंस मात्र दाखवावी. फौजेस निरोप न द्यावा. कळावें हे विनंती.

नं. २३४९. श्री. (वैशाख व० ७-१८ मे.)

पै॥ छ० २३ रबिलाखर. सन समान सबैन वैशाख मास.

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापन ता॥ छ० २० रबिलाखर मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ० १६ रबिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं काल पावोन लिहिला मजकूर कळला. श्रीमंत राजश्री भाऊंचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. उत्तरें लेहून पाठविलीं आहेत. त्यांकडे प्रविष्ट करावीं. 'लोकांनीं दंग्याचा प्रकार बहुतच निकडीचा केला' व 'त्रिवर्गांस विनंती करून ऐवजाची सोय होय तो प्रकार करावा' म्हणोन लिहिलें, त्यास राजश्री नरसिंगराव धायगुडे लष्कराहून आले त्याणीं सविस्तर मजकूर सांगितला. त्याजवरून मशारनिल्हेबरोबर दोन लाख रुपये द्यावे आणि याणीं जाऊन लोकांस थोडे थोडे यथाविभागेंकरून खर्चास द्यावे

१ तांडवकृष्ण हें महादजी शिंद्यास दिलेलें नांव, लंगडा होता म्हणून. २ पत्र गंगाधरराव यांस मिरजेस.

आणि फौजेस निरोप द्यावा; येणेंप्रमाणें निश्चयांत आलें आहे. ऐव-जाची तरतूद करून दोन चार दिवसांत मशारनिल्हेची रवानगी करून पाठवितात. 'नरगुंदचें पत्र आलें; कोपळ किल्ला हैदरखान याणें घेतला;' म्हणोन लिहिलें तें कळलें. किल्ला नामी होता. येथें सांगि-तल्यास 'होणारास इलाज नाहीं' म्हणतात! हैदरखानावर फौज पाठ-वावी, तरतूद करावी, स्थलें रक्षावीं, हें कोणाच्या चित्तांत नाहीं! आपलाल्या कालविवंचना करीत बसले आहेत. होणार तें होतें! 'राजश्री महादजी शिंदे शिरोलीवरच आहेत; एकदोन दिवसांत कूच करणार;' म्हणोन लिहिलें तें कळलें. वरकड पुरवणी पत्राचा मजकूर परवांच्या पत्रीं लिहिला आहे त्याजवरून कळेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. नारायणाजवळ श्रीमंत राजश्री नानाची फौज आहे व गणेशकाशी व किरकोळ पथकें होतीं त्या साऱ्यांस तेथून आणिलें. भिवडीजवळ राहिले. आतां राजश्री नानाचें खास पथक मात्र नारा-यणाजवळ राहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३४६. (वैशाख व० ९—२० मे.)

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस[1]:—

"येथील फौज जाऊन कांहीं काम होईल हें कळतच आहे. प्रस्तुत शिंद्याचा मुक्काम कोठें आहे, कऱ्हाडापुढें गेले किंवा कसें तें लिहावें. आमचें उद्यां कूच होईल. हलके हलके श्रीक्षेत्राच्या सुमारें जात आहों."

नं. २३४७. श्रीगणपति. (वैशाख व० ९--२० मे.)

पै॥ छ० २४ रबिलाखर. सन समान सबैन. वैशाखमास.

आशीर्वाद उपरी. राजश्री आबा फडके याजबरोबर इंदुवार-तिसऱ्या प्रहरचें पत्र पाठविलें तें आज तिसरे दिवशीं बुधवारीं जव-

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावं ह्यांस.

ळ्यांचे मुक्कामी पावले. राजश्री व्यंकटराव घोरपडे यांचा मजकूर लिहिला तो कळला. त्यांचा ओडघस्त कारभार तर आहे; परंतु दोन वर्षे त्यानीं चाकरी केली. श्रीमंताजवळ जाणार. त्याणींही समागमें असोन कांहीं दिवस चांगलें असें वाटलें तर बोलावयासी येईल; यास्तव लिहिलें होतें. येतील तर पाठवून द्यावे. आले तर खर्चास द्यावें. नाहीं तर कळतच आहे ! लिमयाच्या चिठीच्या नकला पाठविल्या त्या अलीकडे पत्र आलें नाहीं. येथें खर्चाची निकड ओढ आहे ती केवळ श्रीहरि जाणे. वोलेकराचे वाडीहून इंदुवारीं कूच केलें. लष्कराचा मुक्काम हतीतावर गेला. मी सडा राजश्री हरीपंततात्यांच्या लष्करांत सोनपेवर गेलों. तोफखान्याच्या गृहस्थाची चिठी आली त्यांतील भाव " निःसंदेह राजश्री उभयतां एकत्र जाहले. गुंता राहिला नाहीं. लौकर किल्ल्यासमीप यावें. " म्हणोन दोन चिठ्या राजश्री बापू पानशे यांस भिवराव यांच्या आल्या त्यांच्या नकला हातास येत नाहींत. इलाज करून पाहतों. जवळ्यांवर राजश्री बापू पानशे यांची भेट जाहली. चिठ्या पाहिल्या. त्यांतील मजकूर बापू पानशे यांस लिहिलें आहे कीं, " उभयतां एकत्र जाहले. कोणेविशींचे उभयतांत संशय राहिले नाहींत. सर्व प्रकारें निखालसता जाहली. तुम्ही हरीपंततात्यांस सोडून घासदाणा उकळीत बसलां हें ठीक न केलेंत. लौकर तात्यांस मिळोन त्यांचे मर्जीप्रमाणें वर्तणूक करावी. " असे भाव आहेत. आमचें ( व ) पानसे यांचें बोलणें जाहलें, त्यांत " मागील संदर्भ अगदींच ठाऊक नाहीं. एकाएकींच ( तुमच्या ) चिठ्या आल्या हें काय ! करितां काय ! रोज एक करितां ! राज्य सारें बुडालें. आह्मांस कांहीं समजत नाहीं. मी घरास जाणार होतों परंतु तुम्हीं राजश्री हरीपंततात्यांस लिहिलें यास्तव आलों. आज जातों. खर्चास नाहीं. त्यांनीं

१ सोंडूरकर. २ भिवराव पानशे यांच्या चिठ्या सखाराम बापू पानशे यांस आल्या. ३ कारभारी बापू व नाना. ४ पुरंदराजवळ. ५ भिवरावाच्या पत्रांतील भाव. ६ नानांनीं.

असें करूं नये. भाऊंस या गोष्टीचा विश्वास येत नाहीं यास्तव उभयतांनीं चिठ्या पाठवाव्या." म्हणोन लिहिलें आहे म्हणोन सांगत होते. असो. लिमयाच्या चिठींतही भाव आहे कीं, उभयतां एकचित्त जाहले, तेव्हां ती गोष्ट जाहलीच. गुंता नाहीं. नकला हातास आल्यास घेऊन पाठवितों. गडाहून बचाजीपंत म्हणोन आले आहेत. शंकरोबा ह्मणून आले त्यांतील मजकूर—संक्रोबाजवळ निरोप कीं 'जलद येणें. शिंद्याची वाट न पहावी. बापू आह्मी मिळालों. आमचेंही राजकारण शिंद्याकडे आहे. बापूंनींही बाबूराव केशव याचे विद्यमानें ठीक केलें, त्यास शिंद्याच्या कूच मुक्कामाची बातमी राखून जें करणें तें करावें.' काल तुमचींही पत्रें आलीं जे, शिंद्याचें कूच जाहलें. त्यानंतर राजश्री राघो त्रिंबक म्हणून सरकारचे कारकून परंतु नानाच्या ममतेचे शिंद्याकडे गेले आहेत त्यांचें पत्र आलें त्यांतील मजकूर 'याउपर कोठें मुक्काम न करतां ( शिंदे करवीराहून ) दरमजल निरपावेतों जातात. आपण ही बातमी राखून त्यासुमारें यावें' म्हणोन लिहिलें आहे. तेव्हां याउपर दरमजल निरातीरास जातील. मग कोठें एखादा मुक्काम केला तर नकळे. नाहींतर जातीलच असें वाटतें. त्यास त्यांचे लष्करची दिनचर्येची बातमी कळली पाहिजे. येथून तर डांक ठेवितां नये. यास्तव त्यांचे लष्करापासून आमचे लष्करापावेतों स्वारांची डांक बसली पाहिजे. तिमरायासी कळवून त्याचीं पत्रें आम्हांसीं आलीं पाहिजेत. तिमरावास ल्याहावें. त्यानें वरचेवर दिनचर्येचें वर्तमान लष्करास मजकडे लिहीत जावें असी तरतूद जरूर करावी. आमचें येथून कूच होऊन श्रीक्षेत्रांकडे[1] जाणार. शिंद्यांनीं हणमंतराव घाटगे यांचे कुमकेस तीन हजार फौज देऊन रवाना केले. त्यास तिकडे जातील किंवा कसें तें लिहून

---

1 पंढरपुराकडे.

आणवावें. मनसबे जवळ दिसों लागले. त्यास कांहीं न कळतें असें नाहीं. तेव्हां ते[१] काय करितात, किंवा वृद्धाचे विश्वासावर जातील, कसें होईल, तेंही संकटच आहे. राजश्री नरसिंगराव बाबा गेले आहेत त्यांचे पत्र "दादाचें बोलणें जाहलें. ऐवजाची तरतूद होत आहे. खामखा घेऊन येतों." आणखी बारीक बातमी पाहतांही दादा तरतूद करितात. कनिष्ठपक्ष दोन लाख रुपये तरी यावे असें आहे. यांत श्री इच्छा प्रमाण. किल्ल्याहून शिंद्याकडे नारोपंत फडके म्हणोन गेले आहेत जे "जलदीनें येणें. नाहींतर रसदेचा पैसा सालमजकूरचा ते[२] घेतात. तर दिवसगत न करावी." हेही चाललेच आहेत. मग जवळ जाऊन काय करितील पहावें! येथील फौजेची याद निवडली. आठ हजार हुजरात खरी आहे. नांवनिशी (व) दरमहाच आकारला. याशिवाय आह्मी व रास्ते व आह्माजवळ हुजरातचे लोक एक हजार. मिळोन पांच. एकूण तेरा हजार फौज खरी आहे यांत गुंता नाहीं. याशिवाय तोफखाना गाडदी दोन दीडपावेतों आहेत. श्रीकृपेंकरून सरंजाम चांगला, परंतु मोठें संकट खर्चाचें आहे, याचा विचार कांहीं दिसत नाहीं. चिंतोपंत याचें पत्र येऊन तीन दिवस जाहले, त्यानंतर पत्र नाहीं. येथें दिवस जातो तो केवळ संकटाचा आहे. यांत अनेक प्रकारचे मनसबे कसे सिद्धीस जातील हें श्रीहरि जाणे! असो. श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें. रास्ते यांचें पत्र 'लग्न जाहलें. याउपरी लौकरच येतों.' येतील किंवा नाहीं पहावें. आज तोफखान्याचें कूच होऊन वडगांवावर गेला. तिमराव यास तूर्त तेथून न आणावे. तेही निरोप देणार नाहींत. त्यांनीं गळाठ्याचा मजकूर लिहिला त्यासी दहा वीस रुपये रोखी पोटास खर्चास द्यावें. तूर्त तेथेंच असों द्यावा. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे आशीर्वाद.

---

१ शिंदे. २ मोरोबा वगैरे प्रतिपक्षी. ३ शिंद्याच्या लष्करांतून.

## श. १७०० फडके व पटवर्धन पुण्याकडे येतात. इ. स. १७७८

नं. २३४८. (वैशाख व० १०—२१ मे.)

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेसः—

" तुम्हीं २१ राबिलाखरचें पत्र पाठविलें तें २३ मिनहूस प्रविष्ट जालें. " शिद्यांचा मुक्काम रेटरेंहरणाक्षावर रविवारीं जाला मंत्री यानीं मेजवानी केली. मालखेडास भौमवारीं कऱ्हाडासमीप कृष्णापार होऊन जाणार " म्हणून लिहिलें तें कळलें. " करवीरकरानीं मागतीं कजियास प्रारंभ केला. शिरगुपीचीं गुरें अकिवाटकरानीं नेलीं. वेदमूर्ति राजश्री जीव दीक्षित अष्टेकर व कृष्ण शेणवी यांचा देण्याघेण्याचा कजिया वारला असतां शेणव्यानीं गैरवाका समजावून ब्राह्मणास पाटीलबावानीं नेऊन श्रमी केल्या"चा मजकूर लिहिला तो कळला. इनसाफ नाहीं; सारा मूठमर्दीचा कारभार; तेथें इलाज नाहीं. शिद्यांचा कारभार ! कोणाजवळ सांगावें असें नाहीं. तह केला तोही ठीक नाहीं ! श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें. बरें ! नेहमींच शिंदे या देशीं राहतात असा अर्थ नाहीं. सर्वांस परीक्षाही कळेल. कांहीं चिंता नाहीं. "

नं. २३४९. श्री. (वैशाख व० १३—२४ मे.)

राजश्री तात्या स्वामीचे सेवेशीं विनंति उपरी. राजश्री नागोपंताबरोबर पत्र पाठविलें तें पावलें असेल. त्यास त्वरेस मोल आहे. जें आपण लक्ष धरीत होते तेंच प्राप्त जाहलें आहे. त्यास राजश्री भाऊ मागें राहिले आहेत म्हणोन ऐकिलें, त्यांस आणवावे. माझी आपली भेट जाहली पाहिजे. याउपरी उपेक्षा न करावी. आज दोन प्रहरपर्यंत मुक्काम करून येथेंच राहिलों. आपलें उत्तर येईल त्याप्रमाणें कूच करून जवळपास अशा सुमारें येतों. आपलेंही कूच होऊन त्यासुमारें यावें. तांडवेकृष्णाकडे पत्र पाठविलेंच असेल. आणखी वरचेवर पाठवावें कीं, लौकर यावें. आह्मी पुढें चालिलों

---

१ सखारामपंत पानशे यांचें हरिपंत फडक्यांस पत्र. २ महादजी शिंद्याकडे.

आहों. याअन्वयें पत्रें लिहीत जावीं. त्यांची आपली डाक चौकी बसल्यास उत्तम आहे. विशेष. अतःपर तरतुदीस आळस न करितां त्वरा करावी. मुख्यें स्वामी आपली मार्गप्रतीक्षा करीत बसले आहेत, कळावें. छ० २६ रविवार प्रातःकाल वहुत काय लिहिणें लोभ करीत जावें हे विनंति.

नं. २३५०. श्री. ( वैशाख वद्य—मे दुसरा पंधर० )

विज्ञापना. श्रीमंत राजश्री नाना[1] किल्ल्यावरच आहेत. राजश्री सखारामपंतबापू लग्नाहून आले ते नानाच्या डेन्यास भोजनास येतों ह्मणोन सांगोन पाठविलें. याकरितां नाना खालीं येऊन मेजवानी करून किल्ल्यावर गेले. तदोत्तर फराशींसाकडील वकिलास निरोप द्यावयाचा होता ह्मणोन आपल्या डेन्यास खालीं येऊन निरोप दिला आणि किल्ल्यावर गेले. फरासीसाचा वकील[3] गुदस्तांपासून ( येथें ) आहे; याजकरितां इंग्रजाचीं " आपला स्पर्धी ठेवून घेतला तेव्हां तुमचा स्नेह कसा राहील ! " अशीं पत्रें येऊं लागलीं व फरासीसाचा उपयोगही दिसेना; याजकरितां त्यास निरोप दिला. श्रीमंत राजश्री दादासाहेब आहेत तेथेंच आहेत; त्यांजकडे जावयास किरकोळ राऊत लुच्चे शें पन्नास जात होते त्यांस घाटोघाट चौक्या ठेवून धरोन आणिले; दहा वीस कल्याण तालुक्यांत गेले होते त्यांस कमाविस दारांनीं धरलें. त्यांची गडबड प्रस्तुत दिसत नाहीं. राजश्री मोरोबादादा, होळकर व सर्व मंडळी करेवरच आहे. राजश्री सखारामबापू भिवडीस आहेत. राजश्री महादजी शिंदे सालप्यास आल्याची बातमी आली आहे. त्यांजकडील नारो शिवदेव वकील पुढें आले ते काल येथें आले, राजश्री बाळाराव व बाबूराव केशव उद्यां परवांत येणार.

---

१ नाना फडनवीस. २ पत्र शिवाजी बाबाजीचें परशुरामभाऊंस. ३ फ्रेंचांचा वकील सेंट ल्युबिन्.

ते आले म्हणजे बोलून चालून पत्रें पाठवितील. तोंपावेतों निरेवरच मुक्काम शिंदे करतील. पुढें मनसबा होईल तो मागाहून लिहून पाठवूं. आपणाकडील लोकांची ऐवजाकरितां मोठी अडचण आहे; पैसा नाहीं; म्हणून लिहिलें तें कळलें. महाल गेले, राहिले त्यांचा पैका येणें कळतच आहे ! खर्च तर सुटत नाहीं. मोठाच पेंच ! इलाज नाहीं. कोठेंच ताल राहिला नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २३५१. श्री. ( ज्येष्ठ शु० १–२७ मे. )

छ० २९ रबिलाखर. नेकार नामकाची चिठी.

राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं. साष्टांग नमस्कार विनंति उपरी. आपण राजश्री तिमराव यांस पत्र पाठविलें त्याजवरून वर्तमान कळलें. उत्तर मशारनिल्हेनीं लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. येथें आपली प्रतीक्षा आहे. मुक्काम व्हावयाचें कारण हेंच आहे, तर त्वरा करून आपण उभयतांनीं लौकर लौकर यावें. येविशीं बोवांचें पत्र तात्यांस राघोपंतासमागमें गेलें तेंही पावलें असेल. येणें लौकर व्हावें. बहुत काय लिहिणें हे विनंति.

नं. २३५२. ( ज्येष्ठ शु० २–२८ मे. )

पत्र परशुरामभाऊचें गंगाधररावांस मिरजेसः—

" राजश्री नरसिंगराव धायगुडे व आपाजीपंत गोंधळे व लक्ष्मणपंत बर्वे ऐवज घेऊन निंबगांवचे मुक्कामीं काल बुधवारीं आले. " लोकांचा फडशा काल येथेंच करून लोकांस निरोप देऊन पुरंदरास जावें. फौजेसुद्धां तिकडे जाऊं नये अशी तोड काढावी " असें तेथें बोलोन आले आहेत. लेखकानीं आपले तर्फेनें उभयतां गृहस्थांस दिले आहेत. ऐवज तर थोडका. लोकांचें देणें तर भारी. कसा निकाल निघतो न कळे. "

१ मारो शिवदेव यांची शिंद्यांच्या लष्करांतून चिठी. २ महादजी शिंद्यांचें हरीपंतांस. ३ मोरोबादादांनीं.

नं. २३५३. ( ज्येष्ठ शु० २–२८ मे. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस—

" परवांचे दिवशीं मंगळवारीं राजश्री नानाकडून कारकून आला. त्याबरोबर राजश्री मोरोबादादानीं बापूस लग्नास जावयाचे पूर्वीं चिठी लिहिली होती ती राजश्री नानांचे हातास कोणेद्वारें खर्चवेंच करून आली; म्हणोन कारकून आला तो सांगत होता. ती येथें अस्सलच पाठविली. आम्हीं उभयतांनींच पाहून राजश्री पाटिलबावांकडे न्यावी. त्याप्रमाणें आह्मांस दाखवून काल पाटलांकडे गेला. चिठींतील आशय " पटवर्धनांचें व वडिलांचें व शिंद्याचें पारिपत्य नाहीं तरी आम्ही तुम्ही सर्वच बुडतों. सर्व दौलत नानाचे हातीं याचा विचार केला पाहिजे. याजकारितां विसाजीपंत व दादोपंत वाघोलकर असे पाठवावे. त्यांशीं बोलून आपणाकडे पाठवितों. ते सविस्तर सांगतां कळेल. " असा मजकूर चिठींत आहे. कांहीं गोपाळनाईक तांबवेकराचे हातची, कांहीं खुद्द दादांचें अक्षर, अशी अस्सलच पाठविली होती. असे प्रकार आहेत. शिंद्यांस कळावें यास्तव आजच पाठविली. काल बुधवारीं निंबगांवनजीक वेळापूर मान्याचें येथील मुक्कामास आलों तों रा॥ नरसिंगरावबाबा व विसाजीपंत व तिकडून लक्ष्मणपंत बर्वे व आपाजीपंत गोंधळेकर असे आले. कांहीं चिठी व कांहीं नक्त मिळून लाख रुपयांचा ऐवज आहे असें बाह्यात्कारें दर्शवितात. परंतु अंतर्यामीं तीनपावेतो अशी जनवार्ता आहे. परंतु कांहीं अंतःस्थ असेल असें वाटतें. काल मुक्काम करावा म्हणून ( त्यांचा ) फारच आग्रह होता. परंतु मुक्काम करितां नये. शिंदे यांजकडील पत्रें व निरोप वरचेवर येऊं लागले कीं, ' जलदी येणें. आम्ही तुम्हांसाठीं घांटतोंडीं अडकून राहिलों. ' त्यावरून आजचा मुक्काम नात्यापुत्याच्या सुमारें नेमिला आहे. "

नं. २३५४. श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० २–२८ मे. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. आम्ही आज गुरुवारीं निंबगांवाहून कूच करून महादेवाचे सुमारें गेलों. शिरटीकर बंदिवानांची याद तुम्हीं पाठविली ती पावली. त्याजवरून ठेवावयाच्या असामींची यादच वीस असामींची पाठविली आहे. इतक्या असाम्या ठेवून घेऊन बाकीच्यानीं " शिरटीकडे जाऊं नये. मिरज देशींच राहावें. " असा करार करून सोडून देणें. कांहीं देतील असें आहे, सबब ठेवावें. हे आशीर्वाद.

नं. २३५५. श्रीगणपति. ( ज्येष्ट शु० ९–३ जून. )

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता।। छ० ७ जमादिलावल सौम्यवारपर्यंत क्षेमरूप असों. विशेष. वडिलीं स्वदस्तुरची पुरवणी लिहिली ती पावून सविस्तर कळलें. भौमवारीं विप्र प्राप्त जाहला. सरस्वती घेऊन गृहस्याकडून आला. वडिलीं व गृहस्थानीं उभयतांनीं पत्र पाहून तिमराव याजकडील गृहस्थास पहावयास पाठविलेचा प्रकार कळला. ( ती चिठी ) कोणेप्रकारें प्राप्त जाहली ? दक्षणा म्हणावी तरी गोष्ट अभिनंवाचीच आहे. कंपीनीं आपली निखालसता पुरती कळावी म्हणून दिली असल्यास नकळे. सविस्तर आज्ञा करावी. तिमराव याजकडे गेले ही गोष्ट उत्तेजनाचीच आहे. " नरसिंगरावबावा व विसाजीपंत व वर्वे व गोंधळे आले. चिठी व

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस. २ पत्र गंगाधरराव यांचें मिरजेहून लष्करास परशुरामभाऊंस. ३ मोरोबानें सखारामबापूस गुप्तपणानें लिहिलेली चिठी नानांनीं मिळविली होती ती त्यांनीं कारकुनाबरोबर फडके, पटवर्धन व शिंदे यांस दाखविण्याकरितां पाठविली ती घेऊन. ४ नानाकडून. ५ हरीपंतांनीं. ६ शिंद्यांस. *आश्चर्याची. मूळ शब्द मोडींत असल्यामुळें ' अभिनवाची ' असाही वाचतां येईल, परंतु अर्थ बरोबर लागणार नाहीं. ७ सखारामबापूनीं. ८ आडनांव गोंवळेकर असें असतां त्याचें रूप ' गोंवळे ' म्हणजे 'गोंवळ करणारे अथवा गोंधळणारे' असें लिहिण्यांत गंगाधररावांनीं मार्मिक कोटि केली आहे ! गोंवळें हें गांव चिपळुणाजवळ आहे.

नक्त म्हणून एकाची बोलवा बाह्यात्कारें आहे; परंतु तीनपर्यंत अंतर्यामीं असेंही ऐकतों. अद्यापि भेट जाहली नाहीं. मुक्काम करावा म्हणून त्यांचा आग्रह होता, परंतु कूच जाहलें. सविस्तर कळलेवर लिहितों" म्हणून आज्ञा; व "मुक्काम करितां नये. राजश्री पाटलांकडे लौकर गेलें पाहिजे. त्यांचीं पत्रें तुम्हासाठीं मुक्काम करून घांटतोंडीं आहों असीं येतात. त्याजवरून आज गुरुवारीं नात्यापुत्याचे मुक्कामीं गेलों. चिठी घेऊन गृहस्थ गेला तोही येतो. दिवसेंदिवस समीप येत चालिलों. श्रीमंतांचे पुण्येंकरून भट्टीस उतरेल" म्हणून (लिहिलें,) ऐसीयासी प्रमाणच आहे. श्रीगजानन कार्यसिद्धिच करील. तीर्थस्वरूप राजश्री बापूंकडील प्रकार दहा तो पूर्वींच आलेचीं पत्रें वडिलांचीं आलीं होतीं. वरचेवर निकडीनें पत्रें पाठविलीं आहेत. वडिलांस येणेविशीं लिहिलें आहे, परंतु येणार नाहींत. पाल्हाळच लिहितील. त्यांजकडून खर्चास येणें कळतच आहे. वसुलास गाडदी मागत होते, वडिलीं पंचवीस देवितों म्हणतांच (त्यांनीं) नको म्हटलें! "तीर्थरूप मातोश्री रखुमावहिनींविशींही वडिलांसीं बोलिलों. त्यांनींही वर्तमान सांगितलें. सारांश सांगूं तें ऐकतील असा अर्थ नाहीं, जाणून लांबणीवर टाकिलें. मातुश्रीस खर्चाची अडचण आहे. दोन हजार म्हणत होती. मीही लिहितों. परंतु पांचसातशें देणें;" म्हणून आज्ञा. उत्तम. आज्ञेप्रमाणें देतों. वडिलांचे व मातुश्रीचे

---

१ एकच लाख रुपये आणिले आहेत असें म्हणताल, पण आणतांना तीन लाख आणले आहेत. २ मेघश्यामराव कृष्ण हे पत्र लिहिणाराचे व परशुरामभाऊचेही वडील चुलतबंधु व मंगळवेढें परगण्याचे मामलेदार. ३ दहा हजार रु. ४ परशुरामभाऊ व मेघश्यामराव हे दोघेही वडील चुलतबंधु असल्यामुळें या पत्रांत गंगाधररावांनीं दोघांसही 'वडील' शब्दानें उल्लेखिलें आहे. ५ तुम्ही. ६ मेघश्यामराव याची वडील भावजय व नारायणराव कृष्ण यांची स्त्री. हिचा पोटगीसंबंधानें दिराशीं कांहीं तंटा होता.

प्रकार सर्व वडिलांस विदित जाहले. वडिलांविना समजाविशी व्हावयाची नाहीं. वडिलांचें येणें जाहलेवर होईल. " तीर्थस्वरूप तुमच्या भेटीस येणार आहेत. आले तरी लौकर निरोप देऊं नये. मातुश्रीस बोलावून पंचाइतींत पाडून ठेवावें. मामलतीविशीं केवळ निष्ठुर जाबसाल जाहल्याशिवाय ताळ्यावर येणार नाहींत. रीत ठाऊकच. समयकाल पाहून करावें इतकेंच, परंतु मळमळीत केल्यास पैका येणें होणार नाहीं; " ऐशीयासीं वडिलांचें येणें जाहलेवर मीही विनंती हीच करणार होतों. असें केलेविना रुपये येणार नाहींत. वडिलांचे आज्ञेप्रमाणेंच होईल. बंदोबस्त हा वडिलीं अगोदर केला पाहिजे. वडिलांचें येणें मंगळवेढेहून जाहलेस आज्ञेप्रमाणें करितों. निरोप देत नाहीं. " तीर्थरूप मातुश्रीस भेटावयास आणविणार होतों, परंतु ठीक नाहीं," म्हणून लिहिलें; लौकरच भेट होईल. प्रमाणच आहे. न बोलाविलें हें उत्तमच जाहलें. श्रीकृपेंकरून श्रीमंतांची भेटही होऊन वडिलांचें येणें सत्वरच होईल. ' तोफखानेवाले यांचे लिहिणेंत राजश्री नानांत बापूंत भेद नाहीं. निखालसता फारच लिहिली आहे ' असें लिहिलें होतें; परंतु ' उभयतांच्या चिठ्या येत नाहींत म्हणून संशय आहेत. ( म्हणून लिहिलें, ) त्यास निखालसताही जाहलीच असेल. चिठ्या आल्या असल्यास आज्ञा करावी. " महिमंतगडाचे बंदोबस्तीविशीं वरचेवर लिहिणें. श्रीधरपंत घरास गेले म्हणून ऐकतों. त्यांस किल्लेस येणेविशीं लिहून बंदोबस्त करावा. तुम्हींही सावधपणें राहावें. " त्यास आज्ञेप्रमाणें महिमंतगडास लिहिलें आहे. श्रीधरपंतही बंदोबस्तीनेंच राहतील. मींही लिहिलें आहे. येथील बंदोबस्तही उत्तम प्रकारें आहे. वरचेवर आज्ञा केली पाहिजे. राजश्री तिमराव यांचीं पत्रें रविवारचीं काल पावलीं. रविवारीं लोणंदास शिंदे मुक्कामास गेले. इंदुवारीं निरेवर

जाणार. राजश्री बापूही भेटीस येणार असें आहे. यजमान वडिलां-कडून गेले होते. त्यांची व शिंद्यांची भेटी जाहली. करारांत गुंता नाहीं. परंतु आस्थाबुद्धि आहे असें लिहिलें होतें. सविस्तर वडिलीं ल्याहावें. तिमराव यांची भेट कोणेस्थळीं जाहली, कर्तव्य काय, कधीं आले, कीं काय (तें लिहावें.) नेने याणीं पुराहून जाणविलें जे, अजापालासह कपि निरेवर भेटीस येणार. असें ऐकिलेवरून त्यानीं कळविलें. त्यास जसी कवडी तसीच निरा दिसते. वडिलीं सावध असलें पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

नं. २३५६. (ज्येष्ठ शु० १२–६ जून.)

शिवाजी बाबाजीचें बाळासाहेबांस पत्र रवाना छ० १० जमादिलावल. मंदवासर. मुक्काम भिवडीहून—

" शिंदे जेऊरावर असतां राजश्री सखारामबापू भेटीस जाणार होते तें राजश्री मोरोबादादांच्या चित्तास न आलें; सबब राहिले. राजश्री बाळाराव व बाबूराव शिंद्याकडून आले. भेटी जाल्या. बोलणें चालणें जालें. दोन तीन दिवस होते. राजश्री मोरोबादादांचें शिंद्याकडे निराळें राजकारण होतेंच. त्यास असेरी किल्ला व जहागीर पेशजी द्यावयाचा ठराव जाला होता त्याप्रमाणें देतों म्हणून मान्य करून राजश्री बापूंस सांगून पाठविलें कीं, भेटीस तुम्हीं जावयाचें करावें. आम्ही येतों. या-प्रमाणें ठराव करून आपणच बापूकडे येऊन निश्चय केला आणि बुधवारीं परिंच्यास गेले. गुरुवारीं शिंदे याणीं निरेवरून कूच करून नजीक मोरेश्वरावर आले. राजश्री हरीपंततात्याही मोरेश्वरावर आले.

१ सहस्रबुद्धे कारकून 'कोंकणचे यजमान.' २ द्रव्याभिलाष. ३ रहिमतपुरा-हून कमाविसदार धोंडो केशव नेने यांनीं. ४ कवडी मुक्कामीं सखारामबापू मोरोबा-च्या भेटीस गेले त्याचा परिणाम नानावर प्राणसंकट ओढवलें. तसेच ते आतां निरेवर शिंद्यास भेटल्यावर शिंदे व बापू व होळकर सारे एक होऊन तुम्हांस दगा होईल, याकरितां सावध रहा, असा हा इशारा आहे.

भेटी जाल्या. राजश्री बापूंच्या भेटी काल जाहल्या. राजश्री मोरोबा दादा व मंडळीच्या भेटी आज होणार. भेटी जाहल्यावर आपल्या लष्करांत येणार. बोलण्याचा ठराव होईल तो लिहून पाठवूं. शिंद्याचा खंबीरच दिसतो. श्रीमंत राजश्री नाना किल्ल्यावरच आहेत. शिंदे श्रीमंतांच्या भेटीस येणार. कुंभारवळणावर मुक्काम करून भेटीस येणार. "

नं. २३५७. श्री. ( ज्येष्ठ शु० १२–६ जून. )

पा। छ० १२ जमादिलावल.

अपत्यें जिवाजी रामचंद्र साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ० १० जमादिलावल वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें न करावें. सदैव पत्रीं सांभाळ करावा. इकडील वर्तमान तर छ० ८ जमादिलावलीं येथें आले. राजश्री सखारामपंतबापू येथें आले आहेत. राजश्री हरीपंत तात्याच्या व बापू शिंदे यांच्या भेटी झाल्या. त्याचें वर्तमान तपशिलवार राजश्री भाऊसाहेबांनीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. ती। राजश्री अंताजीपंततात्या यादवाडकर इकडून आपणाकडे ऐवज किती आहे काय म्हणोन विचारावयास येणार आहेत, त्यास ऐवज आहे नाहीं कळतच आहे ! थोडाबहुत असेल त्याची याद त्यांस न दाखवावी. याप्रमाणें मला ती। राजश्री राघोबादादा याणीं आपणास ल्याहावें म्हणोन सांगितलें, त्यावरोन विनंति लिहिली असे. तात्यांची विद्या अबाधित आहे ! आपण पहिल्या भरावर न जावें. भलती एक गोष्ट त्यांजवळ बोलों नये. हें पत्र दुसरेस न दाखवावें. याचें उत्तर ल्याहावें म्हणजे दादांस दाखवीन. वृद्धाच्या भेटी जाल्या आहेत. पुढें काय

---

१ जिवाजीपंत पोतनीस यांचें पत्र लष्करांतून मिरजेस गंगाधररावांस. २ फडके व पटवर्धन मोरेश्वर येथें मुक्कामास आले.

होईल तें सेवेशीं लिहितों. " तोफखान्याकडे दारूगोळा वगैरे सामान शिरोळावर किल्याकडे दिलें आहे त्याचा जमाखर्च सरकाराकडे जाहला कीं नाहीं तें लिहिणें" म्हणोन आज्ञा. त्याचें उत्तर पेशजी विनंतिपत्रीं लिहिलें आहे. पुरंदरास गेल्यावर जमाखर्च जाला न जाला तें लिहितों. मंगळवेढेकडील दहा हजार रुपये मात्र आले, दुसऱ्या किरकोळ वराताही करीत आहेत. बहुत काय लिहिणें कृपालोभ करावा हे विज्ञापना.

नं. २३५८. श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० १२–६ जून. )

पै॥ छ० १३ जमादिलावल. सन तिस्सा सबैन.

आशीर्वाद उपरी. आम्ही श्रीक्षेत्रास गेलों तेथून पत्रें रवाना केलीं त्याजवरही अलीकडे दोन वेळ पाठविलीं. कांहीं कांहीं लिहिलें. ल्याहावयासी फावलें नाहीं. राजश्री नरसिंगराव धायगुडे, विसाजीपंत आठवले, लक्ष्मणपंत बर्वे, व अप्पाजीपंत गोंधळेकर, व परशुरामपंत लिमये जोतिपंत मामाचे चिरंजिव व आणखी एक दोन कारकून, स्वार पन्नास असे निंबगांवनजीक एलापूर येथील मुक्कामीं आले. दुसरे दिवशीं ( आम्हीं ) मुक्काम करावा अशी त्यांची मर्जी. आग्रह विशेषच केला. परंतु विदुराकडील निकडीचीं पत्रें दोन चार आलीं " जेऊरावर तुमची वाट पहात बसलों. तुम्ही अद्यापि येत नाहीं हें ठीक नाहीं. याउपर लांब लांब मजली करून जलद पुलाचे सुमारें येऊन लिहिणें. तों आम्हीही पुलावर येतों. " मुक्काम करितां नये. तेव्हां पांच सात कोसांचें कूच करितों असें सांगून ते दिवशीं बारा कोस जमीन चालून निरातीरास मुक्काम जाहला. तेथून राजश्री यजमान विदुराकडे रवाना केले जे, ' आम्ही आलों. तुम्ही कूच

---

१ मिरज किल्ल्याकडून. २ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस. ३ पंढरपुरास. ४ शिंद्यांकडील.

करून लौकर येणें.' दुसरे दिवशीं मुक्काम केला. ते दिवशीं भृगु वारीं सारी मंडळी राजश्री हरीपंततात्या घेऊन आमचे येथें आले. भेटी जाहल्या. आगत स्वागत दोन घटका जाहलें. पुढें बोलणें व्हावें तो वारा मोठा सुटला. पर्जन्य आला. गारा पडल्या. त्यांतच दोन डेरे राहुट्या देखील पडल्या. सारे भिजले. अस्तमान जाहला. तसेच ओलेते निघोन गेले. तेथें काळें रान होतें यास्तव दुसरे दिवशीं तीन कोसांचें कूच करून पुढें आलों. दुसरे दिवशीं शंभु-महादेवाजवळ होतों. कधीं देवदर्शन नव्हतें यास्तव जाऊन देवदर्शन घेऊन माघारे रात्रीस आलों तों बाळाजीपंतही विदुराकडून आले. ते दिवशीं ते घाटाखालीं कूच करून लोणंदावर आले. दुसरे दिवशीं मुक्काम त्यांचा तेथें जाहला. आमचाही इंदुवारीं मुक्काम जाहला. प्रातःकाळींच लक्ष्मणपंत वर्वे, अप्पाजीपंत व नरसिंगराव व विसाजीपंत राजश्री तात्यांसुद्धां ( आमचेकडे ) आले. त्यांतील सारांश अर्थ 'राजश्री मोरोबादादाकडून शफत घ्यावी. निखालसपणें दादांसीं वर्तावें.' हें वर्तमान नरसिंगराव यांस ठाऊक नाहीं. ते बोलण्यांत नव्हते.— तेव्हां आम्हीं त्यांस सांगितलें जे, 'आम्ही कांहीं हरामखोर नाहीं. पहिलें वचन राजश्री बापूस व नानास दिलें आहे. हल्लीं त्रिवर्ग एकत्र जाहले म्हणोन पत्रें येतात. त्यास यावरून आम्ही फौजेस निरोप देत देत येयपावेतों आलों. पुढें तुह्मांजवळ खर्चास दिलें आहे तें आह्मास द्या. लोक जातील त्यांस निरोप देऊन आम्ही येत आहों. निराळी ( मोरोबाशीं ) क्रिया कशास पाहिजे ! तथापि नाना दादा एक, किंवा दादा बापू एक, किंवा नाना बापू एक, किंवा त्रिवर्ग एक ! याचा विचार कसा तो आह्मास सांगणें त्यासारखें तुह्मास सांगूं.' तेव्हां याचें उत्तर

---

१ शिंदे. २ चार वर्षांपूर्वी गंगाबाईची स्थापना करण्याची मसलत ठरली तेव्हां.

त्यांचे वस्तु जाहलें नाहीं. भोजनें आमचे येथेंच केलीं. फिरोन बोलत होतों. तेव्हां निराळेंच लक्ष्मणपंत बर्वे यांसीं बोलणें जाहलें. तेव्हां त्यांसीं सांगितलें कीं ' बापू दादा एक असले तर चिठी बापूची घेऊन येणें. जसें बापू सांगतील तसें करूं. ' असें सांगून त्यांची खानगी मंगळवारीं गडास केली. ते दिवशीं मुक्काम जाहला. रात्रीस पत्र पाटलांकडून आलें जे, ' बापू भेटीस येणार होते ते राहिले. आम्ही कूच करून पुलावर जातों. तुह्मी तेथें लौकर येणें ' त्याजवरून बुधवारीं कूच करून होळकरावर (?) निरातीरास आलों. बापू भेटीस पुढें येणार होते. परंतु मोरोबादादास संशय जाहला कीं ' हे पुढें जाणार; तेव्हां काय बोलतील (न कळे!) पुढें जावयाचें काम नाहीं. शिंदे येथेंच येत आहेत. बाळाराव व बाबूराव केशव येथें आले आहेत. त्यांचे मुद्दे असतील ते कबूल करितों आणि त्यांनीं जाऊन त्यांसीं घेऊन यावें. येथेंच तुमच्या आमच्या त्यांच्या भेटी होतील. त्याजवरूच बापूस वाईट वाटलें. ते भिवडीस होते तेथून सासवडास आपले घरास गेले. आम्ही शिंदे एक होणार, जवळ जवळ जाहलों, तसे बुधवारीं तेथून बापू दादा व बजाबा व रघुपतराव व भिवराव व पांडोबा जोशी व आप्पा ( बळवंत ), रामचंद्र गणेश, गणेशपंत कात्रे वगैरे होळकर विसाजी कृष्ण शिवायकरून सारे दोन तीन हजार फौजेनिशीं परिंच्यास आले. हें वर्तमान शिद्यांस[1] कळतांच ( त्यांनीं ) जेजुरीची वाट सोडून पांडेगांवचा मुक्काम नेमिला. आम्हाकडे चिठ्या आल्या जे, ' भेटीस आले त्यांची भेट न घ्यावी हा विचार करून गडास लौकर जाणार. तरी तुम्ही मोरेश्वरच्या मुक्कामीं जलद येणें. ' त्यावरून दहा घटका दिवसास दशमीस गुरुवारीं कूच केलें. मोरगांवचे मुक्कामीं आलों. लोकांचे गवगवे

1 शिंद्यांस.

फार होते. आमच्या येथें घोरपड्यांचें धरणें होतें यास्तव मध्यरात्र मजलीस यावयास जाहली. येथें आलों तों नेमिल्याप्रमाणें शिंद्यांचा मुक्काम जाहला. ते मंडळी सारी गुरुवारीं तयार होऊन पुलाचे सुमारें आले तों शिंदे कूच करून गेले. भेटी न जाहली यास्तव खट्टे जाहले. सारी मंडळी पर्रिच्याहून कोथळ्यास मुक्कामास गेले. बापू मात्र नाझ-र्यास आले. भृगुवारीं पांच घटका दिवसास भेटतात असें कळलें. तेव्हां तसेच पहांटेच्या सहा घटका रात्रीस राजश्री हरीपंततात्या 'पाटलाकडे बापू आल्यावर त्यांची भेट जाहली नाहीं तों आपण भेटून पक्कें करून ध्यावें' याअर्थी गेले. त्यांची भेट जाहली. बोलणें जाहलें. मग निघोन आमचे येथें ( तात्या ) आले. वर्तमान सांगितलें. तसेंच आम्हीं ते मिळोन देवदर्शनास गेलों. माघारे तात्या आपले डेऱ्यास गेले तों बापूही आले. आणि राजश्री हरीपंततात्यांस शिंद्यांचें बोलावणें आलें. हे गेले. बापूची यांची भेट जाहली. " प्रान-शांचे मार्फतीचें बोलणें होतेंच. तसेंच तोच संकेत धरून येथपावेतों आलों. पुढें जसी आज्ञा कराल तसी वर्तणूक करूं " म्हणोन बोलून हरीपंततात्या माघारे आले. बापू शिंद्यांचे घरींच होते. त्यांचे मतें तोडजोड करावी, लढाई होऊं देऊं नये, असें आहे. यांत काय घडतें पहावें. चहूंकडे जांबुवंताचे खेळ आहेत !!! परिणाम लागणें श्रीगजा-ननाचे स्वाधीन ! येथपावेतों जालें तसें पुढें निभावल्यास भट्टी चांग-लीच आहे. पांच सात दिवस पत्रें सविस्तर वर्तमानाचीं गेलीं नव्हतीं यास्तव जाहला मजकूर लिहिला आहे. फावत नाहीं यास्तव दोन दिवस अधिक लागले. याउपर डाक ठेवावी. आमची शिंद्यांची भेट आज होणार आहे. चिंतो विठ्ठल श्रीमंत राजश्री दादासाहेबांस आणाव-यास्तव ( मुंबईस ) गेले आहेत. कसें होतें पहावें ! झूज जाहल्यास ठीक नाहीं. पळाले तर लांबतील यास्तव संकट. आब राखून होतें तर बरें

होतें. पुढें श्रीगजानन करील त खरें ! तीर्थस्वरूप राजश्री बापूस खर्चा-विशीं लिहिलें होतें, परंतु त्याणीं पाल्हाळच लिहिले आहेत ! यास्तव कांहीं खर्चाची तजवीज करून ल्याहावी. आतां येथें वैरण देखील मिळत नाहीं. चहूंकडून संकटें आहेत. यांत श्रीइच्छा प्रमाण ! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३५९. ( ज्येष्ठ शु० १४—९ जून. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. पै।। १३ जमादिलावल. रवाना छ० ५ जमादिलावल चें—

" मानाजी शिंदे यांची स्त्री व सासू, रास्ते यांच्या हवालीं होती त्यास राजश्री महादजी शिंदे यांचे विचारें आपले हवालीं करावी. दोन चार पत्रे आलीं. त्याजवरून रास्त्यानीं अथणीस आणिली. पु॑ इकडे आणावी त्यास मिरजेस तुम्हांजवळ पोंचवितील. प्यादे व स्वार व महादजी शिंदे यांस पत्र देऊन त्यांजकडे रवाना करावी."*

नं. २३६०. श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० १४–९ जून. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. तुह्मीं छ० ८ जमादिलावलचीं पत्रें भृगुवारीं कृष्णाजी खिजमतगार याजबरोबर पाठविलीं तीं आदित्यवारीं दोन घटका रात्रीस बेलसरे येथील मुक्कामीं पावलीं. यादवाड व तेरदाळचीं पत्रें " गजेंद्रगड गेला व टिपूची फौज बदामी नरगुंदकडे येणार. घटप्रभेस अद्याप उतार मोडला नाहीं. प्रांत गडबडला. " ह्मणून त्यांचीं पत्रें पहावयास पाठविलीं तीं पाहून मजकूर कळला. पत्रें पाहून माघारीं पाठविलीं आहेत. तूर्त शत्रूस ईश्वर अनुकूल त्यापक्षीं उपाय नाहीं ! नबाबाकडील माल ह्मणून

* १९ जमादिलावलचे पत्रांत—" मानाजी शिंदे यांची सासू व बायको पाठविली ती पावली. दोघींसही महादजी शिंदे यांचे स्वाधीन केलें. " असा मजकूर आहे. तें पत्र येथें छापलें नाहीं.

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावास.

त्याजकडील कपितान सांगतो ह्मणून लिहिलें तें कळलें. त्यास तो माल सोडून द्यावा ह्मणून पेशजी तुम्हांस लिहिलें आहे. तो माल सोडून द्यावा. नबाब निजामअलीखान गदवालाकडे आलेची बातमी लिहिली ती कळली. तिकडील बातमी अलीकडील आली नाहीं. राजश्री महादजी शिंदे यांच्या भेटी जाहल्यानंतर पत्रें रवाना केलीं आहेत त्याजवरून सविस्तर कळेल. राज्यास बुडावयासीं बाकी राहिली नाहीं! पुढें बंदोबस्त होणें हा श्रीमंताचे दैवेंकरून जाहला तरच न कळे. काळजी कोठवर करावी! बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३६१. **श्रीगणपति.** (ज्येष्ठ शु० १४–९ जून.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव[1] यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० १४ जमादिलावल बुधवार प्रातःकाळ रुजू भोमवार[2] मुक्काम बेलसरें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री महादजी शिंदे यांची भेट जाहल्यानंतर मोरगांवचे मुक्कामावरून तुह्माकडे पत्रें पाठविलीं आहेत त्याजवरून सर्व कळलें असेल. रविवारीं मोरगांवाहून कूच करून जेजुरीस जाऊन देवदर्शन करून येथें आलों. काल सोमवारीं श्रीमंतांची भेट जाहली. राजश्री महादजी शिंदे व सारे फौजेनिशीं भेटावयास येथून सहा कोस आलों. राजश्री नाना नारायण देवळाजवळ भेटावयास किल्ल्यावरून खालीं आले. तमाम लहान मोठे सरदारांच्या व लोकांच्या भेटी जाहल्या. श्रीमंतांचे खासे डेरे किल्ल्याखालीं दिले. तेथें श्रीमंत होते. लोकांचे भेटीचा समारंभ उरकून खासे खासे श्रीमंतांचे भेटीस गेलों तरी

---

१ गंगाधरराव. २ पूर्वी लिहिण्यांत अशुद्ध पडलें तर तें न खोडतां पुढें 'रुजू' ही अक्षरें लिहून दुरुस्ती करण्याची वहिवाट होती. भाऊनीं पत्र मंगळवारीं रात्रीस लिहिलें पण उद्यां रवाना होईल या समजुतीनें रवाना वार बुधवार लिहिला. नंतर शामूद रात्रीसचा निघतोसें पाहून 'भौमवार' अशी दुरुस्ती केली.

चार घटका श्रीमंत डेऱ्यांत बसून मुजरा लोकांचा घेऊन विडे दिले. धणियाचे पाय पाहिले, आनंद जाहला तो कोठवर लिहावा ! लोक कसाला सोसून आले, श्रीमंतांस पाहून बहुत संतोष जाहला. श्रीमंतांची बोलावयाची व बसावयाची व देखणेपणाची तारीफ काय लिहावी ! अति उत्तम आहे. भेटी जाहल्यानंतर तोफांची सरबत्ती खालीं व किल्लेवर जाहली. श्रीमंत चार पांच घटका दिवस अस्तमानास राहिले-नंतर किल्लेवर गेले. राजश्री बापूंची भेट श्रीमंतांजवळ जाहली. कारभारी यांसीं बसोन चार घटका बोलोन राजश्री हरीपंततात्या व पाटीलबावा व आह्मी निघोन सा घटका रात्रीं गोटास आलों. नवे कारभारी व त्यांज-कडील मंडळीपैकीं कोणी भेटीस नव्हते. याजउपर बोलणें बंदोब-स्ताचें होईल तें मागाहून लिहून पाठवूं. तूर्त येथें वैरणीची काडी मिळत नाहीं. तीन चार दिवस कही यावयास पाहिजेत. त्यांत पाव-साळे दिवस. तट्टांत बाकी राहिली नाहीं. आज कहींसाठीं दोन पथकांपैकीं पांच सातशें लोक राजश्री रामचंद्र रुद्र यांसमागमे देऊन निरा उत्तरतीरीं राहून कही भरून पाठवावी असी ताकीद करून कही लावून दिली. नेहमीं तेथें राहून कही पाठवितील. येथील फडशा श्रीकृपेंकडून लौकर जाहल्यास उत्तम. नाहींतर खर्चाचा वेध बसेल. शत्रु सबळ जाहला. अवळ करवीरकर आहेत. लबाडीस चुकावयाचे नव्हत. याजकरितां तुम्हीं बहुत सावध असावें. चिरंजीव राजश्री दामोदरबाबा मोरगांवचे मुक्कामीं आमचे भेटीस आले ते आह्माजवळच आहेत. राजश्री अप्पाजी त्रिंबक यांचीं मुलें माणसें तिकडील गडबडीमुळें निघोन तेरदाळास आलीं होतीं तेथेंही लोकांचे वस्तु राहवत नाहीं, याजकरितां ऐनापुरास येणार. त्यास धाकटें उगार वगैरे हरएक जागां जाग्याची सोय करून द्यावी. तिकडील लोकांस मिरजेशिवाय थारा नाहीं असा समय आला आहे. श्रीमंतांची

बाललीला काय लिहावी! केवळ ईश्वर-स्वरूपी आहेत! चिरंजीव राजश्री बळवंतराव व चिरंजीव तात्या नेहमीं श्रीमंतांजवळ असतात. खालीं आले होते. तेथेंच भेटी जाहल्या. सदैव पत्र पाठवीत जावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २३६२. श्रीगणपति. (ज्येष्ठ शु॥ १५–१० जून.)

पै॥ छ० १६ जमादिलावल. सन तिस्सा सबैन. ज्येष्ठमास.

आशीर्वाद उपरी. महादजी शिंदे यांचे (व) आमचें लष्कर मोरेश्वराजवळ गुरुवारीं मिळालें. दुसरे दिवशीं भृगुवारीं रा॥ सखारामपंतबापू भेटीस आले. भेट जाहली. तेथेंच राजश्री हरिपंततात्यास बोलावून भेट घेतली. आगत स्वागत जाहलें. हरिपंतासीं बापू बोलिले जे, " होळकराची व शिंद्याची समजाविशी करावी, या विचारांत आहों. परंतु समजाविशी होत नाहीं. खटपट करून पाहतों " ह्मणोन बोलिले. बापू शिंद्याचे घरीं अस्तमानपावेतों राहून " मोरोबादादा वगैरे सर्व मंडळी भेटीस परिंच्याच्या मुक्कामीं आली होती. त्यांचा अव्हेर करून आपण न भेटले. त्यांची भेट घ्यावी. नाहीं तर अपेश मजला येतें. " याप्रमाणें शिंद्यांस बहुत प्रकारें सांगितलें आणि भेटी व्हाव्या असा सिद्धांत केला. मग आपण नाझऱ्यास मुक्कामास होते तेथें आले. मंदवारीं शिंद्याच्या हरिपंत आदिकरून आह्माकडील मंडळीसह भेटी प्रातःकाळपासून दोन प्रहरपावेतों जाहल्या. उपरांतिक शिंदे दहा हजार फौज व तोफखाना समागमें घेऊन मोरोबादादाचे भेटीस आले ते बापू नाझऱ्यास होते तेथें गेले. त्यांचेच डेऱ्यांत जाऊन बसले. दादा मंडळीसह दोन तीन हजार फौज घेऊन आले त्यानिशीं परिंच्याहून गुरुवारीं निघाले, ते कोयळेंनजीक जेजुरी येथें येऊन राहिले

---

१ बळवंतराव कृष्ण व हरिहरराव पुरुषोत्तम पटवर्धन मंगळवेढेकर. २ परशुराम-भाऊचें पत्र मिरजेस गंगाधररावांस.

होते. तेथून फिरोन नाझऱ्यास बापू होते तेथें आले. शिद्यानीं पुढें जाऊन भेट घ्यावी तें न करितां बापूच्या डेऱ्यांत भेट घेतली. संभाषण उभयपक्षीं कांहीं न होतां तसेच उभाउभी निघोन शिंदे मोरेश्वरावर होते तेथें आले. दादा मंडळीसह निघाले ते सासवडाजवळ कोडिता-नजीक पहिले होळकराजवळ होते तेथें आले. मंदवारीं रात्रीं शिद्याच्या डेऱ्यास बोलून निश्चय करावा या अर्थें आह्मी व हरिपंततात्या व मालोजी व शंकराजी घोरपडे व अप्पाजीराव पाटणकर असे गेलों. तीन प्रहर रात्रपावेतों बोलणें जाहलें. त्यांतील तात्पर्य पाहतां बापूनीं शिंद्याजवळ येऊन बहुता प्रकारें मागून घेतलें कीं, " हा दोष मजकडे. आमचेविशींची क्षमा करावी. हा दोष मजकडे खरा, परंतु राखावें. मोरोबा आपल्यास कैद करींत होता म्हणोन आलों. या उपरी तुमचे विचारास येईल तसा कारभार करावा. जें नाना तुम्ही सांगाल तें ऐकूं. राजश्री हरीपंताच्या व परशुरामपंताच्या मनांत याविशीं वांकडें फारच आलें आहे. त्यांची खातरजमा होत नाहीं ते खातरजमा व्हावी " अशीं बोलणीं जाहलीं असे स्पष्ट शिंद्याच्या बोलणेंत भाव आढळले नाहींत; परंतु बातमींत वर्तमान आहे. आणि पक्केपणीं पहातांही खरें. त्याजवरून शिंद्यानींही वचन दिल्हें असें आढळलें. आमच्या त्यांच्या बोलण्यांत भाव निघाले. " जलदी करून जाऊन झुजावें तर पळून जातील. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे जातील अथवा आणखी एखादीकडे जाऊन खूळ माजवितील तेव्हां जड पडेल. तेव्हां खर्चा-खालीं यावें लागेल. तुमचे फौजेंत दंगा, तेव्हां जलदी कशी करावी ? यास्तव रविवारीं कूच करून पुरंदराजवळ जाऊं. श्रीमंतांची व नाना-ची भेट घेऊं. पुढील तरतूद कशी करितात हें समजून त्यांचे आमचे विचारें ठरेल तसें करूं. विशेष बोलावें बर खर्चाच्या अडचणी हे बाह्यात्कारीं, पण आंतील बापूंचें बोलणें जाहलें हे भाव; तेव्हां आह्मी

आग्रह करून फल काय ? आणि आमचे गुजारतीचें राजकारण नव्हे. परभारें नानानीं केलें. आह्मीं आग्रह कशास करावा, या अर्थे तेंच वाजवी ह्मणोन रविवारचें कूच ठराव करून उजाडतां गोटास आलों. ' मसलत लांबवूं नये. जलदी करावी. नाहीं तर घोडीं मरतील; ' असें बोलून आलों. त्यांचें बोलणें ' जलदीच करितों. दिवसगत लावीत नाहीं. ' रविवारीं कूच होऊन आम्ही कोथळ्यांवर राहिलों. बेलसरें मार्गे टाकून खळदाजवळ शिंदे राहिले. मजलीस येतां येतां जेजुरीस देव-दर्शनास गेलों. राजश्री बापू तेथे ते दिवशीं राहिले होते हें कळल्या-वर राजश्री हरीपंत बापूंकडे गेले. विशेष बोलणें नाहीं. प्रदोष होता म्हणून लौकरच निघोन मजलीस आले. ' दुसरे दिवशीं तेरा घटकांत इंदुवारीं श्रीमंतांस नानानीं घेऊन किल्ल्याखालीं यावें. तेथें शिंद्यांच्या आमच्या भेटी व्हाव्या. ' असा निश्चय जाहला. मजलीस आलों तों राजश्री नानानीं शिवाजीपंत यांसीं पाठविलें जे, "शिंद्यानीं काय ठरविलें आहे ? जलदी करावी. दिवसगत लावूं नये. " आम्हीं त्यांचें बोलणें मंदवारीं रात्रीं जाहलें त्यांतील भाव ' दिवसगत लावून मळमळीत करावें असें दिसले ' असें सांगून पाठविलें. ( शिवाय सांगून पाठविलें कीं ) " आपण शिंद्यांची भेट घ्यावी. आपण समक्ष बोलून काहीं भि-डेनें कांहीं त्यांचें, कांहीं आपलें, असें करून सिद्धांत करावा. " भेटीचा निश्चय जाहला. इंदुवारीं प्रातःकाळींच तयारी करून ( श्रीमंतांच्या ) भेटीस गेलों. बापू जेजुरीजवळ होते तेही भेटीच्या समयास आले. आधीं शिंद्यांच्या व श्रीमंतांच्या व नानांच्या भेटी जाहल्या. मागाहून हुजुरात व सर्व आमच्या मंडळीच्या भेटी जाहल्या. अस्तमानाच्या सुमारास कांहीं पर्जन्य पडला. सहा कोस जाऊन सर्वांच्या भेटी होऊन निघा-वयासीं अस्तमान जाहला. अर्ध घटका नानाचें आमचें बोलणें जाहलें. शिंद्याचें व बापूचें कांहीं वेळ, शिंद्याचें व नानाचें बोलणें घटकाभर

जाहलें. मग शिंदे, नाना, बापू असें बोलणें जाहलें. त्यांतील अर्थ पहातां जांबुवंत याचे मतें आपले मंडळींचें संरक्षण करावें. शिंद्याची होळकराची भेटी करावी. मग नानानीं कारभार करावा. मोरोबाचे चित्तास येईल तें करावें.म्हणजे आमचींच बोटें आमच्याच डोळ्यांत घालावीं, वरकडांचें सर्वांचें संरक्षण करावें ! उपरांतिक आमचें नानाचें तात्यासुद्धां बोलणें जाहलें. त्यांतील निश्चय ' शिंद्यांच्या लष्करांत (नानानीं) यावें. खडखडीत बोलावें. मग ठरेल तें खरें. ' शिंद्याच्या बोलण्यांतही ' बोलण्यास लांब पडतें. बापू तुम्हीं आम्हीं बसून निश्चय करावा. ' त्याजवरून आज नानानीं यावें असें ठरलें आहे. आज बुधवारीं दोन प्रहरानंतर येथें येतील. मग बोलणें काय होतें पहावें. फल कांहीं चांगलें दिसत नाहीं. काल बुडता आला. शिंदे होळकर उभयतां सरदार. त्यांत खुद्द शिंद्याजवळ फौज भारी. आमचीही हुजरातसुद्धां फौज बारा तेरा हजार. शिवाय नानाजवळ पांच हजार लोक. कंपेश चाळीस हजार फौज. गाडदी तोफखाना उभयपक्षाचा म्हणतां मातबरच सरंजाम. तिकडील होळकरसुद्धां सोळा पंधरांचा अजमास. याप्रमाणें फौजा आहेत परंतु कांहीं कार्य दिसत नाहीं. आंत आंत मनस्वी राजकारणें ! कोणाचाही विश्वास येत नाहीं. आणशफतेत ताल कांहीं राहिला नाहीं. न्हिंतो विठ्ठल श्रीमंतांकडे गेलेच आहेत. मोरोबादादा फौजा आणखी ठेवितात. फार तर दोन तीन हजार ठेवतील. असो. वैरणीचाच तोटा. घोडीं सारीं मरावयाचाच समय आला आहे. येथें आठ पंधरा दिवस राहिल्यानें काय होईल हें समजत नाहीं. ज्यापक्षीं घडीस एक बोलणें येथचें, तेव्हां काय खरें मानावें ? बापूंच्या मनांत " होळकर यांची समजावीस करून द्यावी, आणि नारो गणेश होळकराचे दरबारांतून काढावे आणि गंगोबाचे चिरंजीव घालावे. बजावा आदिकरून आपली मंडळी तिकडे मिळाली तिचें

संरक्षण करावें. मग मोरोबा आदिकरून कोंकण्यांचे चित्तास येईल तें करावें !" म्हणजे 'कांहींकडून तुमचेंच वाईट,' असे भाव आहेत. यांत काय ठरेल तें मागाहून लिहून पाठवितों. इतक्यांत श्रीमंत येतात किंवा काय पहावें. चिंतोपंत तर तेथें जाऊन पावले. बापूंच्या मनांत आमच्या व हरिपंतांचे विषयीं वांकडें फार आहे. असो ! श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून आम्हीं निष्ठेनें सेवा केली आहे. बापूंशीं चहूं पांच वर्षांत वांकडेंपण कांहीं केलें नाहीं. त्यापक्षीं चिंता नाहीं. त्यांचीं कर्में त्यांस जाचून याचे प्रतिकार करितील. हां मनांत द्वेष आणून वांकडेपणें नीट व्हावें असें नानाशीं बोलतात. काय ठरेल तें मागाहून लिहितों. आज उद्यांत काय ठरेल तें लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद. येथें आमची खर्चाची अडचण आहे ती श्रीहरि जाणे ! तुम्ही तरी काय कराल ! परंतु इलाज नाहीं. समय या प्रकारचा. तीर्थस्वरूप राजश्री बापूकडील ऐवज लौकर येत नाहीं. यास्तव आजपावेतों जसें संभाळिलें तसें आणखी महिनाभर संभाळावें. दहा हजार रुपयांची तजवीज करून जरूर रवाना करावे. अनमान न करावा. जरूर जरूर जाणोन लिहिलें असे. याउपर पुढें लांबलेंच तर मग पहातच आहों. याउपर मोरोबादादा व होळकर काय करितात पहावें. असो. श्रीइच्छेनुरूप घडेल ! आह्मी चिंता करीत नाहीं. सर्व भार श्रीगजाननावर आहे. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तीर्थस्वरूपानीं येथील सर्व प्रकार लिहिले आहेत. कुरूंदवाडास वर्तमान लिहीत जावें. तेथील एखादा कारकून विश्वासू आणून मातुश्रीबाईस कांहीं वर्तमान वरचेवर सांगून पाठवीत जावें. पत्र ल्याहावें म्हणून मातुश्री लिहितात; परंतु पृथक लिहितां नये, यास्तव वडिलीं लिहीत जावें हे विज्ञापना.

नं. २३६३. श्रीगणपति: (ज्येष्ठ व. ३–१३ जून.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल तां॥ छ० १७ जमादिलावल मंदवार दोन प्रहर मुक्काम बेलसरें वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्हीं छ० १३ जमादिलावलचें पत्र मंगळवारचें पाठविलें तें भृगुवारीं तृतीय प्रहरीं पावलें. शत्रूची फौज यादवाड व मुधोळपावेतों आली या बातमीचीं पत्रें राजश्री अंताजीपंत यांचीं तेरदाळाहून आलीं तींच तुम्हीं पाठविलीं तीं पाहून मजकूर कळला. कृष्णेसही अद्याप उतार मोडला नाहीं. याइश्वाडाचा फडशा जाहला. खासा हैदरखान जाले-हाळाजवळ आहे. कांहीं फौज पुढें आली. याजकरितां तेरदाळचें ठाणें राखावें म्हणून अंताजीपंत यांस लिहन पाठवावें. "इकडील समेट होऊन फौज कर्नाटकास बंदोबस्तास आली तरच उत्तम. नाहींतर ठीक दिसत नाहीं. स्थळें घेत शत्रु येतो." म्हणून लिहिलें तें कळलें. शत्रूचें दैव अनुकूल ह्मणून पन्नास साठ हजार फौज शत्रूच्या पारिपत्याजोगी जमा असोन आपआपल्यांतच कलह निर्माण होऊन पुणें देश लुटीत फौज बसली आहे! अद्याप कोणताही ठराव नाहीं. हजार प्रकारें विवेक व्हावा ही गोष्ट उत्तम आहे. अविवेकांत नफा नाहीं. यांत ईश्वरें काय योजिलें आहे नकळे! शत्रूस तो आडकाठी नाहीं. कोणतेंही स्थळ रहात नाहीं. त्यास फुरसतही तसीच पडली! येथील मनसबा उरकता तर ठीक होतें. नाहीं तत्रा१ विवेक जाहला तरी तिकडे फौजा या दिवसांत येणें ही गोष्ट दुरापास्तच. यांत श्रीसत्ता प्रमाण. करवीरकर दगाबाजीस चुकावयाचे नाहींत. येविशीं बहुत सावध असावें. श्रीमंतांची भेट जाहल्यानंतर कृष्णाजी खिजमतगारासमागमें सविस्तर लिहि-

---

१ गंगाधरराव. २ तेरदाळचे फडणीस अंताजाशिंकर.

लेख आहे त्याजवरून कळेल. राजश्री बापू व नाना लष्करांत येऊन राहिले आहेत. भानगड लागली आहे. अद्याप ठरावांत गोष्ट आली नाहीं. ठराव होतांच लिहून पाठवितों. आज उद्यांत ठराव होईल. सारांश अर्थ काल विलक्षण आहे त्याच्या या गोष्टी आहेत ! कोठेंच ताल नाहीं. काल रास्ते आणखी पांच सातशें हुजरातचे लोक व शिंद्याकडील दोन तीन हजार फौज घाटाचे बंदीस व पुण्याचे रखवालीस गेली आहे. राजश्री मोरोबादादाकडील मंडळीस सर्वांस पत्रें गेलीं आहेत. एकूण चिवडाचिवड आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

सेवेशीं अण्णाजी त्रिंबक साष्टांग नमस्कार विज्ञापना. मुलें माणसें तेरदाळास होतीं. काय गत जाहली कळेना ! त्यांस रहावयास मिरजेसच घर देवावें. हे विज्ञापना.

नं. २३६४. ( ज्येष्ठ व० ४—१४ जून. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेशीं पो रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ता. छ० १९ जमादिलावल भानुवार दोन प्रहरपावेतों यथास्थित असे. विशेष. तेरदाळचें ठाणें आज प्रहर दिवसानंतर घेतलें त्यांचे लोक हत्यारें सुद्धां लावून दिले. कागदीं पत्रीं जाबसाल लांबीवर पडों लागला, यास्तव पांच सहाशें लोक जमा करून ठाणें घेतलें, परंतु त्याची फौज माघारी जाइजेपर्यंत रखवालीचा बंदोबस्त चांगला पाहिजे. व दारूगोळी ठाण्यांतील त्यांनीं नेली, दारूगोळी व सरकारचे लोक शें दीडशें ऐसे येतीलसें केलें पाहिजे. येथील काटकांवर भरंवसा नाहीं, समयीं अवसान सोडणार, यास्तव हुजुरून लोक आले

१ मोरोबास सोडून इकडे निघून या अर्शी कारभारी व शिंदे यांची पत्रें. २ हैदरअलीचे.

म्हणजे अवसान बसेल, यास्तव लिहिलें आहे. मीं आपणास लिहावें असें नाहीं. सारांश बंदोबस्त होय तो अर्थ केला पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंति.

नं. २३६९.[1] श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० ३–१३ जून. )

पै॥ छ० २० जमादिलावल. सन तिस्सा सबैन. पौष मास.

आशीर्वाद उपरी. आज दोन चार दिवस घालमेल राजश्री नानाचे व बापूचे समजाविशीची लागली आहे. किरकोळ ठराव जाहला. ' देवावें ' नाना अलीकडे करीत होते तें करूं नये असें बापू बोलतात. ' कदाचित् नानाचा आग्रहच असला तर माझा संतोष नाहीं. ' येविशींचें उत्तर प्रति उत्तर आज दोन दिवस होत आहे. राजश्री मोरोबादादाकडीलही बोलणें ( नानाकडे ) लागलें आहे. त्यांतील भाव " तुम्हीं आम्हीं एक होऊन वृद्धांस पटकी द्यावी. " परंतु शिंद्यांचे विचारें ' मोरोबादादा ठीक नाहीं. बापू व नानानीं एक व्हावें आणि काम कारभार करावा. ' सारांश कोणाचें पारिपत्य होत नाहीं, बखेडा आहे तो आहे, असा प्रकार दिसतो ! होळकर यांची समजाविशी होत आहे. मोरोबादादांचे मतें " मजला मेळवून घ्यावें. नाहींतर आपण मरून जाईन, परंतु निशाण, शिक्के कटार देणार नाहीं ! याजबद्दल मरणें जरूर. " यांचे मतें तर दोन्हीही आणावीं. दादांबरोबर लोक मुत्सद्दी मंडळी सरदार पागे सर्वांस येथून चिठ्या गेल्या आहेत जे, ' निघोन येणें. ' कोणी कोणी येतों येतों म्हणतात. होळकर यांची बोली लागली आहे, ते आले म्हणजे सारेच येतील असेंही आहे. आज उद्यांत काय तें निश्चयांत येईल. सारे खेळ वृद्धाचे आहेत ! सर्वांचे मतें मोरोबाचें पारिपत्य करावें. वरकड कोणाचें होत नाहीं ते पक्षीं आमचे मतें मोरोबाचेंही करूं नये. सर्वांबरोबर

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस.

त्याचीही समजाविशी करावी असें आहे. परंतु कांहीं घडत नाहीं! आज उद्यांत निश्चय होईल तो लिहितों. शत्रु तर तिकडून निकड करीत आला आहे. काल या प्रकारचा, त्यांत श्रीमंतांचा प्रताप व श्रीगजाननाची इच्छा! दुसरें कांहीं नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३६६. ( ज्येष्ठ व० ४-१४ जून. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस मिरजेस:-

" तुम्हीं १३ जमादिलावल मंगळवारीं पत्र पाठविलें तें मंदवारीं छ० १७ मिनहूस पावलें. " शत्रु गजेंद्रगडाजवळच आहे. सडी फौज. यादवाड व मुधोळपावेतों आली. बदामी घेऊन धारवाडास येणार कृष्णेस अद्यापि पाणी नाहीं यामुळें अलीकडील व पलीकडील प्रांत गडबडला आहे. गजेंद्रगडकरांस लाख होन देणें म्हणून शत्रूनें संधान लाविलें आहे; " ह्मणून लिहिलें तें कळलें. तिकडे फौजा जातपावेतों त्याचें पाऊल पुढेंच आहे! कृष्णेस व घटपेस पूर आला तरच बचाव आहे!"

नं. २३६७. ( ज्येष्ठ व० ४-१४ जून. )

पै॥ छ० २१ जमादिलावल. सन तिस्सा सबैन. ज्येष्ठमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १८ जमादिलावल. वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्हीं छ० १४ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें आजच पावलें. " यादवाड, तेरदाळ व जमखिंडी हीं ठाणीं गेलीं. खासा हैदरखान मुधोळचे सुमारें आला. कृष्णेस पाणी नाहीं यामुळें घाताची बाकी नाहीं! मिरज फोडावी कीं काय? " ह्मणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐसीयास या दिवसांत कृष्णेस पाणी नाहीं तेव्हां ईश्वरच त्यास अनुकूल असा प्रकार जाहला! मिरजेचा

आसरा. जो येतो तो तेथें येतो असी आवाई. तेथपावेतों येऊन नदीस पाणी नाहीं, त्याजपक्षीं फौज सडी येऊन दगा करावयास चुकणार नाहीं. याजकरितां मिरज फोडावी. याउपर तुम्हीं चार माणूस नामी जिल्हाळ्याचे ठेवावे. बहुत सावध असावें. वरचेवर दर-रोज वर्तमान लिहावें. येथील प्रकार अद्याप प्रथम दिवस! तुमचीं पत्रें आतां आलीं तींच कारभारी यांजकडे पाठविलीं. आम्ही दरबारास जातों. बोलणें जाहल्यानंतर मागाहून लिहून पाठवितों. जमाखंडी-सारखी जागा गोळी न वाजवितां गेली! असो! काल—महिमा खरा! याजपुढें उपाय नाहीं. तुम्हीं सावध राहणें. येथील प्रकार दोन चार दिवसांत उलगडा होऊन पुढील तरतूद व्हावीसा आहे. तुमचें पत्र आल्यापासून कांहींच सुचत नाहीं. तासगांव कुरुंदवाडचीं (माणसें) आलींच असतील. होणार तदनुरूप घडेल, चिंता कोठवर करावी! सर्व भार श्रीगजाननावर आहे. तीर्थस्वरूप राजश्री तात्या मुलें माणसें-सुद्धां आले कीं नाहीं हें लिहून पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. कुरुंदवाडचीं मुलें माणसें आणविलींच असतील. नसलीया आणवावीं. पागा वगैरे घोडीं आदिकरून जेथें सोय दिसेल तेथें ठेवावीं. हे विज्ञापना.

नं. २३६८. ( ज्येष्ठ व० ६–१६ जून. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेसः—

पै॥ २२ जमादिलावलः—

" येथील वर्तमान तर दोन चार दिवस होळकरांचें बोलणें शिंद्याकडे लागलें होतें. त्यांतील तात्पर्य "वृद्धांनीं आपणास फसविलें, अबरूस खत्ता पावलों; जें तुम्हीं केलें तें आम्हीं केलें; आम्हीं केलें तें

---

१ अंताजी विठ्ठल पटवर्धन यादवाडकर,

तुम्हीं केलें. तुम्ही आम्ही भाऊ; त्यापक्षीं तुम्हीं केलें तेंच आम्हांस मान्य. रा. मोरोबादादांचेही ठीक करून द्यावें, नाहीं तर काशीस पोंचवून द्यावें. अथवा त्रिवर्गास एक करून द्यावें. मोरोबादादानीं आपली फौज जमा केली, त्यांतील लोकांस जेवण केलें. ' आपले मरणाचे सोबती असतील त्यांनीं जेवणास यावें. ' त्यावरून हजार बाराशें पात्र भोजनास जालें. मग किती मरतात पहावें ! मोरोबादादा, बजाबा, बापोजी नाइकाचे चिरंजीव, हे त्रिवर्ग मरणार. त्यांनीं कृतसंकल्प केला आहे ! ' समजावीस करून आपल्यास दोघे ( कारभारी ) तसे तिसरे असें करावें. आणि जरीपटका, शिकेकट्यार आहे तशी राखावी. ' असें मोरोबांचें बोलणें आहे तें यांचे चित्तास येत नाहीं. उभयतांचेही विचारें " ( मोरोबा ) निखालस आपल्याशीं चालणार नाहींत. त्यापक्षीं मिळवून घेऊं नयेत. जितके त्यांत मिळाले आहेत त्यांतून फुटून येतील त्यांस आणावे. न येतील त्यांचें परिछिन्न पारिपत्यच करावें. " होळकरांची तर समजावीस जाहल्यादाखल. तेव्हां फक्त (मोरोबा) राहिले. मग पळतात किंवा लढाई करितात न कळे. "

नं. २३६९. ( ज्येष्ठ व० ६–१६ जून. )

पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस—

पै॥ २२ जमादिलावल.

" शत्रूकडील फौज रायबागेकडे आली, व करवीरकरानीं आपाजी शामजी, विशाळगडकर प्रतिनिधी, व अमात्य यांस एकांतास बोलावून कैद केलें. सटवोजी भोंसले जमाव घेऊन शत्रूकडे जाणार " म्हणून व शत्रूकडील बाणदार कुडचीस आल्याचें लिहिलें तें कळलें. चिरंजीव राजश्री हरिहरराव यांचे नांवें सरकारची सनद मुहूर्तानें घेतली, ती तुम्हांस पहावयास पाठविली आहे. ही जतन खासगीचे रुमालांत ठेवावी. कीर्दीसही नांव लिहावयास आरंभ केला. "

---

१ हैदरअलीकडे.

नं. २३७०. श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० ६–१६ जून. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० २० जमादिलावल भौमवार सकाळ वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्हीं छ० १४ जमादिलावलचें पत्र बुधवार पांचवे तासीं रवाना केलें तें रविवारीं प्रहर दिवसास पावलें. राजश्री त्रिंबकराव व अंताजीपंत यांचें पत्र बातमीचें पाठविलें तें पावलें. जमखिंडीस ( शत्रूचें ) ठाणें बसल्याची बातमी अंताजीपंतानीं लिहिली त्यावरून कळली. " यादवाड व मुधोळची पेठ मारून ( शत्रूनें ) खराब केली. कृष्णेस उतार आहे याजमुळें अलीकडे यावयाची आवाई दाट. कसा प्रसंग पडतो न कळे. शहरांत माणूस चहूंकडून फार भरलें. याजकरितां निरोप द्यावा कीं काय ? याजउपर सरकारांतून तरतूद करून फौज आल्यासच बचाव आहे. नाहींतर ठीक नाहीं. कुरुंदवाड व तासगांवची मंडळी आणविली. गांवगन्नाचे प्यादे आणिले. आणखी नवेही आणविले आहेत. सारांश सान्यांनीं मिळोन तूर्त राज्य रक्षावें " म्हणून लिहिलें तें कळलें. ऐसियास पत्रें तुमचीं येतांच उत्तर लेहून येथून जासूदजोडी रवाना केली. व जिवाजी खिजमतगारही रवाना केला आहे त्याजवरून सर्व कळेल. जमखिंडीची जागा चांगली. एकाएकीं जावी व द्यावी अशी जागा नाहीं. राजश्री भास्करपंतमामा यांचा बंदोबस्त चांगला. मामा एकाएकीं ठाणें गमावतील असें मनांत नव्हतें ! ! ! फौज व तोफा मोर्चा नसतां ठाणें स्वाधीन जाहलें; अपूर्व आहे ! तस्मात् काल–महिमा ! लाख रुपये खर्चून गढी बांधून गोळी न वाजवितां ठाणें गमाविलें ! असें झाल्यास काय करावें ! ! पाऊस नाहीं. या दिवसांत कृष्णेस उतार तेव्हां ईश्वरी क्षोभ ! यास उपाय नाहीं. उतार असल्यास शत्रु हांवभरी जाहला, कावा साधत चालल्यानंतर अलीकडे नये असेंही ह्मणतां नये. याज-

करितां गांव जरोरा करावा म्हणून लिहिलें आहे; तसें करावें. तुह्मींच फार माणूस चांगलें ठेवून बंदोबस्त उत्तम प्रकारें करून सावध असावें. या कामांत इतबार कोणाचा नाहीं. बहुत सावध असावें. सारी अब्रू या काळांत एक जाग्यावर आहे. जागाही नामांकित ! लौकिकाप्रमाणें बंदोबस्त करून मजबूत असावें. राजश्री त्रिंबकराव यशवंतही आल्याचा मजकूर लिहिला तो कळला. सदाशिवपंत यांजकडील पत्राच्या नकला पाहून पाठविल्या त्या पावल्या. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे आशीर्वाद.

नं. ३३७१. श्रीगजानन. ( ज्येष्ठ व० ६–१६ जून. )

पै॥ छ० २२ जमादिलावल. सन तिस्सा सबैन. ज्येष्ठ मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. राजश्री सखारामपंतबापूनीं पानशांचे विचारें रा॥ नानाशीं सधान राखलेंच होतें. आणि मोरोबाचें करणें ठीक नाहीं, मोरोबानीं शिंद्याकडे जात होते त्यासमई दगा करावयाचें केलें होतें, हें पुरतें समजलें. आणि नानासीं मिळाल्याशिवाय ठीक नाहीं असें समजून शिंद्यांचे विद्यमानें बोलणेंचालणें होऊन केवळ निखालसपण होऊन याद ठरली. त्यांत विशेष कलमें नाहींत. परस्परांनीं निखालस असावें याप्रें॥ ठराव होऊन काल इंदुवारीं दहा घटकांनंतर एका घटकेंत राजश्री नानाची व बापूची आणशपथ बेलभंडार शिंद्याचे विद्यमानें जाहला. कांहीं दिकत राहिली नाहीं असें दिसतें. उभयतांही फजित पावून निखालस जाहलें, तेव्हां दरज नाहीं असें वाटतें आणि दरजही राहिली नाहीं. या समयीं पक्केंसें जाहलें आहे. त्यानंतर उभयतां मिळोन सायंकाळचा चार घटका दिवस राहतां आमच्या येथें आले. वृद्धास आमचा संशय होता. बोलणें दोन घटका जाहलें. " उभयतां एक जाहले; श्रीमंतां-

---

१ संडा. मोकळा. भोसाड. २ मिरजेचा किल्ला. ३ पत्र परशुरामभाऊचें.

च्या पायांपाशीं निष्ठेनें वर्तणूक करणार; त्यापक्षीं आमचा दुसरा अर्थ नाहीं. " ह्मणोन आम्हीं वचन दिल्हें. त्यांणीं बेलभंडार दिल्हा. आम्हींही दिल्हा. बोलण्याचें इंगित पाहतां निखालसच दिसतें. दिकत दिसत नाहीं. मग ज्याचें कर्म तो जाणे! चिरंजीव राजश्री हरिहरराव[1] यांचे नांवें काल इंदुवारीं सरकारची सनद पांच घटकेंत घेतली ते पाठविली आहे. पावेल. उत्तर पाठवावें. शिंदे होळकर यांच्या भेटी काल जाहल्या. उभयतां मिळोन नानाच्या डेऱ्यास आले होते. तेथून होळकर शिंद्याचे घरीं आले आहेत. मेजवानी जाहली. राजश्री हरीपंततात्या शिंद्यांचे घरीं होळकरास भेटावयास गेले होते. तेथील बोलणें आज कळेल ते लिहून पाठवितों. उभयतां सरदार व रामचंद्र गणेश व कांहीं किरकोळ सरंजामी मिळोन कर्नाटकांत रवाना करावे असें घाटत आहे. दोन चार दिवसांत रवानगी होईल असें वाटतें. मोरोबाचें ठरलें म्हणजे फौजेची रवानगी होत असे. संदेह नाहीं. श्रीमंत राजश्री दादासाहेब ममईस आहेत. विशेष नाहीं. चिंतो विठ्ठल[2] तेथें पावले. तरतूद कांहीं नाहीं. तिकडील स्वस्थ आहे. पुढें काय होईल ते होऊ. पुण्यास दोन तीन हजार फौज येथून रखवालीस गेले आहेत. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३७२. श्रीगणराज. ( ज्येष्ठ व० ८–१८ जून. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विष्णुपंत[3] स्वामी गोसावी यांसी.

पोष्य- महादाजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ० २२ जमादिलावल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें आज दोन प्रहरां पावलें. लिहिला

१ पांडुरंगराव गोविंद वारल्यामुळें त्यांचे पुत्र हरिहरराव यांचे नांवें पेशवेसरकारांतून सरदारीची सनद नवीन मिळाली ती. २ पोतनीस नि॥ मिरजकर हल्लीं पुण्यास लष्कराबरोबर होते ते. ३ कुरुंदवाडकरांचे कारभारी.

मजकूर कळोन समाधान झालें. " कारभारी व शिंदे होळकर सर्व एकरूप जाहले. एकनिष्ठपणाचें बोलणें जाहलें. राजश्री मोरोबादादाचें बोलणें शिंद्याकडे लागलें आहे त्यासही मिळवून घेणार. आठ चार रोजांत शिंदे होळकर व राजश्री रामचंद्र गणेश हुजरातसुद्धां फौजा सत्वरच हैदरखानाचे पारिपत्यास रवाना होणार " म्हणोन लिहिलें, बहुत उत्तम. याप्रमाणें होऊन फौजा लौकर आल्यास शत्रूस जरब बसेल. शत्रूची फौज यादवाडाहून निघोन रामदुर्ग मुदलावीच्या सुमारें गेली. (त्यानें) यादवाडची दीड लाख रुपये खंडणी घेऊन भागती गांव लुटून सत्यानाश केला. देसाई यास धरून समागमें नेला. करवीरवासी याणीं राजश्री अप्पाजी शामजी व प्रतिनिधि व अमात्यपंत वगैरे बारा तेरा असामी करवीरास बोलावून नेऊन विश्वासघात करून बसविले. दोन तीन रोज उपाशीं कोंडून ठेविले होते. त्यांपैकीं प्रतिनिधि व अमात्यपंत उभयतांपासून पांच लक्ष रुपये खंडणीच्या देणेंप्रमाणें पावले म्हणोन कबज लिहून घेऊन सोडून दिल्हे. बाकी आपाजी शामजी व बावडेकराकडील कारभारी व बाबूराव फडणीस व राघोबा पायऱ्या व संवदत्तीकर गोसावी वगैरे अकरा असामी अटकेंत ठेविले आहेत. अप्पाजी शामजी यांजकडून ' ठाणीं स्वाधीन करणें ' म्हणोन तमाम चिठ्या लिहून घेतल्या. वडगांव आदिकरून स्वाधीन जाहलीं. कोगनोळी व निपाणी व चिकोडी यांच्या चिठ्या घेतल्या आहेत परंतु हस्तगत होणार नाहींत, यास्तव सटवाजी भोंसले सात आठशें स्वार व प्यादे दोन हजार जमा करून जावे या अर्थें बाहेर ढाला दिल्या आहेत. काय करितो पहावें. राजमंडळकरांचें भय कोण वाळगतो ! शत्रूचें मात्र भय. तो माघारा गेला. आतां भीत नाहीं. राजमंडळकरांचें राजकारण त्याकडे आहे. तो

---

१ नं. २३११ स तहृ छापला आहे त्याप्रमाणें पेशव्यांस अकरा लक्ष रु० खंडणी द्यावयाची त्या रकमेपैकीं. त्या रकमेस करवीरकरांच्या तर्फे हे लोक हमीदार झाले होते असें दिसतें.

माघारा गेला तेव्हां (यांच्यानें) कांहीं होणें नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंती. आणखी वर्तमान होईल तें ल्याहावें हे विनंती.

नं. २३७३. ( ज्येष्ठ व० १०–२० जून. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. रवाना

छ० २४ जमादिलावलचें—

" काल या प्रकारचा, सारीं मुलेंमाणसें एक जागां, हें ठीक नाहीं. याकरितां देशीं एखादा किल्ला मागून घ्यावा म्हणून लिहिलें तें प्रमाणच. कारभारी यांचे कानावर मजकूर घातला आहे. "

नं. २३७४. ( ज्येष्ठ व० १०–२० जन. )

पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस—

" होळकरानीं शिंद्याचे विद्यमानें सरकार लक्षांत रहावें असें ठरोन होळकरानीं मकारनामकापासून आज मंदवारीं कूच करून कुंभार वळणावर आले. शिंदेही कूच करून होळकराजवळच गेले. उभयतां मिळोन एक जागां राहिले. राजश्री मोरोबादादानीं पुण्यांत जाऊन स्वस्थ रहावें असा ठराव जाला आहे. दादाचें कूच पुण्यास जाल्यावर येथील गुंता उरकला. नंतर उभयतां सरदार कर्नाटकचे मसलतीस येणार. "

नं. २३७५. **श्रीगणपति.** (ज्येष्ठ व० १०–२० जून. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. संतू गाईकवाड आला त्याअलीकडे पत्र येत नाहीं त्याजवरून चिंता लागली आहे. पत्रें रवाना करावयासी आळस कां जाहला हें ल्याहावें. शत्रु माघारा गेला ह्मणोन कळलें. त्यास तो दगाबाज आहे. कृष्णाबाईस पाणी नाहीं. कोणे समयीं काय करील नकळे. करवीरकरही लबाड, तेथें जाऊन मिळाले आहेत; तेव्हां कृष्णा दाक्षिणतीरचा फडशाच जाहला. राजकी वर्तमान तर होळकरांच्या व शिंद्यांच्या भेटी

जाहल्या. राजश्री नानाच्या व बापूच्या भेटी जाहल्या. बोलणें चालणें जाहलें. त्यांत राजश्री मोरोबादादानीं पुण्यांत जाऊन स्वस्थ रहावें. वरकड मंडळी येथें कारभारी यांजवळ यावे. आज होळकर शिंदे एकत्र जाहले. कुंभारवळणावर गेले. याचा अर्थ मोरोबादादाजवळ होते ते अलीकडे आमच्याजवळ आले. शिंदे आमच्या मागें होते ते पुढें गेले, याउपर दादाकडील फौजेस निरोप देणार, एक दोन दिवसांत निरोप देतीलच. नच देतील तर देवितील! राजश्री महादजीबावानीं श्रीमंतांचे चरणांशीं फारच निष्ठा धरून राजश्री नानाचे लक्षाप्रमाणें वर्तणूक करितात, राजश्री नानाचा भार सर्व पाटलावर आहे, त्यानींच बापूंची व नानाची निखालसता करून दिली. बाकी राहिली नाहीं. उभयतांही शहाणे, याउपर कर्नाटकांत उभयतांनींही जावें असें घाटत आहे. चार दिवसांत रवानगी होईल असें दिसतें. यांत हरिसत्ता प्रमाण. दादाकडील फौजेस निरोप जाहल्यावर मग फौजांचे रवानगीची तरतूद होईल. श्रीमंत ममईसच आहेत. विशेष कांहीं नाहीं. फरांशिसांचा वकील येथें होता त्यास निरोप दिला. इंग्रजांचे मनांत वांकडें येऊं लागलें यास्तव निरोप दिला. वरकड मंडळीचें कसें कसें होतें तें मागाहून लिहितों. फारकरून क्षमेंतच आले. येथील फौजेस निरोप जाहला ह्मणजे आम्हीही निरोप घेतों. तिकडे फौजेची रवानगी लौकर होय तें करीत आहों. घडेल तेव्हां खरें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३७६. श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० १०—२० जून. )

पै॥ छ० २४ जमादिलावल. सन तिस्सा सबैन. ज्येष्ठमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. शिंद्याची होळकराची भेट जाहली. उभयतां कारभारी यांची निखालसता शिंद्याचे

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस.

विद्यमानें जाहली. व कारभारी यांची व होळकराची निखालसता शिंद्याचे विद्यमानें होत आहे. मकोरनामकाचा गुंता उरकतांच फौजा कर्नाटकांत रवाना करावयाचा प्रकार कारभारी यांसीं बोलिलों. वृद्धाचे चित्तीं तोच प्रकार आहे हें पेशजी तुह्मास लिहिलें आहे त्याजवरून कळलें असेल. मकारनामकाचें अद्याप उरकलें नाहीं. उरकतांच तिकडे येतों. दोन चार दिवसांत उरकेल. काल शिंदे होळकराचे येथें गेले आहेत. आज वर्तमान कळेल त्यासारखें लिहितों. आज दोन दिवस मीं निकड तिकडील रवानगीविशीं लाविली आहे. काय घडतें पहावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तीर्थरूप मातोश्री बाई व उभयतां चिरंजीव आलेच असतील. वरकड चीजवस्त कुरुंदवाडाहून आणिलीच असेल. बाकीचीही आणवावी. हत्ती पागा वगैरे आपलीं जिकडे जातील तिकडे हत्ती, घोडीं कुरुंदवाडचीं लावून द्यावीं. बहुत बहुतच सावधपणें असावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. २३७७. श्रीगणपति. ( ज्येष्ठ व० १०–२० जून. )

आशीर्वाद उपरी. राजश्री मोरोबादादानीं जाऊन पुण्यास रहावें असा ठराव जाहला आहे. परंतु आंतील बातमी पळून जाणार अशी आहे. चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त केला आहे. जवळ जवळ लष्करें उतरलीं आहेत. परंतु न जाणों, कोठें कोणे वेळेस जातील ! एक शिवनेरीस जावें असें, दुसरें शत्रूकडे जावें असें आहे. तिसरें मुमईस जावें. मग कोणीकडे जातात किंवा शत्रूकडे जातात न कळे. इकडील घांटाची वगैरे बंदोबस्ती आहेच. परंतु कदाचित् शत्रूकडे जाऊं लागल्यास त्याच रानांतून जातील, यास्तव हें पत्र तुम्हांस

---

१ मोरोबादादाचा. २ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस. ३ हैदरअलीकडे

लिहिलें आहे. तर येविशींची बातमी ऐनापुर वगैरे येथें असावी. आपणासही कळेल तसी चौकशी असों द्यावी. हें घडणार नाहीं, येथेंही बंदोबस्त आहे, परंतु सुचला प्रकार लिहिला आहे. श्रीकृपेंकडून लौकरच उलगडा व्हावासा आहे. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३७८. ( ज्येष्ठ व० ११–२१ जून. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस. रवाना छ० २९ जमादिलावलचें—

" मोरोबादादानीं पुण्यास जाऊन सुखरूप रहावें असें ठरलें. होळकर तेथून निघोन सासवडाजवळ आले. शिंदेही तेथेंच गेले. वरकड विसाजी कृष्ण व आनंदराव गोपाळ वगैरे सारे सरदारही आले. बाकी राहतां बजाबा व बाबूजी नाईक यांचे पुत्र व पांडोबा व बळवंतराव जिवाजी व धोंडोपंत जोग वगैरे चार हजार फौज आहे. सर्वांस निरोप देऊन आपण दोनशें स्वारांनिशीं जावेंसें ठरलें आहे. "

नं. २३७९. श्रीगणपति. (ज्येष्ठ व० १४–२३ जून. )

आशीर्वाद उपरी. मकारनामकाकडील जाबसाल पाटीलबावांचे विद्यमानेंच लागला आहे. होळकर उठोन आल्यानंतर त्यांचाही दुसरे दिवशींच उरकावा, त्यास एक दिवस अधिक लागला. तेव्हां तावल्याशिवाय लौकर उरकणार नाहीं, म्हणून राजश्री हरीपंततात्या व आम्ही फौजसुद्धां तयार जाहलों. चिरंजीव राजश्री दादास पुढें भिवडीनजीक फौजेसहित रवाना केलें. आम्ही एकटे मशारनिल्हेच्या डेऱ्यास गेलों तों झाडून मानकरी तयार होऊन जलदीनें काम करावें हा बेत दिसला. ही गलबल मकारनामकांसही कळून घाबरे होऊन तयार होऊन आले. होळकराचे विद्यमानें पाटीलबावांकडे निरोप व कारकून आले कीं,

१ ऐनापूर येथें कृष्णेस उतार असतो सबब. २ पांडोबा व बळवंतराव जिवाजी हे उभयतां खासगीवाले. ३ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. ४ मोरोबाकडील. ५ हरीपंतांच्या.

"आतां आपला जीव वांचवा. पुणें व शिवनेर येथें राहत नाहीं. चांभारगोंदें, पेडगांव, जांबगांव व वाफगांव यांतून कोठेंही राहूं." असें सांगून पाठविलें. तेव्हां कलागत कमी व्हावयाचा सुमार आला. तेव्हां राजश्री बाळाराव व गोपाळ नाईक तांबेकर व होळकराकडील कारकून मकारनामकाकडे जाऊन बोलून येत तोंपावेतों उतावळी करूं नये असा पाटीलबावांचा निरोप राजश्री नानाकडे आला, त्याजवरून सोमवार. अस्तमानपर्यंत फौज चौकी दाखल उभी राहिली. तेव्हां उभयतां सरदारांनीं "मंगळवारीं सकाळीं दादाकडील गुंता ठेवीत नाहीं. पळोन गेले तर आह्मास जिमा लागला." असें ठरोन उभयतांकडील दिवाणजी व हजार पांचशें खासे दादांचे डेऱ्यांत चौकीस बसविले. मग सरकारची फौज चार घटका रात्रीस गोटास आली. बारा घटका रात्रीस भोजन जाहलें. सोमवार प्रदोषाचे दिवशीं इतका प्रकार जाहला. वाफगांवीं तर राहूंच नये. पाटीलबावांचे आसऱ्यास राहावें असें ठरलें आहे बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २३८०. श्रीगणपति.( ज्येष्ठ व० ३०—२४ जून. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. रविवारीं रात्रीं सिद्धांत जाहला जे 'होळकर वगैरे सर्व आले. बाकी फक्त दादा वगैरे बजाबा व चार हजार किरकोळ फौज आहे. याउपर जातील. राहणार नाहींत. मनसबा लांबणीवर पडेल. दिवसगतीवर न घालावें. यास्तव प्रातःकाळींच फौज भिवडीस पाठवावी; म्हणजे जाऊं पावणार नाहींत.' राजश्री मोरोबादादाचें बोलणें आम्हास शिवनेरीस राहूं द्यावें; किल्ला आम्हाकडे असो द्यावा. यांचे विचारें 'किल्ला परिच्छिन्न त्यांजकडे ठेवूं नये. त्याणीं पुण्यांत स्वस्थ रहावें. वरकड त्यांजकडील मंडळी आहे त्यांचीं अनुक्रमें सर्वांचीं पारिपत्यें जरूर क्षेपनिक्षेप व्हावीं.' असा

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ नानांचे.

सिद्धांत जाहला. तेव्हां त्रयोदशी इंदुवारीं प्रातःकाळीं आह्मास (व) आणखी पथकें तयारी करविली. आम्हीं चौकीस जावें असा सिद्धांत जाहला. तों मागती विचार जाहला (कीं) सारीच फौज जाऊन चौकी बसवावी आणि आजच्या दिवसांत फडशा करावा. त्याजवरून राजश्री हरीपंततात्या आदिकरून राजश्री नानाची देखील फौज तयार जाहली. आम्ही सासवडाजवळ चिरंजीव राजश्री दादा व बळवंतराव असे जाऊन पुढें लष्करापासून अदकोसावर उभे राहिलों. साऱ्या फौजा तयार होऊन येतात असें जाहल्यावर तेही तयार जाहले. होळकर त्यांचे मध्यस्त. त्यांजकडून त्यांचे दिवाण राजश्री नारो गणेश व सुलतानजी लांबहाते असे शिंद्यांचे येथें आले. " आम्ही मध्यें आहों. आज फडशा करितों. फौजा जाऊं देऊं नयेत." शिंद्याचे विचारें 'तावून साधावें.' त्याजवरून 'तिसरा प्रहरपावेतों जाऊं नये. तयार असावें.' असें होऊन जेथील तेथें उभेच होतों. आमची फौज पुढें गेली ती माघारी आणविली. तिसरा प्रहर जाहला. ते वेळपावेतों कांहीं जाबसाल नाहीं. उगेच गोपाळ नाईक व दादा पोतनीस असे होळकराचे येथें आले. फिरोन तयारी जाहली. तेव्हां बोलण्यांत निश्चय ठरला कीं " जीव जगवावा. बहुल ह्मणोन गांव आहे तेथें रहावें अथवा शिंद्यांचे घरीं पेडगांव, जांबगांव, चांभारगोंदें जेथें ठेवाल तेथें राहूं. " असें (मोरोबाचें) बोलणें जाहलें. येव्हां असें बोलून रात्रीस गेले तर कसें करावें ? हें (बोलणें) पडलें. चौकीस रात्रीं फौज पाठवावी. तेही रात्रीं राहिले. शिंदे यांची फौज असावी. उभयतां दरम्यान पळाल्यास. असें होऊन त्यांची फौज चार घटका रात्रीस त्यांजवळ गेली. मग आमची फौज माघारीं आली. प्रदोषाचें जेवण दीड प्रहर रात्रीस जाहलें. काल फडशा व्हावा परंतु जाहला नाहीं. उद्यां होईल किंवा किती दिवस

---

१ शिंदे होळकर.

लागतील नकळे ! उभयतां मध्यस्तीस पडले आहेत त्यांचे विचारें करावें लागतें, यास्तव एक दिवस अधिक लागला. हे आशीर्वाद.

नं. २३८१. ( आषाढ शु० १–२५ जून. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस–पै०२ जमादिलाखरचें—

" होळकरांसमागमें विसाजी कृष्ण व आनंदराव गोपाळ वगैरे सर्व सरदार आले. होळकराचे विद्यमानेंच मकारनामकाचें बोलणें सुरू आहे. आम्हीं द्वादशीस कोथळ्याहून कूच करून खलत, खानोडी, येकतपूर येथें मुक्कामास दोन कोस आलों. राजश्री नाना व हरीपंततात्या व आम्ही मिळोनच उतरलों. सासवड येथून दोन कोस आहे."

नं. २३८२. ( आषाढ शु० १–२५ जून. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस रवाना

छ० २९ जमादिलावल. मुक्काम खलद येथून—

" हैदरखानाकडील उपद्रवाचा मजकूर विस्तारें लिहिला तो कळला. मुधोळ, जमखिंडी, यादवाड व तेरदाळ येथील वर्तमान ऐकतां अनाहूतच गोष्टी जाल्या ! येथील समारोप जाल्याशिवाय फौजा तिकडे यावयाची तरतूद होत नाहीं. होळकर व पथकें उठून आल्याचा मजकूर लिहिलाच आहे. काल इकडील फौज तयार जाली त्याजवरून त्यांची फौज तयार जाली. इकडील आज्ञा मात्र होती म्हणजे लुटले जाते. व त्या समयीं पळोन जातील याजकरितां बोलणें चालणें पडलें. पुण्यांत राहावें असें यांचें म्हणणें. त्याजकडील बोलणें शिवनेरीस रहावें. याजकरितां घालमेल पडली. शेवटीं संध्याकाळीं ठराव जाला कीं, वाफगांव होळकराकडील तेथें रहावें. शिंदे यांजकडील पेडगांव-जांबगांव-चांभारगोंदें या चार स्थळांतून जागा नेमणूक करून ठेवावें. याप्रमाणें बोलण्यांत आलें. त्यास शिंदेच दरम्यान जाले.

शिंद्याच्या तीन स्थळांपैकीं जो जागा त्यांच्या विचारास येईल तेथें ठेवणार. फौज दूर करावी व जरीपटका सरकारांत आणून द्यावा या ठरावास एक दुसरा दिवस लागेल. होळकरसुद्धां पथकें उठोन आल्यावर त्यांचे खुद ठेवणुकेची मात्र चार पांच हजार फौज राहिली. तितक्यानिशीं लढावें याप्रमाणें उमेद धरली होती. झुजत नाहींत, करीत नाहींत, हें समजलें असतां आविर्भाव कां न आणावा; याकरितां करून पाहिलें. राजश्री बजाबा मोरोबादादा यांजविशीं मात्र वचन जालें. वरकड ज्याणीं ज्याणीं लबाडया केल्या आहेत त्यांचें पारिपत्यच होणार. "

नं. २३८३. श्रीगणपति. (आषाढ शु० १–२५ जून.)

पै॥ छ० ३ जमादिलाखर. सन तिस्सा सबैन आषाढ मास.

आशीर्वाद उपरी. मानाजी शिंद्यांस हैदरखानानें कैद केलें ह्मणून आज आठ दिवस वर्तमान ऐकितों. काल आणखी महादजी शिंदे यांजकडे बातमी मानाजीस कैद केल्याची आली. याचें कारण राजश्री मोरोबादादा यांनीं मानाजी शिंद्यांस पत्र पाठविलें होतें कीं, " महादजी शिंदे यांची दौलत तुम्हास देतों. तर पत्र पावतांच निघोन येणें. " म्हणोन पाठविलें होतें तें पत्रच हैदरखानास सांपडलें. यांजकरितां मानाजी शिंद्यास कैद केलें. हें प्रमाण वाटावयाचें कारण बाजीराव बर्वे यांची पागा येथें पाटीलबावांकडे पहिल्यापासोन आहे व पाटीलबावांकडे हैदरखानाचेंही सूत्र आहे. बर्व्यांचे कागदपत्र त्यांजकडे येत असतात. पाटीलबावांनींच 'कैद केला खरा. आमची बातमी आली' म्हणोन सांगितलें. त्याजवरून प्रमाण वाटतें. वागेल तयार्ये फलही तैसेंच आहे! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस.

नं. २३८४. ( आषाढ शु० २—२६ जून. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस— पै० ३ जमादिलाखरचें—

" काल राजश्री सखारामपंतबापूचा वाखा झाला आहे. दोन-चार ढाळ जाहले. वाडयांतच आहेत. उतारही पडेल. चिंता नाहीं. काल शिंदेदेखील बापूच्या तेथें आले होते. त्यांत ठराव जाला आहे कीं, लोकांस दादानीं निरोप द्यावा. मोरोबादादानीं बहुलेसच रहावें. चारशें स्वार सरकारचे नेहमीं जवळ असावे. रा. बजाबानीं कोणठाणास जाऊन गंगातीरीं रहावें. गोपाळनाईक यांनीं जाऊन क्षेत्रास पंढरीस रहावें. वरकडांचीं कळतील तशीं पारिपत्यें करावीं. असा प्रकार आहे. आजपासून लोकांस निरोप द्यावा. उद्यां येथून जावें, असें आहे. याउपर फौजेची तरतूद होऊन त्या प्रांतीं येणें होईल. "

नं. २३८५. श्री. ( ज्येष्ठ व० ६ श. १६९९—
२६ जून स. १७७७. )

* तीर्थस्वरूप मातुश्री आजीबाई वडिलांचे सेवेशीं अपत्यें हरी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ० १९ जमादिलावलपावेतों यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन बहुत संतोष जाहला. ऐसेंच सदैव पत्र पाठवून सविस्तर लिहून पाठवित जावें. राजश्री दादोंनीं व राजश्री दाद सावंत याणीं पत्रें लिहिलीं त्यांत कित्येक मजकूर लिहिला होता तो अक्षरशः कळला. त्याजवरून राजश्री महादजी शिंदे यांस पत्र पाठविलें. लाट व रांगोळी या दोनी गांवचा बंदोबस्त पेशजीप्रमाणें करून देतील. ' राजश्री दाद सावंत आपणाकडे येतील, कित्येक घराऊ मजकूर सांगतील; ' म्हणोन लिहिलें, त्यास मशारनिल्हे यांस पाठवून द्यावें. येऊन बोलोन

* हरीपंत फडक्यानीं हें व पुढचें अशीं हीं दोन पत्रें लिहिलेलीं येथें चुकून लागलीं आहेत. १ अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर. २ व्यंकटराव घोरपडे याणीं.

जातील. आम्ही तुंगभद्रेपलीकडे छावणी करणार होतों. परंतु ओढी-मुळें घडली नाहीं. याउपरी राजश्री परशुरामपंतभाऊंची भेट घेऊन ठराव होईल तो लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंति.

नं. २३८६. श्री. ( ज्येष्ठ शु० ६ श. १६९९–
२६ जून स. १७७७. )

राजश्री महादजी शिंदे गोसावी यांसी. सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित हरी बल्लाळ. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १९ जमादिलावल जाणोन स्व-कीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. आपण करवीरच्या मस-लतीस गेलां आहां, त्यास लढाई अगर तह होऊन फडशा होईल. तह होऊं लागेल तेव्हां राजश्री व्यंकटराव नारायण घोरपडे यांजकडे लाट रांगोळी दोनी गांव सरकारांतून करार करून दिले आहेत त्या प्रमाणें तहांत वजा करून त्यांचे त्याजकडे द्यावे. तीर्थस्वरूप मातुश्री आजीबाई[1] यांजकडील काम आहे. आपण मनापासून बंदोबस्त करून देतील हा भरोंसा आहे. फार काय लिहावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

नं. २३८७. श्रीगणपति. (आषाढ शु० ४–२८ जून. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ छ० ३ जमादिलाखर रविवार वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्हीं छ० २८ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें छ० १ जमादिलाखरीं पावलें. " देशीं किल्ला चांगला पाहून घ्यावा व तोफा घ्याव्या. मंगळवेढ्याचा ऐवज आणवावा. तेथील फडशा जाहला असलियास फौजा रवाना लौकर जाहल्यास ठीक.

---

१ सवाई माधवराव पेशवे यांच्या आजाची आत अनूबाई इचलकरंजीकर यांचें.

सुरापुरचें कापड किल्लेंत आणून ठेविलें. शत्रु माघारा गेला म्हणून बेफाम नाहीं, सावध आहों." म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशीयास मकारनामकानीं निघोन जाण्याचा ठराव जाहला हें सविस्तर लिहून पाठविलेंच आहे त्याजवरून कळेल. मकारनामकाचा काल भृगुवार वर्जवार होता म्हणून शिक्केकटार व निशाण व जरीपटका दिल्हा नाहीं. आज मंदवारीं येऊन उद्यां रविवारीं त्यांनीं निघोन बहुलास भीमातिरीं जावें. त्यांसमागमें उभयतां सरदारांकडील तीन चारशें लोक नेहमीं असावे. असा ठराव जाहला आहे. उद्यां जातात. फौजेसही निरोप देतात. कर्नाटकांत फौज रवाना करावयाची तरतूद होत आहे. उभयतां सरदार तिकडे आल्यानंतर बंदोबस्त होईलच. तूर्त त्याची काबू साधली आहे एवढें खरें. अद्याप कृष्णेस पाणी नाहीं! सीमा जाहली! येथें आज दोन दिवस आभाळ व बुरबुर थोडी थोडी लागली आहे, तेव्हां कोंकणांत पाऊस लागला असेल. आतां नदीसही पाणी येईल असें वाटतें. (शत्रूनें) बदामीस तोफा लाविल्या कीं काय हें ल्याहावें. राजश्री नानाशीं किल्ल्याचें व तोफांचें बोलोन ठेविलें आहे. स्वस्थसें जाहल्यानंतर दोनी कामें करून घेतों. पोलादाविशीं लिहिलें, पुण्यास लेहून पाठवून तुम्हीं लिहिलेप्रमाणें मिळाल्यास खरेदी करून पाठवितों. प्रतिनिधि व अमात्य करवीरकरानीं सोडले. आपाजी शामजीस सोडलें नाहींत. 'होळकराकडील पागेचीं घोडीं सुटावयाजोगीं असल्यास यत्न करावा' म्हणून लिहिलें तें कळलें. ऐसियास होळकराकडील घोडीं सुटावयाचा प्रकार जरूर साधल्यास पाहतच आहों. 'डाक बसविली' म्हणून लिहिलें तें कळलें. तुम्हीं पेशजी रहिमतपुरपर्यंत बसवितों म्हणून लिहिलें होतें. त्याजवरून आम्ही रहिमतपुरपा-

---

१ मोरोबा. २ हैदराची.

वेतों बसविली होती. आतां उठवून आणिवतों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३८८. श्रीगणपति. (आषाढ शु० ४–२८ जून.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. आज चतुर्थी रविवारीं राजश्री मोरोबादादा सडे दोनशें स्वारांनिशीं निघन बहुळास भीमातीरास जाणार. जातीलच. त्यांचा खासगत कारखाना मात्र त्यांसमागमें जावा, वरकड कोणीं जाऊं नये, असें बोलण्यांतच आहे. राजश्री बजाबा कोकमठाणास गंगातीरीं जाणार असें आहे अद्यापि निश्चय नाहीं. बहुधा येथेंच सासवडीं रदबदली करून राहतील असें वाटतें. पहिल्यानें बोलले, परंतु घर सोडून जाणें अवघड आहे! गोपाळ नाईक तांबेकर याणीं क्षेत्रांत रहावें. अथवा मालखेडास जावें असें आहे. मग कोठें जातील पहावें. वरकडावें कोणीं पुसलें नाहीं. याणीं जावसाल केला नाहीं. काल शिक्केकटार जरीपटका निशाणसुद्धां राजश्री नानाजवळ आला. उभयतां सरदारांकडील हजार स्वार तूर्त समागमें जाणार. चारशें नेहमीं त्यांजवळ रहावे असें आहे. शिवनेर किल्ला त्यांजकडे आहे त्याचे अंमोमत आहे. परंतु घ्यावा असें मानस यांचें आहे. घेतील असें वाटतें. यानंतर कर्नाटकचे फौजेची रवानगी लौकर करावी असें घाटत आहे. आम्ही निरोप घेऊन येणार होतों. परंतु फौज रवाना जाहल्याशिवाय आम्हींच येणें ठीक नाहीं. शास्तव दोहींतिहींकडील लोकांस निरोप देऊन कारखाने दोहींतिहींकडील लाऊन देऊन सड चारशें स्वारांनिशीं रहावें असें योजिलें आहे. चार दिवसांत कारखाने रवाना करितों. आम्हीं निरोप घेऊन यावें तर कर्जाचे ऐवजाचा फडशा व्हावयाचा; हुजरातीचे लोकांची वाट राजश्री हरीपंततात्याकडील होईल तेव्हां आमचीही होईल; तो गुंता उरकला

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. २ पंढरपुरास. ३ नानानीं. ४ मोमब.

पाहिजे. दुसरें, आधीं फौज तिकडे रवाना जाहली पाहिजे. आम्हीच आल्यास आब राहणार नाहीं. वाईट दिसतें. आम्ही येथें आहों तों रवानगीची टुमणी आहे. दुसरें, येथें आल्यास कांहीं कामकाजें व्हावीं; चिरंजीव राजश्री हरीहरराव व चिरंजीव राजश्री गणपतराव उभयतांस वस्त्रें व्हावीं; त्यास माघ ( ? ) अथवा तेथें सर्वांचे विचारें ठरेल तसें करावें; परंतु तेंही जाहलें पाहिजे. आमच्यानेंच केवळ कर्नाटकचें काम होतें असें नाहीं. आमची बाकीही राहिली नाहीं. त्यापक्षीं निरोप घेऊन यावें आणि मागाहून कारभारी याणीं ' लौकर जाणें ' ह्मणोन ल्याहावें तेंही ठीक नाहीं. यास्तव मासपक्ष येथेंच घालवावा. सडे चारशें तिहींकडील मिळोन लोक ठेऊन सर्वांस निरोप देतों. तीर्थरूप मातोश्री बाईंची भेट जाहली पाहिजे, त्यास येथील प्रसंग आठ चार दिवसांत कळेल तदनुसार लिहून पाठवितों. चिरंजीव राजश्री हरि-हररावही मातुश्रीबरोबर लावून द्यावे. दरबारींही राहतील. सर्वांची ओळखही होईल. कामेंकाजें करून श्रीमंतांची आज्ञा घेऊन चिरंजीव मंडळीसह निरोप घेऊन येऊं असें आहे. यास्तव तुमचे विचारें कसें करावें तें ल्याहावें. येथून पागा वगैरे फारकरून मंगळवेढ्याकडे रवाना करितों. नदीस पाणी आलें असलें तर मग चिरंजीव यांची रवानगी करावयाची तजवीज करावी. नाहीं तर ( मिरजेंतून पटवर्धन ) निघाले ह्मणोन तिकडे बोलों लागतील ! तोफांविशीं लिहिलें, त्यास मागून घेतों. किल्ल्याची नेमणूक करून घेतों. इकडे किल्ला चांगला योजत नाहीं. घांटाखालीं कांहीं कामाचा नाहीं. चंदन व परळी कांहीं कार्याची नाहीं म्हणतात; असा प्रकार आहे. वळखीचा सिंहगड आहे परंतु देतील न देतील हें पहावें ! विचारून पाहतों. राजश्री बाबूजी नाईक बारामतीकर यांचे धाकटे चिरंजीव पांडुरंगराव तिकडे गेले

---

१ मोरोबाकडे.

होते त्यांचा जाबसाल कोणींच केला नाहीं. ते अद्यापि येथेंच आहेत. आज निघोन येथें येतील. आम्हाकडे काल त्यांनीं सांगून पाठविलें होतें. आम्हीं आज राजश्री चिंतोपंत लिमये त्यांजकडे पाठविले आहेत. ' तुम्हीं कूच करून येणें. मग तुमचे आमचे विचारें बोलूं. ' असें सांगून पाठविलें आहे. ते[1] जातात तेव्हां हे कूच करून येतील. वरकड मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे आशीर्वाद.

नं. २३८९. ( आषाढ शु० १२–६ जुलई. )

एका कारकुनाचें गंगाधररावास पत्र रवाना

आषाढ शु॥ १२ इंदुवासर. मुक्काम नजीक सासवड येयून.—

" श्रीमंत राजश्री भाऊंस येथें दोन तीन महिने लागणार. छावणीस तिकडे कांहीं सरंजामी व कांहीं हुजरातपैकीं मिळून आठ दहा हजार फौज ठेवणार या तजविजेंत कारभारी आहेत. राजश्री सखारामपंतास समाधान नाहीं. अतिसार व ज्वरांश जाला आहे. पांच सात दिवस आरोग्य आहे. नानाफडणीस याणीं आम्हांस बोलावून नेऊन सांगितलें कीं, सन सलासांत लाख रुपये कर्ज दिले आहेत ते व्याजसुद्धां देणें. आम्हास ऐवजाची जरूर आहे. "

नं. २३९०. श्री. ( आषाढ शु० ८–२ जुलई. )

श्रीसिद्ध
सुपुत्रो विजयते
राजा शाहू नृपति हर्षनिधान
रघुनाथ बाजीराव मुख्य
प्रधान.

मशरुल अनाम जनार्दन श्रीनिवास नाडगौंडा परगणे कोकटणूर यांस– ) रघुनाथ बाजीराव प्रधान. सु॥ समान सबैन मय्या व अलफ. राजश्री विठोजी चव्हाण हिमतबहादर यांस फौजेचा जय धरून विजापूरप्रांतीं सरकारचा अम्मल बसवावया-

१ मोरोबा.

विषयीं आज्ञा केली असे. तरी तुम्ही यांस रुजू होऊन यांची कुमकही करणें. जाणिजे. छ० ७ जमादिलाखर. (लेखना- वधि.)
आज्ञा प्रमाण.

नं. २३९१. श्रीगणपति. (आषाढ शु० १२–६ जुलई.)

पै॥ छ० १५ जमादिलाखर सन तिसा सबैन. आषाढ मास.

आशीर्वाद उपरी. हैदरखानाचा अंमल बसला तो उठवावा, त्यांत निमे वांटणी हिंदुस्ताना प्रो॥ कर्नाटकांत द्यावी असें शिंदे व होळकर यांचें बोलणें लागलें आहे. ठाणीं कबूल केल्यानंतर कर्नाटकची मसलत कबूल करितात. शत्रूनें मुलूख घ्यावा त्यापक्षीं यांस कां ठाणीं न द्यावीं! उभयतां सरदारांस तिकडे रवानगी करावयाचें घाटत आहे. दोन दिवसांत ठरेल तें मागाहून लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

नं. २३९२. श्रीगणपति. (आषाढ शु० १२–६ जुलई.)

पै॥ छ० १५ जमादिलाखर. सन तिस्सा सबैन. आषाढ मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. किल्ल्याचा मजकूर सविस्तर राजश्री गोविंदपंतमामाबरोबर सांगून पाठविला त्याजवरून कळेल. त्यास कर्नाटकचे फौजेची रवानगी जाहल्यास दुसऱ्या स्थळांचा फारसा कांहीं उपयोग नाहीं. उगाच लौकिक मात्र. आणि तें नाहीं तेव्हां स्थलही पाहिजे. त्यावांचून परिणाम नाहीं. महिमंतगड किल्ला चांगला, परंतु कोंकणांत; आणि लांब आहे. देशीं किल्ला आपले सोईचा दुसरा चांगला नाहीं. " चंदन देतों. महिमंतगड माघारा द्यावा " ( असें कारभारी म्हणतात; ) त्यास चंदनास माघापासून पाणी अगदीं नाहींसें होतें, तेव्हां किल्ला काय कामाचा ? परळी किल्ला लहान आहे परंतु चांगला आहे असें ( कारभारी ) म्हणतात, त्यास

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस. २ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस.

किल्लयावर जुने लोक आहेत. केवळ सरकारचे आज्ञेनें वरील लोक उतरतील असा प्रकार दिसत नाहीं. राजश्री नाना त्या तजविजींत आहेत. लोक उतरले तर देतों ह्मणोन बोलले आहेत. परंतु लोक उतरतील असें दिसत नाहीं. तेव्हां जागा मुलें माणसें ठेवावयासी पाहिजे. समय एक प्रकारचे दिसतात. यास्तव आह्मीं सिहगडचें नांव घेतलें. त्याणीं " पुरंधर सिहगड दोन किल्ले खासगी सरकारचे आहेत. केवळ वृद्धास वाईट वाटेल आणि तें करितांही नये. मुलें माणसें समयास ठेवावयाचीं जाहलीया सिहगडास आणून ठेवावीं. शेपन्नास माणूस तुमचें असल्यास चिंता नाहीं. " असें बोलिले. त्यास समय या प्रकारचा. कर्नाटकचे फौजेची रवानगी न होय आणि मिरजेस शत्रु येऊन बसणार; तेव्हां हे राज्य कशाचें करितील ? आणि मग वरकड किल्लयांचा अर्थही समजलाच ! असो श्रीनें तसें नच करावें. तत्रापि काल एक प्रकारचा, यास्तव योजना असावी. त्यास दुरंदेशी पाहतां मिरजेहून निघणें, तेव्हां एक सारा किल्ला चांगला, त्यास जवळ करावें अथवा सिव्हगडचें. दुसरें स्थळ योजत नाहीं. एक मास श्रावणाचा ( गेला म्हणजे ) सर्व समजतें. कर्नाटकची मसलत राहिलीसीच जाहली तर या प्रांतीं हरएक जागा योजणूक करणें प्राप्तच आहे. श्रावणमासअखेरपावेतों दम धरावा. येथील मनसब्याचे प्रकार तर अद्यापि होळकर तर फौजेस निरोप देत नाहींत. शिंदेही देत नाहींत. याचें कारण अशेरी किल्लयाच्या सनदा दिल्या आहेत, परंतु किल्ला हातास आल्यावांचून फौजेस निरोप देऊं नये. होळकराचे विचारें शिंदे ज्यापक्षीं निरोप देत नाहीं त्यापक्षीं आपणही देऊं नये असें आहे. होळकर खट्टेच आहेत. मोरोबादादा गेले ते वडुलास राहिले आहेत. शिवनेर त्यांजकडे, त्यापक्षीं नीट रंग दिसत नाहीं. कपी तर राज्यास किडाच ईश्वरें निर्माण केला आहे ! ईश्वरइच्छेनें श्रीमंतांचे प्रतापेंकरून जें

काय घडणें तें घडेल. अनेक प्रकारच्या बोलवा त्या केवळ लिहितां येत नाहीं. खऱ्याही म्हणतां येत नाहींत. मोरोबादादाकडील मंडळी सारी होळकराजवळ आहे. कोणी कोठें गेले नाहींत. चिंतो विठ्ठल श्रीमंतांकडे ममईस गेले आहेत त्यांजबरोबर कारखाना गेला होता त्याजवर यानीं राऊत पाठवून एक हत्ती, चार उंटें व पंचवीस तीस घोडीं याप्रमाणें आणिलीं. नबाब निजामन अल्लीखान यानीं श्रीमंतांस दोन घोडे लहान व हत्ती एक लहान व दोन कटारा व तरवारा याप्रमाणें पाठविले आहेत. एक नबाबाचा मात्र स्नेह चांगला. वरकड कांहीं ताल कोठें दिसत नाहीं. इंग्रजांचा तर बिघाड दिसतो. हिंदुस्थानांत काल्पीचें ठाणें इंग्रजांनीं घेतलें. भारी सरंजामानिशीं येत आहेत. येथें माष्टीन ममईकर आहे त्याचें बोलणें लागलें आहे. अद्यापि कांहीं ठरावांत आलें नाहीं. फरांशीसाचा वकील येथें होता त्यासी लावन दिला. कलकत्त्यास पत्रें पाठविलीं आहेत. काय उत्तर येतें पहावें. तोफांची चिठीही घेऊन पाठवितों. विजयदुर्गीचा कारकून पुण्यास गेला आहे त्यास बोलावूं पाठविलें आहे. येतांच तोफांची चिठी घेऊन पाठवितों. अद्याप हरीपंतांच्या फौजेचा फडशा नाहीं. ऐवजाचीच अडचण. काम कांहीं निघत नाहीं. असा प्रकार आहे. शिंदे होळकर यांसीं कर्नाटकचे मसलतीविशीं बोलत आहेत. त्यांचें ह्मणणें आम्हास हिस्सा द्यावा. मसलत करूं. यांचें म्हणणें नबाबास निमे देऊं केलें आहे. त्यास टाकून मसलत करितां नये. खेळ करितील. त्यांचा सरंजाम आणविलाच पाहिजे. तेव्हां निमे गेलें. बाकी राहिलें त्यांत हिस्सा देऊं; परंतु मुलखाचा देणार नाहीं. पैक्याचा मात्र देऊं. निदान मुलखाचाही कबूल करितील. हुजरात देऊन भिवराव पानशे यांची रवानगी करावी असें होत आहे. यांत काय घडतें पहावें. येथें घर—कलहाचे सर्वांचे कज्जे आहेत! दुसरा प्रकार नाहीं.

तुम्हीं शिबंदी ठेविली आहे त्यास प्रस्तुत नदीस पाणी आलें आहे तों दूर करावी. भाद्रपद होतांच फिरोन ठेवावी लागेल. बरें. दोन महिने खर्च उणा होईल तितका करावा. पुढें फौजा रवाना जाहल्या तर जसा रंग दिसेल तसें करावें अथवा नाहींच त्यापक्षीं मग खर्चाखालीं तरी कशास यावें ? यास्तव तूर्त निरोप द्यावा. तीर्थस्वरूप राजश्री बापूनीं अद्यापि ऐवज पाठविला नाहीं. पन्नास स्वार पाठवावे ह्मणोन लिहिलें आहे त्याचें उत्तर आम्हीं पाठविलें जे, ' आह्मीं फौजेस निरोप दिल्हा; रोजमऱ्यावर मिळाल्यास ठेवणें; असें लिहिलें आहे. कापडखरेदीस रामाजी नाइकास पाठविलें म्हणून लिहिलें, त्यास कापड नारायणपेठ व जालनें पैठण कांहीं पहिलेंच आलें आहे. तूर्त कांहीं नवें खरेदी करवूं नये. पुढील प्रसंगानुरूप कार्तिकीस खरेदी करावयास येईल. येथील खर्च पेस्तर कमी केला तथापि महिना चार हजार रुपयांचा आहे. चिरंजीव येणार; येथें केवळ एकटें राहणें ठीक नाहीं; तेव्हां इतका पाहिजेच. त्यासी याची नेमणूक करकंबेवर एक मासाची करून लिहून पाठवावें. श्रावणमास जाईल, मग पुढें पहातच आहों. यास्तव पांच हजार रुपयांची चिठी करकंबेवर पाठवावी. पंचवीस हजार रुपयांच्या चिठ्या आणविल्यासुद्धां मंगळवेढ्यावर केल्या. हा ऐवज पावल्यावर आणखी करावयासी येतील. चिरंजीव राजश्री हरिहरराव व चिरंजीव राजश्री गणपतराव यांची रवानगी करावी ह्मणोन लिहिलें, त्यासी आषाढ वद्य तृतीया रविवारीं दिवस चांगला आहे. आषाढमास आहे. सर्वांचे विचारें जाहल्यास रवानगी करावी. नाहींतर श्रावणमासीं मुहूर्त चांगला पाहून रवानगी करावी. आम्ही उतावळी कोणेविशीं दाखवीत नाहीं. पडच घेऊन येथें रहातों. भिवडीस छपरांची योजना केली आहे. स्वस्थ चार महिने राहिल्यावांचून कांहीं कामही होणार नाहीं. आणि गेल्यावर ( कारभारी )

उगीच पत्रें पाठवूं लागतील ! येथून पागा मंगळवेढ्यास रवाना केली. कांहीं येथें ठेविली आहे. उंटें व हत्ती मिरजेस पाठविलीं आहेत. बाळाजीपंत भिडे व अंताजीपंत[1] शिराळे, मोरोबा आचारी, विठ्ठलपंत लेलें, चिंतोपंत फडके वगैरे यांसीं निरोप देऊन पाठविले आहेत. पावतील. राजश्री गोविंदपंतमामाची रवानगी केलीच आहे. त्यांचे गुजारतीचे कर्जाचे ऐवजाची चिठी दिली आहे. त्यास तो ऐवज आमचा आहे, यास्तव तासगांवास मामाचे गुजारतीनें पावता करावा. येथून चिठ्या तासगांवावर केल्या आहेत. सर्व अडचणी ईश्वरें आणून घातल्या आहेत ! परिणाम गजानन लावील तो खरा ! येथून शिलेदार व बारगीर यांच्याही चिठ्या कांहीं केल्या आहेत. सोईसोईनें ( ऐवज ) द्यावा. चिरंजीव राजश्री हरिहरराव याची रवानगी करतेसमयीं तीर्थस्वरूप राजश्री बापूंस बोलावूं पाठवून आल्यास चिरंजिवाबरोबर पाठवून द्यावे. येतील असें वाटत नाहीं, परंतु तुम्हीं पत्र पाठविणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री हरिहरराव याची रवानगी होतेसमयीं तीर्थस्वरूप राजश्री भास्करपंत आपाचे विचारें-वडिलांचे विचारें चिरंजीव राजश्री विनोबा आबाची रवानगी करावी असें जाहल्यास करावी. परंतु आबा पाठवून द्यावे. हे आशीर्वाद. हें पत्र कोणास न दाखवावें. राजश्री लक्ष्मणपंत सुभेदार याणीं राजश्री रामचंद्रपंत[2] मामास 'येणें' ह्मणोन पत्र पाठविलें ह्मणोन लिहिलें, त्यास इकडे आणविले तर येथें कांहीं मागूं लागतील. गृहस्थ नाहक पेंचांत येईल यास्तव इकडे न पाठवावें. हे आशीर्वाद.

---

१ गंगावतीच्या लढाईंत भाऊंचा शागीर्द अंतोबा शिराळे यानें पराक्रम केला ( पहा नं. २२६८ ) यामुळें त्याची कांहीं बढती झाल्याचें व मानमान्यता वाढल्याचें दिसतें. कारण या पत्रांत भाऊनीं त्याचें नांव येथें 'अंताजीपंत' असें लिहिलें आहे. २ रामचंद्रपंत हुपरीकर, मोठे सावकार. ते पुण्यास आले तर कारभारी त्यांजवळ कर्ज मागूं लागतील !

नं. २३९३. **श्रीगणपति.** (आषाढ शु० १२–६ जुलई.)

आशीर्वाद उपरी. तुम्हीं छ० ८ जमादिलाखर गुरुवारचें पत्र पाठविलें तें रविवारीं तृतीय प्रहरीं तिसरे दिवशीं पावलें. (शत्रूनें) "बदामी घेऊन नरगुंदची पेठ मारून चौकी दिल्ही व खंडणीही जाहली म्हणोन वर्तमान. मनोळी घेतली ती मनोळकर रुपये देऊन आपणाकडे करून घेणार. पाऊस नाहीं. नदीस पाणी उतरतें. शत्रू टोकन्याची तरतूद करितो. नदीअलीकडे येणार असी आवाई. फौजा लौकर याव्या. तोफांचा व किल्ल्याचा जाबसाल जाहलाच असेल. खर्च अधिकच होतो. " वसूल येत नाहीं रयत पळाल्यामुळें. याजमुळें मोठी ओढ. " म्हणून लिहिलें तें कळलें. उपाय नाहीं. दंगा या प्रकारचा. शिबंदी कमी करितां नये अशी अडचण. श्रीनेंच लज्जा रक्षावी! तोफांची परवानगी घेऊन सनद लौकरच पाठवितों. किल्ल्याचा मजकूर अलाहिदा लिहिला आहे. फौजेची तरतूद होत आहे. उभयतां सरदारांनींच (कर्नाटकांत) जावें असें बोलणें होत आहे. फौजाही पुढें पाठवितात. राजश्री गंगाधरपंत यास नातू जाहला म्हणून लिहिलें तें कळलें. व चिरंजीव उमाबाई प्रसूत जाहली, पुत्र जाहल्याचें कळोन संतोष जाहला. बारा दिवस निर्विघ्नपणें गेल्याचें वर्तमान लिहून संतोषवीत जाणें. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३९४. **श्रीगणपति.** (आषाढ शु० १२–६ जुलई.)

पै।। छ० १५ जमादिलाखर. सन तिस्सा सबैन. आषाढमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. किल्ल्याचा मजकूर रा।। नानास पुसिला. त्यास वंदन कैपीकडे आहे त्याचें नांव काढतांच नये. चंदन देतात, परंतु महिमंतगड माघारा द्यावा ह्मणतात.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस. २ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस. ३ सखारामबापूकडे.

( महिमंत ) गडापेक्षां चंदन चांगला नाहीं हें एक. दुसरें सिंहगडांत तूर्त मुलें माणसें आणून ठेवावीं. शेंपन्नास माणस आमचें असल्यास चिंता नाहीं. असावें. सिंहगडचा बंदोबस्त नानाचाच आहे. तेथें मुलें माणसें आणून ठेवावीं. महिमंतगडही तुमचा तुम्हाकडे असों द्यावा असें श्रीमंत राजश्री नानानीं सांगितलें. महिमंतगड आमचा आह्माकडे राहून तूर्त सिंहगडांत मुलेंमाणसें ठेवून पाया शिरकल्यानंतर पुढे सोई-सोईनें आपले लगामीं लावून घ्यावयास येईल असा मजकूर आहे. यांत तुमचा मजकूर कसा तें ल्याहावें. या पर्जन्यकाळांतच युक्तीचे वाटेनें माणसें इकडे आणावीं असा प्रकार आहे. उत्तर जलद पाठवावें. सिंहगड किल्ला चांगला आणि पुणें जवळ. आणि सोईची जागा मजबूद. आह्मींच आंत मुलेंमाणसें ठेविल्यानंतर बंदोबस्त करावयाचा मजकूर सरकारांत वोढ त्यापक्षीं सहजांतच बंदोबस्त करावा म्हणून सांगतील, तेव्हां करावयास चिंता नाहीं, आजच निखालस आमचे हवालीं करा असें ह्मणतांही नये. ह्मटल्यानें देणार नाहींत. जिदीनें मागावें तें वाईट वाटेल. यास्तव त्यांचे संतोषाचेंच करावें तें ठीक शत्रु[1] प्रबळ जाहला तेव्हां मुलेंमाणसें तेथें तर ठेवितां नये. महिमंत-गडाकडे पाठवावीं तर कोंकणची जागा. ती हवाही मानणार नाहीं. वळणही गैर. याजकरितां सिंहगडास येणें उत्तम. पहाडही चांगला, अजिंक जागा, मातबर कुटुंब ठेवावयास चिंता नाहीं. तोफा देतों म्हणन राजश्री नानानीं कबूल केलें. सनद घेऊन मागाहून पाठवितों. तीर्थस्वरूप मातुश्री सगुणाबाईचा मजकूरही कानावर घातला आहे. ताकीदपत्रेंही घेऊन पाठवितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २३९५. ( आषाढ व० २--११ जुलई. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस.

---

1 हैदरअल्ली.

पै॥ २० जमादिलाखरचें—

" गंगोबातात्याचे लेंकास होळकराची दिवाणगिरी द्यावयाचें घाटतें म्हणून पुरवणी अगोदर शनिवारीं आवशींच लिहिली. उपरांतीक बारा घटका रात्रीनंतर किल्लयास जाऊन वस्त्रें शनिवारीं रात्रींच द्यावीं असें सरदारांकडून आल्यानंतर ठरलें. तसेंच आम्ही व राजश्री नाना मिळोन किल्लयास गेलों. फिरोन रातोरात येऊं. "

नं. २३९६. ( आषाढ व० २–११ जुलई. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. पै॥ छ० २० जमादिलाखरचें—

" सालमजकुरीं इंग्रजांचा बिघाड व्हावासा दिसतो. उभयतां सरदार देशीं आहेत. निखालसपणें प्रस्तुत वर्ततात तसे वर्तले तर कोणतेही गोष्टीचें अगाध नाहीं. "

नं. २३९७. श्रीगणपति. (आषाढ व० १–११ जुलई.)

पै॥ छ० १८ जमादिलाखर. सन तिस्सा सबैन. आषाढमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० १६ जमादिलाखर मंदवार वर्तमान यथास्थित असे. विशेष. होळकराकडील कारभारी राजश्री नारो गणेश यानीं इतकें खूळ केलें. त्यांस पाठवून देणें म्हणून होळकरांस सांगून पाठविलें. ते सुप्रवर्तीनें पाठवीनात, तेव्हां काल भृगुवारीं शिंद्याचे विचारें फौजेसहीत तयार होऊन होळकराचे गोटाजवळ गेलों. तेव्हां त्यांसहीं समजलें कीं निकर्षाचा प्रकार दिसतो. तेव्हां राजश्री महादजी शिंदे मध्यस्थ पडोन ' लबाडी केली त्यांस धरून द्यावें आणि आपली विखालसता करून घ्यावी ' असें निक्षून सांगितलें. फौजही उरावर उभी राहिली. तेव्हां नारो गणेश व गोपाळ नाईक तांबवेकर, आपाजापंत गोंधळे, कचोबा पाळंदे व बाळाजीपंत

दामले, दादोपंत वाघोलकर, व बाबाजी जामदार निंबाळकर, इतके होळकरानीं लागलेच हातीं धरून दिले. यांत बाबाजी जामदार यानें तोंड चुकावलें तो आज सकाळीं सांपडला. रीस महंमदही त्यांजकडेसच होता त्यासही हातीं द्यावयाचा करार. अद्याप येथें आले नाहींत. जामदार व रीस महंमद दोघे माघारे यावयाचे. बाकीचे सरकारांत आल्यानंतर फौजही गोटास आली. मकारनामक निघोन गेल्यानंतर गोंधळे व पाळंदे व तांबवेकर वगैरे मंडळी सर्व होळकराजवळच होती. इतकी असामी पहिल्यापासोन खेळांतील, याजकरितां साऱ्यांस सरकारांत आणिले. याजउपर शक्तिनुसार हिरण्यश्राद्ध होईल. गुंता नाहीं. गोपाळनाईक तांबवेकराचें घर मालखेडांत आहे त्याची जप्ती करावयाची परवानगी जाहली आहे. याजकरितां पत्र पावतांच शहाणा कारकून पाठवून जप्ती करून याद पाठवून देणें. सदरहूप्रमाणें करावें हें पांच सात दिवस घाटत होतें. परंतु शिंदे मन घालून करितील किंवा कसें होईल, कधीं कसें शेवटास जाऊं देईल, हे संशय होते ह्यास्तव लिहिलें नाहीं. हल्लीं सिद्ध जाहलें यास्तव लिहिलें आहे. आणखी कित्येक गृहस्थ आहेत त्यांचींही पारिपत्यें व्हावींशीं आहेत. घडतील तशीं लिहीन. राजश्री आनंदराव जिवाजी लिमये[१] यांजवरही आरोप आहे. अद्यापि घरची जप्ती नाहीं. परंतु पांडोबा व बळवंतराव होळकराचे गोटांत आहेत ते आज हातीं घ्यावे असें आहे. काय घडतें याजविशीं मजला संकटच आहे. प्रगट करूं नये. मातोश्रीबाई[२] श्रमी होतील. नारो शंकर यांचे पुत्र रघुपतराव होळकराजवळ होते ते हल्ल्याचे समयीं गोटासहीत इकडे आले. सर्व निस्तेज जाहले. पुढें श्रीनें काय योजिलें न कळे! आम्हीं सर्वांस निरोप दिला. दोनी तिनी पथकें मिळून तीनशें चारशें कमपेश होतील. समय या प्रकारचे

१ कारण कीं लिमये ( खासगीवाले ) यांजकडे परशुरामभाऊंचें आजोळ. २ भाऊंची आई जानकीबाई.

आहेत. अधिक ठेवावे तर खर्चास नाहीं. बरें ! श्रीइच्छा प्रमाण ! खासाअसामीचीं पोरें ( बाळें ) कैद केलीं. पुढें होळकरांची दिवाणगिरी गंगोबाचे लेकास द्यावी असें घाटत आहे. ठरल्यावर लिहीन. मोरोबादादा बहुलेस गेले तेथें स्वस्थ बसेनात ! सारी मंडळी होळकराजवळ राहिली, यास्तव हें करणें प्राप्त जाहलें. दादांवरही फौज गेली आहे. कसें होतें पहावें. अद्यापि वर्तमान आलें नाहीं. कोळ्यांचे मिषें गेले आहेत. मालखेडांत गोपाळ नाईक यांचें घर आहे तेथील जप्ती करणें. सनद मागाहून घेऊन पाठवितों. सविस्तर उद्यां लिहीन. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३९८. श्रीगणपति. (आषाढ व० ३–१२ जुलई.)[1]

पै॥ छ० १२ जमादिलाखर सन तिस्सा सबैन आषाढ मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. कोळ्यांच्या पारिपत्यास फौज गेली म्हणोन सचना येथून तुम्हाकडे गेलीच होती. ते जांऊन राजश्री मोरोबादादास रविवारीं बहुलेहून घेऊन गुलटेंकडीवर आले. हें फारच वाईट जाहलें. ठीक न जाहलें. याउपर बंदोबस्तीनेंच ठेवावें असें आहे. राजश्री बजाबांचाही[2] विचार होणार असें आहे. सदाशिव रामचंद्र यांजवर जप्ती गेली. बाळाजीपंत सफरे यांजवर चौकी बसली. आणखी किरकोळ बसतच आहेत. आनंदरांव लिमये यांजवर चौकी पाठविली म्हणोन ऐकिलें, परंतु निश्चय नाहीं. कळल्यावर रदबदल करणेंच आली. सौ॥ चिमाबाई व चिरंजीव असे बहुलेस सूनसुद्धां आहेत, तेथें शिंद्याची चौकी आहे. राजश्री विसाजीपंत बिनीवाले[3] यांजला तसदी फारच जाहली. येथील अन्याय थोडा, परंतु हिंदुस्थानांतील शिंद्याचा रोष फार होता यास्तव असा प्रसंग पडला. मातबर मनुष्य ! इलाज नाहीं. दोन दिवस खटपट करून पाहतों.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस. २ बजाबा पुरंधरे. ३ खासगीवाले.

प्रसंग एक प्रकारचा ! प्रस्तुत काळांत सर्व मदार पाटीलबावावर आहे. कैपीस आंतून फारच वाईट वाटलें आहे. परंतु तेही चांगलें म्हणोनच करीत आहेत. गंगोबा होळकर यांचे चिरंजीवास वस्त्रें द्यावीं असें ठरलें. होळकराकडून देविलीं. राजश्री नाना व राजश्री बापू होळकराचे समाधानास गेले होते. बोलून बेलभंडार जाहले. प्रस्तुत धडाका उठला आहे. काळ पाहतां फारच कठीण दिसतो. राजश्री नरसिंगरावबाबास मोठ्या प्रयासें हातीं घेतलें. कार्यास चुकलें नाहीं, परंतु लौकिकासाठीं केलें पाहिजे. सरंजाम काढितात. ठेवीत नाहीं असें दिसतें. जे जे जप्त जाहले त्यांचीं घरें जप्त जाहलीं. मालखेड गोपाळ नाईक तांबेकर यांचें, तेथील जप्तीविशीं पेशजी लिहिलें आहे. त्यास जप्ती केलीच असेल. चौकशीनें करावी. तेथें त्याचें कांहीं आहे अशी बोलवा. विसाजीपंत बिनीवाले यांजकडे बेळगांव, पाच्छापूर दोन स्थळें तिकडे आहेत त्यांची जप्ती होणार. आम्हाकडे मागितल्यास देतील, परंतु समय एक प्रकारचा; आणि खर्च पडेल. पैशास आपणाजवळ ठिकाण नाहीं, यास्तव आह्मी बोललों नाहीं. तथापि येथें कबूल कोणीं केलें नाहीं. आम्हास विचारलें तर कसें करावें ? तेथें लक्ष्मणपंत सुभेदार आहेत व गोविंदपंतमामा आहेत. अथवा अंताजीपंत मामा, तीर्थरूप राजश्री तात्या, या चौघांतून कोणी कबूल करील तर मनास आणून जलद उत्तर पाठऊन द्यावें. बजाबास चौकी बसली. अनर्थ जाहला आहे ! बरें ! श्रीइच्छा प्रमाण. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २३९९. **श्रीगणपति.** (आषाढ व० ४–१३ जुलई.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. काल प्रातःकाळीं इकडील वर्तमान लिहिलेंच आहे. त्यानंतर प्रहर दिवसास

१ सखारामबापूस. २ होळकराच्या दिवाणगिरीचीं. ३ धायगुड्यास. ४ सखदेव. ५ यादवाडकर. ६ परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र.

राजश्री नरसिंगरावबाबा धायगुडे व राजश्री विसाजीपंतदादा बिनी-वाले यांच्या घरीं चौक्या शिद्यानीं बसवून आपले गोटांत धरून नेलें. कृष्णाजी रणदिवे यांच्या घरींही चौक्या बसल्या आहेत. रीस महमद गाडदी व बाबाजी जामदार अद्यापि सांपडले नाहींत. चौकशी होत आहे. चिरंजीव राजश्री बळवंतराव व पांडोबा लिमये यांसही आणावें असें होतें, परंतु आम्हीं रदबदल केली आणि आपलेजवळ आणले. घरींही चौकी जाऊं दिली नाहीं. तिसरा प्रहरां राजश्री नाना व राजश्री बापू व राजश्री महादजी शिंदे असे मिळोन होळकराचे समाधानास गेले होते. शिष्टाचार करून आले. रघुपतराव नारायण होळकराजवळ होते, ते परवां समयासच कूच करून आम्हांजवळ येऊन राहिले आहेत. बहुलाकडे फौज गेली तिकडील वर्तमान कांहीं आलें नाहीं. जितक्यांचें येथें पारिपत्य जाहलें तितक्यांचीं घरें जप्त जाहलीं. नरसिंगराव यांचा ऋणानुबंध बहुत दिवसांचा, त्याणीं करावयाचें तें केलेंच, परंतु लौकिक रक्षावा-या अर्थे खटपट करून हातीं घ्यावे म्हणतों. परंतु शिद्याकडे गुंतला आहे. हातास येणें कठिण आहे. राहिल्यांचीं पारिपत्यें होतीलच असें दिसतें. एक दोन दिवसांत सर्व कळेल. "राजश्री गंगोबाचे चिरंजीव दादाजी यांस होळकराची दिवाणगिरी द्यावी. कंपेश[1] दहा लक्ष रुपये त्याणीं द्यावे. पंधरा हजार फौज याशिवाय ठेऊन कर्नाटकांत जावें" असें ठरलें आहे. दोन चार दिवसांत सुदिवस पाहून वस्त्रें देतील असें दिसतें. चिरंजीव राजश्री हरिहरराव व गणपतराव यांचे रवानगीविशीं लिहिलें आहे. रविवारीं सुदिवस होता. वृद्धि फिटली, परंतु आषाढमास, यास्तव अनमान केला असला तर न कळे. नाहींतर रवानगी जाहलीच असेल. याउपर नारो शंकर यांचे पुत्राचे विश्राम लौकरच होतील. गाईकवाड यांचा कारभारही विल्हेस लागेल.

---

1 राजे बहादर.

होळकराकडील दोघे गृहस्थ आहेत हे पैकेकरीच आहेत. तिसरे बिनीवाले आहेत. द्रव्यहीन करावे हेंच आहे! श्रीमंतांचें नशीब! कांहीं पैका हातीं लागल्यास फौजेची उस्तवारी होऊन लौकरच मसलत होईल. श्रीमंत सौ॥ आनंदीबाई मंडळेश्वरीं आहेत तेथें हजार स्वार (व) त्रिंबकराव शिवदेव वोढेकर यांचे पुत्र आहेत. त्यांस हिंदुस्थानास रवाना करावें आणि येथून हजार स्वार त्यांजकडे पाठवावे असे भाव आहेत. होईल. तिकडे हिंदुस्थानांत राजेरजवाडे व कमावीसदारांजवळ फौज आहे वगैरे त्या प्रांतीं फौजा आहेत. त्याणीं सर्वांनीं एकत्र होऊन इंग्रज काल्पीस आले आहेत तेथून पुढें येत आहेत त्यांसीं पायबंद द्यावा असें होत आहे. अमृतराव श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे मानस पुत्र यांची स्त्री निवर्तली. येथील रीत एक प्रकारची पडली आहे. आम्हाजवळ सरंजाम फार थोडा राहिला. काळ तर एक प्रकारचा आला आहे. यास्तव चिरंजीवाबरोबर शंभर स्वार चांगले व शंभर प्यादा चांगला निवडक पंचरूढ असा पाठवून द्यावा. प्रस्तुत सर्व भार मनसब्याचा राजश्री पाटीलबावावर आहे. तेही मन घालून करीत आहेत. नारो शंकराचे शालक आनंदराव गणेशही कैद केले. आणखी वरचेवर होत आहेत. कोठवर लांबेल न कळे. असो. श्रीइच्छा प्रमाण. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २४००. ( आषाढ व० ६–१५ जुलई. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. पै॥ छ० २३ जमादिलाखरचें—

“ अद्यापि धराधरीचाच कारभार होतो. राजश्री विसाजीपंत बिनीवाले व नारो गणेश हे शिंद्याजवळ चौकींत आहेत त्यांसीं ‘बोला’ ह्मणून निकड लाविली आहे. अद्यापि ठरावांत गोष्ट आली नाहीं, मकारनामक पुण्यांत गुलटेकडीजवळ बागेंत आहेत. तेथें दोन हजार फौज

चौकीस आहे. मोरोबा व बजाबा यांस कोठें तरी ठेवावें असें आहे. त्यास बोलत बोलत आमचे हवालीं करावें अथवा नगरकरांचे हवालीं करावें. या दो जाग्यांतून हरएक जाग्यास ठेवावें. भलते जागां ठेविलें तर पुढें मागें पेंच, यास्तव असें घाटत आहे. आमच्या येथें राहण्यास ते ( मोरोबा ) कबूल करणार नाहींत. आणि केलें तर मग घेऊन यावे लागतील. अगोदर सूचना लिहिली आहे. तसें जाहल्यास चिरंजीव राजश्री श्रीपतराव यांचें घर थोर आहे. तेथें ठेवावे लागतील. येविषयीं तरतूद मनांत मात्र असों द्यावी. "

नं. २४०१. ( आषाढ व० ६–१५ जुलई. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस रवाना २० जमादिलाखर बुधवारचें—

" मकारनामक पुण्यास आणिले. सदाशिव रामचंद्र यास चौकी दिली. राजश्री बजाबा यासही चौकी देणार; म्हणून काल सविस्तर तुह्मांस लिहिलेंच आहे, त्याजवरून कळेल. राजश्री बजाबाचे वाड्यासभोंवतीं चौकी काल रात्रीं पाठविली तों वाड्यांतून गोळी मारिली. तेव्हां एक गारदी ठार जाला. यामुळें सरकारचे लोकांनीं वाड्यावर चालून घेतलें. तेव्हां गोष्ट फारच जिदीस पडली. यास्तव राजश्री आपा बळवंत आम्हांकडे आले. ' या समयीं बाजी राखावी. यांचा भोळेपणाचा मजकूर. उपाय नाहीं. ' भोजनाचे समयींच येऊन आग्रह केला. भोजन करून राजश्री नानाकडे जाऊन बोलोन बजाबास एकट्यास तेथून आणिलें. ते आमचे पीठ गोटानजीक राहुटी देऊन सभोंवतीं गाड्यांची चौकी देऊन ठेविले आहेत. ती॥ रा॥ आनंदराव लिमये यांचे घरीं चौकी दिली. चिरंजीव राजश्री बळवंतराव व पांडोबा आम्हांजवळच आहेत. इष्टमित्र, शरीरसंबंधी, श्रीमंताचे अन्नानेंच वाढलेले ! सेवाचाकरी न करितां घरीं बसल्यासही लाख दोन लाख रुप-

येचा सरंजाम खाऊन श्रीमंतांच कल्याण चिंतून सुखी राहीनात ! खेळ चुकेनात ! कारभारी आज चार पांच वर्षें सबुरी करीत आले. परिणाम नाहीं, तेव्हां राज्यकारभार करणारास बंदोबस्त केल्याशिवाय उपाय नाहीं, म्हणून कारभारी उभयतांनीं निष्ठुरता धरिली आहे. आम्ही समीप आहों म्हणून आप्त व स्नेही यांची मुरवत पडती; तेव्हां सरकारांत जावें लागतें, बोलावें लागतें. बोलल्यासही आरोप, न बोलल्यासही आरोप, असें प्राप्त जालें आहे. उपाय नाहीं. ईश्वरइच्छेनें जें काय होणें तें होतच आहे. द्वेष प्राणाचे संकटाचे पडले. आतां पारिपत्यें करणें, तेव्हां चांगलींच जाहलीं पाहिजेत. "

नं. २४०२. ( आषाढ व० १२–२१ जुलई. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस रवाना २८ जमादिलाखरचें—

" उभयतां कारभारी व उभयतां सरदारांचें खलबत होऊन उभयतां सरदारांनीं इंग्रजावर जावें, व उभयतां कारभारी यांनीं कर्नाटकांत जावें. असें ठरून नबाबास तयारीविशीं पत्रें पाठविलीं. व भोसले व गायकवाड यांस कर्नाटकांत येणेविशीं पत्रें रवाना होतात. इंग्रजांचा बिघाड, काल्पीस पलटणें आलीं आहेत, अशी गुणगुण आहे. त्यापेक्षां अगोदर याची पैरवी जाली पाहिजे याकरितां उभयतां सरदारांस तिकडे पाठवावेंसें ठरलें. "

नं. २४०३. **श्रीगणपति.** (श्रावण शु० ४–२७ जुलई.)

पै॥ छ० ६ रजब. सन तिस्सा सबैन. श्रावणमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. तुम्हीं छ० २७ जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १ रजबीं पावलीं. राजश्री दादाजी रामय्याचें पत्र व धारवाडाहून पत्र आलें त्याची नक्कल

---

१ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस.

पहावयास पाठविली ती पाहून मजकूर कळला. राजश्री त्रिंबकराव यशवंत यांचें पत्रही त्यांस प्रविष्ट केलें. धारवाडास व रामदुर्गास ( शत्रूचे ) मोर्चे बसल्याचा मजकूर लिहिला तो कळला. करवीरची राणी देवाधीन जाहली म्हणून लिहिलें तें कळलें. कुमक जाहल्या-शिवाय कोणती जागा रहात नाहीं हें कळतच आहे. ज्या ज्या काळीं जें होणें तें चुकत नाहीं. त्याची काळजी कोठपावेतों करावी ! आम्ही कारभारी यांस सांगावयाचें सांगत आहों. घडतां घडेल तें खरें. धारवाडासारखी जागा शत्रूचे स्वाधीन जाहल्यावर मग फिरोन हातीं येणें कठीण ! आतां लौकर कुमक होणें हें कळतच आहे. तेव्हां धारवाड रहात नाहीं असा प्रकार आहे. बरें. हरिसत्ता प्रमाण ! राम-दुर्गही गेलेंच. असो. बहुत काय लिहिणें. चिरंजीव राजश्री हरिहरराव व गणपतराव यांची रवानगी आज जाहलीच असेल तर पांच सहा दिवसांत येऊन पावतील. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४०४. ( श्रावण शु० ५–२८ जुलई. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पै॥ ६ रज्जबचें—

" बजाबास चंदनास लावून दिलें. गोपाळ नाईक रायरीच्या किल्ल्यावर लावून दिले. नाईक दोन लाख रुपये देतों म्हणतात. हे पांच मागतात. राजश्री विसाजीपंत बिनीवाले व नारो गणेश, शिंदे यांचे गोटांतच आहेत. गोपाळ नाईक याजकडील कारकून व जाम-दार मालखेडांत आहेत त्यांस इकडे लावून द्यावे. राजश्री नाना व शिंदे व होळकर काल रविवारीं जेजुरीस देवदर्शनास गेले होते. आ-म्हीही गेलों होतों. देवदर्शन घेऊन नाना किल्ल्यावर एकटेच गेले. आम्ही भिवडीस नेहमीं रहावयास आलों. राजश्री सखारामपंत गुळ टेंकडीजवळ रहावयास गेले. राजश्री नानाही तेथेंच जाणार. आम्ही

चार दिवस येथेंच राहणार. कारभारी यांचा आग्रह फारच जाहला तर सडे जाऊं. कारभारी पुण्यांत घरास जात नाहींत. बाहेर राहणार. या उपर काय मनसबा करितात पहावें. राजश्री हरिपंततात्या कूच करून पुण्यास गेले. हुजरातींत फारकरून निरोप दिले. दोन हजार फौज राहिली आहे. शिंद्यांचे थोडेबहुत निरोप घेऊन जातात. शिंदे होळकर उद्यां कूच करून जाणार. ते गुलटेंकडीजवळ राहिले तर आम्हांसही सर्व आटाळा घेऊन जावें लागेल.

नं. २४०५. श्रीगणपति. (श्रावण शु० ५–२८ जुलई.)

" मकारनामकानीं मिरजेसच जाऊन रहावयाचा आग्रह केला. उपाय नाहीं. तेव्हां नानास आम्हीं निक्षून सांगितलें कीं, ज्या पक्षीं त्यांस मिरजेस लाऊन देणें त्या पक्षीं आम्ही गेल्याशिवाय व नेहमीं घरीं राहिल्याशिवाय बंदोबस्त होणार नाहीं; असें सांगितलें. तेव्हां राजश्री विसाजीपंत आठवले यांस मकारनामकास पोहोंचवावयास देऊन नगरचे किल्ल्यास लावून दिलें. राजश्री बजाबा अद्यापि येथें आहेत. त्यांस वंदनास लावून देणार. गोपाळ नाईक यांची रायरीस रवानगी झाली."

नं. २४०६. श्री. (१८ आक्टो० स० १८९२.)

*यादी. महादजी रामचंद्र फडणीस परगणे तेरदाळ सुरुसन सलास खमसैन मय्यातैन व अल्लफ. छ० २८ जिल्कादचें पत्र आलें त्यांत " परगणे म॥ येथलि आपल्यास फडणिशी कधीं मिळाली व कोणीं संपादन केली, त्यास किती दिवस झाले, ये विषयींचा मजकूर आपल्यास विचारावयाचा आहे. तर पत्र पावतांच सदरहू बद्दल दाखल्याचे कागदपत्र असतील ते घेऊन शहापुर मुक्कामीं हजर व्हावें. " ह्मणून

* ही यादी व पुढल्या नंबरांत छापलेलें पेशव्यांचें ताकीदपत्र यांचा चालू प्रकरणाशीं विशेष संबंध नाहीं. यादींत हैदरखानानें तेरदाळास येऊन दंगा केल्याचा मजकूर आहे. ताकीदपत्रांत तेरदाळ परगणा पटवर्धनांकडे कसा आला हें लिहिलें आहे. हें मागेंच छापावयाचें, पण चुकून राहिलें, सबब येथें छापिलें.

लिहिलें, त्यास आमचे आजे अंताजी शंकर. महालच्या फडणिशीची नेमणूक श्री॥ पेशवे सरकारांतून कै॥ नानासाहेब याणीं सन ११६३ फसली आर्बा खमसैनांत करून दिली त्या तागायत आम्हाकडे फडणिशी चालत आहे. त्याचा दाखला महालचे सरकारी ताळेबंदीं आहे. तीं सालें—

३० आजे अंताजी शंकर होते तोंपर्यंत.

१५ इचलकरंजीकर घोरपडे यांजकडे अंमल होता इ॥ सन ११६३ तागायत सन ११७७ समान सीतन. सुमार सालें.

१५ मिरजेकडील सरंजामास महाल लागला इ॥ सन ११७८ तिस्सा सीतैन ता॥ सन ११९२ सछास समानीन. एकूण सालें ३०.

३०

२९ तीर्थरूप रामाजी अनंत यांचे नांवें.

इ॥ सन ११९३ आर्बा समानीन ता॥ सन १२२१ इसन्ने अशर. एकूण सालें.

१६ मिरजेकडील वहिवाट इ॥ सन१२०८ ता॥ तिस्सा तिसैन. एकूण सालें.

१३ सांगली सरकार अमलांत इ॥ सन १२०९ मय्यातैन ता॥ सालें.

२९

४१ माझे नांवें सांगली सरकार अमलांत इ॥ सन १२२२ सलास अशर ता॥ सन १२६२ सलास खमसन. एकूण सालें.

१००

शंभर वर्षे महालचे ताळेबंदीं आमचा भोगवटा आहे. मिरज व सांगलीस निशाणाचे ताळेबंद सालोसालचे आहेत त्यांत दाखला आहे. सन ११८७ समान सबैन अखेरीस ज्येष्ट मासीं हैदरखान याचा दंगा झाला. चार कोसांवर घटप्रभा नदी आहे तेथें फौज आल्याची

आवाई ऐकून भयस्त होऊन गांवांतील लोक चहूंकडे घर जिनगानी टाकून गुव्यास गेले. आमचे आजे कुटुंबासुद्धां रातोरात मिरजेस गेले. जिनगानी व हिशेबाचे वगैरे कागदपत्र काढावयाची अवाधि राहिली नाहीं. तेच दिवशीं सायंकाळीं हैदरखान ठाण्यांत येऊन वाडा जाळला. त्यांत कागदपत्रें व फडणिशीसंबंधें सनद वगैरे जळाली. जिंदगानी-चीही नासाडी झाली. गांवांत लोकांचीं घरें लुटलीं. याप्रमाणें खराबी करून हैदरखान गेल्यानंतर मिरजेहून कारकून व लोक येऊन रयत व उदमी वगैरे यांस आणून गांवची वसाहत करविली. जाला मजकूर आपल्यास विदित होण्याकरितां लिहिला आहे. ता॥ छ० ४ माहे मोहरम. आश्विन शु॥ ६ सदरहू फडणिशीसंबंधें तैनात वगैरे नेमणूक.

| | | |
|---|---|---|
| ६७० तैनात. | पैकीं कमी. सरकारांतून चौथाई कमी केली त्याव॥ | |
| ४५० महाल कारकुनी. | | |
| ३० भोजनखर्च. | | |
| १८० हशमांत माणसें आ॥ ५ | ५० तैनात पै॥ | बाकी १२३०रु० तपशील. |
| | ५० दरबार खर्च महाल कारकुनी पै॥ | ६२० तनात. |
| १३३० | १०० | ४०० दरबारखर्च महालकारकुनी. |
| | | ३० भोजनखर्चाव॥ |
| | | १८० माणसांव॥ |
| | | १२३० |

नं. २४०७. श्री. (श्रावण शु० १०–२३ आगस्ट श० १६९०–इ. स. १७६८.)

सकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री व्यंकटराव नारायण स्वामी गोसावी यांसी.

---

१ मोरघडे इचलकरंजीकर.

पो॥ माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. परगणे तेरदाळ प्रांत कर्नाटक महाल मामलत तुह्माकडे होती ते सालमजकुरीं तुम्हांकडून दूर करून राजश्री गोविंद हरी यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम महालचा अंमल करार करून दिला असे. तरी परगणे म॥ येथील अंमल देखील ठाणीं जकिरासुद्धां यांचे हवालीं करून कबज घेणें. जाणिजे. छ० १० रबिलाखर. सुरू सन तिस्सा सीतैन मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंति.

पै॥ छ० २२ रबिलाखर.

श्रावणमास. मु॥ पुणें.

बार.

नं. २४०८. श्री.

*विनंति उपरी. चिठी पावली. लि॥ मजकूर कळला. श्रीमंत नानासाहेब कैलासवासी सन इसन्ने सितैनांत जेष्ठमास अवलीस कैलासवासी जाले. पुढें कार्तिकमासीं मोंगलांवरी स्वारी रावसाहेब दादासाहेब मिळोन. पुढें तसें वडगांव करवीरकरांचें मारलें. पुढें कित्तूर सोंद्याकडे रावसाहेब व त्रिंबकरावमामा कारभारी मिळोन. इसन्ने अखेरीस पुणेस आले. पुढें दादासाहेब पळोन गेले. सलास सितैनांत गोपाळरावसाहेबांकडून मिरज घेतली. पुणें जळालें. राक्षसभुवनावरील लढाई. पुढें कर्नाटकचे स्वारीस धारवाडावरी छावणी करून धारवाड घेतलें. हैदरखानावर बिदनुरावर जाऊन खंडणी घेतली. सर कारभारी सखारामबापू होते. मागाहून आनंदवल्लीस दादासाहेब आर्बा सितनांत एक वर्ष राहून पुढें कुमकेस गेले. उभयतां स्वारी करून पुण्यास आले. नंतर भाद्रपदमासीं सन सीतसितैनांत आनंदवल्लीस गेले. पुढें रावसा-

* या टिपणाचा एकच बंद सांपडला.

हेब व दादासाहेब भोंसल्यावर गेले. रावसाहेब माघारे आले ते समयीं बाबूजी नाईक यांस धरलें. दादासाहेब सन सीतासितैन व सबांअखेरीस माघारे गोंहदेहून आले. समान सितैनांत बयोबाईचें[1] लग्न जाहलें. त्यांत सालअखेरीस दादासाहेब घोडपेहून धरून आणिलें. तिस्सासितैन भोंसले वराडची स्वारी. सबैन, इहिदे सबैन, इसन्ने सबैन, त्रिंबकरावमामा कर्नाटकांत छावणी. सन सलास सबैनांत रावसाहेब देवाधीन जाहले. नंतर सन आर्बा सबैनांत नारायण रावसाहेब देवाधीन. बेदरची स्वारी. गुजराथेंत खमस सबैन व सीत सबैन दोन सालें. व समानें सबैन शिरटीची स्वारी. तिस्सा सबैन सुरापूर

१ ही परशुरामभाऊंची कन्या. हीसंबंधें मजकूर अधिकारयोग पृ० ११६ येथें पहा.

# दरबारची डळमळ.

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मोरोबादादाच्या कारस्थानाचा बीमोड होऊन त्यांत सांपडलेल्या बखेडेखोरांचा यथास्थित बंदोबस्त झाला खरा; पण तेवढ्यानें पुणें–दरबारांत अथवा मराठी राज्यांत स्वस्थता झाली, असें मात्र कोणीं समजूं नये. राज्यांतले श्रीमंत दादासाहेब व करवीरकरमहाराज आणि राज्याबाहेरचे हैदरअल्ली व इंग्रज हे शत्रु जोंपर्यंत पूर्णपणें पराजित व निराश झाले नव्हते तोंपर्यंत लढाया व दंगेधोपे नेहमीं सुरू असणें स्वाभाविकच होतें.

मोरोबानें पुण्यास घडवून आणलेल्या संकटामुळें हरीपंततात्या व परशुरामभाऊ यांस हैदरअल्लीवरची पांचवी स्वारी तशीच टाकून आपापल्या फौजांसह पुण्याकडे परत येणें भाग पडलें. ते तुंगभद्रा उतरून अलीकडे येतात तों हैदरअल्लीही त्यांच्या मागोमाग नदी उतरून आला. मराठे आपल्या घरच्या कारभारांत इतके गुंतले आहेत कीं, निदान दोन चार महिने तरी त्यांस आपणाशीं गांठ घालतां येणार नाहीं, हें हैदरअल्लीनें ओळखलें होतें. श्रीमंत दादासाहेबांशीं केलेल्या कल्याणदुर्गाच्या तहाप्रमाणें तुंगभद्रेच्या उत्तरचें राज्य काबीज करण्यास त्याला हा चांगलाच अवसर सांपडला. त्यानें या सालच्या मे महिन्यापासून जुलई अखेरपर्यंतच्या मुदतींत कोपळ व बदामी हे दोन बळकट किल्ले घेतले, इतकेंच नव्हे, तर मलप्रभेच्या दक्षिणेस जेवढा ह्मणून मराठ्यांचा मुलूख होता तितका सर्व त्यानें ताब्यांत आणिला. त्याच्या फौजेची एक टोळी ती नदीसुद्धां उतरून अलीकडे आली होती तिनें दौड करून येऊन तेरदाळ, जमखिंडी व यादवाड हीं ठाणीं घेतलीं. तेरदाळास शत्रूनें आपलें स्वतःचें ठाणें ठेविलें ;

जमाखिंडी व यादवाड येथच्या देसायांच्या हवालीं केलीं. सारांश, या तीन महिन्यांत शत्रु जें जें म्हणेल तें तें सिद्ध होत गेलें. एक धारवाड मात्र त्याच्या ताब्यांत यावयाचें राहिलें. तें सुद्धां त्यानें आगष्ट महिन्यांत घेतलें. हैदरअल्लीच्या या धामधुमीमुळें कृष्णेपलीकडच्या रयतेस दहशत बसून ती सैरावैरा पळत सुटली ती मिरज प्रांतांत जागोजाग आसऱ्याआसऱ्यानें येऊन राहिली. पण खद्द पटवर्धन सरदारांस सुद्धां मिरजेच्या किल्ल्याचा भरंवसा आतां पुरेनासा झाला व तेथून आपलीं मुलेंमाणसें काढून एखाद्या सुरक्षित पहाडी किल्ल्यावर नेऊन ठेवावीं, अशा उद्देशानें पुणें–दरबाराकडून तसा एखादा किल्ला मिळविण्याच्या तजविजीस ते लागले. सिंहगड मिळेल तर हाताखालीं घालून ठेवावा इकडे परशुरामभाऊंची विशेष नजर होती. हा सारा मजकूर मागच्या प्रकरणांतल्या पत्रांतून जागोजाग आलाच आहे.

हें जें हैदरअल्लीचें बलाढ्य परचक्र महाराष्ट्रावर येऊन आदळलें होतें त्याचें कसेंही करून निवारण करणें हें कारभाऱ्यांचें पहिलें कर्तव्य होतें. मोरोबाचा बंदोबस्त झाल्याबरोबर पुणें–दरबारांत वाटाघाट सुरू झाली कीं, आतां हैदरअल्लीस मागें रेटून तुंगभद्रापार हुसकून लावण्यासाठीं उभयतां कारभाऱ्यांनींच फौजेची जय्यत तयारी करून स्वारीस निघावें व शिंदे होळकरानीं–निदान या दोहोंतून एकानें तरी–स्वारीबरोबर जावें. याप्रमाणें योजिलेला बेत तडीस जाता तर त्याचा कांहींतरी उपयोग झाला असता; पण तो तडीस जाणें आजच्या स्थितींत केवळ दुरापास्त होतें! याचें पहिलें कारण खुद्द उभयतां कारभाऱ्यांचीं मनें परस्परांविषयीं शुद्ध नव्हतीं. दरबारची हल्लींची स्थिति सखारामबापूंस हवी तशी नसल्यामुळें तीस ते कंटाळलेले दिसत होते. अर्थात् त्यांच्या नेहमींच्या कारस्थानी स्वभावास अनुसरून ते आणखी कांहीं नवी भानगड उत्पन्न करितात कीं काय, अशी नानांस

काळजी पडली होती. शिंदे, होळकर यांचें तरी कारभाऱ्यांशीं अजून नीटसें जमत नव्हतें. होळकर रुष्ट असण्याचें कारण तर सांगावयासच नको. शिंद्यांस दहा लक्षांची जहागीर, अशीरगड व बऱ्हाणपूर कारभाऱ्यांनीं पूर्वीं देऊं केले होते. त्याप्रमाणें यंदां सनदाही करून दिल्या होत्या. परंतु अशीरगड व बऱ्हाणपूर हीं ताब्यांत आलीं नसल्यामुळें शिंदे नाखूष होते. कारभाऱ्यांबरोबर सरदारांनीं स्वारीस निघावें असें बोलणें सुरू होतांच शिंदे होळकर म्हणूं लागले कीं, हिंदुस्थानाप्रमाणें कर्नाटकांतसुद्धां आम्हांस हिस्सा द्याल तर आपण स्वारीस येऊं. कारभारी ह्मणाले कीं, तुंगभद्रेपलीकडे जो मुलूख सुटेल त्यांतला निम्मा हिस्सा पूर्वींच्या तहाप्रमाणें निजामअल्लीस दिला पाहिजे; बाकी निमे सरकारांत राहील त्यांत खंडणी वगैरे द्रव्याचा मात्र हिस्सा तुह्मांस देऊं. मुलुखाचा हिस्सा देणार नाहीं. तें बोलणें त्या सरदारांस पटलें नाहीं. त्यामुळें त्यांचा कारभाऱ्यांबरोबर स्वारीस निघण्याचा बेत तसाच राहिला.

कारभारी ह्मणत होते त्याप्रमाणें यदाकदाचित् स्वारीस त्यांचें निघणें झालेंच असतें तरी त्याला पुष्कळ अवकाश लागता. त्यापूर्वीं कोणा तरी सरदारास कांहीं फौज बरोबर देऊन पुढें पाठविणें अवश्य होतें. सखारामबापूंच्या मनांत भिवराव पानशांस पाठवावयाचें होतें व त्यांच्या द्वारें आपली मंडळी फौजेच्या कारभारांत घुसवून फौज आपल्या लगामीं लावावी ही त्यांची मसलत होती. ती मसलत सिद्धीस जाऊं नये म्हणून नानांनीं आपल्या वर्तनें सरदार परशुरामभाऊ यांस आगष्ट महिन्यापासूनच स्वारीस बाहेर निघण्याचा तगादा लाविला. मागच्या दोन स्वाऱ्यांतलें देणें आपणास झालें आहे, त्याची फेड सरकारांतून झाल्याशिवाय व येत्या स्वारीकरितां फौज आपले मार्फत ठेवावयाची तिच्या खर्चाची तजवीज आगाऊ झाल्याशिवाय आपण

स्वारीस निघत नाहीं, असें भाऊंचें म्हणणें होतें. दुसरींही त्यांचीं अनेक किरकोळ कामें सरकारांतून व्हावयाचीं होतीं तीं आतांच व्हावीं, हा त्यांचा आग्रह होता. परंतु त्यांचा हेका बाजूस राहून नाना फडनवीस यांच्या आग्रहामुळें व हरीपंततात्यांची पराकाष्ठेची भीड पडल्यामुळें त्यांस सप्टेंबरच्या अखेरीस स्वारीस निघावें लागलें. त्यांजबरोबर जाण्याकरितां कांहीं पागा व हुजरातेपैकीं पाटणकर, घोरपडे वगैरे पथकें व सरंजाम्यांपैकीं अक्कलकोटकर भोंसले, रास्ते, प्रतिनिधि व आनंदराव गोपाळ, यांची नेमणूक झाली होती. सरकारचा तोफखाना घेऊन राजाबा पानशे स्वारीबरोबर यावयाचे होते.

आजपर्यंत महादजी शिंदे, तुकोजी होळकर, हरीपंततात्या, यांनीं आपापल्या फौजांस निरोप न दिल्या मुळें फौजांस दाणावैरण व लांकूडफाटें परवितां पुरवितां पुणें प्रांत ओसाड होण्याच्या बेतास आला होता. शेवटीं हरीपंततात्यानीं आगष्टांत व शिंद्यानीं सप्टेंबरांत बऱ्याच लोकांस घरीं जाण्यास निरोप दिला. पटवर्धनानींही गेल्या वर्षीं ठेविलेल्या फौजेस यापूर्वींच निरोप दिला होता; व त्यांची यंदांची फौज अद्यापि गोळा व्हावयाची होती. शिंदे जांबगांवास लग्न करून घेण्याकरितां जाणार होते. पुढें बीड येथें त्यांचा एक फकीर गुरु होता त्याच्या दर्शनास जावें, व तेथून तुळजापुरास देवीच्या दर्शनास जावें, असाही त्यांचा बेत होता.

राज्यांतले फितूर अद्यापि मोडले नसल्यामुळें ते वारंवार प्रकट होतच होते. त्यांत कांहीं फितूर दादासाहेबांचे व कांहीं मोरोबादादांचे होते. शिवनेरी किल्ला अद्यापि मोरोबांच्या ताब्यांत असून त्यांचा कारकून तेथें होता, त्यानें आसपासचे कोळी उठवून दंगा करण्याची सुरुवात केली होती. खुद्द पुरंदरास गडकरी कोळी होते त्यांचा नाईक फितुरांत असल्याचें उमगलें; आणि त्याच सुमारास नगरच्या किल्ल्यांतून पळून

जाण्याचा मोरोबादादानीं बेत केला होता तो उघडकीस आला. याप्रमाणें वारंवार व जागोजाग फितूर उघडकीस येत असल्यामुळें दूर कर्नाटकांत फौजा घेऊन जाण्याविषयीं कारभाऱ्यांचें मन कां कूं करूं लागलें. शिवाय हैदरअल्ली आगष्ट महिन्यांतच तुंगभद्रा उतरून परत गेला होता यामुळें कारभाऱ्यांनीं याच वेळीं स्वारीस निघालेंच पाहिजे अशीही जरूरी राहिली नव्हती. त्या कामीं दिरंगाई झाली तरी चालण्याजोगें होतें. इतक्यांत इंग्रजांच्या फौजेची तयारी मुंबईस होत असल्याच्या बातम्या येऊं लागल्या व श्रीमंत दादासाहेबांस घेऊन पुण्यावर चालून येण्याचा त्यांचा रोंख दिसून येऊं लागला; त्यामुळें कारभाऱ्यांचें लक्ष तिकडे वेधलें जाऊन त्यांचा कर्नाटकच्या स्वारीस स्वतः जाण्याचा बेत तसाच राहिला.

परशुरामभाऊ मात्र पुण्याहून निघाले ते हळू हळू मजला करीत नीरेपर्यंत आले होते. त्यांच्याजवळ म्हणण्यासारखी फौज अजून जमली नव्हती. त्यांस मिरजेकडे जलदीनें येण्याविषयीं मिरजेहून पत्रें गेलीं होतीं. कारण कीं नुकताच महादजी शिंद्यांच्या विद्यमानें पेशव्यांशीं केलेला तह मोडून करवीरकर पुन्हां दंगा करूं लागले होते, व त्यांनीं कागलास वेढा दिला होता. तो वेढा चिकोडीच्या ठाण्यांतून कुमक येऊन उठवला गेला हें खरें, तथापि तेवढ्यानें करवीरकरांचा दंगा शांत होण्याचा संभव नव्हता. मागें इंग्रजांच्या स्वारीची गडबड तर पुढें करवीरकरांचा दंगा ! अशा स्थितींत आपणास कोणीकडे जावें लागेल याचा अजमास न लागल्यामुळें परशुरामभाऊ नीरेच्या आसपासच कांहीं दिवस तळ देऊन राहिले होते.

---

नं. २४०९. श्री. ( ज्येष्ठ व० ३०—२४ जून. )

राजश्री विठोजी चव्हाण हिंमतबहादर गोसावी यांसीं.

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य. स्नेहांकित लक्ष्मण आपाजी. आशीर्वाद विनंति. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें उत्तम समयीं पावून संतोष जाहला. कित्येक मजकूर पत्रांतील श्रीमंतांस निवेदन केला. आपलें पत्र श्रीमंतांस होतें तें प्रविष्ट होऊन श्रीमंताचें प्रत्युत्तर घेऊन पाठविलें आहे. पावेल. श्रीमंतांची स्वारी मुंबईहून निघोन घांट चढोन येत आहे. त्यास श्रीमंतानीं आपणास लिहिलें आहे त्याप्रमाणें आपणही येऊन पोंचावें. सदैव आपलेकडील कुशल लिहीत जावें. श्रीमंतांवर श्रीनें कृपा केली. कलकत्त्याहन श्रीमंतांचे कामाकरितां कुमक रवाना जाहली तीही थोडया दिवसांत येऊन पोंचेल. रा॥ छ० २८ जमादिलावल. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

नं २४१०. ( श्रावण शु० ९—१ आगस्ट. )

एका कारकुनाचें पत्र गंगाधररावांस रवाना

श्रावण शु॥ ९ मंदवासर मुक्काम पुणें येथून—

" श्री. रा. भाऊ भिवंडीसच आहेत. होळकर पर्वतीच्या पश्चिमेस निपाल ( ? ) जागा पाहून राहिले आहेत. शिंदे पर्वतीच्या रमण्यांत राहणार. राजश्री सखारामबापू राजश्री विसाजी केशव यांच्या बागेंत गुलटेंकडीजवळ आहेत. राजश्री नाना शहरांत वाड्यांत आहेत. मास पक्ष पुण्याजवळच राहून कार्यभाग सारा उरकून भाद्रपद शुद्धांत उभयतांनीं बाहेर निघावें, येणेंप्रमाणें मनसबा आहे. "

---

१ हे श्रीमंत दादासाहेब यांचे कारभारी. यांचें हें फितुराच्या कारस्थानाचें मुंबईहून पत्र. २ उभयतां कारभाऱ्यांनीं.

नं २४११. ( श्रावण शु० ११–३ आगस्ट. )

पत्र परशुरामभाऊचें गंगाधररावांस रवाना छ० ९ रजबचें—

“ राजश्री नाना पुण्यांत जाऊन राहिले आहेत. बापू व शिंदे होळकर गुलटेंकडीजवळ आहेत. आम्हांसही पुण्यास जाऊन रहावें लागेल. ”

नं. २४१२. श्री. (श्रावण शु०–आगष्ट प० पंधर०)

सेवेशीं विनंती उपरी. राजश्री माधवराव व चिरंजीव अण्णाजीराव यांस काली निरोप जाहला. छ० १७ रजब मंगळवारीं येथून निघून सेवेशीं येत आहेत. रा॥ खंडेराव यांसमागमें हैदरखान यांस व पुत्रास व बायकोस व चौघे मुतसद्दी व तिघे चौघे मातबर सरदार वगैरे यांस नबाबानीं वस्त्रें पाठविलीं आहेत. जवाहीर कांहीं दिल्हा नाहीं. प्रस्तुत भर हैदरखान याजकडील पडलें आहे. स्वामीस श्रुत व्हावें याजकारितां लिहिलें आहे. विनंतीपत्रें लिहिलीं तीं पृथक् ठेवावीं. चिरंजीव सेवशीं आलियावरी सविस्तर विनंती करितां विदित होईल. हे विनंती.

नं. २४१३. ( श्रावण व० १०–१७ आगष्ट. )

पत्र परशुरामभाऊचें गंगाधररावांस पै॥ छ० २६ रजबचें—

“ आज आठ दिवस राजश्री नाना ह्मणतात कीं, “ तुम्हीं पुढें स्वारीस भाद्रपदमासींच निघोन जावें. मागाहून दसरियास आम्ही खामखा निघोन येतों. ” त्यास आह्मीं उत्तर केलें कीं, “ मागील देणें लोकांचें तसेंच तटलें आहे. सरंजामही गेला. त्यापक्षीं पुढील तरतूद होऊन निघावयाचें कठीण आहे. व याखेरीज हुजरातसंमंधें गुंतलों आहों त्याचा निकाल नाहीं. तेव्हां आमचे वस्तु जाणें होत नाहीं, ” म्हणोन सांगितलें. त्यावरून राजश्री नाना ( आमचे ) घरपावेतों

१ पत्र सावनुराहून परशुरामभाऊंस.

आले. आणि सांगितलें कीं, " हुजरातसंमंधें कर्ज बाकीस राहिलें आहे त्याचा ऐवज दोहों तिहीं महिन्यांनीं पावे असा लावून देतों. सरंजाम तूर्त गेला त्यापक्षीं हुजरात कांहीं बरोबर देतों. शिवाय सरंजामी रास्ते वगैरे देतों. जावयाचें करावें; " असें सांगितलें. आह्मीं तर अद्यापि मान्य केलें नाहीं. याप्रमाणेंच राजश्री हरीपंततात्यांबरोबरही निरोप आला. आणखी नाना घरपावेतों येणार. वृद्धाचे चित्तांत आम्हीं मान्य न केल्यास दुसऱ्यास सांगावें असें आहे. परंतु नानाचे चित्तांत दुसऱ्यास पाठवूं नये. आमचीच रवानगी करावी. आह्मीं जाणें तेव्हां केवळ हुजरातीबरोबरच परिणाम लागेल असें नाहीं. घरची फौज तीन चार हजार तरी पाहिजे तरच ठीक. ऐशास नानाचा तर आग्रह भारी. त्यास कसें करावें ? याचा विचार करून सत्वर उत्तर पाठवावें. हैदरखान तुंगा उतरून गलगनाथाकडे गेला ह्मणून येथें बातमी आली आहे. त्यास हें वर्तमान सत्य किंवा मिथ्या व धारवाडचें वर्तमान काय तें सत्वर लिहावें. राजश्री नानाचे विचारें दुसरा कोणी पाठवावा तर फौज त्याचे लगामीं लागेल तें ठीक नाहीं. यास्तव तुम्हीं जावें असें ह्मणतात. आमचे घरचे प्रकार तर मागील बाकीसच ठिकाण नाहीं; तेव्हां पुढील तरतूद कशी होते ? दोन तीन हजार फौज इतलाख ठेऊं त्याचा पैका द्यावा, नाहींतर आमचे वस्तु होत नाहीं, ह्मणून साफ सांगितलें आहे. कबूल केल्यांत मागील गुदस्तां हरीपंततात्यांस कर्जास गुंतलों आहों त्याचा फडशा होईल. हुजरातचे पाटणकर, घोरपडे, वगैरे मानकरी यांचेही फडशे होतात. पुढें खासे उभयतां ( कारभारी ) निघणार त्यापक्षीं आह्मांस घरीं बसूं देतात असा अर्थ नाहीं. याचें पुरतें मनन करून उत्तर पाठवावें. अडचणी तर फारच आहेत. "

नं. २४१४. श्रीगणपति. ( १९ आगष्ट. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ श्रावण वद्य १२ रोज बुधवार.

मुक्काम पुणें जाणून आपलेकडील कुशल लेखन करीत असावें. विशेष. तुम्हीं छ० २० रजब भृगुवारचें पत्र पाठविलें तें काल अस्तमानीं पावलें. धारवाडचा ( मजकूर ) व हैदर मेल्याचें पत्र नरगुंदचें आलें त्याची नक्कल पाठविली ती पावली. सारांश चहूंकडून वर्तमानें येतात त्यांत शत्रु मृत्य पावला; तेव्हां ती गोष्ट प्रमाणच असेल. कुरुंदवाडाहून वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री बावा उपाध्ये यांचें पत्र वे॥ रा॥ त्रिंबकभटजी यांस आलें त्यांत लिहिलें जे, रामाप्पा पटवर्धन याचा माणूस हैदरखानाच्या लष्करांतूनच आला—गदगावर लष्कर सोडिलें—त्यानेंही मृत्यु पावलाच म्हणोन सांगितलें असें लिहिलें आहे. इकडील वर्तमान तर पेशजी लिहिलेंच आहे. आम्हास आज आठ दहा दिवस ' बाहेर निघावें ' ह्मणोन राजश्री नानानीं बहुता प्रकारें लाविलें आहे. आम्ही ज्या ज्या अनुपती सांगावयाच्या त्या सांगितल्या. परंतु नानाचें ह्मणणें कीं, " भिवराव पानसे यांस पाठवावें तर फौज लगामींची जाते. हें ठीक नाहीं. आजपावेतों जें केलें त्याचें सार्थक तुम्ही निघाल्यास होतें. नाहीं तर तुह्मीं व हरीपंत येथें राहून मागील आटपावें. आम्ही पुढें जातों. " असे कितीएक भराभरीचें ( भारी उभारींचें ! ) बोलणें बोलतात. आमचे चित्तीं तर "(आमचा) सारा सरंजाम गेला. मागील एक सालाचा ऐवज देणें लोकांचा त्यास ठिकाण नाहीं. दोनही पथकांत कांहीं बाकी राहिली नाहीं. तीर्थस्वरूप कैलासवासी कोन्हेरराव चाकरीस गेले, तीन वर्षे चाकरी केली, तिकडेच जिवानिशीं गेले[1]. त्या पथकाचा फडशा होणें. आमच्या समागमें पाटणकर, घोरपडे वगैरे हुजरातीचे लोक आहेत त्यांचा जाबसाल होणें. आमचा कर्जाचा ऐवज हरीपंततात्याकडे गुंतला आहे. पुढें फौज ठेवावयासी खर्चास नाहीं. तीर्थरूप कैलासवासी दोजीनीं[2] चाकरी केली त्यांच्या मुलांचा बंदोबस्त होणें. आमचा

१ सावशीच्या लढाईत. २ पुरुषोत्तमराव कृष्ण मंगळवेढेकर यानीं.

सुरापुरचा ऐवजच दरसाला सुरापुरचा येणें. आणखी कित्येक अनुपती बहुत सांगितल्या. परंतु त्यांचा आग्रहच ! तिकडे शत्रु मृत्यु पावला परंतु ( त्याचा ) लेंक आहे. भारी सरंजाम पाहिजे, खर्चाची बेगमी होणार नाहीं, फजिती होईल, आपले वस्तु ( जाणें ) होत नाहीं, " असेंच म्हणत आलों. तों धारवाड गेलें म्हणोन काल आमचे येथें राजश्री हरीपंततात्या बोलावयासी आले. ते आले त्याणींही ( बोलून ) पाहिलें. " सर्वांचे विचारें घरीं बसून तरी काय करावें ? यांसीं कनिष्ट पक्ष कार्तिक मार्गशीर्ष मासीं निघालें तर नकळे. त्यापक्षीं आपण निघावयाचें करावें. " त्याजवरून आम्हीं सांगितलें कीं, " सरंजाम झाडून गेला. आमचे लोक बहुता दिवसांचे आणि आह्मी ते लोक सोडून जाणें हें ठीक नाहीं. तर सरंजाम फार तर मिरजप्रांत व करकंब, मंगळवेढें मिळोन एक हजार फौजेचा होईल. तितक्यानिशीं आमचें निघणें होत नाहीं. तीन हजार फौज इतलाखी ठेवावयासी सांगावी. त्याचा पैका सरकारांतून द्यावा. तूर्त तयारीस कांहीं खर्चास द्यावें. कांहीं हुजरातचीं पथकें सरंजामी नेमिलीं आहेत त्याप्रमाणें पांच सात हजार मिळोन बारा पंधरा हजार जमाव होईल. आपणही लौकर निघतां असा निश्चय असल्यास आह्मीही महिना पंधरा दिवस पुढें जाऊं. " नाहीं ह्मणूनच ओढलें, परंतु कालदेशानुरूप कबूल करणें लागलें. कर्जाचे व मागील हुजरातीच्या लोकांच्या देण्याचे वगैरे कसे कसे फडसे करितात, तूर्त खर्चास काय तयारीस देतात, फौजेचा वगैरे कामाचा कसा बंदोबस्त करितात, हें पाहोन सर्वांचे विचारें ठरेल तसें करितों. न करितांही गत्यंतर नाहीं. तिकडे प्रसंग पडल्यास तयार असावें ! मजला अनेक प्रकारचीं संकटें. तीर्थरूप मातुश्री बाईची भेट अद्यापि नाहीं. दोन वर्षें जाहलीं. घर पाहिलें नाहीं. संसाराचा गव्हाठा. मागील

कर्जदार. चहूंकडून संकटें ईश्वरें आणिलीं आहेत. न निघतां गत्यंतर नाहीं. निघावें तर सोय नाहीं. चिरंजीव उभयतां येथें आले आहेत त्यांस वस्त्रें दिलीं पाहिजेत. त्यास दसऱ्याशिवाय मुहूर्त नाहीं. प्रस्तुत गुरूचें अस्त जाहलें आहे. व येविशींचें थोडें थोडें परवां लिहिलें आहे व आपाजीपंत याजबरोबर सांगून पाठविलें आहे त्याजवरून कळेल. उत्तरें रवाना जाहलीं असल्यास लौकरच येऊन पावतील. तुह्माकडील दुकित्ता पत्रें आलीं त्याचे जाब मागाहून लिहून पाठवितों. येथील समयानुसार थोडीं थोडीं कामें उरकोन घेऊन निघावयाचें करितों. दसरा जेजुरी निरेकांठीं जाहल्यास मागती माघारे येऊन उभयतांस वस्त्रें देऊन मागती जावयाचें करूं. परंतु निघाल्यांतच. घरीं राहणें म्हणावें तर फौजच नाहीं. तेव्हां तिकडे घर कोठें ! रानांत मुलें सर्व कुटुंबें कोणीकडे घेऊन फिरावें ? ते पक्षीं आपणच फिरावें, परंतु सर्वांस तरी घर सोडावें नलगे ! असें चित्तांत आणून सर्वांचें कबूल करावें असें जाहलें त्याजवरून जातों. परंतु कर्जाचा ऐवज, हुजरातीचा फडशा, व तूर्त तयारीस पैका आणि दोन तीन हजार फौज इतलाखी ठेवावी त्याचा पैका, (सरकारांतून ) द्यावा त्याचें ठरतें त्यासारखें मागाहून लिहून पाठवितों. पागेची वगैरे जरूरीची तयारीची योजना करावी. तीर्थस्वरूप राजश्री बापू तेथें आले होत ते गेलेच असतील. त्यांचे पुढील बोलण्यांत ऐवजाचा वगैरे बंदोबस्त केलाच असेल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४१५. ( श्रावण व० १३–२० आगष्ट. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस रवाना छ० २६ रजबचें—

" आह्मी पुण्यास आल्यानंतर राजश्री विसाजीपंत बिनीवाले पांच लक्ष व नारो गणेश दहा लक्ष व नारो शंकर यांचे पुत्र त्रिंबकराव

नारायण दहा एकूण तीन असाम्या मिळोन २५ लक्ष ठरले. धायगुडे यांचें बोलणें लागलें आहे. अद्यापि ठरलें नाहीं. गोपाळ नाइकाची बेरीज ठरल्याचें पेशजी लिहिलेंच आहे. फौजेची समजूत होऊन दसऱ्यासच बाहेर निघावें; अशीच तरतूद सरकारांतून होत आहे."

नं. २४१६. ( भाद्रपद शु० ८–३० आगष्ट. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. पै।। छ० ९ साबानचें—

" अमित्र मेला खराच, अशीं वर्तमानें येतात. त्याची फौज नेदी उतरावयाच्या तरतुदेंत आहे. परंतु नदीस पाणी फार याजमुळें कपोतगुड्ड लक्ष्मेश्वर जागा जागां उतरली आहे. चित्रदुर्गकरानें तिकडे धामधूम उठविली आहे. हरिहर घेतलें. बंद यादवाड मुधोळचा मार्गीं सांडविला. सटवाजी भोंसला जाऊन भेटला. तिकडील कांहीं फौज घेऊन येणार " ह्मणून लिहिलें तें कळलें."

नं. २४१७. ( भाद्रपद शु० ८–३० आगष्ट. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पै।। छ० ९ साबानचें—

" आह्मांस पुढें बाहेर निघा म्हणतात हा मजकूर पेशजी सविस्तर लिहिलाच आहे. आमचे जाबसाल होऊन येणें त्याचा अद्यापि सरकारांतून फडशा नाहीं यास्तव अद्यापि निघावयाचाही ठराव जाला नाहीं. सरकारवाड्यांत चतुर्थीचा उत्सव होत आहे. आज चार वर्षें संकलितच करीत होते. यंदां उभयतां कारभारी येथें आहेत. समारंभ बराच होत आहे."

नं. २४१८. ( भाद्र०शु०१३–४ सप्टेंबर )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र––पै।। छ०१६ साबान—

" राजश्री नानानीं द्वादशीस भोजनास बोलाविलें होतें. खाशी मंडळीसह मेजवानी जाली. वस्त्रें दिलीं. ( तुम्हीं ) कापडाची याद पाठ-

---

१ तुंगभद्रा. २ शत्रूनें यादवाड मुधोळचे लोक धरून श्रीरंगपट्टणास रवाना केले होते ते वाटेंत चित्रदुर्गकरांनीं सोडविले. ३ कोल्हापुराहून जाऊन हैदरअलीस भेटला.

विली ती पावली. पैठण अगदीं नाहीं, त्यास पैठण सुमार पाहोन लागेल तें येथेंच खरेदी करितों. याखेरीज काळ्या गजन्या तुह्मीं पेशजी लिहिल्याप्रमाणें येथें घेतों. आमचा मुक्काम येथें अमावास्येपर्यंत आहे. तदोत्तर पुरंदरास जाऊं. त्यास तमाम शागीर्दपेशाचे वोझ्याचे बैल नेमणुकेप्रमाणें व उंटें ओझ्यास कारखाना येणेंप्रमाणें आश्विन शु॥ १ स येथें येऊन पोंहचतसे रवाना करावे. मंगळवेढें, करकंब येथील पागा स्वारीबरोबर यावयाची त्याची तयारी करवावी. खोगरें व फरसावा तयार आहे ह्मणोन पेशजी तुह्मीं लिहिलेंच आहे. जीन किती पाहिजेत याचा अजमास पाहोन त्यांपैकीं जुने कामास येई जोगतें असतील ते डागडोजी करवून नीट करवावे. बाकी लागतील ते खरेदीं करावे. याची तरतूद आतांपासून करून तयारी करवावी. मग येथून लिहोन पाठवूं त्याप्रमाणें रवानगी करावी. पागेची जेथील तेथेंच तयारी करवावी. मग येथून लिहोन पाठवूं त्याप्रमाणें रवानगी करावी. हत्तींचे गाशे व नमदे व भारकस वगैरे आहे नाहीं पाहोन नवें तयार करावें. उदईक राजश्री नाना आमचे येथें भोजनास येणार. राजश्री हरीपंततात्या व आपा बळवंत व अमृतराव पेठे—त्रिंबकराव मामाचे नातू—यांसही सांगणार. राजश्री सखारामपंतबापू अगोदर एक वेळ व मागती एकदां असे दोन वेळां घरास आले होते. वरकड कांहीं नाहीं. सहज आले होते."

नं° २४१९. श्रीगणपति. (भाद्रपद शु० १३–४ सप्टेंबर.)

पौ॥ छ० १६ साबान. सन तिस्सा सबैन, भाद्रपदमास—

आशीर्वाद उपरी. आम्हांस श्रावणांतच बाहेर निघावयाविशीं तांतड करीत होते हा मजकूर सविस्तर पेशजीचे पत्रीं लिहिलाच आहे. त्याजवर मध्यें आठ दहा दिवस फिरोन निघावयाविशीं तांतड केली; तेव्हां आह्मीं उत्तर केलें कीं, आमचे जाबसाल कर्जवामाचे कितेक

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस.

होणें त्यांचा फडशा आधीं करून द्यावा. मग निघावयाचें होईल. याप्रमाणें सांगितलें, परंतु राजश्री नानाचा आग्रह “ जाबसालाचा फडशा होऊन निघणें म्हटल्यास अवकाश थोडा राहिला. मुहूर्त द्वादशीशिवाय नाहीं. पुढें पितृपक्ष आला. यास्तव मुहूर्तानें बाहेर निघावें. जाबसालाचे फडशे करून देतों ” म्हणोन; त्यावरून सर्वांचे विचारें ‘ ओढूं नये. ’ राजश्री हरीपंततात्याबरोबर ( नानाचे ) निरोपावर निरोप. मग राजश्री नाना आपणच घरास येऊन चार घटका बसोन फारच आग्रह केला. त्याजवरून मान्य निघावयाचें करून शुद्ध द्वादशी गुरुवारीं प्रथम प्रहर सात घटका रात्रीस चिरंजीव राजश्री हरिहररावसुद्धां निघोन गुलटेंकडीजवळ डेरादाखल जाहलों. याउपर जाबसालाचे फडशे व बरोबर फौजेची नेमणूक होईल तें सविस्तर मागाहून लिहोन पाठवितों. कर्नाटकचे स्वारीस उभयतां सरदारांनींही यावें असें घाटत आहे. ठरेल तेंच खरें ! तुम्हीं लिहिलें कीं, “ सालमजकुरीं पथकाकडील फौज ठेवावयास बाकी राहिली नाहीं. सरंजाम गेला. सरदारी कर्जाखालीं आली. ” हा प्रकार खराच आहे. बाकी कोणत्याही गोष्टीची राहिली नाहीं. सर्व अर्थ राजश्री नानाशीं बोलिलों आहों. याउपर जें निश्चयांत येईल तें मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. आह्मी एकंदर बाहेर निघत नव्हतों. याचें कारण बाहेर निघाल्यानंतर मागील लोकांचा देण्याचा फडशा केल्याशिवाय परिणाम नाहीं. वगैरे कित्येक जाबसाल आहेत. भेटीअंतीं सविस्तर समजेल. जाबसालाचे फडशे करून देतों म्हणोन दरम्यान मध्यस्त चिरंजीव राजश्री दादा[1] जाहले याजमुळें निघालों. अगोदर तुम्हांस ल्याहावें तर आमचा निश्चयच नव्हता. काल प्रातःकाळपासोन संध्याकाळपर्यंत ( नानानीं ) मोठी निघावयाविशीं निकड बसविली याजमुळें चार

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर.

घटका रात्रीस निश्चय ठरला. सर्वेच सातवे घटकेस रात्रीस डेऱ्यास दाखल जाहलों. इतलाख फौज अडीच हजार ठेवावी. त्यास तूर्त खर्चास लाख रुपये द्यावे. अडीच हजार फौजेचा शेरा दोनशेंप्रमाणें[1] तूर्त अखेरसालपर्यंत ( सरकारांतून ) निभाऊन द्यावा. सालमजकुरीं महाल सुटोन जो ऐवज सालअखेरपावेतों वसूल पडेल तो यांत (आह्मीं) मजुरा द्यावा. याप्रमाणें करार ठरला आहे. इतलाख अडीच हजार फौजेशिवाय आणखी हुजरातचीं पथकें व रास्ते, आनंदराव गोपाळ, नारोशंकराचें पथक व भोंसले[2] वगैरे सरंजामी नेमिले आहेत. तोफखान्याचे खर्चास फौजेचे नेमणुकीशिवाय ऐवज दिल्यास बाळगावा. नाहींतर नाहीं. असें आमचें बोलणें आहे. परंतु तूर्त डेऱ्याजवळ काल तोफाही आणोन ठेविल्या आहेत. कबूल केल्यास संकट, न केल्यास एकप्रकारें संकट, जाणोन बाहेर निघालों. निभावणार श्रीगजानन आहे. मागील लोकांचे फडशे जाहले पाहिजेत. त्याखेरीज परिणाम नाहीं हें समजलेंच आहे. परंतु उपाय काय! त्यास ऐवजाची तरतूद येथें बापू जोशी यांस लिहोन करवावी. राजश्री गोविंदपंतमामास इकडे पाठवून द्यावें. मामा आल्यानंतर फडशाचें काम चालीस लागेल. दसरियास उभयतां कारभारी क्षेपनिक्षेप स्वारीस निघतात असें आहे. आह्मांकडील जाबसालाची याद सरकारांत लिहोन दिल्ही आहे. मखलासी होऊन हातास आलियानंतर यादीची नक्कल करून पहावयास पाठवून देतों. आम्हांकडील डेरे दांडे सारा कारखाना भिवडीसच आहे. तूर्त सरकारच्या डेऱ्यांतच येऊन राहिलों आहोंच. बाहेर निघालों. यादही देतील. कबूल नच करावें असें मानस होतें परंतु हे[3] तरतूद करून बाहेर निघोन स्वारीस जाऊन कामें होतील यास कनिष्टपक्ष चार म-

---

१ मृगसाल सुरू होईपर्यंत आठ महिन्याचे दोनशें. २ अक्कलकोटकर. ३ कारभारी.

हिने तरी पाहिजेत. हे होऊन आग्रह करितात. कर्जाचा ऐवज लावून देतात. हुजरातसंबंधीं खर्च आहेत ते अनेक प्रकारचे. पाटणकर, घोरपडे वगैरे यांचीं झटें. त्यांसीं तूर्त पावणा लाख रुपये सरकारांतून द्यावे. वरकड सर्वांचा फडशा होऊन वाट पडल्यावर द्यावे. कोन्हेरराव यांचे पयकाचे वगैरे कालानुसार बंदोबस्त होऊन यादी देतात. मागील पंथ उत्तम निघतो. आणि मिरजेकडेही जाणें, ते पक्षीं कबूल करावें असें चित्तांत आणून कवल करून निघालों. राजश्री नानाचें मानस जे, आह्मीं निघावें. तेणेंकरून फौज आपले लगामीं राहते. दुसरा निघाला तर त्याचे लगामीं लागेल तें ठीक नाहीं; असे कित्येक अर्थ. वृद्धांची रीत समजलीच आहे, असें जाणून नानाचे मर्जीस्तव निघालों. घरांत बसावें तें कांहीं ठीक नाहीं. मिरजेजवळ कज्जा[1] आलाच आहे. कसेंही जाणें तर या समयीं निघावें हेंच कांहीं बरें! असें जाणून कबूल केलें. येथील फौजेची तरतूद कांहींच नाहीं. मातुश्री बाई येथें आली. तीन दिवस जाहले नाहींत तों निघावयाचें जाहलें म्हणून बहुतच श्रमी मातुश्री जाहली. इलाज नाहीं. पागेची वगैरे तरतूद करावी. फरसावा वगैरे सरंजाम करवावे. उंटाचा कारखाना सामान करून अमावास्येस येथें पावे असा पाठवून द्यावा. प्रतिपदेस कूच करून किल्ल्याजवळ येऊन दसऱ्यास श्रीमंतांची आज्ञा घेऊन वस्त्रें उभयतांस[2] होतील आणि कूच करून महादेवाचे सुमारें येतों. तोंपावेतों आणखी होतील तीं वर्तमानें लिहितों. इकडे इंग्रजांची गडबड फारच बाजारी बोलतात. वृद्धाचें मानस एक प्रकारचें आहे. कसें कसें होतें हेंही आठ चार दिवसांत कळेल त्यासारिखें वरचेवर लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

[1] हैदरअल्लींच्या स्वाऱ्या तेरदाळ जमखिंडीपर्यंत नुकत्याच आल्या त्यास अनुलक्षून हें लिहिणें. [2] हरिहरराव पांडुरंग व गणपतराव कोन्हेर यांस.

नं. २४२०. श्री. (भाद्र० व० १३–१८ सप्टंबर.)

राजश्री विठोजी चव्हाण हिमत बहादर यांसीं.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. कित्येक आपले निष्टेचा व सेवा करून दाखवावयाचे उमेदीचा अर्थ लिहिला तो विदित जाहला. त्यास सरकारचाकरीची आज्ञा नेरसिंगराव गोविंद यांस केली आहे तरी तुम्हीं त्यांस सामील होऊन सेवा बजावून दाखविणें. सेवेनुरूप सर्फराज केलें जाईल. जाणिजे. छ० २६ साबान बहुत काय लिहिणें.

नं. २४२१. श्रीगणपति. (भाद्र० व० १२–१७ सप्टंबर.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद उपरी. आम्ही बाहेर निघोन राहिल्यास पंधरा दिवस होत आले. आज चौदा दिवस जाहले. फिरोन कांहीं बोलणें तरतूद रवानगीची कांहीं नाहीं. कामाकाजाचा उलगडा कांहीं नाहीं. कोणे एके गोष्टीचे जाबसाल यथास्थित होत नाहींत. असा प्रकार आहे. नेट धरून या दिवसांत कामें विल्हेस लागतात असा अर्थ नाहीं! फौजेची तोडजोड नाहीं. दसऱ्यास निघणार म्हणतात परंतु कांहीं तरतूद नाहीं. निघतील असें दिसत नाहीं. आम्ही कामाकाजाचे फडशे दसऱ्यापावेतों जाहले तरी वस्त्रें घ्यावयाकरितां पुरंधरास जाणार. कारभारी येतील असें दिसत नाहीं. पहावें! ठरेल तें मागाहून लिहून पाठवितों. कामाकाजाचे फडशे होऊन निरोप जाहल्यास उत्तमच आहे; सारेच दसऱ्यानंतर दरमजल

१ यावरून मराठी सरदारांचीं आंतून फितुरी राजकारणें दादासाहेबांशीं कशीं चालत असत हें दिसतें. श्रीमंतांचीं पत्रें असलीं आणखीही कित्येक सरदारांस गेलीं असावीं. २ आदल्या वर्षी ज्यानें करकंबचें ठाणें घेतलें होतें तो बंडवाला. ३ पत्र परशुरामभाऊचें. ४ स्वतः मोहिमेस निघणार असें कारभारी म्हणतात.

येत आहों. तें नाहीं ते पक्षीं चिरंजीवांस वस्त्रें देऊन दसरा झालेनंतर लावून देतों. मी येथें कर्जाचे जाबसालासाठीं व मानकरी वगैरे लोकांच्या फडशासाठीं सडा राहतों. मग फडशे होऊन येईल तसें करीन. रास्ते यांचे गणपतराव भाऊ याणीं पांच[1] ' लाख रुपये देतों. दरबारखर्चेही लाख दोन लाख करीन. सरदारी आपल्यास द्यावी. ' असें म्हणतात. गंगाधरराव नाना यांसीं ( कारभारी ) बोलतात. यानीं उत्तर केलें, ' आम्हास सरदारी लागत नाहीं. भाऊंसच सांगावी ! याप्रमाणें येथील मजकूर आहे. श्रीइच्छेनुरूप श्रीमंतांचे दैवानें घडेल तें खरें ! पहिले ऐवजाचे जाबसाल ठरले आहेत त्यांजपैकीं अद्यापि कोणाची निशा नाहीं. उत्तरेकडून इंग्रज येतात त्यांजवर उभयेतां सरदार जाणार त्याचीही तरतूद नाहीं. कैक नानाप्रकारचे मनसबे घाटत आहेत. कांहीं ताळ दिसत नाहीं. मग श्रीनें काय योजिलें आहे न कळे ! काळजी कोठवर करावी ! वृद्धाची बुद्धि स्थिर नाहीं. नाना प्रकार घाटत आहेत असें लोक बोलतात. मग काय होईल पहावें ! सविस्तर मागाहून लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४२२. ( आश्विन शु० ४–२४ सप्तंबर. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र. रवाना छ० २ रमजान.

" भास्करपंतमामास देसाई जमींखडीकर येऊन भेटला; ठाणें हवालीं केलें; म्हणोन लिहिलें तें कळलें. उत्तम गोष्ट जाली. करवीरकरांचे तोंडावर राजश्री बचाजीपंत खांडेकर जमावसुद्धां तिकडे रवाना केले आहेत. जाऊन पंधरा दिवस झाले. आजला आले असतील. कर्नाटकांत स्वारी गेल्यावर नेहमीं मिरजेस स्वार ठेवावयाचीही नेमणूक होईल. काल राजश्री अमृतराव पेठे यांचे येथें भोजनास गेला होतों. आज

---

१ शिंदे होळकर.

मंडळीसह राजश्री आपावळवंत यांचे येथें मेजवानी झाली. राजश्री बापू दसरियाचे दिवशीं मुहूर्त करून डेरे दाखल होणार. राजश्री पौर्णिमेच्या मुहूर्तानें निघणार. राजश्री बाबूराव वैद्य यांची रवानगी भोसल्यांकडे जाली. उभयतां सरदारही दसऱ्यानंतर निघणार. राजश्री नाना निघणार यास्तव श्रीमंतांचे दर्शनास जाणार आहेत. दसऱ्यास पुण्यास येणार. रास्ते यांचे सरदारींचें पडलें होतें त्यासीं पूर्ववतप्रमाणें योणींच करावी असें ठरलें आहे. नित्य एक ठरतें ! कांहीं हिसके आंतून बापूंचे, कांहीं पाटीलबावांचे, असें आहे; याजमुळें कोणतेंही काम लौकर निघत नाहीं. उभयतां ( कारभारी ) निघतात, परंतु अद्यापि फडशा नाहीं. देण्याची तोड नाहीं. निघाले, मासपक्ष आधीं येथेंच लागेल तरी शिवनेर किल्ल्यास मोरोबादादाकडील कारकून आहे त्यानें गडबड मांडली आहे यास्तव किल्ल्यास चौकीदाखल दोनशें राऊत व चारशें गाडदी सरकारांतून रवाना जाले आहेत. रा. नाना परवां आमचे येथें उगेच आले होते. दोन घटका बसून गेले. "

नं. २४२३. ( आश्विन शु० ४-२४ सप्तंबर. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र. पै।। छ० ४ रमजानचें—

" हैदरखानाची फौज झाडून तुंगा पार जाली. थोडी बहुत फौज दुर्गकरावर गेली होती. दुर्गकरांची त्यांची लढाई होऊन शत्रूचे फौजेचा मोड जाहला. दोन हजारपर्यंत लोक मारलेले व येक सरदार पाडाव जाला, " म्हणोन लिहिलें तें कळलें. सरकारांतही याचप्रमाणें वर्तमान आलें आहे. हैदरखान मेला हें तर तथ्यच आहे. तुंगा अलीकडे त्याची फौज नाहीं. रान मोकळें जालें आहे. अशांत दहा पंधरा हजार फौज तरी रवाना होती तर मातबर स्थळांखेरीज सर्व मुलूख सुटता. परंतु तो योग तूर्त कांहींच दिसत नाहीं ! होणें जाणें सर्व

---

१ गंगाधरराव नाना रास्ते याणीं.

श्रीमंतांचे दैवावरच आहे. उभयतां कारभारी दसरियास निघतों म्हणतात. दसरा तर कांहीं लांब नाहीं. परंतु तरतुदीची जात कांहींच नाहीं."

नं. २४२४. (आश्विन शु० ४—२४ सप्तंबर.)

परशुरामभाऊंचें पत्र गंगाधररावांस. पै॥ ४ रमजानचें—

"बापूजी नाईक यांचे चिरंजीव श्रीमंतांचे जामात यांजकडे बारामती रहावी असें ठरोन निघून निरोप घेऊन गेले. चिरंजीव बयास पाठवावें म्हणून बहुत आग्रह केला. नाइकांचें वर्षश्राद्ध पंचमीस आहे. यास्तव काल लावून दिली. फिरोन दसरियास आणवितों. आमचा जाबसाल—कर्जाचा ऐवज देतों म्हणतात. परंतु कोन्हेरराव व तात्या यांचे वेळचें व आमचे मार्फतीचें अलीकडील कर्ज आहे तें मात्र देत नाहींत ! "पुढें दहक व कर्जपदींचा फडशा होईल तेव्हां देऊं. तूर्त हरीपंतांस ऐवज दिला आहे तितका मात्र देऊं." म्हणतात. आम्ही साराच द्यावा म्हणतों, यास्तव खट्टे आहेत. राजश्री हरीपंततात्या यांस साडेसातशें स्वारांची सरदारी सांगितली. त्यांपैकीं पांचशें स्वारांचा सरंजाम तूर्त लावून देतात. नरसिंगराव, विसाजीपंत यांतून नेमून देतात. जातीस चाळीस हजार रुपये तैनात करार केली. याप्रमाणें वर्तमान आहे."

नं. २४२५. श्रीगणपति. (आश्विन शु० ३—२३ सप्तंबर.)

पै॥ छ० ४ रमजान सन तिस्सा सबैन आश्विनमास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. इकडील वर्तमान तर रास्ते यांचे बंधु राजश्री गणपतराव याणीं पांच लाख रुपये नजर देतों, आपणास सरदारी सांगावी. म्हणोन बोलणें बोल-

१ या उताऱ्यासंबंधें अधिकार–योग पृ० ११६ येथील मजकूर पहावा. २ धायगुडे विनीवाले यांचे सरंजाम सरकारांत जप्त झाले होते त्यांतून. ३ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस.

तात. राजश्री लक्ष्मणरावअण्णा तिकडे गेले म्हणोन ( रास्त्यापासून ) कांहीं घ्यावें अशी वांच्छा (नानांस) आहे. वृद्ध एक प्रकारचा, कारभार मन घालून करीत नाहीं, उदास उदास, असे अनेक प्रकारच्या चर्चा आहेत. परंतु सत्य मिथ्या कांहींच कळत नाहीं; आणि म्हणतांही येत नाहीं. शिंदे अशेरी किल्ला स्वाधीन जाहला नाहीं म्हणोन खट्टे आहेत असें बोलतात. होळकर तर खट्टे आहेतच. हिंदुस्थानांतून इंग्रज येतात. मुंबईहून श्रीमंत निघणार; उभयतां सरदारांचें लक्ष त्यांचे ठायीं आहे; वृद्धही त्यांत आहे; असें बोलतात. राजश्री नाना शिंद्याच्या साधनांतच आहेत. केवळ बिघडेल असें वाटत नाहीं. परंतु कारभार विल्हेस लागून कोण दिशेचीही तरतूद कांहीच नाहीं. उभयतां ( कारभारी मोहिमेस ) निघणार असेंही बोलतात. तरतुदेवरून निघतील असें दिसत नाहीं! शिंद्यांस बर वाटत नाहीं. गजदान केलें. असें आहे. पठण नबाबाकडे आहे त्यास शिंद्यानीं दोन हजार फौज पाठवून तेथें ठाणें बसविलें. तेथील कमाविसदार धरला. एका सावकारास धरून नेला. असे नानाप्रकरचे खेळ आहेत. नबाबानींही जाबितजंग याचा तालुका जप्त केला असें आहे. शिंदे होळकर वाफगांवास जांबगांवास जाणार अशीही वदंता आहे. आम्ही बाहेर निघाल्यास वीस दिवस जाहले. अद्याप कांहीं येथें कामाचा उलगडा झाला नाहीं. दसरा समीप आला. उभयतां चिरंजीवांस वस्त्रें देवावयाचीं आहेत यास्तव अष्टमी इंदुवारीं येथून निघोन भिवडीस किल्ल्यानजीक जातों. दसऱ्याच्या मुहूर्तेकरून वस्त्रें देतील. उपरांतीक सारें खटलें लावून देऊन सडे येथें राहावें. कारण कर्जाचा ऐवज व मानकरी यांचा फडशा जाहलाच पाहिजे. हे दोन लढे नसतें तर मीही तिकडेच येतों. परंतु या दोहों लढ्यांची वाट जाहली पाहिजे; यास्तव राहणें प्राप्त आहे. यास्तव सर्वांस लावून देऊन राहतों. वरकड

१ मोरोबादादास अनुकूळ झाले होते.

पुरवणीपत्रावरून कळेल. पुढील तरतूद कांहीं दिसत नाहीं. सर्व भार श्रीहरीवर आहेत. श्रीमंतांचे दैवेंकडून घडेल तें खरें ! आमची व नानाची भेट बारा तेरा दिवस नाहीं. कोणत्याही कामाची सुरत दिसत नाहीं ! असो. श्रीनें जें नेमिलें असेल तें घडेल. चिंता कोठवर करावी ? बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे आशीर्वाद. राजश्री मोरोबा-दादा नगरांत[1] होते तेथें कांहीं भेद करीत होते. राजश्री माधवराव नारायण सावध होऊन बंदोबस्त केला. दोन चार माणसांचीं डोकीं मारिलीं. बंदोबस्त जाहला. शिवनेर किल्ला मोरोबाकडे आहे तेथें त्याज-कडील येसोबा म्हणोन कऱ्हाडा ब्राह्मण आहे. खटपटचा बारामतीहून गेले तेव्हां त्यांनीं तेथें ठेविला होता. त्यांनीं कोळी उठवून धूम मांडली आहे. तिकडे स्वार रवाना करणार आहेत. कसें होतें पहावें ! हे आशीर्वाद.

नं. २४२६. श्रीगणपति. (आश्विन शु० ९--२९ सप्टंबर.)

पै॥ छ० ९ रमजान दसरा. सन तिस्सा सबैन—

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. आह्मांस निघोन आजच वीस दिवस जाहले. अद्यापि येथें कांहीं कार्याचा उलगडा नाहीं. पुढेंही लौकर उलगडा होऊन निघणें होईल असें दिसत नाहीं. त्यापक्षीं येथें खर्च ठेऊन राहणें ठीक नाहीं. उभयतां कारभारी निघणार. आम्हीं येथें रहावें तर भिडेभाडेनें चला ह्मणतील तेंही ठीक नाहीं. चिरंजीवांस तर पुढें लावून द्यावयाचेच आहेत. आम्ही स्वारीस निघोन जात नाहींच ह्मणत होतों. त्यांचे आग्रहास्तव कांहीं त्यांचा संतोष, कांहीं आपलीं कामें, सोडून कालानुसार घरीं बसणें ठीक नाहीं असें पाहून कबूल केलें. परंतु नानाप्रकारचे हिसके ! ( आम्ही निघालों ) हें वृद्धांस ठीक वाटलें नाहीं. शिंद्यासही ठीक वाटलें नाहीं. असें वाटतें. यास्तव हिसके बसून तूर्त राहिलें. आमची

---

१ नगरकर. २ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस.

अवस्था तर श्रीहरि जाणे ! येथें सावकारी कर्जाचा पेंच. दुसरा हुजरातीचे मानकरी वगैरे लोकांचा गवगवा. ऐवज देणें, तेव्हां माझी सुटका होणें कठीणच आहे ! त्यापक्षीं चिरंजीव राजश्री गणपतराव व चिरंजीव राजश्री हरिहरराव यांस मात्र मुहूर्तकरून वस्त्रें देवावीं आणि सर्वांची रवानगी पुढें करून द्यावी. चिरंजीव राजश्री अप्पा, धाकटीं मुलेंसुद्धां लावून द्यावीं आणि सडे रहावें. तीर्थरूप मातुश्री मात्र कसें करितील पाहावें ! तीं राहिलीं तर राहिलीं. नाहींतर त्यांसुद्धां रवानगी करून देऊं. सारे कारखाने दोहींकडील लावून देऊन सडे दहा वीस स्वारांनिशीं रहावें. चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा देखील लावून द्यावे. थोडीशी उदासता दाखवावी. यांत कांहीं कामें निघोन चांगलेंसें दिसलें तर कबूल केलेंच आहे. मग सर्वांचीं वस्त्रें एक वेळेसच निघतील. नाहीं त्यापक्षीं याप्रमाणें सारे लावून देऊन मी राहतों. आठ पंधरा दिवस वाट पाहून कर्जाची व लोकांची वाट जाहल्यास करून घेऊन आपण घरास यावें. सारे लावून दिल्यानंतर मग मसलत कबूल करणें कठीणच आहे. आम्ही घरास येऊं. नाहीं त्यापक्षीं कांहीं खटपट करणें हें ठीक नाहीं, तेव्हां गंगास्नानास जावें असीही योजना आहे. यांत श्रीसत्तेकडून घडेल तें प्रमाण. आमची नानाची भेट आज पंधरा दिवस नाहीं. त्यांसही आम्ही उदास आहों असें समजलें आहे. परंतु आंतून हिसके बसतात यास्तव इकडे बोलतां येत नाहीं, तिकडे तर हिसके बसतात, असें आहे. परवां श्राद्ध आहे यास्तव उदईक घरास जावें. परवां रविवारीं श्राद्ध करून इंदुवारीं पांच घटकांत निघोन भिवडीस जाऊं असें योजिलें आहे. कोठें कांहीं ताल दिसत नाहीं. कर्जास गुंतून चुकलों आहों. बरें ! हरिइच्छा प्रमाण. श्रीमंतांची एकनिष्ठेनें सेवा केली

---

१ पुण्यास रास्त्यांच्या वाड्यांत. २ यावरून परशुरामभाऊंचे वडील रामचंद्र हरि यांच्या मरणाची आश्विन शु० ७ ही तिथि होय हें सिद्ध होतें.

असल्यास सर्व अरिष्ट श्रीगजानन पार करील. नाहीं तर दैवीं असेल तसें घडेल ! बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे आशीर्वाद.

नं. २४२७. ( आश्विन व० ७–१३ आक्टोबर. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र पै।। छ०२३ रमजानचें—

" अद्यापि काजाकामाचा उलगडा नाहीं. राजश्री दौलतराव घोरपडे येथें आले आहेत. त्यांची भेट करवावी व रावतांचे डौलें करून द्यावे. कांहीं जातीस तूर्त सरंजाम लावून द्यावा, असें कारभारी यांसी बोलत आहों. उभयतां कारभारी लोकांची समजूत जाल्याशिवाय बाहेर निघत नाहींत. कधीं निघणें होईल पहावें. रास्ते यांचे सरदारीचें पूर्ववत्प्रमाणें राजश्री आनंदरावदादा यांजकडेच ठरलें. शिंदे यांस बरें वाटत नव्हतें. अलीकडे उपशम आहे. उभयतां सरदारांची रवानगी उत्तरेकडे होणार. शिंद्यांस बऱ्हाणपूर याणीं दिलें. प्रस्तुत सर्व भार शिंद्यावर आहे. "

नं. २४२८. श्रीगणपति. (कार्तिक शु०६–२६ आक्टो०)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रति परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. राजश्री गोपाळ नाईक तांबवेकर यांच घर व बाग मौजे मालखेड प्रांत पन्हाळा येथें आहे त्याची जप्ती सरकारांतून तुम्हांकडून करविली होती ते हल्लीं मोकळीक करून सरकारचें पत्र तुमच्या नांवचें आहे या पत्राप्रमाणें मालखेडची व घरबागेची जप्ती उठवावी. वस्तभाव सरकारच्या पत्रापूर्वीं खर्च जाहली असेल ती असेल. राहिली वस्तभाव जरा बाजरा नाईक मशारनिल्हे यांचे कारकुनाचे हवालीं करून पावलियाचें कबज घ्यावें. दुसऱ्या पत्राचा उजूर न करावा. रा।। छ०

---

१ अमुक मुलूख अमुक स्वारांचे खर्चाकरितां सरकारांतून तुह्मांस सरंजाम नेमून दिला आहे असे सनदांचे मसुदे.

५ सवाल. सु॥ तिस्सा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २१२९. ( कार्तिक शु० ६–२६ आक्टो० )

परशुरामभाऊंचें पत्र गंगाधररावांस पै॥ छ० ७ सवाल कार्तिक मासचें—

" लोकांची समजूत जाल्याखेरीज कारभारी बाहेर निघत नाहींत. लोकांचें देणें फार निघालें आहे. सरकार वोढीस पडलें त्यापक्षीं झाडून पैसा पावेल हें समजलेंच आहे. लोकांस तोडमोडीचा जावसाल सांगितला पाहिजे. त्यास केवळ आपणच सांगितल्यास मान्य करणार नाहींत, यास्तव कारभारी यानीं उभयतां सरदारांकडून लोकांस समजून सांगवावें, आणि तोडमोड करावी, याप्रमाणें केलें आहे. शिंदे अलीकडे दोन वेळां सरकारच्या वाडयांत याजकरितां आले होते. आम्हांसही बोलाविलें होतें. अद्यापि तोडमोड जाली नाहीं. आणखी काल शिंदे वाडयांत आले होते, परंतु अद्यापि ठरलें नाहीं. आठ चार दिवसांत तोड पडावी असें आहे. आम्हांस कालपासून पुनः निघण्याची तांतड लाविली आहे. कामकाजाचा फडशा मात्र होत नाहीं ! "

नं. २१३०. ( कार्तिक शु० १०–३० आक्टो० )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस छ० ८ सवालचें पत्र—

" परवां पत्रें तुम्हांकडे रवाना केलीं त्यांत मागती कारभारी निघण्याविशीं तांतड करितात म्हणोन लिहिलेंच आहे. कामकाजाचा फडशा जाल्याखेरीज आमचे मतें निघों नये असेंच होतें. परंतु राजश्री हरीपंततात्या अष्टमीचे दिवशीं प्रातःकाळीं येऊन बसले ते अडीच प्रहर दिवसपर्यंत घोळ घातला. शेवटीं उपाय नाहीं, न निघाल्यास राजश्री नानांची मर्जी खट्टी. व मध्यस्थ राजश्री हरीपंततात्या व चिरं-

जीव राजश्री रघुनाथरावदादा हेही खट्टे होऊं लागले. यास्तव उजाडतां नवमी गुरुवार पहांटेच्या चार घटका रात्रीस मुहूर्तानें थेउरावरून देवदर्शन घेऊन भिवडीस जावें म्हणोन वानवडीजवळ आलों. तों राजश्री आकोजी घोरपडे नि॥ हुजरात यानीं आपल्या फडशाकरितां अडविलें. त्यावरून कालचा मुक्काम वानवडीस जाला. रा. हरीपंततात्या आले. मध्यस्तीस राजश्री मालोजी घोरपडे मुधोळकर पडोन संध्याकाळीं निकाल पडला. त्यांचे फडशाचा जिम्मा तात्यानीं आपणाकडे करून घेतला, तेव्हां धरणें उठलें. आज भोजनोत्तर निघोन थेउरास गेलों. उद्यां सुप्याचे मुक्कामास जातों. राजश्री दौलतराव घोरपडे यांस दहा हजारांचीं खेडीं कृष्णेअलीकडे देऊं म्हणतात. कांहीं अधिक द्यावें असें आमचें म्हणणें आहे. यास्तव व आमचे जाबसालाचे फडशे होणें यास्तव चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा यांस पुण्यांत ठेविलें आहे. त्यांस तेथें आठ दिवस लागतील. चिरंजीव लष्करांत आल्यावर सुप्याहून कूच करून पुढें जाऊं. "

नं. २४३१. ( कार्तिक शु० १४–३ नोवेंबर. )

नारो त्रिंबक पोंक्षे याचें पत्र बाळासाहेबांस छ० १३ सवालचें–

" श्रीमंत राजश्री भाऊसाहेब बाहेर निघत नव्हते. ' भाद्रपद शु॥ पक्षीं मुहूर्तानें निघालों. अद्यापि तरतूद नाहीं, ' ह्मणोन निघत नव्हते. परंतु रा॥ हरीपंततात्यानीं नवमीचे दिवशीं प्रातःकाळपासोन अडीच तीन प्रहरपर्यंत बसोन खलबत केलें. भोजन मग केलें. उपोषितच बसले होते. हे ऐकेनात, यास्तव चार चार वेळां तात्यानीं पदर पसरून पायांवर डोई ठेऊन बाहेर काढिलें. परंतु तरतुदीची जात सरकारांतून किमपि दिसत नाहीं ! मग श्रीनें काय योजिलें आहे न कळे. श्रीमंतांचे पुण्यास बळ. तेणेंकडूनच होणें तें होईल. "

नं. २४३२. ( कार्तिक शु० १४–३ नोवेंबर. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र—पै॥ छ० १७ सवाल.

" चितो विठ्ठल यांचीं मुलेंमाणसें पुण्यांत होतीं तीं परवां पळून गेलीं. कांहीं गडबडीचा प्रकार दिसतो. या प्रसंगीं जमातीशिवाय राहणें ठीक नाहीं. याकरितां लोक लौकर आणवावे. करकंब व मंगळवेढे येथील पागा पत्र पावतांच रवाना कराव्या. पुरंदरचे किल्ल्यावर कोळ्यांचे नाइकीवर कोंडाजी नाईक होता त्यानें फितवा केला होता तें उमगलें. त्यावरून त्यास कैद करून बिडी घालून ठेविला आहे. या पुरवणीपत्रांतील वर्तमान गुप्त असा द्यावें. बाहेर प्रगटांत आणूं नये. श्रीइच्छेनें जें घडून येणें तें घडून येईल. काळजी कोठवर करावी ! येथील अधिकारी यांचें करणें ठीक नाहीं. बहुतच स्तिमित कारभार ! पुढें कर्तव्याचा विचार अगदीं नाहीं. "

नं. २४३३. ( कार्तिक व० १४–१७ नोवेंबर. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र—पै॥ छ० २९ सवाल.

"चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा अद्यापि पुण्यांतच आहेत. आणखी आठ दिवस लागतील. दौलतराव घोरपडे यांस दहा हजारांपेक्षां अधिकाचा सरंजाम कारभारी देत नाहींत. ठरेल तें मागाहून लिहूं. उभयतां कारभारी गुलटेकडीजवळ राहिले आहेत म्हणून पूर्वींच लिहिलें आहे. दुसरे दिवशीं तेथून कूच करून वानवडीजवळ एकजण, विसाजीपंत बिनीवाले यांचे बागेंत; व दुसरे बाबूजी नाइकाचे बागेंत राहिले आहेत. सखारामपंताचे पुतण्याची सून वारली, म्हणून बापू परत घरास जाऊन सुतक संपल्यावर पुनः निघणार आहेत. रा. नाना व हरीपंत यांस बरें नव्हतें. आतां दोघांचीही प्रकृति बरी आहे. आम्हाबरोबर रास्ते व प्रतिनिधी नेमिले आहेत तेही बाहेर निघाले. आनंदराव गोपाळ यांचीही तयारी जाली. आम्हाबरोबर तोफ-

रवाना नेमिला आहे तो मुहूर्तानें सासवडाहून येकादपुरास आला आहे. समागमें पानशे राजश्री राजाबा येणार. होळकर पर्वतीजवळ राहिले होते. तेथून कूच करून हडपसरावर येऊन राहिले आहेत. शिंदे यानीं या वळणच्या फौजेस निरोप दिला. लग्नाकरितां अमावास्या करून जामगांवास जाणार. तेथें गेल्यानंतर लग्न करून बिडास त्यांचे गुरु आहेत त्यांचें दर्शन घेऊन तुळजापुरास देवीच्या दर्शनास जाणार."

नं. २४३४. **श्रीगणपति.** (मार्ग० शु० १-२० नोवेंबर.)

पै॥ छ० २ जिल्काद. सन तिस्सा सबैन. मार्गशीर्षमास.

आशीर्वाद उपरी. श्रीमंत राजश्री दादासाहेब याणीं पांच सात हजार माणूस जमा केलें आहे. आणखी दोन तीनपावेतों करून बाहेर निघणार. साष्टीस येऊन वसईकडे गडबड करावी. शिवनेरकराचें सूत्र त्यांजकडे आहे यास्तव तेथेंही यावें. त्याप्रमाणें आवई आहे. त्यांजकडे त्यांच्या तोंडावर कांहीं फौज रवाना करावी अशी तरतूद होत आहे. कोणाची रवानगी करितात पहावें. येविशीं चिरंजीव राजश्री दादाच्या दोन तीन चिठ्या वर्तमानाच्या आल्या त्याच पाठविल्या आहेत. अद्यापि फौजेची तोडजोड नाहीं. श्रीनें काय योजिलें आहे न कळे. आह्मी हलके हलके पाय काढीत निघतों. कोठें ताल दिसत नाहीं. मजबूत तर असलेंच पाहिजे. खर्चास नाहीं. असा प्रसंग घडला आहे! यांत परिणाम श्रीचे हातीं. चिरंजीव राजश्री हरीहरराव यांसीं शुद्ध षष्ठीस मुहूर्त रात्रीस आहे. तेथें सर्वांचे विचारास आल्यास सिद्ध करून बाहेर काढावें. आम्ही महादेवाचे सुमारें आलों म्हणजे लिहून कळवितों लावून द्यावे. उगेच चार लोक जमा असावे यास्तव एकास एक जम पाडावा. सारी फौज जमा करावी तर फौजेनें कोठें दूर जाववतें असें नाहीं. कोणी दोन चार हजार जमले ह्मणजे आपलेही जमा करूं.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर.

बहुत काय लिहिणें. चिरंजीव राजश्री दादा अद्यापि पुण्याहून येत नाहीं मग काय करितात श्री जाणे. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४३५. **श्रीगणपति.** (मार्ग० शु० ६–२५ नोवेंबर.)

पै॥ छ० ६ जिल्काद. सन तिस्सा सबैन. मार्गशीर्षमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांस आशीर्वाद उपरी. तुमचीं पत्रें परवांचीं व कालचीं पुण्यास चिरंजीव राजश्री दादाकडे पाठविलीं आहेत. आम्हांस जलद येण्याविशीं लिहिलें तें प्रमाणच. कागल गेल्यावर शिंदा हांवभरी होऊन प्रांतांत गडबड करील. चुकणार नाहीं. परंतु आम्ही पुढें निघालों याजवरून गडबड जरूर करणार नाहीं असें वाटतें. आम्हास यावयाविशीं लिहिलें, त्यास आम्हाजवळ जमेत काय आहे ? पोटास द्यावयाचें संकट; यास्तव लोक फारसे जमा केले नाहींत. राजश्री गोविंदपंतमामाबरोबर व येथील मिळोन जुने तीनशेंपर्यंत होतील. याखेरीज नवे तीनचारशें ठेविले आहेत. उमेदवार लोक फार येतात पण कोण ठेवितो ! आम्हाबरोबर रास्ते व प्रतिनिधीचें पथक व आनंदराव गोपाळ नेमिले आहेत, परंतु अद्यापि त्यांची रवानगी होत नाहीं. कारभारी यांचा मुक्काम वानवडीवरच आहे. लोकांची तोडमोड अद्यापि नाहीं. इकडील स्तिमिताई या प्रकारची, तेव्हां करणारानीं काय करावें ? आम्हांजवळ जमेत थोडी असें असतां येऊन भ्रम आहे तो जाईल ! यास्तव हळू हळू महादेवाकडे याउपर येत आहों. येतात, आले, ही आवाई तिकडे पडेल. वरचेवर पुण्यास लिहीतच आहों. तिकडून पथकें रवाना झालीं म्हणजे लौकरच येतों. तोंपर्यंत हल्लीं बराबर राऊत आहे यांजपैकीं कांहीं व आणखी कांहीं नवे ठेवून पांच

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस.

सातशें...करावयास येईल. कागलास शेंदोनशें माणूस कुमक पोंचेशी असल्यास तरतूद कुरूंदवाडाहून व तुम्हीं करून पहावें. वरचेवर तिकडील वर्तमान सविस्तर लिहीत जावें. " आपलें येणें लौकर होईल यास्तव चिरंजीव राजश्री हरिहरराव यांसीं बाहेर निघावयाचें व पागा रवाना करावयाचें करीत नाहीं, " म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. करवीरकरानीं कागल घेतलें असलें तर शेर होतील. परंतु कागल त्यांस जाणार नाहीं. कारदग्याच्या कागदांत चिकोडकर बाबूराव दादाजी व राजश्री बचाजीपंत असे तेच दिवशीं कागलकरांचे कुमकेस जाणार होते. बहुता अर्थें गेलेच असतील. जर करितां जाऊन कुमक जाहली असल्यास आपणही शेंदोनशें प्यादे जरूर कुमकेस पाठवावे म्हणजे दबाव बसेल. कागलकर बहुत खर्चाचे हलाखींत आले आहेत. त्यास प्यादे कांहीं दिवस ठेवणें......जर कागल राहिलें तरच ठीक आहे. नाहीं तर ठीक नाहीं. ते[1] शेर होतील. आम्ही आठ दिवसांत घांटाचे सुमारें येतों. फार जलद यावें तर सर्वांचा विचार ध्यानांतच आहे! लोक जमा करूं लागल्यास जलद होतील; परंतु पोटाचेंच मोठें संकट पडतें! सरदार कोणी येणार आले नाहींत. पांच तोफा[2] शें शंभर गाडदी असे पुलावर काल नदी उतरून पुढें गेले. महादेवाचे सुमारें त्यांचे गांव आहेत तेथें जातील. आम्ही तिकडे गेल्यानंतर येतील. आपण सरंजाम वगैरे पागांचा जलद करून दोन चारशें पांचशेंपावेतों जमा करावे. आम्हीही जलद येतों. येथें पांच सातशेंपावेतों नवेच करार बोल्या मात्र केल्या आहेत. परंतु तयार होऊन या म्हणावें तेव्हां पोट चाललें पाहिजे. अनेक प्रकारचीं संकटें आहेत. त्यांत ( करवीरकर ) आधीं नामोहरम जाहले म्हणजे फारसा उपद्रव करणार नाहींत. तत्रापि केला. ......... हे आशीर्वाद.

---

१ करवीरकर. २ तोफखानेवाले पानशे यांचे.

नं. २४३६. श्रीगणपति. (मार्ग० शु० १४–३ दिसेंबर.)

पौ॥ छ० १५ जिल्काद. सन तिस्सा सबैन. मार्गशीर्षमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १३ जिल्काद मुक्काम सोनगांव प्रांत फलटण नीरातीर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. तुम्हीं छ० ७ जिल्कादचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १० मिनहूस जी ती मार (?) येथील मुक्कामास पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. येथून भांडीं रहिमतपुरास पाठविलीं होतीं तीं येऊन पावल्याचें लिहिलें तें कळलें. चिरंजीव राजश्री केसोपंत काळे[1] ...... त्याची यादही पाठविली ती पावली. " कागलास वेढा करवीरकरांचा बसला असतां बाबूराव नरसिंह यानीं मोर्चे तुडवून मुलेंमाणसें कोगनोळीस नेऊन ठेविलीं आणि चिकोडीस जाऊन राजश्री बचाजीपंत खांडेकर व अंताजी शामजीस कोगनोळीस घेऊन शाले आणि मशारनिल्हे कुमक आंत घेऊन गेले. याजमुळें मोर्चे करवीरकरानीं उठविले. माणूस शिंद्याचें जायां जखमी जाल्याचें " सविस्तर लिहिलें तें कळलें. कागलचे मोर्चे उठले, मोठी गोष्ट जाली. समयास चिकोडकरानीं कुमक केली म्हणोन कागल हें समयीं राहिलें. ( येसाजी शिंदा ) जर कागल घेता तर हांवभरी होता. परंतु मोर्चे उठले याजमुळें नामोहरम जाहला. याउपर फैलावणी नाहीं. शिंदा करवीरास गेला कीं बाहेरच आहे हें कळवावें. " कित्तूरकराचा जमाव गोकाकेंत आहे. यादवाडकर देसाई त्यास मिळाला. दहा हजार रुपये देऊन त्याच्या भावास सोडविणार. यादवाडापैकीं दहा हजारांचे गांव कित्तूरकरास देणार. हैदरखानाची फौज मोळेकालमुरीवरी आहे. मोळेकालमुरी घेतली. याउपर जाणार. दुसरें कडपे कर्नोळाकडे जाणार. " म्हणोन सविस्तर लिहिलें

---

१ टिंबें दिल्या ठिकाणीं मूळ पत्र फाटलें असून मजकूर गेला आहे.

तें कळलें. वरचेवर तिकडील बातमी राखोन येईल वर्तमान तें लिहित जावें. परवां नरगुंदचीं पत्रें याच अन्वयें आलीं होतीं......चिरंजीव राजश्री हरिहरराव द्वादशीस रवाना होणार म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. चिरंजीव द्वादशीचे मुहूर्तें डेरादाखल जाहलेचें ल्याहावें. राजश्री गोपाळ नाईक यांचे घरची जप्ती उठविली म्हणोन लिहिलें तें कळलें. मशारनिल्हेचीं घोडीं पुण्यास पाठविलीं तेव्हां तेथें खर्च काय लागला त्याची याद पाठवून द्यावी म्हणोन लिहिलें, त्यास चाळीस रुपये तीन आणे खर्च जाहले आहेत ते मिरजेकडे तसलमातीस लिहिले आहेत. दाणा–वैरण लागली त्याची याद अलाहिदा पाठविली आहे. तपशीलवार चंदी राघो हरी याजवळ आहे. घोड्यास मिरजेंत व वाटखर्च व पुण्यांतील खर्च मिळोन जो ऐवज होईल तो उगवून घ्यावा. "पागा करकंब मंगळवेढें येथून आली. जीन सामान वाटलें. बारगिरां उपयोगी घोडीं निवडून याद पाठविली आहे" म्हणोन लिहिलें, त्यास याद आली नाहीं. विसरून राहिली असेल. करवीरकरानीं तुम्हास पत्र लिहिलें व तुम्हीं उत्तर लिहोन दिलें; दोनीच्या नकला करून पाठविल्या त्या पावल्या. कोंकणांतील तोफा आणावयास बचाजीपंत सहस्रबुद्धे दर्यावर्दी वगैरे माणसें देऊन रवाना केल्याचें लिहिलें तें कळलें. आजला घांटापर्यंत तोफा आल्याच असतील. जलद आणावयाची तरतूद करावी. प्रतिनिधीकडील दस्तकाविशीं रा॥ शिवाजीपंतास लिहिलें आहे. दस्तक येतांच पाठवितों. रा. अंताजीपंतमामा व नारोपंत लेले आले आहेत......मनास आणोन मागाहून लिहोन पाठवितों....तें कळलें. मामा पंधरा हजार देऊं म्हणतात म्हणोन लिहिलें, त्यास मामाकडे किती व लेले किती देतात, दातार आल्यावर त्यांजकडे

१ कारण कीं, प्रतिनिधि विशाळगडकर यांचे मुलखांतून आंबा घाटानें तोफा मिरजेस यावयाच्या. शिवाजीपंतानें पेशव्यांस अर्ज करून त्यांजकडून प्रतिनिधीस पत्र लिहवून त्यांचें दस्तक मिळवावयाचें.

किती करार होतील, तें लिहोन पाठवावें. मंगळवेढयास आज दोन महिने मोठया निकडीनें खर्चाविषयीं लिहीत गेलों तेव्हां परवां पांच हजार रुपये तीर्थस्वरूप राजश्री मेघश्यामरावबापूनीं पाठविले. आणखी पांच हजार जरूर पाठवून द्यावे म्हणून लिहिलें आहे व ऐवजाकरितां राऊतही पाठविले आहेत. काय करितात पहावें. " हैदरखानाकडील तहाचें बोलणें ' तुंगभद्रेची हद्द ' असें बोलत आहेत असें ऐकण्यांत आहे. असें बोलणें आलें असल्यास या प्रसंगीं कबूल केल्यास चिंता नाहीं; " म्हणोन लिहिलें, त्यास या प्रसंगीं असें बोलणें शत्रूकडून आल्यास मग मान्य न करी असा कोण आहे! संधानाचा प्रकार किमपि नाहीं. असें बोलणें बोलावयास त्यास तरी कोणतें संकट येऊन पडलें आहे! असो. श्रीमंतांचे दैवेंकरून जें होणें तें होईल. एरवीं तरतुदेची जात समजलीच आहे! चिरंजीव राजश्री बळवंतराव मुलीच्या लग्नाकरितां कारभारी यांचा निरोप घेऊन मंगळवेढयास जावयास पुरंदरास आले होते. तेथून काल निघून जाणार होते. गेले असतील. कार्यसिद्धि करून लौकरच पुरंदरास जातील. आपण त्या प्रांतींचे लोक चांगले चांगले पाहून......चार पांचशें लोक जमा असावे यास्तव लिहिलें आहे. दिवस कठीण आले आहेत. परिणाम श्रीगजानन लावील. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

# बेरड बंडखोरांचा दंगा.

एकीकडून मुंबईकर इंग्रजांची पुण्यावर चालून येण्याची गडबड, तर दुसरीकडे करवीरकरांचा दंगा; अशा दुहेरी अडचणीमुळें वेळ पडल्यास पुण्याकडे अथवा कोल्हापुराकडे जातां यावें म्हणून परशुरामभाऊ फौज जमा करीत नीरेच्या कांठीं तळ देऊन राहिले होते हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. शेवटीं वर सांगितलेल्या दोन्हीं स्थळीं त्यांचें जाणें न होतां त्यांस जेवढी फौज जमली तेवढीच घेऊन घाईघाईनें पंढरपुराकडे कूच करून जाणें भाग पडलें. याचें कारण त्या वेळीं त्या प्रांतीं बंडखोरांनीं केलेला दंगा हें होय.

या दंग्यांत नरसो गोविंद, भगवंतराव निंबाळकर, पिडाप्पा बेरड, सुरापूरकर बेरड देसाई हे चौघे प्रमुख होते. यांत पहिल्या तिघांस चौथ्याचा म्हणजे सुरापुरकर देसायाचा आश्रय असून तो सैन्य व मुलूख या बाजूंनीं बराच प्रबळ संस्थानिक होता. करवीरकरांप्रमाणें हे चौघे बंडखोर श्रीमंत दादासाहेबांच्या उत्तेजनावरून दंग्यास उद्युक्त झाल्यामुळें त्यांचा दंगा लवकर मोडून टाकणें व विशेषतः सुरापुरकराची रग जिरवून त्यास वठणीस आणणें अत्यंत अवश्यक होतें. नरसो गोविंद हा वाचकांच्या ओळखीचाच आहे. गतवर्षीं यानें बंड करून पटवर्धनांचें करकंब हें ठाणें बळकाविलें, तेव्हां तुकोजी होळकरानीं त्याचा दंगा मोडून त्यास कैद करून पुणेंदरबाराच्या हवालीं केलें होतें; परंतु मध्यंतरीं कांहीं दिवस मोरोबादादा कारभारी झाले तेव्हां त्यानीं त्यास कैदेंतून सोडून दिलें ! तो हजार पांचशें लोक जमवून कोठें घाला घालावयाच्या यत्नांत होताच, इतक्यांत त्याला भगवंतराव निंबाळकर व पिडाप्पा बेरड हे येऊन मिळाले. तेव्हां त्या सर्वांची मिळून पांच हजार फौज जमली. शिवाय वेळ पड-

त्यास सुरापुरकरांच्या मुलखांत त्यांस आसरा मिळण्याजोगा होता. भगवंतराव निंबाळकर माढेकर व रंभाजी निंबाळकर मोहोळकर यांचा भाऊबंदकीचा दावा होता त्यामुळें भगवंतरावाचें बंड बळावूं लागतांच हा आतां आपला मुलूख लुटील या भयानें रंभाजीनेंही फौजेची तयारी केली, व आपली कुमक करण्याविषयीं पुणेंदरबारास पत्रें लिहिलीं. त्यावरून तिकडून पवार, जाधव, कवडे, गोविंदराव कृष्ण व पांडुरंग बाबूराव या पांच पागांची रंभाजीच्या कुमकेस नेमणूक झाली. त्या पागा येऊन मिळाल्यावर रंभाजीजवळ पांच हजार फौज जमा झाली. मग त्यानें भगवंतराव वगैरे त्रिवर्ग बंडखोरांशीं कार्तिक शुद्ध १३ स गांठ घातली. तेव्हां उभयपक्षीं तुमुल युद्ध होऊन बंडखोरांचा मोड झाला. तथापि एवढ्यानें त्यांच्या दंग्याचा बीमोड झाला असें नाहीं. कोठें तरी एखादी बळकट जागा बळकावून बंडाचा फैलाव करावा याविषयीं ते उद्युक्तच होते. अक्टोबरच्या अखेरीस सुरापुरकरानें या बंडवाल्यांस मिळवून घेऊन मराठी मुलखावर स्वारी केली. त्यानें प्रतिनिधीचें बागेवाडी हें ठाणें घेऊन तेथील कमावीसदारापासून तीस हजार व रयतेपासून साठ हजार रुपये खंड घेतला; आणि प्रतिनिधीचे दीडशें घोडे ठाण्यांत होते ते नेले. नंतर त्यानें आलमेलें परगण्यावर स्वारी करून तेथील रयतेपासून दोन लक्ष रुपये हाणमार करून घेतले! त्याच्या भयानें इंडी, तांबें, होर्ती या परगण्यांतले तमाम लोक घरेंदारें टाकून पळत सुटले. नंतर तो देसाई मोठा जमाव करून पंढरपुरावर येणार व तें क्षेत्र लुटून मंगळवेढें, करकंब व बरडोल तालुके घेणार अशा बातम्या उठून तो प्रांत गडबडून गेला. या बातम्या खऱ्याच होत्या. कारण कीं, तो देसाई सात आठ हजार फौज घेऊन पुनः स्वारीस निघाला होता. इतक्या गोष्टी झाल्या तेव्हां आतां त्या देसायाची व त्याचे साथी नरसो गोविंद वगैरे उपद्व्यापी लोक होते त्यांची उपेक्षा

करणें घातुक होतें. याकरितां बाकीचे सर्व विचार बाजूस ठेवून परशुरामभाऊनीं दिसेंबरच्या अखेरीस पंढरपुराकडे कूच केलें.

इकडे करवीरकरानीं दंगा एकसारखा सुरू ठेविला होता तरी त्यांस अद्यापि कोठें यश आलें नव्हतें. चिकोडीकरानीं मदत केल्यामुळें त्यांस कागलचा वेढा उठवावा लागला हें मागें सांगितलेंच आहे. नोवेंबरांत श्रीमन्महाराज व येसाजी शिंदे पुनः कागलावर चालून आले. परंतु राणोजी घाटगे सर्जाराव व येसाजी बाबूराव चिकोडीकर यानीं त्यांशीं लढून त्यांस तीन वेळां मागें हटविलें. सटवोजी भोसले येळगुडच्या ठाण्यास दिसेंबर महिन्यांत वेढा घालून बसला असतां चिकोडीकरानीं त्याचा पराजय करून त्यास पळवून लाविलें व त्याचे घोडे, हत्ती, नगारा, निशाण सारें हिरावून घेतलें, तेव्हां तो पांचपंचवीस स्वारांनिशीं पळून इकेरींच्या ठाण्याच्या आसऱ्यास गेला. तथापि या पराजयामुळें करवीरकरांची हिंमत कमी न होतां आपले बेत तडीस नेण्याची तयारी ते अधिकच उत्साहानें करीत होते !

नं. २४३७. ( आषाढ शु० ९-३ जून. )

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस पै॥ छ० १० जमादिलाखर तिस्सा सबैन आषाढमासचें—

" छ० २९ जमादिलावलचीं पुण्याहून पत्रें आलीं. होळकर वगैरे सरदार इकडे येऊन मिळाले. सर्वांची एकचित्तता जाली. मोरोबादादाची समजाविशी होणें ती होळकराचे विद्यमानें होईल. दोन चार दिवसांत फडशा होऊन तदोत्तर शिंदे होळकर, रामचंद्र गणेश वगैरेची रवानगी ( कर्नाटकांत ) होणार. हैदरखानाचा मुलगा टिपू बदामीस वेढा घालून तोफांचा मार देत आहे. बहुत प्रबळ जाहला आहे. "

नं. २४३८. ( भाद्र० व० ९–११ सप्टं. )

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस:—

" महिपतराव कवडे रंभाजी निंबाळकरांकडे जाणार. रंभाजी बैराग माणकेश्वराकडे पांच हजार फौजेनिशीं आले. करमाळ्यास सरकारची फौज आली. व गोविंदराव पवार दोन हजार जमावानिशीं आहेत. तेही बैरागाकडे जाणार. "

पै॥ छ २१ साबान तिस्सा सब्बैन.

नं. २४३९. (कार्तिक शु०—अक्टो० दु० पंधरवडा.)

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस:—

" नरसो गोविंद व भगवंतराव निंबाळकर व पिडापा बेरड असे एकत्र होऊन शिवणगीवर आहेत. भगवंतरावाची मसलत निंबाळकरांचा तालुका लुटावा. नरसो गोविंदाचा रोष करकंबेवर. बेरड येळूर, बरडोल व मंगळवेढे यांजवर जाणार. "

नं. २४४०. ( कार्तिक शु० ९–२९ आक्टो. )

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस पै॥ छ० १० सवाल तिस्सा सबैन मार्गशीर्ष मासचें.

" सुरापुराहून बेरडानें येऊन बागेवाडी प्रतिनिधीकडील ठाणें यास वेढा घातला. आठ दिवस लढाई होऊन ठाणें घेतलें. कारकुनांपासून तीस हजार रुपये व रयतेपासून ६० हजार खंड घेतला. प्रतिनिधीचे घोडे दीडशें ठाण्यांत होते ते घेतले. बेरडास भगवंतराव निंबाळकर व नरसो गोविंद हे जाऊन मिळाले आहेत. "

नं. २४४१. ( कार्तिक शु० १०–३० आक्टो. )

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस पै॥ छ० ११ सवाल तिस्सा सबैन कार्तिकमासचें.

" सुरापुराहून बेरडांची फौज येऊन अलमेलें घेतलें. तेथील रयतेपासून दोन लक्ष रुपये हाणमार करून घेतले. बेरडांचे भयानें इंडी तांबोळ होर्ती इत्यादि परगणे ओस जाले. पुनः वस्ती जाली म्हणजे बेरड येणार. सध्यां गेला आहे. "

नं. २४४२. ( कार्तिक व० ३—७ नोवें. )

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस—

" सुरापूरप्रांती नरसो गोविंद जमाव करून दंगा करणार. सुरापुराकडेही जमाव भारी केला आहे. क्षेत्र पंढरपुरावर येणार म्हणून दाट आवई आहे. सोलापुरास बेरडांचें वर्तमान तथ्य आलें. क्षेत्रावर[1] निश्चयें येणार. प्रांतांतील लोक फार गडबडले आहेत. "

पै॥ छ १९ सवाल तिस्सा सब्बैन.

नं. २४४३. ( कार्तिक व० ३—७ नोवें. )

करकबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस. पै॥ छ० १९ सवाल कार्तिकमास तिस्सा सब्बैन.

" भगवंतराव निंबाळकर याची व रंभाजी बाजी निंबाळकर व श्रीमंतांकडील पागे यांची कार्तिक शु॥ १३ स मोठी लढाई जाली. भगवंतरावाचा मोड जाला. भगवंतराव पळून गेला. "

नं. २४४४. ( कार्तिक व० १२–१९ नोवें. )

राणोजी घाटगे सर्जेराव यांकडून कागलाहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. पै॥ छ० २७ सवाल. तिस्सा सबैन. मार्गशीर्षमास.—

" श्रीमन्महाराज व येसाजी शिंदे[2] छ० २१ सवालीं हजार स्वार व तीन हजार प्यादेनिशीं आम्हांवर तीन वेळां चालून आले. तीनही वेळां आम्हीं त्यांस मागें सारिलें. युद्ध तुमुल जालें. ते पुनः चालून

१ पंढरपुरावर. २ घाटग्यांस येसाजी बाबूराव चिकोडीकर सामील झाले होते. त्यांचेंही याच मजकुराचें पत्र निराळें आहे तें येथें घेतलें नाहीं.

येणार. आह्मी तर जिवावर उदार होऊन येथें राहिलों आहों. आह्मांस उपराळा सत्वर करावा व सरकारांत लिहून या प्रांतीं फौज लवकर येई तें करावें. "

नं. २४४५. ( कार्तिक व०—नोवें. प. पंधरवडा. )

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस—

" रंभाजी निंबाळकर याणीं अणिगिरीच्या ठाण्यास तोफा लाविल्या आहेत. बहुत युक्तीनें कामें करून घेतात. "

नं. २४४६. ( पौष शु० ४–२३ दिसें. )

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस पै॥ छ ५ जिल्हेज तिस्सा सबैन पौषमासचें.

" नरसो गोविंद, भगवंतराव निंबाळकर व पिडापा बेरड उदनाळावर आहेत. दगा करून कोठें बळकट जागा दाबून दंगा करणार. पांच हजार जमाव आहे. भीमापार होऊन मंदरूपावर भंडारकवठेंवर गेले होते. तेथील ठाणेदारानें त्यांस मागें हटविलें. बरडोल, मंगळवेढें, ममदापूर यांवर चालून जाणार. करकंबेवरही आले होते परंतु भाऊसाहेब फौजसुद्धां जवळ आले म्हणून पळाले. गोविंदराव कृष्ण, पांडुरंग बाबूराव व जाधव यांच्या पागा रंभाजी निंबाळकर यांस मिळाल्या आहेत. "

नं. २४४७. ( पौष शु० ५–२४ दिसेंबर

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र छ० ४ जिल्हेजचें मुक्काम नजीक वेळापुर येथून:—

" नरसिंगराव गोविंद व भगवंतराव निंबाळकर वगैरे चार लुच्चे जमून बेरडाच्या आसऱ्यानें पंढरपुरावर गलबल करणार म्हणून लिहिलें, त्यास आतां आम्हीं क्षेत्रालगत येऊन पोंचलों आहों. कांहीं चिंता नाहीं. "

१ सुरापूरकर बेरड संस्थानिक यांच्या.

नं. २४४८. ( पौष शु० १२–३० दिसेंबर. )

परशुरामभाऊंचे गंगाधरराव गोविंद यांस पत्र पै॥ छ० ११ जिल्हेज—

" सटवोजी भोसला येळगुडास वेढा घालून बसला असतां चिकोडीकरानीं चालून जाऊन त्याचा मोड केला. घोडे, हत्ती, नगारा, निशाण, सर्व घेतलें " म्हणून लिहिलें तें कळलें. भोसल्याचा रेंच मोडला हें बरेंच जालें. आतां करवीरकर फारसा दंगा करणार नाहींत. आम्ही मोहोळचा गुंता उरकून मंदरूपचा फडशा करून घेऊन मंगळवेढे[२] उजवे टाकून हलसंगीकडे येतों. जे समयीं तिकडे निकड पडेल ते समयीं तुमचें पत्र येतांच तिकडे येतों. दुर्गास[१] शत्रूचा वेढा बसला आहे म्हणून लिहिलें तें कळलें. आज कूच करून डिगंत (?) परगणें मोहोळ येथें गेलों. मोहोळ मंदरूपचें एका दोहों दिवसांत विल्हेस लावून कूच करून सोनपेच्या सुमारें येतों. "

नं. २४४९. श्री. ( ९ जानेवारी. )

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे सेवेशीं.—

विनंती सेवक रामाजी अनंत, मुक्काम लचाण साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ऐसीजे, ता॥ पौ० व० ७ बुधवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे. बेरडाच्या बातमीविशीं लिहिलें, त्यास पिडापा बेरड यास आचार्य स्वामी खेडकर यानीं आश्रय देऊन कसबे मणूर येथून उडचणावरी स्वारी केली. गुरें व माणसें घेऊन मणुरांत ठेविलीं होतीं त्यास उडचणकरानीं हजार सामान मेळवून बेरडावर स्वारीस गेले होते ते समयीं वीस घोडीं पाडून घेतलीं. आणि दुसरे दिवशीं धाकट्या मणुरावर पिडापा उतरला होता, रात्रीं उडचणकर येऊन छापा पाडून

१ चित्रदुर्गास हैदरअलीचा. २ मंगळवेढयाचे मामलदार मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन.

पन्नास साठ घोडीं घेऊन गेले. बेरडाचा गळाठा फार केला. तेथून पिडापा पळून गेला. त्यांच्या[1] पारिपत्यास्तव सुरापुराहून वीरभद्रआपा नष्टी सात आठ हजार फौज घेऊन तगेहाळी परगणे तांबें येथें उतरला होता. काल तेथून कूच करून नागरहाळी परगणे आलमेलें येथें जाऊन उतरला. मौजे मजकुरापासून आठ कोसांवर आहे. हलसंगीस यावयाची आवाई फार आहे, परंतु कोणीकडे जातो नकळे. विजापुराकडे जाणार म्हणतात. कोठें जाणार न कळे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. आणखी माणसें बातमीस पाठविलीं आहेत. वर्तमान आल्यावर लिहून पाठवितों. हे विज्ञापना.

---

१ उडचणकरांच्या.

# इंग्रजांची पुण्यावर मोहीम.

या मोहिमेचें तशीलवार वर्णन " अधिकार-योगांत " एकंदर आलेलें असल्यामुळें तें आम्ही येथें संक्षेपानेंच देणार आहों.

इंग्रजांनीं दादासाहेबांचा पक्ष सोडावा म्हणून पुणेंदरबारानें त्यांस दहशत घालण्याकरितां फ्रेंचांशीं राजकारण करण्याचा डौल घातला; त्यायोगानें इंग्रजांस दहशत वाटावी ती न वाटतां उलट पुणें दरबाराविषयीं व विशेषतः नाना फडनवीस यांविषयीं त्यांचा क्रोधाग्नि मात्र अधिक भडकला. वस्तुतः फ्रेंचांशीं नानाचें किंवा सखारामबापूचें कोणत्याही राजकारणाविषयीं खरोखरीचें बोलणें झालें नव्हतें, व तें करण्याचा उभयतांचाही बेत नव्हता. पण इंग्रजांच्या मनांत पक्की अटी बसली कीं, फ्रेंचांचा वकील पुण्यास येऊन बसला आहे त्याच्या द्वारें त्या लोकांची फौज पश्चिम किनाऱ्यावर आणून आपणास मुंबईंतून हुसकून लावण्याचा प्रयत्न पुणें दरबारानें चालविला आहे! तें राजकारण सिद्धीस जाण्यापूर्वींच श्रीमंत दादासाहेबांस पुण्याच्या गादीवर आणून स्थापावें; नाना फडनवीस वगैरे लबाड कारभारी दरबारांतून काढावे, व फ्रेंचांचें पाऊल महाराष्ट्रांत केव्हांही न शिरकेल असा पक्का बंदोबस्त करावा; असा मुंबई सरकारानें म्हणजे मुंबईच्या इंग्रजानीं बेत केला. तो बेत गव्हर्नर जनरल वारन हेस्टिंग्स् यांस पसंत पडून त्यांनीं बुंदेलखंड, माळवा व नेमाड या मार्गानें मुंबईकरांच्या कुमकेस सहा पलटणें रवाना केलीं. मोरोबादादाच्या कारस्थानाची चलती होती त्या वेळीं त्यानीं जर इंग्रजांस पुण्यास येण्याविषयीं इशारा केला असता तर ते दादासाहेबांस घेऊन तत्काळ पुण्यास येते. परंतु त्या वेळीं मोरोबानें त्यांस बोलाविलें नाहीं. पुढें ते

अधिकारभ्रष्ट होण्याची वेळ आली तेव्हां दादासाहेबांस घेऊन लवकर पुण्यास या अशी त्यांनीं मुंबई सरकारास परोपरीनें विनंति केली. पण त्या वेळीं पावसाळा सुरू होणार असल्यामुळें त्या विनंतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुण्यावर मोहीम करण्याची मसलत मुंबई सरकारास पावसाळा संपेपर्यंत चार महिने तहकूब ठेवावी लागली. त्या अवधींत मोरोबादादा कारभारांतून निघून कैद झाले आणि नाना फडनवीस यांचा बोलबाला पुणें दरबारीं पूर्वीप्रमाणें सुरू झाला. त्यामुळें पुण्यावर मोहीम करण्यास जी अनुकूल स्थिति पावसाळ्याच्या आधीं होती ती तशी पुढें राहिली नाहीं.

तथापि श्रीमंत दादासाहेब व त्यांचे चिंतो विठ्ठल व आबाजी महादेव वगैरे कारभारी यांनीं मराठी राज्यांत चोहोंकडे बंडें व फितूर उत्पन्न करून इंग्रजांच्या मसलतीचा मार्ग सुगम करण्यांत आपणाकडून आळस केला नाहीं ! शिवनेरचा किल्ला अद्यापि मोरोबादादाच्या कारकुनाच्या हवालीं होताच, त्यामुळें त्या कारकुनाशीं सूत्र लावून त्याजकडून दंगा करविण्याचें काम त्यांस सुलभच होतें. शिवाय मिरजप्रांतीं मुराराव घोरपडे सेनापति यांचे जांवई राणोजी नाईक निंबाळकर यांच्या व विठोजी चव्हाण हिंमतबहाद्दर यांच्या द्वारें फौज जमा करून दंगा कराविण्याचा त्यांनीं उद्योग केला होता. त्याशिवाय सुरापूरकर बेरड व नरसो गोविंद वगैरे बंडखोरांनीं सन १७७८ चा पावसाळा संपतां संपतां पंढरपूर, सोलापूर वगैरे प्रांतांत धिंगाणा माजविला होता, तोही दादासाहेब व त्यांचे कारभारी यांच्या उत्तेजनावरूनच होय; हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. करवीकरांसही याच वेळीं श्रीमंत दादासाहेबांकडून इशारा गेल्यामुळें इंग्रजांची पुण्यावर मोहीम सुरू होण्याच्या सुमारास त्यांनींही पेशव्यांच्या मुलखावर स्वाऱ्या करून लुटालूट करण्याचा उद्योग सुरू केला होता. तुकोजी होळकरांचा

पुणें दरबाराशीं अद्यापि चांगलासा मिलाफ झाला नव्हता व इंग्रजांची फौज घेऊन घांट चढून वर आलांत म्हणजे मी तुह्मांस मिळेन असें त्यांनीं दादासाहेबांस आश्वासन दिलें होतें; आणखीही कांहीं सरदार दादासाहेबांस व इंग्रजांस आयते वेळीं येऊन मिळणार असल्याचें चिंतो विठ्ठल मुंबई सरकारास सांगत होता, तेव्हां त्यांत कांहीं तरी खरें असलेंच पाहिजे. मुंबई सरकारची फौज व बंगालच्या सहा पलटणें एकत्र होऊन लढाईची मसलत निकरानें चालू झाली असती, व वर सांगितलेले फितूर व राजकारणें त्याच वेळीं सिद्धीस गेलीं असतीं, तर दादासाहेबांची पुण्यास स्थापना होण्याचें काम फारसें दुर्घट झालें नसतें, परंतु मोहीम सुरू झाली तेव्हां बंगालची फौज मुंबईच्या फौजेस मिळालेली नव्हती व सुरापूरकर वगैरे बंडखोरांचा समाचार घेण्यासाठीं परशुरामभाऊ पंढरपुराकडे वेळींच निघून गेले होते. बाकीचे फितूर व करवीरकरांची मसलत यांचा एकमेकांशीं मेळ नसल्यामुळें व त्यांचें कार्य एकाच वेळीं घडून येत नसल्यामुळें त्यांपासून मराठी राज्यास तादृश उपद्रव झाला नाहीं. आणि त्या राज्यावर या वेळीं एवढें हें मोठें जें काहूर उठलेलें दिसत होतें तें एक दोन महिन्यांत विसकटून जाऊन आपोआप शांत झालें !

निम्मा पावसाळा संपतो न संपतो तोंच इंग्रजांनीं मोहिमेची तयारी झपाट्यानें सुरू केली. मुंबईची सर्व बातमी पुण्यास प्रत्यहीं कळत असल्यामुळें कारभारीही पुढें येणाऱ्या या अरिष्टाचें निवारण करण्याच्या उद्योगास लागले. दसरा झाल्यावर कर्नाटकच्या मोहिमेवर जाण्याचा बेत त्यांस आतां अर्थातच सोडून द्यावा लागला. नोवेंबरच्या अखेरीस मुंबईहून इंग्रजांची चार हजार फौज स्वारीस निघाली तेव्हां तीबरोबर श्रीमंत दादासाहेब व त्यांचे दत्तकपुत्र अमृतराव व दिवाण चिंतो

विठ्ठल हेही निघाले. ह्या सर्वांची स्वार पायदळ मिळून दोन हजार फौज व कांहीं तोफाही स्वारींत होत्या. इंग्रजी फौजेबरोबर बुणग्याचें इतकें अनिवार लटांबर जमलें होतें कीं, तें बरोबर घेऊन बोरघांटाच्या माथ्यावर येण्यास त्या फौजेस पक्का एक महिना लागला! त्या अवधींत मराठयांची फौजही पुण्यास जमा होत चालली. महादजी शिंद्यानीं आपल्या फौजेस नुकताच निरोप दिला होता तरी या प्रसंगाकरितां त्यांनीं ती पुनः बोलावून आणली. व हरीपंततात्यानींही घरोघर निघून गेलेली हुजरात पुनः गोळा केली. रास्ते, प्रतिनिधी वगैरे पथकें परशुरामभाऊंस सामील होण्याकरितां निघालीं होतीं त्यांसही कारभाऱ्यांनीं याच मोहिमेवर नेमिलें.

याप्रमाणें फौजेची तयारी होते तों इंग्रजांची अघाडीची टोळी घेऊन इष्टुर फांकडा घांट चढून वर आला. त्याचा मुकाबला घेण्यास इकडून भिवराव पानशांची रवानगी झाली होती; त्या उभयतांची घांटमाथ्यावर गांठ पडून थोडें थोडें युद्ध सुरू झालें तेव्हां फांकडयाच्या मदतीस सारें इंग्रजी लष्कर घांट चढून वर आलें. त्यामुळें शिंदे होळकर व उभयतां कारभारी व हरीपंततात्या वानवडीस होते तेही कूच करून तळेगांवच्या रोखें आले. पानशांशीं लढत लढत इंग्रजी लष्कर हळू हळू पुण्याकडे येत असतां खंडाळ्यास लेफ्टनंट कर्नल के बाण लागून जा।ां झाला व कारल्याच्या मुक्कामीं तोफेचा गोळा लागून इष्टुर फांकडा ठार झाला. मराठी राज्याविषयीं व विशेषतः पुणें दरबार प्रकरणीं उत्तम माहितगार मि. मॉस्टिन स्वारीबरोबर होता, तो दुखण्यानें हैराण होऊन मुंबईस परत गेला. या गोष्टीमुळें इंग्रजांचा थोडासा हिरमोड झालाच होता. त्यांत आणखीही निराशेची भर पडण्यास कारणें उद्भवत गेलीं. पूर्वीं कबूल केल्याप्रमाणें दादासाहेबांस येऊन मिळण्याचें तुकोजी होळकरानीं आतां साफ नाकारलें. चिंतो विठ्ठल मुंबईस

म्हणत होता त्याप्रमाणें दुसरी कांहीं मराठी फौज इंग्रजांस येऊन मिळणार होती तीही मिळाली नाहीं. आपल्याशीं लढण्यास नानाफडनवीस फौज जमा करूं शकणार नाहींत असा इंग्रजांचा अजमास होता तो साफ चुकल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. कारण कीं नानानीं या मोहिमेवर चाळीस हजार फौज गोळा करून आणिली होती. इतक्या सेनासमुदायापुढें त्या चार हजार इंग्रजी फौजेचा निभाव कसा लागावा ? तथापि इतक्याही गोष्टींस न जुमानतां मर्दुमीनें झुजत झुजत ती फौज तळेगांवापर्यंत आली. तेथें महादजी शिंद्याशीं तिची गांठ पडून थोडीशी लढाई झाली. इंग्रज तळेगांवास मुक्कामास आले तों तो गांव जळून खाक झालेला त्यांच्या दृष्टीस पडला ! पुण्याच्या वाटेवरचीं सर्व गांवें व भोंवतालचा मुलूख मराठ्यांनीं जाळून ओस केला आहे इतकेंच नव्हे, तर खुद्द पुण्यासही आग लावण्याची नानाफडनविसानीं तयारी केली आहे, अशी बातमी इंग्रजांस समजली; तेव्हां पुढें चाल करणें आपल्यास झेंपणार नाहीं असें समजून ता. ९ जानेवारीच्या रात्रीं इंग्रजी लष्कर तळेगांवाहून मुंबईस परत जाण्याकरितां निघालें तों मराठी फौजा चोहोंकडून धांवून येऊन त्यांस बिलगल्या. त्या गर्दींत इंग्रजांचें पुष्कळ सामान लुटलें गेलें. मराठ्यांशीं लढत लढत वाट चालतां चालतां इंग्रजी फौज वडगांव गांठीपर्यंत उजाडलें. तेथें मराठ्यांनीं चोहोंकडून घेरल्यामुळें तिला वडगांवांत शिरावें लागलें. तेथें बरीच लढाई झाली. शेवटीं मराठे म्हणतील त्या अटींवर तह करून सुटका करून घेण्याखेरीज गत्यंतर नाहीं असें इंग्रज सेनेवरच्या मुख्य अधिकाऱ्यांस दिसून आलें, त्याप्रमाणें त्यानीं कारभारी व शिंदे यांशीं बोलणें सुरू केलें. तेव्हां त्यानीं दादासाहेबांस हवालीं करण्याची अट घातली ती कबूल करणें इंग्रज अंमलदारांच्या जिवावर आलें. पण श्रीमंत आपण होऊन शिंद्यांच्या स्वाधीन होण्यास कबूल झाले, त्यामुळें ती अडचण दूर

होऊन तहाचीं बाकीचीं कलमें ठरण्यास उशीर लागला नाहीं. साष्टी व जंबूसर वगैरे गुजरायचे महाल इंग्रजांनीं घेतले होते ते सोडून देऊन माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दींत तह झाला होता त्याप्रमाणें चालावें व हिंदुस्थानांतून पलटणें येत होतीं तीं परत लावन द्यावीं; याप्रमाणें तहाच्या शर्ती होत्या त्या इंग्रजांनीं तत्काळ मान्य केल्या; व दोन इंग्लिश अंमलदार ओलीसही दिले. नंतर दादासाहेब शिंद्यांच्या लष्करांत येऊन उतरले व इंग्रजी फौज मुंबईस परत गेली.

इंग्रजांशीं युद्ध चालू असतां नरसो गोविंद व बेरड वगैरे बंडखोर पांच हजार जमाव करून वरडोलास तळ देऊन राहिले होत व पंढरपूर, मंगळवेढें वगैरे लुटण्याचा त्यांचा बेत तडीस जाऊं न द्यावा ह्मणून परशुरामभाऊ पंढरपुरासच खुद्द तळ देऊन राहिले होते. अर्थात् त्या प्रांतीं बंडखोरांची गडबड तूर्त कमी झाली होती. पण त्या अवधींत इकडे करवीरकरांनीं कागलचें ठाणें घेतल्यामुळें त्यांची कांहींशी सरशी झाली होती. त्यानीं कागलास पुन्हां येऊन मोर्चे दिले असतां मिरजेहून कागलकरांस कुमक व्हावी ती झाली नाहीं. असें असतांही बरेच दिवस घाटग्यानीं झूज केलें. पण शेवटीं निरुपायामुळें तह करून ठाणें महाराजांच्या हवालीं करणें त्यांस भाग पडलें. सटवोजी भोंसल्याचा मागें सांगित त्याप्रमाणें चिकोडीकरानीं पराजय केल्यावर तो गोकाकेस गेला होता. तेथें कित्तूरकर देसाई होता तो व करवीरकर एकत्र होऊन पेशव्यांच्या मुलुखास उपद्रव देण्याची मसलत आतां घाटूं लागली होती !

नं. २१५०. (कार्तिक व० नोव्हें० दु० पंधरवडा.)

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र पै॥ छ० २ जिल्काद सन तिस्सा सबैन मार्गशीर्षमासचें.

" श्रीमंत राजश्री दादासाहेब यांणीं पा.च सात हजार माणूस जमा केलें आहे. आणखी दोन तीनपावेतों करून बाहेर निघणार

साष्टीस येऊन वसईकडे गडबड करणार. शिवनेरकरांचें सूत्र त्यांजकडे आहे. यास्तव तेथेंही यावें याप्रमाणें आवाई आहे. याजकरितां त्यांच्या तोंडावर कांहीं फौज रवाना करावी अशी तरतूद होत आहे. कोणाची रवानगी करितात पहावें. येविशीं चिरंजीव राजश्री दादांच्या दोन तीन चिठ्या वर्तमानाच्या आल्या त्याच पाठविल्या आहेत "

नं. २४५१. श्रीगणपति. (मार्ग० शु० १४ ३ दिसेंबर.)

पै॥ १५ जिल्काद. सन तिस्सा सबैन. मार्गशीर्ष मास.

" आशीर्वाद उपरी. इकडील वर्तमान तर इंग्रजानीं गडबड केल्याचा प्रकार वरचेवर दोन तीन पत्रीं लिहिलाच आहे, त्यावरून कळलेंच असेल.- अलीकडील वर्तमान तर इंग्रजांकडील माणूस घांट चढून वर आलें. घांटमाथां बातेम्या बांधीत आहेत. वरचेवर जथ तेथें पाडणार, यास्तव उभयतां सरदारसुद्धां कारभारी याणीं वानवडीवरून कूच केलें. परवां नदीपार होऊन दोन कोस मुक्कामास गेले. पुढें शिंदे यानीं लोकांस निरोप दिला होता, परंतु अलीकडे या गडबडे-पासोन मागती पत्रें पाठवून लोक जमा करीत आहेत. या फौजेनें मन घालोन काम केल्यास इंग्रज ठरतील असें नाहीं. परवां चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादांचें पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे त्यावरून सविस्तर कळेल. आम्हां समागमें प्रतिनिधी व रास्ते व आनंद-राव गोपाळ वगैरे सरंजामी नेमिले होते ते सारे तिकडेंच गुंतले. तोफ-खाना अगोदर पुढें रवाना केला होता तो आजच येथें येऊन दाखल जाला. राजश्री राजाबा पानशे येणार आहेत.आम्ही हळूहळू महादेवा-कडे येत आहों. मुक्काम मजकुराहून महादेव आठ कोस आहे. राजश्री दौलतराव घोरपडे जेजुरीसच आहेत. त्यांची याद सरकारांतून ठरली ती अद्यापि आली नाहीं. गडबडीमुळें चार दिवस दिरंगावर पडलें असें

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस.

दिसतें. याउपर मशारनिल्हे लष्करांत येतील. बोरघांटावर खंडाळें म्हणोन तळें आहे तेथें पांच हजार गाडद व पांच तोफा येणेंप्रमाणें (इंग्रजांचा) सरंजाम आला आहे. खासा श्रीमंत राजश्री दादासाहेब बेलापुरावर आहेत. चिंतो विठ्ठल व मानसपुत्र अमृतराव पुढें आले आहेत म्हणून बोलवा आहे. आणखी मागाहून सरंजाम त्यांकडील येणार. तो आल्यावर पुढें यावें असें आहे. उभयतां सरदारांनीं लोकांस पत्रें लिहिलीं आहेत. फौज जमा होत आहे. हुजरातही जमा होत आहे. राजश्री सखारामपंतबापूस अवरोध आला होता यास्तव गांवांत आले होते, ते दशमी रविवारीं फिरोन डेरे दाखल जाले. लष्कर वानवडीवर होतें तेंही सरदारसुद्धां झाडून पुलापलीकडे जाऊन राहिलें आहे. तेथून कूच होऊन पुढें जाणार आहेत. मग कधीं जातात पहावें. हिंदुस्थानांत इंग्रजी सरंजाम आला आहे तोही पुढें भेलशांसुमारें आला. भोसले व ते मिळणार अशी वदंता आहे. मग श्री इच्छा प्रमाण. आम्हांस एक पत्र पहिलेंच राजश्री हरीपंततात्यांचें आलें. त्याजवर फिरून आलें नाहीं. आम्ही हलके हलके महादेवाचा घांट चढून वर येतों. तोफखाना आला आहे. खर्च चालला पाहिजे. श्रीमंतांचा मनसबा उभा राहिला हें मोठेंच अरिष्ट उठलें आहे. पुणें पळून जाऊं लागलें. कोणाचा भरंवसा कोणास पुरेना असें जाहलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे आशीर्वाद."

नं. २४५२. (मार्ग० व० २-६ दिसेंबर.)

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र. पै॥ छ० १८ जिल्काद.–

"पुण्याकडील वर्तमान तर इंग्रज बोरघांटावर आले ते तेथेंच आहेत. उभयतां सरदारसुद्धां कारभारी वानवडीवरून कूच करून नदीपलीकडे खडकीजवळ उतरले आहेत, हें परवांचे पत्रीं लिहिलेंच

---

१ दादासाहेबांचा.

आहे. अद्यापि खडकीवरच मुक्काम आहे. उभयतां सरदार तडका फौज जमा करीत आहेत. खडकीवरून कूच करून तळेगांवाचे रोखें जाणार होते. काल आज अलीकडे पत्र आलें नाहीं. चिरंजीव रघुनाथराव-दादा पुण्यांतून निघून नेहमीं नानाजवळ लष्करांतच राहिले आहेत. आह्मी उदईक कूच करून महादेवाकडे येतों. आज रविवारीं सोनगां-वाहून कूच करून पुढें तीन कोस आलों. येथून महादेव पांच कोस आहे. चिरंजीव राजश्री दादाकडून काल पत्रें आलीं त्यांत मजकूर " राजश्री रामचंद्र गणेश व बाजीपंतअण्णा यांस फौजसुद्धां पुढें तळेगांवास तोंडावर रवाना केले आहेत. वरचेवर फौजेचा जथ त्यां-जवळ पाडणार. इंग्रजानीं तळें किल्ला आहे त्यास मोर्चे दिले होते; ऐशास गांवांतून लोक मोर्च्यांवर पडून मारामारी केली. दीडशें माणूस कापून काढिले. दोन तोफा व जेजाला वीस पाडाव केल्या. मोर्चे गेले. " याप्रमाणें लिहिलें आहे. " उत्तरेकडील इंग्रज बडव्याचे घा-टास आले. एक वार्ता भडोचेस जाणार. दुसरी वार्ता उत्तर तीरानें सुरतेकडे जाणार. त्यांच्या लष्करांत मरी आली आहे. माणसें फार मरतात. भोसल्यांचा त्यांचा बीत बसला नाहीं. मुधोजी भोसले यांस फारच समाधान नाहीं. फारच अवस्था कठीण आहे. " याप्रमाणें चिरंजीवाचे पत्रांत आहे. आमचे मतें महादेवाचा घांट चढून वर याव असें आहे. त्यास चिरंजीवाचीं पत्रें तर पुढें न जावें अशीं येतात. आजी स्पष्ट लिहिलें आहे. " आम्हांजवळ खर्चास नाहीं. येथेंही कामें बसून काय करावें ? पोटाची वाट काय ? तुह्मीं निघोन येणें. नाहीं-तर आह्मी घरास जाऊं. " असें लिहिलें आहे. परंतु उतावळी करून येतां नये ! "

नं. २४५३. ( १६ दिसेंबर. )

गंगाधरराव गोविंद यांस पुण्याहून बापूजी बल्लाळ जोशी यांचें पत्र मार्गशीर्ष व॥ १३ चें—

" खंडाळें घांटमाथां इंग्रज चार हजार, तोफांसुद्धां जमा आहेत. दादासाहेब वारवईनजीक चौक येथें आले आहेत. त्रयोदशीस वरते येणार असें वर्तमान आहे. त्यांजसमागमें दोन तीन हजार इंग्रजांचें पायदळ आहे. इकडील फौजेचें वर्तमान तरी—शिंदे पंधरा हजार जमा जाले. होळकर सहा हजार व हुजूर फौजा दहा हजार पागा व पथकें मिळोन एकूण पंचवीस हजार फौज खडकीच्या पुलाजवळ आहे. पानशे व बाजीपंतअण्णा वगैरे तीन हजार फौज तळेगांवावर पाठविली आहे. दादासाहेब तो पुण्यास येणार. आंतील सूत्रें इकडील कोणाकोणाचीं तिकडे जाहलीं आहेत. शिंदे यांचें कांहींच कळत नाहीं ! "

नं. २४९४. ( पौष शु० ८—२७ दिसेंबर. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र. पै॥ छ० ९ जिल्हेज.

" आह्मी गार्डीच्या मुक्कामास आल्यानंतर तुमचीं तिकडे येण्याविशीं पत्रें आलीं त्याजवरून तिकडे येण्याची तयारी केली; तों मंगळवेढ्याहून पत्र आलें कीं, "नरसिंगराव गोविंद व भगवंतराव निंबाळकर माढेकर व बेरडाकडील जमाव मिळोन पांच हजार बरडोलानजीक आले आहेत. मंगळवेढें तालुक्यांत धामधूम करितील. या सुमारें यावें," म्हणोन. त्यास हा शह जवळ मंगळवेढ्यालगता असतां सोडून आल्यास शेर होऊन चढाई करून पुढें येऊं लागतील. यास्तव काल शनिवारीं गार्डीहून कूच करून पंढरपुरचे मुक्कामास आलों. नरसिंगराव गोविंद यास व आह्मांस चार गांवांची तफावत आहे. चिरंजीव राजश्री दादाकडून पुण्याहून छ० ३ जिल्हेजचीं पत्रें आलीं. रा. भिवराव पानशे तळेगांवास जाऊन राहिले होते. तेथून इंग्रजावर चालून जाऊन कांहीं तोफेचे गोळे व बाण टाकिले. तेव्हां तेही तयार होऊन चालोन यांजवर येऊं लागले. तेव्हां यांनीं मागती मारागिरी करून मागें सारिलें.

ऐसें मागती एक दोनदां जालें. कारभारी खडकीवरून कूच करून चिंचवडानजीक गेले. "

नं. २४५५. श्री. ( पौष शु० १०–२९ दिसेंबर. )

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ९ जिल्हेज मुक्काम लष्कर नजीक तळेगांव. वर्तमान यथास्थित असे. विशेष आपण पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळला. " सरकारच्या फौजा कोठें आहेत व श्रीमंत राजश्री दादासाहेब कोठें आहेत तें तपशीलवार लिहून पाठवावें " ह्मणोन लिहिलें तें कळलें. त्यास दादासाहेब बोरघाटचे माथां येऊन राहिले आहेत. बरोबर इंग्रजांचे लोक सहा सात हजार आहेत. मोर्चेबंदी करून राहिले आहेत. शिंदे होळकर मिळोन पंचवीस हजार फौज हल्लीं आहे. आणिकही मागाहून जमा होतच आहे. राजश्री भिवराव पानशे व बाजीपंतअण्णा बरोबर निवडक फौज घेऊन पुढें गेले आहेत. यांस त्यास तीन कोसांचें अंतर आहे. एक दोन वेळां याणीं उपराळ्यानें जाऊन गोळी वाजाविली. परंतु ते जुमेस खात नाहींत. पुढें येतात न येतात हें समजत नाहीं. पुढें कोस दोन कोस आल्यास मैदान आहे. पारपत्य करावयास ठीक आहे. प्रस्तुत घाटमाथां राहिले आहेत तेथें जावयास मार्ग चांगला नाहीं याजमुळें यत्न चालत नाहीं. पुढें कसें होईल पहावें. " करवीरकर कागल घेऊन कागलावर मुक्काम करून आहेत व सटवाजी भोंसला गोकाकच्या सुमारें आहे. कित्तूरकर व ते एकत्र होऊन दंगा करणार " म्हणोन लिहिलें तें कळलें. " नरसो गोविंद व भगवंतराव माढेकर व पिडापा सुरापुराकडील ऐसे चार पांच हजार जमले आहेत. मंदरूप व बरडोल परगण्यांत स्वाऱ्या करितात " म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास सरकारच्या फौजा तिकडे येऊन सुरापुरकर व कित्तूरकर

१ पत्र गंगाधररावांस. २ जुमस खाणें = वचक बाळगणें.

वगैरे यांचें पारिपत्य करावें, या मनसब्यानेंच श्रीमंत उभयतां कारभारी निघाले होते. त्यांत हें[1] नवेंच उद्भवलें याजकरितां तिकडे येणें जाहलें नाहीं. विना इंग्रजांचें पारिपत्य जाहल्याखेरीज येणें होत नाहीं. इकडील शह निवारण जाहल्यावर सहजच तिकडे येतील. श्रीमंत राजश्री रघुनाथरावदादा येथें लष्करांत आले आहेत. येथील कामकाज एक दोन रोजांत उरकून श्रीमंत राजश्री भाऊंकडे निघोन जाणार. हुजरातेची तोड निघाली कीं नाहीं म्हणोन लिहिलें, त्यास सन समानखेरीजकरून मागील फडशा मानकरी आदिकरून कागदीं पत्रीं जाहला आहे. सरंजामी यांजकडील निम्मे ऐवज सरकारांत घेतात. ज्याचा ठराव होतो त्याजवर वराता होतात. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २४५६. श्री. (पौष शु० १२–३० दिसेंबर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेशीं पोष्य बाळाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागायत पौष शु॥ १२ सौम्यवासर मुक्काम क्षेत्र पंढरपूर यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. शिखांचा आदा लिहून पाठविला त्याप्रमाणें सरकारांत रुजू करून पावती पाठवितों ह्मणोन लिहिलें, उत्तम आहे. “ करवीरकरांनीं कागल घेतलें. मोर्चे दिले होते; घाटगे चांगले लढले; शेवटीं तह करून ठाणें दिलें. करवीरकरांनीं ठाणें पाडिलें, ” म्हणोन लिहिलें तें कळलें. असो. होणार तें घडतें ! “ सटवोजी भोसले चिकोडीकर यांच्या खेडियांच्या गळीं पडणार तों त्यांचें त्यांचें झूज जाहलें. सटवोजीचा मोड जाहला. पंचवीस राउतांनिशीं हुकेरीस गेला; ” ह्मणोन लिहिलें तें कळलें.

---

१ इंग्रज प्रकरण. २ कुरुंदवाडकर. ३ दामले हशमनीस किल्ले मिरज. ४ मामलेदार परगणे करकंब.

चित्रदुर्गाकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. पश्चिमेकडील वर्तमान " श्रीमंत मुंबईहून निघाले. कल्याणाअलीकडे दोन कोसांवर वोढा आहे तेथें उतरले आहेत. विशेष जमाव नाहीं. बोरघांटास इंग्रज दोन हजार आले आहेत. घांटमाथा मेढा घातला आहे तेथें आहेत. सरकारच्या फौजाही गेल्या आहेत; " ह्मणोन लिहिलें तें कळलें. इंग्रजाकडील वकील आला त्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान नरसो गोविंद वगैरे जमाव करून गुदवनच्या वोढ्यावर होते. इकडे येणार इतकियांत श्रीमंत राजश्री भाऊसाहेब महादेवाच्या सुमारें आले. त्यांस वर्तमान कळलें. तेथून निघोन ( भाऊसाहेब ) धुमेरा वोढा येथें आले. तेथून लंबरडीवर आले. तेथून श्रीक्षेत्र पंढरपूर येथें सप्तमी शनिवारीं आले. आज पांच सा दिवस जाहले. उदईक कूच करून पुढें जाणार. आपणास कळावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

नं. २४५७. श्री. (पौष शु० – दिसेंबर दु० पंधरवडा.)

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादासाहेब जमावसुद्धां घांटमाथां आले. लकडकोट घालून बातेऱ्या बांधोन अडचणीच्या जागांत राहिले आहेत. राजश्री भिवराव पानशे व बाजीपंतअण्णा सडी फौज व तोफा घेऊन गेले आहेत. तलावा करून पहिल्या दिवशीं तोफा लाविल्या. तोफा तोफांची लढाई जाहली. दुसरे दिवशीं ज्या जागेवर पानशे याणीं तोफा लाविल्या होत्या तेथें त्यांचें सामान जागा धरून राहुटया देऊन राहिलें. पानशे दुसरे दिवशीं गेले. तोफा लाविल्या तेव्हां ते वाढोन आले. यानीं संभाळून आले. तिसरे दिवशीं लांब पल्ल्याच्या तोफा नेऊन लागू केल्या. तेव्हां राहुटयांवर तोफा लागू करून मार दिल्हा. तेव्हां ( इंग्रजांनीं ) राहुटया तेथून काढून

---

१ पत्र शिवाजी बावाजीचें गंगाधररावांस मिरजेस.

पहिल्या ठिकाणास नेल्या. त्यांजकडील जायां जखमी जाहले. काल तलाव्यास गेले नाहींत. आज जाणार होते. या लष्करास व पानशे यांस पांच कोसांची तफावत आहे. पानशे यांजपासून घांट तीन कोस आहे. पानशे यांजवळ पांच हजार फौज जमली आहे. कारभारी यांजजवळ उभयतां सरदारसुद्धां वीस हजार फौज आहे. घांटाखालीं वीस हजार फौज आजच रवाना जाहली. दुरोखें शह त्यांस बसेल. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापेंकरून दुष्टाचें पारिपत्य होईल. हिंदुस्थानचे इंग्रज नर्मदेवरी हुसंगाबादेवरी येऊन अलीकडे दोन तीन मजली आल्याचें वर्तमान आलें. त्यांजवर राजश्री भवानी शिवराम पांच हजार फौजेनिशीं रवाना होणार. बेरोजगारी राऊत दोनचारशें श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे जाऊन मिळाले. लष्करांत बहुतकरून विंदुरसुद्धां येकदिल आहेत. अजापालाचा[1] मात्र भरंवसा पुरत नाहीं. वरकडही राजकारणें कोणाकोणाचीं असतील असा अनुमानेंकरून भास होतो. कोणाच्या पोटांतील कोणास ठाऊक ! हुजुरातीस पैका नाहीं याजकरितां निमे सरंजामाची वेरीज सरकारांत द्यावी, असा ठराव जाहला. रास्ते, प्रतिनिधी, आनंदराव गोपाळ, उभयतां कारभारी सरंजामीच आहेत. त्यांसुद्धां निमेनिम पैका घेतला. निमे पैका घेऊन फौज कराराप्रमाणें बाळगावी, येणेंप्रमाणें ठरलें. होळकर शिंदे याणीं पंधरा पंधरा लक्ष द्यावे, त्यांत पांच पांच लक्ष तूर्त द्यावे, याप्रमाणें ठराव जाहला. राहिल्या सरंजामीयांस तगादा करून ऐवज दारीं माणसें बसवून घेतात. याप्रमाणें ऐवजाचा जावसाल. राजश्री मुधोजी भोंसले यांस पत्रे वारंवार गेलीं. ते फौज इकडे पाठविणार आहेत. मोंगलाची फौज दहा हजार कुमकेस येणार ती पैठणाजवळ जमा होणार. जिकडे पाहिजे तिकडे बोलावितील. श्रीमंत राजश्री भाऊ सुरापूरच्या[2] रोखावर गेलेच आहेत. करवीरकरांच्या पारिपत्यास फौज इकडील कांहीं आडसट्यांत मन

१ महादजी शिंदे. २ होळकरांचा.

सबा आल्याशिवाय पाठवीत नाहींत. ही बातमी त्यांस आहेच. ते हांवभरी होतील. मागाहून होईल तें लिहोन पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २४५८. श्री. (पौष व०–जानेवारी प० पंधर०)

पै॥ छ० २९ जिल्हेज. इंदुवार दोन प्रहर दिवसास. मु॥ पा॥ होर्ती. विनंती उपरी. " शुक्रवारीं षष्ठीस श्रीमंत राजश्री दादासाहेब इंग्रज सुद्धां तळेगांवावर आले. यानीं तळेगांव जाळलें. उपरांत शुक्रवार तागायत रविवारपर्यंत तळेगांवींच होते. सोमवारीं रात्रीस दादासाहेब व इंग्रज पांच पलटणें सुद्धां निघोन माघारे गेले. त्यांचे मागें तीन पलटणें व बुणगें जाऊं लागलें ही चाहूल छबिन्यास सरकारची फौज होती त्यांस समजली, आणि मागें लागोन गेले. आणि गोटांत बातमी पाठविली, तेव्हां फौजा धांवून गेल्या. तेव्हां छकडे वगैरे कांहीं सांपडलें. तों तळेगांवनजीक वडगांव आहे तेथें दोन तीन पलटणें दिवस उगवतां गांठ पडली. सरकारच्या तोफा लाविल्या. निकडही बहुत केली. तोफा त्यांजकडील बंद केल्या. परंतु बंदुकांची मारागिरी भारी. तें माणूस कजाख ! ते निघोन गेले. मागें फौजा आहेत. तोफा दोन तीन पाडाव आणिल्या. मंगळवारीं श्रीमंत मुंबईस पावले असतील. चिंतो विठ्ठल यांस तोफेचा गोळा लागून ठार जाहले. हें वर्तमान त्यांजकडील जखमी याणीं सांगितलें " म्हणोन तांतडीचें वर्तमान सांडणीस्वाराबरोबर आलें. मागाहून पक्कें वर्तमान आलें ह्मणजे लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. २४५९. श्रीगणपति. (माघ शु० -जाने प० पंधरवडा०)

चिरंजीव राजश्री गणपतराव[1] यांसीं प्रती परशुराम रामचंद्र.

---

1 गणपतराव कोन्हेर.

आशीर्वाद उपरी. " इंग्रजांचा मोड जाहला. चारपांचशें माणूस मारिले. पांच तोफा व दोन गरनाळा सरकारांत पाडाव आणिल्या. शिवाय दोन हजार बंदुका वगैरे लूट सांपडली. तळेगांवनजीकचें वडगांव येथें इंग्रज कोंडिले आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब निघोन गेले अशी आवाई, परंतु त्यांत आहेत. " याप्रमाणें राजश्री नानाचें स्वदस्तुरचें पत्र पुरंद राहून आह्मांस आलें तें आतांच प्रथम प्रहर रात्रीस पावलें. पत्र पाहून खुशालीच्या तोफा करविल्या. बजिन्नस तेंच पत्र पहावयास तुह्मांकडे पाठविलें आहे. तुम्हीं पाहोन राजश्री माधवराव व गोविंदराव कृष्ण यांस दाखवून माघारें पाठवावें...तुम्हीं उदईक कूच करून तीन कोस येणें. आम्हीही येथून कूच करून हलकेंच जातों. तुम्हीं तेथील गुंता उरकोन मजलीस येणें. सर्वांस वर्तमान सांगणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २४६०. ( १३ जाने० )

मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस शिवाजी बाबाजीचें पत्र पौष वद्य एकादशीचें.—

" तळेगांवाहून पत्रें कारभाऱ्यांचीं आलीं कीं, पुण्यास अन्न लावणें. असें पत्र जनार्दनआपाजीस आलें. तमाम लोक पळून गेले. पुण्यांत माणूस कोणी नाहीं. उदमी व गरीब वगैरे किरकोळ माणसें होतीं तीं पुण्यांतून सर्व गेलीं. तळेगांव जाळिलें. इंग्रज तळेगांवास आला होता. पौष व॥ १० स तिसरा प्रहर रात्रीस कूच करून माघारा वडगांवास अडीच कोशांचें अंतर. फिरोन माघारा गेला. काय मसलत ती नकळे. तो माघारा गेला म्हणून आज पुण्यास अन्न लावावयाचें राहिलें. नानाचे मतें पुणें जाळावें. होळकर शिंदे यांचे मतें न जाळावें. असा मजकूर लष्करांत आहे. कोंकणांत बाळाजीपंत फाटक चार हजार फौज सुद्धां कल्याण प्रांतांत गेले. तमाम मुलूख जाळिला. घांटाखालीं खोपवलीस फौज बसली आहे. इंग्रजांची रस्त मना केली आहे. इंग्र-

जांची मसलत फसलीशी दिसत्ये. कोणता प्रकार ह्मणाल तर चिंतो विठ्ठल याणीं इंग्रजास सांगितलें कीं, घांटमाथां गेल्यावर फौज वीस हजार तुम्हांस सामील होते. असें त्यांस सांगितलें त्याजवरून इंग्रज घांट चढून वर आला."

नं. २४६१. ( पौष व० १४–१६ जानेवारी. )

बापूजी बल्लाळ जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र छ० २७ जिल्हेज. पौषमासचें. पुण्याहून—

" पुण्यांत गडबड भारी जाहली. पुणें झाडून ओस जालें. पुणें शाबूत राहत नाहीं; याप्रमाणें नाना फडणीस याणीं साफ सांगोन पाठविलेवरून आज झाडून वोस जालें. तळेगांवास दादासाहेब व इंग्रज आले. तळेगांव इकडील फौजेनें जाळून टाकिलें."

नं. २४६२. श्री. (पौष व०३०–१७ जानेवारी.)

पै॥ छ० ७ मोहरम.

सेवेशीं शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ० २८ जिल्हेज मु॥ लष्करनजीक तळेगांव जाणून स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष. इंग्रजाकडील वर्तमान तरी इंग्रजाचा मोड जाहला. तोफा व बंदुका दोन हजार पाडाव आणिल्या. छकडे वगैरे पाडाव केले. इंग्रजाकडील वकील येऊन तहरह जाहला जे, "श्रीमंत राजश्री दादासाहेबांस स्वाधीन करावे. साष्टी, उरण, व गुजराथेंतील महाल घेतले आहेत ते स्वाधीन करावे. आणि श्रीमंत नानासाहेबांचे वेळेस तहरह होता त्याप्रों चालवें." असा तहरह ठरला. राजश्री दादासाहेबांस खर्चामाफक नेमणूक करून द्यावी आणि ( त्यानीं ) शिंदे यांजपाशीं असावें. आज इंग्रज कूच करून जाणार. " दोन कफितान ओलीस ठेऊन जावें. ( ते ) साष्टीस ठाणें

---

१ पत्र मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस.

सरकारचें बसल्यावर मग सोडून द्यावे. " याप्रों ठरलें आहे. आज श्रीमंत दादासाहेब शिंदे यांचे गोटास येणार. श्रीमंत रावसाहेब यांचें दैव विचित्र आहे. तेणेंकरून अशा गोष्टी घडल्या. इंग्रजांची व या फौजांची गांठ पडल्यापासून युद्धप्रसंग जाहल्याचें व इंग्रज पेंचांत आल्याचें वृत्त श्रीमंत रा॥ रघुनाथरावदादानीं पत्रें आपणाकडे पाठविलीं तीं पावलींच असतील. अलीकडील वर्तमान तर इंग्रजाकडील वकिलाकडील बोलणेंचालणें ठरलें. साष्टी व उरण व गुजराथचे महाल, जंबूसर वगैरे सरकारी महाल व गायकवाडीकडील महाल सुद्धां दरोबस्त सोडून द्यावे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस हवालीं करावें. दादासाहेबांपासून तहनामे वगैरे दस्तऐवजीं ज्या ज्या समयीं कागदपत्र इंग्रजानीं घेतले आहेत ते माघारे द्यावे. याप्रों ठराव होऊन परस्परें करारनामे जाहले. सदरहूच्या निभावणीस इंग्रजाकडील मातबर ओलीस ठेविला. आज कूच करून इंग्रज माघारे जाणार. श्रीमंत राजश्री दादासाहेब आज अमावास्या ह्मणोन न आले. उदईक प्रतिपदेस शिंद्याच्या गोटांत येणार. उभयतां कारभारी यांचें मानस भेट न घ्यावी असेंच आहे. तसेंच घडेल. जसा पाहिजे तसा बंदोबस्त शिंदे याणीं करावा. बंदोबस्ताचा हवाला शिंद्याकडे. सारांश श्रीमंत राजश्री रावसाहेबांचे पुण्य विचित्र. इंग्रज ह्मणजे सर्वांस मसलतीविशीं भारी. नबाब ( निजामअल्ली व ) हैदरखान वगैरे सर्वांस आंच, अशांचें पारिपत्य जसें ह्मणावें तसें जाहलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब हस्तगत जाहले येणेंकरून घरांतील बाहेरील सर्व जागांचे फितूर तुटले. अतःपर हैदरखानाचें पारिपत्य करून ( त्यास ) ठिकाणीं ठेवून तालुका सोडवावा; या मनसब्यांत ( कारभारी ) आहेत. उभयतां कारभारी उभयतां सरदारांसुद्धां अशाच जथानें कर्नाटकांत यावें असा ठराव होत आहे. याप्रमाणें जाहल्यानें करवीरकरांचें ( व ) कित्तूरकराचें सहजांत पारिपत्य होईल. तुंगभद्रेपावेतों गेल्यानें हैदरखान

श्रीमंतांच्या मर्जीप्रमाणें तह करून खंडणी देईल यांत संशय नाहीं. चित्रदुर्गास हैदरखान बसला आहे. दुर्गकर हिंमत धरून लढतात. त्याणीं आणखी पंधरा दिवस दम धरावा ह्मणजे फौजा येऊन पोंहचल्याच ! गुंता नाहीं. राजश्री पुरुषोत्तमपंतांस आठ दिवस रहा ह्मणून बहुता प्रकारें सांगितलें, परंतु राहिले नाहींत. 'ऐनापुरास जातों, मिरजेसही जाऊन राहीन,' म्हणत होते. मिरजेस असल्यास उत्तमच जाहलें. ऐनापुरास असल्यास पत्र आह्मीं लिहिलें आहे. आपण पत्र लिहून हें पत्र प्रविष्ट करावें; आणि त्यांस लिहून दुर्गास पत्र या वर्तमानाचें पावतें होयसें जरूर करावें. व दुर्गकरांचा व श्रीमंत कैलासवासी रावसाहेबांचा भाऊपणा. त्यांचे जागां आपण आहां. आपण पत्र दुर्गकरास लिहून प्रविष्ट होयसें केल्यानें मोठीच गोष्ट. पत्र पावतें होयसें ज्ञाहल्यास करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २४६३. **श्रीगणपति.** (माघ शु० १–१८ जानेवारी.)

पै।। छ० १ मोहरम. सन तिस्सा सबैन. माघमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २९ जिल्हेज इंदुवार दोन प्रहर दिवस जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. काल तुह्मीं खिजमतगाराबरोबर पत्रें पाठविलीं त्याजबरोबर येथून पत्रें रवाना केलीं आहेत. पावतील. आतांच बारामतीहून राजश्री पांडुरंग बाबूराव यांचें पत्र येथें त्यांजकडील राजश्री गंगाधरपंत पागेवर आहेत त्यांस आज चवथे दिवशीं आलें. त्यांतील मजकूर श्रीमंत राजश्री दादासाहेब पांच पलटणें सुद्धां माघारे ममईस गेले. दोन तीन पलटणें वडगांवनजीक तळेगांव येथें छ० २२ जिल्हेजीं सरकारच्या फौजांची गांठ

---

१ हा चित्रदुर्गकर संस्थानिकाचा कारभारी. २ इंग्रजांचा पराजय झाल्याचें. ३ गोपाळराव गोविंद यांचा. ४ पत्र गंगाधररावांस मिरजेस.

पडोन लढाई जाहली. इंग्रजाचे वस्तु ठरोन राहणें जाहलें नाहीं. तेही माघारे गेले. त्यांजकडील दोन तीन तोफा पाडाव आल्या. चिंतो विठ्ठल यांस तोफेचा गोळा लागोन म॥ निल्हे ठार जाहले. " याप्रों लिहिलें आहे. त्यावरून सविस्तर कळेल. बजिन्नस त्या पत्राची नकल करून पाठविली आहे त्याजवरून कळेल. सारांश श्रीमंत राजश्री रावसाहेबांचें पुण्य समर्थ आहे. त्यांच्याच प्रतापें इंग्रज नामोहरम होऊन सरकारच्या फौजेस यश आलें. संतोषाचें वर्तमान कळावें ह्मणोन लिहिलें असे. चिरंजीव दादाचींही पत्रें आज उद्यां येतील. आल्यानंतर सविस्तर मागाहून लिहून पाठवितों. तुम्हांकडेही पत्रें आलींच असतील. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. सर्वही श्रीगजाननाचे कृपेंकडून यथास्थितच होईल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४६४. श्री. ( माघ शु० ५–२२ जाने० )

पै॥ छ० १७ मोहरम. सन तिस्सा.

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ०३ मोहरम भृगुवासरे मु॥ नजीक तळेगांव वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्र छ० २७ जिल्हेजचें पाठविलें तें छ० २ मोहरमीं पावोन लिहिला मजकूर कळला, " इंग्रजांचें व सरकारच्या फौजांचें युद्ध जाहलें ह्मणून वर्तमान आहे. व हिंदुस्थानाकडील इंग्रजांचें सविस्तर ल्याहावें " म्हणोन लिहिलें, त्यास इंग्रजांची लढाई होऊन शिकस्त होऊन नामोहरम जाहले. वडगांवावर कोंडिल्याचें व लुटल्याचें सविस्तर श्रीमंत राजश्री रघुनाथरावदादानीं कलमवार पत्रें लिहून पाठविलीं तीं पावलींच असतील. अलीकडे इंग्रजांचा वकील आला. ठराव जाहल्याचें व श्रीमंत राजश्री दादासाहेब शिंद्याकडे येतात येविशींचें विस्तारें रहिमतपुरच्या

१ पत्र गंगाधररावांस मिरजेस.

माणसाबरोबर लिहून पाठविलें तें पावलेंच असेल. इंग्रज वडगांवावर जात तोंच लुटले गेले. फारच गेले. पुढें परिणाम नाहींसें समजोन थैली पाठविली कीं, " पत्राचें उत्तर येतांच भल्या माणसास पाठवूं. " तेव्हां पत्राचें उत्तर गेलें. त्यांजकडून भला माणूस आला. त्याणें लिहून पाठविलें त्याजवरून अकत्यारी आला. त्याचें नांव मेस्तर होम. त्याणें ठराव केला कीं, "साष्टी, उरण व जंबुसर वगैरे गुजरायचे महाल सरकारचे व गायकवाडाकडील घेतले आहेत त्यासुद्धां झाडून सोडून देऊन श्रीमंत नानासाहेब व माधवरावसाहेबांपासून तहनामा चालत आला त्याप्रमाणें चालावें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस हवालीं करून द्यावें. कलकत्याहून कंपू आले आहेत त्यांस ( सरकारांतून ) दस्तक द्यावें म्हणजे ( परत ) जातील. " येणेंप्रमाणें ठराव जाहला. साष्टी वगैरे ठाण्यासाठीं इष्टुर फांकड्याचा पुतण्या वोलीस राहिला. दुसरा परमार ह्मणोन इंग्रजच. येणेंप्रमाणें वोलीस राहिले. तहनामे दस्ताऐवजी जाहले त्याचें लिहिलें सरकारांत, सरकारचें लिहिलें त्यांजवळ, येणेंप्रमाणें ठरोन हिंदुस्थानाकडून इंग्रज येतात त्यांस जाण्याविशीं पत्रें व इकडील दस्तक येणेंप्रमाणें देऊन इंग्रजाबरोबर शिंदे होळकर यांची फौज पोहोंचवावयासी दिल्ही. आणि कूच त्याणीं केलें ते आजपावेतों मुंबईस पावले असतील. त्यांजबरोबर राजश्री गणेशपंत सरसुभ्याचे साष्टी वगैरे ठाणीं हवालीं करून घ्यावयासाठीं पाठविले आहेत. साष्टी पूर्ववतंप्रमाणें राजश्री आनंदराव यांचे हवालीं करणार. कलकत्याच्या इंग्रजांकडे पत्रें गेलीं. ते जातील. हें वर्तमान त्यांस कळल्यावर ते पत्राची वाट पाहाणार नाहींत! तत्राप पत्र गेल्यावर एक क्षणभर राहणार नाहींत. " इतके दमानें आले असतां असें कसें जाहलें " असें आपण म्हणतील, त्यास मुख्यत्वें श्रीमंतांचें पुण्य विचित्र! अवतारी पुरुष! त्यासारखे योग घडले. ज्या माष्टीमानें मसलत केली तो घांटावर येतांच समाधान नाहीं ह्मणोन मुंबईस गेला तेव्हां मृत्यु पावला. इष्टुर फांकडा

लढाव इकडील तोफेचा कारल्याच्या मुक्कामीं गोळा लागोन ठार जाहला. कर्णेल की ह्मणोन होता त्यास बाण लागोन जेर जाहला. आकारिक होते त्यांची अशी अवस्था जाहली. इकडून फौज तिकडे येईल म्हणोन भरंवसा होता ती फौज मिळाली नाहीं. इकडील फौजेंत देण्याघेण्याचा दंगा, तेव्हां फौज मिळणार नाहीं असा त्यांचा समज. त्यास उभयतां सरदारसुद्धां पन्नास हजार फौज जमा जाहली. चोहोंकडून फौजेनें भार पाहतांच छाती तडकली, तेव्हां माघारें कूच केलें. सारांश श्रीमंतांचा प्रताप हें खरें ! श्रीमंत राजश्री दादासाहेब शिंद्याकडे आले आहेत. समागमें तीनशें राऊत आहेत. व बरोबर तेरा तोफा आहेत व बारातेराशें गाडदी आहेत. शिवाय शार्गीर्द पेशा वगैरे दोनशें माणूस आहे. अद्यापि कोठें रहावें, काय करावें, खर्चाची बिजमी काय करावी, हा ठराव होणें आहे. याजकरितां चार पांच मुक्काम येथें होणार. ठराव होईल तो लिहून पाठवितों. सखारामपंतबापू मुलीच्या लग्नासाठीं उंदईकवांईस जाणार. श्रीमंत राजश्री दादासाहेब शिंद्याच्या गोटांत आहेत. शिंद्याची फौज चौकीस दुरून आहे. दोन तीन दिवसांत ठराव होईल तो लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

# सुरापुरावर स्वारी.

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें परशुरामभाऊ पंढरपुरास तळ देऊन राहिले तेव्हां सुरापुरकर व नरसो गोविंद वगैरे बरडोलच्या आसपास पांच सात हजार जमाव करून राहिले होते व बेफामपणें मंगळवेढ्यापर्यंत उपद्रव देत होते. परंतु त्यांचें पारिपत्य होण्याची वेळ आतां जवळ आली होती ! चार दिवस स्वस्थ राहिल्यासारखें करून भाऊंनीं एके दिवशीं त्यांवर अकस्मात् फौज पाठविली. तिनें त्यांस गांठून त्यांचा धुव्वा उडवून दिला ! त्या लढाईत नरसो गोविंद यास दोन जखमा लागल्या. सुरापुरकराचे तीनशें घोडे पाडाव सांपडले व शेंकडों लोक मारिले गेले. अनेक समरप्रसंगांत कसलेली ती भाऊंची फौज. तिज-समोर ते भुरटे चोर किती असले तरी पुनः लढाईस उभें राहण्याची उमेद कसची धरितात ! दाणादाण होतांच ते चोहोंकडे चार जे पळून गेले ते गेलेच ! ही लढाई होतांच भाऊंनीं शिवणगी, देऊर व आलमेलें हीं ठाणीं शत्रूंनीं घेतलीं होतीं तीं पुनः काबीज केलीं व कर-जगी, बरडोल, इंडी, तांबें या परगण्यांतून घांसदाणा घेत ते सुरा-पुरच्या हद्दीवर येऊन ठेपले. तेव्हां सुरापुरकरांचा वकील तहाचा ठराव करण्याकरितां आला व सालाबादप्रमाणें खंडणी देतों असें म्हणूं लागला.

या प्रसंगीं सुरापुरास जाऊन वेढा घालावा व तें बळकट ठाणें काबीज करण्यांत बहुत दिवस घालवून अधिक फायदा करून घ्यावा हा एक पक्ष होता; किंवा वकील खंडणीची बेरीज बोलत आहे तींतच कांहीं कमजास्त करून ठराव करावा व सुरापुरच्या मसलतींतून मोकळें व्हावें असाही एक पक्ष होता. यांतून कोणता पतकरावा याचा निश्चय करितांना राज्यांत अन्यत्र स्थिति काय होती इकडे लक्ष ठेवणें

जरूर होतें. या सुमारास इंग्रजांची मोहीम तर आटपून गेलीच होती. कारभाऱ्यानीं श्रीमंत दादासाहेबांपासून राज्याचें बेदावापत्र लिहून घेऊन त्यानीं दहा लक्ष रुपयांची जहागीर घेऊन महादजी शिंद्यांच्या पैरवीखालीं झांशी येथें स्वस्थ रहावें असा ठराव केला होता. त्या ठरावास अनुसरून त्यांची हिंदुस्थानाकडे रवानगी होऊन ते कायगांव टोक्यापर्यंत जाऊन पोंचले होते. त्यांबरोबर हरी बाबाजी नांवाचा शिंद्यांचा सरदार बंदोबस्ताकरितां पाठविण्यांत आला होता त्याबरोबर शिंदेहोळकरांची व थोडी पेशव्यांची अशी पांच हजार फौज होती. मिळून इंग्रज व दादासाहेब या प्रकरणाविषयीं तूर्त काळजी करण्याचें प्रयोजन राहिलें नव्हतें. कित्तूरचा देसाई थोडयाशा जमावानिशीं गोकाकच्या ठाण्यांत राहिला होता त्याचा रोख तेरदाळ परगण्यास किरकोळ उपद्रव देण्यापलीकडे नव्हता. चिकोडीकरांनीं पिटून लाविल्यावर सटवोजी भोंसला हुकेरीस राहिला होता त्याचाही थोडाबहुत उपद्रव सुरूच होता. त्यानें येळगुडच्या ठाण्यास वेढा घातला असतां चिकोडीकरांनीं त्यास लुटून पळवून लाविलें होतें त्याचा सूड येसाजी शिंद्यानें चांगलाच घेतला ! कारण कीं पुनः त्याच ठाण्यास वेढा घालून तें काबीज करून त्यानें पाडून टाकिलें. इतकें झाल्यावर शिंदे व भोंसला एकत्र झाले तथापि चिकोडीकर भोजेवर तळ देऊन राहिले होते ते अद्यापि त्या दोघांसही भारी होते. त्यांतच चिकोडीकरांच्या मदतीस पुणें-दरबारानें व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर यांस हजार पांचशें लोक बरोबर देऊन पाठविलें होतें त्यांचा मुक्काम येली मनोळीवर होता. मिळून करवीरकरांचाही विशेष उपद्रव होण्याचा संभव राहिला नव्हता. चिकोडीकरांस कुमक करण्याकरितां गंगाधरराव बाळासाहेब यानीं मिरजेस हजारपर्यंत स्वार गोळा केले होते त्यानींही या वेळीं एक लहानशी कामगिरी बजाविली होती. मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें राणोजी नाईक

निंबाळकर यानें फौज ठेऊन आवाडाव करण्यास सुरुवात केली होती तों या मिरजेच्या फौजेनें जाऊन त्यास कैद केलें व त्याचे हत्ती, घोडे, पालख्या वगैरे सर्व सामान सरकारांत आणून हजर केलें. निंबाळकराविषयीं दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर व व्यंकटराव घोरपडे सोंडूरकर यांनीं परशुरामभाऊंजवळ रदबदली केली तेव्हां तो मुरारराव घोरपडे सेनापति यांचा जांवई हें लक्षांत आणून भाऊनीं त्यापासून जामीन घेऊन त्याची सुटका केली व त्याचें हत्ती, घोडे वगैरे सर्व सामान त्यास परत देवविलें. सारांश या वेळीं महाराष्ट्रांत तरी तूर्त कोठें मोठासा दंगाधोपा नव्हता. परंतु उभयतां कारभारी मोठी फौज घेऊन हैदरअल्लीस तंबी देण्याकरितां कर्नाटकच्या मोहिमेस निघणार ही आज चार महिने बोलवा होती. कारभारी आतां इंग्रज प्रकरणांतून मोकळे झाल्यामुळें ते खरोखरच मोहिमेस निघण्याचा संभव होता. तसे ते निघाले तर फौजेसह त्यांस जाऊन मिळणें परशुरामभाऊंस भाग होतें. त्यामुळें सुरापुरास वेढा घालण्याच्या भानगडींत न पडतां होतां होईल तों बाहेरून बाहेरूनच त्या संस्थानास उपद्रव देऊन त्याजकडून खंडणीचा जाबसाल आपल्या मनाप्रमाणें यथास्थित उगवून घ्यावा अशी परशुरामभाऊनीं मसलत ठरविली. आणि तीस अनुसरून त्यानीं सुरापुरच्या वकिलास ताकीद केली कीं, तीन लक्ष सत्तर हजार रुपये व प्रतिनिधींचे बागेवाडीच्या ठाण्यांतून नेलेले दीडशें घोडे तुझा धनी देत असेल तर तह होईल. नाहींतर लढाई सुरू आहेच ! तिचा परिणाम काय होईल याचा विचार तुमचा तुह्मींच करावा ! याप्रमाणें सुरापुराहून पक्का ठराव करून घेऊन लवकर येतों असें बोलून तो वकील सुरापुरास गेला.

या सुमारास सुरापुरकरांचा व्यंकाप्पा नांवाचा एक सरदार भाऊंच्या लष्करापासून पांच सात कोसांवर सात आठशें स्वारानिशीं लपून छपून फिरत होता. लष्करचें कहीकबाड कोठें तावडींत सांप-

डेल तर लुटावें ही त्याची मसलत होती. त्याच्या मुक्कामाची बातमी राखून भाऊनीं फौजेची एक लहानशी टोळी त्यावर पाठविली. ती टोळी त्याच्या तळाजवळ जाणार तों तो नुकताच पळून गेला होता. तथापि त्या टोळीपैकीं दोन हजार पेंढार त्याचा सुगावा काढीत पाठीस लागले. त्यानें दोन कोसांवर त्यास गांठून लुटून फस्त केलें ! पांचशें घोडे व इतर पुष्कळ लूट पेंढाऱ्यांनीं आणिली. मागच्या व या पराजयामुळें सुरापुरकराची हिंमत लढाई करण्याविषयीं आतां अगदींच राहिली नाहीं. तथापि चेंगटपणानें दिवस घालवून कोठें तरी संधान बांधून कांहीं फायदा झाल्यास पहावा अशा उद्देशानें तो संस्थानिक भाऊंच्या मनाप्रमाणें तहाचा पक्का ठराव करीना.

तें त्याचें धोरण ओळखून त्यास आधिक जरब द्यावी म्हणून परशुरामभाऊ मोंगलाई हद्दींत सगर परगण्यांत गेले व त्या बाजूस सुरापुरकरांचे जितके गांव होते तितके त्यानीं लुटून जाळून ओस केले इतकेंच नव्हे, तर तेथील रयत मोंगलाईंत ज्या ज्या ठाण्यांत जाऊन लपून बसली होती तेथें तेथें त्यानीं सुगावा लावून तीं तीं ठाणीं घेऊन लुटलीं. भीमेपलीकडे अफजलपूर, कलबुर्गे वगैरे मोंगलाई तालुके होते त्यांतूनही त्यांनीं जबरदस्तीनें घांसदाण्याचा ऐवज घेतला

अदवानीचा नबाब बसालतजंग याजवळ लाली नांवाचा एक फ्रेंच सरदार चाकरीस होता त्यास बसालतजंगानें नोकरींतून काढून टाकिल्यामुळें तो पेशव्यांच्या पदरीं नोकरी मिळेल तर पहावी या उद्देशानें पुण्याकडे चालला होता. भाऊंच्या लष्करापासून पांच सहा कोसांवर त्याचा मुक्काम असतां आपणास चाकरीस ठेवण्याविषयीं त्यानें भाऊंस पत्र पाठविलें. भाऊ लिहितात, "तुरुपस्वार पांचशें व गोरा शंभर दीडशें व गारदी व तोफा पांच सहा (त्याबरोबर) आहेत. सामान चांगलें आहे. आम्हांस त्याचें उमेदवारीचें पत्र आलें होतें. परंतु तें झट भारी ! पैक्याचा निभाव पडणार नाहीं, यास्तव ठेविले नाहींत."

पुढें पेशव्यांनींही लालीस चाकरीस ठेविलें नाहीं त्यामुळें तो भागानगरास गेला व निजामअल्लीनीं त्यास त्याच्या फौजेसह चाकरीस ठेविलें.

ही स्वारी चालू असतां इतरत्र काय काय गोष्टी घडत होत्या इकडेही अवधान ठेविलें पाहिजे. तह करून इंग्रज वडगांवच्या मुक्कामाहून परत मुंबईस गेल्यावर महिना दीड महिना मराठी फौजेचा मुक्काम तळेगांवासच होता. श्रीमंत दादासाहेबानीं हिंदुस्थानांत जाण्यापूर्वीं अमृतरावसाहेबांचें दुसरें लग्न येथेंच करविलें. स्वतःही एक लग्न करून घेण्याचा श्रीमंतांचा विचार होता ! असो, श्रीमंतांची हिंदुस्थानांत रवानगी झाल्यावर उभयतां कारभारी व शिंदे होळकर वगैरे सर्व सरदार पुरंदरास परत आले. इंग्रज घांट चढून आले तेव्हां सखारामबापूनीं आपल्या हातें श्रीमंत दादासाहेब व चिंतो विठ्ठल यांस फितुराच्या चिठ्ठ्या पाठविल्या होत्या त्या महादजी शिंद्यांच्या हातीं लागल्या होत्या. आतां पुरंदरास आल्यावर शिंद्यानीं त्या अस्सल चिठ्ठ्या सखारामबापूंस दाखवून फितुराचा गुन्हा त्यांच्या पदरीं घालून त्यांस तेथेंच कैद करून सिंहगडास रवाना केलें ! नानाशीं संगनमत करून त्यांच्या सांगण्यावरून शिंद्यानीं ही मसलत केली हें उघडच आहे. बापूंची मालमत्ता, कापड व नक्त पैसा वगैरे सर्व जप्त होऊन सरकारच्या जामदारखान्यास आलें व घोडीं उंटें होतीं तीं निरनिराळ्या सरकारी पागांकडे वांटून देण्यांत आलीं. मोरोबादादाच्या मालमत्तेचीही व्यवस्था त्याप्रमाणेंच यापूर्वीं लागली होती.

भिवराव पानशे यांस मार्च महिन्यांत आठ चार दिवस किंचित् समाधान नव्हतें ते एकाएकींच वारले. त्यांच्या स्त्रीनें सहगमन केलें. शूर माणसाच्या गुणाची पारख शूर माणसांस अधिक उत्तम रीतीनें व्हावी हें योग्यच आहे. परशुरामभाऊ लिहितात, " भिवराव कर्ता माणूस.

यंदा इंग्रजांचे लढाईंत फारच मेहनत त्यांनीं केली होती. तसा मनुष्य होणें दुस्तर. श्री इच्छेस इलाजच नाहीं. भिवराव बहुत थोर, शहाणे, एकनिष्ठ. साल मजकुरीं व गुदस्तां व तोतयाचे मसलतींत बहुतच मेहनत केली होती. गुदस्तां बहुतां प्रकारें नानाच्या मसलतीस उपयोगीं पडले होते. पुढही निष्ठेनेंच सेवा करावी असे माणूस; परंतु आयुष्यमर्यादा पुरली त्यास इलाज नाहीं. मोठी धूरच या कालांत गेली! तोफखान्याचा बंदोबस्त चांगला राखीत होते."

वैशाख शु. ५ स श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे यांचा पुणें मुक्कामीं व्रतबंध करण्याचा निश्चय नाना फडणवीस यानीं ठरविला होता. हा समारंभ पुण्यास या धामधूमीच्या दिवसांत करणें ठीक नाहीं, याकरितां तो पुरंदरासच उरकून घ्यावा, असें भाऊंचें मत होतें. परंतु तें बाजूस ठेऊन नानानीं श्रीमंतांची मुंज पुण्यांतच केली. चैत्राच्या अखेरीस श्रीमंतांची स्वारी पुरंदराहून निघाली ती जेजुरी, मोरेश्वर व थेऊर येथें जाऊन देवदर्शन करून पुण्यास गेली. तेथें मोठ्या समारंभानें नेमलेल्या मुहूर्तावर पर्वतीस त्यांचा व्रतबंध झाला. त्या वेळीं शिंदे होळकर उभयतांही त्या समारंभास आले होते. एकादशीस श्रीमंतांची स्वारी शहरांत मोठ्या थाटानें मिरवत येऊन शनवार वाड्यांत राहिली.

परशुरामभाऊंची स्वारी मोंगलाईंत फिरत असतां त्यांच्या हातून ओघाओघानें अशा गोष्टी घडत गेल्या कीं जेणेंकरून निजामअल्ली व पेशवे यांमध्यें मोठेंच युद्ध सुरू व्हावें! सुरापुरच्या हद्दींतून मोंगलाई मुलखांत ज्या ज्या ठाण्यांस रयत पळून गेली होती तीं तीं ठाणीं भाऊनीं घेऊन लुटलीं व अफजलपूर व कलबुर्गें या परगण्यांतून घासदाणा घेतला हें वर सांगितलेंच आहे. या गोष्टी मोंगल अधिकाऱ्यांस अर्थातच प्रिय वाटण्यासारख्या नव्हत्या. त्यांतच परशुरामभाऊनीं आणखी एक गोष्ट केली ती त्या अधिकाऱ्यांस फारच असह्य झाली.

स्वराज्य, बाबती व सरदेशमुखी हे मराठ्यांचे तीन हक्क मोंगलाई मुलखांत अफजलपूर, कलबुर्गे व चितापूर या परगण्यांत होते, त्याचा ऐवज त्या त्या हक्कदारांस आज बरींच वर्षे मिळाला नव्हता. मोंगल कमावीसदार यांच्या दांडगाईमुळें मागील बाक्या तशाच राहिल्या व चालू सालचा ऐवज हातीं येईना. अशा स्थितींत भाऊंचें लष्कर जवळ आलेंसें पाहून त्या त्या हक्कदारानीं त्यांजवळ याविषयीं गाऱ्हाणें नेलें व त्यांस फौजेच्या खर्चाकरितां कांहीं पैका देऊं केला. तेव्हां भाऊनीं कलबुर्गे वगैरे तिन्ही तालुक्यांत शिरून जबरदस्तीनें सर्व ऐवज वसूल करून दिला. ती गोष्ट तेथील कमावीसदार वगैरे मोंगल अधिकाऱ्यानीं निजामअलीस तिखट मीठ लावून लिहून कळविली, तेव्हां त्यानीं क्रुद्ध होऊन तहवारजंग व अल्लाउद्दौला हे दोघे सरदार त्या प्रांतीं होते त्यांस परशुरामभाऊंचें पारिपत्य करण्याचा हुकूम केला! त्या दोघांपैकीं पहिल्या जवळ पांच हजार व दुसऱ्याजवळ चार हजार फौज असून ते अनुक्रमें कलबुर्गे व तांडूर येथें होते. नबाबाचा हुकूम येतांच ते दोघे सरदार एकत्र झाले व त्यांच्या मदतीस भागानगराहून बाळाजी केशव वगैरे सरदारांबरोबर आणखी फौज रवाना झाली. अशी ती सारी मिळून वीस हजार फौज येऊन परशुरामभाऊंबरोबर लढाई सुरू करणार असा रंग दिसूं लागला. भागानगरास पेशव्यांचे वकील होते, त्यांस भाऊनीं साफ लिहिलें कीं, “ आह्मांकडून द्वैतभाव नसतां महालकऱ्यांच्या लिहिण्यावरून ( नबाबांची ) मर्जी खफा होऊन मुकाबल्यास फौज रवाना केली आहे, उत्तम आहे. आह्मी सिद्धच आहों. जें होणें असेल तें होईल ! ” याप्रमाणें रागाच्या पहिल्या झटक्यांत मुकाबल्यास फौज पाठविणें व लढाईस तयार होणें वगैरे प्रकार उभयपक्षीं होऊन गेले; परंतु याचा परिणाम काय होईल याचा विचार मोगलाई व पेशवाई या दोन्ही राज्यांच्या सूत्रचालकांस शांतपणेंच करणें भाग होतें. निजामअलीनीं भाऊंच्या वर्तनाविषयीं नानाफडनवीस यांस लिहिलें

तेव्हां त्यानीं भाऊंस पत्र लिहिलें कीं, " नबाब श्रीमंतांशीं अंतःकरणपूर्वक ममता करितात व या दौलतीची काळजी वागवितात; असें असतां तुम्ही त्यांच्या तालुकियास उपद्रव देतां त्यामुळें नबाब फारच खट्टे आहेत. व जिवाजीपंत वकील यानींही बहुतच बखेडे आले ह्मणोन लिहिलें आहेच. असें न करावें. थोडक्या कामाकरितां मातबर कामास हिसका बसतो. घेतला ऐवज माघारा द्यावा." त्या लिहिण्यावरून परशुरामभाऊनीं लढाईची मसलत सोडून दिली व लष्करचा तळ हालवून ते पुनः सुरापुर संस्थानांत आले. त्यांचें ह्मणणें, " कलह वाढवावा तर आम्हांवर शब्द येतो. तेंही करावें; फौजही जमा बरीच आहे; लोकही चांगले आहेत; परंतु आम्हांवर निमित्त येतें; यास्तव काढतेंच घेतलें!" या अवधींत नबाब निजामअल्लीनीं कमावीसदारांच्या तकरारींची छान करून पाहिली त्यांत या प्रकरणीं भाऊंकडे दोष कांहींच नाहीं असें त्यांस आढळून आलें; व आपण त्यांवर फौज पाठविली हें फार गैर झालें असें वाटून त्यानीं वकिलाकडून त्या अभिप्रायाचें पत्रही परशुरामभाऊंस लिहविलें.

हैदरअल्लीस तंबी देण्याकरितां उभयतां कारभारी कर्नाटकच्या मोहिमेस निघणार होते तो बेत सखारामबापूंस शिंद्यानीं कैद केल्यामुळें आतां तहकूब राहिला. हैदरअल्ली चित्रदुर्गास आज दीड दोन वर्षें एकसारखा उपद्रव देत होता. मध्यंतरीं त्या स्थानास त्यानें एक दोनदां वढाही दिला होता तेव्हां मराठ्यांच्या फौजा जवळ आल्यामुळें त्यास तो उठवावा लागला होता. हल्लीं मराठे इंग्रजांच्या मोहिमेच्या धामधुमींत गुंतलेसे पाहतांच त्यानें पुनः येऊन चित्रदुर्गास वढा दिला. कारभाऱ्यांच्या मोहिमेचा उद्देश तिकडे गेल्यावर आधीं चित्रदुर्गचा वेढा उठवावा हा होता. परंतु हैदरअल्लीनें बहुत निकरानें लढून माघ वद्य पंचमीस तें स्थळ घेतलें. बापू कैद झाल्यावर मुख्य कारभाऱ्याचा

अधिकार आतां नाना फडनविसांकडे आला व हरीपंततात्या दुय्यम कारभारी झाले. विसाजीपंत आठवले व बाजीपंतअण्णा यांस सात आठ हजार फौज देऊन भाऊंकडे पाठवावें व भाऊनीं आपली व हीं फौज घेऊन जाऊन चित्रदुर्गाचा वेढा उठवावा, अशी मसलत या नवीन कारभाऱ्यानीं केली होती. पण वर सांगितल्याप्रमाणें तें स्थळ शत्रूच्या हातीं गेल्यामुळें आतां तो बेत तसाच राहिला, आणि भवानी शिवराम या सरदाराबरोबर चार पांच हजार फौज मात्र कारभाऱ्यांनीं भाऊंकडे पाठविली, व भाऊंस लिहिलें कीं, सुरापुरची मसलत लवकर आटपून तुम्हीं बदामी बागलकोटाकडे यावें; व त्या प्रांतीं रास्त्यांच्या जहागिरींतलीं वगैरे ठाणीं हैदरअल्लीनें घेतलीं आहेत तीं परत घेऊन रास्त्यांच्या हवालीं करावीं आणि त्याच मार्गानें करवीर व कित्तूर तालुक्यांत येऊन करवीरकर व कित्तूरकर यांचाही बंदोबस्त करावा.

हैदरअल्लीनें चित्रदुर्ग घेतल्यावर सावनूर, डंबळ, हरपनहल्ली, रामदुर्ग, कनकगिरी वगैरे लहान थोर संस्थानांपासून खंडण्या घेतल्या; आणि कर्नूळ व अदवानी येथील नबाबांपासून अनुक्रमें चार व सह लक्ष रुपये खंडणी घेण्याचा करार ठरविला. कडपेकर नबाब खंडणी देण्याविषयीं तकरार करूं लागला म्हणून हैदरानें त्यावर आपला मेहुणा मीररेजा यास पाठविलें, परंतु कडपेकरानें मीररेजाचा पराजय करून त्यास धुडकावून लाविलें. मग हैदरअल्ली स्वतः मोठी फौज घेऊन कडप्यास आला व त्यानें तें स्थळ घेऊन तेथल्या नबाबास कैदेंत टाकून त्याचें राज्य घेतलें. कपडेंकर नबाबाची बहीण रूपानें अत्यंत सुंदर होती. तिनें हैदरअल्लीस सांगितलें कीं, तूं मजशीं लग्न करून मला माझ्या योग्यतेप्रमाणें सन्मानानें वागविशील तर मी तुझी स्त्री होण्यास कबूल आहें. तें न करितां केवळ तूं मजवर बलात्कार करून मला भ्रष्ट करूं पाहशील तर मी प्राण देईन ! असा तिचा निर्धार

पाहून त्यानें तिजशीं निका लाविला व तिला 'बक्षी बेगम' अशी पदवी देऊन आपल्या जनानखान्यांत मुख्य स्थान दिलें. त्याच्या लष्कराचा तळ कडपें येथें असतां अकस्मात् लांब दौड करून येऊन परशुराम-भाऊंवर छापा घालावा असा त्यानें बेत केला होता ! भाऊंस सावध राहण्याविषयीं नरगुंद वगैरे ठिकाणांहून वारंवार इशाराही येत होता. त्या वेळीं भाऊंची स्थिति फार बिकट होती. सुरापुरकर तर तहाचा ठराव झाला असतांही ऐवज देण्याविषयीं टाळाटाळ करीत असल्या-मुळें भाऊंस तो प्रांत सोडून जातां येईना. शिवाय एकीकडून निजाम-अल्लीशीं बिघाड झालेला असल्यामुळें त्याची फौज त्यांवर चालून येण्याची भीति होती व दुसरीकडून हैदरअल्लीचा छापाही येण्याचा संभव होता ! यामुळें दोहींकडच्या बातम्या काळजीपूर्वक आणवून ते फार फार सावधपणानें रहात असत; आणि हैदर ज्या बाजूस होता तिकडे त्याच्याच मुलखांत चाळीस पन्नास कोसपर्यंत नेहमीं फौजेच्या टोळ्या स्वारीस पाठवीत असत. या टोळ्यांनीं लूट करून शत्रूच्याच लखावर पोट भरावें, त्याच्या हालचालींवर नजर ठेवावी, व आम्हांस तुझी कांहींच पर्वा वाटत नाहीं असें त्यास दर्शित करावें, असे तीन उद्देश या टोळ्या स्वारीस पाठविण्यानें भाऊंस साधावयाचे होते. गनिमी काव्याच्या लढाईचा तो पहिलाच मोहरा होता ! त्या वेळीं निजामअल्लीशीं लढाई सुरू होती तर मोंगल व हैदर एक होऊन मोठीच मसलत उभी राहण्याचा रंग होता ! परंतु नानांच्या खरमरीत लिहिण्यावरून मागें सांगितल्याप्रमाणें भाऊनीं "काढतेंच घेतलें" हें बरेंच झालें ! पुढें निजामअल्लीचा राग शांत झाला आणि हैदरअल्लीचा छापा येण्याचा तेवढा मात्र धोका राहिला. तेवढा धोका संभाळून सुरापुरकरांची रग जिरविण्याचें भाऊंत सामर्थ्य होतें व त्यामुळेंच ते आतां त्या संस्थानिकाच्या राजधानीजवळ आले होते.

भाऊंची फौज सुरापुराजवळ येऊन ठेपली तरी तेथील संस्थानिकानें चाळवाचाळव चालविलीच होती. याचें कारण त्यानें हैदरअल्लीशीं गुप्तपणें सूत्र लावून त्याची फौज आपल्या कुमकेस आणण्याची योजना केली होती, आणि त्याप्रमाणें ती फौज येण्याची वाट पहात तो एक एक दिवस काढीत होता. ती बातमी भाऊंस समजतांच त्यांनीं सामोपचाराचा मार्ग सोडून तत्काळ युद्धप्रसंग करून आपला कार्यभाग साधून घेतला ! तो प्रकार त्यांच्या शब्दांनीं आम्ही येथें लिहितों. " सुरापुरची बेरीज ठरून एक महीना झाला असतां आज उद्यां म्हणोन चाळवाचाळव करूं लागले. त्यामुळें वाघिनगिऱ्यावर परवां पंचमीं बुधवारीं सडे तयार होऊन पहांटेच्या सहा घटका रात्रीस गेलों. किल्ल्यास तोफा लाविल्या. खालील गढी घेऊन लुटली. किल्ल्यावर लोक चढून निकड करून अर्धा किल्ला घेतला. तों सावकारसुद्धां सगो निळकंठ येऊन बहुतच रदबदल केली. हातापायां पडूं लागले. याजमुळें लोक माघारे आणविले. कराराप्रमाणें उदईक चिठी देतों म्हणून मुकाशाच्या जावसालाचा लढा होता यास्तव बोलोन येतों म्हणोन माघारे सुरापुरास गेले; कीं षठीस प्रहर दिवस चढला नाहीं तों येतों. त्यास तो दिवस समग्र गेला. आले नाहींत. शत्रूकडील बातम्या अनेक प्रकारच्या येऊं लागल्या, दिवसगत कामाची नाहीं, याजमुळें मागती काल सप्तमी भृगुवारीं पहाटेंची चार घटका रात्र आहे तों तयार होऊन फिरोन पहिली जागा सोडून सुरापूर व वाघिनगिरें यांच्यामध्यें वाघिनगिऱ्यालगती गढी डोंगरावर आहे— तेथून सुरापूर पावकोसही होणार नाहीं—तेथें जाऊन तोफा लागू केल्या. अलीकडे एक बुरूज होता त्यांतील प्यादे तोफा पाहतांच गढींत गेले. मुख्य वाघिनगिऱ्याची गढी तीच. तेथें तोफा सुरू करून हल्ला केला. लोक जाऊन भिताडास लागल. तों मागतीं सावकार घेऊन सगो निळकंठ आले. त्यांनीं कराराखेरीज वीस हजार रुपये गुन्हेगारी जास्ती व

हत्ती एक नजर कबूल करून साहुकारी निशा दिली तेव्हां निशाचिठी घेऊन गोटास येऊन भोजन केलें ! बाकीचीं बागेवाडीचीं घोडीं व बोली अलमेलें व बागेवाडी येथील आज येतील. येथील फडशा जाहला. अतःपर एक दोन दिवशीं कूच करून कृष्णातीरास जातों. सुरापुरकर परिच्छिन्न अमित्राची वाट पहात होते ! आम्हीं लवकर निकड केली याजमुळें निशा पटली. नाहीं तर पैका येत नव्हता ! संस्थानचा श्रम फार होता, आतां आब राहिला नाहीं ! " किल्लयाची बळकटी ही तो संभाळणाऱ्या माणसांच्या मर्दुमीवर अवलंबून आहे हें अनेक वेळां सिद्ध झालेलें तत्व आम्हांस येथें आणखी एकदां सांगावयाचें होतें व त्यासाठींच वरील लांबलचक उतारा आम्हीं येथें दिला आहे. यासंबंधें चौऱ्याहत्तर वर्षांपूर्वीं याच स्थळीं काय प्रकार घडला होता इकडे वाचकानीं लक्ष द्यावें. त्या वेळीं येथील संस्थानिक पेमनाईक यानें बंड केलें होतें. तें मोडण्याकरितां सामान्य सरदाराचा कांहीं इलाज चालेना म्हणून खुद्द औरंगजेब ऊर्फ अलमगीर बादशहा लक्षावधि सैन्य घेऊन येथें आले होते; व या वाघिनगिऱ्याच्या भिकार किल्लयास कित्येक महिने वेढा देऊन बसले होते ! त्या प्रसंगीं पेमनाईकाच्या मर्दुमीमुळें बादशहांचे सर्व उपाय थकले तेव्हां त्यांनीं उत्तरेकडून झुलपुकारखान व कर्नाटकांतून सादतखान या आपल्या दोन उत्तम सेनापतींस बोलावून आणिलें. मग या दोघांनीं जिवापाड मेहनत केल्यावर व उभयपक्षीं हजारों लोक मारिले गेल्यावर हा वाघिनगिऱ्याचा किल्ला बादशहांच्या हातीं लागला ! ! ! सारांश ज्या ठिकाणचे लोक त्या वेळीं अलमगीर बादशहाबरोबर वाघाप्रमाणें लढले त्याच ठिकाणच्या लोकांस परशुरामभाऊनीं आतां कुत्र्यांप्रमाणें झोडपून काढिलें ! ! !

याप्रमाणें सुरापुरची मसलत आटपतांच परशुरामभाऊ कृष्णातीरीं होनगुंद्याच्या आसपास आले तों भवानी शिवराम हे पुण्याहून

रवाना झाले होते ते आपल्या चार पांच हजार फौजेसह भाऊंस येऊन मिळाले. नंतर हैदरानें घेतलेलीं ठाणीं परत काबीज करण्याचा उपक्रम सुरू झाला. वैशाख वद्य चतुर्दशीच्या दिवशीं पहांटेची चार घटका रात्र असतां फौजेची एक टोळी रघुनाथराव कुरुंदवाडकर यांजबरोबर हणमसागरचें ठाणें काबीज करण्यास चालती झाली, व बाकीची फौज घेऊन खुद्द भाऊ सकाळचा प्रहर दिवस आला नाहीं तों होनगुंद्यास आले. त्यानीं येतांच हल्ला करून पेठ घेतली व डोंगरावर गढी होती तिजवर तोफा सुरू केल्या. संध्याकाळीं गढींतले लोक हत्यारांसुद्धां आम्हांस सोडून द्या असें म्हणूं लागले; परंतु तें बोलणें भाऊनीं मान्य केलें नाहीं म्हणून दुसरे दिवशीं ते हत्यारें खालीं ठेवून बाहेर आले. ठाण्याठाण्यांतून शत्रूचे लोक होते त्यांस दहशत बसावी म्हणून भाऊनीं त्यांपैकीं कित्येकांचे हातपाय तोडविले ! हैदरखानाचा कमावीसदार सोमण्णा म्हणून होता तो व तेथील देसाई व देशपांडे सांपडले ते कैदेंत ठेवण्यांत आले. रघुनाथराव हणमसागरावर गेले तों तेथचे प्यादे बाहेर येऊन लढूं लागले. तेव्हां रघुनाथरावानीं त्यांवर घोडीं घालून चाळीस पन्नास प्यादे ठार केले. मग तेथला देसाई शरण येऊन भेटीस आला व आठ हजार होन खंडणी देण्याचा करार करून परत गेला. पण दुसरे दिवशीं खंडणीची रक्कम यावी ती आली नाहीं ह्मणोन रघुनाथरावानीं हणमसागराची पेठ लुटली व खंडणीपुरत्या ऐवजाच्या ओली घेऊन ते लष्करास परत आले. नंतर भाऊनीं केळूर, कटगिरें, बसुरकी व मुदलावी हीं ठाणीं घेतलीं. यांपैकीं कोणचेंही ठाणें घेतांना लढाई करावी लागली नाहीं. अनवाल व यादवाड येथेंही ठाणीं बसलीं. केरूरचें ठाणें मजबूत होतें त्यास एक दिवस तोफा लावून भाऊनीं हल्ला करण्याची सिद्धता करितांच आंतले लोक शरण आले व त्यानीं तें ठाणे दिलें. एक बदामीच्या किल्ल्याखेरीज त्या प्रांतीं जितकीं ठाणीं हैदरअल्लीच्या लोकानीं व ठिकठिकाणच्या पाळेगारानीं

बळकाविलीं होतीं तितकीं सारीं आतां पुनः परशुरामभाऊनीं घेऊन रास्त्यांच्या हवालीं केलीं. नंतर ते करवीरकरांचा बंदोबस्त करण्याकरितां त्यांच्या कटकोळ महालांत शिरले.

नं. २४६५. श्रीगणपति. (पौष व० ११-१२ जाने०).

पै॥ छ० २६ जिल्हेज. सन तिस्सा सबैन. पौषमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रति परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २४ जिल्हेज मुक्काम निगडी परगणे करजगी जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. तुम्हीं छ० १९ जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं छ० २२ मिनहूस पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. " दुर्गास शत्रूचे फौजेचे मोर्चे बसले आहेत. कित्तूरकराचा जमाव पांचसातशें गोकाकेस आहे. सटवाजी भोंसला हुकेरींतच राहोन किरकोळ उपद्रव चिकोडी प्रांतांत करितो. शिंदा येळगुडावर आहे. येळगुडचें ठाणें पाडीत आहे. चिकोडीकरांचा जमाव भोजेवर आहे. " ह्मणोन तपशीलवार लिहिलें तें कळलें. चिकोडकरांची कुमक करावी अशीं पत्रें तुह्मांस सरकारांतून आलींच आहेत. आम्हासही पत्रें राजश्री बापू व नानाचीं आलीं आहेत कीं " मिरजेंतील सामान व यावेरीज तुम्हाजवळ फौज आहे त्यापैकीं दोन हजार याप्रमाणें चिकोडीकरांच्या उपराळ्यावर पाठवून देणें " म्हणोन लिहिलें आहे. त्यास आम्ही कोणत्या शहावर आहों, व आम्हाजवळ फौज किती, कांहीं ध्यानांत न आणितां कारभारी ( लोक ) मागतील तशीं पत्रें देतात ! असो. तूर्त तुम्हीं तेथें राऊत चारपांचशें जमा केले आहेत. आणखी दोनअडीचशें जमा करून त्यांपैकीं तीनचारशें राऊत व कांहीं शेंदीडशें गारदी याप्रमाणें सामान कोणी शहाणा निभावणीचा पाहून त्याजबरावर चिकोडीकरांकडे पाठवून द्यावें. स्वा-

१ गंगाधरराव गोविंद.

रांस व प्याद्यांस पोटास द्यावें असा करार येथें राजश्री अंताजी शामजी व बाबूराव दादाजी यांजकडील कारकून येथें आले आहेत त्यानीं केला आहे. राउतीं वीस रुपये आम्ही मागत होतों, ( परंतु ) रदबदलीमुळें पंधरा दरमहा राउतास व प्याद्यास पांच रुपये याप्रमाणें ठराव जाहला आहे; तर लिहिल्याप्रमाणें जमाव त्यांजकडे लावून द्यावा. कागलास वेढा दिला तेच वेळेस चहूंकडून कुमक झाली असती तर ठीक पडतें. तें न जाहलें. त्याजवर ( येसाजी शिंद्यानें ) येळगूड घेतलें. याप्रमाणें एक एक स्थळ साधीत येतो. उपेक्षा झाल्यास चिकोडी आदिकरून गुंडाळिल्यास मग मिरज प्रांतीं धामधूम करील ! यास्तव दूर आहेत तोंच बळ पाडून कलागतीचें तोंड तिकडेच पाडावें. चिकोडीकरानीं यंदां दोन वेळां चांगलें ठांसून राखिलें. करवीरकरांच्या पारिपत्यास्तव आम्हीच तिकडे येणार होतों; परंतु इकडे बेरड वगैरे मिळोन धिंगाई मांडिली होती यास्तव इकडे येणें प्राप्त जालें. आतां विना सुरापुरकरांचा तह ठरल्याशिवाय तिकडे येतां येत नाहीं. रावतांस पंधरा रुपये दरमहा द्यावयाचा करार,त्यांत रुपया दोन रुपये उणे दिले तरी कबूल करून जमाव पाठवावा.सारी कच आपल्या अंगावर येऊन पडल्यानंतर मग आटपावयाचें कठीण पडेल. एक कागल गेलें याजमुळें किती उणें पडलें ! याच अन्वयें प्रस्तुत तिकडे चिकोडीकर दम धरून आहेत याजमुळें ठीक आहे. आतां सर्वांनीं मिळोन तेथें बळ पाडिल्यास उत्तम. लिहिल्याअन्वयें जमाव पाठवून चिकोडीकरांची कुमक जरूर जरूर करावी. त्याची कुमक केल्यास आपला स्वार्थच आहे, यास्तव करणें प्राप्त आहे. आम्हास सरकारचें पत्र आलें जे, " रा॥ आनंदराव गोपाळ व आम्हाकडील हजार स्वार पाठविणें व तुम्हांस मिरजेस लिहिणें " ह्मणोन लिहिलें आहे. त्यास आम्हीं तिकडे यावें तर पोटास मिळणार नाहीं. खर्च भारी. आणि मागें बेरड व नरसो गोविंद वगैरे फिरोन जमून पंढरपूरपावेतों विल्हेस लावितील ! यास्तव सुरापुरचा लढा उर-

कोन बोलूनचालून बंदोबस्त करून तिकडे यावें असें म्हणतो. त्यास कनिष्ठ पक्ष एक मास लागेल. यास्तव तोंपावेतों त्यानीं ठाणें घेऊं नये असें जाहलें पाहिजे; चिकोडीकरांची कुमक जाहली पाहिजे; तरी आपण कुमक जरूर करावी. सरकारचेंही पत्र तुम्हांस गेलेंच आहे व श्रीमंत राजश्री व्यंकटरावदादांची[1] रवानगी विसाजीपंतमामाचे[2] चिरंजीव सुद्धां होते ह्मणोनही कळलें. त्यास जय पडे तों आपण बाबूराव व अंताजी शामजी यांची कुमक कांहीं घेऊन अथवा फुकट आपले त्यांचे विचारें, परंतु करावी. अनमान करूं नये, आम्हीं लोकांच्या बोल्या केल्या आहेत तेही जमतात. सुरापुरकरांचा वकीलही आला आहे. श्रीकृपेंकरून लवकरच विल्हेस लागावेसें आहे. शहाजी भोंसले यांजकडीलही जमाव जवळ आला. दोन चार दिवसांत येईल. करजगीचें बोलणें ठरलें. निशा व्हावयाची आहे तेही एका दोन दिवसांत होईल. उपरांतिक बरडोलचा जाबसाल कांहीं घांसदाण्याचा व बाकी तीा। राा। बापूकडील कांहीं उगवावयाची आहे त्याची तोडजोड जेथवर होईल तेथवर तीर्थस्वरूपांचे विचारें करून पुढें इंडी तांब्याचे सुमारें होतों. इतक्यांत कसें कसें घडतें तें मागाहून लिहितों. आपणाजवळ पांचशें स्वार ठेवावे आणि पांचशें स्वार तिकडे पाठवावे. कांहीं खर्चास येईल, कांहीं कुमक शेरा, असें करावें. परंतु उभयतांची कुमक करावी. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४६६. **श्रीगणपति.** (पौष व० ११–१३ जानेवारी).

पैा। छ० २६ जिल्हेज सन तिस्सा सबैन पौषमास.

आशीर्वाद उपरी. मोरव्याहून आम्हांस आलेलें पत्र व खंडोपंताचें पत्र राजश्री नरसिंगराव धायगुडे यांस प्रविष्ट करून खंडोपंताचे

१ घोरपडे इचलकरंजीकर यांची पेशवे सरकारांतून करवीरचे बंदोबस्तास रवानगी, २ विसाजी नारायण जोशी हुपरीकर,

पत्राचें उत्तर घेऊन पाठविलें तें पावलें. या पत्रापूर्वींच परभारें राजश्री माधवराव याणीं लिहून पाठविलें होतें. नववे दिवशीं वर्तमान त्यांस कळविलें म्हणोन लिहिलें तें कळलें. कोंकणांतील तोफा येऊन पावल्या. चांगल्या आहेत, म्हणोन लिहिलें, उत्तम. वामनाजी बल्लाळ यांचे डोळे अद्याप बरे जाहले नाहींत. मागाहून आठ चार दिवशीं पाठवून देतों म्हणोन लिहिलें तें कळलें. डोळे निवळल्यानंतर मशारनिल्हेस पाठवून द्यावें. तीर्थस्वरूप राजश्री भास्करपंतआपाचा मजकूर वेदमूर्ति राजश्री त्रिंबकनाना आल्यानंतर आज्ञेप्रमाणें करितों म्हणोन लिहिलें; उत्तम आहे, वडिलांचाही फारच ओढीचा प्रकार आहे. यास्तव जरूर त्यांचा बंदोबस्त करून द्यावा. बेळगांवास तांदळाकरितां कौठी पाठविली होती; पाटणकरांचें पत्र असतां त्यांजकडील कारकुनानें हंशीलाचे ३६ रु॥ घेतले; म्हणोन लिहिलें तें कळलें. " गजेंद्रगडकर मंडळीचीं पत्रें, ' आठ दिवसांत तयार होऊन येतों ' म्हणोन आलीं आहेत. संताजी भोंसले यांचे चिरंजीवही येणार. आज्ञा जाहलीया पत्र पाठवूं " म्हणोन लिहिलें त्यास पत्र पाठवून आणवावे. सारी मंडळी येतांच तेथें प्रयोजन लागल्यास ठेवून घ्यावे. नाहीं तर इकडे पाठवून द्यावे. गोविंदराव भांडवलकर बंधु वगैरे मंडळीसह ( आपणाकडे ) आले आहेत म्हणोन लिहिलें, त्यास अद्यापि ते येऊन पावले नाहींत. येतील. येसाजी गोविंद पुण्याहून आले त्यांचे जबानीचें वर्तमान तिकडील लिहिलें तें कळलें. होळकराकडील येक सरदार सातआठशें स्वारांचा धणी पळोन घांटाखालीं गेला व बराणपुरची खंडणी उत्तरेकडील इंग्रजानीं घेतल्याचे हे दोनी मजकूर ऐकण्यांत अथवा चिरंजीव राजश्री दादाच्या पत्रांत नाहींत. परवां आलेलीं पत्रें चिरंजीवाचीं तुम्हांकडे पाठविलीं आहेत. पावलींच असतील. " इंग्रज बळावत चालले. अद्याप त्यांच्या पारिपत्याची तरतूद सरकारांतून होत नाहीं " म्हणोन लिहिलें, त्यास राजश्री महादजी शिंदे यांची निष्ठा

श्रीमंतांच्या पायाशीं चांगली आहे. दुसरा प्रकार किमपि नाहीं. इंग्रजांचें पारिपत्य खामखां करावें हीं हिमत धरली आहे. प्रस्तुत इंग्रजानीं जी जागा बळकावून आहेत ती जागा अडचणीची आहे, यास्तव त्यांजवर चालोन जात नाहींत. ते जागा सोडून पुढें मैदानांत यावयाची वाट पाहतात. खालीं मैदानांत येतांच गांठ घालोन पारिपत्य करितात. राजश्री चिंतोपंत लिमये पुण्याहून पंढरपुरास आले. दो दिवशीं येथें यतील. दरबारचीं काजकामें लौकर होऊन येत नाहींत. कामें आटपल्यानंतर चिरंजीव राजश्री दादा निघोन येतील. चिरंजीव राजश्री जिउबानीं रुजुवात केली. याउपर तेही दादाबरोबर येतील. सरंजामी यांचा मजकूर लिहिला कीं, " चौथाई व निमे नालबंदीचा तगादा केल्यास हुजूरच जाऊं म्हणतात; अथवा आपणाकडे येऊं म्हणतात " म्हणोन तपशीलवार लिहिलें तें कळलें. ऐशास केवळ आजच निकड लावूं नये. दोनीं कलमें बजावून ठेवावीं. त्यांत सरंजामी येक जागीं मिळाले आहेत. सारे मिळोन जाबसाल येक पद्धतीनें करितील, यास्तव सारे येके जागां न ठेवावे, एक दोघे इकडे पाठवून द्यावे. एक दुसरे चिकोडकिराकडे सामान पाठवाल त्यांत रवाना करावे. आनंदराव शिंदे गरीबसा पाहून त्याची जप्ती करून एक दुसऱ्याची वाट पाडावी म्हणजे सहजच सारे मान्य करितील ! युक्तीनेंच करावें. असेंही करितां एखादा कोणी फारच खटलेखोर असेल त्यास तूर्तच तसदी देऊं नये. आम्हाकडे कोण येतील त्यांस आम्ही सांगूं. चिंता नाहीं. सुरापूरच्या कापडाचा मजकूर सविस्तर लिहिला तो कळला. ऐशास आमचें कापड दुसाला मिळोन पंधरा हजारांचें यावें, त्यास वाजवी किंमतीचें रोख पंधराचें मांडून घ्यावें. बाकीचें कापड तूर्तच पुणियास लावून देऊं नये. तसेंच असों द्यावें. रोख पंधरा हजारांचें ते मांडून देत नसल्यास सारेंच कापड आहे तसेंच असों द्यावें. येथेंच बोलोन करार करून पत्र घेऊन

येतील त्याप्रमाणें मांडून घ्यावें, येविशीं कदाचित् सरकारचें पत्र आलें तरी चिंता नाहीं. ' आमच्या हिशाचें कापड मांडून देत नाहींत, मांडून दिल्यानंतर परत देतों ' असें उत्तर लिहोन द्यावें. इकडील वर्तमान तर करजगी परगण्यांत रोखे केले आहेत परंतु परगणा ओस आहे. आबादान नाहीं. थोडके बहुतांवर उरकेल. सुरापूरकर विना त्याच्या तालुकियांस उपद्रव लागल्याशिवाय ठीक ताळ्यावर येऊन बोलत नाहीं, यास्तव उद्यां कूच करून हलसंगीच्या रोखें जातों. राजश्री शहाजी भोंसले यांजकडील भवानी पाटील फौजसुद्धां अक्कलकोटाहून निघोन दोन मजली अलीकडे आले. दो दिवशीं येऊन सामील होतील. बेळगांवास पत्रें पाटणकराचीं असतां मानीत नाहींत म्हणोन लिहिलें, त्यास येविशीं चिरंजीव राजश्री दादास पुण्यास लिहिलें म्हणजे आणखी पत्र पाठवितील. आमचा ऐवजही सरकारांत फारच गुंतला आहे! यास्तव कापडाची मांडून घ्यावयाची अथवा रवाना करावयाची तांतड करूं नये. हिसक्यांत घालून ठेवावें. पुढें पाहतच आहों. गुदस्तां बोलेकराचें ( पारिपत्य ) जाहलें. एक जिवाजी शिंद्याचें जाहलेंच आहे. आणखीं एक दुसरा निर्माल्यसा पाहून करावें. वरकडापासून चाकरी घ्यावी. फडशा पुढें होईल ह्मणोन सांगावें. युक्ति युक्तीनें करावें. बहुत काय लिहिणें. नरसिंगराव गोविंद जखमी शिवणगींत आहे. दोन जखमा लागल्या आहेत. लोक चौघे चहूंकडे गेले. लोभ असो दीजे हे आशीर्वाद.

नं. २४६७. **श्रीगणपति.** (पौष व० १२–१४ जानेवारी.)

चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा[1] यांसी प्रति परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल तारीख छ० २६ जिल्हेज गुरुवार प्रातःकाळ मुक्काम सोनलगी परगणे करजगी जाणोन स्वकीय

१ कुरुंदवाडकर.

लिहीत जावें. विशेष. तुम्हीं छ० १८ जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं काल छ० २५ मिनहूस पावून हस्ताक्षर पत्रांतील मजकूर अक्षरशः कळला. याजकरितांच आह्मी कबूल नव्हतों. हल्लीं सर्व गोष्टी तुमच्या प्रत्ययास येऊन चुकल्या. एवढ्यानें तुमची खातर दास्त झाली ! असो, जें होणें तें होईल. तुम्हीं याउपर लौकर तेथील कामें आटपून यावें. आम्ही सांप्रत बेरडांच्या तोंडावर आहों. विना येथील फडशा झाल्याखेरीज दुसरेकडे जातां येत नाहीं. रा. शहाजी भोंसले यांजकडील रा. भवानजी पाटील फौजेसुद्धां दोन मजला अलीकडे आल्याचें पत्र आलें. याउपर तेही लौकरच येतील. राजश्री बापू व नानांचीं पत्रें आम्हांस राजश्री नागो शामजी याणीं घेऊन पाठविलीं, त्यांतील मजकूर " तुम्हांकडील हजार राऊत व राजश्री आनंदराव गोपाळ यांचें पथक व शिवाय मिरजेंतील सामान चिकोडीच्या कुमकेस पाठवून द्यावें. " ह्मणोन. त्याच अन्वयें तुमचेंही पत्र होतें ! ऐशास आम्हांजवळ सामान किती, व आम्हांस बेरडाचा शह अगदीं समीप, असें असतां यांत काय पाठवावें, पाठविल्यास बाकी काय रहातें, हें ध्यानांत न आणितां सरकारांतून पत्रें मागितल्याप्रमाणें देतात ! तुम्हीं देखील तसेंच लिहून दिलें ! आह्मीं पत्रांचीं उत्तरें दिलीं कीं, " पंढरपुराजवळ होतों ते समयीं याप्रमाणें पत्रें आलीं असतीं तर आम्ही तिकडेच गेलों असतों. बेरडाच्या तोंडावर येऊन शहास गुंतल्यानंतर आतां जाणें कसें होईल, तिकडील कुमकेचें आम्हांसही अगत्य आहे. मिरजेस लिहून पाठविलें आहे. हुजुरूनही तिकडे लौकर फौजेची रवानगी व्हावी. याप्रमाणें जाब उभयतांच्या पत्रांचे लिहून दिले. रा. रामचंद्र नाईक व नागो शामजी यांच्याही पत्रांचें उत्तर असेंच लिहून दिलें. मिरजेस चिरंजीव राजश्री बाळासाहेबांस चारशेंपर्यंत राऊत जरूर

---

१ सुरापूरकराच्या. २ अक्कलकोटकर. ३ कारभाऱ्यांच्या.

चिकोडीकरांचे कुमकेस पाठविण्याविषयीं लिहोन पाठविलें आहे. रवानगी करितील. " इंग्रज पहिल्या जाग्यावरून दोन कोस अलीकडे मैदानांत आले. रा. भिवराव पानशे यांजवळ तोफा नव्हत्या. त्यानीं मारगिरी यांजवर केली. रा. धारराव शिंदे यांची घोडी गोळा लागून पडली. आणखी दहा पांच घोडे पडले. व पांचचार माणूस ठार शिवाय जखमी जालें. पानशे यांचें बुनगें माघारें आलें. सडे त्यांच्या तोंडावर राहिले आहेत. उभयतां सरदारांनीं सडे होऊन त्यांजवर जावें असा निश्चय ठरला; " म्हणून तपशीलवार सर्व लिहिलें तें कळलें. उभयतां सरदार सडे होऊन गेले कीं नाहींत, अलीकडील मजकूर काय जाला, तो सविस्तर लिहावा. तुम्हांजवळ जामियत नाहीं. तुम्ही तेथें एकटे आहां. रात बिरात बहुत सावधपणें असावें. बेहेडा व कारसाईच्या सनदा तयार झाल्याचें लिहिलें तें कळलें. काळे व फडतरे यांजबरोबर ऐवजाची वरात थोरात व शिराळेंकरांवर घेऊन पाठवावयाविशीं परवां लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें घेऊन पाठवावी. खेरीज हप्त्यांपैकीं ऐवज येणें, त्यास भोंसल्याकडील ऐवज लावून द्यावा. पाटणकरांचे हत्तीबद्दल रुपये उगवावे. सुरापूरकराकडील वकील येथें आला आहे, परंतु नेट बसल्याखेरीज बोलणें पक्केपणांत येत नाहीं! राजश्री चिंतोपंत पंढरपुरास आले. अद्यापि येथें आले नाहींत. येक दोहों रोजीं येतील. आल्यानंतर त्यांच्या जबानींतील अर्थही कळेल. आनंदराव जाधव यास अन्यायामुळें शिंद्याच्या लष्करांत मेखसू घालोन मारिलें, म्हणोन ऐकण्यांत आलें आहे. परंतु तुमचे पत्रांत कांहीं नाहीं. त्यास सविस्तर लिहावें. सारांश तेथील काजकामें आटपून अतःपर तुम्हीं सत्वर यावें. " रामतीर्थाकडे न जावें. सुरापूर तालुक्यांतच जावें. " म्हणोन लिहिलें

---

१ हरिहरराव पांडुरंग यांच्या नांवें तयार झालेला हा सरंजामाचा नवीन बेहडा गोविंद हरि व वामनराव गोविंद यांच्या बेहडयाप्रमाणें तपशीलवार नसून नुसती एक त्रोटक याद आहे.

त्यास तसेंच योजिलें आहे. प्रस्तुत होर्तीपावेतों आलों आहों. आल-मेल्याचे सुमारें जाणार. सुरापूरकराचे वकील संगो नीलकंठ व आणखी एकजण आला आहे. दुसालांची खंडणी देतों म्हणतात. आम्ही ' सरकार तालुक्यांत ऐवज घेतलात तो व बागेवाडींत घोडीं घेतलीं आहेत तीं द्यावीं. ' म्हणोन म्हणत आहों. त्यास सर्वांचें लक्ष तिकडे आहे. इंग्रजांचें पारिपत्य होतांच भलतसें विल्हे लावितील असें दिसतें. तों पावेतों यांनीं नाद लाविला आहे. आमचीही फौज वरचेवर जमा होत आहे. चार पांच पावेतों जमा जाहले. आणखी दोन हजार पावेतों यावयाचे आहेत. आठ चार दिवसांत येतील. चिरंजीव राजश्री गणपतराव यांजवळही दोन अडीचशें[1] जमा जाहले आहेत. आम्ही यंदां तरी देवस्थापनेस जावें म्हणतों. परंतु तुमचें येणें होऊन लवकर आलां तरी जाऊं. नाहीं तरी चिरंजीव राजश्री आपास पाठवून देतों. चि. रा. हरिहरराव यांस लष्करांत आणावें म्हणोन लिहिलें, त्यास मुहूर्तानें बाहेर काढविलेंच होतें. तों येसाजी शिंदे याचा दंगा तिकडे जाहला. नरसो गोविंद याचा इकडे जाहला. तेव्हां तिकडेही फौज पाहिजे व इकडेही फौज पाहिजे असें जाहलें. तेव्हां हजार फौज जमा करविली. लोक सारे जुने तेथेंच जमा जाहले आहेत, यास्तव चिरंजीव तेथेंच आहेत. आतां आणवावे तर एकटे आणविणें ठीक नाहीं, यास्तव राहिले आहेत. चिकोडीकरांचे व रामचंद्र नाइकांचे कुमकेस सरकारांतून फौज गेली म्हणजे त्यांस येथें आणवितों. दोन चारशें स्वार तेथें ठेऊन खासा पांचशें स्वार घेऊन इकडे येतील. तिकडे फौज जरूर पाठवावी. कोणी तरी ( सरदार व ) कनिष्ठ पक्ष चांगली मुनार दोन गेली पाहिजे; तरच तिकडील बंदोबस्त होईल. नाहीं तर ठीक नाहीं. यास्तव वरचेवर उत्तेजन देऊन फौज तिकडे जाईल

[1] दोन हजार.

करावें. भापकर नेमिले ते चांगलेच आहेत. आणखी कोणी असे पाठवून द्यावे. म्हणजे चिरंजीवास आणवितों. मिरजेस चिकोडीकरांची कुमक करणेविशीं लिहिलें आहे, यास्तव आणवितां नये. वरकड राजश्री रामचंद्र गणेश यांचे रवानगीचा मजकूर कर्नाटक चित्रदुर्गचे कुमकेस होत होती त्याचा मजकूर तपशीलवार सहा बंद लिहिला तो कळला. तुम्हीं राहविला, ठीक न केलें ! त्यांचे वस्तु रवानगी व्हावयाची नाहीं. एक राऊत तेथून या समयीं निघणें कळतच आहे ! आमचे रवानगीची तरतूद फारच झाली ! त्यास हुजरात देऊन सरंजामी दोन्ही पथकें देऊन रवानगी करणार, तेव्हां ती मसलत आपल्याशिवाय तर करीत नाहींत. मग केल्यास चिंता नाहीं. आह्मीं फौज ठेविली आहे ही हर कोठेंही फेडूं ! मला अवघें समजलेंच होतें. यास्तवच कबूल करीत नव्हतों. तुमचे आग्रहास्तव कबूल केलें. तुमचेही प्रत्ययास आलें, चांगलेंच जाहलें ! असो. तुम्ही आम्ही एकत्र असतों तरी चार वाटा रोंखून फौज फेडून येतों, आम्ही निष्ठेनें सेवा करीत असतां संकट श्रीगजानन पाडणारच नाहीं. शागीर्दपेशा चाकर सांडणीबरोबर देखील रवाना करावयाची सोय पडेना ! असो. सर्व भरंवसा श्रीमंतांचे चरणावर आहे. फार काय ल्याहावें ? तुम्हीं कर्जाचे ऐवजाचें काम इतके दिवस राहिल्यासारखें तरी करून यावें. इंग्रज पुढें आले, आतां झूज होईलच. लष्करांत नानाप्रकारचीं राजकारणें, तुम्ही उतावळे, लोकही नाहींत, एकटे तेथें आहां, याचीच मोटी काळजी आहे. तुम्हीं लवकर यावें. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत असावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद. पै॥ छ० ४ मोहोरम माघ मास.

---

गतन कर्नाटकच्या स्वारीस फौजेची रवानगी व्हावयाची नाहीं.

नं. २४६८. श्रीगणपति. (पौष व० १२–१४ जानेवारी)

चिरंजीव राजश्री दादास आशीर्वाद. उपरी " राा शिवाजीपंतास येतांना घेऊन यावें किंवा ठेऊन यावें " म्हणोन लिहिलें, त्यास मशारनिल्हेस येतांना समागमें घेऊनच यावें. तेथें परिछिन्न ठेवावयाचें काम नाहीं. मिरजेस चि. रा. गंगाधरराव यांसींही लिहिलें आहे. राजश्री नानाही मजजवळ असेंच बोलले होते, यास्तव घेऊन यावें. ठेऊन येऊं नये. समागमेंच घेऊन यावें. ते कांहीं निमित्त करून राहतों म्हणतील तर तुम्हीं सांगावें कीं, यादीबुदी वगैरे कामेंकाजें आपलीं आहेत, तुम्ही माहीत ( गार ) आहां, वडिलांस समजावून मागती माघारे जावें, असें सांगावें. सद्दा बंद मजकूर अक्षरशः कळला. असो. चिंता काय आहे ? तुम्हांस मात्र समज कळविला नव्हता म्हणावा तर उत्तमही होता. (?) परंतु पुढें काय भरीस उतरला नकळे ! असो. आतां त्याची विवंचना काय ! आम्ही निष्ठेनें सेवा करितों; नाना शिवाय लक्ष दुसरें नाहीं; असें आहे तर सर्व यथास्थितच होईल. हरामखोर असतील त्यांचीं पारिपत्येंच होतील. तुम्ही तेथें[2] राहिलां आहां, मोठे काळजींत आहों. लौकर निकाल काढून यावयाचें करावें. इकडे आलां म्हणजे नरसो गोविंद याचे पारिपत्यें आपले पुढें नीटच श्रीमंतांचे कृपेकडून होईल. कर्नाटकांत पांच सात हजार फौज जाऊन निभावून येणें हें श्रीस्वाधीन आहे! असो. काळजी कोठपर्यंत करावी ? इकडे दोन महिने पोट भरूनच मग चिकोडीकडे जावयाचें म्हटलें, ठीकच आहे. तुम्ही मात्र उलगडा करून लौकर यावें. रा. हरीपंततात्यास नमस्कार प्रविष्ट करावा. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पैा छ० ४ मोहरम माघ मास.

---

१ परशुरामभाऊंचें रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पत्र. २ लष्करनजीक तळेगांव येथें.

नं. २४६९. ( पौष व० —जाने० प० पंधरवडा )

परशुरामभाऊंचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस—

" कौलगी परगणे विजापूर येथून पत्रें तुम्हांकडे पाठविलीं आहेत तीं पावलींच असतील. तेथून कूच करून शिवणगीस आलों. तें ठाणें बेरड व नरसो गोविंद यांचें माहेरघर. मुक्कामास आलों तेच दिवशीं प्यादे ठाणें टाकून पळून गेले. ठाणें पाडावयास लाविलें आहे. देऊरचें ठाणें चांगलें, बाहेर गांवकुसूं वेगळें, आंत अडीचशें प्यादा होता. तोफा आल्या दिवशींच प्रहरभर तोफा लावून बाहेरील गांव हल्ला करून घेतला. दहा पांच माणसें जायां जखमी जालीं. गढीचें भिताड तोफांनीं पडलें. प्यादे कौल घेऊन हत्यारानिशीं उतरून गेले अलमेलेंही घेतलें. सुरापुरकर अद्यापि यथास्थित बोलत नाहींत, सालाबादप्रमाणें देऊं म्हणतात. याउपर कूच करून अलमेलें परगण्याच बंदोबस्त करून त्यांच्या तालुक्यांत जातों. "

नं. २४७०. श्री. ( पौष व० १४–१६ जानेवारी. )

विनंती. सेवक केसो सखदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता।। मंदवार दीड प्रहर रात्र आवशीची. यथास्थित असे. विशेष. कुंडलेहून पत्र एका गृहस्थाचें आलें तेंच सेदेशीं बजिन्नस पाठविलें आहे. तेथें चाळीस पन्नास स्वार जमले आहेत आणखी आज निंबाळकर मंगसुळीहून पंचतीस स्वार येणार होते. पोंचले असतील, अगर [illegible]दईक येतील. थोरले श्रीमंतांकडील गृहस्थ करवीरकरांकडे जातात [illegible] होय. कुंडलकरांचा आश्रय त्यांस असेलसें आहे. त्यांचें पारि[illegible] [illegible] नदईक ते तेथून जाणार. स्वार पाठविणें तरी परभारें [illegible]नद होय तों ते तेथें राहतील कीं जातील

---

[illegible]त्र. २ राणोजी [illegible]हेबांकडील.

नं. २४७१. श्री. (पौष व० ३०–१७ जानेवारी.)

पौ॥ छ० २८ जिल्हेज. सन तिस्सा सबैन. पौषमास. आठ तास रात्र.

विनंती केसो सखदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ रविवार सहा घटका दिवस. सायंकाळ. यथास्थित असे. विशेष. ज्याणें पत्र दाखविलें तो गृहस्थ ओळख्या नव्हता, परंतु त्याणें मुद्दाम पत्र आणून दाखविलें. सत्य मिथ्या खरें न वाटे, म्हणून त्याजबराबर गडी दिला होता. गडी पाहून आजच त्याचें पत्र घेऊन आला. तो गृहस्थ त्यांजपाशींच राहतो. पत्र त्याचें प्रगटेस न आणावें. त्याचें नांवही प्रगटास येऊं नये. आजचे पत्रावरून भाव समजेल. तरतूद पत्राचा भाव समजून करावी. गडी सांगत होता, " स्वार वीस आहेत. वरचेवर येऊन माघारेही जातात; " ह्मणोन सांगितलें. विदित होय हे विज्ञापना. तजवीज करणें तरी पोक्त जमाव पाठवावा. गांवचा आश्रय असोन गांवांत हणमंताचे देवळाजवळ उतरले आहेत. विदित होय हे विज्ञप्ति.

नं. २४७२. श्री. (१८ जानेवारी.)

पौ॥ छ० ४ मोहरम. सन तिस्सा सबैन. माघमास.

श्रीमंत राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेशीं.

विनंती-सेवक मल्हार विठ्ठल दि॥ राजश्री आनंदराव भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ माघ शुद्ध प्रतिपदा स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं कृपाकरून पत्र पाठविलें तें पावलें. " हैदराची फौज चित्रदुर्गास बसली आहे. तिकडील वर्तमान आलें असेल तें लिहून पाठविणें " म्हणून आज्ञा, त्यास

---

१ पत्र अष्ट्याहून मिरजेस गंगाधररावांस.

येथील कारवान व सौदागर त्याच्या लष्करांत आहेत त्यांजकडील माणसें आलीं त्यांनीं जबानी सांगितलें जे, उभय पक्षीं लढाई बहुधा लागली आहे. हैदरानें तीनशें तोफा जमा केल्या आहेत. तोफांची मारगीर व लोकांनीं हल्ला करून एक टेंकडी घेऊन तेथें बातेरी बांधोन तेथून तोफांची मारगीर पेठेवरील साधोन मारगीर फार करीत असत, दुर्गकरानें खासे खासे शिपाई पांच सात हजार पाठवून टेंकडीवरील मोर्चा मारून काढिला. तेथें लढाई भारी जाहली. दोन अडीच हजार लोक बाहेरील मारिले व आंतीलही पांच सातशें पडले. पहिल्या तळावरी बाहीर फौज येऊन उतरली. येकायेकीं तूर्तप्रमाणें बधत नाहीं. प्राणावरी उदार होऊन लढाई घेत आहे. अशांत त्यास कुमक पोंचती तरी शत्रूचें पारिपत्य यथास्थित होतें. मोहरम महिना आहे. आणखी शंभर तोफा पट्टणाहून आणविल्या आहेत. आशोरा ( ? ) सरत्यावरी हल्ला करावी याप्रमाणें करार केला आहे. पुढें कसें होतें पहावें. श्रीमंत राजश्री " भाऊ याणीं सुरापुरकरांची फौज व भगवंतराव माढेकर वगैरे मंगळवेढेपर्यंत उपद्रव करित होते त्यांजवरी फौज पाठवून पारिपत्य केलें. सुरापुरकरांची फौज पळोन गेली. दोनतीनशें घोडीं पाडाव करून आणिलीं. " व " करवीरकराचें पारिपत्य चिकोडींत जमाव होता त्याणीं केलें. शिंदे पळोन गेले. " म्हणून लिहिलें, त्यास श्रीमंतांचा प्रताप विचित्र आहे. त्याचेयोगें पारिपत्यें होतात. इंग्रजही लयास पावतात. हैदरास दुर्गकर वस्ताद बरा भेटला आहे. पुढें कसें होतें पहावें. सारांश सरकारच्या फौजांचा शह शत्रूस बसता तरी यंदां पारिपत्य यथास्थित होतें. तें घडत नाहीं. ( हैदराच्या ) लष्करांतून कागदपत्र येत नाहीं. जबानी माणसें येतात त्याणी सांगितल्यावरून लिहिलें असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २४७३.  श्री. ( माघ शु० २–१९ जानेवारी. )

पै॥ छ० ३० जिल्हेज सन तिस्सासबैन पौषमास.

विनंती सेवक केसो सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० ३० माहे जिल्हेज प्रातःकाळ एक घटका दिवस पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें सूर्योदयापूर्वीं पावलें. पुण्याकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. व मंगसुळीच्या गृहस्थाचें वर्तमान लिहिलें तेंही कळलें. कुंडलेस खिजमतगार आज प्रातःकाळींच रवाना केला आहे. बातमी आली ह्मणजे लिहोन पाठवितों. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब कोठें आहेत याची बातमी ल्याहावयास आज्ञा करावी. व चित्रदुर्गाकडील वर्तमान काय तेंही लिहविलें पाहिजे. टिपू याची फौज चित्रदुर्गकरानीं बुडविली म्हणोन बाजारी वर्तमान आहे, यास्तव लिहिलें असे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचें व सुरापुरकराचें युद्ध झालें म्हणोन बाजारी वर्तमान उठलें आहे व चित्रदुर्गकरानें पट्टणवाल्याची कांहीं फौज मारिली व कांहीं नामी नामी लोक धरले. परिघ बसला होता तो उठवून जोरबेजोर लावून दिला म्हणोन ही खबर, परंतु सत्य मिथ्या न कळे. स्वामीकडे लिहिलें आलें असल्यास साद्यंत ल्याहावया आज्ञा करावी. पुण्याकडील इंग्रज नामोहरम जाले येणेंकडून सलाबत चांगलीच बसली. त्यांजकडून राजकारण अनुसंधानाचें आलें होतें तेव्हां आजपावेतों तिकडील संधान जाहलें असेल अथवा जेर तरी जाहले असतील. वर्तमान येईल तें मुद्दाम ल्याहावयाची आज्ञा केली पाहिजे. विदित होय हे विज्ञप्ति.

नं. २४७४.  ( माघ शु० १२–२९ जाने० )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र छ० १० मोहरमचें. देऊर परगणे हिपरगी मुक्कामाहून[1]—

१ पत्र अष्टयाहून मिरजेस गंगाधरराव यांस.

" रा. राणोजीराव निंबाळकर यांस मिरजेस आणिल्याचें तुम्हीं लिहिलें व रा. व्यंकटराव घोरपडे यानींही लिहिलें; त्यास निंबाळकर हे राजश्री मुरारराव हिंदुराव घोरपडे सेनापति यांचे जामात, यास्तव त्यांजकडे पहावें लागतें. तर निंबाळकर यांस त्यांचीं खासगत घोडीं उंटें तट्टें चीजबस्तसुद्धां सोडून द्यावें. "

नं. २४७९. श्रीगणपति. (माघ व०—फेब्रुवारी प० पंधरवडा.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. " रा॥ राणोजी निंबाळकर यांस व्यंकटराव घोरपडे यानीं आपले जिमेस करून घेतलें. घोडीं वगैरे तशींच ठेविलीं आहेत. आज्ञा येईल त्याप्रमाणें करूं. " ह्मणोन लिहिलें, त्यास त्यानीं केल्यास तुम्हीं केलें तें योग्यच; परंतु ते राजश्री मुरारराव घोरपडे यांचे जामात. त्यांजकडे पहावें लागतें. व येथें राजश्री दौलतराव घोरपडे[1] ..... भिडेस घातले या.........व्यंकटराव यांचे जिमा केलेच आहेत. त्यांजकडोन पत्र लिहून घेतलें असेल तें माघारें द्यावें व खुद्द निंबाळकरांचे घरचीं घोडीं उंटेंतट्टें जीं असतील तीं चीजबस्तसुद्धां सोडून द्यावीं. त्यांजबरोबर शिलेदार होते त्यांचीं मात्र घोडीं आहेत तशीं असों द्यावीं. हा मजकूर राजश्री व्यंकटराव यानीं लिहिला होता त्याजवरून त्यांच्या माणसाबरोबरही तुह्मांस पत्र लिहिलें आहे. त्याप्रमाणें म॥ निल्हेचीं घोडीं वगैरे सोडून द्यावीं. कौलगी परगणे विजापूर येथून पत्रें तुम्हाकडे पाठविलीं आहेत. पावलीं असतील. तेथून कूच करून शिवणगीचे मुक्कामास आलों......बेरडांचें ( व ) नरसिंगराव गोविंद यांचें माहेरघर. मुक्कामास आलों ते दिवशीं प्यादे रात्रीसच पळोन गेले. ठाणें पाडावयास लाविलें आहे, तेथून मुक्काम मजकुरास आलों. देऊरचें ठाणें चांगलें. बाहेरगांव कुसूं वेगळें. आंत अडीचशें प्यादा होता. तोफा

---

१ सोंडूरकर. २ पत्र परशुरामभाऊंचे गंगाधररावांस मिरजेस. ३ टिंबें दिल्या ठिकाणीं मूळपत्र फाटून मजकूर गेला आहे.

आल्या दिवशींच प्रहरभर लावून बाहेरील गांव हल्ला करून घेतला. दहा पांच माणसें जायां जखमी झालीं. गढीचें भिंताड तोफांनीं पडलें तेव्हां प्याद्यांनीं हत्यारें देऊन उतरून गेले. गांव हिपरगी खालीं..... गांवांत ठाणें. तोफा दोन......प्रस्तुत त्यानीं प्रतिनिधीचे कारकुनाचे हवालीं करून आपले लोक काढून नेले. तसेंच आलमेल्याचें ठाणेंही तेथील जमीदाराचे हवालीं केलें आहे. सुरापुरकर अद्यापि यथास्थित बोलत नाहींत. सालाबादप्रमाणें देऊं ह्मणतात. याउपर कूच करून आलमेल्याचा बंदोबस्त करून त्यांच्या तालुक्यांत जातों. बहादरखान गोरी व रामजी चव्हाण यांच्या तैनातजाबत्यांची नक्कल पेशजी पाठवावयाविशीं लिहिलेवरून हल्लीं पाठविली आहे. रा॥ व्यंकटरावदादा घोरपडे इचलकरंजीकर बेडगेस येऊन निरोप सांगोन पाठविल्याचें लिहिलें तें कळलें. महादाजीपंत दातार यानीं चंडूर व शिदापूर व इंगळगांव येथें रोखे केल्याचें लिहिलें व माघारे टाकावयाविशीं लिहिलें तें कळलें. रोखे परिछिन्न धरूं नयेत अशी ताकीद गांवकरांस करावी. म॥ निल्हेस तुम्हीं पत्र लिहिलें होतें त्याचें उत्तर काय आलें तें कळवावें. राजश्री बापूजी नारायण परवां आपले चिरंजीवसुद्धां येथें आले. त्यांजबरोबर कांहीं राऊत व प्यादे आहेत ते चाकरीस........त्यांत कापड असेल त्यापैकीं तेथील खर्चापुरतें ठेवून घेऊन बाकी चिरंजीवांबरोबर पाठवून द्यावें. पथकाकडे खर्च होऊन बाकी राहील तें हुजरातेकडे मांडून द्यावयास येईल. पैका उगवून घेऊं. तर कापड जरूर मांडून जें द्यावयाचें असेल तें पाठवून द्यावें. फौजेस खर्च होऊन राहील तें हुजरातीकडे देऊं. महादाजीपंत दातार यांणीं रोखे केले

१ फडणीस निसबत इचलकरंजीकर. यानीं आपल्या यजमानाच्या देशमुखी हक्काच्या ऐवजाबद्दल मिरजेस सुभ्याकडे मागणी करावी तें न करितां आपल्याच जोरावर परभारें गांवगन्ना रोखे केले होते. २ हरिहरराव पांडुरंग यांजबरोबर. हे मिरजेहून भाऊंच्या लष्करास यावयाचे होते.

म्हणून लिहिलें, त्यास जे स्वार रोखे घेऊन येतील त्यांसच अडकवावें ह्मणजे त्यांस उमजेल ! महादाजीपंत दातार ह्मणजे कोण, आणि रोखे करितात ! असो. पांचशें स्वार तुम्हीं तेथें ठेवावे त्यांपैकीं तीनशें-पावेतों तेरदाळास पाठवावे म्हणजे तेथील बंदोबस्त राहील. बाकीचे तीनशें आपणाजवळ ठेवावे म्हणजे कांहीं फिकीर नाहीं. त्या प्रांताचा बचाव चांगला होय असें करावें. दोन चार हजार खर्च पडला तरी मागें घेऊं नये. ( पुण्याची फौज ) त्या रोखें आल्यास मग गुंताच नाहीं, परंतु येसाजी शिंद्याचें पारिपत्य करावें या अर्थें त्याच वाटेनें जातील असें वाटतें. यादवाडचें ठाणें देतों म्हणून नारोपंत भावे शहापुरचे फडणीस येथें आले होते. परंतु लबाड कारभार ! पांच हजार रुपये द्यावे म्हणत होते. आह्मीं कबूल केलें नाहीं. या उपरी मागील रंग पाहून ठाणें आपणच होऊन देतील असें वाटतें. चिरंजीवांचीं पत्रें भेट जाहल्याचीं मात्र आलीं होतीं. अलीकडे पत्रच नाहीं. आज उद्यां येतील तर सविस्तर लिहितों. निंबाळकरानीं तर लबाडी केली, परंतु मुरारराव यांजवर नजर द्यावी आणि त्यांची खासगत वस्तभाव घोडीं उंटेंसुद्धां सोडून द्यावी......चिरंजीव रा॥ जिउबा पुण्याहून आला ह्मणोन लिहिलें तें कळलें. शिक्केकटयार त्याबरोबर येणार होती ती आली कीं नाहीं तें लिहून पाठवावें. नसल्यास चिरंजीवास सूचना ल्याहावी. त्या प्रांतीं फौज येणार त्यास शहापूर तालुक्यांत वगैरे ठाणीं बसवावीं. जशजशीं ठाणीं बसत जातील तसतसे तेरदाळचे स्वार पुढें पुढें तोंडाशीं ठेवावे. यादवाड, पुढें शहापूर प्रांत, असें समजोन करावें. बहुत काय लिहिणें. चिरंजीवांची रवानगी लौकरच करावी. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचीं. हे तळेगांवास कारभारी, शिंदे, फडके यांचें लष्कर होतें तेथें होतें.

नं. २४७६. ( माघ व० ३–३ फेब्रुवारी. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस रवाना छ० १९ मोहरम. मुक्काम गुब्याड परगणे आलमेलें येथून—

" सुरापुराकडील व्यंकापा सात आठशें स्वारांनिशीं येथून पांच सहा कोसांवर आला होता. कहीवर लाग बसवावा असें त्यानें योजिलें होतें. ती बातमी आह्मांस कळल्यानंतर कहीबरोबर फौज रवाना केली. फौज त्या सुमारें गेली तों ते अगोदरच निघून गेले होते. परंतु पेंढारी दोन हजारपर्यंत दोन कोस ( पुढें ) गेले तों त्याची गांठ पडली. त्याचा मुक्काम होत होता तों गांठ पडली. पांचशेंपर्यंत घोडे व पांच सात उंटें व अबदागिरें दोन चार याप्रमाणें पाडाव आलीं. याखेरीज गुरें बैल वगैरे हजारपर्यंत लूट झाली. शंभर राउतांनिशीं व्यंकापा पळून गेला. श्रीमंतांचे प्रतापें सहजांतच काम जालें. काल ७ मोहरमचें राजश्री भिवराव पानशे यांचें पत्र आलें त्यांत लिहिलें आहे कीं, " श्रीमंत दादासाहेबांस झांशीस ठेवावें; १० लक्षांची जहागीर नेमून द्यावी; याप्रमाणें निश्चयांत येईल असें आहे. हें जालियानंतर उभयता सरदारांस हिंदुस्थानांत रवाना करून उभयतां कारभारी कर्नाटकचे मसलतीस येणार. "

नं. २४७७. श्रीगणपति. ( माघ व० ३–३ फेब्रुवारी. )

पै॥ छ० १८ मोहरम. तिस्सा सबैन. माघमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. तीर्थस्वरूप राजश्री भास्करपंत आपाचा मजकूर " राजश्री विष्णुपंत कुरुंदवाडाहून आल्यानंतर मागील कागदपत्र पाहोन सोईनें खर्चास देवितों " ह्मणोन लिहिलें, उत्तम आहे. तुमची वोढ तर आहेच. वडिलांचे वोढीचा प्रकारही तुमचे ध्यानांत आहेच. ल्याहावें असें नाहीं. मागील

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजस.

कागदपत्र पाहून फडशा करून देऊन वडिलांची पागा लावून द्यावी. चिरंजीव राजश्री रघुराथरावदादा येथें काल दोन प्रहरां आले. बरोबर राजश्री शिवाजीपंतही आले आहेत. चिरंजीव राजश्री हरिहरराव कालच अदकोसावर येऊन राहिले होते. काल चिरंजीवाचें जन्मनक्षत्र यास्तव भेट घेतली नाहीं. आज चिरंजीव येथें आले. भेट जाहली. आज पांच सहा दिवस उभयतां चिरंजीव येणार याजमुळें मुक्काम केले. आज येथून कूच दोन कोसांचें केलें. मुरगानुरचे मुक्कामास गेलों. उद्यां भीमेवर जातों. राजश्री शहाजी भोंसले यांजवर सरंजामाचे चवथाईचे ऐवजीं सरकारांतून रदकर्जास आम्हांस ऐवज देविला आहे, त्याचा निर्गम होणें व किरकोळ अबदुलपूर वगैरे मोगलांचाही तालुका आहे तेथें घांसदाणा चार रुपये घेणार; अद्याप सुरापुरचा फडशा जाहला नाहीं. वकील बोलोन याद घेऊन संस्थानास गेले. आज उद्यां येतील. ठरेल तें मागाहून लिहून पाठवितों. सुरापूरचा गुंता उरकल्यानंतर कलबुर्गेवरून गदवाल, रायचूर प्रांतांत जावें असें आहे. रास्ते फलटणचे सुमारें आले होते. आजला पंढरपूरचे आसपास आलेच असतील. तेही लौकरच येऊन सामील होतील. आतां फौजेचा जथ चांगला पडला. अलीकडे चिरंजीव राजश्री दादा पुणियाहून निघाल्यानंतर तिकडील पत्र आलें नाहीं. अद्याप कारभारी यांचा मुक्काम तळेगांवाअलीकडे आहे तेथेंच आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस झांशीस ठेवावें असें निश्चयांत आलें आहे. पुरंधरास कारभारी येऊन उभयतां सरदारांस हिंदुस्थानांत जावयास निरोप देऊन आपण कर्नाटकांत यावें असें आहे. घडेल तें खरें. रामरावजी शेंडगे व सुलतानजी शेंडगे व बाबूराव सलगर उभयतांच्या व पोटेचे[1] लोक असतील त्यांचे देखील तैनातजावत्यांच्या नकला करून पाठवून द्याव्या. अथणीकर राजश्री विनायकपंत आले आहेत. त्यांचीं कांहीं ठाणीं कृष्णातीरास बेरडानें

१ सदरहु शिलेदारांच्या निसबतींचे.

घेतलीं आहेत तीं घेऊन द्यावयाविशीं बोलावितात; परंतु तूर्त तिकडे जात नाहीं. लष्करांत सवंगाई चांगली आहे. सुरापूरकराचा मुलूख या तोंडचा अगदीं उजाड आहे. वस्ती नाहीं. पीक आहे याजमुळें लष्कर आबादान आहे. अंबारी लग्नास तासगांवास गेली आहे म्हणोन चिरंजीव राजश्री हरिहरराव यांणीं सांगितलें. त्यास हत्ती तासगांवाहून चिरंजीव राजश्री आपाबरोबर येत आहे त्याच हत्तीवर अंबारी इकडे आणावयाविशीं तासगांवास चिरंजीवास लिहोन पाठवावें ह्मणजे घेऊन येतील. चिरंजीवाबरोबर दोन चिठ्या पाठविल्या त्या पावल्या. "डेऱ्यास येऊन रहावें. चिरंजीव नेणते आहेत. सर्वप्रकारें शहाणे करावे" म्हणोन लिहिलें, त्यास चिरंजीवाविशीं चिंता किमपि न करावी. डेऱ्यास तूर्त जाऊन रहावें तर चिरंजीव राजश्री आपा येथें नाहींत, यास्तव प्रस्तुत दोनी डेरे हातघोंडयांचे अंतरानें जवळच बाजूस देऊन राहतों. येथील फिकीर न करावी. कापडाचा मजकूर तुह्मीं लिहिलेप्रमाणें सवाई नफा धरून आंख मांडवितों. लग्नकार्य करून आलांच असाल. सविस्तर ल्याहावें. चिरंजीवाबरोबर राजश्री शिवाजीपंत आले. घरास जावयास निरोप मागतात. "कोंकणांत जाणार, नवस आहे." म्हणत होते. अमावास्या जाहल्यावर निरोप देऊं ह्मणोन सांगितलें आहे. जरूर मागितल्यास निरोप देतों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४७८. श्रीगणराज. ( १९ फेब्रुवारी. )

तीर्थस्वरूप राजश्री गंगाधररावकाका वडिलांचे सेवेशीं. अपत्यें श्रीपतीनें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ माघ वद्य चतुर्दशी पावेतों

---

१ सांवशीच्या लढाईत शत्रूकडे पाडाव झालेले व हल्लीं श्रीरंगपटणास कैदेंत असलेले श्रीपतराव मोरेश्वर यांचें हें पत्र. अमुक दिवसांत खंडाची रक्कम देतों अशी सावकार राघवेंद्र नाईक नकाते यांची हमी दिल्यावरून हैदरअल्लीनें यांची तूर्त अर्धवट सुटका केली होती.

समस्त मंडळीसह वर्तमान सुखरूप असों. विशेष. रा॥ काका यांस जाऊन दोन महिने जाहले. अद्यापि वृत्त कांहींच कळलें नाहीं त्याजवरून अहर्निश चिंता लागली आहे. येथील वाइदा दोन मासांचा केला होता तोही जाहला. सावकार आमची वाट काय म्हणून वारंवार पुसतो. अशी गत जाहली. मीं तर वडील यांच्या भरंवशेवर अब्रू जाऊं लागली, आतां परीस मला नाहीं, असें पाहून कबूल केलें. आतां वडिलीं अव्हेर केला तर अब्रू जाऊन जिवानिशीं जातों! काकासाहेब! याचा विस्तार मी कोठवर लिहून दर्शवूं! तेथून भरणा होत नसला तर या पत्राचे अन्वयें गुप्त मार्गें करून उत्तर पाठवावें ह्मणजे अब्रू जाऊन प्राण जाणार तों आह्मीच प्राण देऊं! परंतु अब्रू गमावून घेणें माझ्यानें होत नाहीं. हें पत्र अंतींचें असें समजावें. जीवदान द्यावयाचें असेल तर द्यावें. नाहींतर तसेंच ल्याहावें. या उपर काय तें सत्वर करावें. अंत पाहूं नये. काकासाहेब! तीन वर्षें वडिलांचे भरंवशेवर दृष्ट ठेवून अनुक्रमिलीं. शेवटीं अब्रू जाऊं लागली असा प्रसंग पाहून कबूल करणें प्राप्त जाहलें. असें असतां असा प्रकार जाहला तर वडिलांकडे काय आहे! आम्हीं हतभाग्य म्हणून असा प्रकार घडला! या उपर सुटकेच्या पत्राची वाट पाहतों. दोहोंतून एक, होतें किंवा नाहीं, असें पत्र पाठवावें. होत नसलें तर घरदार सर्व आपलें आहे. तीं॥ मातोश्री बाईचा समाचार घेणेविशीं मीं काय लिहिणें आहे? सर्व आपलें आहे. नाहीं अतें पत्र आलेवर उत्तर देणें कठीण, यास्तव शेवटचें पत्र असें समजून लिहिलें आहे. तीर्थस्वरूप राजश्री भाऊ व रघुनाथरावदादा यांस माझा नमस्कार सांगावा. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

१ वासुदेवकाका पटवर्धन येथून मिरजेस.

नं. २४७९. श्रीगणपति. (माघ व० १०–१० फेब्रुवारी.)
पै॥ छ० २८ मोहरम, सन तिस्सा सबैन. माघमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० २२ मोहरम सौम्यवासर मुक्काम काचापूर प॥ सगर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष तुम्हीं छ० १५ मोहरमचीं पत्रें पाठविलीं तीं छ० २० मिनहूस मुक्काम मजकुरीं पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. रा॥ महादाजीपंत दातार यांस पत्र लिहिलेवरून त्यांनीं गांवगन्ना रोखे केले ते मना केले म्हणून लिहिलें तें कळलें. याउपर रोखे झाल्यास स्वारच धरून ठेवावे. त्यांची कथा काय ! कापड शिलकेस किती आहे याचा शोध करून मागाहून लिहोन पाठवितों ह्मणोन लिहिलें, त्यास शोध केलाच असेल व उंटेंही वाईस गेलीं तीं रिकामीं जालींच असतील. तेथील खर्चापुरतें कापड ठेऊन घेऊन वरकड चिरंजीव राजश्री आपाबरोबर पाठवून द्यावें. "येसाजी शिंदे व सटवोजी भोसले एकत्र जाले. मागुरूहून शिधगिरीस गेले. पाठलाग करून चिकोडीकर गेले असतां गांठ पडली नाहीं. चार खेडयांचीं गुरें वळून घेऊन माघारे आले. याउपर कोगनोळीस जाणार" म्हणोन लिहिलें तें कळलें. मातबर राजकारण लयातें पावलें. आतां किरकोळाचें अगाध नाहीं. खासा स्वारी तिकडून आल्यास पुरतेंच करवीरकरांचें पारिपत्य होईल. लग्नास तासगांवास जातों ह्मणून लिहिलें, त्यास जाऊन आलांच असाल. लग्नाचें वर्तमान सविस्तर ल्याहावें. वऱ्हाडी माघारे गेल्यानंतर चिरंजीव राजश्री आपाची रवानगी करून द्यावयाविशीं तीर्थरूप मातुश्री वाईस लिहिलें आहे. "राजश्री रामचंद्र दीक्षित यांचे चिरंजीवांचे लग्नाबरोबर तीर्थस्वरूप मातुश्री साळूआक्का व वहिनी कुरुंदवाडास गेलीं आहेत. व तीर्थ-

---

१ पत्र गंगाधररावांस मिरजेस. २ इंग्रजांनीं पुण्यावर स्वारी केली ते. ३ उभयतां कारभाऱ्यांची स्वारी.

स्वरूप राजश्री बापू उभाउभी येऊन भेटून समुदावसह लग्नास कुरुंदवाडास गेले." ह्मणोन लिहिलें तें कळलें. दोन्ही कार्यें उरकलींच असतील. राजश्री शिवाजीपंत यांचें पत्र तुम्हांस आलेलें पाठविलें तें पावलें. "राजश्री राणोजीराव निंबाळकर यांस सोडून दिलें. त्यांचीं घोडीं उंटें वांईस गेलीं आहेत. आल्यावर चीजबस्तसुद्धां सोडून देतों." ह्मणोन लिहिलें, उत्तम. घोडीं उंटें वांईहून आलींच असतील. सोडून द्यावीं. तीर्थस्वरूप मातुश्री काशिकाकींनीं मूल पहावयास कारकून वांईस पाठविला आहे व जिवाजी गोपाळ यांच्याही मुलांचा शोध करून लिहोन पाठवावयाविशीं बापू जोशी यांस लिहिलें आहे ह्मणोन लिहिलें, "त्यास आजला दोहींकडील उत्तर आलेंच असेल. कोणता मूल निश्चयांत आला तें लिहून पाठवावें. तेरदाळपैकीं तीस हजार रुपये वसूल आले ते सालगुदस्त पैकीं. त्यांत सालमजकूरचा पैसा दंग्यामुळें लावणी मागाहून जाहली, व नापीक, सबब निम्मे आकार होईल. सालमजकूरचा वसूल चालीस लाविला आहे. ऐवज येईल तो लष्करास पाठवून देतों" ह्मणोन लिहिलें तें कळलें. पेशजी लिहिलेप्रमाणें सालमजकूरचे ऐवजाच्या झाडा वेगळाच कीर्दीस जमाखर्च न करितां राखावा. "पा॥ मजकूरचे देसाई यांजकडे नजरेबद्दल पसतीस हजार रुपये करार केले. निशा नाहीं. हप्तेबंदीप्रमाणें द्यावें असें केलें आहे;" म्हणून लिहिलें तें कळलें. कराराप्रमाणें ऐवजाची निशा घ्यावी आणि यादीचा ठराव पेस्तरसालीं करावा. "रामजी चव्हाण व शेख इमाम यांस रोजमरा काय पावत होता व बहादरखान गोरी यांस रोजमरा दस रोजां किंवा पंधरवडा" ह्मणोन लिहिलें, त्यांस सन सब्बाचे कागदपत्र येथें नाहींत. येविशीं तासगांवास लिहोन पाठवून तेथून शोध आणवावा. सरंजामी याचा मजकूर लिहिला कीं, "चौथाई

---

१ हैदराच्या दंग्यामुळें.

व निम्मेचा फडशा करून द्यावयाविशीं तगादा लावितों, परंतु अखेर सालपावेतों निभावून न्यावें; पेस्तर फडशा करून घ्यावा; हें ठीक दिसतें;" ह्मणोन लिहिलें, उत्तम आहे. येथें सरंजामी चिरंजीव राजश्री हरिहरराव यांजबराबर आले आहेत त्यांस आम्ही बजावून ठेवितों. व तेथें असतील त्यांस बजावून सोडावें. तुमचे विचारें तूर्त अखेर सालपावेतों तगादा करूं नये, तसेंच करावें. पेस्तरसालीं क्षेप निक्षेप तगादा करावा. तूर्त चौथाई येईल त्याजपासोन निकाल करून घ्यावा. निम्मेचा तगादा पेस्तर करावा. सारें एकदांच म्हटल्यास भारी दिसतें हेंही प्रमाणच आहे. " फडशाच्या वराता आजपर्यंत झाल्या त्यांपैकीं करकंब, मंगळवेढें येथें ऐवज देविला तो वजा होऊन बाकी मिरजेंत आदा जाहला. अद्यापि पन्नास साठ हजार रुपये देणें राहिलें आहे." ह्मणोन लिहिलें तें कळलें. ओढीचा प्रकार कितेक लिहिला तें प्रमाणच. यंदा फडशा केल्याप्रमाणें लोकांस ऐवज पावेल व पुढें पत राहील असा भरंवसा राजीक[1] पहातां नव्हता. परंतु ईश्वरें निभावलें! बरें! सर्व चिंता श्रीस असावी. आमचे काळजीनें काय होणें! सर्व भार श्रीगजाननावर आहे. तूर्त तर कर्जाशींच संबंध पडला आहे. श्री पार पाडील. चिंता न करावी. म्हैसाळकर शिंदे व आनंदराव शिंदे यांस चिरंजीव राजश्री आपाबरोबर पाठवून द्यावें. चौदा हजार रुपये दरमहा खर्च आहे म्हणोन लिहिलें, त्यास स्वारांचा खर्च तर पाहिजेच, आणि ठेवावा. कांहीं प्याद्यांचा खर्च कमी करावा. सरंजामी पथकें तेथेंच ठेविलीं. बाकी राहिलीं तीं पाठवून द्यावीं. गणेश बाजीराव यांचें पथक पागा येथून पाठविली. त्यांचे निसबतीचे लोक चिरंजीवाबरोबर येथें आले त्यांसह लावून द्यावे किंवा यांचे मोबदला तेथून दुसरे पाठविणार हें ल्याहावें. पांचशें चारशें स्वार ठेवून बाकी झाडून लावून

१ राजकीय स्थिति. २ कुर्लेकर. मिरजसंस्थानांत कुर्लेकर हे पोटसरंजामदार आहेत.

द्यावे म्हणजे परभारें तूर्त खर्च चालेल. काहीं तेरदाळपैकीं वसूल आला म्हणजे लावून द्यावा. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४८०. (१७ फेब्रुवारी )

परशुरामभाऊचें मिरजेस गंगाधरराव यांस पत्र. रवाना फाल्गुन शु॥ १. पै॥ ५ सफर. मुक्काम नेलवगी परगणे सगर, भीमातीर, येथून—

" चिरंजीव हरिहरराव लष्करांत येऊन पावल्याचें लिहिलेंच आहे. सुरापूरकरांचा या लगत्याचा मुलूख गांवखेडीं जाळूनपोळून ओस केलीं. तरी अद्यापि सुरापूरकर ध्यानावर येऊन बोलत नाहीं. रास्त्यांकडील आनंदराव जिवाजी विजापूर तालुक्यांत आले. लवकरच येथें येतील. सुरापूरकरांचें उरकल्याशिवाय मागें पुढें जातां नये, यास्तव भीमातीरास गेलों. नदीपलीकडे आबदुलपूर व कलबुर्गे वगैरे मोंगलांचा तालुका आहे त्यांत घांसदाण्यांचे रोखे केले आहेत. हैदरखानानें माघ व॥ ५ स चित्रदुर्ग घेतलें, राजा हस्तगत जाला, म्हणून दोहों चोहोंकडून तहकीक वर्तमान आलें. इलाज नाहीं ! दुर्गकर आज दोन वर्षें हिमतीनें लढले, परंतु त्यांस इकडून कांहीं कुमक न जाली; यामुळें सर्व प्रयत्न व्यर्थ जाले. उपराळा नाहीं तेव्हां त्यांचा तरी काय उपाय ? बहुत दिवसांचें संस्थान दुष्टाचे हातीं लागलें ! ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. "

नं. २४८१. ( फाल्गुन शु० १–१७ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र–पै॥ छ० ५ सफर—

" सांडणीस्वारांबरोबर राजश्री नानाचीं पत्रें आम्हांस आलीं त्यांतील भाव " श्रीमंत राजश्री दादासाहेब यानीं झांशीस रहावयाचा निश्चय झाला. पांच सात लक्ष रुपये सालास खर्चास द्यावे. बंदोबस्त (आह्मी) उभयतां कारभारी यांचा तेथें असावा असें ठरलें. दोहों चोहों

दिवशीं रवानगी होणार. राज्याशीं याउपर आपला संबंध नाहीं असें दादासाहेब यांजपासून लिहून घेतलें. आणखी पांच सात हजार फौज तुह्मांकडे पाठवून देतों ह्मणजे दुर्गाचा[1] उपराळा होईल कीं नाहीं ! " असें लिहिलें आहे. त्यास आह्मीं उत्तर दिलें कीं, "दुर्ग तर गेलें. आतां हैदरखान हांवभरी होऊन तुंगभद्रेअलीकडे येईल, यास्तव खासा स्वारी कोल्हापुरावरून पुढें कित्तूर तालुक्यांतून कर्नाटकांत तुंगभद्रा-तीरास लौकर यावें, व उभयतां सरदारही[2] समागमें असावे, म्हणजे दाव चांगला पडेल; " असें लिहोन पाठविलें आहे. "

नं. २१८९. श्रीगणराज. (फाल्गुन शु० ४–२० फे०)

यादी. सुलतानजी बिन बाळोजी पाटील साळोंखे का॥ कवठें महांकाळ यांत व राणोजी बिन येसाजी बेडे साळोंखे पाटील कसबे मजकूर यांत वडील धाकटेपणाचा कजिया लागोन हुजूर फिर्याद आले. त्यांचा इनसाफ पंचमतें होऊन सुलतानजी बिन बाळोजी सा-ळोंखे पाटील वडील नांगऱ्या ठरला. राणोजी बिन येसाजी बेडे सा-ळोंखे पाटील निमेचा भाऊ धाकटा ठरला. नांगराविशीं कजिया सांगत होता तो खोटा जाहला. सुलतानजी बिन बाळोजी पाटील साळोंखे याचें वडीलपण खरें जाहलें. सबब सुलतानजी बिन बाळोजी पाटील याचे नांवें पत्रें—

१ देशमुख व देशपांडे.
१ मोकदमाचे नांवें.
१ सुलतानजी बिन बाळोजी याचे नांवचें.
१ कमाविसदार.

—

४

चार पत्रें लिहोन देणें.

छ० ३ सफर. फाल्गुन मास. सन तिस्सा सबैन.

---

1 चित्रदुर्गास हैदरानें वेढा घातला होता त्याची. 2 शिंदे होळकर.

नं. २४८३. ( माघ व० ७–७ फे० )

करकंबच्या ठाणेदाराचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस पै॥ छ० २१ मोहरम तिस्सा सबैन माघ मासचें—

" इंग्रजांचा पराभव श्रीमंताचे कृपेंकरून जाला. हैदराची फौज चित्रदुर्गावर येऊन बसली आहे. दुर्गकर हिमतीनें लढतात. सरकारच्या फौजाही लवकरच तिकडे येतील म्हणून लिहिलें तें कळलें. "

नं. २४८४. श्री. ( फाल्गुन शु० ८–२४ फे० )

पै॥ छ० १० सफर. सन तिस्सा सबैन. फाल्गुन मास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं—

पोष्य हरी बल्लाळ. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ० ७ सफर. जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन बहुत संतोष जाहला. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. दुर्गाकडील वर्तमान कळलें त्यास दुर्गकर पेंचांत आले, यामुळें कर्नाटकचे मसलतीस मोठा पेंच पडला. त्याणीं शर्त करावयाची ती केली; परंतु सरकारांतून उपराळा जाहला नाहीं ! असो. इकडील वर्तमान तर उभयतां सरदारांस निरोप जाहला. यानंतर कर्नाटकच्या मसलतीचा उद्योग त्यास दिवस राहिले नाहींत. व मागील पैका देणें फार यामुळें गवगवा आहे. आतां चार रोजांत निश्चय होईल तो आपणास लिहून पाठवूं. इंग्रजांनीं तह करून मुंबईस गेले. आतां बेबदल गोष्ट 'कलकत्त्याचा हुकूम पाहिजे,' म्हणतात ! हिंदुस्थानांतून इंग्रज येत होते ते सुरतेस गेले. श्रीमंत राजश्री दादासाहेब झांशीस जातात. समागमें सरदारांची फौज आहे. वरकड चिंतो विठ्ठल, खरगसिंग, आदिकरून येथें राहिले त्यांचा काय विचार

१ फडके. २ शिंदे होळकरास हिंदुस्थानांत जावयास. ३ जनरल गाडर्ड.

ठरेल तो मागाहून लिहून पाठवूं. आपणाकडील व राजश्री भाऊंकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. बहुत काय लिहिणें कृपालोभ कीजे हे विनंति.

नं. २४८५. ( फाल्गुन शु० १३–२८ फे० )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र छ० ११ सफरचें. मुक्काम नेलवगी परगणे सगर, भीमातीर, येथून—

" सुरापूरकर अद्यापि नीट बोलत नाहींत. तालामाला पहातात लबाडींत आहेत. रास्ते यांची फौज जथ करजगी तालुक्यांत आहे ती अद्यापि आम्हांस येऊन मिळाली नाहीं. येथें आज दहा बारा मुक्काम जाले. याचें कारण आबजलपूर कलबर्गें येथें घासदाण्याचे रोखे करून कांहीं ऐवज घेतला. सुरापूर तालुका तर मारून ताराज केला. बेरडाकडील तालुक्याचें गुढें[1] मोंगलाचे तालुक्यांत आहे त्याचाही शोध करून येईल तें पहात आहों. बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांजकडून पुण्याहून पत्रें येऊन चार दिवस जाले. अद्यापि श्री॥ रा॥ दादासाहेबांची रवानगी झांशीस जाली नाहीं. अमृतराव यांचें लग्न जालें. ( दादासाहेब ) आपलेंही लग्न करणार. दुर्ग गेल्याचे पूर्वीं[2] विसाजीपंत आठवले व बाजीपंतअण्णा यांजबरोबर सात आठ हजार फौज कारभारी आम्हांकडे पाठविणार होते. आतां काय करितात पहावें ! "

नं. २४८६. ( फाल्गुन व० ४–६ मार्च. )

परशुराममाऊंचें गंगाधररावांस पत्र. पै॥ छ० २४ सफर. फाल्गुनमासचें—

" छ० ९ सफरचें पत्र राजश्री नानाचें कालच छ० १६ मिनहूस आलें त्यांतील अर्थ " राजश्री बापूंची चिठी इंग्रजांचे प्रकर्णांतील

---

१ गुढें अथवा गुळें ह्मणजे पळून गेलेली रयत. २ चित्रदुर्ग हैदरअल्लीचे हातीं जाण्यापूर्वीं.

फितव्याची सांपडली. याजमुळें बापूंस कैद करून सिंहगडास पाठविलें. पुढें फौजसुद्धां राजश्री आपा बळवंत यांची रवानगी केली आहे. महादेवावर त्यांचा मुक्काम आहे. सरदारांशीं बोलावयास आपणास चार दिवस लागतील." म्हणोन लिहिलें आहे. बजिन्नस पत्राची नक्कलच करून पाठविली आहे त्यावरून सर्व कळेल. वाईट गोष्ट जाली ! चांगला कर्ता पुरुष होता. परंतु खेळ न जात, त्याजमुळें हें प्राप्त जालें. होणार सुटत नाहीं ! तिकडेही वर्तमान कळलेंच असेल. चहूंकडील बातमी राखून सावध असावें. आजपावेतों उभयतांहीं ( कर्नाटकच्या स्वारीस ) यावें असें होतें. त्यास आतां तर असें घडलें, पुढें काय मनसबा करितात पहावें. एक वेळ सरदारसुद्धां येऊन हैदरास तंबी बसती म्हणजे ठीक पडतें. श्रीइच्छेनुरूप घडेल. याउपर खासे येतील असें तर नाहीं. परंतु कांहीं फौजा आल्या तर न कळे."

नं. २४८७. **श्रीपांडुरंग.** ( फाल्गुन व० ९–११ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

सेवक आनंदराव शेषगीर. मुक्काम नजीक सासवड दोनीकर जोडून साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता॥ छ० २२ सफर जाणून स्वानंद लेखन आज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष. प्रस्तुत इकडील वर्तमान—

१ श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा मुक्काम पारनेर येथें आहे. मजल दर मजल टोंक्यास जाणार. बरोबर उभयतां सरदारांची फौज चार हजार व हरी बाबाजी यांस तेथील अखत्यार सांगून येथील

१ श्रीमंत राजश्री रावसाहेब[१] यांचा व्रतबंध करावा ऐसें आहे, त्यास नारोपंत पोंक्षे यांस वेदशास्त्र संपन्न राजश्री रामशास्त्रीकडे पाठविलें. तेथून मुहूर्तबळानुसार यथास्थित घडून आल्यास वैशाख

१ पेशवे.

आज्ञेप्रमाणें वर्तावें असे बेत करून रवांनगी जाहली आहे. श्रीमंतानीं स्नानसंध्या करून स्वस्थ असावें. कारभारसंबंध करणें नाहीं. कलम १

१ होळकराची छावणी वाफगांव अगर चांदवड येथें चातुर्मास पर्जन्यकाल करणार. कलम १.

१ अखेरचे दिवस समीप आले. अमित्राचें[1] पारिपत्य यथास्थित होणार नाहीं. मसलतीवर गोष्ट पडेल. याजकरितां फौजेस निरोप देऊन शंभूमहादेवानजीक राजश्री आपा बळवंत आहेत त्यापैकीं पांच हजार फौज राजश्री भाऊंकडेस रवानगी करणार. कृष्णेच्या आसपास छावणी करून असावें असें आहे. कलम १.

१ सुरापुरचे संस्थानाकडून वकील येथें आला आहे. माधवराव शु॥११ एकादशीचा मुहूर्त घडेल. शास्त्रिमतास नये तरी करणें नाहीं. कलम १.

१ शिंदे तुळजापुरास देवीच्या दर्शनास जाणार. तेथून छावणीच्या सुमारास बराणपूर येथें करावें ऐसें होत आहे. कलम १.

१ सखारामपंत यांचा फौजेचा व जातीचा सरंजाम कुल सरकारांत जप्तीस येऊन मामलेदार एक दुसरे उभे करून त्यांचे हवाली केला. घर व पागा, कोठी व दाणा वगैरे याची चौकशी राजश्री बाळाजीपंत ठोसर व पांडुरंगराव गोडबोले यांजकडे सांगितलें आहे. रोजच्यारोज मोजदाद होती. तूर्त तेरा उंट भरून कापड व नक्त, कांहीं मोहरा, जामदारखानेस दाखल जाहलें. ऐवज पुरता झाडा नाहीं. येकंदर आकार जाहल्यावर लिहून पाठवूं. कलम १.

१ भिवराव यशवंत पानसे यांचे शरीरास समाधान नव्हतें.

---

[1] हैदरअल्ली.

जाधवराव यांजकडून बोली लाविली आहे. बहुतएक येयून कारारमदार खंडणीचा होऊन राजश्री भाऊंस पत्रें जातील कीं यांचा फडशा करून द्यावा ऐसें आहे. सिद्धांत नाहीं. कलम १.

फाल्गुन वद्य ६ षष्ठी सोमवारीं प्रातःकाळीं मृत्यु पावले. वाईट जाहलें. श्रीमंत राजश्री नाना व तात्या व शिंदे समाचारास गेले होते. या उपरी काय होईल तें पहावें. कलम १.

येणेंप्रमाणें आढळलें सविस्तर स्वामीस कळावियाकारितां सूचनार्थ लिहिलें असे. मुख्य गोष्ट अमित्राचीं पारिपत्यें तूर्त होणें राहिलें. बाजतबरयात मातबर फौज सरंजाम जाऊन पारिपत्य होईल. श्रीमंतांचा प्रताप विशेष आहे. अमित्र परस्परें लयातें पावतील. सेवक पदरचा ऐसें जाणून कृपा करीत असावें. आपल्या छायेस नांदणूक करून सुख संतोषें असों. विशेष काय लिहिणें. लोभ करीत असावें. हे विज्ञापना.

नं. २४८८. **श्रीगणपति** (फाल्गुन व० १३-१९ मार्च.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. ( तुम्हीं ) हस्ताक्षरें पुरवणी पत्र पाठविलें. " वृद्धास शिंद्यानीं कैद करून सिंहगडास रवाना केलें. असें शिंद्यानीं केलें तेव्हां पुढें कसें, दस्तऐवज काय कसा सांपडला, " ह्मणोन लिहिलें, त्यास बापूस कैद केल्यानंतर राजश्री नानाचें पत्रच आम्हांस आलें होतें त्याची नक्कल परवांचे जोडीबरोबर पाठविली आहे. पावली असेल. नानाच्या लिहिण्यांत चिठी सांपडली इतकेंच लिहिलें आहे. मजकूर काय हें लिहिलें नाहीं. त्याजवर बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचीं पत्रें आलीं, त्यांतील भाव— " विनंति उपरी म्हणोन बापूची चिठी चितो विठ्ठल यास इंग्रज

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस. २ ' विनंति उपरी ' या शब्दांनीं जिचा प्रारंभ अशी. बाकी नांव, गांव, कोणी कोणास लिहिली, तारीख, वार हें कांहीं लिहिलें नसलेली.

चढाई करून घांटावर आले तेव्हां लिहिलें कीं, " दक्षिणेकडे सूचना केली आहे. आम्ही पाय पसरून बसलों आहों. अशांत जलदी कराल तितकी उपयोगी आहे " म्हणोन लिहिलेली चिठी शिंद्यांस सांपडली. मसलत शेवटास जाईतोंपर्यंत शिंद्यानीं अगोदर सांगितलेंच नाहीं ! पुरंधरास आल्यानंतर दस्तऐवज दाखवून सर्वेच कैद करून सिंहगडास रवाना केलें " याप्रो मा॥ निल्हेनीं लिहिलें आहे. काल छ० १७ सफरचीं पत्रें राजश्री भिवराव पानसे यांचीं आलीं त्यांतील मजकूर " वृद्धानीं श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस व चिंतो विठ्ठल यांस याप्रमाणें दोन चिठ्या फितुराच्या लिहिल्या होत्या त्याच बजिन्नस श्रीमंतानीं इकडे पाठविल्या. त्याजवरून ( बापूस ) कैद केलें, " असें लिहिलें आहे. व कर्नाटकचे बंदोबस्तास राजश्री नाना उभयतां सरदारसुद्धां येत आहेत असेंही लिहिलें आहे. आम्हांस छ० १३ सफरचीं पत्रें राजश्री नाना व हरीपंततात्यांचीं सांडणीस्वाराबरोबर आलीं त्यांतील मजकूर " अमित्रानें दुर्ग घेतलें, मोकळा जाहला, त्यापक्षीं सुरापूरचा जाबसाल लौकर विल्हेस लावून रिकामें व्हावें; म्हणजे करवीर व कित्तूर तालुक्यांत जाऊन जरब द्यावयास ठीक पडेल. राजश्री आपा बळवंत यांजबरोबर फौज महादेवाजवळ पाठविली आहे. दिवस तर मुलूकगिरीचे थोडके राहिले. मनसबा कसा करावा ? " असें कित्येक लिहिलें आहे. बजिन्नस पत्राच्या नकला करून पाठविल्या आहेत त्यावरून कळेल. नवी शिक्केकटार सरकारचे नांवची सांडणीस्वाराबरोबर आली आहे. सुमुहूर्ते शिक्का चालता केला. नबाबानीं तहवारजंग यांची रवानगी इकडे पांच सहा हजार फौज व तोफासुद्धां केली आहे. अक्कलकोट परगाणियांत आले म्हणोन बातमी आली आहे. जवळपास आलियानंतर कागदपत्रीं स्नेहाचे रीतीनें शिलशिला राखावा; प्रयो-

---

१ हैदरअलीनें चित्रदुर्ग घेतलें. २ हरिहरराव पांडुरंग यांचे नांवचा.

जन लागल्यास बोलावयास येतील; असें नबाबानीं व नबाबाजवळ राजश्री जिवाजी रघुनाथ वकील सरकारांतून आहेत त्यानीं व त्याच अन्वयें रा॥ नानानीं लिहिलें आहे. अद्याप जवळपास आले नाहींत. काल छ० २० सफरचीं पत्रें पुरंधराहून आलीं. “तीन लक्षपर्यंत सुरापुरचे वकील बोलतात. यासही जाजती तेथें बोलत असल्यास लिहोन पाठवावें. नाहीं तर ठराव करून निशा करून घेतों. याउपर वाढवूं नये. दुर्ग गेलें, हैदरखानाच्या फौजा रिकाम्या जाहल्या, त्या पक्षीं आपणही मोकळें व्हावें” असें लिहिलें आहे. बजिन्नस पत्राची नक्कल पाठविली आहे, त्यावरून कळेल. सगो निळकंठही आज येतील. तदोत्तर निश्चय ठरोन पुणियाचीं उत्तरें रवाना होतील. “राजश्री दौलतराव यांस गांव देतों. बाकीची वाट व सालमजकूरचा पैका आकाराप्रमाणें त्यांनीं द्यावा. तेथील कुरणही देतों. त्यानीं आसपास आमचीं कुरणें आहेत तेथें उपसर्ग देऊं नये.” म्हणोन लिहिलें तें त्यांस सांगितलें. आसपासच्या कुरणास उपद्रव लागणार नाहीं. सालमजकूरचा पैका आकाराप्रमाणें देतील. मागील बाकीही रुजुवार्तामुळें कुळारग वाजवी असेल ती वसूल करून देतील. मागाहून त्यांजकडील कारकून पत्र घेऊन येत आहे. गांव स्वाधीन करावा. चिरंजीव राजश्री धोंडोबा आबा व अण्णा कधीं निघाले हें लिहून पाठवावें. आमच्या रदकर्जाचे ऐवजीं राजश्री शहाजी भोसले यांजवर सालमजकूरच्या कर्जपट्टीच्या ऐवजीं वराता दिल्ह्या आहेत. त्यास पावणेचार लक्षांची कमकसर वरात आहे. परंतु दोनपर्यंत विल्हेस लावावें असें आमचें मानस आहे. यांत हरिसत्ता! ठरेल तो प्रकार मागाहून लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे आशीर्वाद.

---

१ निजामअल्लीनीं. २ घोरपडे गजेंद्रगडकर. ३ अकलकोटकर.

नं. २४८९. (फाल्गुन व० १३-१५ मार्च.)

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र —

" राजश्री नानाचीं पत्रें छ० २० सफरचीं काल्च रविवारीं सांडणीस्वारावरोवर आलीं. " भिवराव पानशे यांस किंचित् आठ-चार दिवस समाधान नव्हतें त्यांस देवाज्ञा जाली. बरोबर स्त्री सती गेली. " म्हणोन लिहिलें आहे. ईश्वरें मोठी अनुचित गोष्ट घडविली. भिवराव कर्ता माणूस. यंदां इंग्रजाचे लढाईत फारच मेहनत त्यानीं केली होती. तसा मनुष्य होणें दुर्लभ. श्रीइच्छेस इलाजच नाहीं. येथें राजश्री राजाबा आहेत त्यांचें बहुत प्रकारें शांतवन केलें. भिवराव बहुत थोर, शहाणे, कर्ते, एकनिष्ठ सालमजकुरीं व गुदस्तां व तोतयाचे मसलतींत बहुतच मेहनत त्यानीं केली. गुदस्तां बहुता प्रकारें राजश्री नानाचे मसलतीस उपयोगी पडले होते. पुढेंही निष्ठेनेंच सेवा करावी असे माणूस ! परंतु आयुष्यमर्यादा पुरली त्यास इलाज नाहीं. मोठी धूरच या कालांत गेली. तोफखान्याचा बंदोबस्त चांगला राखीत होते. परंतु श्रीइच्छेस इलाज नाहीं. "

नं. २४९०. (फाल्गुन व० १३-१६ मार्च.)

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस रवाना छ० २८ सफर—

" लाली फिरंगी आजवर नबाब बसालतजंग यांजकडे चाकरीस होता. प्रस्तुत ( त्यानीं ) बरतर्फ केला, सबब उमेदवार होऊन पुण्याकडे जात आहे. येथून सहा कोसांवर उतरला आहे. बरोबर तुरुक स्वार पांचशें व गोरा शंभर दीडशें व गारदी व तोफा पांच सहा आहेत. सामान चांगलें आहे. आम्हांस त्याचें पत्र उमेदवारीचें आलें होतें, परंतु तें झट भारी ! पैक्याचा निभाव पडणार नाहीं. यास्तव ( चाकरीस ) ठेविले नाहींत. "

नं. २४९१. ( चैत्र व० २-३ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र छ० १५ रबिलावलचें. मुक्काम केरलूर. भीमा दक्षिण तीर येथून—

" पुरंदराहून परवां पत्रें आलीं. श्रीमंत राजश्री दादासाहेब टोंक्यापर्यंत गेले. पुढें जातील. रा॥ भवानी शिवराम यांची रवानगी पांच हजार फौजेनिशीं इकडे जाली. लौकरच दर मजल येणार. वरकड सरकारच्या फौजांस व उभयतां सरदारांकडील फौजेस निरोप देत आहेत. परंतु उत्तरेकडील इंग्रज सुरतेस दाखल जाले. अश्विनीकुमाराजवळ मुक्काम आहे. इंग्रजानीं लबाडी मांडिली आहे. सरकारच्या महालांस उपद्रव दिला आहे. आणि लढाऊ सामानही तयार करीत आहेत. कसा प्रसंग पडेल न कळे. यास्तव तूर्त सरकारचे फौजेस व उभयतां सरदार आपले फौजेस निरोप देत नाहींत, याप्रमाणें लिहिलें आहे. सुरापुरचा तह हुजूर वकील बोलत होते. त्यास हुजूर बेरीज ठरेल त्यापेक्षां जाजती चाळीस ( हजार ) द्यावे असा करार येथें सगो निळकंठ यानीं केला आहे. त्यास हुजूर तीन लक्ष तीस हजारांवर ठराव जाला. शिवाय चाळीस. येणेंप्रमाणें तीन लक्ष सत्तर हजार बेरीज ठरली. हप्तेबंदीप्रमाणें साहुकारी निशा द्यावी असें करारांत आलें आहे. हुजूर निशा पटल्यावर मग पैका आमचे हातीं येणें कळतच आहे ! यास्तव आह्मी येथेंच निशा घ्यावी ह्मणतों. चितापूर वगैरे मोंगलांकडील महालांचा घांसदाण्याचा फडशा व्हावयाचा आहे. त्यास सरकारचीं पत्रें आलीं आहेत कीं, मोंगलांचा व श्रीमंतांचा स्नेह. नबाब अंतःकरणापासोन या दौलतीची काळजी वागवितात. त्यापक्षीं त्यांच्या तालुक्यास एकंदर उपसर्ग देऊं नये. कांहीं ऐवज घेतला असेल तो माघारा द्यावा. " याप्रमाणें लिहून

१ पुण्यास पेशव्यांजवळ.

राजश्री नानानीं लिहिलें आहे यास्तव जरब देतां येत नाहीं. सोहल-तीनेंच होईल तेथवर पहात आहों. नबाबाकडील फौजही कलबुर्गे-नजीक आली आहे. कांहीं भागानगराहून बाळाजी केशव वगैरेही रवाना जाले आहेत. चिरंजीव राजश्री दादा आज चार दिवस सडे सगरचे पेठेवर गेले आहेत. कांहीं पेठ झाबडली. मातबर पेठ आहे. परंतु गुर्ढे सारें किल्ल्यावर गेलें आहे. येथून सगर दहा कोस आहे. दुर्गावर शत्रु अद्यापि आहे. तेथील बंदोबस्त पडझड होत आहे. खासा पट्टणास जाणार. कांहीं फौज कडपें कर्नोळाकडे व कांहीं तुंगाअली-कडे रवाना करणार. सावनूर, डंबळ, हरपनहल्ली, रायदुर्ग, कनकगिरी वगैरे लहान थोर संस्थानच्या खंडण्या जाल्या. याप्रमाणें बातम्या आल्या. प्रस्तुत हैदरखानाची कांहीं फौज अनेगुंदीजवळ आली आहे. अशीही बातमी आली आहे. आम्ही चोहोंकडे बातमी राखून सावध आहों."

नं. २४९२. **श्रीगणपति.** (चैत्र व०—एप्रिल प० पंधरवडा.)
सुरू सन तिस्सा सबैन.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसा आशीर्वाद उपरी. इकडील फडशा जाहल्यानंतर तिकडे यावें, शिरोळ एक वेळ घ्यावें, असें चित्तांत आहे. आम्हाबरोबर फौज भारी व एकहाती आहे. या फौजेस तें स्थल अगाध आहे असें नाहीं. इरेस्तव काम करणें जरूर आहे. यास्तव दारूगोळ्याची तरतूद चांगली पोक्ती असावी. मागाहून तिकडे यावयाचा निश्चय ठरवून लिहून पाठवितों. हें वर्तमान प्रगटांत आणूं नये. गुप्त असों द्यावें. घडेल तेव्हांच खरें. श्रीमंतांचा व्रतबंध होणार, काय पाठवावें लागेल, ह्मणोन लिहिलें, त्यास वैशाख शुद्ध पंचमीस व्रतबंध होणार. स्वारी जेजुरी व मोरेश्वर व थेऊर येथें जाऊन देव-

---

१ गुर्ळे. २ पत्र परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधररावांस.

दर्शन करून पुणियास जाऊन तेथें व्रतबंध करणार; ह्मणोन कालच बाळाजीपंत यांचीं पत्रें आलीं. त्यास ' पुणियास व्रतबंध करणें ठीक नाहीं. किल्ल्यावरच करावा, ' अशी सूचना लिहोन पाठविली आहे. कोठें करितात पहावें ! श्रीमंतांस अहेर चिरंजीव राजश्री शिवराव सुभेदार यांजबरोबर पाठवून द्यावा. तेथेंही चिरंजीव राजश्री बळवंतराव व हरीपंततात्या आहेतच. कोणी गेल्याशिवाय ठीक नाहीं. सुभेदारांस पाठवावें हें चिरंजीव राजश्री दादाचेही विचारास आलें. एक कंठी हजार रुपयेपर्यंत श्रीमंतांस पाठवावी. शिवाय एक झगा, टोपी, चोळणी व अंगवस्त्राबद्दल धोतरजोडा एक येणेंप्रों पाठवावें. तासगांवासही लिहिलें आहे. मिरजेहून रवानगी होईल तेव्हां तासगांवाहूनही रवानगी करावी. याखेरीज लुगडीं श्रीमंत सौ॥ पार्वतीबाई व मातुश्री सगुणाबाई व श्रीमंतांची आजी याप्रों तीन लुगडीं पाठवून द्यावीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४९३. **श्रीगणराज.** (चैत्र व० ३–४ एप्रिल.)

यादी राणोजी बिन येसाजी पाटील साळोंखे बंडे कसबे कवठें महांकाळ व सुलतानजी बिन बाळोजी पाटील कसबे मजकूर निमेचे पाटील यांत वडीलधाकटेपणाचा कजिया लागोन हुजूर मिरजेस आले. पंचमतें इनसाफ मनास आणितां राणोजी बिन येसाजी पाटील धाकटे ठरले. व सुलतानजी बिन बाळोजी पाटील साळोंखे वडील ठरले. निम्मे पाटीलकी कसबे मजकूरपैकीं त्यांतील निम्मेची भाऊ वांटणी राणोजी बिन येसाजी पाटील यांणीं घेऊन असावें याप्रमाणें निवाडा होऊन परस्परें एकमेकांस समजपत्रें लिहोन दिलीं आहेत. त्या समजपत्राचे अन्वयें राणोजी बिन येसाजी पाटील साळोंखे बंडे कसबे मजकर याचे नांवचीं पत्रें लिहून द्यावीं—

---

१ पुण्यास बळवंतराव कृष्ण व हारिहरराव पुरुषोत्तम पटवर्धन मंगळवेढेकर आहेतच, ताई साठी.

१ देशमुख व देशपांडे यांसीं

१ मोकदमास

१ पाटील मजकुराचे नांवें

१ कमाविसदारास.

—

४

चार पत्रें लिहून देणें.—

छ० १६ रबिलावल सन तिस्सा सबैन. चैत्रमास.

नं. २४९४. श्रीगणपति.( चैत्र व०–एप्रिल प. पंघरवडा. )

आशीर्वाद उपरी. मोंगलांच्या तालुकियांत स्वराज्याचा व बाबती सर देशमुखीचा अमल येणें. त्यास मागील बाक्या तशाच राहिल्या आहेत. व पुढेंही सुरळीत पावत नाहीं. याजमुळें अबजलपूर, कलबुर्गे, चितापूर येथें तगादा करून अंमल देविला. यामुळें आम्हांसही चार रुपये मिळाले. त्यास हा मजकूर नबाबानीं पुरंधरास विदित करून लिहिलें, त्यावरून हुजूरचीं पत्रें आह्मांस आलीं कीं, " नबाब श्रीमंतांशीं अंतःकरणपूर्वक ममता करितात. व या दौलतीची काळजी वागवितात. असें असतां तुम्ही त्यांच्या तालुकियांस उपसर्ग देतां याजमुळें नबाब फारच खट्टे आहेत. व जिवाजीपंत वकील याणींही बहुतच बखेडे आले म्हणोन लिहिलें आहेच. असें न करावें. थोडक्या कामाकरितां मातबर कामास हिसका बसतो. घेतला ऐवज माघारा द्यावा " म्हणोन व "नबाबानीं चित्तांत विकल्प आणोन तुम्हांवर फौजही रवाना केली आहे. सावध रहावें " असें लिहिलें आहे. याच अन्वयें जिवाजीपंतांचींही पत्रें येथें आलीं आहेत. व तहवरजंग[1] पांच हजार फौजेनिशीं कलबर्ग्यानजीक आले आहेत. याखेरीज तांडुराजवळ अल्ला-

---

१ हें मोंगल सरदाराचें नांव.

उद्दोलेही आले आहेत. त्यांजवळही चार हजार फौज आहे. उभयतां येकत्र होणार अशी बातमी आली आहे. ती फौज आम्हांस भारी आहे असें नाहीं. आम्ही बातमी राखोन सावधपणेंच आहों. आम्हीं जिवाजीपंताकडे पत्रें रवाना केलीं आहेत नबाब यांच्या मनांत कांहीं आमचे फौजेशीं खटला करावा असें आहे. आह्मीही सावध आहों. सुरापूरचें विल्हेस लागलें म्हणजे कांहीं भीत नाहीं. पुढें पहातच आहों. प्रस्तुत दोहींकडून बातम्या आणवाव्या लागतात. श्रीइच्छेनुरूप घडेल तें प्रमाण. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २४९५. ( चैत्र व० ६–७ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र. पै।। २३ रबिलावल.—

" चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा अद्यापि सडे स्वारींतून माघारे आले नाहींत. येथून चार कोसांवर राहिले आहेत. रोज तेथून पांच सात कोस तलावे पुढें जाऊन करून येतात. बेरडांच्या रावतांची व त्यांची दोन वेळां गांठ पडली होती. दोन वेळां मिळोन पाऊणशें घोडे पाडाव त्याजकडील आले. "

नं. २४९६. ( चैत्र व० १२–१३ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र रवाना छ० २५ रबिलावल.—

" सुरापुरची खंडणी सवातीन लक्षांवर उरकली. परंतु निशेचा गुंता पडला आहे. नबाबाचे तालुक्यांत स्वराज्याचे अमलाविशीं व सुरापुरचे गुढ्याविशीं तगादा करून अफजलपूर व चितापूर व कलबर्गे या महालांतून चार रुपये घेतले, याजमुळें नबाब फारच खट्टे होऊन आम्हांवर साहेबजादे व तहवारजंग वगैरे फौजा रवाना केल्या आहेत. भागानगराहून साहेबजादे अलीकडे वीस कोसांवर निघून आले. तह-

१ हैदराबादची व निजामअल्लीखानाची. २ सुरापुरकराच्या.

वारजंग कलबुर्ग्यानजीक होते तेही त्यांस मिळावयास आडवे गेले. चालोन आम्हांवर मुकाबल्यास येणार. याप्रमाणें नबाबाजवळ सरकारतर्फे जिवाजीपंत वकील आहेत त्यांचीं दोन चार पत्रें स्पष्टच आलीं. येथूनही तह्वारजंगाकडे बातमीकरितां कारकून पाठविला आहे, त्यांचींही पत्रें तशींच येतात. केवळ नबाबाचे चित्तांत विपर्यास दिसावा असा उपसर्ग आम्हांकडून नसतां त्यांचे चित्तांत वांकडी गोष्ट आली आहे ! आम्हीं जिवाजीपंत यांस लिहिलें कीं, " आम्हांकडून द्वैतभाव नसतां महालकऱ्यांचे लिहिण्यावरून मर्जी खफा होऊन मुकाबल्यास फौज रवाना केली आहे, उत्तम आहे. आम्ही सिद्धच आहों. जें होणें असेल तें होईल. " असें लिहून पाठविलें. सुरापूरचे ऐवजाची निशा झाल्यानंतर आह्मी मोकळेच आहों. मग कृष्णातीरास जावें असें आहे. हैदरखानाचें कूच दुर्गाहून झालें. रत्नगुडीवर मुक्काम होता. मिरास[1] कडप्यावर पाठविलें असतां कडपेवाले यानीं अर्काटाहून महंमदअल्ली यांजकडून कुमक आणून मिरास नामोहरम केलें. मिराचे कुमकेस्तव हैदरखान आणखी फौजा रवाना करीत आहे. इकडे येणार म्हणन बातमी होती ती खरी नव्हे. खासा पट्टणास निघून गेला म्हणून बापूजी नारायण ह्यांचीं पत्रें आलीं. परंतु शत्रु दगाबाज आहे. आणखी बातमी आणवीत आहों. आह्मी तळाव्यास जाण्याबद्दल कालच सडे जालों. बुनग्याचा मुक्काम सोनती भीमा दक्षिणतीर येथें आहे. आह्मी बुनग्यापासोन कोसावर सडे राहिलों आहों. उदईक सरापुरचे रोखें जात आहों. आह्मांकडील पेंढारी, लुगारे वगैरे कृष्णापार जाऊन कनकगिरीपर्यंत जाऊन फिरोन आले. चिरंजीव राजश्री बळवंतराव कृष्णेपर्यंत देवदुर्गच्या रोखें सुरापूर उजवें टाकून तळाव्यास गेले होते येथून कृष्णा दहा कोस आहे.प्रातःकाळीं जाऊन संध्याकाळीं माघारे आले

१ मीर रेजा हा हैदराचा मेहुणा त्यास.

नबाबाचे मनांत घांसावें असेंच आहे. वीस हजारपावेतों फौज या रोखें रवाना झाली. आह्मीही बातमी राखून सावध आहों."

नं. २४९७. ( वैशाख शु०—एप्रिल दु. पंधरवडा. )

परशुरामभाऊचें पत्र गंगाधरराव यांस मिरजेस—

"सुरापुरकरांचें बोलणें ठरावांत आलें. बहुतकरून विल्हेस लागावें असेंच आहे. नबाबाच्या मनांत हिसका द्यावा असें आहे. यामुळें मात्र काय होतें न कळे. इकडील जाबसाल उगवल्यानंतर त्याच रोखें यावें असें आहे. पंचमहालांत जावें तर नबाबाची मर्जी नाखुष होते, आणि इकडे फौजाही आह्मावर त्याणीं रवाना केल्या आहेत. कलह वाढवावा तर आह्मावर शब्द येतो. तेंही करावें, फौजही जमा बरीच आहे, लोकही चांगले आहेत, परंतु आह्मावर निमित्य येतें, यास्तव काढतेंच घेतलें. त्या प्रांतीं आल्यास मग आमच्या विचारें शिरोळ घ्यावें असें आहे. आह्मांबरोबर तोफा आहेत त्यांत चार चांगल्याच आहेत. मिरजेंत तोफा असतील त्यांपैकीं पांच सात चांगल्या पाहून बाहेर काढून ठेवाव्या.

नं २४९८. ( वैशाख शु०—एप्रिल दु० पंधरवडा. )

पै॥ छ० २९ रबिलाखर. सन तिस्सा सबैन. वैशाखमास—

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. इकडील वर्तमान तर नबाब निजामअल्लीखान यांचे तालुक्यांत स्वराज्याचे अमलाविशीं वगैरे तगादा केला, सबब नबाबांस त्यांच्या कमाविसदारांनीं विपरीत करून लिहिलेवरून मर्जी दफा होऊन साहेबजादे व तहवारजंग यांची रवानगी आम्हांवर केली. त्यावरून आम्हीं आपले तर्फे कलह वाढवूं नये म्हणून भीमा दक्षिणतीर सोडून सुरापुरकरानीं जाबसाल ठरला असतां लांबणीवर निशेचें टाकिलें यास्तव सुरापुरा-

१ परशुरामभाऊचें मिरजेस गंगाधरराव यांस पत्र.

नजीक आलों. साहेबजादे पेडबावर आहेत व तहवारजंग यातगिरीवर आहेत. नबाबानीं महालचे कमाविसदारांचे लिहिण्याचा छान करून पहातां आम्हांवर फौजा रवाना केल्या हें गैर जालें असें चित्तात आणून खुषमर्जीनें आम्हांस बहुतप्रकारें खातरजमेचीं पत्रें रा॥ जिवाजीपंत वकील यांजकडून लिहोन पाठविलीं. तींच पत्रें राजश्री नानाकडे पहावयास पाठविलीं आहेत. भवानी शिवराम भंडार कवठ्यावर आले. म॥ निल्हेबरोबर तीन चार हजार फौज आहे म्हणून जासूद येतात ते जबानी सांगतात. येथें आल्यावर कळेल. काल पुण्याहून शु॥ ६ चीं पत्रें रा॥ बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचीं आलीं. "श्रीमंतांचा व्रतबंध पंचमीस मोठ्या समारंभानें जाला. शिंदे होळकर आले आहेत. एकादशीस मध्यरात्रीं मुहूर्तानें शहरांत वाड्यांत येणार. आठ चार दिवस तेथें रहाणार. राजश्री नाना गंगास्नानास जाणार. शिवनेर किल्ल्याची भानगड लागली आहे. आठ चार दिवसांत हस्तगत होईल. श्रीमंत राजश्री दादासाहेब चांगदेवावर गेले. दर मजल पुढें जात आहेत. त्यांचें शरीरीं समाधान नाहीं. ज्वर येत असतो. इंग्रज लढाऊ सामान तयार करीत आहेत." म्हणोन म॥निल्हेनीं लिहिलें आहे. हैदरखान अद्यापि कडपें तालुक्यांत आहे. तेथील बंदोबस्त जाला. कर्नोळचा तह चार लक्षांवर ठरला आहे. निम्मे ऐवज पावला. निम्मेस ठिकाण नाहीं. अदवानीकरांचा तह सहा लक्षांवर ठरला आहे. परंतु पैका घेऊन स्थळें हस्तगत करावीं ही त्याची वासना आहे. बातमीस आम्हीं अदवानी वगैरे जागां जोड्या पाठविल्या आहेत. सावधपणें आहों. याउपर शत्रु मोकळा जाला आहे. दगेखोर कोणीकडे तोंड टाकितो न कळे. सुरापुरच्या ठराव होऊन महिना होत आला. निशेकरितां दिवसगत लागली. याजमुळें समीप येऊन मुक्काम केला. या मुक्कामास येऊन दहा अकरा दिवस जाले. निशा चिठ्ठी आणावयास

संस्थानिकाकडील कारकून नारायणपेठेस गेले होते. निशा घेऊन सावकाराचे गुमास्ते सुरापुरास येऊन पांच सात दिवस जाले. 'आज येतों' 'उद्यां येतों' म्हणून चाळवाचाळव मांडिली आहे. परंतु अंतर्गत ध्यान काय आहे हें समजत नाहीं. कराराप्रमाणें बागेवाडीबद्दल घोडीं मात्र साठपर्यंत काल आलीं. संस्थानाकडील फडशा जाल्याचा मजकूर सविस्तर अलाहिदा पत्रावरून कळेल. गणेशप्रसाद हत्ती आजारी होता तो मेला म्हणोन लिहिलें तें कळलें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २४९९. श्रीगणपति. ( वैशाख व० ६-६ मे. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. तुह्मा-कडील छ० ६ रबिलाखरचीं पत्रें आलीं त्यांचीं उत्तरें लिहून तयार केलीं. रवाना करावीं तों दुसरीं पत्र छ० १३ रबिलाखरचा पाठ-विलीं तीं कालच छ० १८ मिनहूस पावलीं. लिहिला मजकूर सवि-स्तर कळला. चिरंजीव सौ॥ नरसूबाईचें लग्न द्वादशीस जाहलें. समा-रंभ उत्तम प्रकारें होत आहे. राजश्री जिवाजी गोपाळ खुद्द आले नाहींत. वरकड सर्व आले आहेत. याखेरीज तासगांव व कुरुंदवाडची मंडळी आली आहे; म्हणोन तपशीलवार लिहिलेवरून संतोष पावलों. कार्यसिद्धि जाली, उत्तम गोष्ट जाली. आजला वऱ्हाडी माघारे गेलेच असतील. कोणे दिवशीं गेले, व दक्षिणा ब्राह्मणांस काय दिली, खर्च किती लागला, याचा अजमास लिहोन पाठवावा. चिरंजीव राजश्री शिवराव सुभेदार मुंजीकरितां पुणियास गेले होते. जाऊन माघारे आ-ल्याचें लिहिलें तें कळलें. ' नरगुंदाहून पत्रें आलीं त्यांतील मजकूर " ( हैदरानें ) कडपें घेतलें. याउपर आपणावर फौज छाप्यास रवाना

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधररावांस मिरजेस.

होणार; " असें लिहिलें आहे ' ह्मणोन लिहिलें त्यास याप्रमाणें जिवाजीपंत वकील यांचें पत्र भागानगराहूनही आलें. त्यांतही खामखा छापा येणार, बहुत सावधपणें असावें, असें लिहिलें आहे. आम्ही तर चहूंकडील बातमी राखोन सावध आहों. श्रीसत्ता प्रमाण ! " कित्तूरकर जमावसुद्धां बाहेर निघाला आहे. सडयावर जाणार. राजश्री व्यंकटेराव दादा घोरपडे येली मनोळीजवळ आहेत. बाळाजी राम नि॥ करवीरकर दोन तीनशें स्वारांनिशीं अकीवाटास आला आहे. चंदुरास घांसदाण्याचा रोखा केला आहे; " ह्मणोन लिहिलें तें कळलें. दोन तीनशें स्वारांनिशीं बाळाजी राम याचें वस्तु होणें काय कळतच आहे ! रोखा माघारा टाकावा. अलीकडील वर्तमान लिहावें. इकडील वर्तमान तर सुरापुरची बेरीज ठरून एक महिना जाहला असतां आज उद्यां ह्मणोन चाळवाचाळव करूं लागले. यामुळें वाघिनगिऱ्यावर परवां पंचमी बुधवारीं सडे तयार होऊन पहांटेच्या सहा घटका रात्रीस गेलों. किल्ल्यास तोफा लाविल्या. खालील गढी घेऊन लुटली. किल्ल्यावर लोक चढून निकड करून अर्धा किल्ला घेतला. तों सावकारसुद्धां सगो निळकंठ येऊन बहुतच रदबदल केली. हातांपायां पडूं लागले. याजमुळें लोक माघारे आणविले. गोटास आलों. कराराप्रमाणें उदईक चिठी देतों ह्मणोन मुकाशाच्या जाबसालाचा लढा होता यास्तव बोलोन येतों म्हणोन माघारे सुरापुरास गेले कीं, षष्ठीस प्रहर दिवस चढला नाहीं तों येतों. त्यास तो दिवस समग्र गेला. आले नाहींत. शत्रूकडील बातम्या अनेकप्रकारच्या येऊं लागल्या; दिवसगत कामाची नाहीं; याजमुळें मागती काल सप्तमी भृगुवारीं पहांटेची चार घटका रात्र आहे तों तयार होऊन फिरोन पहिली जागा सोडून सुरापूर व वाघिनगिरें यांच्यामध्यें वाघिनगिऱ्यालगती गढी डोंगरावर आहे,

---

१ हवलकरंजीकर.

तेथून सुरापूर पावकोसही होणार नाहीं, तेथें जाऊन तोफा लागू केल्या. अलीकडे एक बुरूज होता त्यांतील प्यादे तोफा पाहतांच गढींत गेले. मुख्य वाघिनगिऱ्याची गढी तीच. तेथें तोफा सुरू करून हल्ला केला. लोक जाऊन भिंताडास लागले. तों मागती सावकार घेऊन सगो निळकंठ आले. कराराखेरीज वीस हजार रुपये गुन्हेगारी जास्ती व हत्ती एक नजर कबूल करून साहुकारी निशा दिली. तेव्हां निशाचिठी घेऊन तिसरे प्रहरीं गोटास येऊन भोजन केलें. बाकीचीं बागेवाडीचीं घोडीं व वोली अलमेलें व बागेवाडी येथील आज येतील. येथील फडशा जाहला. अतःपर एका दो दिवशीं कूच करून कृष्णातीरास जातों. सुरापूरकर परिच्छिन्न अमित्राची वाट पहात होते. आह्मीं लवकर निकड केली याजमुळें निशा पडली. नाहीं तर पैका येत नव्हता. संस्थानचा श्रम फार होता. आतां आब राहिला नाहीं ! वाघिनगिऱ्यावर निकड केली ते दिवशीं दोनतीन हजार गुरूं वगैरे लूट जाहली. घोडे दहापर्यंत जाया जखमी जाहले व शिवाय माणूसही दहा वीस गारदी वगैरे ठार व जखमी जाहले. परंतु दाब बसवून पैका घेतला. श्रीगजाननाचे कृपेंकडून एक वेळ फडशा जाहला. नाहीं तर काम मोठें फेदीस पडलें होतें. असो. याउपर लौकरच होनगुंद्यासुमारें येत आहों. गुंता नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

अपत्यें जनोबानें[1] शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलांकडून पत्र येऊन बालकाचा संभाळ होत नाहीं. तरी वडिलीं ऐसें न करितां सदैव पत्र पाठविजेस आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विज्ञापना.

---

१ जनोबा सुभेदार यादवाडकर.

नं. २५००. श्रीगणराज. (वैशाख व० १४-१५ मे.)

पै॥ छ० ३ जमादिलावल. सन तिस्सा सबैन.—

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागाईत छ० २८ रबिलाखर मुक्काम सडी स्वारी होनगुंद जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. " सुरापुरचा फडशा जाहला; कृष्णेच्या रोखें कूच केलें; " म्हणोन पत्रें पाठविलीं आहेत तीं पावोन सविस्तर वर्तमान कळलेंच असेल. अलीकडील मजकूर तर वद्य त्रयोदशीस कृष्णा दक्षिणतीरास आलों. राजश्री भवानी शिवराम कृष्णातीरास आलों त्याच्या आदले दिवशीं येऊन मिळाले. आल्या दिवशीं भेटीस मुहूर्त नव्हता याजमुळें दुसरे दिवशीं त्रयोदशीस नदीवर आलों तेच दिवशीं मशारनिल्हेची भेट जाहली. चतुर्दशीस पहांटेची चार घटका रात्र असतां सडे स्वारीनें निघालों ते चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा व रा॥ गोविंदपंत-मामा व आनंदराव गोपाळ यांचे चिरंजीव व गोविंदराव कृष्ण वगैरे पथकें हणमसागरास रवाना करून आम्ही होनगुंद्यास प्रथम प्रहर दिवसास आलों. आले क्षणींच पेठ हल्ला करून घेतली. डोंगरावर गढी आहे तेथें तोफा लाविल्या. संध्याकाळीं बोलूं लागले कीं ' हत्यारें सुद्धां सोडून द्यावें. ' त्यास कौल दिल्हा नाहीं. आंत पाणी नव्हतें याजमुळें काल प्रातःकाळीं हत्यारें सोडून लोक बाहेर आले. प्याद्यांचे हात पाय कांहीं तोडविले. हैदरखानाकडील कमाविसदार सोमण्णा व येथील देसाई मुख्य अमीनगौडा त्यांचा भाऊ हुसेनगौडा, व देशपांडे वगैरे सांपडले. अमीनगौडा देसाई शत्रुपक्षी नव्हे. सरकार लक्षांत आहे. सरकारचें ठाणें तूर्त बसवावें तर उपयोग नाहीं. याजकरितां अमीनगौडा याजकडे चार रुपये साधतील ते ठरवून त्याचेच हवालीं ठाणें करणार. हणमसागरास चिरंजीव राजश्री दादा गेले आहेत. गांव भरला आहे आणि गांवांत दोन तीनशें प्यादेही आहेत. चिरंजीवाबरोबर

तोफा नाहींत. चौकी देऊन बसले आहेत. प्रथम दिवशीं हणमसागरचे प्यादे बाहेर निघाले होते त्यांजवर घोडीं घातलीं तेव्हां चाळीस पन्नास प्यादा ठार जाहला. इकडील दहा पांच घोडीं व भले माणूस दहापर्यंत जखमी जाहले. आणखी फौज पाठवावी व आम्हांसही येण्याविशीं चिरंजीवानीं लिहिलें आहे. त्यावरून राजश्री भवानी शिवराम व चिरंजीव राजश्री बळवंतराव यांस हणमसागरास रवाना केलें. आम्ही आज तोफांसुद्धां तिकडेच जात आहों. चिरंजीव रा॥ हरिहरराव व आपा बुनग्यांतच आहेत. बुनग्याचा मुक्काम कपिला संगमाजवळ आहे. हणमसागरचा फडशा होतांच मलप्रभातीरानें यादवाडाकडे येत आहों. काल चिरंजीव राजश्री दादाकडून चिठी आली. हणमसागरचा देसाई येऊन भेटला. आजच्या दिवसांत फडशा होईल. उद्यां सातगिरीवरून केलूराकडे येतील. हणमसागरचा फडशा जाहला यास्तव आम्ही तिकडे गेलों नाहीं. उदईक कूच करून आम्ही केलूरचे मुक्कामास जातों. कमतीवरून बागलकोट उजवें टाकून यादवाडाकडे येतों. दारूचे तरतुदेविशीं पेशजी लिहिलें आहे त्याप्रमाणें तरतूद केलीच असेल. जरूर जरूर यत्नांत असावें. मागाहून सविस्तर लिहोन पाठवितों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २५०२. श्रीगणपति. (ज्येष्ठ शु० ६–२१ मे.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ छ० ४ जमादिलावल मुक्काम कटगिरें परगणे केरूर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. अलीकडे तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, त्यास सविस्तर लिहून पाठवावें. इकडील वर्तमान तपशीलवार होनगुंद्याच्या मुक्कामाहून सडे स्वारींतून लेहून पाठविलें आहे त्यावरून सविस्तर कळलेंच असेल. त्याअलीकडील वर्तमान तर हणमसागरास चिरंजीव राजश्री दादा बोलले होते तेथील खंडणीचा ठराव आठ हजार होनांवर

जाहला होता. परंतु थोडाबहुत वसूल पडला असतां गांवकर बदमामलीस आले याजमुळें थोडीसी पेठ झावडली. कांहीं बोली हातास आल्या त्या घेऊन चिरंजीव आले. आम्ही होनगुंदाहून केलूरास ठाणें बसवून केकतीचे मुक्कामास तृतीयेस बुनग्यांत आलों. तेच दिवशीं चिरंजीवही हणमसागराहून आले. तेथून काल कूच करून मुक्काममजकुरास आलों. आज लोकापुरचा मुक्काम नेमिला आहे. चिरंजीव राजश्री बळवंतराव सडे फौजेनिशीं अनवाल व यादवाडास ठाणें बसवावयास पुढें कालच रवाना केले आहेत. मुक्काम मजकुरीं ठाणें हैदरखानाकडील होतें. परंतु लष्कर येऊन उतरतांच प्यादे कौल घेऊन उतरले. ठाणें रास्ते यांचें बसलें. शिरूर हा गांव बागडकोटाखालील. तेथेंही हवेलीस ठाणें रास्ते यांचें बसलें. बन्नूर हा गांव तोरगलाखालीं आहे. तेथें ठाणें बसवावें असें आहे. उद्यां तेथेंच मुक्कामास जातों. बसुरकींत ठाणें बसलें. मुदलावीचें ठाणें सहजांत आल्यास पाहतों. बन्नूरचें उरकल्यावर गोकाकेस येतों. तेथील बंदोबस्त जाहल्यावर शिरोळास येत आहों. त्यास दारूगोळा पोक्ता पाहिजे त्याची तरतूद असावी म्हणून पेशजीचे पत्रीं लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें तरतूद जरूर जरूर करावी. तोफा लहान मोठ्या पंधरापर्यंत गोलंदाज वगैरे सरंजामसुद्धां तयार असों द्याव्या. तिकडे येणार हें वर्तमान अद्याप प्रगटांत नाहीं. तेथेंही वाच्यता न करावी. मोर्चास कामाठी पाहिजेत. येथें कांहीं तरतूद करविली आहे. तुम्हीं पन्नास साठपर्यंत कामाठी मेळवावे. हैदरखान अद्याप कडपे तालुक्यांतच आहे. अदवानीचा तह सहा लक्षांवर जाहला. याजउपर कांहीं फौज तुंगाअलीकडे येणार अशी बातमी आली आहे. गजेंद्रगडची पेठ कांहीं आम्हाकडील लोकांनीं झावडली. पेंढारी केंचनगुड्डपर्यंत जाऊन स्वारी करून आले. लष्करांत गुरूं लुटीचें फार आलें आहे. आज

लोकापूरचा मुक्काम नेमिला होता, परंतु काल रात्रौ केरूरचें सूत्र आलें आहे, कीं 'तोफा व फौज येऊन शास्त्रार्थ करावा म्हणजे ठाणें देतों.' त्यावरून रास्ते रात्रीसच गेले. येथून तीन कोस आहे. आज मुक्काम केला. आणि चिरंजीव राजश्री दादा व राजश्री भवानी शिवराम व आनंदराव गोपाळ यांचे चिरंजीव वगैरे तोफांसुद्धां रवाना केले आहेत. संध्याकाळपर्यंत उरकल्यास उदईक येथून कूच होईल. राजश्री अंताजीपंतमामा यांचें प्रयोजन आहे. त्यांस आणवून पाठवून द्यावें. तीर्थस्वरूप राजश्री अंताजीपंततात्या यांस यावयाविशीं पेशजीचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून निघालेच असतील. नबाबाकडील फौजा यादगिरी व शेडबावर होत्या. त्यास साहेबजादे व शर्फद्दौला यांच्या भेटी होऊन एकत्र जाहले. काडलूर संगमाकडे गेले. आठ पंधरा दिवस तेथें राहून साहेबजादे माघारे जाणार; शर्फद्दौला छावणीस राहणार; याप्रमाणें आम्हाकडून कारकून तेथें आहे त्यानें लिहिलें आहे. आमचें मानस गोकाकेवरून हुकेरीवरून पुढें शिरोळास खामखा यावें. फौजेचा जमाव व सरंजाम चांगला; एक हातीं कारभार; यास्तव एक वेळ लगट करून चार दिवस अधिक उणे लागले तरी चिंता नाहीं असा प्रकार आहे. यास्तव तोफा तर आहेतच, परंतु दारू निदान पक्ष पंचवीस खंडी पाहिजे त्याची मात्र तरतूद असावी. येविशीं पेशजीही एक दोन वेळा लिहिलें आहे. तर जरूर पंचवीस तीस खंडी पक्क दारूची व गोळे चार पांच हजारांची तरतूद करावी. अखेर ज्येष्ठ (किंवा) आषाढ लागतां खामखा येतों. यांत संशय न मानावा. यासाठीं कामाठी शंभर व पन्नास बेलदार यांची तरतूद जरूर करावी. आमचा येण्याचा संशय कांहीं चित्तांत न धरितां जरूर तरतूद करावी. देवस्थापनेस येणार होतों, परंतु अगोदर आल्यानें ठीक पडणार नाहीं यास्तव यावयाचा अनमान केला आहे. सविस्तर कळावें यास्तव लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

रामाजी नाईक गोखले यांच्या पत्राचें उत्तर पाठविलें आहे हे आशीर्वाद.

नं. २५०२. श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० ११–२६ मे. )

पै॥ छ० १३ जमादिलावल. सन तिसा सबैन. ज्येष्ठमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी आशीर्वाद उपरी. इकडील वर्तमान सविस्तर कटगिऱ्याचे मुक्कामावरून लिहिलें आहे त्यावरून कळलेंच असेल. अलीकडील वर्तमान तर केरूरास तोफा लाविल्या आहेत म्हणोन परवांचे पत्रीं लिहिलेंच आहे. त्यास एक दिवस तोफा लागू करून मोर्चे कायम केले. लष्कर उतरावयास बाहेर पाणी विपुल नाहीं; व किल्ला मजबूद; चांगला मजबूद खंदकही आहे; आठ पंधरा दिवस लागावयाजोगें तें स्थळ. परंतु हल्ला करावा असा सिद्धांत करितांच रात्रौ तेच दिवशीं बोलीस आले. हत्यारसुद्धां सोडावें असा करार करून उतरले. ठाणें रास्ते यांचें रविवारीं प्रातःकाळचे प्रहर दिवसास बसलें. सर्वेच ते दिवशीं कूच करून येतगिऱ्याचे मुक्कामास आलों. सोमवारीं राहून काल भौमवारीं मुक्काममजकुरास आलों. केरूरपासून अनवाळ परगणा व लोकापूर वगैरे तमाम येथवर खेडीं ओस पडलीं आहेत. तीर्थस्वरूप राजश्री अंताजीपंततात्या यादवाडास आले. भृगुवारीं तेथें ठाणें बसलें. यादवाड तालुक्यांतही वस्ती विशेष नाहीं. फारकरून खेडीं ओसच आहेत. राजश्री गोविंदपंतमामा यांस कालच कटकोळास चौकी द्यावयास पाठविले आहेत. चिरंजीव राजश्री बळवंतराव वन्नुरास चौकीस पुढें पाठविले होते. जवळ दोन तीन खेडीं अदकोसाचे अंतरानें आहेत तेथील गुडें खेडेकरी वन्नुरास घेऊन येत होते. हें वर्तमान रात्रौ बळवंतराव यांस कळतांच गुडें लुटावयास गेले.

---

१ जंत्रींत आदले दिवशीं 'समानीन' हें साल सुरू झाल्याचें लिहिलें आहे. सबब 'तिस्सा सबैन' च्या जागीं येथें 'समानीन' असें पाहिजे. २ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस.

तों गुडयाबरोबर पांचशें प्यादा होता त्यांजवर घोडीं घातलीं. पन्नास साठ प्यादे ठार व पन्नास साठ जखमी त्यांजकडील झाले. हत्यारें दोन अडीचशें लोकांचीं आणिलीं. इकडील एक घोडें ठार व दहा बारा जखमी जाहलीं. तों आमची बिनी येऊन पोहोंचली. झाडून लष्करच आलें, आतां परिणाम लागणार नाहीं, हें समजून गांवकर बोलीस आले आहेत. तोरगलाहून राजश्री लक्ष्मणराव शिंदे यांजकडूनही बोलावयास कारकून आला आहे. याउपर ठराव होईल. येथें एक दोन मुक्काम होतील. कडकोळचाही फडशा होणें आहे. हैदरखान अद्याप कडपें तालुक्यांतच आहे. अर्काटवाल्यांत व यांत बिघाड जाहला आहे. कुमदानाची रवानगी बल्लारीकडे जाहली आहे ह्मणोन बातमी आली आहे. परंतु यंदां तुंगाअलीकडे तूर्तच चार महिने येणार नाहीं असें दिसतें. रास्ते निरोप मागतात. तालीकोट परगण्यांत काम आहे, जातों म्हणतात. कृष्णापार व्हावयाचे पूर्वींच जाणार होते. परंतु येथवर आणिले. याउपर एका दोहों दिवशीं निरोप देणार. चिरंजीव धोंडूबाई कंकणवाडीहून भेटीस्तव आलीं आहेत. त्यांची मोकासबाब दहा साला लोकापुराकडे येणें, त्याची उगवणी करावी असें होतें. परंतु लोकापूर अगदींच बेचिराख. तीर्थस्वरूप राजश्री अंताजीपंततात्या यादवाडाहून कालच संध्याकाळीं येथें आले. यादवाडकर देसाईही भेटीस येणार आहे. मग येतो किंवा नाहीं न कळे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

# करवीरकरांचा बंदोबस्त.

स० १७७९ जून ते स० १७८० आक्टोबर.

सुरापूरची स्वारी आटपून वाटेनें हैदरअल्लीच्या ताब्यांत गेलेलीं ठाणीं काबीज करीत करीत करवीरकरांचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यांच्या कटकोळ महालांत परशुरामभाऊ दाखल झाल्याचें मागच्या प्रकरणांत सांगितलें आहे. करवीरकरांचा बंदोबस्त करण्याचीं कारणें काय काय झालीं याचाही उल्लेख मागच्या प्रकरणांतल्या पत्रांतून जागोजाग आलेला आहे. त्याचीच पुनरुक्ति वाचकांच्या समजुतीकरितां आणखी एकवार करून नंतर चालू प्रकरणाचा सारांश थोडक्यांत सांगूं.

करवीरकरांनीं स० १७७८ च्या एप्रिलअखेरीस महादजी शिंद्यांशीं जो तह केला तो सहाव्या भागाच्या अखेरीस नं. २३११ स
स० १७७८ छापिला आहे. त्या तहांतल्या शर्ती शिंद्यांनीं करवीरकरांकडून जबरदस्तीनें कबूल करविल्या होत्या त्यामुळ त्या पाळण्याचें त्यांच्या मनांत मुळींच नव्हतें. अर्थात् तह होऊन दोन महिने लोटले नाहींत तोंच करवीरकरांनीं पुनः धामधूम सुरू केली ! शिंदे व पटवर्धन वगैरे सरदार—किंबहुना सारें पुणें दरबार—या वेळीं मोरोबादादाचें खूळ मोडण्यांत गुंतलें असल्यामुळें आपणास तूर्त प्रतिबंध करणारें कोणी नाहीं हें करवीरकरांस पक्कें माहीत होतें. त्यांनीं खलबत करावयाच्या मिषानें बावडेकर अमात्य व त्यांचे कारभारी, विशाळगडकर प्रतिनिधि, आपाजी शामजी, बाबूराव गडनीस, राघोबा पाथऱ्या, सौंदत्तीकर गोसावी वगैरे अकरा असामी बोलावून
जून. आणून विश्वासघातानें कैद केले. शिंद्यांशीं केलेल्या तहांत अकरा लक्ष रुपये द्यावयाचें कलम होतें त्या रकमेस शिंद्यांनीं अमात्य व प्रातिनिधि वगैरे असामी उगवणीदार घेतले

होते असें दिसतें. कारण कीं या अकरा मंडळीस करवीरकरांनीं कैद करून तीन दिवस उपाशीं कोंडून ठेवल्यावर चवथे दिवशीं प्रतिनिधि व अमात्य यांस मात्र सोडून दिलें. पण सोडतांना शिंद्यांस देऊं केलेल्या खंडणीपैकीं पांच लक्ष रुपये पोंचल्याची पावती त्यांजपासून लिहून घेतली ! बाकी बावडेकरांच्या कारभाऱ्यासुद्धां नऊ असामी अटकेंत राहिले त्यांपासून निघेल तो पैका उकळण्याचा उद्योग चालूच होता. आपाजी शामजीच्या ताब्यांत ठाणीं होतीं त्यांच्या सोडचिठ्या लिहून देण्याविषयीं त्यास सक्तीचा तगादा लागला तेव्हां त्यानें त्या लिहून दिल्या. त्याप्रमाणें वडगांव व आणखी एखाददुसरें ठाणें स्वाधीन झालें. परंतु कोगनोळी, निपाणी व चिकोडी येथील ठाणेदारांनीं या चिठ्या मान्य करण्याचें साफ नाकारिलें. त्यावरून महाराजानीं आपाजी शामजीवर क्रुद्ध होऊन त्याचे डोळे काढविले ! शिंद्यांशीं केलेल्या तहांत चिकोडी व मनोळी हे दोन्ही तालुके पेशव्यांस देऊन टाकल्याचें व कागलकर घाटग्यांकडे कागलचें ठाणें कायमचें ठेवण्याबद्दलचें कलम लिहिलेलें आहे. परंतु आतां चिकोडी, मनोळी व कागल जबरदस्तीनें घ्यावयाची मसलत करवीरदरबारांत ठरली ! त्याप्रमाणें चिकोडी घेण्याकरितां सात आठशें स्वार व दोन हजार पायदळ इतक्या सरंजामानिशीं सटवोजी भोंसल्याची स्वारी निघाली. ता० १८ जुलई रोजीं राणी दुर्गाबाई मरण पावली. तथापि तिच्या मृत्यूमुळें वर सांगितलेल्या मसलतींत कांहीं फेरफार झाला नाहीं. इकडे आपाजी शामजीचे बंधु विरूपाक्ष शामजी व अंताजी शामजी यांनींही करवीरकरांशीं टक्कर द्यावयास कंबर बांधिली. त्यांच्या कुमकेस पुणें–दरबाराकडून बचाजी विश्वनाथ खांडेकर यांबरोबर थोडीशी फौज आली. मागून व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर यांची याच कामावर नेमणूक झाली.

आक्टो०

नोव्हेंबर महिन्यांत महाराज व येसाजी शिंदे कागलास वेढा देऊन बसले तों चिकोडीकरांनीं येऊन घाटग्यांची कुमक केली व महाराजांस वेढा उठविणें भाग पाडिलें. सटवोजी भोंसला येळगुडच्या ठाण्यास वेढा देऊन बसला होता त्यावरही चिकोडीकरांनीं छापा घालून त्यास लुटून पिटाळून लाविलें. चिकोडीकरांची याप्रमाणें सरशी झाली तरी पुढच्याच महिन्यांत महाराज व येसाजी शिंदे यांनीं पुनः कागलावर चाल केली. या वेळीं घाटग्यांनीं मर्दुमीनें लढून महाराजांचे एकामागून एक तीन हल्ले परत फिरविले. परंतु वेळेवर कोणाकडून कुमक न पोंचल्यामुळें शेवटीं त्यांस कागलच ठाणें महाराजांच्या हवालीं करावें लागलें. येळगुडचें ठाणेंही शिंद्यांनीं संधि साधून घेऊन पाडून टाकिलें.

नोव्हें०

दिसें०

पेशव्यांची बहुतेक फौज इंग्रज पुण्यावर चालून येत होते त्यांशीं लढण्यांत गुंतली होती. कांहीं सुरापूरच्या मोहिमेवर परशुरामभाऊंबरोबर होती. याप्रमाणें त्या वेळीं रान मोकळें सांपडल्यामुळें करवीरकरांस चांगलेंच फावलें असतें, पण चिकोडीकरांनीं त्यांस तात्पुरतें आटोक्यांत ठेवून त्यांचा अधिक फैलाव होऊं दिला नाहीं. पुढें इंग्रज व दादासाहेब पराजित होऊन इंग्रज तळेगांवाहून मुंबईस परत गेल्यावर करवीरकरांची धडपड अर्थातच कमी झाली. चिकोडी, मनोळी तर त्यांच्या हातीं लागली नाहींच; पण घाटगे, प्रतिनिधि व अमात्य यांस उपद्रव दिल्याबद्दल व प्रांतांत धामधूम केल्याबद्दल पेशवे सरकारांतून तंबी मिळण्याचें भय नवीन उत्पन्न झालें !

स० १७७९.

हैदरअल्लीवर स्वारी करण्याकरितां उभयतां कारभाऱ्यांनीं मोठी फौज घेऊन कर्नाटकांत जावें अशी मसलत पुणें–दरबारीं बरेच दिवस घाटत होती. त्याप्रमाणें इंग्रजांशीं चालू असलेली लढाई संप-

त्यावर कर्नाटकचे स्वारीस निघावयाचें नानाफडनवीस व सखारामबापू यांनीं कबूलही केलें होतें. तसें झालें असतें तर त्या उभयतांनीं कर्नाटकांत जातां जातां करवीरकरांचें पारिपत्य सहजासहजींच केलें असतें. परंतु सखारामबापूस शिंदे व नाना यांनीं कैद केल्यामुळें मोहिमेचा बेत तितकाच राहिला; आणि परशुरामभाऊ

एप्रिल.

सुरापूरचे मोहिमेवर गुंतले होते त्यांस नानाफडनवीस यांनीं लिहिलें कीं, सुरापूरच्या खंडणीचा उलगडा झाल्यावर तुह्मीं करवीरकर महाराज व कित्तूरकर देसाई यांच्या तालुक्यांत जाऊन त्या उभयतांचा बंदोबस्त करावा. त्याप्रमाणें आतां परशुरामभाऊ करवीरकरांच्या दंग्याचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यांच्या कटकोळ महालांत येऊन पोंचले होते.

त्या महालांत भाऊंचें लष्कर येतांच लक्ष्मणराव शिंदे तोर्गलकर यांनीं खंडणीचा जाबसाल सामोपचारानें संपविण्याची खटपट राजाबा पानशे यांच्या विद्यमानें केली; परंतु ती

मे.

सिद्धीस गेली नाहीं. भाऊनीं बन्नूर व कटकोळ या गांवांस जरब देऊन त्यांपासून अनुक्रमें तीस व दहा हजार रुपये खंडणी घेतली व दोन्ही गांवांत आपलीं ठाणीं घातलीं. नंतर तोर्गलकरांपासून थोडीबहुत खंडणी घेऊन ते मनोळी तालुक्यांतील सतीगिरें वगैरे ठाण्यांवरून गोकाकेकडे आले. इतकें होईतों जून महिन्यास सुरुवात झाली. त्यामुळें आठपंधरा दिवसांत मोहिमेचें काम बंद ठेवणें प्राप्त झालें. तितक्या अवकाशांत साधेल अशी मसलत भाऊंस पतकरावयाची होती. गोकाकचें ठाणें कित्तूरकर बळकावून बसला होता, व त्या ठाण्याच्या आसऱ्यानें राहून तेरदाळ परगण्यास उपद्रव देत होता, याकरितां त्यापासून गोकाकचें ठाणें घ्यावें ही एक मसलत होती. दुसरी मसलत करवीरकरांचीं अकीवाट व शिरोळ हीं ठाणीं काबीज करण्याची होती. पहिलीपेक्षां

दुसरी मसलत परशुरामभाऊंस फारच अगत्याची होती. अकीवाटकरांचा कुरुंदवाडास व शिरोळकरांचा मिरजेस फारच उपद्रवकारक शेजार झाला होता. अकीवाटापेक्षां शिरोळचें ठाणें फार बळकट असल्यामुळें तें यंदांच्या मोहिमेंत घ्यावें असें दोन महिने भाऊंच्या मनांत घोळत होतें. त्या कामापुरती एकहाती मुब्रलक फौज व चांगल्या थोर तोफा यंदां त्यांच्या स्वारींत होत्या. पंचवीस तीस खंडी दारू, पांच सात थोर तोफा, व शेंपन्नास कामाठी व गोलंदाज निमूटपणें तयार ठेवण्याविषयीं त्यांनीं मिरजेस गंगाधरराव यांस लिहून तितकी तयारी करविली होती. पण आतां अखेरीचे दिवस आल्यामुळें शिरोळचें ठाणें घेण्याची मसलत झेंपणार नाहींसें समजून भाऊनीं अकीवाटात वेढा घातला. तेंही ठाणें फार मजबूत असून आंत शिबंदीचे लोक निवडक व भरपूर होते. त्यांनीं तें ठाणें तीन आठवडे फारच शितापीनें झुजविलें. भाऊनीं मोर्चेबंदी करून तोफांच्या मारगिरीनें तटाच्या भिंतीस खिंडारें पाडून हल्ला केला

जून.

तेव्हां आंतले लोक जिवावर उदार होऊन मोठ्या आवेशानें लढले. त्यांनीं कौल मागितला नाहीं व बाहेरच्या लोकांनीं दिला नाहीं. आंतल्यांपैकीं शेवटचा शिपाई मारला जाईपर्यंत उभयपक्षीं हत्यार थांबलें नाहीं! त्यामुळें हें ठाणें काबीज होईपर्यंत भाऊंची हानि फार झाली. नुसत्या हल्ल्यांतच त्यांचें नामी नामी दोनतीनशें माणूस ठार पडलें, आणि तलवारीच्या व दगडाच्या जखमा लागलेल्यांची संख्या सातशेंपासून आठशेंपर्यंत होती! पुढें पावसाळा सुरू झाल्यामुळें मोहिमेचें काम तहकूब झालें.

इकडे श्रीमंत दादासाहेबांची झांशीस रवानगी झाली होती तें बऱ्हाणपुरापर्यंत जाऊन पोंचले. मंडळेश्वरास आनंदीबाई होती, ती तेथून निघून बऱ्हाणपुरच्या मुक्कामीं श्रीमंतांस येऊन मिळाली. दादासाहेब, आनंदीबाई, अमृतराव व बाजीराव हें सारें कुटुंब पांच वर्षांनीं

पुनः एकत्र झालें. श्रीमंतांबरोबर पंधराशें गारदी, पंधरा वीस तोफा व पांचसातशें स्वार इतका सरंजाम स्वतःचा होता त्यावर त्यांचा पूर्ण ताबा होता. श्रीमंतांस झांशीस पोंचविण्याकरितां महादजी शिंद्यांनीं हरी बाबाजी नांवाचा सरदार बरोबर दिला होता, त्याजवळ पांच हजार फौज होती ती शिंदे, होळकर व पेशवे यांची मिळून असल्यामुळें तिजवर त्याची हुकमत बेताबाताचीच होती. शिवाय तो सरदार अजारी असल्यामुळें सावधपणाविषयींचा त्याचा बंदोबस्त ढिला झाला होता. अशा स्थितींत विश्वासघात करून पळून जाण्याची युक्ति श्रीमंतांच्या मनांत आली व सांधि साधून ती त्यांनीं तडीसही नेली ! हें लष्कर नर्मदेच्या कांठीं पोंचलें, असतां दादासाहेबांचा व हरी बाबाजीचा असे दोन गोट एकमेकांलगत उतरले होते. आपलें पायदळ व तोफा नदीच्या उतारावर आगाऊ रवाना करितों, ते लोक नदीपार

जून.

झाल्यावर मागून साऱ्या लष्करानें नदी उतरून जाणें सोईचें होईल, असें मिष करून श्रीमंतांनीं तोफांची पायदळासह रवानगी केली. त्यांचा जाण्याचा रस्ता हरी बाबाजीच्या गोटावरूनच होता. तो गोट बेसावधपणानें अस्ताव्यस्त उतरलेला होता. श्रीमंतांच्या तोफा व पायदळ जवळ येतांच गोलंदाजांनीं तोफांचा भडिमार केला व पायदळानें बंदुकांच्या फेरांवर फैरा झाडिल्या ! त्यामुळें शेंकडों लोक मारले जाऊन सर्व फौज उधळून गेली; व खुद्द हरी बाबाजी दहा जखमा लागून ठार झाला. इतकें होतांच श्रीमंत दादासाहेब झपाट्यानें लांब लांब मजली करीत गुजराथेंत शिरून सुरतेस इंग्रजांची फौज जमा झाली होती तिला जाऊन मिळाले.

ती इंग्रजांची फौज ह्मणजे वारन् हेस्टिंग्स् साहेब यांनीं मुंबई सरकारच्या मदतीस बंगाल्यांतून पाठविलेलीं सहा पलटणें होत. त्या पलटणांवर जनरल गाडर्ड हा मुख्य सरदार होता. तळेगांवच्या पराजयामुळें झालेला दुर्लौकिक घालविण्याकरितां इंग्रजांस आतां मरा-

ठयांशीं लढणें प्राप्तच झालें होतें. आतां दादासाहेब त्यांचेकडे आले काय, आणि त्यांजकडून पुणें दरबाराकडे परत गेले काय, दोन्ही गोष्टींची त्यांना फिकीर नव्हती. तथापि जनरल गाडर्ड यानें दादासाहेबांस आश्रय देऊन सन्मानानें ठेऊन घेतलें. श्रीमंतांनीं पळून जावें म्हणून त्यांबरोबर शिंद्यांनीं मुद्दाम थोडी फौज दिली होती असें ग्रांट डफ्साहेबांचें म्हणणें आहे. परंतु हें मत चुकीचें असून श्रीमंतांस सहजगत्या दगाबाजी करण्यास ही संधी सांपडली असेंच आम्हांस अद्यापि वाटतें. सरकारांतून श्रीमंतांचा बंदोबस्त शिंद्यांकडे सोंपविला असतां ते त्यांच्या ताब्यांतून पळून गेले, सबब त्यांनींच त्यांस धरून आणून सरकारच्या हवालीं करावें असें नानांचें म्हणणें पडलें. श्रीमंत आपल्या ताब्यांतून पळून गेले हें पाहून शिंदे खजील झालेच होते. त्यांत नानांची याप्रमाणें टोंचणी लागतांच त्यांस चीड येऊन दोघांतलें सौरस्य कमी झालें. दरबारच्या कामांत शिंद्यांची ढवळाढवळ सुरू होतीच. प्रत्येक कारभारांत नानांच्या मतास न जुमानतां आपलाच हेका तडीस न्यावा इकडे त्यांची प्रवृत्ति अधिक वाढली. तें नाना व हरिपंत यांस असह्य झालें. अशी ही दरबारांत धुसपूस चालली होती. तरी सर्व गोष्टी बाजूस ठेऊन श्रीमंतांस आश्रय देणाऱ्या इंग्रजांशीं लढण्याकरितां शिंद्यांस आतां गुजराथप्रांतीं स्वारीस जाणें भागचें होतें. ती स्वारी ते न पतकरते तर त्यांचा लौकिक वाईट झाला असता. व राज्यांत त्यांचें वजनही राहिलें नसतें. ही स्वारी त्यांनींच पतकरावी हें नानाचें म्हणणें होतेंच. त्यास अनुसरून महादजी शिंदे इंग्रजांवर स्वारी करण्याकरितां आपलें सैन्य जमा करूं लागले.

आगस्ट.

आक्टोबर.

इकडे स० १७७९ चा पावसाळा संपतांच परशुरामभाऊ पुनः करवीरकरावर मोहीम करण्याच्या उद्योगास लागले. मिरज, तासगांव

व कुरुंदवाड येथील पथकें तयार होऊन आलीं होतीं तेवढींच बरोबर देऊन त्यांनीं चिकोडी परगण्याच्या संरक्षणाकरितां रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पाठविलें. त्याप्रमाणें रघुनाथराव भोज येथें तळ देऊन राहिले. मोहिमेस आणखी फौज लागेल तिची व तिच्या खर्चाची तजवीज पुणें दरबाराकडून अजून निश्चित झाली नव्हती. ती करून घेण्याकरितां परशुरामभाऊ पुण्यास गेले. तेथें त्यांचा मुक्काम असतां नाना व शिंदे यांचें भांडण अगदीं विकोपास जाण्याच्या बेतांत आलें होतें. शिंद्यांचें म्हणणें असें होतें कीं, आपण कबूल केल्याप्रमाणें दादासाहेब व इंग्रज यांचें पारिपत्य करण्याकरितां स्वारीस निघतों, पण आम्ही म्हणतों त्या दोन गोष्टी आधीं तुम्हीं कबूल केल्या पाहिजेत. गुरस्तां दादासाहेबांस झांशीस नेऊन ठेवण्याचें आम्हीं कबूल केलें तेव्हां श्रीमंतांच्या खर्चाकरितां सरकारांतून आह्मास जहागीर देऊं केली होती ती यद्यपि श्रीमंत आमच्या ताब्यांतून पळून गेले आहेत तरी सुद्धां द्यावी. कारण कीं श्रीमंत ज्यांच्या आश्रयास गेले आहेत त्या इंग्रजांवर स्वारी करण्याचें आम्हीं कबूल केलेंच आहे. आमची दुसरी गोष्ट अशी आहे कीं, तुम्हाजवळ हरीपंत फडके आहेत त्यांचें आमचें वांकडें आहे, ते नानाप्रकारें आम्हांविषयीं तुह्मास कुबुद्धि शिकवितात, याकरितां त्यांस दरबारच्या कामांतून काढावें. याविषयीं उत्तरें प्रत्युत्तरें होऊन उभयपक्षीं जिकीर वाढत चालली व कुतर्क उत्पन्न होऊं लागले. शिंद्यांचा मुक्काम त्या वेळीं जामगांवास होता. त्यांच्या लष्करांत एक दिवस अशी हूल उठली कीं, हरीपंत व परशुरामभाऊ हे लष्कर लुटण्याकरितां येत आहेत ! ही बातमी पसरतांच मोठी गडबड होऊन सारें लष्कर तयार होऊन हल्ला होण्याची वाट पहात उभें राहिलें. ही बातमी अजीबाद खोटी असल्यामुळें ही सारी गडबड आपोआप शांत झाली हें सांगणें नकोच. हेंच निमित्त करून शिंदे फौज जमवूं लागले

नोवें०

दिसें०

तेव्हां नानांसही हुजरातीच्या वगैरे पथक्यांस बोलावणीं पाठविणें भाग पडलें. याप्रमाणें या दोघां बलवान् मनुष्यांस संशयपिशाचिकेनें पछाडिल्यावर त्यापासून अनर्थही भयंकरच व्हावयाचे, परंतु सुदैवानें तसें कांहीं घडलें नाहीं. दोघांचीही आपसांत समजूत होऊन नानानीं शिंद्यांस जहागीर द्यावी आणि शिंद्यानीं हरीपंताविषयींचा आग्रह सोडून द्यावा असें ठरलें. मग होळकरांसह पंचवीस हजार फौज घेऊन शिंदे इंग्रजांशीं लढण्याकरितां गुजरायेंत निघून गेले.

स० १७८० सन १७८० च्या प्रारंभीं घडलेली व मराठी इतिहासांत फार महत्वाची गोष्ट झटली ह्मणजे पुणें दरबारानें हैदरअल्लीशीं केलेला तह ही होय. आपणाशीं लढण्याच्या बाबतींत मुंबई, मद्रास व बंगाल येथील सर्व इंग्रजांचें एकमत झालें आहे त्याअर्थीं यापुढें इंग्रजांशीं युद्ध होईल तें बहुत निकरानें होईल व तें बरेच दिवस चालू राहील असें नानांस कळून चुकलें. याच वेळीं हैदरअल्लीनें दक्षिणमहाराष्ट्र ग्रासिलें असल्यामुळें त्याचा प्रतिकार करणें अत्यावश्यक झालें होतें. दोन्ही गोष्टी एकदम करण्याचें आतां मराठी राज्यांत सामर्थ्य राहिलें नव्हतें. यामुळें नुकसान सोसूनही हैदरअल्लीशीं मैत्री करावी यावेरीज गत्यंतरच राहिलें नाहीं. हैदराशीं तह झाला त्यांत असें ठरलें कीं, तुंगभद्रा व मलप्रभा यांमधला मुलूख हैदरानें घेतला आहे तो पेशव्यांनीं त्याजकडे ठेवावा. हा तह होतांच आज

जाने० अनेक वर्षें महाराष्ट्र व म्हैसूर येथील सरकारांत जो युद्धप्रसंग सुरू होता तो बंद पडून एकोपा झाला. या एकोप्याच्या पायावर एक प्रचंड कारस्थान उभारलें गेलें. या कारस्थानाचा मूळ उत्पादक निजामअल्ली असून कारस्थानाचें स्वरूप असें होतें कीं, पेशवे, हैदर, निजामअल्ली व भोसले या चौघांनीं एक संकेतानें एकदम स्वाऱ्या करून हिंदुस्थानांतून सर्व इंग्रज लोकांस कायमचें हुसकून लावावें!!! त्यांत पेशव्यानीं मुंबई, गुजराथ व अंतर्वेदी येथील

इंग्रजांस पादाक्रांत करावें, भोंसल्यानीं बंगाल्यावर स्वारी करावी, निजाम-अल्लींनीं सिकाकोल राजमहेंद्रीकडे जाऊन तो प्रदेश घ्यावा, आणि हैदरानें आपलें सर्व बळ खर्चून मद्रासेवर स्वारी करून इंग्रजांचें तिकडील राज्य घ्यावें, अशी चौघांमध्यें कामाची वांटणीसुद्धां झाली होती! यांपैकीं कोणाकडून कोणचें काम पार पडलें हें आम्ही यथाप्रसंगीं दाखवूं.

पुण्यास परशुरामभाऊंचा मुक्काम असतां फौजेच्या मागील देण्याघेण्याचे लढे होते ते दरबाराकडून उरकून घ्यावे व चालू सालच्या मोहिमेबद्दल खर्चाची तरतूद सरकारांतून करून घ्यावी म्हणून भाऊंनीं फार प्रयत्न केला; पण मिष्ट भाषणाखेरीज नानांकडून त्यांस विशेष कांहीं प्राप्त झालें नाहीं! मागच्या देण्याघेण्याचें तर राहोच, पण चालू सालच्या मोहिमेस खर्च लागेल ह्यांपैकीं लाख रुपये मात्र आपण देऊं, बाकी खर्चाचें तुम्ही स्वारींतल्या स्वारींत भागवून घ्यावें, असें नानांचें ह्मणणें होतें! भाऊ रुसवा करून पुण्याहून कातरजेस आले, मागून हरीपंततात्यानीं येऊन हातापायां पडून समजूत करून त्यांस परत नेलें हें सारें झालें. पण नानाकडून कांहीं द्रव्य निघण्याचा योग मात्र दिसेना! शेवटीं पुण्यास तीन महिने राहिल्यावर कंटाळून परशुरामभाऊ मिरजेकडे येऊन करवीरच्या मोहिमेवर पुनः रुजू झाले. मागच्या वर्षाप्रमाणें यंदाही रास्ते, प्रतिनिधि, अक्कलकोटकर भोंसले हीं सरंजामी पथकें व कांहीं पागा त्यांबरोबर चाकरीस होत्या. एकंदर फौजेचा जमाव दहा हजारांवर असून शिवाय पायदळ व तोफांचा सरंजामही चांगला होता.

फेब्रु०

शिरोळ हें करवीरराज्यापैकीं ठाणें मिरजेपासून सात मैलांवर असून मध्यें कृष्णानदी आहे. त्या ठाण्यांतील लोकांपासून मिरज व भोंवतालचीं खेडीं यांस फार उपद्रव होत असे. शिरोळच्या लोकांनीं उन्हाळ्यांत नदीस उतार असतो तेव्हां अलीकडे येऊन शिवारांतलीं

बुचाडें जाळावीं, धान्य व चिरगूट पांघरूण लुटावें, माणसें तोडावीं, गुरें वळवून न्यावीं; मग मिरजेच्या लोकांनीं नदी उतरून जाऊन करवीर हद्दींतल्या गांवांवर तोच प्रयोग करावा; असें दोन चारदां तरी घडल्याशिवाय वर्ष सुनकें जात नसे! उत्तरेकडच्या शिवारांत शेतकरी पेरणीस गेले असतां पलीकडच्या लोकांनीं गोळ्या मारून पेरणी बंद पाडावी, मग शेतकऱ्यांनीं मिरजेच्या किल्ल्यांतून जेजाला व जेजालदार नेऊन एकीकडे पलीकडच्या लोकांशीं लढाई करावी आणि एकीकडे आपलीं शेतें पेरावीं, असेंही कित्येकदां झालेलें आहे! या उपद्रवामुळें चीड येऊन शिरोळचें ठाणें घेऊन पाडून टाकावें या हेतूनें स. १७७५ त पांडुरंगराव पटवर्धन यांनीं मोठ्या फौजेनिशीं येऊन शिरोळास वेढा घातला होता, व करवीरकरांनीं थोड्याशा लोकांनिशीं येऊन त्यांस तेथून हुसकून लाविलें होतें, हें या पुस्तकाच्या पांचव्या भागांत वर्णिलें आहे तें वाचकांस आठवत असेलच. त्या पराजयामुळें पटवर्धनांच्या शिपाईगिरीच्या कीर्तीस काळिमा लागला होता तो दंश परशुरामभाऊंच्या मनांत सारखा डांचत होता. महादजी शिंद्यांनीं करवीरकरांशीं तह ठरवितानां शिरोळ देण्याचा मुद्दा घातला होता; पण तें ठाणें आह्मी तुम्हांस देत नाहीं, त्याबद्दल दोन लक्ष रुपये खंडणी अधिक देऊं, असें करवीरकरांनीं ह्मणतांच शिंद्यानीं आपला मुद्दा सोडून दिला.! गतवर्षीं करवीरकरांनीं आपण होऊन तह मोडलासें पहातांच शिरोळ घेण्यास ही संधि उत्तम आहे असें भाऊंच्या मनांत आलें. पण सुरापूरची मोहीम आटपावयास उशीर झाला त्यामुळें शिरोळ घेण्याची मसलत तितकीच राहिली, हें मागें सांगितलेंच आहे.

यंदां स्वारीची सिद्धता होतांच परशुरामभाऊंनीं शिरोळास एप्रिल महिन्याच्या प्रारंभीं वेढा घातला. ठाण्यांतले लोक एप्रिल. मर्दुमीनें सुमारें तीन आठवडे लढले. या सुमारास मानाजी फांकडे हैदराच्या कैदेंतून सुटून करवीरकरांच्या आश्रयास आले होते.

ते फांकडे व सटवोजी भोसले व राजमंडळचे येसाजी शिंदे वगैरे सरदार पराक्रमांत कमी नव्हते. परंतु भाऊंसमोर येऊन लढण्याजोगी फौजेची तयारी करवीरकरांची नव्हती, त्यामुळें शिरोळास कुमक पोंचविणें कोणाकडूनच झालें नाहीं. भाऊंनीं तोफांच्या माऱ्यानें ठाण्याची तटबंदी जागोजाग ढांसळून पाडिली; व ता. १ मे रोजीं हल्ल्यानें ठाणें

मे. घेण्याचा सिद्धांत ठरविला. अमुक गोष्ट झाली म्हणजे फौजेनें हल्ला करावा असा संकेत ठरला होता. हल्ला झाला तेव्हां भाऊ देवपूजा करीत बसले होते. हल्ला झाल्याची वर्दी येतांच ते देवपूजा तितकीच टाकून पळत जाऊन हल्ला करणाऱ्यांच्या पुढच्या रांगांत निशाण होतें त्यापाशीं जाऊन उभे राहिले! हल्ला झाला, घटकाभर वीरश्रीची उभयपक्षीं खडाजंगी होऊन शेंकडों माणसें मारिलीं गेलीं, ठाण्यावर पेशवे सरकारचें निशाण फडकूं लागलें, आणि मग भाऊंनीं परत येऊन स्वस्थपणानें देवपूजा वगैरे ब्रह्मकर्म समाप्त केलें! ब्राह्मणांनीं आपला धर्म सोडून क्षात्रधर्माचा अवलंब केला होता त्या अर्थीं भाऊंचें हें वर्तन क्षात्रधर्मास अनुसरून ठीकच झालें! ठाण्यांतले लोक घुमटांत कोंडले गेले त्यांनीं तिसरे दिवशीं कौल मागितल्यावरून त्यांस भाऊंनीं सोडून दिलें, पण शिरोळचे मामलेदार अंताजी जनार्दन व सरनोबत विठोजी सुर्वेशी यांस मात्र मिरजेच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें.

शिरोळ घेतल्यावर भाऊंनीं हुकेरी व सेंडूर हीं ठाणीं घेतलीं.

मे. मिरज, कुरुंदवाड, चिकोडी व निपाणी या ठाण्यांस अनुक्रमें शिरोळ, अकीवाट, हुकेरी व सेंडूर हीं करवीरकरांचीं ठाणीं फार त्रासदायक झालीं होतीं व तीं घेणें प्राप्त झालें होतें; म्हणून गतवर्षीं व यंदां मिळून हीं चार ठाणीं भाऊंनीं घेऊन पेशव्यांच्या राज्यापैकीं हा प्रांत करवीकरांच्या उपद्रवापासून निर्वेध केला. नंतर भाऊंनीं सामानगडच्या रोखें चाल केली. तिकडे जातांना

इचलकरंजीकर व्यंकटराव घोरपडे यांस त्यांनीं करवीराजवळ ठेविलें. करवीरकरांकडे नेहमीं पेशव्यांच्या मुलखांतून रस्त जाते ती बंद करावी, कोडोली, अळतें, शिरोळ वगैरे ठाणीं राखावीं. आणि करवीरकर, येसाजी शिंदे वगैरे सरदारांस जरबेंत ठेवावें, हीं तीन कामें व्यंकटरावांकडे सोंपविलीं होतीं. सामानगडाच्या घेर्‍यांत कापशीकर सेनापतीचे कांहीं गांव होते ते सामानगडकर्‍यांनीं घेतले होते. ते गांव परत घेऊन सेनापतीच्या हवालीं करण्यांत भाऊंचे पंधरा दिवस मोडले. त्या अवधींत कित्तूरकराशीं तहाचें बोलणें घाटत होतें, परंतु त्याचें बोलणें उडवाउडवीचें असल्यामुळें कोणताच ठराव होण्याचा रंग दिसेना.

अशी स्थिति असतां गोकाकच्या ठाण्यांत कित्तूरकर असल्याची बातमी सामानगडच्या मुक्कामीं परशुरामभाऊंस समजली. तेव्हां त्यांनीं तत्काळ तिकडे फौजेचें कूच करवून रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पुढें पाठविलें. ते जाऊन पोंचतात तों

जून.

कित्तूरकराचे दोन तीनशें स्वार व पांच सातशें पायदळ घटप्रभेच्या दक्षिण तीरीं उभें होतें त्यांची गांठ पडून लढाई झाली. तींत देसायाच्या लोकांचा मोड झाला. नंतर गोकाकेस चौक्या देऊन रघुनाथराव उभे राहिले तों सायंकाळीं सर्व लष्कर घेऊन परशुरामभाऊ येऊन पोंचले. दुसरे दिवशीं मोर्चेबंदी होऊन गोकाकेवर तोफांची मारागिरी सुरू झाली. आंत देसाई कोंडला गेला होता त्याजवळ तीनशें स्वार व हजार बाराशें प्यादे होते, परंतु दाणावैरण व दारूगोळीचा पुरवठा नव्हता. त्यामुळें आठ पंधरा दिवस लढाई झाल्यावर देसाई निरुपायानें भाऊंच्या स्वाधीन झाला. भाऊंनीं गोकाकेंत आपलें ठाणें बसवून देसायास मिरजेच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें.

करवीरकरानीं राल्यांच्या विद्यमानें भाऊंशीं तहाचें बोलणें सुरू केलें होतें. सात लक्ष रुपये खंडणी आपण देऊं असें त्यांचें म्हणणें होतें

तें भाऊनीं मान्य केलें होतें. परंतु इतर कित्येक बाबींचा पक्का ठराव अजून व्हावयाचा होता. खरोखरच तह करावयाचें त्यांच्या मनांत असतें तर आजला तह होऊनसुद्धां गेला असता! परंतु येसाजी शिंदे मूळचा दंगेखोर स्वभावाचा असून त्यास मानाजी फांकडे व सटवोजी भोसले या महा उपद्व्यापी व्यक्तींच्या संगतीचा लाभ झाला असल्यानें त्या तिघांची दंगाधोपा करण्याकडेच प्रवृत्ति झाली यांत नवल नाहीं. त्यांस आटोक्यांत ठेवण्यासाठीं भाऊंनीं व्यंकटराव घोरपड्यांची योजना केली होती, पण व्यंकटराव या तिघांच्या खिसगणतींत सुद्धां नव्हते! भाऊ गोकाकचें ठाणें घेण्यांत गुंतलेसें पहातांच या तिघांनीं कोल्हापुराबाहेर पडून वाळवें, इस्लामपूर, कऱ्हाडपर्यंत

मे. स्वाऱ्या करून गांव लुटण्याचा व जाळण्याचा सपाटा चालविला! ते बोभाटे दररोज पुणें दरबारापर्यंत जाऊं लागले, नानानीं व्यंकटरावास रागें भरून पत्र लिहिलें, पण व्यंकटरावांच्या हातून या तिघांचा कांहींच बंदोबस्त न झाल्यानें त्यांनीं प्रांत उध्वस्त करण्याचें काम खुशालपणें चालविलें होतें! व्यंकटरावास हे आटोपत नाहींतसें पाहून भाऊंनीं गोकाकच्या मुक्कामाहून आपले ज्येष्ठ पुत्र रामचंद्रपंतआपा यांबरोबर चार हजार फौज रवाना केली. रामचंद्रपंतांची ही पहिली स्वारी होय. त्यांनीं लांब मजली

जून. करून येऊन वाघापुरचे मुक्कामीं या त्रिवर्ग करवीरकरांशीं अचानक गांठ घातली. व त्यांचा पूर्ण पराजय केला. या प्रसंगीं रामचंद्रपंतास पुष्कळ लूट मिळाली. करवीरकरांची इतकी दाणादाण झाली कीं येसाजी शिंद्यास दहा स्वारांनिशीं करवीरास पळून जावें लागलें.

ही लढाई झाल्यावर करवीरकरांचा दंगा थांबला. पेशव्यांच्या आग्रहावरून त्यांनीं मानाजी फांकडे व सटवोजी भोसले यांस निरोप देण्याचें कबूल केलें. 'मानाजीनें पूर्वींप्रमाणें चाकरी करून श्रीमंतांच्या

पदरीं रहावें, त्याचा सरंजाम सरकारांत जप्त झाला आहे तो आपण सोडितों, ' असें नाना फडनवीस म्हणत होते; पण मानाजीस त्यांचा विश्वास न पुरल्यामुळें तो सांवतांच्या वाडीस जाऊन त्या मार्गानें मुंबईस जाण्याच्या वेतांत होता. परंतु त्यास तिकडे न येऊं देण्याविषयीं पेशव्यांचें सांवतांस पत्र गेल्यावरून मानाजीचा तो मार्ग बंद झाला. त्यामुळें तूर्त तो करवीरासच राहिला. तो फांकडा असल्यामुळें त्यास बाळगणें फारसें कठिण नव्हतें. परंतु सटवोजी भोसल्याची गोष्ट निराळी होती. त्याजवळ हत्ती, घोडे, उंटें वगैरे सरंजाम व जड जवाहीर व थोडीशी फौजही होती. ज्या धामधुमीवर त्याचा निर्वाह चालावयाचा, ती धामधूमच मुळीं करवीरकरानीं बंद केल्यामुळें सटवोजीस चरितार्थाची सोय अन्यत्र पहाणें अवश्यकच होतें. त्यानें परशुरामभाऊंकडे सल्ल्याचा पैगाम लाविला, तेव्हां त्यांसही कसें तरी करून ही व्याद या मुलखांतून काढून लावायचीच होती. त्यानीं पुणें दरबारास लिहून सटवोजीच्या नांवचीं मार्गाचीं दस्तकें आणवून त्याजकडे पाठवून दिलीं आणि इमानपूर्वक सांगून पाठविलें कीं, तुम्ही करवीरकरांचा आश्रय सोडून आम्हाकडे निघून यावें. पेशवे सरकारच्या पदरीं तुम्हास रहावयाचें असेल तर तशी सोय करून देऊं. तें तुमच्या मर्जीस न येईल तर तुमच्या इच्छेस येईल तिकडे मार्गस्थ करून देऊं. तें बोलणें कबूल करून सटवोजी भोसला डेरे-राहुट्या, हत्ती, घोडे वगैरे सरंजाम व सर्व मालमत्ता घेऊन करवीराहून निघाला तो मिरजेच्या आसपास भाऊंचें लष्कर होतें त्यासमीप येऊन उतरला. त्यास राखण्याकरितां भाऊंनीं जनोबा सुभेदार याबरोबर फौज पाठविली होती, तीही सटवोजीसमीप उतरून त्यावर टेहळणी करीत राहिली. त्यावर आपण प्रतिबंधांत सांपडलोंसें मानून सटवोजीनें विचार केला कीं, यांचें आमचें बनलें तर बरें. न बनलें तर हे

अक्टो०

## ( ३४७८ )



आपणास वाटेल तिकडे जाऊं देतीलसें कशावरून? आपण यांच्या तावडींत सांपडलों ही चूक झाली. तर आतां यांची नजर चुकवून परत करवीरास पळून जावें. असा विचार करून तो डेरेदांडे व बुणगें वगैरे जड सामान सारें तळावर टाकून सडें सामान व खजिना घेऊन पळाला! ही बातमी परशुरामभाऊंस कळतांच त्यानीं त्या सटवोजीचा पाठलाग करण्याकरितां तत्काळ जनोबा सुभेदार याजबरोबर फौज पाठविली. त्या फौजेनें त्याला गांठून त्याचे हत्ती, घोडे, उंट, पालख्या, खजिना, जवाहीर वगैरे सर्व लुटून फस्त केलें! तो मात्र कसा बसा जीव बचावून करवीरास पळून गेला.

---

नं. २५०२. ( ज्येष्ठ व० – जून प० पंधरवडा. )

" बन्नूरचे मुक्कामाहून तुह्माकडे पत्रें पाठविलींच आहेत. त्या अलीकडील वर्तमान तर तोरगलकराकडील कारकून रा।। राजोबा यांचे विद्यमानें बोलत होते, परंतु बनाव बसला नाहीं. यास्तव बन्नुरास तोफा लावून वीस हजारावर ठराव केला. कडकोळास चौकीस गोविंद सखदेव व भवानी शिवराम पाठविले होते. परंतु काल बन्नुराहून कूच करून मुक्काम मजकुरास बुनगे लावून देऊन आम्ही सडे-तोफांसुद्धां कडकोळास आलों तों दहाहजारांवर ठराव जाला. तोरगलचा फडशा बन्नुराखेरीज व्हावयाचा आहे, यास्तव आज मुक्काम केला. तोरगलचे पेठेवर फौज रवाना केली आहे. तोरगलचा फडशा होतांच सर्तीगिरे वगैरे मनोळी तालुक्यांत साधेल तें घेऊन गोकाकेकडे येत आहों. बदामीकरांनीं दोनशें राऊत व चार हजार पायदळ याप्रमाणें येऊन द्वादशीस उजाडतां केरुरास वेढा दिला. शिड्या लावून हल्ला केली. आंतील लोकांनीं शर्तीनिशीं हल्ला मारून काढिली. बाहेरील पन्नास साठ माणूस ठार पडले. लोकांनीं बाहेर पडून मारामारी केली तेव्हां नामोहरम होऊन माघारे बदामीस गेले. ठाण्यांत आह्माकडील शंभर गारदी व याखेरीज तीनशें माणूस, रास्ते याजकडील आहे. काल आह्मीं रास्ते यांस मेजवानी करून निरोप दिला. ते तालिकोट परगण्यांत जात आहेत. आह्मी चहूं दिवसांत गोकाकचे सुमारें येत आहों. आठचार दिवस कित्तूर तालुक्यांत घालवून करवीर तालुक्यांत येतों. पुढें त्यासुमारें येतों. "

नं. २५०३ श्रीगणराज. ( १० जून. )

तीर्थस्वरूप मातुश्री लक्ष्मीवाहिनी वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता।। ज्येष्ट व।।

---

१ वडील बंधु पांडुरंगराव यांची स्त्री लक्ष्मीबाई यांस गंगाधरराव गोविंद यांचें पत्र.

११ गुरुवारपर्यंत समस्त सुखरूप असों विशेष. वडिलीं कोतवडेंहून निघोन वजरीस मुक्कामास आलेवर पत्र पाठविलें तें पावलें व संगमेश्वरचे मुक्कामाहून वासुदेवपंताचें पत्र व तीन फणस आले ते काल पावले. वडिलांचें येणेंही एकदोन दिवसांत होईलच. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री दादासाहेब झांशीस जावयाकरितां बऱ्हाणपुराहून पुढें गेले तों सौ॥ आनंदीबाई तिकडून आली. नंतर नर्मदेवर गेले. समागमें राजश्री महादजी शिंदे यांजकडील हरि बाबाजी होते त्यांस बरें वाटत नव्हतें. श्रीमंतानीं तोफा व गाडदी नर्मदा उतरावयास म्हणून उताराकडे पाठविले; आणि हरि बाबाजीचें लष्कर उतरलें तेथें जवळ जातांच तोफांची व गाडदी यांची सलक केली; तेव्हां गोट उधळला. कांहीं लुटला गेला. हरि बाबाजीस दहा जखमा आहेत. असा प्रकार जाहला. तदनंतर चोळी महेश्वरावर मुक्कामास गेले. सुरतेस मागती इंग्रजाकडे जाणार. येणेंप्रमाणें वर्तमान आलें. राजश्री महादजी शिंदेकडील सरदार पेंचांत आला. श्रीमंतानीं या प्रकारें केलें म्हणून शिंदे फौज जमा करितात. श्रीमंतांवर जावें असा मनसबा केला आहे. श्रीमंत पंतप्रधान यांचे प्रतापें सर्वही यथास्थित होईल. नानाप्रकारें लोकवार्ता उठत असेल यास्तव लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

नं. २५०४. (आषाढ शु० १–१५ जून.)

अंताजी विठ्ठल यादवाडकर यांचें बाळासाहेबांस पत्र—२९ जमादिलावलचें. तेरदाळाहून—

"हैदरखानाची फौज निजाम उद्दीन दरोगा याजसमागमें दहाहजार स्वार व दहा हजार बार व दहा तोफा ऐसें सामान बदामीनजीक आलें आहे. श्रीपतराव शिवमोघेही मागाहून पांच हजार फौजेनिशीं येणार. चिरंजीव राजश्री भाऊसाहेबांची स्वारी घटपा पार

गेली असें ऐकून शेर होऊन पुढें आले आहेत. आणि कृष्णेपर्यंत मुलूख मारणार. बागडकोट व केरूर वगैरे तमाम ठाणीं घेणार. भाऊसाहेबांची फौज माघारी आली तरच इकडील बचाव होईल ! ”

नं. २५०५ श्रीगणराज. (आषाढ शु० ११–२४ जून.)

राजश्री वासुदेव सदाशिव व शंकराजी मोरेश्वर स्वामी गोसावी यांसः–

विनंती उपरी. तुम्ही सौम्यवासर अस्तमानचें पत्र पाठविलें तें आज गुरुवारीं अकरावे तासीं पावलें. लिहिलें वृत्त सविस्तर कळलें. पखाली व कुंभारकाम लिहिल्याप्रमाणें रवाना केलें आहे. रातबिरात बहुत सावधपणें राहोन वरचेवर वर्तमान लिहित जाणें. सामान लागेल तें वरचेवर येतच आहे. रा। छ० ९ जमादिलाखर गुरुवार तास रात्र आवशीची. एक पखाली पाठविला आहे. एक बरोबर दिलेलाच आहे. गाडद्यांचे बिरादरीगणीक पखाली आहेत. गाडदीही फार नाहींत. सरकारकाम वक्तानुसार पडतें. त्यांचे जमातदारांस सांगोन पाणी गाडद्यांचे भरतीपुरतें देऊन हशमी लोकांसही देवविणें. हल्लींचा पखाली उद्यां निघोन येईल. ‘थोरल्या तोफा दारुगोळा याची भिस्त तुम्हाकडेच म्हणून नारोपंतास लिहिलें, व अंशेकरून आम्हास लिहिलेवरून कळलें. त्यास काल दोन खंडी दारू पक्के किल्लेपैकीं तोफखानेकडील कारकुनाचे पदरीं माप घातलें. आज पुण्याहून दहा खंडी दारू आलेली लष्करास आली आहे. येथें भारी तोफा आहेत त्यांस बैल नाहींत. रयतेचे रोड बैल कामाचेही नाहींत, आणि लावणीचे दिवस आहेत. तीर्थ-

---

१ परशुरामभाऊनीं अकीवाटचे ठाण्यास वेढा दिला होता. तेव्हां भाऊंचे लष्करास मिरजेहून तोफा व गारदी व किल्ल्याचें हशम पायदळ गेलें होतें. त्यावरचे हे दोघे कारकून. त्यांस हें व याचसंबंधाचीं पुढचीं पत्रें गंगाधरराव गोविंद यांनीं मिरजेहून लिहिलेलीं आहेत. २ हें कुंभारकाम म्हणजे शिपाई लोकांच्या उपयोगाकरितां रांजण, मडकीं, परळ वगैरे !

स्वेरूपांस सरकारकारखानेपकीं शंभर बैल पाठवावे म्हणून लिहिलें आहे. बैल आल्यास थोर तोफही एखादी पाठवून देऊं. पालांविशीं लिहिलें, त्यास घेऊन कांहीं पाठवून देतों. तुम्ही तोफांचे बार राखूनच करावे. सामान सरत आलें म्हणजे पूर्वी दोन दिवसांची बेगमी राखून लिहित जाणें. 'नवा गोलंदाज ठेविला' ह्मणून लिहिलें, उत्तम केलें. चांगला आहे त्या पक्षीं करार होईल. बहुत काय लिहिणें हे विनंति. पै।। छ० ९ जमादिलाखर पहांटेची दोन तास रात्र. समानैन.

नं. २५०६. श्रीगणराज. (आषाढ शु० १०–२३ जून.)

राजश्री वासुदेवपंत व शंकराजीपंत व गंगाधर नारायण स्वामी गोसावी यांस—

सेवक गंगाधर गोविंद. नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. काल तुम्ही कागवाडचे मुक्कामीं गेलां. पालें पावलेचें उत्तर आलें. आणखीही घेऊन पाठवून देतों. आज तुम्ही नदी उतरावयास गेलां ते समयीं जिव्या माळी तिकडून पत्रें घेऊन आला त्यानें सांगितलें. तुम्ही गेलेवर वडिलांची व चिरंजीवांची भेटी कोठें जाहली, तुह्मास मोर्चांची आज्ञा कोणीकडे केली, आज तुम्ही आपलेकडील तोफांचे आवाज किती केले, सामान पाहून वडिलांची आज्ञा काय जाहली, गांवचा दम कसा आहे, भिंताड पडतें कीं नाहीं, काल कुमक गांवांत गेली ह्मणोन ऐकतों हें खरें किंवा बातील, आह्माकडील गोलंदाजांचे गोळे कोणाचे कसकसे लागतात, हें दिनप्रतीनें आळस न करितां लिहीत जाणें. आज दोन खंडी दोन मण तीन शेर दारू पक्के तोफखानेकडील राजश्री सखो निळकंठ आले होते त्यांचे पदरीं माप घातलें. सदरहू दारूस बंदरे सुमार एकशें तीन आहेत. ते तुह्माजवळ घ्यावे. बदरेचें वजन वजा होऊन बाकी

१ परशुरामभाऊंस लष्करास. २ हरिहरराव पांडुरंग यांची. ३ मिरजेहून तोफा व पायदळ वगैरे सामान तुह्माबरोबर गेलें आहे हें पाहून परशुरामभाऊ काय म्हणाले?

दारूची पावती घेऊन पाठविणें. येविशीं वडिलांसही लिहिलें आहे. तुम्हीं दारू लष्करांत गेलेवर विनंति करून वदरे चौकशीनें वजन करून घेणें. आणि बाकी दारूची पावती घेऊन पाठविणें. रवाना छ० ८ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. रातबिरात बहुत खबरदारीनें राहणें. हे विनंती. हशम लोक नेमणुकेप्रमाणें तेथें गेले अगर कोणी राहिले हें कळलें पाहिजे; याजकरितां तेथें शोध घेऊन लिहिणें. येथेंही वरचेवर ताकीद होतच आहे, हे विनंती.

पै॥ छ० ९ जमादिलाखर. दहा तास दिवस. सन समानैन.

नं. २५०७. श्रीगणराज.(आषाढ शु० १–२९ जून.)

राजश्री वासुदेव सदाशिव व शंकराजी मोरेश्वर स्वामी गोसावी यांस–

विनंती उपरी. तुम्हीं छ० ११ व छ० १२ व छ० १३ जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. काळे पहाडाचा हटवा मोडला त्यास नीट करावयाचें सामान पाठवावें म्हणून यादी सामानाची पाठविली ती पावली. ऐसियासीं हटवा तेथें नीट करावयाचा नाहीं. नाव तेथें आली म्हणजे काळा पहाड बैल देऊन इकडे पाठवणें व जंबुरा काना थोर झालेलाही पाठवणें. येथेंच हटवा नीट करूं. तेथें करावयाचा नाहीं. सामान पाठवीत नाहीं. वेंकूस लवकर पाठवून देणें. नरसापा तेथें तुम्हाजवळ आहेच. येथें आणखी नवे गाडे तयार करावयाचे वगैरे काम कितेक वेंकूकरितां तटलें आहे. तरी जलदीनें वेंकूस पाठविणें. वराणेपुरीचा धुरा मोडून कागवाडावर राहिल्याचा प्रकार लिहिला तो कळला. आजपावेतों नदीवर तोफ गेलीच असेल. नाव तेथें आलेवरी पलीकडे येईल. "मोर्चे गांवा-

१ पत्र गंगाधरराव गोविंद यानीं मिरजेहून अकीवाटास पाठविलें. २ 'काळा पहाड' हें तोफेचें नांव. ३ हें ही तोफेचें नांव.

जवळ गेले. अद्यापि (आंतले लोक) बोलों लागले नाहींत. हल्ला करणार म्हणतात;" म्हणून लिहिलें, (व) लोक जखमी व ठार झाल्याची यादी पाठवितों म्हणून लिहिलें तें कळलें. गंगाधरपंत यांस गोळी लागल्याचा मजकूर लिहिला तो कळला. कुरुंदवाडास गेले, देहावसान झालें, स्त्रीनें सहगमन संपादिलें, हेंही वर्तमान कळलें. मोठी वाईट गोष्ट जाहली. होणारास इलाज नाहीं. गंगाधरपंतासारिखें मनुष्य होणें नाहीं. सरकारचे गोळे घेतले म्हणून लिहिलें तें कळलें. उत्तम केलें. बदरे दारूचे सुमार १०३ येकशें तीन वाण्यासमागमें सरकारांत दारू दिली त्याचे पाठविले आहेत म्हणून लिहिलें तें कळलें. वाणी अद्यापि आले नाहींत. आले उपरी बदरे येऊन पोंचतील. सरकारांत दारू दिली त्याची पावती घेऊन पाठविली नाहीं, तरी पावती घेऊन पाठवणें. पखाली अद्यापि येऊन पोंचला नाहीं म्हणून लिहिलें, त्यास नदीवर पखाली गेलेला जिव्यास भेटला. तुम्हाजवळही आज पावेतों पोंचलाच असेल. जंबुऱ्याचा मजकूर लिहिला तो कळला. पर्जन्य लागल्याचा प्रकारही कळला. पालें पाठवून देतों. नाव अलासाजवळ गेली म्हणजे कणगीही पाठवितों. बैलांचे[1] दाण्याचा मजकूर लिहिला, त्यास नाव आले उपरी दाणा पाठवूं. तोंपावेतों विकत घेणें. जय विजयेचे[2] गोळे सरले म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास गोळे आजच रवाना करितों. येऊन पोंचतील. रवाना छ० १४ जमादिलाखर. तुम्हास जातेसमयीं सांगितलें होतें जे, लष्करचे सोद्यांस कांहीं देऊं करून उकाल गोळे गेलेले आणवावे. त्याप्रमाणें कांहीं गोळे तुम्हीं आणविले कीं नाहीं! नसल्यास सदर लिहिलेप्रमाणें आणविण. गंगेस[3] पाणी आलेमुळें सामान यावयास ढील पडतें, उपाय नाहीं. मावज्या म्हार याजबरोबर दहा म्हार देऊन आजच रवाना करितों. येऊन पोंचेल. पालेंही

---

१ बैल तोफा ओढणारे. २ जय व विजय हीं तोफांचीं नांवें. ३ कृष्णेस.

पाठवितों. जयविजयेचे गोळे सारे चारश पंचेचाळीस हात. आजपर्यंत तीनशें तुम्हाकडे आले. राहिलेले आज पाठवितों. अतःपर गोळे या तोफेचे नाहींत. चुडापा गेलेला इतकेंत गोळे घेऊन आला तर मिळतील. वडिलांसही लिहिलें आहे. तुम्हींही विदित एकांतीं करावें. माणस जायां ठार होतें, उपाय नाहीं. श्रीकृपेंकरून सर्व खैरच होईल. चिंता नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंति.

राजश्री गंगाधर नारायण यांस नमस्कार. सावधपणें असत जाणें. हे विनंति.

समस्त लोक नामजाद हशम किल्ले मिरज यांस आशीर्वाद. रात बिरात हुशार राहून साहेब काम करीत जाण. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १४ जमादिलाखर. भौमवासर. नऊ तास दिवस.

नं. २५०८. श्री. ( आषाढ–जुलई. )

* यादी. बंदिवान यांजकडे शिधा नेमणक. सु॥ समानैन मय्या व अल्लफ.

१ नरसिंगराव धायगुडे.

| | |
|---|---|
| असामी. | खुर्दा भाजी, टक्के २ |
| १ खासा. | तल दररोज ८८। प्रमाण. |
| १ पुत्र. | कच्चें वजन ८८४. |
| १ ब्राह्मण आचारी. चाकरीचा. | |
| १ शूद्र. | |
| — | |
| ४ | |

* ही याद राजकीय बंदिवानांच्या शिधा नेमणुकीची आहे. या बंदिवानांत धायगुडे हे मोठ्या योग्यतेचे सरदार दुर्दैवानें मोरोबाच्या फितुरांत गुरफटले गेल्यामुळें मिरजेच्या किल्ल्यांत कैदेंत होते. शिरहट्टीकर देसायाच्या बायका व पुत्र व दिवाण व परिवार मंडळी स० १७७७ च्या सप्टेंबरांत परशुरामभाऊनीं शिरहट्टी हल्ला करून

[ पान ३४८६ पहा.

बेगमी ता॥ छ० २० जमादिलाखर १६ रोजां.

वजनी. वजन पक्कें.

| | |
|---|---|
| ८॥। | तांदूळ बा॥ खा॥ |
| ८॥। | कणीक. |
| ८। | डाळ तुरी. |
| ८२ | पीठ जोरी. |
| ८८२ | मीठ. |
| ८८। | सुपारी. |
| ८८८१॥। | कात. |
| ८८२ | तूप. |
| ८८१॥। | गूळ. |
| ८८॥। | साखर. |
| ८८८१ | हिंग. |
| ८८८९ | जिरें, मिरें. |
| ८८। | हळद. |

८१॥।८॥११॥।

गवळ्याकडील.

८८३ लोणी.

८।६ तूप दररोज ८८१.

लांकडें जळाऊ. वजन पक्कें.

।. पांच मण.

तांबोळी. दररोज पानें.

२० पिकलीं पानें.

५ हिरवीं पानें.

२५

पानें ४००

पैकीं वजा एकादशी १ पानें २५ बाकी पानें ३७५.

---

पान ३४८५ वरून पुढें चालू.]

घेतली तेव्हां कैद झाली होती. हणमाजी शिवराम हा करवीरकरांच्या हद्दींत दंगा करणारा इसम होता. करवीरकरमहाराजानीं त्यास आमच्या स्वाधीन करावें असें सांगितलें असतां पेशव्यानीं तें न ऐकतां त्यास मिरजेस कैदत ठेविलें होतें. या सर्व कैद्यांस शिधा देण्यांत आला आहे त्यांत उत्तम, मध्यम, कनिष्ठ अशा प्रती आहेत त्या वाचकांस तारतम्यानें ओळखतां येतीलच. धायगुड्यांच्या शिध्यांत दोन खासे व दोन नोकर मिळून चार माणसें असून त्यांस ६४ भार वजनी शेर या हिशेबानें दररोजचा आकार पुढें लिहिल्याप्रमाणें बसतो. चार असामींस मिळून दररोज १२० तोळे तांदूळ. ८० तोळे कणीक. ४० तोळे डाळ. ४८ तोळे जोंधळ्याचें पीठ. ८ तोळे मीठ. १ तोळा सुपारी. ९ गुंजा कात. ८ तोळे खर्ची तूप. ६ तोळे गूळ. २

[पान ३४८७ पहा.

२ शिरटीकर देसाई यांजकडील दिवाण अटकेंत आहेत. असामी ७ एकूण. बेगमी एक माही. वजन पक्कें.

८२॥। तांदूळ.
८२ कणीक.
८॥५ तुरीची डाळ.
८८८९ जिरें, मिरें.
८८८१॥ हिंग.
८८॥। सुपारी.
८८८१। कात.
८८२ गूळ.
८८१ साखर.
८८७ तूप.
८८। हळद.
८८२ चिंच.

---

-॥८८११॥।

३ शिरटीकर देसाई यांजकडील ब्राह्मण व शूद्र असामी १९ बेगमी एक माही.

ब्राह्मण असामी ७. कली बारुलें.

८१। तांदूळ सडीक.
८२। जोरी पिठास.
८॥ डाळ तुरी.
८८१ मीठ.

---

८४८१
तूप वजन पक्कें ८८३ तीन शेर पक्का.

शूद्र असामी १२. कला बारुळ.

.।.।१॥। जोरी.
८८१ तांदूळ.
८।२। डाळ तुरा.
८८१॥। मीठ.

---

-।१८॥।

---

पान ३४८६ वरून पुढें चालू. ]
तोळे साखर. ६ गुंजा हिंग. ६॥ मासे जिरें. १ तोळा हळद. २ पैसे भाजीकरितां नेमणूक. ५ तोळे तेल. ३॥ तोळे ताजें लोणी. २० तोळे साजूक तूप. ११ धडा म्हणजे १२॥ शेर लांकडें. २० पक्कीं पानें. ५ कच्चीं पानें. याप्रमाणें हा शिधा आहे. यांत पांच भार तेल आहे तें दिव्याकरितां आहे. तेवढयांत अस्तमानापासून मध्यरात्री-पर्यंत एक दिवा सहज जळेल. बहुधा दगडी दिवा तितक्याच मापाचा केलेला असेल। फोडणीकरितां दोन वेळच्या सैंपाकांस ८ तोळे तूप आहे. मसाला जुंजबी आहे. चिंच व मिरची यांचें नांवच नाहीं ! विडयाची हिरवीं पानें ५ व २ तोळे साखर
[ पान ३४८८ पहा.

| | |
|---|---|
| मीठ कैली मापें ॥१. | वजन कच्चें. |
| शाकभाजीस खुर्दा. टक्के ३॥६. | ॥. चिंच. |
| तूप दररोज ॥१. | ॥६ मिरच्या. |
| तेल दररोज वजन कच्चें ॥९प्रा॑. | ॥१ हळद. |
| लांकडें जळाऊ. वजन पक्कें ४॥. | ---- |
| पानें दररोज हिरवीं ५० प्रमाणें | ॥७ |
| पैकीं वजा एकादशी २. | |

तेरीज.

| कैली बारूलें. | वजन पक्कें. | वजन कच्चें. |
|---|---|---|
| ॥१॥ | ३ | ॥७ |

लांकडें जळाऊ.

४ ब्राह्मणांकडे.

३॥ शूद्रांकडे.

----

१२॥

---

पान ३४८७ वरून पुढें चालू. ]

देण्यांत देवपूजेच्या विडा–नैवेद्याचीच योजना केलेली दिसते ! यांत खाण्याकरितां साखर नाहीं व त्याचें आश्चर्यही नाहीं. कारण कीं, त्या वेळीं ' चिनी साखर ' सुद्धां हल्लींपेक्षां तिपटीनें महाग असल्यामुळें तो श्रीमंतीचा व चैनीचा जिन्नस होता. मुलगा झाला म्हणजे साखर वांटावयाची ! पांढरपेशांव्यतिरिक्त जातींत वाग्निश्चयाच्या वेळीं ' गूळपान ' वांटावयाचें ! वजनी साडेबाराशेर म्हणजे सामान्य प्रतीचीं पांच सहाच लांकडें होतात. तितक्यांत स्नानें व दोनदां सैंपाक उरकावायचा तर बेत राखू-नच खर्च केला पाहिजे ! नं. २ च्या सदरांतले शिरहट्टीकर दिवाण ७ असामी यांची एक माही बेगमी आहे तिचें धायगुडयांच्या शिध्याशीं दुपटीचें प्रमाण दिसावें तें दिसत नाहीं. लांकडें तर थोडींच आहेत त्यावरून स्नानास ऊन पाणी अथवा संध्याकाळचा सैंपाक यांतून एकास फांटा दिल्यावांचून सुटका दिसत नाहीं ! यांच्या शिध्यांत चिंच मात्र एक जिन्नस अधिक आहे. सदर ४ मधला शिधा मुख्यत्वें बायकांचा आहे. त्यांत लसूण हा अधिक जिन्नस आहे. त्यांबरोबरच त्यांचा दळवाई म्हणजे सैन्याधिकारी आहे त्याजकरितां रोज एकदोनदां चिलीम ओढण्यापुरती तंबाखूही

[ पान ३४८९ पहा.

४ शिरटीकर देसाई यांजकडील बाइका वगैरे असामी ८.

बेगमी एक माही.

खासा असामी.

३ बाइका.

१ पुत्र.

१ दळवाई.

वजन पक्कें.

८१॥- तांदूळ.

८१।- कणीक.

८॥- डाळ तुरी.

८८१॥- तूप.

८८७ मीठ.

८८८१॥- हिंग.

८८८१३॥. जिरें, मिरें.

८८॥. लसूण.

८८२ चिंच.

८८८१।. कात.

८८॥। सुपारी.

शाकभाजीस खुर्दा दररोज ८६ प्रा॥ ३॥६.

लोणी वजन पक्कें ८८४.

तूप दररोज वजन ८८१.

लांकडें जळाऊ वजन पक्कें ।.

तेल दररोज ८८।९

दररोज हिरवीं पानें ५०

---

५ हणमाजी शिवराम असामी १

बेगमी एक माही.

वजनी. वजन पक्कें.

८।५॥. तांदूळ.

८।१॥. कणीक.

८८२॥। तूप.

---

पान ३४८८ वरून पुढें चालू.]
दिली आहे! कुणबिणी वगैरेस डाळ पीठ ८७ शेर दिलें आहे तें तिघींस दररोज ३ शेर प्रमाणें आहे. कारण हा जमादिलाखर महिना २९ दिवसांचा आहे. देसाइणीच्या व इतर सदरांत शाकभाजीस खुर्दा ८६ सहा रुक्के दिला आहे त्याचा अर्थ ६ पै. ३॥६ साडेतीन टक्के सहा रुक्के म्हणजे साडेचवदा आणे. टक्का म्हणजे चार आणे. पण रुपयाचा खुर्दा चार टक्केच मिळत असे असें नाहीं. त्याचा दर ३॥ पासून ५॥ पर्यंतही झालेला पहाण्यांत आहे! सदर ३ मधला १९ असामींचा शिधा कनिष्ठ-प्रतीचा आहे त्यांत मात्र मिरची भरपूर दिली आहे. बाकीचे चार शिधे उत्तम व मध्यम प्रतीचे आहेत, त्यांत मिरची मुळींच नाहीं हा चमत्कारच आहे! आणखी एक गोष्ट लक्षांत घ्यावयाची कीं, सदर ३ मधल्या शिध्यांत 'जोरी पिठास' म्हणून

[पान ३४९० पहा.

| | | | |
|---|---|---|---|
| ८८॥. | तंबाकू. | ८८२।' | गूळ. |
| ८८१॥ | साखर. | ८८८९ | सुपारी. |
| ८८१ | गूळ. | ८८४॥' | डाळ तुरी. |
| ८८।९ | हळद. | ८८१॥' | मीठ. |
| | | ८८१ | चिंच. |

८३॥।५।७।.

शूद्र माणसें व कुणबिणी असामी ३ तीन.

डाळ पीठ शिरस्तेप्रों वजन पक्कें ८२८७.

८॥।९८९

शाकभाजीस खुर्दा टक्के २

लांकडें जळाऊ वजन मण ८१

तेल दररोज कच्चें ८८।'

नं. २५०९. श्रीगणराज. (श्रावण शु० १३-२४ आ०)

आज स्वारी राजश्री हरिहरराव पांडुरंग दिमत राजश्री पंत-प्रधान. तहां शिष्यसमुदाय मठ संबंधीं. मौजे मालगांव, कर्यात बेडग, प्रांत मिरज. सुरू सन समानैन मय्या व अल्लफ. गंगाधर अय्या काळा जंगम पट देवरू मठ मौजे मजकूर यांत व गोरा गंगाधर अय्या जंगम यांत माजे मजकूरचा पट व मठसंबंधें कजिया लागोन हरदू जण किल्ले मिरजेस हुजूर येऊन आपलाली हकीकत विदित केली. त्यावरून हरदू जणांपासून राजीनामे व जामीनकतबे व केरीने घेऊन देशमुख व देशपांडे प्रांत मजकूर व मौजे मजकूरचे मोकदम व काड देवरू शिध-गिरीकर व भोंवर गांवचे जंगम व कसबे मिरज येथील समस्त देवें घ जंगम यांस आणून आज्ञा केली जे, " कोणाची रू रयात न धरितां

---

पान ३४८९ वरून समाप्त. ]
लिहिलें आहे व इतरत्र ' पीठ जोरी ' असें लिहिलें आहे. याचा अर्थ सदर ३ मध-ल्या १९ ब्राह्मण व शूद्र असामींनीं आपले जोंधळे आपणच दळून घ्यावे असा होतो.

१ कैफियती. २ लिंगाईत जात.

उभयतांचा हरएक मजकूर मनास आणोन वाजवी असेल त्याप्रमाणें विदित करणें. " त्यावरून देशमुख देशपांडे व समस्त पंचाईत यांनीं हरदू जणांचे करीने पाहून मजकूर मनास आणितां ' गंगाधर अय्या गोरा जंगम मठाधिकारी होऊन मठांत राहत होता त्याजवर शब्ददोष आला, याजकारितां तो पेटास व मठास उपयोगी नव्हे. त्यास समंध नाहीं. ' म्हणून पेशजी मौजे मजकूरचे मोकदमा वगैरे जंगम यानीं श्रीमंत कैलासवासी गोविंदपंत नाना यांस येऊन निवेदन केलें. त्याजवरून सन तिसा सीतैनांत गंगाधर अय्या काळा जंगम यास पटीं बैसविलें. त्यांनीं पट व मठाधिकार अनुभवावा. ऐसा कयास करून देशमुख व देशपांडे व समस्त पंचाईत यांनीं सविस्तर मजकूर हुजूर निवेदन केला. त्यावरून मनास आणितां गंगाधर अय्या गोरा याजवर शब्ददोष आला, त्यामुळें यास पटास व मठास समंध नाहीं. गंगाधर अय्या काळा यास पेशजी पट जाला आहे त्याचप्रमाणें त्यानीं पट व मठ मौजे मजकुरीं सुदामत अनुभवावा; ऐसें जाणून त्यास दुमाला पत्र दिलें आहे. व तुह्मास हें पत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं समस्त शिष्यवर्ग मौजे मजकूरचे मठाखालीं सुरळीतपणें वर्तत जाणें. जाणिजे. छ० ११ माहे साबान. मोर्तबसूद.

नं. २५१०. श्री. ( १६ दिसेंबर. )

राजश्रिया विराजित राजश्री नारोपंत नाना दामले स्वामीचे सेवेशीं पो॥ जनार्दन माधवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ मार्गशीर्ष शु० ८ बुधवारपर्यंत सुखरूप असों. विशेष. आपण कृपा करून पत्र व चिरंजीव राजश्री आनंदराव याचें

१ मूळ शब्द पट्ट म्हणजे मुख्य आसन. २ आनंदराव माधव तोफखानेवाले सांवशीच्या लढाईत हैदरअलीकडे पाडाव सांपडले होते ते अद्यापि श्रीरंगपट्टणास कैदेंतच होते. त्यांच्या बंधूनें हें साताऱ्याहून पत्र पाठविलें.

हस्ताक्षर पत्र पाठविलें त्यावरोन परमानंद पावलों. त्यानीं लिहिला अर्थ सविस्तर समजला. सारांश भेटी होईल तो सुदिन असे ! आमचे सर्वस्वी प्राण त्याजपाशीं आहेत. वरकड सांसारिक अर्थ आमचा आम्ही जाणो. चहूंकडून पेंचांत आहों. ईश्वर निभावून नेईल तें खरें ! यंदा धारण पांचे सवापांच या प्रांतीं आहे. खर्च भारी आहे. पुण्याहून सरकारांतून राजश्री तात्या जोशी व गोजंभट व रा॥ नरसिंगराव वकील हैदरखानाकडे बोलीस गेले आहेत. आम्ही त्यांस चिरंजीवाविशीं विनंति केली आहे. मिरजेस आले असतील ते समयीं राजश्री गंगाधररावजींची भेट झाली असेल. त्यानीं जें सांगणें तें सांगितलें असेल. तें आपणास समजलें असेल. सारांश सुटका होय तो अर्थ बोलण्यांत असल्यास आम्हास सर्व जोड पावली. यानंतर तिकडोन कोण आला तो भेटता तर तिकडील वर्तमान समजतें, त्यांचे अन्नवस्त्राची गत काय आहे तें समजत नाहीं. आपण त्यास पुशिलें असेल, परंतु आह्मास कांहीं लिहिलें नाहीं ! त्यास या गोष्टीचा सविस्तर शोध करून ल्याहावें. अगर राजश्री रावजींस विनंती करून त्यांस एकोपावेतों पाठविलिया बहुत उत्तम आहे. वकिलासमागमें आपलेतर्फेनें कोणी गेला असलियास वरचेवर वर्तमान कळेल तें ल्याहावें. सर्व भरंवसा आपला आहे. या समयांत जो परामर्ष कराल तो थोडा आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती. तुम्ही आपलें पत्र तिकडील आलें तें पाठविलें म्हणून लिहिलें, परंतु इकडे आलें नाहीं. दोन चिठ्या आमची व पानशे यांची मात्र दोन आलीं. आपणास कळावें म्हणून लिहिलें असे. हे विनंती.

नं. २५११. **श्रीगणराज.** (आश्विन व० ७–३१ आ०)

चिरंजीव राजश्री रघुनाथराव यांसी प्रती गंगाधरराव गोविंद आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० २० सवाल जाणून सदैव

१ शयास पांच सवापांच पायली. २ एक हजार रुपयेपर्यंत.

पत्र पाठवीत जावें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. प्याद्यांविशीं लिहिलें, त्यास प्यादे कालच पाठविले आहेत. पावले असतील. सावधपणें असावें. बातमी वरचेवर आणवीत जावी. इकडेही लिहीत जावें. तीर्थरूप राजश्री भाऊ[1] आज कूच करून पुढें जाणार होते. कळावें. आज अठरा घटकांनंतर मुहूर्त आहे. लोकांस पत्रें रवाना करितों. रा॥ गोविंदपंत मामास पत्र लिहिलें आहे. पावतें करावें. बहुत सावध असावें. बहुत काय लिहिणें. मानाजी शिंदा व सटवोजी भोसला कडकोळास एकंत्र जाहलेचें वर्तमान आहे. लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० २० सवाल. सन समानीन.

नं. २९१२. श्रीगणराज. (कार्तिक शु० १०-१८ नो०)

चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा यांसी प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जावें. विशेष. राजश्री गंगाधरराव नाना यांजकडून पत्र आलें तें पाहण्यास पाठविल आहे. सटवोजी भोसले याचा मुक्काम बुगवाड व मल्लापूर परगण गोकाक येथें आहे. इंदुवारीं होता म्हणोन राजश्री अंताजीपंत तेरदाळकर याचें पत्र सोमवारींचें आतांच आलें. हनगंडीचें ठाणें देसाई यांजकडील लोकांनीं बळकावून राखिलें होतें तेंही ठाणें घेतलें. लोक बाहेर निघाले. सटवोजी भोसले याजकडील वर्तमान लिहून पाठविणें म्हणोन तेरदाळकरांस लिहिलें आहे. आणखी येईल वर्तमान तें लिहून पाठवितों. कागवाडचे मुक्कामीं तुम्ही कधीं येतां तें

---

१ पुण्यास जाण्याकरितां. २ हैदराची स्वारी गुदस्तां आली तेव्हां तेरदाळकर देसायानीं हनगंडीच्या ठाण्यांत आपले लोक ठेवून ठाण्याचा बचाव केला. हल्लीं मिरजेहून लोक ठाण्यांत रहावयास गंगाधरराव यानीं पाठविले तेव्हां देसायानीं हनगंडीचें ठाणें त्यांचे हवालीं करून आपले लोक काढून नेले.

लिहून पाठवावें. आम्हाकडील लोक तीनशेंपर्यंत येथें जमा जाहले. तेरदाळास गेले ते याजखेरीज. वरचेवर येतच आहेत. पागाही लौकर दोन दिवसांत येईल. आज ब्रम्हाणपुरी तोफ अकीवाटावर जायां जाहली होती ताडाजवळ ती नीट जाली. काल गाडेवर चढविली यास्तव आजच बार तीस बत्तीस करणार. कळावें छ० ९ जिल्काद. डेरेस आला. येथून पत्र रवाना केलें असे. गोट पांच सातशेंचा आमचा उतरला आहे. तुमची पागा आलीच असेल. करवीरची बातमी आणून लिहवावी. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं २५१३. **श्रीगणराज.** (कार्तिक शु० ११-१२ नो०)

पै॥ छ० १० जिल्काद कार्तिकमास पांच घटका रात्र भृगुवार सन समानीन मय्या व अल्लफ.

चिरंजीव राजश्री रघुनाथराव यांसी प्रती गंगाधरराव गोविंद आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जावें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. " दशधेनूंच्या संकल्पापैकीं कांहीं धेनु द्यावयाच्या राहिल्या आहेत त्या कृष्णातीरीं देणार. यास्तव ग्रहण येथेंच करून कूच करावयाचें केलें " म्हणून लिहिलें, ऐशियास ग्रहणाचे पूर्वापर आठ दिवस कूच करितां येणार नाहीं. तेव्हां पंचमीपर्यंत मुक्काम पडल्यास आजच पत्र पावतांच प्रस्थान करून तळ ढाळावा आणि उदयीक कूच करोन कागवाडास यावें. ती॥ राजश्री भाऊंचा लाखोटा व तुह्मास आलेलीं पत्रें पाठविलीं आहेत; व राजश्री बाळाजीपंतांचीं पत्रें पुणियाहून तीर्थरूपांस आलेलीं आह्मांकडे आलीं तींही पाठविलीं आहेत. त्याजवरून सविस्तर कळेल. भवानजी पाटील यांची व तीर्थस्वरूपांची भेटी होऊन अलीकडे आले. एक दोन दिवशीं जवळ येतील. यास्तव तुम्ही उदईक कागवाडास यावें. आम्ही भवानजी पाटील यांजकडे पत्रें सांडणीस्वाराबरोबर रवाना

करितों. तुम्ही मुक्काम न करितां कूच करावें. रास्ते यांचेंही लष्कर लवकरच येईल. तूर्त भवानजी पाटील व तीर्थस्वरूप आमचे तालुक्यांत मुक्काम करून रान चारूं लागतील. सबब सारे एकत्र व्हावें ह्मणजे जथ पडला हें शत्रूसही कळेल. अनमान करूं नये. कूच करावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २५१४. ( २५ नोवेंबर. )

शिवाजी बाबाजींचें पत्र बाळासाहेबांस कार्तिक कृष्ण २ चें पुण्याहून—

" श्रीमंत राजश्री नाना ग्रहणासाठीं भीमेस भोंसें गांव आहे तेथें गेले होते. राजश्री मोरोबादादाच्या पुत्राच्या पोटांत कवळू जाली आहे यास्तव तुळा याणीं जाऊन केली. कालच माघारे आले, गार्डर[1] मुंबईस आला होता तो पुनः सुरतेस गेला. राजश्री लक्ष्मणराव चिटणीस सुरतेसच आहेत. सलुखाचा प्रकार नाहीं. गुजराथप्रांताच्या महालांस उपसर्ग करावा या मनसबियांत (इंग्रज) आहेत. राजश्री सखारामपंत बापू व मोरोबादादाकडील जवाहीर आदिकरून हातीं लागलें. आतां ठेवी वगैरे जागा जागां आहेत त्यांचा चौकशी होत आहे. राजश्री गोपाळ नाईक यांजकडे (मोरोबादादांची) साडेपांच लक्ष ठेव होती. त्यांत निमे ऐवज दादांनींच घेतला होता. निमे पावणेतीन राहिला तो द्यावा म्हणून तगादा नाइकास लागला आहे. नरसोबा नाईक मध्यें आहेत. खटपट करितात. वस्तभाव येणें जाणें मनास आणून भरणा करून घेतात. उभयतांकडील अगदींच जवाहिरसुद्धां ऐवज सिंहगडास खर्च न करितां ठेविला. कापड व घोडीं मात्र जिकडे तिकडे पडल्या[2] घोडयांत व पागा पागानीं दिलीं. कापड दसरियास

१ जनरल गाडर्ड. २ लढाईंत शिलेदारांचीं घोडीं पडलीं तर मोबदला घोडा अथवा किंमत सरकारांतून द्यावी लागे त्याऐवजीं.

खर्च जाले. त्रिंबकराव शिवदेव यांचे पुत्रापासून व पवारांचा कारभार त्यांजकडेच होता याजकरितां उभयतां मिळून पांच लक्षांची भरतीची बेरीज ठरली आहे. राजश्री चिंतो विठ्ठल शिंद्यांजवळच आहेत. त्रिंबकराव नारायण यांजपासून चाकरी नीट होत नाहीं यास्तव शिंद्यांच्या मतें चिंतो विठ्ठल याचे रदबदलीवरून रघुपतराव यांची उभारणी करावी असें आहे. आज काल शिंद्यांच्या उदरीं आलें आहे! मारून कुटून देल (?) देतो. वोढेकर व पवार आदिकरून शिंद्यांकडेच कारभार होत आहे. येणीं भलतें होय नाहीं म्हटल्यास शिंदे ऐकत नाहींत. त्यांचें ह्मणणें यांस ऐकणें प्राप्त होतें! सारा डौल तिकडे पडला आहे. येथील कारभारांत राजश्री नाना व राजश्री हरीपंततात्याशिवाय तिसरे थोडे बहुत कृष्णराव असतात. फार करून तात्यांखेरीज कोणती गोष्ट होत नाहीं."

नं. २५१५. (कार्तिक व० १२–४ दिसेंबर.)

नारो त्रिंबक यांच पुण्याहून बाळासाहेबांस पत्र २५ जिल्कादचें—

"श्रीमंत राजश्री राव[1]साहेब यांची भेट गुरुवारीं दशमीस सोळा घटकांस जाली. राजश्री हरीपंततात्या भेटीच्या समयीं होते. श्रीमंतांनीं सफेद पोशाख केला होता. मधील चौकांतच कचेरी होती. (श्रीमंतांनीं) खास निमचे व हत्ती आणून दाखविला. तिरंदाजी केली. तदोत्तर हरीपंततात्यानीं श्रीमंतांस विचारिलें कीं, भाऊनीं गांवांत रहावें कीं गोटांत रहावें? तेव्हां 'लष्करांत रहावें हेंच ठीक,' असें दोन वेळां उत्तर जालें. स्वहस्तें विडे दिले. दोन घटका बसून भोजनास गेले. राजश्री नानाचे मतें घोरपडीवर मुक्काम होता तेव्हांच सामोरें येऊन भेटावें असें होतें. परंतु (भाऊसाहेब) बातमी कळों न देतां गुरुवारीं

१ राजेबहादर मालेगांवकर. २ नानानीं. ३ काळे. ४ पेशवे.

भोजनापूर्वींच कूच करून सूर्योदयास नानाचे डेऱ्यास आले. तों नाना हजामतीस बसले होते. दोन नखें काढावयाचीं राहिलीं होतीं. तसेच येऊन भेटले. तेथेंच भोजनास राहविलें. मग बोलले कीं, " आलां उत्तम आहे. आमची बातमी चुकली. याप्रमाणें वारंवार कांहीं होणार नाहीं ! " याप्रमाणें विनोद नानानीं केला. नाना आज येथें येणार आहेत."

नं २५१६. श्रीगणपति. ( पौष व० १–३ जाने०

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी–

आशीर्वाद उपरी. राजश्री महादजी शिंदे यांसीं दुष्टबुद्धि निर्माण जाली आहे. फौजेची अद्यापि तयारी नाहीं. इंग्रजाचा तर बिघाड करविला. सुरतेस ( इंग्रजांची ) तयारी होत आहे. गुजराथ प्रांतीं फौज श्रीमंत रा॥ दादासाहेब यांजकडील गेलीच आहे. कांहीं अंमल उठविले. अहमदाबादेहून कांहीं लोक बाहेर पडले होते त्यांसीं दादा साहेबांकडील चंदरराव पवार गेले त्याणीं मोडलें. दोन तोफा अहमदाबादकरांच्या घेतल्या. त्या प्रांतीं फौज पाठवावयाची तरतूद होत नाहीं ( शिंदे ) स्वस्थ जांबगांवीं आहेत. त्यांचें ( नानास ) म्हणणें, " हरिपंत तात्या तुम्हांजवळ आहेत. ते नसावे. आमचें त्यांचें ठीक नाहीं. ते मनस्वी तुम्हास शिकवितात. यास्तव त्यांनीं घरीं बसावें. तरच तुमचा आमचा स्नेह. मी ( गुजराथच्या स्वारीस ) आज निघून जाईन ! ' भांडर म्हणोन झांशी प्रांतीं चार पांच लक्षांचा तालुका आहे तो गुदस्तां श्रीमंत झांशीस रवाना केले ते समयीं यांसी द्यावा, दोन हजार फौज उभयंतांचीही ( श्रीमंताबरोबर ) जावी त्याबद्दल द्यावा, असें ठरलें होतें. त्यासाठीं रुसवा. यांचें म्हणणें दादासाहेबांचा कारभार बिघडला त्यापक्षीं कां द्यावें ? त्यांचें ह्मणणें आह्मी तिकडील मनसुबाच कबूल केला

---

१ आमच्या गोटास. २ पुण्याहून परशुरामभाऊंचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस ३ शिंदे-होळकरांची. ४ नानाचें.

त्या अर्थे क्षेप निक्षेप द्यावा. असें बोलतां बोलतां द्यावा असें ठरलें. परंतु " चिंतो विठ्ठल व सदाशिव रामचंद्र तुम्हांजवळ आहेत ते इकडे आम्हांकडे पाठवून द्यावे. तुम्ही निघून सुरतेच्या सुमारें जावें, तेव्हां सनदा देऊं. हरिपंतांचें नांव काढूंच नये. " असें रा॥ नारो शिवदेव यांजसमागमें ( नानानीं ) सांगून पाठविलें आहे. अद्यापि उत्तरें आलीं नाहींत. आल्यानंतर कळेल. आठ दहा दिवस जाले, शिंद्याच्या लष्करांत आवई पडली कीं " हरीपंत व परशुरामभाऊ असे फौज घेऊन लुटावयासीं येतात ! " त्याजवरून तेथें दोन प्रहरांच जिनबंदी जाहली ! येथें म्हणावें तर तसा प्रकार स्वप्नींही नाहीं ! राजश्री नानाचा भार भरंवसा सर्व पाटलावर; असें असतां अशीं चिन्हें होऊं लागलीं आहेत ! कोठवर जाऊन कशीं ठरतात पहावें. येथें म्हणावें तर पांच हजार फौज चांगली आहे. शिंद्याच्या लष्करांत आवई पडली यास्तव त्यानीं ही फौजेस पत्रें पाठविलीं. हे विचारांत पडले आहेत. शिंदे जें म्हणतात तें कबूल करितात. तत्रापि त्यांची रीत अशी : असा प्रकार आहे. यांत कसें घडेल तें वरचेवर लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद. पत्र गुप्त असावें. हे आशीर्वाद. छ १४ जिल्हेज. मार्गशीर्षमास. सन समानीन.

नं. २५१७. ( पौष शु० ३—९ जानेवारी. )

परशुरामभाऊंचें पुण्याहून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र पै॥ ३ मोहोरम.

" इंग्रजाचा बिघाड जाला. शिंदे शुद्ध सप्तमीस कूच करून जातात. येथून राजश्री गणेशपंत कात्रे यांची रवानगी होत आहे. इंग्रजांनीं सुरत अठ्ठाविशींत गडबड केली. गुजराथेंतही करणार. येथील फडशास प्रथम दिवसच आहे ! "

नं. २५१८. श्री. ( १० जानेवारी. )

श्रीमंत राजश्री रघुनायराव दादा यांसीं प्रती —

आश्रित त्रिंबकभट वाटवे. वेदोक्त आशीर्वाद. विनंति उपरी येथील क्षेम तागायत पौष वद्य त्रयोदशी बुधवारपर्यंत आपले कृपें-करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. परम समाधान जाहलें. असाच निरंतर पत्रद्वारें परामर्ष जाहला पाहिजे. पत्रीं लिहिलें जे, श्रीमंत राजश्री भाऊंचें येणें सत्वर व्हावें. अशास आपणाकडील अहर्निश चिंता लागली आहे. थोडेबहुतानें तोड का-ढून निघावें अशा योजनेंत आहेत. " फौजेची नालबंदी वगैरे खर्च झाला आहे तो तूर्त मागूं नये, कर्जाचे रुपये असतील तेच घ्यावे, म्ह-णून यत्न करीत होते. परंतु सरकारचे मतें निदान लक्षाची वाट करून द्यावी, आणि लक्ष अखेरसालपर्यंत नेमून द्यावे. वरकड तिकडे समजे-जोन घ्यावें." भाऊ म्हणाले, याजवर आपली स्वारीस जाण्याची निभा-वणी होणार नाहीं. तेपक्षीं रिकामें जावें, देवस्थापना करावी, म्हणून पंचमीचे दिवशीं तयारी केली. तों राजश्री हरीपंततात्यानीं येऊन राह-विलें. तदनंतर राजश्री नानानींही बोलावून नेऊन मायममतेनें फार भाषण केलें. परंतु ऐवज जाजती द्यावा हें कांहींच नाहीं ! राजश्री हरीपंततात्यांचा पुतण्या देवाधीन जाहला याजमुळें कालपासून बोलणें अगदींच बंद जाहलें. आपण तो पेंचांत. येथील निघावयाचा प्रकार या रीतीचा. यामध्यें फलदाता ईश्वर ! तात्यांचे सुतकाचे बारा दिवस जाले म्हणजे हरएक प्रकारें तोड पडेलशी दिसती. आपण भोजेपुढें जावयाचें करूं नये. भाऊ येईतपर्यंत तेथेंच रहावें. बोरगांव तैनातेंत व

---

१ हे परशुरामभाऊंचे उपाध्ये. यांचें याच मजकुराचें आणखी एक पत्र माघ शु॥ ९ चें आहे त्यावर मेबस्ती " छ० १२ सफर सन समानीन " अशी आहे.

इनामांत मागितलें आहे. करार होईलसें दिसतें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंति.

नं. २५११. श्री. ( १५ जाने० )

तीर्थस्वरूप सौभाग्यादि संपन्न मातुश्री माई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें बळवंतराव महादेव भिडे मुक्काम पुणें चरणावरी मस्तक ठेवून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत मिती पौष शु॥ ८ पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. आपले घरीं जुन्नरास साळी कुळंबीण पहिली होती ती हल्लीं किल्ले हडसर येथें गेली आहे. तिचा वळखी कुळंबी होता त्याणें येऊन सांगितलें कीं, साळी कुळंबीण तुमचे घरीं होती व ती हल्लीं हडसरेस आहे. परंतु ही बाटी आहे. त्यावरून आह्मीं त्यास विचारलें कीं, ही बाटी कशी आहे ? तेव्हां त्या कुळंब्यानें सांगितलें कीं, राघो अनंत परभू कुळकर्णी तो॥ नाणेमावळ याची ही लेक. ही मागें महाराजवळ गेली असा आळ हिजवर आला होता. त्याजकरितां साळीचें मडकें फोडून हिजला बाहेर घालविलें होतें. ती सात आठ वर्षें मुलकांत फिरत होती. ती रांडही आहे. त्यावरून आह्मीं साळीची चौकशी केली. तों तिणेंही सांगितलें कीं, "मी राघो अनंत कुळकर्णी याची लेंक खरी. मजवर आळ आला होता खरा. माझें मडकें फोडिलें होतें तेंही खरें. मग मी मुलकांत फिरत होत्यें. त्याजवर तुह्मांकडे आल्यें आणि तुमचे घरीं राहिल्यें. आपली जात चोरिली." असें सांगितलें. त्याजवर आह्मीं हें वर्तमान राजश्री नानाच्या[1] कानावर घातलें. त्याजवरून त्याणीं वेदशास्त्रसंपन्न राजश्री शास्त्रीबावा[2] व केशव भटजी साठे यांस सांगितलें. त्यावर त्याणीं आह्मांस प्रायश्चित्त नेमून दिलें. त्याजवरोन आह्मी उदईक प्रातःकाळीं निघोन प्रायश्चित्त घ्यावयास जुन्नरास गेलों. पौष

१ नाना फडनविसांच्या. २ रामशास्त्री न्यायाधीश.

शु॥ १४ चतुर्दशीस प्रायश्चित्त घेऊं. त्यास तुम्ही आमचे घरीं होतींत येविशीं आह्मीं वे॥ राजश्री केशवभटजी यांस पुसलें कीं, आमची चुलती व चुलतभाऊ व बहीण आमचे घरीं होतीं तीं हल्लीं मिरजेस गेलीं आहेत. त्याणीं काय करावें ? त्यावरून वे॥ केशवभटजीनीं पुसिलें कीं, तीं विभक्त आहेत कीं एकत्र आहेत ? त्यावर आह्मीं सांगितलें कीं, तीं विभक्त आहेत. दंग्यामुळें वरीष सहा महिने आमचे घरीं आहेत. त्यावरून त्याणीं सांगितलें कीं, त्याणीं मिरजेस येणेंप्रमाणें पत्र पावेल तेच दिवशीं एक दिवस निरशन उपोषण करावें. कांहीं भक्षूं नये. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं स्नान करून पंचगव्य घ्यावें. हा दोष निवारणार्थ प्राजापत्यें ब्राह्मणांस रौप्यमय द्यावीं.

२० सौ॥ मातुश्री माईनीं प्राजापत्यें सुमार १० दर प्राजापत्यास रुपये दोनप्रमाणें वीस रुपये दहा अगर वीस ब्राह्मण शिष्ट पाहून त्यांस द्यावीं.

१० गोविंदराव यांस प्राजापत्यें ५ दर प्राजापत्यास रुपये दोनप्रमाणें दहा रुपये दहा ब्राह्मणांस द्यावे.

१० साळूबाई भाटी यांस प्राजापत्यें ५ दर प्राजापत्यास रुपये दोनप्रमाणें दहा रुपये दहा ब्राह्मणास द्यावे.

---

४०

एकूण प्राजापत्यें वीस दर २ प्रमाणें रुपये चाळीस शिष्ट ब्राह्मण पाहून द्यावे आणि शुद्ध व्हावें. व रा॥ श्रीपतराव यांचे घरीं आपण गेलीं आहेत, त्यास त्याणीं पंचगव्य तेथें घ्यावें. येथें आह्मी पुण्यास श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांचे घरीं महिना दीड महिना पंगतीस भोजन करीत होतों. यास्तव श्रीमंत नानानीं दहा मासे सुवर्ण ब्राह्मणांस देऊन पंचगव्य घेतलें. व पंगतीस कारकून व भिक्षुक वगैरे

जेवीत होते त्याणीं एक एक प्राजापत्य दर असामीं रुपये दोनप्रमाणें ब्राह्मणांस देऊन त्याणींही पंचगव्य घेतलें. तर राजश्री श्रीपतराव याणींही पंचगव्य घ्यावें व प्राजापत्य ब्राह्मणांस द्यावें. याप्रमाणें वे॥ रा॥ केशवभटजी साठे याणीं सांगितलें. त्याजवरून आपणास लिहिलें आहे. आपण एक दिवस कडकडींत उपोषण करून सदरहू लिहिल्याप्रमाणें वीस प्राजापत्यें ब्राह्मणांस देऊन शुद्ध व्हावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २५२०. ( पौष व० ४–२५ जानेवारी. )

नारो त्रिंबक यांचें पुण्याहून गंगाधरराव गोविंद यांस पत्र छ० १७ मोहोरमचें—

"मुसा लाली फिरंगी अदवानीचे कुमकेस्तव नबाब निजामअल्लीखान याणीं रवाना केला असतां हैदरखानानें फितावून त्यास आपणाकडे नेला, याजमुळें नबाब शत्रूशीं बिघाड करितात. तेव्हां सरकारांतून नबाबाची कुमक न जाल्यास तेंही वाईट दिसतें. इंग्रजांची मसलत उभयतां सरदारांनीं पतकरिली आहे, तोही शेवट सुधा दिसत नाहीं! इकडील कामकाजाचा फडशा तर पैशाविरहित सर्व बोलतात! राजश्री नाना परवां व तात्या काल येथें आले होते. यांचें कारण वद्य ५ स निघोन देवास कोंकणांत जातों असें भाऊसाहेब म्हणतात, यास्तव आले होते. यांचा तर आग्रह उदईक पंचमीस बुधवारीं निघावें असा आहे."

नं. २५२१. ( माघ शु० १३–१८ फेब्रुवारी. )

नारो त्रिंबक यांचे पुण्याहून छ० १२ सफरचें पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस—

"इकडील वर्तमान तर बोलण्याचालण्यांत कामास दिवसगत लागों लागली, याजमुळें श्रीमंत राजश्री भाऊसाहेब रुसवा करून

परवां द्वादशीस रात्रौ मुहूर्तेकरून श्रीमंतांस नमस्कार करून वस्त्रें ‹, घेतां दोन प्रहर रात्रीस कातरजेस आले. काल राजश्री हरीपंततात्या येऊन बोलणेंचालणें होऊन दोन प्रहर रात्रीस माघारे गेले. उद्ईक फिरोन तात्या येतील. समर्पक जाबसाल दिसोन आल्यावर मग राजश्री नाना येऊन निरोप देतील."

नं. २५२२. श्री.( माघ व० १–२१ फेब्रुवारी. )

छ० १५ सफर. सन समानीन. नाहावी.

शिरटीकर देसाई यांचे पोराकडे. नरसिंगराव धायगुडे यांजकडे
१ १

दोघांकडे नाहावी पाहिजे. आज्ञा १

पाठवून देणें. नाहावी याणें त्यांसीं बोलूं नये. सरकारचें माणूस जवळ असावें. हे विनंती.

छ० १५ सफर. सन समानीन.

नं. २५२३. ( माघ व० ५–२४ फेब्रुवारी. )

जिवाजी रघुनाथ ( पेशव्यांचा मोंगलाकडे वकील होता तो ) याजकडून बाळासाहेबांस पत्र. १८ सफरचें भागानगराहून–

"नबाब निजामअलीखान यानीं अदवानीच्या कुमकेस्तव मुसालाली फरासीस फिरंगी पाठविला. त्यास हैदरखान याने फितावून आपणाकडे नेला. याजमुळें नबाब शत्रूचे पारिपत्यास जाणार ह्मणोन ऐकतों. याजकरितां मुजरद जासूद जोडया तीन पाठविल्या आहेत. कच्चें वर्तमान लिहीत जावें;" ह्मणून लिहिलें, त्यास इंग्रजांचा व शिंद्यांचा बिघाड जालाच आहे. इंग्रजांवर शिंदे होळकर जात आहेत. ऐशियास मुसालाली बंदेगानअली यांजकडे गैरहजर राहून निघोन.

---

१ ही कैदखान्याच्या एका सामान्य बाबीसंबंधाची विनंति मिरज किल्ल्याचे हशमनीस नारो बाबाजी दामले यांनीं गंगाधरराव गोविंद यांस लिहिली असून याच चिठ्ठीवर " पाठवून देणें " येथपासून खाशानीं आपल्या हातानें उत्तर लिहिलें आहे.

गेला. जरीदा मात्र गेला. बाकी लोकांस धांवणीमुळें जाण्यास फुरसत पडली नाहीं, याजकरितां जागां जागां राहिले. बंदुका वगैरे यांजकडील लोकांनीं आणिल्या. हजरत हैदरखानाचे पारिपत्यास जाणार म्हणोन (आपण) ऐकिलें, त्यास हैदरखान याणीं अदवानी प्रांतांत दंगा केला. आसपास ठाणीं बसविलीं, त्याजवरून श्रीमंतानीं खानमजकुरांस माकुऊ करून लिहिलें कीं, हजरतीचा आमचा स्नेह अकृत्रिम. हल्लीं तुमचा जाहला. असें असतां अदवानी तालुक्यास उपद्रव करावा असा अर्थ नाहीं. अशीं पत्रें वरचेवर गेलीं; त्याजवरून खानमजकूर याणीं हरकत जाबसालावर घातलें आहे. इंग्रजाचा बिघाड उघडा जाहला. शिंदे होळकर कूच करून फौजेसुद्धां गुजराथेकडे गेले. राजश्री खंडोजी भोंसले फौजसुद्धां बंगाल्याच्या मोहिमीस जातात. हजरत शिकाकोळ, राजमहेंद्रीकडे जाणार. हैदरखान चिनापट्टणाकडे जाणार. याप्रमाणें नक्षा ठरला आहे. श्रीमंतांचे पुण्यप्रतापानें इंग्रजांचें पारिपत्य होईल."

नं. २५२४. श्री. (माघ व० १०–२९ फेब्रु०)

चिरंजीव राजश्री रघुनाथराव यांसी प्रती गंगाधरराव गोविंद आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० २३ सफर जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जावें. विशेष. तुम्हीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. झाळोजीराव घोरपडे यांचा मजकूर कळला. "शत्रूची फौज करवीराकडे गेली. तमदलग्यापावेतों तलाव्यास येत असतात. इकडीलही फौजा जात असतात. परंतु गांठी पडूं देत नाहींत" म्हणून लिहिलें, व "लोक फुटकळ शत्रूकडून उठोन येतात. कुडचीकर कांहीं आले," म्हणून लिहिलें तें कळलें. राघोजी जिवाजीचा माणूस सोडून द्यावा म्हणून लिहिलें त्याप्रमाणें सोडून देतों. "उगारचे

---

१ सडा, एकटा. २ मद्रासेकडे.

गाडदी उठवून आणविले. कारकुनास मिरजेस जाणेविशीं लिहिलें" म्हणून लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. वीं॥ राजश्री भाऊंचें पत्र छ० १९ सफरचें आलें. विसावे सफरीं कातरजेहून कूच करून पुढें येणार होते. गुरुवारीं तासगांवास येणार. राजश्री अंताजीपंत तेरदाळकर यांचें पत्र आज छ० २० सफरचें आलें त्यांतील मजकूर हैदरखानाची फौज-गजेंद्रगड धारवाडची फौज—दोन हजार व चार हजार गाडदी व तोफा दोन ऐसी नरगुंद प्रांतीं आली आहे. नरगुंदचीं खेडीं.... दहा बारा घेतलीं. आणखी घेतात. नरगुंदकर इडगल वगैरे जाग्यांचा बंदोबस्त करून आहेत. याप्रमाणें लिहिलें आहे. कळावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

पै॥ छ० २४ सफर. सन समानैन.

नं. २५२५. श्रीगणराज ( चैत्र शु० १-५ एप्रिल. )

राजश्री शंकराजीपंत स्वामी गोसावी यांसः—

विनंती उपरी. सालगुदस्तां अर्कीवाटावर हल्ला जाहली त्या समयीं गाड्यांचीं निशाणें जळालीं आहेत व लोक जखमी जाहले आहेत. त्यास तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांकडून हुजरातच्या लोकांस निशाणें जळालीं त्यांस व अंगावरील चिरगुटें जळालीं त्यांस व जखमी यांस काय पावलें असेल त्याची चौकशी करून लिहोन पाठवावें. व रोहिले यांचा शेरा कसा आहे; जमातदार, निशाणदार, व पोरगा पखाली हे सारे शेऱ्यांतच पाहून घ्यावे अगर तैनाता आहेत हें लिहिणें; म्हणून पेशजी तुम्हांस लिहिलें होतें; उत्तर आलें नाहीं; तें लिहिणें. रा॥ छ० २९ छ० रा॥ वल. समानीन. हे विनंती.

पै॥ छ० ३० रा॥ वल. सन समानैन

नं. २५२६. श्रीगणराज. ( चैत्र शु० १०–१४ ए० )

राजश्री नारोपंत स्वामी गोसावी यांस—

विनंती उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. ' बुचास अंबाडी आली नाहीं यास्तव एक मण विकत घेतली म्हणून लिहिलें तें कळलें. उत्तम केलें. कालच अंबाडी रुजू ताग बुचास रवाना केला. काल संध्याकाळ जाहलेमुळें राहिला असल्यास आज येऊन पोहोंचला असेल. तेथें अंबाडी विकत घेतली त्यास दर काय आहे तो लिहिणें. येथेंही मनास आणून तेथें घ्यावयाची झाल्यास तेथें घेणेविशीं लिहोन पाठवूं अथवा येथून पाठवावयासी येईल. काथ्याचाही दर मनास आणिला जाईल. शेरं केदारी खिजमतगारासमागमें देऊन बारा गाडे शेर पाठविला आहे. येऊन पोंचला असेल. दर्यावर्दी व पखाली चाकरीस ठेविला ह्मणून लिहिलें तें कळलें. चांगला धडधडीत सरकार चाकरी-उपयोगी असला म्हणजे उत्तम. येथें पाठवावयाचें प्रयोजन नाहीं. लोखंड व सूत पाठवावें म्हणून लिहिलें, त्यास सूत कालच रवाना केलें. पोहोंचलें असेल. लोखंड मणभर पाठवितों. शंकराजी मोरेश्वर यांच्या अस्थि न्यावयाविशीं ब्राह्मण पाठवावा ह्मणून लिहिलें त्यास तीर्थस्वरूप राजश्री भाऊंचें पत्र ब्राह्मणाविशीं काल रात्रीसच आलें होतें. आज प्रातःकाळींच ब्राह्मण जासूद आला होता त्यासमागमें पाठविला आहे. येऊन पोंचला असेल. समसूभाईस व मिरू नगारचीस गोळीचा धक्का लागल्याचा मजकूर लिहिला तो कळला. खैर जाहली, उत्तम गोष्ट जाहली. त्यांस खर्चास दिलें ह्मणून लिहिलें, उत्तम गोष्ट केली. आणखीं

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांचें शिरोळास. २ चुकून शब्द पडला तर तो चिताड न करितां ' रुजू ' हीं अक्षरें लिहून पुढें दुरुस्ती करण्याची पूर्वीं वहिवाट होती. ३ शिपाई लोकांस गोळीच्या टप्यांत बसतां यावें ह्मणून अडोसा करण्यास अथवा मोर्च्यापुढें आच्छादन करण्यास. ४ हा शिरोळच्या वेढयांत नुकताच ठार झाला होता.

जखमी होतील त्यांस खर्चास जखम पाहून तेथेंच देत जाणें. रात्रीस गोळी फार उडत होती; मोर्चे जवळ गेले आहेत; म्हणून लिहिलें तें कळलें. वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. रा॥ छ० ८ राखर, गुदस्ता तीर्थस्वरूप राजश्री भाऊनीं तीन हजार रुपयांचे गोळे खरेदी करविले त्याचा झाडा अलाहिदा पाठविला आहे. तीर्थस्वरूप राजश्री भाऊंस पत्र लिहिलें आहे. पत्र व झाडा प्रविष्ट करावा आणि सदरहू गोळ्यांचा ऐवज तीन हजार सवाशहात्तर रुपये मागून घ्यावा. चुडाप्पा कासार आला आहे. आणखी गोळे आणवावयाचे असल्यास तीर्थस्वरूपांस विचारून लिहोन पाठविणे. तीर्थस्वरूपांचे नांवें लखोटा निराळाच पाठविला आहे तोही प्रविष्ट तीर्थस्वरूपांस करावा. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पौ छ० ८ राखर. सन समानीन. चैत्रमास.

नं. २५२७. श्री. ( चैत्र शु० ११–१५ एप्रिल. )

पै॥ छ० राखर. सन समानीन.

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेशीं—

पो॥ केसो बल्लाळ व रामचंद्र बल्लाळ साष्टांग नमस्कार. विनंती आपण पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळला. आजचे रात्रीस खंदकाजवळ मोर्चे गेले. आंतून मार फार झाला. बाहेरील जखमी लोक फार जाहले म्हणून सांगतात. सविस्तर लिहावें. वे॥ राजश्री जोशीबावाकडे काल संध्याकाळीं गेलों होतों. भेट जाली. दोन तीन रोज औषध आलेचा रस, मध, तूप यांतच घ्यावयास सांगितलें. दुसरीं औषधें यादीप्रमाणें दिलीं. आज तयार होईल. तुम्हांस रात्री भोजन नाहीं. मोर्च्यांतच संध्या करितां तेथें फराळास काय मिळणार ? ब्राह्मण गेला तो रिकामा. त्याणेंही कांहीं नेलें नाहीं ! हल्लीं संताजीबरावर पोहे व गुळ-

---

१ पत्र मिरजेहून शिरोळास.

पापडी व केळें ६ पाठविलीं आहेत. कोरडे पोहे न खावे. भिजवून खावे. विसोबा खुशाल आहे. फोडया पाण्यास भरल्या. वाडयांतील कृष्णाप्पा मोघ्या ब्राह्मण यास फोडया आल्या होत्या तो काल रात्रीं देवाज्ञा जाला. विसोबाच्या फोडया चांगल्या आहेत. कळलें पाहिजे. मोर्चे फार जवळ गेले. ( तुम्हीं ) मोर्च्यांत बसावयाचें अगर जावयाचें काम नाहीं. खाशांजवळ राहून जें कामकाज होईल तें करावें. बहुत काय लिहिणें. सविस्तर ल्याहावें. येणार ते कधीं तें ल्याहावें. एक वेळ येऊन जावें. हे विनंती.

मौजे मल्लेवाडीवरी सरदेशमुखीचा रोखा सरकारचा जाहला आहे. ऐवज तो आपणाकडे नेमून घेतला आहे. तरी काय तो जाबसाल लिहिला पाहिजे. हे विज्ञापना. विश्वनाथभट नरसोबाचे वाडींत आहेत. ब्राह्मण सरस अर्घ्यप्रदानास पाहिजेत, त्यास काळंभटास चिठी लिहून पाठवावी म्हणजे भटजींस पाठवून देतील. हे विज्ञापना.

नं. २५२८. श्री. ( चैत्र व० ६-२४ एप्रिल. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेशीं.

पो बाळाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील ता॥ चैत्र ...... इंदुवारपर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तर ऐसें न करावें. सदैव पत्रीं सांभाळीत असावें. इकडील वर्तमान अधिकोत्तर ल्याहावेंसें नाहीं. तिकडील वर्तमान 'शिरोळास मोर्चे लाविले आहेत; शिरोळ जेर जालें असेल;' म्हणून वर्तमान बोलतात. आजपावेतों फत्ते जाहलें असेल. सविस्तर ल्याहावें. पुणियाकडील वर्तमान अलीकडे कांहीं कळत नाहीं. श्रीमंत राजश्री बळवंत-

---

१ करकंबचा कमाविसदार.

रावदादा यांजकडील वर्तमान कळत नाहीं. तेथें वर्तमान येत असेल. सविस्तर ल्याहावें. "गुजरायेंत उभयतां सरदार फौजसहित गेले आहेत. गायकवाड उभयतां श्रीमंतांस मिळाले आहेत. इंग्रज बाहीर आला आहे. नित्य गोळागोळी होती. ( यांनीं ) सुरत अठ्ठाविशींतील गांव जाळून टाकिले. अन्न मिळत नाहीं. रसद बंद. इंग्रज आयांस आला;" म्हणोन इकडे बाजारी बोल्तात. तिकडील सविस्तर लिहून पाठवावें. दादांचें वर्तमान कोणे ठिकाणीं आहेत तें ल्याहावें. सदैव पत्रीं राजकी स्वकीय वर्तमान लिहून पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २५२९. श्रीगणराज. (चैत्र शु० १२–१६ एप्रिल.)

राजश्री नारोपंत स्वामी गोसावी यांस–

विनंती उपरी तुम्हीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. गरनाळेचे गोळेविशीं लिहिलें, व तीर्थस्वरूपांची चिठी पाठविली ती पावली. त्यास गरनाळेचे गोळे त्या गरनाळेचे फर्म्यास येणार नाहींत. लहान आहेत. यास्तव पायरवटाचा शोध करून पायरवट पाठवून देतों. तेथेंच गोळे करवावे. 'महबुदल्ला खान रोहिले यांचे कर्णालेंचीस गोळी लागली. पांच रुपये खर्चास दिले आहेत. पुढें जखम पाहून द्यावे म्हणून लिहिलें ते कळलें. छ० १० रबिलाखर. दोन तास रात्र. हे विनंती.

---

१ शिंदे होळकर. २ फत्तेसिंग व गोविंदराव हे दादासाहेबास मिळाले. ३ पत्र गंगाधरराव गोविंद यांचें मिरजेहून शिरोळास. ४ कर्णा वाजविणाऱ्यास. गारद्यांच्या प्रत्येक जमातीस कर्णा, ताशा, निशाण, पखाल वगैरे सरंजाम पृथक् नेमिलेला असे. आरबांची जमात असेल तर तिला मर्फा हें एक अधिक वाद्य नेमिलेलें असे. हल्लीं युद्धाचे संकेत बिगुलांतून वाजवून दाखवितात ते सारे पूर्वी कर्ण्यांतून व शिंगांतून वाजवून दाखवीत.

नं. २५३०. श्रीगणराज. ( चैत्र व. ७–२१ एप्रिल. )

राजेश्री नारोपंत स्वामी गोसावी यांस विनंती उपरी. जिव्या-बरोबर पत्र पाठविलें तें पावलें. कहीचा प्रकार " ताकीद वेडोल करीतच आहेत. त्यांस वाईट वाटेसें न ल्याहावें," ह्मणून लिहिलें, त्यास काल गांव कहीनें झाबडले तितकेंच वडिलांस लिहिलें होतें. व चिरंजीव राजश्री दादांस लिहिलें. गांव अमके तसनस जाहलेचा विस्तार व तिगस्तां रामचंद्र गणेश व बाजीपंतीं मिरज प्रांत मारला ते समयीं वडील व तुम्ही मनोळीवर होतां. आमची धांवत तुम्हांस कसें ( तरी ) लिहावें म्हणजे झालें. प्रस्तुत फौजही तुमचीच. प्रांत दुसरेचा असा अर्थ नाहीं ! सर्व प्रकारें पेंचांत आहों हें ल्याहावेंसें नाहीं, तुम्हांस सर्व कळावें म्हणून लिहिलें. दुसरे कोणांस ल्याहावें ? वारंवार वडिलांस कहीचे बंदोबस्ताविशीं लिहितों म्हणून ........ कसा होईल इतकें लिहिलें होतें. त्याचीं उत्तरें आलीं कीं, " चिरंजीव राजश्री दादास कहीस पाठवून बंदोबस्त करवितों. कही कोणेकडे येते लिहिणें." त्यास "कृष्णा व वारणा उतरूं देऊं नये, (तरच) प्रांत वांचतो," अशी विनंती लिहिली आहे. तुम्हास कळावें. तुम्हीं पुढें जात न जाणें. चिरंजीव राजश्री रांव यांसही आमचा निरोप सांगावा. पुढें जाऊं नये. इतके ते म्हातारे जाहले नाहींत ! मेहनती करावयाचे दिवस पुढें आहेत. दुसरें कसबही नाहीं. वडिलांचे आज्ञेप्रमाणें असावें. हें काम करूं नये असें सांगावें. छ० २० रबिलाखर. तीन तास रात्र. आज तुमचीं पत्रें एकविसावी तारीख घातलेलीं आलीं. आज वीस तारीख ! हे विनंती.

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांचें मिरजेहून शिरोळास. २ परशुरामभाऊ. ३ शत्रूची टेहाळणी करण्यास फौजेच्या आघाडीस. ४ पुतण्या हरिहरराव. वय वर्षे अटरा वीस. ५ फक्त शिपाईगिरीचें कसब.

नं. २५३१. श्रीगणराज. ( चैत्र व० ८-२७ एप्रिल.)

राजश्री नारोपंत स्वामी गोसावी यांस—

विनंती उपरी. काल निमणी व नागांव दोन्ही गांवची कहीं जाहली. माणसें तोडिलीं. एक बायकोही तोडिली ! वडिलांस विनंती लिहिली आहे. तुम्हास कळावें ह्मणून लिहिलें आहे. बंडेखान इटेकरी याजबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. प्रांताची गत या प्रकारची ! बरें ! देव प्राधान्य आहे. रा॥ छ० २० रा॥ खर. दोन प्रहर. हे विनंती. पद्माकरपंत तोफखानेंतून आले. चारशें गोळे उसने चार साडेचार शेरी राजश्री राजेवानीं मागितले म्हणत होते. त्यास येथील गोळ्यांचा प्रकार तुम्हास ठाऊकच आहे. गोळे असते तर दिले असते. ग्राम तोफेचे गोळे न्यावयास मुद्दाम राजश्री राजावाचें पत्र घेऊन कारकून आला तो दोनशें गोळे घेऊन ( तेथें ) आला आहे. हे विनंती. पद्माकरपंतही सरकार शिलकेपैकीं गोळे निवडावयास आले आहेत. फर्मे लावून पाहतील. हे विनंती.

पै॥ छ० २१ रा॥खर. सन समानीन.

नं. २५३२. ( चैत्र व० १२–१ मे. )

नारो त्रिंबक यांचें पत्र बाळासाहेबांस शिरोळच्या मुक्कामाहून—रवाना छ० २५ रबिलाखर.

“ आतांच दोन प्रहरां गोपाळपंत सोनी यांचे मोर्च्याकडून लोक बुरजावर चढले. तों श्रीमंत राजश्री भाऊसाहेब देवपूजा करीत होते, तसेच निघोन तेथें गेले. हल्ला घुमटावरी जाली. घुमट फत्ते जाला. फार करून लोक आंत सांपडतील. बाहेर जाऊं पावणार नाहींत. श्रीकृपेंकरून फत्ते जाली. ”

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांचें मिरजेहून शिरोळास. २ पानशे तोफखान्याचे मुख्य अधिकारी यांनीं.

नं. २५३३. श्री. ( वैशाख शु० ६–१० मे. )

राजेश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस—विनंति उपरी. खंडाप्पा पाटील याजकडील म्हाळाप्पा ठार जाला, त्यास कफनास रु. ५ पांच रुपये देणें. छ० ५ जा॥वल.

नं. २५३४. श्रीगणराज. ( वैशाख शु० ६–१० मे. )

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस—विनंति उपरी. बडेखानाकडील दऱ्याप्पा ठार झाला. त्यास कफनास रु. ५ पांच रुपये देणें. छ० ५ जमादिलावल.

नं. २५३५. श्रीगणराज ( वैशाख शु० १०–१३ मे. )

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस–विनंती उपरी. रघोजी चिकजी मयेत जाला त्याची बाइको समागमें जात्ये. सबब खर्चास रु. २५ पैकीं पावले ५ बाकी २०.

वीस रुपये देणें. छ० ८ जमादिलावल.

नं. २५३६. श्री. ( वैशाख शु०–मे प० पंधरवडा. )

राजश्री दिवाणजी स्वामीचे सेवेशीं—सा॥ नमस्कार. विनंती. उपरी. जखमी लोक मिरजेस पाठविले आहेत. त्यास रामापा अगर खानाजी नापीक अगर हरकोणी तबीब मेळवून जखमी लोकांकडे नेमून द्यावा. जखमी लोक पोटासही परभारें देतील. आपण उत्तम ताकीद करून–रोजबरोज ताकीद अशी कीं रोजचे आठ आणे. (अशी करावी. ) तबीब रुपया घेतात. याविशीं ताकीद असावी. हे विनंती.

---

१ देणें यादी गंगाधरराव गोविंद यांची. सदरहूप्रमाणें पुढच्या दोन. २ शिरोळा-वरच्या हल्ल्यांत जखमी झालेला मिरजेस येऊन मयत झाला. ३ नारोपंत दामले यांचें शिरोळाहून मिरजेस वासुदेवपंत दिवाणजीस पत्र. ४ शस्त्रवैद्य.

नं. २५३७. ( वैशाख शु० १५–१८ मे. )

रामचंद्र परशुराम यांचे लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.–रवाना छ० १४ जमादिलावल.—

" कालच पुण्याहून पानशांची पत्रें आलीं. त्यांतील मजकूर– वेलापुरास इंग्रज आला होता त्याचें व बाजीपंतअण्णाचें झुंज जाहलें. यांचे फौजेनें पांचशें इंग्रज कापून काढिले, व चार तोफा पाडाव आणिल्या. त्यांत एक तोफ सत्रा शेरी आहे. आणखी बहुत सलतनत सांपडली. "

नं. २५३८. ( वैशाख शु० १५–१८ मे. )

आपाजी गोविंद यांचे लष्करांतून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र पै॥ १४ जमादिलावल.—

" सामानगडची खंडणी वीस हजार रुपयांवर श्रीमंत राजश्री दादानीं ठरविली, परंतु अद्यापि निशा नाहीं. यास्तव तोफा व फौज तयार करून माचीवर जावें असें ठरलें आहे. कित्तूरकराकडील कारकून आले आहेत. अद्यापि भेटी जाली नाहीं. करवीरचें बोलणें सात लक्षांवर ठरलें आहे. "

नं. २५३९. ( वैशाख व० ५–२३ मे. )

रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचे लष्करांतून मिरजेस बाळा-साहेबांस पत्र.–छ० १८ जमादिलावलचें—

" कित्तूरकर गोकाकेस आहे ही बातमी पक्की सामानगडचे मुक्कामीं आह्मांस कळली त्याजवरून आह्मी सडीफौजसुद्धां छ० १५ जमादिलावलीं दोनप्रहर दिवसास आलों. कित्तूरकराचा जमाव घटपा-पार होऊन दक्षिण तीरास स्वार दोन तीनशें व प्यादे पांच सातशें उभे होते. तेथें आमची त्यांची गांठ पडून लढाई झाली. त्यांचा मोड करून त्यांस माघारें गोटांत घातलें. चाळीस पन्नास माणूस त्याज-

नं. २५३३. श्री. ( वैशाख शु० ६–१० मे.

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस—विनंति उपरी खंडाप्पा पाटील याजकडील म्हाळाप्पा ठार जाला, त्यास कफनास[1] रु. ५ पांच रुपये देणें. छ० ५ जा॥वल.

नं. २५३४. श्रीगणराज. ( वैशाख शु० ६–१० मे.

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस—विनंति उपरी बडेखानाकडील दऱ्याप्पा ठार झाला. त्यास कफनास रु. ५ पांच रुपये देणें. छ० ५ जमादिलावल.

नं. २५३५. श्रीगणराज ( वैशाख शु० १०–१३ मे. )

राजश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस–विनंती उपरी. रघोजी चिकजी मयेत[2] जाला त्याची बाइको समागमें जात्ये. सबब खर्चास रु. २५ पैकीं पावले ५ बाकी २०.

वीस रुपये देणें. छ० ८ जमादिलावल.

नं. २५३६. श्री. ( वैशाख शु०–मे प० पंधरवडा. )[3]

राजश्री दिवाणजी स्वामींचे सेवेशीं—सा॥ नमस्कार. विनंती. उपरी. जखमी लोक मिरजेस पाठविले आहेत. त्यास रामापा अगर खानाजी नापीक अगर हरकोणी तबीब[4] मेळवून जखमी लोकांकडे नेमून द्यावा. जखमी लोक पोटासही परभारें देतील. आपण उत्तम ताकीद करून–रोजबरोज ताकीद अशी कीं रोजचे आठ आणे. (अशी करावी. ) तबीब रुपया घेतात. याविशीं ताकीद असावी. हे विनंती.

---

१ देणें यादीं गंगाधरराव गोविंद यांची. सदरहूप्रमाणें पुढच्या दोन. २ शिरोळावरच्या हल्ल्यांत जखमी झालेला मिरजेस येऊन मयत झाला. ३ नारोपंत दामले यांचें शिरोळाहून मिरजेस वासुदेवपंत दिवाणजीस पत्र. ४ शस्त्रवैद्य.

नं. २९३७. ( वैशाख शु० १५–१८ मे. )

रामचंद्र परशुराम यांचे लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.–रवाना छ० १४ जमादिलावल.—

“ कालच पुण्याहून पानशांचीं पत्रें आलीं. त्यांतील मजकूर–वेलापुरास इंग्रज आला होता त्याचें व बाजीपंतअण्णाचें झुंज जाहलें. यांचे फौजेनें पांचशें इंग्रज कापून काढिले, व चार तोफा पाडाव आणिल्या. त्यांत एक तोफ सत्रा शेरी आहे. आणखी बहुत सलतनत सांपडली. ”

नं. २९३८. ( वैशाख शु० १५–१८ मे. )

आपाजी गोविंद यांचे लष्करांतून मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र पैा। १४ जमादिलावल.—

“ सामानगडची खंडणी वीस हजार रुपयांवर श्रीमंत राजश्री दादांनीं ठरविली, परंतु अद्यापि निशा नाहीं. यास्तव तोफा व फौज तयार करून माचीवर जावें असें ठरलें आहे. कित्तूरकराकडील कारकून आले आहेत. अद्यापि भेटी जाली नाहीं. करवीरचें बोलणें सात लक्षांवर ठरलें आहे. ”

नं. २९३९. ( वैशाख व० ५–२३ मे. )

रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचे लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.–छ० १८ जमादिलावलचें—

“ कित्तूरकर गोकाकेस आहे ही बातमी पक्की सामानगडचे मुक्कामीं आह्मांस कळली त्याजवरून आम्ही सडीफौजसुद्धां छ० १५ जमादिलावलीं दोनप्रहर दिवसास आलों. कित्तूरकराचा जमाव घटपापार होऊन दक्षिण तरीस स्वार दोन तीनशें व प्यादे पांच सातशें उभे होते. तेथें आमची त्यांची गांठ पडून लढाई झाली. त्यांचा मोड करून त्यांस माघारें गोटांत घातलें. चाळीस पन्नास माणूस त्याज-

कडील ठार जालें. व घोडीं दहा पंधरा त्याजकडील पाडाव आलीं. आह्मांकडील चार माणसें ठार जालीं. घोडीं राजश्री गोविंदपंत मामा व भोंसले व आम्ही वीस बेवीसपर्यंत ठार जालीं. शिवाय जखमी आहेत. याप्रमाणें होऊन गांवास चौक्या देऊन आम्ही उभे होतों तों तेच दिवशीं संध्याकाळीं तीर्थस्वरूपही येऊन पोंचले. गांवासभोंवते मोर्चे बसवून चौक्या बसवून बंदोबस्त केला. तोफांची मारगिरी होत आहे. गांव गडबडला आहे. दोन चार दिवसांत फडशा होईल असें दिसतें. कित्तूरकरांकडील बोलण्याचें संधानही लागलें आहे."

नं. २५४०. श्रीगणपति. ( वैशाख व० ५–२३ मे. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १८ जमादिलावल भौमवासर मुक्काम गोकाक जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष तुह्मी छ० १५ जमादिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं कालच पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. 'करवीरकरांची फौज मौजे खेड तालुके वाळवें येथें येऊन गांवास वेढा दिला आहे' म्हणोन लिहिलें, व दुसरीं पत्रें छ० १६ जमादिलावलचीं पाठविलीं तीं आजच पावलीं. व बातमीचें पत्र गोट-खिंडीचें पाठविलें तेंही पावोन भाव कळला. राजश्री व्यंकटरावदादांस तिकडे तलावाकरणेविशीं ल्याहावें. शिरोळास सावधतेविशीं लिहोन पाठविलें म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. व्यंकटरावदादांस काल व आज लिहोन पाठविलें आहे. तिकडे तेलावे करितील. तुम्हीं वरचेवर बातमी त्यांस पोंचवीत जावें. त्यांजकडे आणखी फौजही पाठवून देतों. तेकडील रखवालीकरितां दादा घोरपडे नेहमीं त्या तोंडावर ठेविले आहेत. चिंता नाहीं. "करवीरकर मनोदयानुरूप तह करीत नाहींत. त्या पक्षीं चिकोडीकरांचे हवालीं करून पांच रुपये त्यांजपासून घ्यावे हेंच

१ मिरजकरांच्या पथकावरचे सरदार. २ अक्कलकोटकर. ३ गंगाधरराव गोविंद. ४ इचलकरंजीकर. ५ टेद्दाळणी. ६ हुकेरीचें ठाणें.

ठीक दिसतें " म्हणोन लिहिलें, त्यास करवीरकरांच्या बोलण्यांत रास्ते आहेत. त्या पक्षीं पुरता जावसाल तुटक समजल्याखेरीज कोणतीही गोष्ट करितां येत नाहीं. तुटक जाहल्यानंतर दुसरा पर्यायही करावयास येईल. " राजश्री चिंतामणराव शिवदेव यांजकडील बेरीज कारकुनी-सुद्धां एकवीसशें रुपयांवर ठराव करणें अशी आज्ञा, परंतु ते आपली नातवानी बहुत सांगतात. त्यांची पांचशें रुपयांची रदबदल आहे. यांत आज्ञा करणें ते करावी, त्याप्रमाणें ठराव करूं" म्हणोन लिहिलें. त्यास आम्हीं सांगितलें तें ठीकच आहे. तेवढी बेरीज फार नव्हे. तुमचे विचारें शें दोनशें निदान उणे करावे असें असल्यास कमी करून ठराव करावा. आणि ऐवज वसूल घ्यावा. " कवठें एकंद येथील चालत्या रानास तासगांवकर नवीन सालमजकुरीं कजिया करितात. याज-करितां बाजीपंतास पत्र लिहिलें असतां त्यानीं उत्तर लिहिलें त्याची नक्कल पाठविली आहे. मशारनिल्हेस लिहोन कजिया न करीत तें करावें. " म्हणोन लिहिलें तें विस्तारें कळलें. तुम्हीं लिहिल्यावरून बाजीपंतास पत्र पाठविलें आहे व परभारेंही लिहोन पाठविलें आहे. याउपर खटला पडणार नाहीं. ' गोकाकेस आलों; कित्तूरकर देसाई आंत आहे; गांवास चौकी दिली आहे; ' हें परवांच्या पत्रीं लिहिलेंच आहे. आंत .........मोर्चे दिले आहेत व तोफांची मारागिरीही होत आहे. आंत हजारबाराशें प्यादा व तीनशें राउत आहेत. परंतु दाणा वैरण दारू शिसें नाहीं, याजमुळें दम दिसत नाहीं. बाहेरून कुमक आंत यावी हा विचार राहिला. आसपास कीर्द चौकी दिली आहे. देसाई याजकडून बोलणें लागलें आहे. अतःपर दिवसगत लागत नाहीं. लौकरच उरकेल. ठरेल तें मागाहून लिहोन पाठवितों. कित्तूरकरांकडे अलीकडे पथकाचे सरंजामाबद्दल किती सालां ऐवज राहिला आहे हें मनास आणोन खंडणी व दरबारखर्च याची याद तपशीलवार सालो-सालची लौकर पाठवून द्यावी. " पंधरा हजार रुपये पैकीं पांचशें

राहिले तेही देवावे व चिरंजीव राजश्री केसोपंत काळे यांजकडून दहा हजार रुपये देविले ते लौकर प्रविष्ट होय तें करावें. पांच हजार केसोपंतमामाकडून घ्यावे. पांच आम्ही देतों असें केसोपंतानीं लिहिलें आहे; " म्हणोन लिहिलें, त्यास साडेदहा हजार रुपयेही केसोपंत काळे यांजकडूनच देविले आहेत प्रविष्ट करितील. तुम्हीं साडेदहा हजार केसोपंतासच मागावे. भरणा करितील. करवीरकर वाळवें तालुक्यांत वगैरे स्वाऱ्याशिकाऱ्या करितात यास्तव स्वार प्यादयांविशीं तासगांवाहून कदाचित् बाजीपंत यानीं तुम्हास लिहिल्यास पाठवून द्यावे. पत्र पावतांच शें पन्नास स्वार व कांहीं प्यादे तासगांवास जरूर पाठवून द्यावे. रामजी वैद्य याचें प्रयोजन आहे, यास्तव त्यास लौकर पाठवून द्यावा. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

छ० २१ जमादिलावल. सन समानीन. वैशाख मास.

नं. २५४१. श्रीगणपति. (वैशाख व० ५-२३ मे.)

श्रीमंत राजश्री व्यंकटराव दादा स्वामीचे सेवेशीं—

पोष्य परशुराम रामचंद्र सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० १८ जमादिलावल मु॥ गोकाक जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष आपण छ० १५ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें छ० १६ मिनहूस पावोन लिहिला मजकूर कळला. " मानाजीराव शिंदे व सटवाजी भोंसले शिये भुयावर जमावसुद्धां येऊन उतरले आहेत. पायदळ व तोफा आणून ठाण्याच्या गळीं पडावें असा मनसबा आहे. पडल्यास उपराळा चांगला जाहला पाहिजे. यास्तव आणखी फौज व खर्चाची तरतूद करून लौकर पाठवावी " म्हणोन कित्येक तपशीलवार लिहिलें तें सर्व कळलें. ऐशास " आम्ही गोकाकेस आलों, कित्तूरकर देसाई आंत आहे. भोंवताले चौकी दिली आहे; " म्हणून कालचे पत्रीं लिहिलेंच आहे. त्यास कालपासून तोफांची मारागिरी

होत आहे. मोर्चे आदितवार पेठेंत गेले व बोलणेंही लागलें आहे. याउपर येथील फडशाचा ठराव सत्वरच व्हावा असें आहे. येथील गुंता उरकूनच तुम्हाकडे फौज व खर्चाची तरतूद करून लौकरच पाठवून देतों. लढा नाहीं. आपण बातमी त्यांची राखोन रातबिरात बहुतच सावधपणें असावें. तूर्तच ठाण्याठुण्याच्या गळीं ते पडतील असें दिसत नाहीं. तत्रापि आपण कोडोलीचा बंदोबस्त चांगला करावा. तिकडील वर्तमान वरचेवर सविस्तर लिहीत जावें. रुपये पाठवावयाचे ते लवकरच पाठवून देतों. आपण सावध असावें. प्रस्तुत करवीरकरांचा जमाव वाळवेंप्रांतीं गेला आहे, म्हणोन शिरोळाहून व मिरजहून पत्रें आलीं. आपल्याकडेही लिहिलें असेल, तर बहुत सावध असावें. कोडोलीची बंदोबस्ती चांगली करावी. सारांश सावध असावें. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.[1]

नं. २५४२. श्री. ( वैशाख व० ६-२६ मे. )

विनंती सेवक सखो रंगनाथ साष्टांग नमस्कार विज्ञापना ता।। छ० २१ जमदिलावलपावेतों स्वामींच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष ...... दिवसेंदिवस मोर्च्यांची व चौक्यांची बंदोबस्ती फार जाहली आहे. तोफांची मारगिरी व तोफा पश्चिमेकडून लागू करून गांवांत गोळे नित्य टाकितात. गांवांत दाणाचारा दारूगोळा नाहीं, यामुळें आयां आहे. दोन तीनशें राऊत व दाड हजार पायदळ, खुद्द देसाई येणेंप्रमाणें आंत आहेत. देसाई याजकडील बोलणें पहिल्यापासून लागलें आहे. देसाई निदान सहा सात लक्षपर्यंत बोलतात. परंतु हे ऐकत नाहींत. हे निदान पंधरा लक्ष ह्मणतात. अद्याप ठरलें नाहीं. श्रीमंत दादासाहेबांचे विद्यमानें देसाई यानीं बाहेर यावें असें बोलण्यांत आलें. परंतु ठरावांत आलें नाहीं. एकदोन दिवसांत कायतो फडशा होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.[2]

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचे.

नं. २५४३. श्री. ( वैशाख व० १३–१ जून. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री व्यंकटराव स्वामीचे सेवेशीं—

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. तुम्हीं पत्र छ० २१ जमादिलावलचें पाठविलें तें छ० २६ मिनहूस प्रविष्ट जाहलें. "राजश्री परशुरामभाऊनीं शिरोळचें ठाणें घेऊन गोकाक प्रांतीं गेले. करवीरकर यांची फौज मिरज वगैरे जागां येऊन धामधूम करील याजकरितां आम्हांस फौजसुद्धां त्यांचे बंदोबस्तास ठेविलें आहे. सरकारचा ठाणीं करवीरानजीक घातलीं आहेत त्यांची बंदोबस्ती व करवीरची रस्त जाते त्यास चौक्या ठेऊन बंदोबस्त करितों. मानाजी शिंदे व सटवोजी भोंसले पन्हाळ्याचे आश्रयास राहून इसलामपुर व वाळवें प्रांतीं स्वारी करितात त्यांचा बंदोबस्त करणें तो केला आहे" म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास तुम्हां समागमें फौज देऊन रवाना केले त्याप्रमाणें फौजसुद्धां जाऊन जागा जागा चौक्या ठेऊन मानाजी शिंदा व सटवोजी भोंसले यांचा बंदोबस्त केला असतां कराड प्रांतीं उभयतां फौजसुद्धां येऊन गांव मारितात, लुटितात, जयरामस्वामींचें वडगांव मोठें संस्थान तें लुटिलें, कराड प्रांतीं उभयतांनीं मोठा दंगा केला असोन तुम्हीं त्यांची वातमी राखून फौजसुद्धां जाऊन पारिपत्य करावें तें न केलें ! "हे उभयतां पन्हाळ्याचे आश्रयास आहेत, त्यांचा बंदोबस्त करणें त्या प्रकारें केला," असें तुम्ही लिहितां, आणि उभयतां कराड प्रांतीं येऊन दंगा करितात ! दोन दोन मुक्काम करून राहतात ! हजार पांचशें फौज घेऊन अलीकडे येतात ते वातमी तुम्हांस कळत नाहीं ! त्या पक्षीं बंदोबस्त कोणे प्रकारें केला हें समजत नाहीं ! उभयतांनीं रान मोकळें पाहून पाठीवर फौजेचा पिच्छा नाहीं असें

समजोन प्रांतांत मनस्वी उपद्रव करितात येविशीं कमावीसदारांचीं लिहिलीं येतात. हे गोष्ट चांगली नाहीं. या उपरी तिकडील ठाण्यांचा बंदोबस्त राखोन पत्रदर्शनीं फौजसुद्धां त्यांचे पिच्छावर येऊन त्यांस जरब बसवून धुडावून देऊन फिरोन त्यांचें येणें इकडे न होय असा बंदोबस्त करावा. बेसावध नसावें. राजश्री पंतप्रतिनिधी यांचे पांचशें राऊत कराड प्रांतीं रवाना केले आहेत ते लवकरच येऊन पोंहचतील. तुह्मीं मानाजी शिंदा व सटवोजी भोंसले यांची बातमी राखोन आपले जागां बहुत सावधपणें राहून लौकर येऊन पारिपत्य करावें. त्यांचा फैलाव न होय हें लवकर करावें. रवाना छ० २७ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती. तुम्हांस इकड बंदोबस्तास ठेविलें ह्मणोन राजश्री भाउनीं येथें लिहिलें होतें, त्यावरून खातरजमा होती कीं करवीरकरांकडील उपद्रव ( आपण ) होऊं देणार नाहींत. परंतु बंदोबस्त न जाला ! या उपर उपद्रव न होय हें लवकर व्हावें हे विनंती.[1]

पै।। छ० ५ जमादिलाखर.

नं. २५४४. ( ज्येष्ठ शु० १-३ जून )

गोपाळ मल्हार याचें इचलकंजीहून शिवराम निलकंठ यांस कुरुंदवाडास पत्र—

" रामचंद्रपंतअप्पाचे ५० स्वार करवीरकरांचे फौजेजवळ गेले. तेथपर्यंत ते बेसावध होते. मग हे थोडे स्वार पाहून त्यानीं हल्ला केली तों अप्पा सर्व फौजेनिशीं येऊन पोंचले. तें पाहून करवीरकरांचा धर सुटून पळून गेले. "

पै।। छ० २९ जमादिलावल. इहिदे समानीन.

---

१ येथून पुढें खास दस्तुराचा मजकूर आहे.

नं. २९४५. ( ज्येष्ठ शु० २–४ जून. )

कुरुंदवाडाहून शिवराम निलकंठ याजकडून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. पै।। छ० ३० जमादिलावल. इहिद्दे समानीन.

" अप्पाचें ( रामचंद्र परशुराम यांचें ) व करवीरकरांचें ( साजी शिंद्यांचें ) युद्ध वाघापुरावर होऊन शिंद्याचा मोड जाल करवीरकरांचे दोन तीनशें घोडे, पालख्या वगैरे लूट फार आणिली, ह्मणून लिहिलें तें कळलें. "

नं. २९४६. ( ज्येष्ठ शु० २–४ जून. )

कुरुंदवाडाहून शिवराम निलकंठ यांजकडून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

" वाघापुरच्या लढाईंत मोड जाल्यामुळें शिंदा दहा घोडयांनिशीं करवीरास पळून गेला ! "

नं. २९४७. श्री. ( ज्येष्ठ शुद्ध १–३ जून. )

कौलनामा राजश्री व्यंकटराव नारायण घोरपडे देशमुख प्रांत मिरज, तहां मोकदमानीं मौजे उगार बुद्रुक तर्फ ह्मैसाळ. प्रांत मजकूर. सुरुसन समानैन मय्या व अल्लफ. कौलनामा ऐसा जे, मौजे मजकूरची खंडणी होणें. ह्मणोन हुजूर ठाणें इचलकंजींचे मुक्कामीं तुम्हांस आणून खंडणीचा फडशा करून देणें म्हणोन आज्ञा केली. त्यास तुम्ही मौजे मजकूरचा नातवानीचा प्रकार समजाविला. त्यावरून बराय अर्ज खातरेस आणून मौजे मजकूरचे पेस्तर सालचे लावगीवरी नजर देऊन सालमजकूर करार रुपये २९० येकूण दोनशें नवद रुपये करार करून कौल सादर केला असे. सदरहू रुपये वसूल देऊन सुखरूप राहणें. जाजती जलाल होणार नाहीं. कळावें. कौल असे. जाणिजे. छ० १९ माहे जमादिलावल.

नं. २९४८. श्रीगणराज. (ज्येष्ठ शु० १०-१२ जून.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना[1] स्वामीचे सेवेशीं.

पोष्य परशुराम रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० ८ जमादिलाखर मुक्काम अकीवाट. वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण छ० २४ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें छ० ४ जमादिलाखरीं प्रविष्ट होऊन लिहिला मजकूर कळला. तेथें लिहिलें जे, "श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी करवीर यांजकडील किल्ले तोरगल वगैरे तालुक्यांत तुह्मांकडून उपद्रव लागला. तहाचें बोलणें येथें लागलें आहे. तरी इतःपर तालुकियास उपसर्ग न करावा;" म्हणान लिहिलें, ऐसीयास तोरगलकरांकडील व कडकोळचा मजकूर पेशजी आपणास लिहिला आहे. अलीकडे हुकेरी तालुक्यांत आल्यावरी हुकेरी व शेंडूर वगैरे ठाणीं सावकारांस कर्जांत श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामी याणीं तालुका लावून दिल्हा असतां दरम्यान सटवोजी भोंसले याणीं ठाणीं घेतलीं होतीं तीं घेऊन सावकारांकडे दिल्हीं व सामानगडकरानीं राजश्री राणोजी घोरपडे सेनापति यांजकडील ठाणीं गडा ........................ वगैरे त्याणीं घेतले होते. ते घेऊन सेनापतींचे पुत्र राजश्री म्हाळोजी घोरपडे आम्हासमागमें आहेत त्यांस घेऊन दिल्हे. वरकड कारणाशिवाय उपद्रव लाविला नाहीं. करवीर प्रांतांत तर गेलोंच नाहीं. अकीवाट व शिरोळ या ठाण्यांचें घ्यावयाचें कारण आपणास ठाऊकच आहे. बहुत काय लिहिणें कृपा निरंतर असावी हे विनंती.

---

1 फडणवीस कारभारी.

नं. २५४९. ( पौष-जानेवारी. )

नारोपंत नाना दामले यांस जनार्दन माधवराव यांजकडून पत्र बिनतारखेचें " हैदर नाइकाचा तह जाहला ऐसें वर्तमान आहे. तहांत ठरलें कीं झाडून बंद सोडावे. त्यास पेशजी खंडणी लाख होनाचा करार झाला; त्यास हल्लीं याप्रमाणें ठराव जाहला आहे कीं कृष्णेअलीकडे त्यानें येऊं नये; यांनींही पलीकडे जाऊं नये; याप्रमाणें वदंता ऐकितों. त्यास आपल्यास जालें वर्तमान कळलें असेल तरी लिहून पाठवावें. चिरंजिवांची सुटका कैसी होती ही चिंता बहुत लागली आहे."

नं. २५५०. श्रीव्यंकटेश. (मार्गशीर्ष व० ६–३१ दिसेंबर.)

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंति सेवक नरसिंगराव देवाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १९ जिल्कादपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. मी स्वामींचा निरोप घेऊन आल्यावरी श्रीमंत राजश्री बाळासाहेबानीं राजश्री आनंदराव निंबाजी नि॥ रास्ते व राजश्री बाजीपंत अण्णा यांची फौज मिरज तालुक्यांतून गेले तेव्हां खेडयांचे रखवालीकरितां पाठविलें होतें. याजमुळें आपणाकडे पत्र पाठविलें नाहीं. क्षमा करावी. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब शेंडुरावरी होते. चार पांच मुक्काम जाहले. परंतु शेंडूर घेतलें नाहीं. तोफखाना नाहीं याजमुळें कूच करून कागल याचे आसपास आले आहेत. सात हजार फौज आहे, याशिवाय पेंढारी तीन हजार. एकूण दहा हजार जमाव जाहला आहे. श्रीमंत मातोश्री अनूबाई याणीं दोन तोफा सरंजामसुद्धां भाऊबरोबर दिले आहेत. स्वामीस कळावें ह्मणून सेवेशीं विनंति

१ कैदी. २ धाकटे बंधु आनंदराव तोफखानेवाले यांची. ३ हें सन १७७६ च्या दिसेंबरांत पांडुरंगराव गोविंद यांस लिहिलेलें पत्र सहाव्या भागांत नं. १९५८ च्या पुढच्या नंबरास छापावयास पाहिजे होतें. तेथें छापण्याचें चुकून राहिलें सबब येथें छापिलें.

लिहिली असे. मजविशीं श्रीमंत राजश्री बाळासाहेबांसीं एक पत्र पाठवून पांचचारी खेडीं कमाविशीस नेमून द्यावीं म्हणून स्वामींनीं पत्र पाठवून द्यावें. व सेवकावरी पूर्ण कृपा करून ऊर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. शिंदा करवीरीं जमावसुद्धां आहे. फौज तीन हजार, प्यादा चार हजार, ऐसे जमावानिशीं आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २५५१. ( आषाढ व० १५–३१ जुलई. )

नाना फडनवीस यांचें परशुरामभाऊंस पत्र. पै॥ छ० २८. रजब. आषाढ मास.—

" मानाजी शिंदा सावंताचे वाडीस जाऊन जळमार्गें श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे जाणार. त्यास तो इकडे येत असल्यास वचन देऊन आणवावें. सावंताचे वाडीसही शिंद्यास न ठेवून घेण्याविशीं पत्र पाठविलें आहे. "

नं. २५५२. श्रीगणराज. (श्रावण शु० ६–६ ऑगस्ट.)

अपत्यें गंगाधरानें सा॥ नमस्कार. विज्ञापना ता॥ छ० ५ साबानपावेतों यथास्थित असे. विशेष. वडिलांची आज्ञा पांचशेरी तोफेचे गोळे पांचशें तोफखान्याकडे द्यावयाची आज्ञा, त्याजवरून तोफखान्याकडील गोलंदाज पांचशेरी तोफेचा फर्मा घेऊन आला त्याच्या फर्म्यानें भाडयाचे बैलवरून गोळे ऐनी व शिशाच्या गोळ्या बैल सर २२ येकूण.

| | |
|---|---|
| गोळे ऐनी बैल सर २० दर बैलीं गोळ १६ येकूण ३२० तीनशेंवीस गोळे | बंदुकीच्या गोळ्या शिशाच्या दोन खंडी पैकीं राहिल्या ८७२६ शिसें वजन पक्के ६४॥ बैल सर २ |

बैल सर २२ पैकीं वजा भाड्यास कमी केला सर १ बाकी सर २१ दर बैलीं रु. १। प्रमाणें करार करून पाठविले आहेत. कारखान्याकडील पावती गोळे व शिसें पावल्याची पावतीची आज्ञा असावी. भाडेकरी गु॥ सातापा शेटे.

नं. २५५३. श्री. (आश्विन व० १४–२६ ऑक्टो.)

तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांस सटवोजी भोंसल्याचे मजकुराचें पत्र पाठविलें त्याची नक्कल[1] लिहिली. सन इहिदे समानीन.

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २७ सवालपर्यंत वडिलांचे आशीर्वादें क्षेम असे. विशेष. सटवाजी भोंसले यानें तो कोती बुद्धि करून पळून गेला. सरकारच्या फौजा जाऊन लुटून जीन जितरब सर्व आणिलें. ज्यास सर्व माहितगारी आहे तो मात्र बोलणार नाहीं; परंतु चार मुलकांत लौकिक एक प्रकार जाला. सटवोजीनें आपली बुद्धि कमी करून पळून दुसरेचा लौकिक केला; यास्तव मात्र वाईट वाटतें. जर करितां वडिलांचे मर्जीस येईल तर विनंति मान्य करावी. विनंति मान्य करावयाजोगी वर्तणूक सटवोजीनें केली नाहीं, परंतु हत्ती व उंटें घोडीं जराबाजरा जर वडिलांचे मर्जीस आलें तर सटवोजीकडे पाठवून द्यावीं. जवाहीर सटवोजीजवळ साबाजी भोंसल्याचें होतें, कांहीं नक्तही ऐवज होता, असें ऐकण्यांत येतें; त्याचीही चौकशी उत्तम व्हावी. गनिमाई मोंगलाई दोन्ही राज्यांत वडिलांचा लौकिक अपरिमित होईल. जर सटवोजीचें जराबाजरा सांपडलेलें पाठविल्यास आणि त्याणें जातीनिशीं मागती येऊन मर्जीनुरूप श्रीमंतांचे पदरीं राहावें असेंच होईल तरी बरेंच होईल. जरी तो न आला तरी लौकिक एक प्रकार जाला

---

१ नक्कल गंगाधरराव यांचे हातची आहे.

हा मिटून कीर्तीस पद होईल. मला सुचली विनंति सेवेशीं लिहिली आहे. ती॥ कैलासवासी दादांनीं मिराचा अभिमान धरिला, श्रीमंतानीं पार पाडिलें. परंतु मीर पळाला नव्हता. हा पळाला. परंतु त्याहीपेक्षां हा लौकिक दिगंतीं होईल आणि वचनास पुढें पुष्टिपत्र दृढ होईल. मीं ही विनंति लिहिली ही कोणासही कळली नाहीं. मर्जीस आल्यास मान्य करावी. सटवोजीनें आपण पळून लोकांत पटवर्धनांस बट्टा आणून गेला, यास्तव मर्जीस गोष्ट येऊन कृपा केलियास बहुत कीर्ति आहे. मर्जीस न येईल तर बाहेरील गोष्ट नाहीं. मीं विनंति लिहिली आहे. उत्तराची आज्ञा करावी. बालकाची विनंति······· असलिया मान्य करावी. नसलिया ·······सेवेशीं विदित होय. त्याची राख ही लष्करांत सांपडली ह्मणोन ऐकितों. मराठे लोकांत राखेच्या पोटचा तो चिरंजीवच असें आहे. मराठ्याची अब्रू आहे. सदरहु विनंतीचें उत्तर द्यावया आज्ञा करावी हे विज्ञापना.

न. २५५४. ( आश्विन व० — ऑक्टो० दु० पंधरवडा. )

पुं॥ राजश्री बाळासाहेब—

इमानावरून व तुमचें कुलदैवत श्रीगणपति याचे दूर्वा व पुष्पें भाऊनीं पाठविलीं त्या इमानावरून आह्मी होऊन निःसंशय तुम्हापाशीं आलों. त्यांच्या आमच्या बोलण्याचा तह भाऊचे हातची कलमबंदीची याद वमु·······कीं " तुमचे मनोदयानुरूप बंदोबस्त जाला तर येथें राहावें

१ गोपाळराव पटवर्धनानीं हैदराचा मेहुणा मीररेजा यास वचन देऊन माधवराव पेशव्यांच्या लष्करात आणिलें. तेथें तो लुटला गेला तथापि पेशव्यानीं सर्व लूट परत देवविली. या गोष्टीस अनुसरून हें लिहिणें. ( पहा नं. ६९४ वगैरे. )
२ सबब अगत्यानें रक्षावी, त्याची राख त्याजकडे पाठवून द्यावी, असा अभिप्राय.
३ सटवोजी भोंसल्याचें गंगाधररावांस पत्र. याचा हा एकच बंद सांपडला.

व मनोदयानुरूप न घडे तरी तुम्हास जिकडे जाल तिकडे मार्गस्थ करून देऊं." हीं इमान पू....मनांत आणोन साहेबांपाशीं आलों. तेथील प्रसंग ध्यानांत आणिला तों आसपास चौकी पाहरे आमच्या गोटाभोंवताले फिरूं लागले, व एक दोघांच्या मुखीं विपरीत वर्तमान ऐकिलें, त्याजवरून आह्मी निघोन इकडे आलों. तों आमचे मागें फौजा रवाना करून अगदीं दौलत जडजवाहीर चार लक्षांचें व हत्ती घोडे, उंटें पालख्या वगैरे सरंजाम झाडून सुतळीचे सडे सुद्धां घेऊन गेले! आह्मास बातमी कळली असती तर सावधगिरीनें येतों. तुमचे निरोपावरून बेफाम मार्गावरून वस्तभाव लावून देऊन मागती सडेस्वारीनिशा परतून यावें यास्तव डेरे दांडे व बाजार व बाहीर बुनगें तळावर ठेऊन वस्तभाव पोंचवावयास आलों, तों मार्गावर ही गर्दी! व तेथें तुम्ही चौक्या पाठवून जिकडील तिकडे बंदोबस्त केला. हें वर्तमान आम्हास कळतांच आम्हीही वसवसा[1] खाऊन निघोन आलों. बरें. जाहली ती गुदस्त. आमची चीजवस्त सुतळीचे तोडयासुद्धां जा असेल ती सारी चौकशी तहकीक करून पाठऊन द्यावी.... वाल तर तुमचा कुलस्वामी श्रीगणपति बुध देईल तेव्हां द्यावी! ज्यांत तुम्हास उत्तम दिसेल तें करावें. तुमची कीर्ति ज्यांत होय तो अर्थ करावा. येखादे गरिबाची चीजवस्त कोणी अभिलाष केली तर पचत नाहीं. आम्ही सेवक तुमचे आहोंत. यांत आपण थोर आहेत. आमची वस्तभाव जी आहे ती झाडून कृपा करून पाठवून द्यावी. सूचना मात्र लिहिली असे. बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धि करावी हे विनंति.

---

१ धास्ती, संशय. २ सटवोजीचें पुढलें चरित्र पहातां 'सूचना मात्र लिहिली असे' या वाक्यांत त्याची दरडावणी गर्भित होती असें दिसतें.

नं. २५५५. श्री. (आश्विन व० १३–२५ ऑक्टो०)

सेवेसीं बाळाजी गोविंद. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ सवाल जाणून स्वकीय लेखन करावें. विशेष. सटवोजी भोंसला सडे स्वारीनिसीं पळोन पांच हत्ती कांहीं उंट घेऊन जात होता. ती बातमी राजश्री सुभेदार[2] यास कळतांच तयार होऊन वडगांवास पाठलाग केला. तों देवाचे डोंगरापावतों लुटीची पाडापाड केली. पांचही हत्ती आणिले व कोतवाल घोडीं आणिलीं. उंट दहा पांच खजिनेचे वगैरे आणिले. याशिवाय शेंदीडशें घोडे पाडून आणिले. तो जातीनिसीं पळोन गेला. आपणास वर्तमान कळावें म्हणोन लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. रवाना प्रहर दिवस प्रथम.

नं. २५५६. श्रीगणराज. (आश्विन व० १३-२५ ऑक्टो.)

चि[3]रंजीव राजश्री रघुनाथरावदादा यांसीं.

प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरी. राजश्री सटवोजी भोंसले काल रात्रौ पळोन गेले. डेरे व तोफा, अंबाऱ्या येणेंप्रमाणें तळावर टाकोन गेले. वचनांत कमी आम्हांकडून नसतां पळाला ! दस्तकें ही सरकारी आणिलीं. कराराप्रमाणें त्याणीं जावें तें न करितां पळून गेले ! तुम्हांस कळावें.

छ० २६ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद. पै॥ छ० २६ सवाल.

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस. २ जनार्दन अनंत पटवर्धन यादवाडकर ऊर्फ जनोबा सुभेदार. ३ पत्र मिरजेहून कुरुंदवाडास.

नं. २५५७. श्री. ( कार्तिक शु० १०—६ नोवें० )

राजेश्री नारोबा नाईक स्वामी गोसावी यांस—विनंति उपरी. दि॥ दमनसिंग याजकडील सैद हबीब याचों सणगें शिरोळावर हल्याचे दिवशीं जळालीं सबब अदमासें रु. १ एक रुपया देणें. छ० ८ जिल्काद. सन तिस्सा.

---

१ शिरोळावर हल्ला झाला त्या दिवशीं मिरजेहून गेलेल्या हशमांपैकीं पुष्कळांचीं चिरगुटें हल्ल्यांत जळाल्याबद्दल मागून त्यांस नुकसानी देण्यांत आल्याच्या चिठ्या आहेत. त्यांतली एकच येथें मासल्याकरितां दिली आहे. त्या चिठ्यांवरून शिरोळकरांनीं हल्ला करणाऱ्यांवर ( Hand-grenades ) हातगोळ्यांचा मारा केला होता असें स्पष्ट होतें.

# इंग्रजांशीं युद्ध.

## तिसरा विवाड.

### मार्च १७७९ ते मे १७८२.

सन १७७५ पासून १७८२ पर्यंत इंग्रज लोकांच्या मराठ्यांशीं ज्या लढाया होत होत्या त्यांस व तत्संबंधीं सर्व अवांतरे प्रसंगांस इंग्रज इतिहासकारांनीं सामान्यतः The First Maratha War अथवा 'मराठ्यांशीं पहिला विवाड' हें नांव दिलें आहे; परंतु असें नांव देणें बरोबर नाहीं. कारण कीं या विवाडाचा अवधि यद्यपि सात वर्षांचा आहे, तथापि तो एकसारखा सतत सुरू होता असें नाहीं. पुरंदरचा तह व वडगांवचा तह या दोन तहांनीं या विवाडाचे तीन भाग झालेले आहेत. पहिला भाग म्हणजे गुजरायची स्वारी असून त्याचें पर्यवसान पुरंदरच्या तहांत झालें. दुसरा भाग म्हणजे सन १७७९ च्या जानेवारींत इंग्रजांशीं तळेगांव मुक्कामीं युद्ध होऊन वडगांवास तह झाला तेथपर्यंत होय. विवाडाच्या तिसऱ्या भागास जनरल गॉडर्ड यांनीं सन १७७९ च्या मार्च व एप्रिल महिन्यांत सुरवात केली. तो सन १७८१ च्या अखेरपर्यंत चालून शेवटीं पुणें दरबाराशीं साल्बाई मुक्कामीं इंग्रजांनीं पक्का तह केला. पहिल्या विवाडाचें वर्णन या पुस्तकाच्या पांचव्या भागांत आलें आहे. दुसऱ्या विवाडाची हकीकत 'इंग्रजांची पुण्यावर स्वारी' या सदराखालीं याच पुस्तकांत पूर्वीं आली आहे. आतां तिसऱ्या व शेवटच्या विवाडाची हकीकत कालानुक्रमाप्रमाणें आह्मी येथें देण्याची सुरवात करितों. ज्या प्रसंगांशीं पटवर्धनांचा प्रत्यक्ष संबंध आला त्या

त्या प्रसंगांचें वर्णन या प्रकरणांतल्या पत्रव्यवहारांत यथास्थित आहे व तें खुद्द परशुरामभाऊनीं स्वतःच लिहिलें आहे. बाकीच्या प्रसंगांपैकीं कांहींचा निर्देश मात्र या प्रकरणांतल्या लेखांत झालेला आहे आणि कांहीं प्रसंगांचा उल्लेख मुळींच झालेला नाहीं. ज्या प्रसंगांचा उल्लेख या प्रकरणांतल्या लेखांत झालेला नाहीं त्यांचें वर्णन वाचकांच्या माहितीसाठीं आह्मी येथें इंग्रज इतिहासकारांच्या पुस्तकांच्या आधारें देऊं.

Convention of Vadgaon म्हणजे 'वडगांवचा तह' सन १७७९ च्या जानेवारींत झाला हें वाचकांस आठवत असेलच.

१७७९.

ती पराभूत झालेली इंग्रजी फौज मुंबईस परत जाऊन महिना दीड महिना झाला नाहीं तोंच जनरल गॉडर्ड हिंदुस्थानांतून नर्मदेवर येऊन बऱ्हाणपुरावरून मार्च महिन्यांत सुरतेस दाखल झाला.

मार्च.

पुणें दरबाराशीं तह करण्याचा अखत्यार त्यास गव्हर्नर-जनरल यांजकडून स्वतंत्र मिळाला असल्यामुळें त्यानें नाना फडनवीस यांशीं तहाचें बोलणें लाविलें. त्याची वाटाघाट बरेच महिने चालली होती. मध्यंतरीं श्रीमंत दादासाहेब हरी बाबाजीस मारून व त्याचा गोट लुटून सुरतेस जनरल गॉडर्ड याच्या आश्रयास गेले हें मागें सांगितलेंच आहे.

जून.

त्या इंग्लिश अंमलदारानें श्रीमंतांस दरमहा पन्नास हजार रुपयांची नेमणूक करून देऊन सुरतेंत ठेऊन घेतलें. ती गोष्ट पुणें दरबारास फारच नापसंत होऊन इंग्रजांशीं तहाचा बनाव बनून न येण्यास तें एक महत्वाचें कारण होऊन बसलें; कारण कीं, ऑक्टोबर महिन्यांत नाना फडनवीस यांनीं जनरल गॉडर्ड यास सांगून पाठविलें कीं, साष्टीचा टापू व दादासाहेब यांस आधीं हवालीं केल्याशिवाय आह्मी तहाचें बोलणें बोलत

ऑक्टो.

नाहीं. त्या दोन्ही गोष्टी करणें इंग्रजांस अशक्य वाटल्यामुळें त्यानीं मराठ्यांशीं युद्ध सुरू करण्याचीच मसलत कायम ठरविली. पावसा-

नोव्हेंबर. ळ्याच्या अखेरीस म्हणजे नोव्हेंबरच्या प्रारंभीं सुरतेहून गॉडर्ड मुंबईस आला; व तेथील गव्हर्नर व कौन्सिलर यांशीं सल्लवत करून पुढें काय काय करावयाचें याचा नकाशा आधीं ठरवून सुरतेस परत गेला. त्याच्या मदतीस मुंबईसरकारची फौज सुरतेस जाऊन पोहोंचली. नंतर सन १७८० च्या जानेवारी

१७८० जानेवारी. महिन्यांत जनरल गॉडर्ड यानें सैन्याची सिद्धता करून डभईवर चाल केली; व तें ठाणें दोन दिवसांत घेतलें. नंतर फत्तेसिंगराव गायकवाड यांस अनुकूल करून घेऊन त्यांशीं गुजरायची वांटणी करून घेण्यासंबंधें तह ठरविला. नंतर त्यानें अहमदाबादेवर चाल करून ती गुजरायेची राजधानी ता. १५ रोजीं घेतली. इतक्यांत त्या प्रांताचा बचाव करण्याकरितां व इंग्रजांशीं युद्ध करण्याकरितां महादजी शिंदे व तुकोजी

फेब्रुवारी. होळकर आले. त्यांबरोबर २५ हजार फौज होती. त्यांचें व इंग्रजांचें युद्ध जुंपलें तें मे महिन्याच्या अखेरीपर्यंत चाललें होतें. महादजी शिंदे हे गनिमी काव्याच्या लढाईत

मे. फार पटाईत असल्यामुळें त्यांनीं या युद्धापासून इंग्रजांस विशेषसा फायदा होऊं दिला नाहीं.

इकडे जनरल गॉडर्ड यास मुंबईसरकारचा तगादा लागला होता कीं, तुम्ही गुजरायेंत शिंद्यांशीं लढाई करण्याच्या भरीस न पडतां इकडे निघून यावें आणि वसईचा किल्ला व उत्तर कोंकणापैकीं घाटापर्यंतचा प्रदेश काबीज करावा; परंतु अखेरीचे दिवस आल्यामुळें आतां यंदां वसई घेणें होणार नाहीं असा गॉडर्डसाहेबाचा अभिप्राय पडला.

सबब तो स्वतः मुंबईकडे आला नाहीं. तथापि मुंबईसरकारची फौज त्याच्या कुमकेस गेली होती ती कर्नल हार्टली याजबरोबर त्यानें उत्तर कोंकण सर करण्याकरितां परत पाठवून दिली.

मे.

ती फौज येण्यापूर्वींच मुंबईसरकारनें कल्याणचें ठाणें घेऊन बोरघाटापर्यंत चौक्या बसविल्या होत्या. त्या चौक्या उठविण्यासाठीं व कल्याण परत घेण्यासाठीं नानानीं बाजीपंतअण्णा याजबरोबर फौज पाठविली. तिनें बोरघाटांतील चौकी कापून काढून तिच्या दोन तोफा घेतल्या, तेव्हां इतर चौक्या धास्तीनें उठून गेल्या. नंतर ही फौज कल्याणच्या ठाण्यास वेढा घालण्यास तयार झाली तों इतक्यांत कर्नल हार्टली गुजराथेंतून आला.त्यानें ता.२४ मे रोजीं बाजीपंताच्या फौजेवर छापा घालून ती फौज घाटावर पिटून लाविली. गणेशपंत बेहेरे सुरत अठ्ठाविशींत लुटालूट करीत होते त्यांवर एप्रिलच्या २३ व्या तारखेस जनरल गॉडर्ड याच्या सैन्यापैकीं एका टोळीनें येऊन छापा घातला आणि त्यांच्या तोफा व बुनग लुटून घेऊन त्यांस पिटून लाविलें.

उत्तर हिंदुस्थानांत गोहदच्या राण्यास अनुकूल करून घेऊन त्याच्या माहितीनें यमुना उतरून एक इंग्रजी फौज अलीकडे आली होती तिनें ऑगस्ट महिन्यांत ग्वाल्हेरचा किल्ला घेतला. तो किल्ला परत घेण्यासाठीं व त्या प्रांतांतून इंग्रजांस हांकून लावण्यासाठीं महादजी शिंदे पावसाळ्यांतच उज्जायनीहून निघाले. पावसाळा संपतो न संपतो तोंच जनरल गॉडर्ड गुजराथेंतून सैन्यासह मुंबईकडे आला. तो वसईस वेढा घालणार ही बातमी नाना फडनवीस यांस कळल्यावरून त्यानीं रामचंद्र गणेश व बाजीपंतअण्णा यास घाईघाईनें वसईच्या कुमकेस पाठविलें; परंतु त्या फौजेस अडवून धरण्याच्या

ऑगस्ट.

कामावर कर्नल हार्टली याची योजना करूनच जनरल गॉडर्ड यानें ता. १३ नोव्हेंबर रोजीं वसईस वेढा घातला होता. सुमारें एक महिना युद्ध झाल्यावर ता. ११ दिसेंबर रोजीं जनरल गॉडर्ड यानें वसईचा किल्ला काबीज केला. त्या अवधींत रामचंद्र गणेश व बाजीपंत मोठी फौज घेऊन पुण्याहून आले. त्यांशीं लढण्याचें सर्व जोखीम कर्नल हार्टली याच्या शिरावर पडलें. सबंध नोव्हेंबर महिना त्याच्या फौजेच्या व मराठ्यांच्या चकमकी दररोज होत होत्या. ता. १२ दिसेंबर रोजीं मोठें युद्ध झालें त्यांत रामचंद्र गणेश मारले जाऊन मराठी फौज मागें हटली; पण त्यामुळें कर्नल हार्टली यास विश्रांति मिळाली असें नाहीं. कारण, दसरा झाल्यावर हरीपंततात्या घाटाखालीं जाऊन पोहोंचले, आणि पुनः इंग्रजांशीं जोरानें युद्ध सुरू झालें.

नोव्हेंबर.

११ दिसेंबर.

१२ दिसेंबर.

दसरा होतांच नानानीं परशुरामभाऊंस सर्व फौजेनिशीं पुण्यास जलदीनें येण्याविषयीं पत्रें पाठविलीं होतीं. त्या पत्रांस अनुसरून भाऊनीं लष्कर गोळा केलेंही होतें. आतां स्वारीस निघावें तों भाऊंची मातोश्री जानकीबाई आजारी पडली म्हणून भाऊ लष्करांतून निघून तासगांवास आले. जानकीबाईचें दुखणें दिवसेंदिवस विकोपास जाऊन ता. २९ दिसेंबर रोजीं तिचें देहावसान झालें. त्यामुळें स्वारीस जाण्याचा बेत भाऊनीं तूर्त थोडे दिवस रहित केला आणि रघुनाथराव कुरुंदवाडकर यांजबरोबर फौज देऊन त्यांस नानाकडे पाठविलें. शिवाय चार हजार फौज बरोबर देऊन आपले ज्येष्ठ पुत्र रामचंद्र पंतअप्पा यांस त्यांनीं खंडणीच्या वसुलाकरितां कित्तूर संस्थानांत रवाना केलें.

२९ दिसेंबर.

या सुमारास खानदेशांत गुलजारखानाचें खूळ माजलें होतें. तो गुलजारखान व श्रीमंत दादासाहेबांचा कारकून केसो कृष्ण या उभयतांनीं रनाळ्याच्या किल्ल्याचा आसरा धरून मोठी फौज जमवून दंगा सुरू केला होता. त्यांचें खूळ मोडण्याकरितां नानानीं गणेशपंत बेहरे यांस फौज देऊन पाठविलें. गणेशपंताच्या कुमकेस, वाघ, लांबहाते हे होळकराचे सरदार आले होत. त्या सर्वांनीं मिळून गुलजारखान व केसोपंत यांशीं लढाई करून त्यांचा पराजय केला व त्यांचें बंड मोडून टाकिलें.

दिसेंबर.

कर्नल हार्टली याशीं लढण्याकरितां पुण्याहून मोठी फौज घेऊन हरीपंततात्या आल्याचें वर्तमान जनरल गॉडर्ड यास कळतांच तो वसईहून तळ हालवून हार्टलीच्या कुमकेस आला. त्या वेळीं सर्व इंग्रजी फौजेचा तळ वज्रजोगिणीवर होता. हरीपंततात्या दहिवलीस राहिले होते. बाजीपंतअण्णा तोफा गारदी वगैरे सरंजामानिशीं बदलापुरावर राहिले होते. मराठी फौजा दररोज इंग्रजांच्या बाजूनें तलावा करीत तेव्हां थोडीबहुत लढाई होत असे. जनरल गॉडर्ड याची मसलत बंदरकिनाऱ्याचीं ठाणीं घेण्याची असावी किंवा सुरतेकडे परत जाण्याची असावी एवढाच मराठी सरदारांनीं तर्क केला होता. इतकी फौज तोंडावर असतां तिला न जुमानतां इंग्रज पुण्यावर चालून येतील असें कोणासही वाटलें नव्हतें; परंतु ही अत्यंत धाडसाची मसलत करून पाहण्याचें जनरल गॉडर्ड यानें मनांत आणिलें आणि त्यास अनुसरून मराठी फौजा वारंवार अडवीत असतांही त्यांस मागें हटवीत हटवीत बोरघाटाच्या पायथ्यापर्यंत त्यानें चाल केली !

दिसेंबर.

परशुरामभाऊनीं रघुनाथराव यांस पुढें पाठविलें होतें, ते जाने-

१७८१ वारीच्या अखेरीस पुण्यास जाऊन पोहोंचले. त्याच सुमारास तुकोजी होळकरही खानदेशांतून आले होते.

ता. २९ जानेवारीस श्रीमंतांच्या व होळकरांच्या भेटी झाल्या. त्या समयीं परशुरामभाऊंखेरीज सर्व पटवर्धन सरदार त्या समारंभास हजर होते. "होळकराचे भेटीस दप्तरचे खालील चौकांत बसावयास घातलें. तेथें सारे खासे लोक नेऊन बसविले. ( शिवाय ) वाड्यांतील चौक्यांचे लोक म्हणतां चांगला बंदोबस्त जाहला. मग दरवाज्यास अमृतराव पेठे यांस पाठविलें. होळकर दरवज्यास आलेच होते. समागमें शंभर खासे होते. त्यांच्या भेटी अमृतराव याणीं घेऊन सर्वेच त्यांस घेऊन वाड्यांत आले. लोकांनीं मुजरे करून बसले. ( श्रीमंत ) दोनतीन घटका बसले होते. तेथेंच तीरकमान आणविली. होळकर व सर्वत्रांस म्हणूं लागले, 'आमची तिरंदाजी पहा.' दहा

२९ जानेवारी. बारा बोथाटीचे तीर हशमानिशीचे दप्तरचे भिंतीस मारिले. सर्वत्रांस आश्चर्य दाखविलें. उपरांत आपले पुस्तीचे अकरा बंद लिहिले होते ते आणून दाखविले. नंतर होळकरांस वस्त्रें दिलीं आणि निरोप दिला. होळकर बाहेर आले......वसंत–पंचमी होती यास्तव ( श्रीमंत ) दादास म्हणूं लागले जे " आम्ही कारंज्याची चादर तुम्हास दाखवूं, मग निरोप देऊं. इतक्यांत भोजनही केलें. दुसरा पोषाख पांढरा केला. तसेंच दिवाणखान्यांत आरसेमहालांत गेले...... कारंज्याची चादर सोडविली ती पावसापेक्षां अधिक तमासा दाखविली ! केशरी रंग आणवून सर्वत्रांचे अंगावर व राजश्री आपाबळवंत व अमृतराव व माहिपतराव यांचे व बाळाजीपंत ठोसर याचे अंगावर रंग घातला. आपले अंगावर विपुल रंग वारंवार 'घाला' म्हणून सांगून रंग घालविला. गवईही आणविले. गाणें

दोन घटका जाहलें. उपरांत विडे दिल. इतक्यांत फुलांचे तुरे आणविले. तेही मागती हांक मारून बोलावून तुरे दिले. " या वेळीं श्रीमंतांच्या वयास सातवें वर्ष सुरू होतें.

हरीपंत व बाजीपंत यांस न जुमानतां इंग्रज घाटाच्या सुमारें येतात असें पाहतांच नानानीं तुकोजी होळकर यांची रवानगी घाटाखालीं केली. पांच हजार फौज व पांच हजार पेंढार होळकरासमागमें होतें. शेवटीं हरीपंततात्या व बाजीपंतअण्णा व होळकर या सर्वांची मिळून चौपटीनें अधिक फौज असतांही तिला धुडकावून लावून जनरल गॉडर्ड बोरघाट चढून वर आला. " तीस हजार स्वार व चार साडेचार हजार पायदळ तुम्हाबराबर असता तुम्हीं इंग्रजांस घाटावर कसें येऊं दिल ? " म्हणून नानानीं हरीपंत व होळकर यांस रागें भरून पत्रें लिहिलीं. हरीपंतानीं त्या पत्रांचें उत्तर पाठविलें त्यांत आपल्या हातून चूक झाली असें प्रांजलपणानें कबूल केलें, आणि होळकरानीं उत्तर लिहिलें त्यांत ' हरीपंततात्यानीं लिहिलें आहे त्यावरून सर्व कळेल, ' असें लिहिल ! असो. कोणाच्या चुकीनें का होईना, परंतु जरनल गॉडर्ड पुण्यावर चालून येण्याच्या उद्देशानें बोरघाट चढून वर आला. ही गोष्ट सिद्ध झाली. आतां तो पुण्यावर येण्यास उशीर लागणार नाहींसें समजून पुण्याचे रहिवाशी लोक घरेंदारें टाकून पळून जाऊं लागले. पुण्यांत दोन दिवस मोठी गडबड व तारांबळ उडाली होती; श्रीमंत पुरंदरास निघून गेले. चार कोसांवर ओझें नेण्याकरितां भाड्याचा बैल दहा रुपये भाडें देऊं करूनही मिळेनासा झाला !

१० फेब्रुवारी.

बोरघाटाच्या माथ्यावर खंडाळें येथें इंग्रजी सैन्याचा मुक्काम झाला होता. त्याचे तोंडावर हरिपंत व होळकर हे राहिले होते ते कारल्याच्या

मुक्कामीं राहिले होते. घाटाखालीं बदलापुरावर बाजीपंतअण्णा होते. इंग्रज वर येऊं लागले तेव्हां त्यांच्या पिछाडीवर बाजीपंतानीं हल्ला करून भरताडाचीं पांचसातशें उंटें व बैल असें लुटून घेतलें. अघाडीस हरीपंत होते त्यांनीं दररोज इंग्रजांच्या छावणीवर तोफा मारण्याचा क्रम चालविला होता; परंतु फार अंतरावरून ते तोफा मारीत असल्यामुळें इंग्रजांचें विशेषसें नुकसान होत नव्हतें. प्रथम बाजीपंताच्या कुमकेस नानानीं रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पाठविलें होतें, परंतु इंग्रज आतां पुण्यावर चालून येणार त्यापक्षीं घाटाखालीं फौज ठेवण्याचा उपयोग नाहीं व तिचा तिकडे निभावही लागणार नाहीं असें समजून नानानीं घाटाखालची फौज वर आणविली.

फेब्रुवारी.

अशी स्थिति असतां परशुरामभाऊंस निघून येण्याविषयीं नानांचीं वारंवार निकडीचीं पत्रें येऊं लागलीं होतीं; म्हणून ते तासगांवाहून निघून लांब लांब मजली करून पुण्याकडे गेले. ता. १० फेब्रुवारी दिवशीं त्यांची व नानांची भेट होऊन पुढील मसलतीविषयीं उभयतांचें बोलणें झालें. नंतर भाऊ हरिपंततात्यांच्या लष्करास जाऊन मिळाले. इंग्रजांची जेथें छावणी होती तेथें जाऊन तीसभोंवतीं भाऊनीं टेहाळणी करून पाहिली. परंतु इंग्रज अडचणीच्या जाग्यांत बातेऱ्या बांधून बंदोबस्तानें राहिले असल्यामुळें कोठें लाग साधण्याचा अंदाज त्यांस दिसून आला नाहीं. मग सर्व सरदारानीं मिळून खलबत केलें त्यांत असें ठरलें कीं, घाटाखालून इंग्रजांस रसद वगैरे पुरवठा दररोज होत असतो, तो बंद केल्याखेरीज इंग्रजांस हैराण करण्याचा दुसरा मार्ग नाहीं. याकरितां परशुमराभाऊनीं स्वतःच घाटाखालीं जाऊन इंग्रजांस मुंबईहून पनवेलच्या रस्त्यानें रसद पोंचत असते ती बंद करावी. ती मसलत

ता. २८ फेब्रु.

कबूल करून परशुरामभाऊ राजमाचीस आपलें बुनगें ठेवून सडे झाले, आणि कोळंब्याच्या घाटानें तळकोंकणांत उतरले.
२ मार्च. अघाडीस रघुनाथराव कुरुंदवाडकर चालत होते त्यांच्या फौजेंत लुटारू स्वार होते. त्यानीं खोपवलीपर्यंत जाऊन इंग्रजांचे हजार दीड हजार बैल भरताडाचे लुटून
५ मार्च. आणिले. भाऊंचा मुक्काम भालवडी परगणे नसराबाद येथें झाला होता. तेथून लुटारू स्वारानीं पुनः एकदां जाऊन इंग्रजांचे रसदेवर छापा घालून ' पांचसातशें बैल व तट्टें व उंटें दोनतीन व एक राहुटी, त्यांत भरताडाचे बैलही आणिले. तुपाचे बुधले व साखरेच्या गोण्याही आणिल्या. ' पटवर्धनांच्या फौजेपकीं लुटारू स्वारांच्या टोळ्या कल्याण व पनवेलपर्यंत हिंडूं लागल्या. खोपवलीपासून चार कोसांवर चौक येथें इंग्रजांचीं दोन तीन पलटण कायमचीं राहिलीं होतीं त्यांवर हल्ला करण्याचा लागभाग कांहीं साधेल तर पहावा असें भाऊंच्या मनांत होतें; परंतु हें हिमतीचें काम करावें हें त्या वेळीं त्यांच्या फौजेंतील कोणा सरदाराच्या मनास येईना. भाऊ लिहितात, ' पनवेलींहून रात्रीचे इंग्रज निघतात. मध्यें मुक्काम करून बंदोबस्तीनें राहून फिरोन रात्रीचें कूच करून रस्त पोंचवितात. ( त्यानीं ) निशाचरीविद्या बरीच आरंभिली आहे ! ज्याचा काळ साध्य त्यास जें करावें तें साध्य आहे ! ' ' इंग्रजांकडील कागद मुंबईस जात होते ते सांपडले. त्यांतील तात्पर्यार्थ–'घाटमाथां गेलों. परंतु त्यांची ( मराठ्यांची ) फौज आहे. याजमुळें रस्त येऊन पोंचत नाहीं, रस्त न आली तर निभाव नाहीं. ' असें लिहिलें होतें '...... ' रस्तेचें पलटण एक दुसर कापल्याशिवाय जरब बसत नाहीं, व रस्त बंद जाल्याशिवाय ( इंग्रज ) आयां एकाएकीं येणार नाहीं. पलटण रस्तेचें कापून काढावें हेंच मनापासून आहे. याजकारितां त्याचे पिछावर पनवेलपावेतों फौज चिरंजीव राजश्री बळ-

वंतराव याजबरोबर रवाना केली आहे. ते बंदोबस्तीनें येत असिले तरी ( बळवंतरावानीं ) त्यांस पाठीवर घेत पुढें यावें व आह्मांस वर्तमान कळवावें.सर्वांनीं मिळून गांठ घालून पारिपत्य करावें असें ( योजिलें ) आहे. त्यांत श्रीसत्ता प्रमाण. चौकावर पलटण होतें तें कापून काढावें ह्मणून भालवडीहून कूच करून कंडव येथें दीड कोस आलों तों ( तें ) रात्रींच निघून गेल्याची बातमी आली. याकरितां येथेंच मुक्काम करून खोपवलीपर्यंत जाऊन आलों.' याप्रमाणें जीं पलटणें कापून काढण्याची भाऊ इच्छा करीत होते तीं इंग्रजांचीं पलटणें लवकरच रस्त भरून जात ना त्यांचे दृष्टीस पडलीं. त्या वेळीं लढाई झाली तींतला अनुभव जो त्यांस आला तो त्यानीं पुढें दिल्याप्रमाणें लिहिला आहे. " रस्त भरावयास फिरून इंग्रज पोक्ते सामानानिशीं येतीलच. तेव्हां आह्मासही आणखी इतकी फौज, पायदळ पांच हजार ' दोनतीन तोफा असाव्या; तेव्हां दोनी तोंडें फौज सारखी निकड करावयास पाहिजे. तेव्हां रस्त बंद होईल तर न कळे. दुसरी फौज कारभारी यांकडून यावयाचा विचार समजलाच आहे ! तत्राप राजश्री नानांस लिहिलेंच आहे. तिकडून सामान जरूर येईल.' तोफेपुढें ( आमची ) गोडी फौज झटल्यानें फौजेचा नाश होतो. ते जागा धरून उभे राहून लढूं लागल्यानंतर फौजेचा काट चालत नाहीं. नासाडीच होईल. ( घांटा ) खालीं एवढी फौज आली, रस्ता बंद होईना ! कांहीं करावें असें सर्वांचे चित्तीं, याजमुळें घोडीं घातलीं. ते दिवशीं भृगुवार—आमचा वर्ज्य वार—ह्मणून निशाणाचे पाठीमागेंच उभे समजोनच होतों.तों चालिस पन्नास घोडे ठार व चाळीस पन्नास जखमी जाले. आह्मी लोकांबरोबरच उठून निकड करितों तर फारच जायां होते. घोडीं इरेनें जायां जाहलीं असें आ-

१६ मार्च.

णखी एकदोन वेळ इरेनें ( लढावें ) ह्मटलें तर सरदारी बसावयाचा प्रकार ! कूच करून लांबण पडल्यानंतर मग साधेल तें साधेल. जाग्या. वर असतांच घोडीं घालूं म्हटलें तर काम होणार नाहीं. अशी अडचण.

ही लढाई ता. १६ मार्च रोजीं झाली. इंग्रजी फौज फक्त दोन पलटणें असून त्यावर कपतान म्याके हा मुख्य सरदार होता. त्याबरोबर धान्य सामग्री वगैरे जिनसानें लादलेले कित्येक हजार बैल होते ते पनवेलीहून खोपवलीकडे येत असतां वाटेनें चौकाच्या मुक्कामीं पलटणांची व पटवर्धनांची गांठ पडली, भाऊ लिहितात ' बातमीसाठीं नेहमीं फौज तिकडे ठेविली होती. बातमी येतांच आह्मी फौजसुद्धां गेलों. फाल्गुन

२६ मार्च.

वा॥ ७ भृगुवारीं प्रहर दिवसास गांठ पडली. लोकांनीं गोटापावेतों घोडीं घातलीं . तीन टोळ्याएकीकडे डावे बाजूस चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा, उजवे बाजूस तीर्थस्वरूप राजश्री मेघश्यामराव बापू, मध्यें चिरंजीव राजश्री बळवंतराव, येणेंप्रमाणें तिन्ही तोंडें फौज उठली. गोटापर्यंत जाऊन मारामार करून शेंदोनशें माणूस जाया जखमी केले. चिरंजीव राजश्री दादाचे तोंडावर एक कुंपणी. कुंपणी म्हणजे शंभर माणसांची जमेत. त्यांत एक निशाण. तें माणूस अव्वलज्वान, शिरा माणूस, चिरंजीवावर चालून गेले. तोफांची मारगिरी होतच होती. तों चिरंजीवानीं निकड करून लोक उठविले. तेव्हां ती एक कुंपणी कापून काढिली. याशिवाय आणखी शेंपन्नास माणूस मारून बंदुखा आणिल्या. आणखी लोक थोडीशी निकड करिते तर गोट झाडून लुटून लोक मारिले असते. फौजही त्यांचे पारिपत्यापुरती होती. परंतु श्रीच्या इच्छेस आलें तितकेंच पारिपत्य ते वेळेस जालें. तों दोन प्रहर जाले. पाण्याची वेळ जाली. लोक निघूं लागले. तोफांची मारगिरी फिरून होऊं लागली तेव्हां दहा वीस घोडे ठार, शेंपन्नास जखमी जाले. ( राऊत ) पुन

उठले तेव्हां तोफा बंद जाल्या. माघारे निघाले तेव्हां माणूसही शेंपन्नास जायां जखमी जाहले.

ही लढाई होऊन दहा बारा दिवस झाले नाहींत तों पुनः पनवेलीस रस्त भरण्याकरितां घाटावरून रिताडाचे बैल घेऊन इंग्रजी फौज आली. त्या फौजेवर कर्नल ब्राऊन हा मुख्य सरदार असून त्याबरोबर तीन पलटणें, सातशें तुरूप स्वार, व दहा तोफा असा पोक्त सरंजाम होता. त्या फौजेची व पटवर्धनांची ता. २९ मार्च दिवशीं पुनः गांठ पडली. इंग्रजांनीं पुष्कळ खटपट केली तरी मराठ्यांनीं त्यांचे अजमासें चार हजार बैल हिसकून घेतले ! लढाईंत उभयपक्षांचे लोकही ठार व जखमी बरेच झाले. शिवाय उंटें, छकडे, तोफेचे गोळे, डेरे, राहुट्यांच्या कनाता व इतर कांहीं सामान लढाईच्या गलबलींत मराठ्यांनीं लुटून घेतलें. बाकी सामान कर्नल ब्राऊन यानें सुरक्षितपणें पनवेलीस पोंचतें केलें. इंग्रजांविषयीं नानाप्रकारचा बातम्या मराठ्यांच्या लष्करांत उठत, त्यांतून कित्येक फार गमतीच्या आहेत. त्यांपैकीं उदाहरणार्थ एक बातमी अशी होती कीं, मागच्या खेपेस कप्तान म्याके रस्त भरून घाटावर गेला. त्या वेळीं मराठ्यांनीं त्याची पुष्कळ नासाडी केली. त्यामुळ पुनः रस्त आणावयास घाटाखालीं जाण्यास कोणी इंग्रज सरदार धजेना. तेव्हां या खेपेस रस्त भरण्याकरितां स्वतः जनरल गॉडर्ड पलटणें घेऊन पनवेलीस गेला आहे ! ही बातमी खुद्द परशुरामभाऊंस सुद्धां खरी वाटली ! याचें कारण भाऊंनीं असें दिलें आहे कीं लुटींत सांपडलेलें ' सामानही खासेंच होतें. डेरे कनाता, व दागिने, रुप्याचे पेले, चमचे व तबकें व ताटें वगैरे चार पांच हजार रुपयांचें सामान लोकांस सांपडलें. याशिवाय रुपजस्ती दागिनेही सांपडले. गाडराशिवाय इतकें सामान दुसऱ्याजवळ असणार नाहींसें वाटतें ! ' या खेपेस

२९ मार्च.

णखी एकदोन वेळ इरेनें ( लढावें ) ह्मटलें तर सरदारी बसावयाचा प्रकार ! कूच करून लांबण पडल्यानंतर मग साधेल तें साधेल. जाग्या. वर असतांच घोडीं घालूं म्हटलें तर काम होणार नाहीं. अशी अडचण.

ही लढाई ता. १६ मार्च रोजीं झाली. इंग्रजी फौज फक्त दोन पलटणें असून त्यावर कपतान म्याके हा मुख्य सरदार होता. त्याबरोबर धान्य सामग्री वगैरे जिनसानें लादलेले कित्येक हजार बैल होते ते पनवेलीहून खोपवलीकडे येत असतां वाटेनें चौकाच्या मुक्कामीं पलटणांची व पटवर्धनांची गांठ पडली, भाऊ लिहितात ' बातमीसाठीं नेहमीं फौज तिकडे ठेविली होती. बातमी येतांच आह्मी फौजसुद्धां गेलों. फाल्गुन

२६ मार्च.

वा। ७ भृगुवारीं प्रहर दिवसास गांठ पडली. लोकांनीं गोटापावेतों घोडीं घातलीं . तीन टोळ्या-एकीकडे डावे बाजूस चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा, उजवे बाजूस तीर्थस्वरूप राजश्री मेघश्यामराव बापू, मध्यें चिरंजीव राजश्री बळवंतराव, येणेंप्रमाणें तिन्ही तोंडें फौज उठली. गोटापर्यंत जाऊन मारामार करून शेंदोनशें माणूस जाया जखमी केले. चिरंजीव राजश्री दादाचे तोंडावर एक कुपणी. कुपणी म्हणजे शंभर माणसांची जमेत. त्यांत एक निशाण. तें माणूस अव्वलज्वान, शिरा माणूस, चिरंजीवावर चालून गेले. तोफांची मारगिरी होतच होती. तों चिरंजीवानीं निकड करून लोक उठविले. तेव्हां ती एक कुंपणी कापून काढिली-याशिवाय आणखी शेंपन्नास माणूस मारून बंदुखा आणिल्या. आणखी लोक थोडीशी निकड करिते तर गोट झाडून लुटून लोक मारिले असते. फौजही त्यांचे पारिपत्यापुरती होती. परंतु श्रीच्या इच्छेस आलें तितकेंच पारिपत्य ते वेळेस जालें. तों दोन प्रहर जाले. पाण्याची वेळ जाली. लोक निघूं लागले. तोफांची मारगिरी फिरून होऊं लागली तेव्हां दहा वीस घोडे ठार, शेंपन्नास जखमी जाले. ( राऊत ) पुन

उठले तेव्हां तोफा बंद जाल्या. माघारे निघाले तेव्हां माणूसही शेंपन्नास जायां जखमी जाहले.

ही लढाई होऊन दहा बारा दिवस झाले नाहींत तों पुनः पनवेलीस रस्त भरण्याकरितां घाटावरून रिताडाचे बैल घेऊन इंग्रजी फौज आली. त्या फौजेवर कर्नल ब्राऊन हा मुख्य सरदार असून त्याबरोबर तीन पलटणें, सातशें तुरूप स्वार, व दहा तोफा असा पोक्त सरंजाम होता. त्या फौजेची व पटवर्धनांची ता. २९ मार्च दिवशीं पुनः गांठ पडली. इंग्रजांनीं पुष्कळ खटपट केली तरी मराठ्यांनीं त्यांचे अजमासें चार हजार बैल हिसकून घेतले ! लढाईंत उभयपक्षांचे लोकही ठार व जखमी बरेच झाले. शिवाय उंटें, छकडे, तोफेचे गोळे, डेरे, राहुट्यांच्या कनाता व इतर कांहीं सामान लढाईच्या गलबलींत मराठ्यांनीं लुटून घेतलें. बाकी सामान कर्नल ब्राऊन यानें सुरक्षितपणें पनवेलीस पोंचतें केलें. इंग्रजांविषयीं नानाप्रकारचा बातम्या मराठ्यांच्या लष्करांत उठत, त्यांतून कित्येक फार गमतीच्या आहेत. त्यांपैकीं उदाहरणार्थ एक बातमी अशी होती कीं, मागच्या खेपेस कप्तान म्याके रस्त भरून घाटावर गेला. त्या वेळीं मराठ्यांनीं त्याची पुष्कळ नासाडी केली. त्यामुळ पुनः रस्त आणावयास घाटाखालीं जाण्यास कोणी इंग्रज सरदार धजेना. तेव्हां या खेपेस रस्त भरण्याकरितां स्वतः जनरल गॉडर्ड पलटणें घेऊन पनवेलीस गेला आहे ! ही बातमी खुद्द परशुरामभाऊंस सुद्धां खरी वाटली ! याचें कारण भाऊंनीं असें दिलें आहे कीं लुटींत सांपडलेलें ' सामानही खासेंच होतें. डेरे कनाता, व दागिने, रुप्याचे पेले, चमचे व तबकें व ताटें वगैरे चार पांच हजार रुपयांचें सामान लोकांस सांपडलें. याशिवाय रुपजस्ती दागिनेही सांपडले. गाडराशिवाय इतकें सामान दुसऱ्याजवळ असणार नाहींसें वाटतें ! ' या खेपेस

२९ मार्च.

आपण इंग्रजांवर चांगलीच जरब बसविली असें परशुरामभाऊंस वाटत होतें. कारण कीं, ' आज इंग्रजांस गानिमी कावा पुरता समजला. ' ' या खेपेस इंग्रजांची खराबी फार जाली. गानिमी जरब त्यांस समजली. ' अशीं अभिमानाचीं वाक्यें त्यांनीं पत्रांतून लिहिलेलीं आढळतात. रिताडाचे बैल घेऊन इंग्रज पनवेलीस गेला त्या अर्थीं तो पुनः रसत भरून घाटाकडे येणार हें ठरलेलेंच होतें. तसा तो येईल तेव्हां त्यास लुटून घेतां यावें म्हणून परशुरामभाऊंचे मदतीस नानानीं तुकोजी होळकरांस घाटाखालीं पाठविलें.

मराठ्यांनीं अजमास केल्याप्रमाणें ता. १२ एप्रिल रोजीं पनवेलीहून घाटाकडे इंग्रजी फौजेनें कूच केलें. त्यांचा पहिला मुक्काम तीन कोसांवर बारवई येथें झाला. तेथें पाण्याची सोय फक्त एक तळें होतें. तें तळें आधीं दोन दिवस मराठ्यांनीं फोडून ठेविलें होतें, दुसरे दिवशीं रसद घेऊन इंग्रजी फौज निघाली ती चौकापुढें एक कोसावर येऊन उतरली. तळावरून निघाल्यापासून मुक्कामास इंग्रज पोंचतपर्यंत त्यांच्या अघाडीस पटवर्धन व पिछाडीस होळकर याप्रमाणें चिकाटी बसून वाटभर लढाई होत होती. अघाडीस इंग्रजांचा भार भारी व अडचणीची जागा असल्यामुळें पटवर्धनांच्या हातून कांहीं विशेषसें झालें नाहीं. पण पिछाडीस होळकर होते त्यांनीं एकदोन वेळां चांगलीच हुलड उठविली होती.

१२ एप्रिल.

सुरतेपासून मुंबईकडे येण्याच्या रस्त्यावर वसईजवळ कोहज म्हणून किल्ला आहे तो घ्यावा असें मनांत आणून वसई सइंग्रजी फौज होती तिनें कोहजेस वेढा घातला; परंतु भाऊनीं आपल्या फौजेंतून किल्लेकऱ्यांच्या कुमकेस एक टोळी पाठविली तिनें जाऊन तो वेढा उठविला.

एप्रिल.

आपण घाटावर जाऊन पुण्यावर चालून येतों असा रोंख दाखविल्यास पुणें दरबार भिऊन तह करावयास कबूल होईल असें जनरल गॉडर्ड यास वाटलें होतें त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. पटवर्धनांनीं घाटाखालून येणारी रसद बंद केल्यामुळें आतां बोरघाटावर राहणेंही त्याला अशक्य झालें. यामुळें त्यानें मुंबईस परत जाण्याचा निश्चय केला. त्या निश्चयास अनुसरून त्यानें ता. १९ पर्यंत आपल्या तोफा व बुनगे घाटाखालीं लावून दिलेंच होतें.

२० एप्रिल.

ता. २० रोजीं तो स्वतः बाकीचें लष्कर घेऊन घाटाखालीं उतरला; व खोपवलीस तळ देऊन राहिला. तेथून २१ एप्रिल दिवशीं त्यानें लष्कराचा तळ हालवून कूच केलें. सबंध दिवसभर पटवर्धन व होळकर त्याच्या अघाडीवर हल्ले करीत होते. तो खोपवलीहून निघण्यापूर्वींच हरीपंततात्या हलक्या तोफा घेऊन घाटावरून आले होते. त्यांनीं पिछाडीवर तोफांचा मारा चालविला होता. त्यामुळें गॉडर्ड यानें कशीबशी दोन कोस मजल मारून खालापुरास मुक्काम केला. दुसरे दिवशीं तेथून कूच करून तो चौकाजवळ आला, तों पिछाडीवर हरीपंतांनीं पुनः तोफांचा भडिमार केला; व कित्येक वेळीं स्वारपायदळानिशीं निकराचे हल्लेही केले. अघाडीस पटवर्धन व होळकर होतेच. त्या प्रसंगीं बरीच लढाई होऊन उभयपक्षीं बहुत लोक जायां जखमी झाले. त्या दिवशीं इंग्रजी लष्कराचा मुक्काम चौकावर झाला. रात्र होतांच पुनः इंग्रजी लष्करानें तेथून कूच केलें, तों उजाडतां उजडतां मराठ्यांची व त्यांची गांठ पडली. त्या दिवशीं मराठयांची सारी फौज पिछाडीसच होती. प्रथम होळकर व पटवर्धन यांनीं लढाई सुरू केली. त्यांतच गारदी व रोहिले व पायउतारा झालेले बंदुकस्वार मिसळल

२३ एप्रिल.

त्यांनीं बंदुकांचा मारा केला. मागून हुजरातीचे लोकही लढाईंत

सामील झाले. तोफांचा भडिमारही सु होता. याप्रमाणें चौकापासून बारवईपावेतों तीन कोस लढाई होत होती. त्या दिवशीं इंग्रजी सैन्यानें पराकाष्ठेची मर्दुमी केली म्हणूनच त्यांचें लष्कर बचावलें. इंग्रजानीं बारवईस मुक्काम करावा तर तेथें तळें होतें त्याला पाणी नव्हतें. याकरितां बुनगें पनवेलीकडे लावून देऊन इंग्रजी सैन्य सडें होऊन मराठ्यांच्या तोंडावर उभें राहिलें, आणि बुनगें सुरक्षितपणें पोंचल्याची वर्दी येतांच लढत लढत पनवेलीस येऊन पोंचलें. या तीन दिवसांच्या लढाईंत मराठ्यांचे हजारों लोक जायां जखमी झाले. भाऊंचा अजमास इंग्रजांकडचें "पांचसहाशें माणूस ठार व हजार दीड हजार जखमी असें दोन लढायांत झालें. दहा वीस गोरे सरदार मेले. दोन मातबर चांगलेच पडले." परंतु हा अजमास चुकला आहे; कारण कीं, डफसाहेबानीं इंग्रजी अस्सल पत्रव्यहारावरून माहिती लिहिली आहे तींत ठार व जखमी झालेल्यांची संख्या फक्त ४९६ लिहिली आहे. ही संख्या फक्त लढाऊ शिपायांची आहे. बुनग्यांपैकीं मारले गेलेले असतील व जायां झालेले असतील ते निराळे. तेही भाऊंनीं यांतच धरले असल्यास न कळे. मराठ्यांशीं इंग्रजांच्या आजपर्यंत बऱ्याच लढाया झाल्या; परंतु इतकेंही मोठें नुकसान पूर्वीं कोणत्याही लढाईंत त्यांचें झालें नव्हतें. यावरून मराठे सरदार या लढाईचे वर्णन अभिमानानें लिहितात तें अस्थानीं आहे असें म्हणवत नाहीं.

जनरल गॉडर्ड पनवेलीस पोंचल्यावरसुद्धां हरीपंत व होळकर पावसाळा सुरू होईपर्यंत घाटाखालींच राहिले; परंतु परशुरामभाऊ ता. २ मे रोजीं हरीपंततात्यांचा निरोप घेऊन घाटावर आले. मेच्या चवथ्या तारखेस चिंचवडाजवळ नानांची व त्यांची गांठ पडली. हुरत

अठ्ठाविशींत स्वारीस जाण्याविषयीं नानानीं भाऊंस आग्रह फार केला परंतु अखेरीचे दिवस असल्यामुळें त्यांचें बोलणें भाऊंस मान्य करितां आलें नाहीं. नानांचा निरोप घेऊन भाऊंची स्वारी पुण्यास येऊन तेथून श्रीमंतांच्या दर्शनाकरितां पुरंदरास आली. ता. १३ मे रोजीं श्रीमंतांच्या भेटी झाल्या. श्रीमंतांनीं हरिहरराव पांडुरंग यांस शिरपेंच, रघु-
१३ मे. नाथराव नीलकंठ यांस मोत्यांचा तुरा व गणपतराव कोन्हेर यांस चौकडा व खुद्द परशुरामभाऊंस मोत्यांची कंठी याप्रमाणें पटवर्धन सरदारांस जवाहीर दिलें. जनोबा सुभेदार यांस या स्वारींत पालखीचीं वस्त्रें यापूर्वींच मिळालीं होतीं. वर लिहिलेल्या प्रसंगीं दौलतराव हिंदूराव घोरपडे गजेंद्रगडकर यांस श्रीमंतांनीं शिरपेंच, हत्ती व वस्त्रें दिलीं. नंतर दुसरे दिवशीं श्रीमंतांचा निरोप घेऊन फौजेसह पटवर्धन निघाले ते मिरज, तासगांव, कुरुंदवाड वगैरे आपआपल्या स्थळांस दाखल झाले.

जनरल गॉडर्ड याची घाट चढून पुण्यावर चालून येण्याची धामधूम सुरू होती त्याच सुमारास हिंदुस्थानांत अन्यत्र इंग्रजांशीं मराठ्यांची लढाई सुरू होती तिचेंही वर्णन येथें केलें पाहिजे. इंग्रजांची एक तुकडी यमुना उतरून ग्वाल्हेरीकडे आली होती तिनें लाहार व ग्वाल्हेर घेतल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. त्याच तुकडीस आणखी इंग्रजी
फेब्रु० फौज येऊन मिळाली, व त्या सर्व फौजेवर कर्नल क्यामक हा मुख्य सरदार झाला. त्यानें फेब्रुवारी महिन्यांत माळवाप्रांतावर स्वारी केली. भेलसें हें ठाणें व तालुका पूर्वींपासून भोपाळच्या नबाबाकडे होता तो पूर्वीं नानासाहेब पेशव्यांनीं त्यापासून जिंकून घेऊन मराठी राज्यास जोडिला होता. तें भेलसें पेशव्यांकडून हल्लीं शिंद्यांकडे जहागीर म्हणून चालत होतें. जनरल गॉडर्ड याची फौज माळव्यांतून दक्षिणेंत गेली. तेव्हां ती भोपाळच्या

मुक्कामीं उतरली असतां तेथील नबाबानें त्या फौजेचें आगतस्वागत करून तिला जरूर ती मदत दिली होती. व त्यायोगानें इंग्रजसरकारचा स्नेह संपादन केला होता. इंग्रजांनीं भेलसें मराठ्यांकडून घेऊन आपलें आपणांस परत द्यावें हा त्याचा इरादा होता. जनरल गॉडर्ड यास दक्षिणेंत जाण्याची घाई असल्यामुळें भोपाळवाल्यांचा बेत त्या वेळीं साधला नाहीं. हल्लीं कर्नल क्यामक माळव्यावर स्वारी करून आला असतां भोपाळवाल्यानीं त्याशीं बोलणें लाविलें कीं, आपण तुम्हास तीन लक्ष रुपये देतों, शिंद्यांकडून भेलसें घेऊन आमच्या हवालीं करावें. तें बोलणें मान्य करून कर्नल क्यामक सुरंज्यापर्यंत चालून आला. इंग्रज येत असल्याची बातमी कळतांच महादजी शिंद्यांनीं उज्जनीहून चाल करून येऊन फेब्रुवारीच्या अखेरीस कर्नल क्यामक याच्या सैन्याशीं गांठ घातली. मराठ्यांनीं इंग्रजांस चोंहोकडून घेरून सात दिवस तोफांचा मार दिला. तेव्हां कर्नल क्यामक ता. ७ मार्च रोजीं मागें हटून महतपुरापर्यंत गेला. तेथें त्यानें धान्य वगैरे सामग्री आपणास पाहिजे होती ती यथास्थित मिळवून मराठ्यांशीं पुनः युद्धप्रसंग आरंभिला. ता. २४ मार्च रोजीं त्यानें शिंद्यांवर छापा घालून त्यांचे पुष्कळ लोक जायां जखमी केले व त्यांच्या १३ तोफा हिसकून घेतल्या. या फौजेस ४ एप्रिल रोजीं कर्नल मूर नांवाचा अंमलदार आणखी फौजेसह येऊन मिळाला व तोच सर्व इंग्रज सेनवरचा मुख्य अधिकारी झाला. महादजी शिंदे छाप्यामुळें न कचकरतां पूर्वींप्रमाणेंच गनिमी काव्यानें इंग्रजांशीं लढत होते. त्यामुळें कर्नल मूर यांस ठाणीं व किल्ले घेण्याच्या भरीस पडतां आलें नाहीं. पुढें इंग्रजांनीं पावसाळा आला तेव्हां आपले मुलुखांत परत न जातां माळव्यांतच छावणी केली; त्यामुळें शिंद्यांसही त्यांच्या तोंडावर छावणी देऊन रहावें लागलें.

२४ मार्च.

सन १७७९ च्या अखेरीस पेशवे, नागपूरकर भोंसले, निजामअल्ली व हैदरअल्ली या चौघांनीं एकत्र होऊन इंग्रजांशीं युद्ध करण्याची मसलत केली होती व त्यांत कोणी कोणतें काम करावें हें आपसांत ठरवूनही टाकिलें होतें, हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. बंगाल्यावर स्वारी करण्याचें काम मुधोजी भोंसले यांनीं पतकरिलें होतें व ती कामगिरी करून दाखविण्याकरितां नागपुराहून आपला पुत्र चिमणाजी राजे याबरोबर त्या सालच्या ऑक्टोबर महिन्यांत त्यांनीं तीस हजार फौज बंगाल्याकडे रवाना केली होती. भोंसल्यांच्या मनांतून इंग्रजांशीं वांकडें व्हावयाचें मुळींच नव्हतें; त्यामुळें पुणें दरबारास कामगिरी करण्याचा फक्त देखावा दाखविण्याकरितांच त्यांनीं फौज रवाना केली होती. ती फौज बंगालच्या सरहद्दीवर जाऊन पोंचण्यास सात महिने लागले! तेथें गेल्यावर पावसाळ्याकरितां ती फौज छावणीस राहिली. त्या मुदतींत चिमणाजी राजे व वॉरन हेस्तिंग्स् यांमध्यें तहाचें बोलणें गुप्तपणानें होऊन असें ठरलें कीं इंग्रजांनीं भोंसल्यांस सोळा लक्ष रुपये द्यावे व ते घेऊन त्यांनीं निमूटपणें नागपुरास परत जावें. पेशव्यांचा गढेमंडळ प्रांत भोंसल्यांच्या मनांतून फार दिवस घ्यावयाचा होता तो घेण्यास इंग्रजांनीं भोंसल्यांस मदत करावी! याप्रमाणें शर्ती ठरून रक्कम पदरांत पडतांच चिमणाजी राजे सर्व सैन्यासह आल्या वाटेनें परत निघाले. ते सन १७८१ च्या फेब्रुवारींत नागपुरास येऊन दाखल झाले.

भोंसल्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें स्वारी करण्याचा देखावा तरी दाखविला, पण निजामअल्लीच्या हातून तेंसुद्धां घडून आलें नाहीं. वास्तविक पाहिलें तर सर्व हिंदुस्थानभर इंग्रजांशीं युद्ध सुरू करण्याच्या कारस्थानाचे मूळ उत्पादक निजामअल्ली होते त्याअर्थीं लढाईचें बरेंच जोखीम त्यांनीं शिरावर घ्यावयास पाहिजे होतें. पण तें कांहीं

एक न करितां ते युद्धाचा तमाशा पहात आपले जागीं भागानगरास स्वस्थ बसून राहिले होते इतकेंच नाहीं, तर मद्रासकर इंग्रजांशीं कांहीं फायदेशीर तह ठरवून घेण्याकरितां त्यांचा उद्योग याच वेळीं सुरू होता !

भोंसले व निजामअल्ली यांनीं लबाडी केल्यामुळें इंग्रजांशीं युद्ध करण्याचा सर्व भार पुणें दरबार व हैदरअल्ली यांवरच पडला. होळकर व पटवर्धन यांच्या मदतीनें नाना फडनवीस यांनीं जनरल गॉडर्ड यास जेरीस आणून घाटाखालीं घालवून दिलें. माळवा प्रांतीं इंग्रजांचें व शिंद्यांचें युद्ध सुरू होतें त्यांत यद्यपि इंग्रजांची थोडीबहुत सरशी झाली होती तरी लढाईविषयीं शिंद्यांचाही उत्साह कमी झाला नव्हता; परंतु इंग्रजांवर जरब बसविण्याचे कामीं नाना व शिंदे यांपेक्षां हैदरअल्लीनें फारच अधिक करामत करून दाखविली होती. त्यानें नव्वद हजार सेना तयार करून सन १७८० च्या जुलै महिन्यांत श्रीरंगपट्टणाहून कूच करून थेट मद्रासेकडे चाल केली. त्या प्रांतीं गेल्यावर त्यानें मद्रासेभोंवतालचा प्रदेश जाळून टाकिला. सर हेक्टर मनरो यास लुटून घेऊन पिटून लाविलें, कर्नल बेलीच्या टोळीचा फन्ना पाडिला व अर्काट काबीज करून घेतलें. त्या प्रांतीं त्यानें अतोनात लूट मिळविली. त्या स्वारींत त्यानें केलेले पराक्रम व इंग्रजांशीं झालेलीं त्याचीं युद्धें यांचा मराठी इतिहासाशीं कांहीं संबंध येत नाहीं, सबब ती हकीकत आह्मी तपशीलवार येथें देत नाहीं. गॉडर्ड घाटावर येऊन पुण्याकडे चाल करीत असल्याची मद्रास प्रांतीं हैदरास बातमी कळली तेव्हां त्यानें नाना फडनवीस यांस निरोप पाठविला होता कीं, मद्रासकर इंग्रजांचें पारिपत्य करून जनरल गॉडर्ड याचा समाचार घेण्याकरितां आपण पुणें प्रांतीं येणार आहों ! उलटपक्षीं जनरल गॉडर्ड याची धमक अशी होती कीं आपण मराठी फौजांचा पराजय

करून पुणें काबीज करून हैदरअल्लीच्या पारिपत्याकरितां त्याच वाटेनें म्हैसुरावर स्वारी करणार !

यावप्रमाणें उभयपक्षांकडून युद्धाची गर्जना सुरू होती तरी मराठे व हैदर यापुढेंही एकत्र राहतील तर त्यांशीं युद्ध करणें आपणांस झेंपणार नाहीं हें इंग्रज मुत्सद्यांस कळून चुकलें होतें; व याकरितां पुणें दरबाराशीं तह ठरविण्याविषयीं ते फार आतुर झाले होते. इंग्रजांच्या वतीनें मुधोजी भोंसले पुणें दरबाराशीं मध्यस्थी करीत होते. जनरल गॉडर्ड याचें नानाशीं तहाबद्दल निराळें बोलणें सुरूच होतें. शिवाय मद्रासचे गव्हर्नर व कमांडर-इन-चीफ यांनींही तह ठरविण्याविषयीं नानास आग्रहाचें पत्र लिहिलें होतें. इतकें सारें झालें खरें, परंतु इंग्रज व मराठे यांमध्यें तह ठरविण्यास आयते वेळीं निराळाच माणूस पुढें यावयाचा होता ! त्या म्हणजे १७८१ सालच्या पावसाळ्यांत माळवा प्रांतीं कर्नल मूर व महादजी शिंदे लढाईच्या इराद्यानें परस्परांसमीप छावणी देऊन राहिले होते हें मागें सांगितलेंच आहे. त्या उभयतांनीं युद्धास कंटाळून असें ठरविलें होतें कीं, कर्नल मूर यानें आपलें सैन्य घेऊन यमुना उतरून परत जावें आणि महादजी शिंदे यांनीं इंग्रज सरकार व पुणें दरबार यांमध्यें तह घडवून आणण्याकरितां मध्यस्थी करावी. त्याप्रमाणें कर्नल मूर परत गेला व शिंदे यांनीं नानाशीं तहप्रकरणीं चर्चा सुरू केली. हदरअल्लीचें व इंग्रजांचें अर्काट प्रांतीं युद्ध सुरूच होतें. पण शिंद्यानीं तहाबद्दल मध्यस्थी पतकरल्यामुळें सन १७८२ च्या सुरुवातीपासून मराठ्यांचें व इंग्रजांचें युद्ध बंद झालें व तहप्रकरणीं वाटाघाट सुरू झाली. शेवटीं त्या सालीं मे महिन्याचे १७ वे तारखेस पुणें दरबार व इंग्रज सरकार यांमध्यें शिंद्यांचे मध्यस्थीनें तह ठरला त्यास सालबाईचा तह म्हणतात. त्या

ऑक्टोबर १७८१.

१७८२ १७ मे.

एक न करितां ते युद्धाचा तमाशा पहात आपले जागीं भागानगरास स्वस्थ बसून राहिले होते इतकेंच नाहीं, तर मद्रासकर इंग्रजांशीं कांहीं फायदेशीर तह ठरवून घेण्याकरितां त्यांचा उद्योग याच वेळीं सुरू होता !

भोंसले व निजामअल्ली यांनीं लबाडी केल्यामुळें इंग्रजांशीं युद्ध करण्याचा सर्व भार पुणें दरबार व हैदरअल्ली यांवरच पडला. होळकर व पटवर्धन यांच्या मदतीनें नाना फडनवीस यांनीं जनरल गॉडर्ड यास जेरीस आणून घाटाखालीं घालवून दिलें. माळवा प्रांतीं इंग्रजांचें व शिंद्यांचें युद्ध सुरू होतें त्यांत यद्यपि इंग्रजांची थोडीबहुत सरशी झाली होती तरी लढाईविषयीं शिंद्यांचाही उत्साह कमी झाला नव्हता; परंतु इंग्रजांवर जरब बसविण्याचे कामीं नाना व शिंदे यांपेक्षां हैदरअल्लीनें फारच अधिक करामत करून दाखविली होती. त्यानें नव्वद हजार सेना तयार करून सन १७८० च्या जुलै महिन्यांत श्रीरंगपट्टणाहून कूच करून थेट मद्रासेकडे चाल केली. त्या प्रांतीं गेल्यावर त्यानें मद्रासेभोंवतालचा प्रदेश जाळून टाकिला. सर हेक्टर मनरो यास लुटून घेऊन पिटून लाविलें, कर्नल बेलीच्या टोळीचा फन्ना पाडिला व अर्काट काबीज करून घेतलें. त्या प्रांतीं त्यानें अतोनात लूट मिळविली. त्या स्वारींत त्यानें केलेले पराक्रम व इंग्रजांशीं झालेलीं त्याचीं युद्धें यांचा मराठी इतिहासाशीं कांहीं संबंध येत नाहीं, सबब ती हकीकत आह्मी तपशीलवार येथें देत नाहीं. गॉडर्ड घाटावर येऊन पुण्याकडे चाल करीत असल्याची मद्रास प्रांतीं हैदरास बातमी कळली तेव्हां त्यानें नाना फडनवीस यांस निरोप पाठविला होता कीं, मद्रासकर इंग्रजांचें पारिपत्य करून जनरल गॉडर्ड याचा समाचार घेण्याकरितां आपण पुणें प्रांतीं येणार आहों ! उलटपक्षीं जनरल गॉडर्ड याची धमक अशी होती कीं आपण मराठी फौजांचा पराजय

करून पुणें काबीज करून हैदरअल्लीच्या पारिपत्याकरितां त्याच वाटेनें म्हैसुरावर स्वारी करणार !

यांप्रमाणें उभयपक्षांकडून युद्धाची गर्जना सुरू होती तरी मराठे व हैदर यापुढेंही एकत्र राहतील तर त्यांशीं युद्ध करणें आपणांस झेंपणार नाहीं हें इंग्रज मुत्सद्यांस कळून चुकलें होतें; व याकरितां पुणें दरबाराशीं तह ठरविण्याविषयीं ते फार आतुर झाले होते. इंग्रजांच्या वतीनें मुधोजी भोंसले पुणें दरबाराशीं मध्यस्थी करीत होते. जनरल गॉडर्ड याचें नानाशीं तहाबद्दल निराळें बोलणें सुरूच होतें. शिवाय मद्रासचे गव्हर्नर व कमांडर-इन-चीफ यांनींही तह ठरविण्याविषयीं नानास आग्रहाचें पत्र लिहिलें होतें. इतकें सारें झालें खरें, परंतु इंग्रज व मराठे यांमध्यें तह ठरविण्यास आयते वेळीं निराळाच माणूस पुढें यावयाचा होता ! त्या म्हणजे १७८१ सालच्या पावसाळ्यांत माळवा प्रांतीं कर्नल मूर व महादजी शिंदे लढाईच्या इरायानें परस्परांसमीप छावणी देऊन राहिले होते हें मागें सांगितलेंच आहे. त्या उभयतांनीं युद्धास कंटाळून असें ठरविलें होतें कीं, कर्नल मूर यानें आपलें सैन्य घेऊन यमुना उतरून परत जावें आणि महादजी शिंदे यांनीं इंग्रज सरकार व पुणें दरबार यांमध्यें तह घडवून आणण्याकरितां मध्यस्थी करावी. त्याप्रमाणें कर्नल मूर परत गेला व शिंदे यांनीं नानाशीं तहप्रकरणीं चर्चा सुरू केली. हदरअल्लीचें व इंग्रजांचें अर्काट प्रांतीं युद्ध सुरूच होतें. पण शिंद्यानीं तहाबद्दल मध्यस्थी पतकरल्यामुळें सन १७८२ च्या सुरुवातीपासून मराठ्यांचें व इंग्रजांचें युद्ध बंद झालें व तहप्रकरणीं वाटाघाट सुरू झाली. शेवटीं त्या सालीं मे महिन्याचे १७ वे तारखेस पुणें दरबार व इंग्रज सरकार यांमध्यें शिंद्यांचे मध्यस्थीनें तह ठरला त्यास सालबाईचा तह म्हणतात. त्या

ऑक्टोबर १७८१.

१७८२ १७ मे.

तहांत इंग्रजांनीं मराठ्यांपासून जितका मुलूख घेतला होता तितका सर्व त्यांचा त्यांस परत दिला. एक साष्टीचें बेट मात्र परत दिलें नाहीं. श्रीमंत दादासाहेब यानीं दरमहा पंचवीस हजार रुपये नक्त नेमणूक घेऊन गोदातीरीं इच्छेस वाटेल तेथें स्वस्थ रहावें, असेंही कलम या तहांत होतें. आणखीही बरींच कलमें होतीं, परंतु तीं विशेष महत्वाचीं नसल्यामुळें येथें दिलीं नाहींत.

या प्रकरणांत जनरल गॉडर्ड याच्या सैन्याशीं पटवर्धनांच्या फौजेच्या लढाया झाल्या त्यासंबंध परशुरामभाऊनीं पत्रें लिहिलेलीं आहेत तीं फार मनोरंजक व महत्वाचीं आहेत. त्यांतले उतारे आम्ही येथें देत बसलों असतों तर हा लेख फारच वाढला असता, याकरितां तसें केलें नाहीं. दिग्दर्शनाकरितां फक्त एकदोनच उतारे दिले आहेत. परशुरामभाऊनीं लिहिलेलीं हीं सर्व पत्रें या प्रकरणांत छापलीं आहेत तीं वाचकांनीं अवश्य वाचून पहावीं अशी आमची त्यांस शिफारस आहे. नं. २५७५ स पेशव्यांच्या नांवें नाना फडनविसांनीं इंग्रजांच्या बादशहास पत्र लिहिलेलें छापलें आहे तेंही मनोरंजक आहे.

नं. २५५८. श्री. ( १६ जून. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक रामाजी मल्हार. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल तागायत ज्येष्ट शु॥ पौर्णिमा मुक्काम करकंब येथें स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं कृपाळू होऊन आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं "वाका अथवा गैरवाका समजाविल्यास ऐकावयाचा नाहीं; समजूनच करणें तें केलें जाईल;" ह्मणून आज्ञापिलें, त्यास मजला स्वामीचा अभयकर, त्यापक्षीं मी चिंता करीत नाहीं. राजश्री मोरोपंत ` ` आले आहेत, ते येथें

सरकारकामांत चित्त घालीत नाहींत व लिहीणेंही लिहीत नाहींत. फडणिसानीं रोजकीर्द घालावी, त्याजवर सुभेदाराची मखलासी व्हावी, याप्रमाणें स्वामीनीं बंदोबस्त करून दिला असतां अद्यापि मखलासी होत नाहीं व रोजकीर्दही घालीत नाहींत ! मी पोतेंझाडा कच्चा राखितों. मोरोपंत महिन्या दोन महिन्यांनीं एक दोन दिवस बसोन कीर्दी समाप्त करितात ! नेहमीं शेत-मळे व देवढी गांव श्रीमंत राजश्री राघोबादादाकडून त्यांनीं कमाविशीनें केला आहे तेथें जातात. 'लिहिणें तटलें, कीर्दी वरचेवर घालीत जाव्या,' ह्मटल्यास म्हणतात कीं, 'तुम्हींच कीर्दी घालणें. अवघें कामकाज तुम्हींच करणें' असें रुसोन बोलतात. मीं सुभेदारांस दोन चार वेळां सांगितलें कीं, 'कीर्दीवर मखलासी होत नाहीं. मोरोपंत रोजकीर्द घालीत नाहींत.' त्यास ते चित्तावरच घेत नाहींत. सारा जाबसाल उसणा करितात. चित्तापासून सरकारकाम करावें हें मानस नाहीं. तेव्हां काय त्यांचे मानस तें समजत नाहीं. गुदस्तां सन समानीनचा हिशेब तयार होणें आहे त्याची माहीतगारी आम्हास नाहीं. यद्यपि कागदपत्र असावे, त्यावरून हिशेब आकारावा, तरी कांहीं कागद मोरोपंतीं घरास नेले आहेत; कांहीं येथें दप्तरांत आहेत. तेव्हां हिशेब कशावरून आकारावा ! असा प्रकार. पोतानिसीचें लिहिणें व दप्तरचें लिहिणें व सुभेदारांजवळचा जाबसाल अशीं तीन संधानें मीं एकट्यानें राखावीं लागतात. एखादे वेळ घस्त पहारा करावयास जावें लागतें. राजश्री आपाजीपंत साठे आहेत ते गैरमाहीत. येणेंप्रमाणें वर्तमान आहे. यास्तव स्वामीनीं मोरोपंतास सरकारकाम व लिहिणें चित्तापासून करणेविशीं सांगावें. मामलतीच केवळ करूं नयेत अशी आज्ञा करावी. उभयतांचे शेताची मोजणी करावी येविशीं स्वामीनीं एक दोन वेळ आज्ञापत्र पाठविलें, परंतु मोजणी होत नाहीं. मौजे अरण व मोर्डानिबेकर शिवेखालीं जमीन सवा चावर लेहून देतात.

ते जमीन लावणी झाल्यास दोनशें रुपये सरकारांत दरसाल येतील, ते बुडतात. याचें कारण दोहीं गांवचे शिंवेची जमीन कजियाची तें सुभेदार शेत करितात. सरकारांत मोघम रुपये ३३ जमा करितात. येणेंकरून शिंवेचा निवाडा होत नाहीं. सुभेदाराची किफायत; तेव्हां हे चित्तावर घेऊन निवाडा करीत नाहींत. चित्तावर घेऊन केल्यास आगाध नाहीं. निवाडा जाहला तरी जमीन गांवाकडे लावणी होऊन सवा चावर जमिनीचे रुपये सरकारांत येतील याप्रमाणें वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय. स्वामी आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करीन. येथील जासूद जातात येतात त्यांसमागमें हें कच्चें वर्तमान लिहितां येत नाहीं. जासूद जाऊं लागतात तेव्हां त्यांस परभारां विचारतात कीं, ' रामाजीपंतानीं कांहीं कागदपत्र दिल्हा आहे कीं काय ? ' एकदोन कागदपत्र घेऊन ठेविले. यास्तव मीं जातीवर एक जासूद आपले मायेंचा ठेविला आहे. वर्तमान आढळेल तें न लिहिलें तरी स्वामी रागें भरतील. यास्तव तपशीलवार लिहितों. सेवेशीं श्रुत होय. कृपाकर स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

नं. २५५९. श्री. (श्रावण शु० — आगष्ट ५० पंधरवडा.)

विज्ञापना. इकडील वर्तमान तरीं इंग्रजांची तयारी मात्र होत आहे. अद्यापि कोठें लढाई नाहीं. यांच्याही फौजेची तयारी होत आहे. राजश्री गणेशपंत बेहेरे चार हजार फौजेनिशीं कल्याणाकडे रवाना जाहले. महाड, विजयदुर्ग, रत्नागिरीकडेही फौजा रवाना होत आहेत. राजश्री नाना फडणीस पुण्यानजीक आहेत. हरीपंततात्या घरींच आहेत. मुहूर्त करून निघाले नाहींत. श्रीमंत राजश्री रावसाहेब वाड्यांत आहेत. महादजी शिंदे बिडाकडे जाऊन तुळजापूर करून येणार. इकडे नेट

१ पत्र शिवाजी बाबाजीचें गंगाधररावांस पुण्याहून.

पडल्यास लौकर येतील. गुलजारखान[1] याचा सल्ला ठरोन इकडे लिहू पत्र पाठविलें होतें; त्यास तो दोनशें स्वारांनिशीं पळोन भिल्लाणांत गेला. ठाणें यानीं घेतलें असलेलें वर्तमान सेवेशीं लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २५६०. ( २३ आगष्ट. )

बापूजी बल्लाळ जोशी याचें पत्र पुण्याहून बाळासाहेबांस मिरजेस. मिति श्रावण व॥ ८.

" आजच बाजारी वर्तमान लोक बोलतात कीं, इंग्रजानें येऊन उज्जनीस उपद्रव केला आहे. शिंदे उज्जनींत आहेत. असें वर्तमान आहे. जाटांचे मुलखांत इंग्रजानें उपद्रव फार केला आहे. चहूकडे इंग्रज जाला आहे ! "

नं. २५६१. ( भाद्रपद व० ८–२१ सप्टंबर. )

तासगांवाहून परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस मिरजेस पत्र. पै० २३ रमजानचें.—

" केसोपंताचें बोलणें लागलें आहे, म्हणोन विनायकपंतानीं लिहिलें आहे. त्याचा भाव समजला नाहीं ' म्हणून लिहिलें, त्यास केसोपंत पेशजी नारोशंकर यांजकडे होत. ते खानदेशांत गुलजारखान यास जाऊन मिळाले होते. गुलजारखान याचें पारिपत्य जालें तेव्हां पळोन जाऊन श्रीमंत राजश्री दादासाहेबांजवळ जाऊन राहिले आहेत. इंग्रजांच्या राजकारणांत आहेत. त्यांजकडून बोलणें लागलें आहे, असा भाव दिसतो. "

---

१ गुलजारखान याचा बाप मीरखान हा थोरले बाजीराव पेशव्यांच्या फौजेंत सरदार होता. त्यास चोपडें परगण्यांत लासूर व भोंवनालची खेडीं मिळून पन्नास हजार रुपये उत्पन्नाचा सरंजाम फौजेच्या खर्चाकरितां दिलेला होता.

नं. २५६२. ( भाद्रपद व० १३–२६ सप्टेंबर. )

हरिहरराव पांडुरंग यांस नाना फडनवीस यांचें पत्र——२६ रमजानचें——

" इंग्रजानीं वसई कल्याण प्रांतीं व खानदेशप्रांतीं लबाडी केली आहे. त्यांचे पारिपत्यास फौजा व जमाव रवाना केलेच आहेत. त्यास गाडर सुरतेहून सरदार मुंबईस येऊन सरंजाम लढवाई करीत आहे. लबाडीस चुकणार नाहीं. याजकरितां आपली सरंजाम सुद्धां तयारी असावी याजकरितां फौजा तोफखाना गाडदी आदिकरून तयारी करविली. दसरियाचे मुहूर्तें डेरे दाखल होणार, याजकरितां तुम्हीं पत्रदर्शनीं फौज जमा करवून दसरियाचे मुहूर्तें डेरेदाखल येऊन पोंचावें. "

नं. २५६३. श्री. ( भाद्रपद व०–सप्तंबर दु० पंधरवडा. )

विज्ञापना ऐसीजे. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांस कांजिण्या आल्या होत्या. हल्लीं चांगला उतार आहे. प्रकृत चांगली आहे. सालमजकुरीं श्रावण मासची दक्षणा सवालाख रुपये वांटिले. कळावें-इंग्रजीं तिरकती जहाज अरबस्थानांत जिनस खरेदी करून आणावयाकरितां गेलें होतें. त्यास माल हरजिनसी खारीक खोबरें द्राक्षें व साकर व सकलाद व कांहीं मोतीं पोवळें वगैरे जिन्नस भरून मुंबईस येत होते. त्यास मार्गीं फरांसिसांची व इंग्रजाच्या तिरकती जहाजाची गांठ पडली. लढाई तीन दिवसपर्यंत मातबर जाहली. फरांसिसानें इंग्रजाचें गलबत शिकस्त केलें. माणूस फारच मारलें गेलें. पागेस लावून घेऊन जात होता. तों पर्जन्यकालचें वावदळ भारी सुटलें, उपाय नाहीं, तेव्हां त्यांणीं पागेचें सोडून टाकिलें. तें वादळानें हाणून सुवर्णदुर्गच्या किल्याच्या बाऱ्यावरी आणिलें. किल्लेकऱ्यानीं बातमीस मचवे पाठविले

१ पत्र शिवांजी बाबाजीचें मिरजेस गंगाधररावांस.

तेव्हां फार जेरदस्तीखालीं ( जहाज ) आलें हें पाहून तयार होऊन जाऊन गलबत नाक्यावरी आणिलें. माल काढावयासी लागले आहेत. पाऊणशें तोफा गलबतावरी आहेत. वीस लक्षांचा माल वरता आहे म्हणोन आवाई आहे. कनिष्ट पक्ष चार पांच लक्षांस कमी व्हावयाचा नाहीं. मागाहून सविस्तर लिहितों. गाडर इंग्रज याणें चार पलटणें जलमार्गी फुलचारीस रवाना केलीं होतीं. त्यास फरांसिसानें पुढें जाऊं दिल्हीं नाहींत म्हणोन माघारीं मुंबईस आल्याची बातमी उडती आली आहे. पक्की समजल्यावरी लिहीन. हैदरखानानें इंग्रज करनल कूट गुडलुराजवळ कोंडून धरिला होता म्हणोन पेशजी लिहिलें होतें, त्यास हल्लीं पत्रें आलीं. इंग्रज संभाळून गुडलूरच्या ठाण्यांत गेला. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २५६४. ( अश्विन शु० १३-११ आक्टो० )

परशुरामभाऊंचें लष्करांतून मिरजेस गंगाधरराव यांस पत्र. पै।। छ० १२ सवाल.

" कल्याणाकडे जमाव सरकारचा गेला होता. तेथें इंग्रजांची लढाई होऊन शामीरखान रोहिले जमातसुद्धां साहेबकामावर आले असें ऐकण्यांत आहे. खरें किंवा लटकें न कळे. " म्हणन लिहिलें; त्यास छ० ७ सवालचें पत्र विनायकपंताचें आलें त्यांत हा मजकूर नाहीं. बावामंगल किल्याचे माचीस इंग्रज बसले आहेत. त्याचे उपराळ्यास सरकारांतून जमाव गेला असतां इंग्रजाचा जमाव भारी, काढ चालेना, याजकारितां सरकारचा जमाव चार कोस माघारा आला; इतकें मात्र लिहिलें आहे. "

नं. २५६५. ( आश्विन व० २-१५ आक्टोबर. )

लष्करांतून परशुरामभाऊंचें मिरजेस गंगाधरराव यांस पत्र. पै।। छ० १८ सवाल.

" हैदरखानाची व इंग्रजांची लढाई मातबर जाली. इंग्रज शिकस्त करून सरदार व हत्ती, तोफा वगैर पाडाव आले. " याप्रमाणें हैदरखानानें रा. आनंदरावदादा रास्ते यांस लिहिलें आहे. व रास्ते याजकडील कारकून रवळो भिकाजी नेहमीं हैदरखानाच्या लष्करांत बातमीकरितां असतो त्याणेंही लिहिलें आहे. "

नं. २५६६. श्री. ( आश्विन व० ४–१७ आक्टो० )

पै॥ छ० १८ सवाल. सन इहिदे समानीन आश्विन मास.

तीर्थस्वरूप राजश्री गंगाधरराव वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें कृष्णराव बळवंत साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. नरूभोई व कुसाजी व जानूभाई नेमाडे यांचा जातीचा कजिया आहे. याजकरितां कुसाजी व जानूभोई आपलेकडे फिर्याद होऊन नरू भोई यास आणून ( आपण ) अटकेंत ठेविला त्याचा फडशा जाहला नाहीं. भोयांचा कजिया कांहीं असल्यास त्याचा निवाडा त्यांचे जातींत होतो. सरकारांत जात नाहींत. याअन्वयें महाराजांचे पालखीचे नाईक व श्रीमंतांचे पालखीचे नाईक वगैरे समस्त गोत भोई याणीं येऊन सांगितलें, त्यावरून आपणास लिहिलें आहे. तरी नरू भोई व कुसाजी भोई या उभयतांस पुण्यास पाठवून द्यावें. त्यांचे जात तेथें कोणी नाहीं. येथ गोत समस्त मिळोन जातीचा कज्या जातींत निवडतील. गोतांत वाजवी मनास आणून उभयतांस आपलेकडे रवाना करतील. उपरांत अन्याय असेल त्याचें पारिपत्य करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ मेहेंदळे.

नं. २५६७. ( आश्विन व० १३–२५ आक्टोबर. )

गंगाधरराव यांस मिरजेस शिवाजी बाबाजीचें पत्र छ० २६ सवालचें कऱ्हाडाहून—

" पुण्याकडील वर्तमान तर इंग्रज खोपवलीस आले होते ते माघारे तळ्यावर गेले. वसईस प्रथम गडबड त्यांणीं केली, परंतु फजीतच पावले. तीन जहाजें वसईच्या गोळ्यांनीं जायां जालीं, तेव्हां सरोन राहिले आहेत. रास्ते यांची फौज वसईस पाठविली आहे. राजश्री चिमाणा पानशे व भवानी शिवराम व मुसानारंद घांटाखालीं जावयास गेले. तळेगांवाजवळ गेले. पुढें घांटमाथां जाऊन खालीं जाणार. होळकराकडील कांहीं फौज गणेशपंत बेहेरे यांजकडे आली आहे. "

नं. २५६८. श्री. ( कार्तिक शु० १३–९ नवें० )

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी—

दंडवत. विनंति उपरी. आपण छ० २७ सवालचें पत्र पाठविलें तें पावलें. " वसईकडे कल्याण प्रांतांत इंग्रजाचीं पलटणें व सरंजाम आल्यावरून येथून त्यांवर राजश्री चिमाणा पानसे व भवनी शिवराम व रास्त्याकडील फौज व मुसानारंज तोफा गाडदीसुद्धां देऊन रवानगी केल्याचा मजकूर व करवीराकडील सटवाजी भोंसल आल्याचा मजकूर विस्तारें राजश्री नारो शिवदेव यांस लिहिला त्यावरून कळेलें. आम्ही आश्विन व॥ ७ सप्तमीस निघून गारपीरानजीक राहिलों. दुसरे दिवशीं कूच करून खडकीवर येऊन मुक्काम केला. फौजेसही बलावणीं केलीं आहेत. त्यापैकीं कांहीं येऊं लागली, बाकीचीही लौकरच जमा होईल. आपणही दसऱ्याचे मुहूर्तें डेरे बाहेरे दिल्हे म्हणून वर्तमान कळलें. उत्तम केलें. आतां मसलतीस दिवस राहिले नाहींत, याज-

१ महादजी शिंद्यांचें नाना फडनवीस यांस पत्र.

करितां आपण खुद्द बाहेर निघोन फौजा लौकर जमा होत तें करावें. येथील अडचणीचे प्रकार सविस्तर नारोपंतानीं सांगितलेच असतील. आपलेही ध्यानांत आहेत, तथापि श्रीमंतांचे दैवेंकरून होईल तेथवर करीतच आहों, " म्हणोन लिहिलें त्यावरून व राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रांवरून सविस्तर कळलें. ऐशियास वसईकडे कल्याण प्रांतांत इंग्रजाचीं पलटणें आलीं त्याजवरून तोफा व गाडदी रवाना केले, उत्तम केलें. करवीराकडून सटवाजी भोंसला निघोन आला हेही गोष्ट बरीच जाहली. करवीरकराकडील तहाचा जाबसाल लागला आहे. तूर्त प्रसंगीं जाहल्यास करावें म्हणजे राजश्री परशुरामपंतभाऊ फौजसुद्धां मोकळे जाहले. आपण खडकीवर मुक्काम केला हें उत्तम केलें. फौज जै जमा होत जाईल त्यांचा जथ तळेगांवावर पडावा. वसई कल्याण प्रांतांत फौज व गाडदी रवाना केले, त्यांची कुमक तुम्हांला वरचेवर जशी बातमी येत जाईल तशी करीत जावी. कार्तिक वद्य द्वितीयेचा मुहूर्त आमचा बाहेर निघण्याचा आहे. द्वितीयेस बाहेर निघतों. ग्वाल्हेरीकडे फौज रवाना केली. ग्वाल्हेरीचे इंग्रजास आणखी चार पलटणें येऊन सामील जाहलीं. इंग्रज गोहद नरवरानजीक आल्याचें वर्तमान आलें आहे. फौजा पुढें पाठविल्या, परंतु त्यांचा पुस्तपन्हा जाहला पाहिजे. याकरितां आपली आमची भेट होऊन माघारे लवकर येणें जाहल्यास वसईकडील मसलतीस उपयोगी. हैदरखानानीं चेनापट्टणाकडे जाऊन इंग्रजाचें पारिपत्य चांगलें केलें. आपली आमची भेट होतांच बोलणें होऊन आपण देशची मसलत आटोपल्यास आम्ही हिंदुस्थानांत जाऊन इंग्रज ग्वाल्हेरीहून पुढें आले त्यांचें पारिपत्य करून बंदोबस्त करूं. होळकर इंदुराहून निघाले. मातुश्री अहल्याबाईची व त्यांची समजूत पडली नाहीं. महेश्वरास जातात किंवा खानदेशांत निकराचाकरावर जातात, कीं काय मनसबा करितात तें पहावें. प्रतिपदेस

आम्ही बाहेर निघाल्यावर होळकराचा प्रकार समजेल, त्यासारखें दर-कूच ठरेल त्याप्रमाणें मागाहून लिहून पाठवूं. मग आपण खडकीहून कूच करून यावयाचें करावें. येविशीं नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. रा। छ० ११ जिल्काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. २५६९. श्री. ( पौष शु० ४–२९ डिसेंबर. )

राजश्रिया विराजित राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामींचे सेवेशीं—

पो॥ बाळाजी जनार्दन. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. केसो कृष्ण याचें पारिपत्य होऊन तो पळाला येविशीं मजकुराचें पेशजी राजश्री यादव रघुनाथ भागवत यांचें पत्र अगोदर आलें त्यावरून हें वर्तमान आपणास संकलित लिहून गेलेंच आहे. त्यानंतर राजश्री गणेशपंत यांचींही पत्रें छ० २२ जिल्हेजचीं आलीं. केसो कृष्ण जमेत सामान फौज सरंजामासुद्धां रनाळ्याचे आसऱ्यानें राहून लढाईची हिमत बाळगीत होता. छ० १९ जिल्हेजीं गणेशपंत फौजसुद्धां एकीकडून व राजश्री तुकोजी होळकर यांजकडील वाघ, लांबहाते, वगैरे एकीकडून याप्रमाणें दोन टोळ्या दोहींकडून होऊन तोफांची मारागिरी केली. त्याणें आसरा धरून हुजरातेवर फार मार दिला. आसरा न सोडी. तेव्हां हुजरातेनें त्याजला अंगावर घेऊन रनाळ्याबाहेर काढिला आणि उलटून लढाई दिली. अडीच प्रहरपर्यंत झुज मोठेंच जालें. हुजरात व सरंजामी फौज राजश्री महादजी निळकंठ व त्रिंबकराव नारायण राजेबहादर यांजकडील वगैरे याणीं मर्दुमीची शर्त केली. त्याजकडील चारशें माणूस ठार व सातशें जखमी जालें. वर-

---

1 पुरंदरे.

कड लोक रनाळ्यांत हत्यारें सोडून पळोन गेले. तोफा व तीन हत्ती व दोनशें घोडे दारूगोळा पाडाव आलीं व सलतनत वगैरे सुद्धां आणिली. केसो कृष्ण परत एकटाच पळून गेला. चंद्रराव पवार हा त्याजकडे होता तो ठार झाला रनाळ्यांत लोक होते त्यांसीं कौल देऊन त्यांचीं हत्यारें घेऊन बाहेर घालविलें. श्रीमंतांचा पुण्यप्रताप! केसो कृष्ण याचें चांगलेंच पारिपत्य जालें. सविस्तर आपणास कळावें म्हणून लिहिलें आहे. रा। छ० २ मोहरम हे विनंति.

नं. २५७०. **श्रीगणपति.** (पौष शु० ५–३० डिसेंबर.)

ती॥ मातोश्री भवानीबाई वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें परशुरामानें विज्ञापना. मातुश्रीस समाधान नाहीं ह्मणोन लष्कराहून निघोन घरास आलों. दुसरे दिवशीं वाडिलांस घेऊन भिलवडीस आलों. काल भृगुवारीं आवशींचे दहा घटका रात्रीं देवाज्ञा जाहली. आम्हां सर्वांस टाकून गेली! इलाज काय आहे! ( मातोश्री ) मागें वडीलपण आपणाकडे आहे. चिरंजीव राजश्री दादा पुढें गेला. आम्हांस येथें गुंता पडला. इलाज नाहीं. चिरंजीवाकडे फौज रवाना करितों. हे विज्ञापना.

नं. २५७१. ( पाष शु० ५–३० डिसेंबर. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र. पो॥ छ० ३ मोहरम पौषमास.—

**श्रीगणपति.**

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी—तीर्थरूप मातुश्रीस घेऊन भिलवडीस आलों. काल भृगुवारीं आवशीच्या दहा घटिका रात्रीस आम्हांस टाकून मातोश्री देवलोकास गेली! ईश्वरें ( आमचें )

---

१ जिला पत्र लिहिलें तिचा मुलगा रघुनाथराव नीळकंठ कुरुंदवाडकर.

छत्र नेलें ! श्रीसत्तेस इलाज नाहीं. सार्थक त्यांचें तर जाहलें; आम्हांस नाहींशी जाली. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २५७२. श्री. ( पौष शु० ६--३१ दिसेंबर. )

राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं—

विनंती उपरी. आपल्यास येण्याविशीं पत्रें फार पाठविलीं. अद्याप येणें होत नाहीं. पुढील कितेक विचार मसलतीचे करावयाचे ते आपण आल्यावर परस्पर बोलोन करावे म्हणोन फार वाट पाहिली. दिवस तर निघोन जात चालले. याकरितां अद्याप तरी जलदीनें येऊन पोहोंचावें. रा। छ० ४ मोहोरम. हे विनंती.

नं. २५७३. श्री. ( पौष शु० ६–३१ दिसेंबर. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुराम रामचंद्र स्वामी गोसावी यांसीं—

पो॥ माधवराव नारायण प्रधान. नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुम्हांस यावयास पेशजीं पत्रें गेलीं त्यास " राजश्री रघुनाथराव निलकंठ यांची रवानगी पुढें केली आहे. येतील. मागाहून आह्मीही लौकरच येतों. " याअन्वयें तुमचीं पत्रें आलीं. ऐशियास अद्याप मशारनिल्हे आले नाहींत व तुह्मी कोणे ठिकाणीं आलां हेंही वर्तमान लिहून आलें नाहीं. या उपरी लौकर निघून यावयाचें करणें. जाणिजे. छ० ४ मोहरम सु॥ इहिदे समानीन मय्या व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंति.[1]

नं. २५७४. श्री. ( पौष शु० ६--३१ दिसेंबर. )

राजश्रिया विराजित राजश्री परशुरामपंत. स्वामीचे सेवेशीं—

पो॥ बाळाजी जनार्दन. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष.

---

१ हें पत्र नाना फडनविसानीं लिहिलें आहे.

आपलें येणें इकडे लौकर व्हावें येविशीं पेशजीं आपणास पत्रें लिहिलीं गेलीं त्याचें उत्तर, " राजश्री रघुनाथरावदादा यांची रवानगी पुढें केली. येतील. आम्हीही मागाहून लौकर येतों. " याअन्वयें आलें. त्यास रघुनाथराव अद्यापि आले नाहींत. आपण कोठेपर्यंत आलां हें लिहून येत नाहीं. तर लिहून पाठवावें. यावयाचेंही लौकर करावें. आपण यावें म्हणोन पत्रें फार पाठविलीं,'येतों. फौज पुढें रवाना केली,' हीं उत्तरें येत गेलीं. अद्यापि फौजेची वार्ताही नाहीं. मग आपलें कूच झाल्याचें वर्तमान कोठून श्रवण होणार ? असो. या उपर लौकर फार लांब मजली करून यावें. केसोपंत दातार याचें पारिपत्य खानदेशांत झालें; मोठें खूळ मोडिलें; हें पूर्वींच लिहिलें होतें. राजश्री गणेशपंत बेहरे यांसी " फौज सुद्धां सुरत अठ्ठाविशींत जाणें " म्हणोन पत्रें पाठविलीं आहेत. व राजश्री तुकोजी होळकर यांसीं लिहिलें कीं, एक सरदार दोन हजार फौज व पांच हजार पेंढार बरोबर दिलें तें गणेशपंतांबरोबर देऊन तुम्हीं नाशिकच्या घांटानें खालीं उतरून कोंकणांत राजश्री हरीपंत यांस येऊन मिळावें. याप्रमाणें लिहून पाठविलें. प्रस्तुत गाडर वसईस आहे. पांच चार हजार पलटणी ( लोक ) वज्राईजवळ आहेत. कांहीं कल्याणास आहेत. हरीपंतही दहिंवलीवर व राजश्री बाजीपंत फौज तोफखाना गाडद सुद्धां बदलापुरावर आहेत. तलावा करितात. कधीं थोडीशी लढाई होते. इंग्रजाचा पुढील मनसबा-घांटावर येतों किंवा बंदरकिनाऱ्याची जागा चांगली आहे तेथें गळीं पडतो, किंवा सुरतेकडे जातो हें समजत नाहीं. हैदरखानाची जरब भारी इंग्रजावर बसली आहे, यामुळें विचारांतही आहेत. तुळाजी पवार गोवेंकर फिरंगी याणें स्नेह धरून सरकारांत पाठविला. सारांश आपण लौक यावें. करवीरकरांचा तह ठरला तरी त्यांचा विश्वास नाहीं. इकडे मसलत

पाहून लबाडी आपण आलियावरी करावयासी चुकणार नाहींत, याचें धोरवट बांधून ठेवावें. रा॥ छ० ४ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. २५७५. श्री.

विलायतेस *सरकारचें पत्र गेलें त्याचा मसुदा नाना फडणीस यांचे हातचा एका गृहस्थास आढळला ( त्यानें ) त्याची नक्कल पाठविली तिची नक्कल.

---

*सवाईमाधवराव पेशवे यांचें. हें पत्र कधीं पाठविलें गेलें ती नक्की तारीख समजण्याला जरी मार्ग नाहीं तरी हें स. १७८० च्या पावसाळ्यांत लिहिलेलें असावें असा तर्क होतो. कारण कीं जनरल गाडर्ड व महादजी शिंदे यांच्या गुजराथेंत लढाया झाल्या व मुंबईकरांनीं कोंकण प्रांतांत स्वारी करून कल्याण घेतलें येथपर्यंत इंग्रज प्रकरणाचा या पत्रांत उल्लेख आहे. आणि या गोष्टी त्या सालच्या जून महिन्यापूर्वी घडलेल्या आहेत. पावसाळ्यानंतर जनरल गाडर्ड यानें गुजराथेंतून मुंबईकडे येऊन वसई घेतली, व पुण्यावर स्वारी करण्याच्या उद्देशानें बोरघाटाच्या माथ्यावर येऊन तळ दिला, वगैरे गोष्टींचा उल्लेख या पत्रांत आलेला नाहीं. हें पत्र पेशव्यांच्या नांवें लिहिलें आहे तरी याची रचना नाना फडनवीस यानीं केलेली आहे. यांत नानांनीं पुणें दरबारची बाजू मात्र चांगली सजवून लिहिली आहे. अर्थात् इंग्रजांच्या वतीनें जो थोडा बहुत मजकूर लिहितां येण्याजोगा आहे तो यांत सांपडावयाचा नाहीं! नानांचें हें लिहिणें त्या काळच्या लोकांस फार पसंत वाटल्यामुळें जागोजागच्या लोकांनीं त्याच्या नकला करून संग्रहीं ठेविल्या असाव्या असें वाटतें. आम्ही छापीत आहों ही नक्कल पेशवाईंतच लिहिलेली असून ती आम्हास मिरजमळा संस्थानच्या दप्तरांत सांपडली व अशीच दुसरी एक प्रत इचलकरंजीच्या दप्तरांत आढळली. रा. रा. द. ब. पारसनीस यानीं आपल्या इतिहाससंग्रहाच्या स. १९०९ मार्चच्या अंकांत असलाच एक निराळा मसुदा छापला आहे तो या आधीं तीन वर्षें लिहिलेल्या पत्राचा आहे.

" मुद्दत एक गुजरली. आमेहेरबानांकडून दोस्तीचें खत येऊन खैरियत मालूम होत नाहीं. त्यास दोस्तीचे अलमांत ऐसें नसावें. हमेशा खत किताबतीचा सिलसिला जारी असावा हें लार्जम आहे. दुन्याईंत उमदा चीज येखलासाखेरीज नाहीं. इंर्ज्यानेबही हेंच चाहतो कीं, पेशजीचे करारांबमोजीब तर्फैन चालून दोस्तीची तरकी रोज बरोज जादा होत असावी. साबि ( क ? ) आमच्या रियासतींत पूर्तकेश, व वलंदेज यांची सौदागिरी जारी होती. ते वक्तीं मंबई कोठी बमोजीब खुर्द व इंग्रज थोडी जमियतेनिशीं विलायतेहून मुंबईस आमदरफ्त करीत होते. तेव्हां मंबईकर जनराल याणीं कैलासवासी बाजीरावसाहेब यांसी दोस्तीचा पैगाम केला. त्या समयीं " टोपीवाल्यांत इंग्रजी बादशहा बहुत नेकनियत रास्तगो व कौलकरारांत कायम व इनसाफांत येकवखंत, अहेद पेमान झाल्यावर त्याच बमोजीब ( त्या बादशहाची ) अखेरपर्यंत चाल चालावी—असें ऐकत होते. त्याजवर मुद्देनजर देऊन मंबईकरांचा पैगाम मंजूर करून त्यांशीं कौलकरार अमलांत आला. आणि वलंदेज व पूर्तकेश यांचीं बंदरें बंद करून इंग्रजांची सौदागिरी आपले रियासतींत जारी केली. त्याबरहुकूम वैकुंठवासी नानासाहेब याणींही करारबमोजीब चालवीत असतां तुळाजी आंगरे सरकारच्या कौलकराराबमोजीब इंग्रजांशीं वर्तणूक न करीत, व

१ पत्र. २ खुशाली. ३ व्यवहारांत. ४ योग्य. ५ दुनियेंत. ६ उत्तम. ७ मैत्रीखेरीज. ८ आम्ही. या बाजूनें. ९ कराराप्रमाणें. १० उभयपक्षीं. ११ वृद्धि. १२पूर्वी. १३ राज्यांत. १४ पोर्तुगीज. १५ डच. १६ मुंबई हें स्थान लहानशीं वखारीप्रमाणें ( होतें. ) १७ येणें जाणें. दळणवळण. १८ स. १७३९ च्या जून महिन्यांत मुंबईच्या गव्हर्नरानें कप्तान इंचबर्ड नांवाच्या वकिलामार्फत बाजीराव व चिमाजीआपा यांशीं तह ठरवून घेतला. १९ सुस्वभावाचे. २० सत्यवादी. २१ यकवकाअत=एक वचनी. २२ कौलकरार. २३ या देशांतले लोक ऐकत होते. २४ बंदरांत व्यापार करूं देण्याचें बंद करून.

हमेश मंबईकरांशीं खरकशा व मुखालिफत करूं लागले. या बाबें सरकारांतून हुकूमही आंगरे मजकूर यांस सादर जाला. लेकिन हामेवार न जाले. सबब सरकारांतून रामाजी महादेव यांस इरशाद फर्मावून विजयदुर्ग वगैरे आंगरे यांजकडील किल्ले येथें महसरा करविला. त्या दिवसांत इंग्रजी गलबत येऊन सुरतचा किल्ला घेतला. तेव्हां रामाजी महादेव याणीं इंग्रजांची कुमक आणून विजयदुर्ग वगैरे मकानें घेतलीं. मालमवेशीसुद्धां ( इंग्रजांनीं ) किल्ले सरकारांत द्यावे असा इंग्रजांशीं करार असतां बिलकुल मालमवेशी इंग्रजांनीं नेऊन किल्ले खालीं सरकारांत सिपूर्द केले. करारावमोजीब कुलमालियत त्यांजकडून येणें असतां येखलासावर नजर देऊन मालमालियतचा तगादा इंग्रजांस न केला. बाद नानासाहेब कैलासवासी जालियावर माधवरावसाहिब राज्याचे अधिकारी, ते मसनदनशीन झाले. त्याणीं मागील करारमदार इंग्रजांशीं जाले व दोस्ती चालत आली त्यावमोजीब चालविली व विलायतेहून तामस् माष्टीन आसाहिबांचें खत घेऊन हुजूर आले. त्यांत मजमूनें कीं, "माष्टीन यास हमेष हुजूर ठेवावें. इंग्रज कोणी बेअंदाई करितील त्यांस तामस् माष्टीन ताकीद करितील; व तर्फैन दोस्तींत कसूर येऊं नये." असें खत आणिलें. तेव्हां साबक इंग्रजांशीं दोस्ती व कौलकरार चालत आले, त्यांत आमेहेरबानांचें खत आलें, तेव्हां बहुत खुष होऊन इंग्रजांचा वकील हुजूर ठेवावयाचा कायदा नसतां आपल्या खतावरून माष्टीन यांस बइज्जवहुरमत पुण्यांत ठेविलें. मशारनिल्हे पांच सात वर्षें हुजूर होते. बाद कांहीं एक दिवसां माधवरावसाहेब कैलासवासी झाले. किंवलेगाहा नारायणरावसाहेब

१ तंटा. २ वैर. ३ परंतु. ४ हुकमास कबूल. ५ आज्ञा. ६ वेढा. ७ ठिकाणें. ८ चीजवस्त गुरूं ढोरसुद्धां. ९ रिकामे. १० हवालीं. ११ मैत्रीवर. १२ नंतर. १३ गादीवर बसले. १४ मजकूर. १५ पूर्वी. १६ सन्मानानें. १७ तीर्थरूप.

राज्यास अधिकारी, ( सबब ) ते रियासत करूं लागले. त्याजवर रघुनाथराव बिरादर असतां त्यांगीं दगा केला. अलमांशिवाय हे गोष्ट त्यांजकडून अमलांत आली. हें हिंदूंच्या महजबांत बहूत नादुरुस्त. बल्केके मुसलमान व टोपीकर यांचेही महजबांत दुरुस्त नसेल, असें जाणून दौलतेंतील मदारूल्महाम व सर्व उमराव व सरदार व कारपर्दाज एकदिल होऊन रघुनाथराव यांचा ताकवं करून दौलतीखेरीज केले. ते वख्तीं मैदान पाहून मंबईकरांनीं बदनजर धरून कौलकरार अहदपैमान सर्व बरबाद करून कारपरदाज़ मोहिमेवर गेले असें पाहून साष्टी घेतली. पुढें रघुनाथराव यास आश्रय दिला. पांच वर्षें जंग व हंगामा शुरू आहे. त्यास फरांशीस वगैरे टोपीवाले या दिवसांत सरकाराशीं दोस्ती करण्यास वकील पाठवून बहुत अंजुमंद. लेकिन दुरंदेशींचे[13] मार्ग पहातां आमेहेरबां म्हणतील कीं, ' आम्हास एक वेळ कुल इतल्ला करावयाचा होता, म्हणजे इंग्रजी लोकांस ताकीद करून कौलकराराबमोजीब वर्तवितों. ' असें दिलांत आणून व पहिले कौलकरार व अहद पमानावर नजर देऊन हें खत आसाहेबांस पाठविलें आहे. आ मेहरबां म्हणतील कीं, ' ममईवाले वगैरे यांजकडून बेअदबीची वर्तणूक काय झाली ? ' त्याचा नक्ष आपणास पूर्णपणें कळावा व खातरनशीन सर्व देरेजे व्हावें; सबब त्यांचे गैररेहाचे वर्तणुकीचीं कलमें—बी तपशील—

१ नानासाहेब कैलासवासी जाले बाद राज्याधिकारी माधवरावसाहेब व नारायणरावसाहेब. त्यास माधवरावसाहेब वैकुंठवासी जालियावर

१ भाऊबंद. २ लोकरीतीविरुद्ध. ३ धर्मांत. ४ त्याचप्रमाणें. ५ कारभारी. ६ कामगार. ७ रघुनाथराव यांचा अधिकार तहकूब करून त्यांस पदभ्रष्ट केलें. ८ नाहींसे करून. ९ युद्ध. १० स्वारी. ११ उत्कंठित. १२ परंतु. १३ दूरदृष्टीचे. १४ ठसा. कच्ची हकीकत. १५ सर्वप्रकारें. १६ गैरचालीच्या.

किबलेगाहा नारायणरावसाहेब दौलत करूं लागले. ते वख्तीं रघुनाथराव घरांतील बिरादर याणीं दगा करून आपण दौलत करावी हा इरादा केला. किबलेगाहा यांस फंद करून मारिलें. ही गोष्ट हिंदूंचे महजबांत बहुत नामुनासब[1] व राज्याधिकारही आमचा; रघुनाथराव यांस तालुक[2] नाहीं; हें मदारूलमहाम व तमाम कारपरदाज अमीर व उमराव व सरदार यांणीं दिलांत आणोन रघुनाथराव यांस दौलती-खेरीज करावें असें मुकरर करून मदारूलमहाम तमाम सरंजाम व फौजसुद्धां त्यांचे ताकुबावर गेले असतां खालीं मैदान देखून व काबू वख्त पाहून तामस माष्टीन पुण्यांत होते त्याणीं ममईवाल्यांकडून सरकारचे मकान साष्टी वगैरे चार जंजिरे घेतले. तेथें सरकारचा अंमल व लवा[3] रयतेची मालियत मुबलग होती, ते मंबईकरानीं आपले तरूफांत[4] घेतली. दुरंदेशी न करितां करार मदार अहद पैमान सर्व तोडून हंगामा बरपा[5] केला. तामस माष्टीन आसाहेबांचें खत घेऊन हुजुरास रहावयास आले होते त्यांत मजमून कीं, 'इंग्रज कोणी बेअदबी करितील त्यांस ताकीद करून दोस्ती चालवावी.' विजयदुर्गची मालियत आंग्रे यांची क्रोडों रुपयांची करार सरकारांतून द्यावयाचा नसतां नेली. तें सर्व दरकिनार[6] राहून माष्टीनमजकूरच बाजीगॅार[7] होऊन बेअदबी करूं लागले, तेव्हां बादशाही हुकूम व अहद पैमान कोठें राहिलें !

१ साबिक बाजीरावसाहेबांचें आयंदार्पासोन[8] पांच चार वेळां करारनामे इंग्रजांशीं झाले. त्यांत करार कीं, सरकारच्या दुष्मनास व रियासतींतील अगर घरांतील कोणी आल्यास पन्हा[9] न द्यावी व कुमक न करावी. बलके सरकारांत सिपूर्द करून द्यावे. ऐसा करार

१ अयोग्य. २ संबंध. ३ सरंजाम. ४ ताब्यांत. ५ उभा. ६ एकीकडे. ७ खेळ करणारे. ८ पश्चात्. ९ आश्रय.

असतां रघुनाथराव यास पन्हा देऊन व कुमक करून कर्नेल कीटण वगैरे इंग्रज जमावसुद्धां सरकार तालुका गुजराथप्रांतीं येऊन करोडों रुपये जमेचा मुलूख खराब करून चाळीस पन्नास लाख रुपये वसूल घेतला. त्यांच्या मुकाबल्यास फौजा रवाना झाल्या, त्यांसही करोडों रुपये खर्च झाला. अहद पैमान करार मजबूत होते ते तोडिले. साष्टी घेतल्यावर ( मुंबईकरानी ) लिहून पाठविलें कीं, पूर्तकेश घेणार म्हणोन आह्मी घेतली ! हे रहा कोण !

१ कर्नेल कीटण याणीं रघुनाथराव यांस नमूद करून गुजराथप्रांतीं हंगामा सुरू केला. सबब त्याचे मुकाबल्यास सरकारची फौज व सरदार गेले. एकदोन लढाया झाल्या. आंइंद जंग सुरू होती तों इतक्यांत कलकत्तेकर जनराल व कौंसल याणीं खत पाठविलें कीं, "इंग्रज कोणाचा मुलूख चहात नाहींत, व हरकोणाची कुमक करून कजिया करावा हें इंग्रजांचे बादशहास व कंपणीस मंजूर नाहीं. मुंबईवाले याणीं दरम्यान हरकत आणिली आहे, त्यास लबाडीची हरकत न करावी, फौज माघारी न्यावी, या बाबें ताकीद पाठविली आहे. तर्फैन दोस्तीची तरकी व्हावी, याजकारितां एक मातबर शक्स रवाना करितों. सरकारचे सरदारांस व फौजेसही ताकीद व्हावी कीं, लढाई न करीत." या मजमुनाचें खत आलें. कलकत्तेकर हे बादशहा व कंपणीचे मुखत्यार, त्याचें लिहिणें रास्त व दुरुस्त व कायमीचें, असें जाणोन दोस्तीवर नजर देऊन सरकारची फौज व सरदार यांस माघारी येण्याविषयीं हुकूम सादर झाला. त्याजवरून सरकारच्या फौजा माघाऱ्या आल्या. कर्नेल कीटण याणीं खालीं मैदान पाहून फौजेचा शह दूर गेला

---

१. त्यावेळीं. २ मनुष्य.

हें समजून व कलकत्तेकर याचें लिहिणें खातरेस न आणून रघुनाथराव यांस बरोबर घेऊन सरकारचे सरदार फत्तेसिंगराव गायकवाड यांजवर मोहीम केली. त्यांजवळून मुबलग पैका घेतला. मुलूखही तशेरुफांत आणिला. बाद कर्नेल जान हपटन कलकत्याहून हुजूर आले. त्याणीं जाहीर केलें कीं, "तमाम हिंदुस्थान व दक्षणचीं बंदरें इंग्रजांचीं यांजवर कौंसल व कलकत्तेकर मुखत्यार आहेत. त्यांचा मुखत्यारनामा घेऊन आलों असों. आह्मी सलूख करूं तों तमाम बंदरांस इंग्रजांस मंजूर असे." ते वखतीं सरकारचे मुत्सद्दी याणीं जबाब दिला कीं, "मंबईकर सर्व फितुराची जड आहे. कलकत्तेकरानीं ताकीद दिली असतां कर्नेल कीटण याणीं हंगामा केला आहे, तेव्हां मुखत्यारी तुमची काय समजावी ? सबब मंबईकरांकडील कोणी मातबर आणवावा. मग सुलूख ठरविला जाईल." याचा जबाब कर्नेल मशारनिल्हे याणीं दिला कीं, "इंग्रजी कायदा-मुखत्यार असेल त्याणें मुकरर केलें तें सर्वांस कबूल आहे. मंबईवाले यांची काय जुरैत कीं, कलकत्तेकर ठरावितील त्यास तफावत करितील !" असें बोलोन मुखत्यारनामा कंपणीचे मोहरेनिशीं बजिन्नस दाखविला. अखेरीस सरकारचा व इंग्रजांचा तर्फैन करारनामा ठरविला. त्याबमोजीब कर्नेल मशारनिल्हे याणीं कलकत्तेकर कोंशल यांचे दसकतानिशीं व कंपणीचे मोहरेनिशीं करारनामा सरकारांत दाखल केला. व सरकारचा करारनामा घेतला. कर्नेल जान हपटन याणीं कुल इतल्ला मंबईकरांस दिला. त्यावरून मंबईकर याणीं आपले शहरांत सलुखाची मुनादी देऊन कर्नेल हपटन यास जबाब पाठविला कीं, करारनाम्याबमोजीब आपण कबूल केला. कर्नेल कीटण यास मंबईकरांनीं व हपटन याणीं पत्रें पाठविलीं कीं, तुह्मी रघुनाथराव यांची रिफाकत

१ ताब्यांत. २ मुळी. ३ सामर्थ्य. ४ दौंडी. ५ संगत.

सोडून देणें. लेकिन् कीटणमजकूर याणीं दोन महिने टाळाटाळ केली. अखेर आपण सुरतेस गेले.रघुनाथराव यांसही आपलेजवळ बोलाविलें. सरकारच्या फौजा हुजूर आल्यावर रघुनाथराव यांस सुरतेहून खुसकीचे रहानें मंबईस रवाना केलें. तेव्हां सरकारचे मकाणास त्याणीं इजा दिली, सबब त्यांजवर सरकारची फौज रवाना केली. इतक्यांत मंबईकर याणीं गलबतें पाठवून रघुनाथराव यांस मंबईस घेऊन गेले. हे बाद-रहाची कैफीयत सरकारांतून कलकत्तेकरांस कलमी केली. त्याणीं जबाब पाठविला कीं, 'मंबईवाले यांस आह्मी ताकीद केलीयाबाद रघुनाथराव यांस कंपणीचे तालुक्यांत मंबईकर पन्हा देणार नाहींत.' असें असतां मंबईकर याणीं कलकत्तेकर यांची ताकीद न मानून रघुनाथराव यांस आपले नजीक ठेऊन सरकारतालुक्यांत फिरोन फंद फितूर सुरू केला जदीद[1] करार झाला त्याची ही अहवाल, तेव्हां रास्तरवी[2] कायमी कोठें राहिली ?

१ कलकत्तेकर याणीं लिहिलें कीं, "इंग्रज कोणाचा मुलूख चाहत नाहींत व कोणाची कुमक करणें हेंही बादशहास व कंपनीस मंजूर नाहीं. मंबईवाले यांजकडे कोणे गोष्टीचा अखत्यार नाहीं. कंप-नीकडून मुखत्यार आम्ही आहों." असें लिहिणें त्यांचें प्रमाण जा-णोन व इंग्रजी ( बादशहा ) इनसाफी, त्यांचे येखत्यारी हेही मुनसफ असतील, असें दिलांत आणोन मंबईवाले याणीं बदमामली केली त्याचा इनसाफ कौंसल व कलकत्तेकर यांजवर दिला असतां त्याणीं इनसाफाची रवेश दरकिनारा ठेऊन खुदगरजीवर[3] नजर देऊन साष्टी वगैरे जंजिरे मंबईकरानीं घेतले ते माघारे सरकारांत देण्याविषयीं ताकीद न केली. तेव्हां मुखत्यारी व इनसाफाची रास्त कोठें राहिली ?

---

१ नवीन. २ सरळ चाल. ३ आपमतलबावर.

विकत घ्यावें लागतें, याजमुळें शिलेदार लोकांचा परिणाम नाहीं. जोरी बाजरी सहा सवासहा. हरभरे ८।१।,८।१॥. डाळतुरीची ८॥०॥, ८।१. तूप दर पक्के मणीं येकोणीस रुपये. तांदूळ कैली ८।०,८।०।,८।०॥ फारच मोठे. येणेंप्रमाणें आहेत. साल गुदस्तपैकीं शिलेदारांस कांहीं पावलें नाहीं. व हल्लीं या चाकरीमुळें आणि पुण्यासारखें शहर, कोणी मुनसफा, कोणी कांहीं, घ्यावें म्हणत. डोंगरचें गवत. आठ कोस जावें, दहा कोस जावें. तें ही डोंगरांस गांवकर याणीं आगी लाविल्या! असा प्रकार येथील आहे. तीन रोजमुरे शिलेदारांस दिल्हे तरी परिणाम त्यांचा नाहीं. परंतु मग त्यांच्यानेंही बोलवणार नाहीं. येविशींची जे आज्ञा करणें ते चिरंजीव राजश्री रावसाहेबांस लिहून पाठवावें. आम्ही वैरण कडबा विकत घेतों. डोंगरचें गवतही आणवितों. बहुत तजविजेनें जिदगानी करीत आहों. घोरपडीचे मळेंतील शाखभाजी आणवीत असतों. कांहीं भोकुम ( चें. ) उंटांस भूस दहावीस उंट भोकुमाहून आणवितों. दहा हजार कडबा दरसदे १।. १॥. येणें प्रमाणेंत्याजकडून खरेदी करून पुण्यास आणून माप द्यावें येणेंप्रमाणें केलें आहे. जसा लागेल तसा आणूं. राहिलाच तर पुढें विकावयास येईल. भोकुमचे कुरणापैकीं गवत व कासारसाईचें ऐसें पुण्यांत आहे तेंही कार्याकारण-त्याची बेजमी वर्षाची ठेऊन राहील तें--आम्हास लागेल तसें आणवितों. सविस्तर मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. राजश्री जिउबाअण्णास साष्टांग नमस्कार. सविस्तर पत्रावरून कळेल. हे विनंति.

नं. २५७७. ( माघ शु० ९--३ फेब्रु० )

वासुदेव धोंडदेव पटवर्धन यांजकडून बाळासाहेबांस पत्र[1]--

" गाडर इंग्रज वज्रजोगिणीपासून अलीकडे सहा कोस आला. बदलापूर येथें हरिपंततात्या गेले. बाजीपंतअण्णा दोन कोस पुढें

1 हरिहरराव पांडुरंग यांस.

गेले. इंग्रजांशीं लढाई सुरू झाली. दहा वीस घोडे जखमी जाले. होळकराकडील पेंढार आज घांट उतरत आहेत. रघुनाथरावदादांस हरिपंततात्यांची चिठी आली कीं, तुम्ही लौकर यावें. नानाफडणिसांसही तात्यांची चिठी आली कीं, " आम्ही सहा कोस बदलापुरास पुढें गेलों. इंग्रज चालोन येत असतां मागें राहणें ठीक नाहीं. यास्तव निघोन गेलों. इंग्रजांस चार कोसांची तफावत आहे. एक वेळ छापा घालून आमची फौज उधळून द्यावी असे इंग्रजांचे मानस आहे. " तात्यांचे लिहिण्यांत ' पुढें गेलों तत्रापि घाव डाव पाहून माघारेंही येऊं; ' असें आहे. नानांचीही चिठी गेली आहे जे, ' आणखी आठ दहा कोस इंग्रजास पाठीवर घेतल्यास चिंता नाहीं. ' अशी चिठी गेली आहे. दोन तीन रोजांत घांटाखालीं जाणेची तरतूद करावी अशी नानाची रघुनाथरावास चिठी आली आहे. "

पै॥ छ० १२ सफर. इहिदे समानीन.

नं. २५७८. श्रीगणपति. ( माघ शु० ९–३ फेब्रु० )

चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा[1] यांसी प्रती परशुराम[2] रामचंद्र. आशीर्वाद उपरी. तुम्ही छ० ४ सफरचें पत्र पाठविलें तें छ. ९ मिनहूस सालसिंगचे मुक्कामास पावलें. " होळकर आले, श्रीमंतांची भेट भौमवारीं जाली. आह्मांस श्रीमंतांजवळ भेटीच्या समयीं चारशें स्वारांस घेऊन जाणें, ह्मणोन राजश्री नानानीं सांगितलें, त्याप्रमाणें गेलों होतों. आह्मी नानांची मर्जी रखून आहों. अद्याप आम्हांस कोणीकडे जावयास सांगितलें नाहीं. होळकरांस घांटाखालीं जावयास सांगितलें. येसाजी बाबूराव वगैरे लोक आले त्यांची गणती घेऊन रोजमुरा देतों. " म्हणोन लिहिलें तें कळलें. आह्मीं पंचमी सोमवारींच

---

१ पटवर्धन कुरुंदवाडकर. २ पटवर्धन कुरुंदवाडकर.

घराहून निघालों. कामकाजामुळें तीन मजली जाहल्या. दोन मुक्काम जाले. आज वैधृत म्हणोन नजीक इटे येथें मुक्काम जाला. उदईक कूच करून मजल दरमजल येतों. चिरंजीव राजश्री बळवंतराव व हरिहरराव यांस वडगांवास येणें म्हणोन लिहिलें आहे. आमची व त्यांची गांठ बुधवारीं पडेल. याजउपरी मध्यें मुक्काम न करितां दरमजल येतों. राजश्री लक्ष्मण हरी आले आहेत त्यांस आज निरोप द्यावा तर दिवस वाईट यास्तव उदईक देतों, आणि लांब लांब मजली करून तेथें येऊन पोंचतों. चिरंजीव राजश्री आपाकडे हजार स्वार पांढरे वगैरे लावून दिले. लष्करास मिळाल्यावर आणखी हजार स्वार चिरंजीवांकडे पाठवून देतों. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २५७९. ( माघ शु० १०–४ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र—पै॥ छ० ११ सफर.

" काल भेंडवडें सालसिंग प्रांत खानापूर येथें आलों. आज मुक्काम केला. उद्यां कूच करून पुढें जातों. राजश्री नाना फडणीस याचें पत्र ८ सफरचें आलें. त्यांतील अर्थ—' इंग्रज कूच करून पुढें १२ कोस आले; यास्तव होळकर यांची रवानगी पुढें केली. पांच हजार फौज व पांच हजार पेंढार होळकरांबरोबर आहे. चिरंजीवांचीही रवानगी पुढें करितों. तुम्ही लवकर यावें, म्हणून लिहिलें आहे. "

नं. २५८०. ( माघ शु० ११–५ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र– पै॥ छ० ११ सफर.

" काल राजश्री नानाचें पत्र इंग्रज पुढें आल्याचें आलें होतें त्याचा मजकूर रातोरात लिहिलाच आहे. आज मजलीस आल्यावर

---

१ रामचंद्रपंतआपा कित्तूरसंस्थानांत स्वारीस गेले होते त्यांजकडे. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांची.

चिरंजीव राजश्री दादाचेंही पत्र आलें. आपले दोन लाखोटे आले ते पाठविले आहेत. सारांश जलद गेलें पाहिजे. चिरंजीव राजश्री केसोपंत जाऊन चार दिवस जाले, अद्यापि आले नाहींत. ते येतपर्यंत हलक्या हलक्या मजलींनीं जात आहों. मंदवारीं द्वितीयेस राजश्री नानाजवळ जातों."

नं. २५८१. श्रीगणपति. ( माघ शु० १४ -७ फेब्रुवारी. )

चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद. उपरी येथील कुशल ता॥ छ० १२ सफरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष तुम्ही छ० ६ सफरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. " छ० २ मिनहूस गाडर वसईहून सामान घेऊन येऊन वज्रजोगिणीहून कूच करून पुढें आला. त्याजवर सरकारच्या फौजा सडया होऊन गेल्या. होळकरही तिकडे गेले. आम्हांसही तिकडे जावयास सांगितलें आहे. उदईक कूच करून तिकडे जातों. आपण लवकर यावें. " म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशियास सरकारचे आज्ञेप्रमाणें तुम्हीं राजश्री हरीपंततात्यांकडे जावयाचें कबूल केलें हें उत्तम केलें. आम्ही माघ शु॥ ५ तासगांवाहून निघालों. करवीरचे व कित्तूरचे बोलणें करितां चार दिवस लागले. सालसिंग येथील मुक्कामाहून तुम्हांस पत्रें पाठविलींच आहेत. त्याजवरून सर्व कळलेंच असेल. ती॥ रा॥ मेघश्यामराव बापू तुम्हांजवळ येऊन पावले, उत्तम जालें. तुम्ही पुढें एकटेच गेलां, याजकरितां बहुत चिंता लागली आहे. सावधपणें रहावें. उतावळीनें कोणतीही गोष्ट करूं नये. आह्मी काल दहिवडीस आलों. आज कूच करून दर मजल येत आहों. आतां मध्यें मुक्काम करावयाचें काम नाहीं. चिरंजीव राजश्री हरिहरराव याची व आमची गांठ मोरेश्वरीं पडेल. ते व आम्ही मिळून पुढें येतों..........आह्मीं दुधबावीचे घांटाखालीं आलों. उद्या मोरेश्वरास येतों. इंदुवारीं राजश्री नानाजवळ

येतों. तुम्ही पुढें एकटेच गेलां, येणेंकरून मोठी चिंता लागली आहे. बरें! श्रीमंतांचें पुण्य समर्थ आहे! आम्ही व चिरंजीव पांचवे सहावे दिवशीं येतों. लढा नाहीं. विठोजी सुर्वा मिरजेंत कैदेंत होता तो मेला म्हणून चिरंजीवानें लिहिलें आहे. बहुत बहुत सावधपणानें रहावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २५८२. ( माघ व. २–१० फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र रवाना छ० १६ सफर.

" काल कोरेगांवाहून कूच करून कवडी नजीक श्रीगजाननाचे थेउरास जाऊन दर्शन घेऊन आलों. चिरंजीव राजश्री रघुनाथराव-दादा यांची रवानगी घांटाखालीं केली ते रा. हरीपंतांजवळ खालीं पावले असतील, तों राजश्री नानांची चिठी पहांटेचे प्रहर रात्रीस आली जे, ' इंग्रज घांट चढून वर आला. राजश्री हरीपंत व होळकर मागें सरकत आले. आपण जलदीनें यावें ' म्हणोन चिठी आली तीच पहावयाकरितां तुम्हांकडे पाठविली आहे. त्याजवरून नगारा करून लष्कर पुढें गेलें. आम्ही स्नान करून जातों. श्रीनें मोठें संकट आणिलें आहे. पुणें पळूं लागलें. श्रीमंत पुरंदरास जातात. बरें! ( तारणार ) गजानन आहे! "

नं. २५८३. ( माघ व० ३–११ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र रवाना छ० १७ सफरचें चिंचवडच्या मुक्कामाहून--

" काल मंदवारीं राजश्री नानाजवळ आलों. रात्रीं राजश्री नाना आमचे डेरियास आले होते. भेट जाली. आज येथून कूच करून चिंचवडचे पुढें एक कोसावर मुक्काम नेमिला आहे. गाडर घांट चढोन

---

१ गंगाधरराव यांणीं.

आला. राजश्री हरीपंत व होळकर अलीकडे आले. राजश्री बाजीपंत-अण्णा घांटाखालीं त्यांचे पिछाडीस आहेत. चिरंजीव राजश्री रघु-नाथरावदादा मशारनिल्हेजवळच आहेत. त्यांस वरतें येणें म्हणून आमची व सरकारची चिठी गेली आहे. बाजपिंतांनीं बदलापूरचे मुक्कामीं इंग्रजांवर फौज पिछाडीस उठवून पांच सातशें उंटें व तट्टें व बैल मिळोन आणिलें, दिंडें सखलातेचीं वगैरे आणिलीं. घांटतोंडीं होळकर व गाडदी पाहले ठेविले होते ती वाट सोडून दुसरे माहित-गारीचे व [illegible] ऊन यांत धुडावून इंग्रज घांटतोंडीं येऊन राहिले आहेत. अद्यापि सामान झाडून वरतें आलें नाहीं. आल्यानंतर कूच करील असें वाटतें, पुणें आज दोन दिवस पळतें. दहा रुपयांस बैल भाड्याचा चार कोशीं मिळत नाहीं. नानांचें व आमचें मसलतीचें बोलणें जालें नाहीं. आज उद्यां होईल त लिहून पाठवूं.

नं. २५८४. ( माघ व० ७–१५ फेब्रुवारी. )

बाळाजी महादेव भिडे याचें बाळासाहेबांस छ० २१ सफरचें पत्र–

" इंग्रजांचा मुक्काम बोरघांटाचे माथ्यावर तळें आहे तथ आहे. आज पांच सहा रोज मुक्काम आहे. इंग्रज बारा हजार व तोफा पंच वीस व लमाण चारण वीस हजारापावेतों आहे. याप्रमाणें त्यांचे फौजेंतील इंग्रज आपल्याकडील फौजेंत सांपडला त्याणें वर्तमान सां-गितलें. घांटाखालीं इंग्रज होता तेव्हां आपल्या पथकांतील व श्री० रा० बापूसाहेब ( मेघश्यामराव कृष्ण ) व रघुनाथरावदादा उभयतां गोटानजीक गेले. परंतु इंग्रज बाहेर आले नाहींत. चार घटका उभे राहून ( हे ) माघारे आले. "

१ इंग्रजांचें.

नं. २५८५. ( माघ व० ८-१६ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र रवाना छ० २२ सफर-

" आम्ही दरमजल लांब लांब मजली करून यांचीं निकडीचीं पत्रें आलीं यास्तव आलों. तों अगोदरच इंग्रज घांट चढून घांटाच्या माथा खंडाळें तळें आहे तेथें मुक्काम करून राहिला. कारल्यांवर अलीकडे तीन चार कोसांवर राजश्री हरीपंत तात्या व होळकर खासा फौज सुद्धां होते. घांट चढतांना याचे हातून इंग्रजाचें नुकसान कांहीं जालें नाहीं. गाफीलपणेंच गेले. चार साडेचार हजार पायदळ यांबरोबर होतें. असो. यासाठीं राजश्री नानानीं होळकरांस व तात्यांस रागें भरून लिहिलें होतें. त्यास तात्यांनीं ' चुकली गोष्ट ' म्हणोन उत्तर पाठविलें, होळकरानीं ' तात्यानीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल 'म्हणोन लिहिलें आहे!सारांश गोष्टगेली असें जाहलें.अद्यापि इंग्रज सारा वरता आला नाहीं.जे दिवशीं इंग्रज घांट चढून वर आला ते दिवशीं दरमजल पुण्यास येईल असें वाटून रा. बाजीपंतअण्णा व चि० रा०दादा खालीं होते त्यांस लौकर येणें म्हणोन पत्रें पाठविलीं. उभयतांही इंदुवारीं घांट चढले. मंगळवारीं तात्यांजवळ आले. चिरंजीव दादा मागती आम्हाजवळ आले आहेत. पुढें होळकरसुद्धां पंचवीस तीस हजार फौज आहे. रोज तलावा करिते. तोफा मारितात. तेही तोफा मारितात. जेथें जेथें आहेत तेथेंच आहेत. अद्यापि पुरता सरंजाम इंग्रजाचा वर चढला नाहीं. खासा गाडर मागेंच आहे. कोणी म्हणतात ' या उपर इंग्रजांची मसलत घांटबंदी करून कोंकणचे किल्ले सोडवावे. प्रांत सोडवावा. ठाणीं घालून घांटमाथां राहणार. ' कोणी म्हणतात, ' सारा सरंजाम वर चढवून मजबूद होऊन मग दर मजल चालून येणार. ' पुण्यास यावें ही इंग्रजाची मोठी कस्त आहे. एक वेळ पुणें पहावें हेंच ( त्याचे मनांत ) आहे. मग काय घडतें पहावें. मागेंही पुण्याची इच्छा

धरून बहुत आले. परंतु यश संपादून मागें कोणी गेले नाहींत. यांचेंही तसेंच होईल ! असो. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. घांटांतून कूच करून इंग्रज पुढें येत नाहीं, कोंकणांत फौज नाहीं हें चांगलें नाहीं, असें जाणून पांच सात हजार फौजेची रवानगी खालीं होत आहे. अद्यापि कोणी गेले नाहींत. पुणें झाडून पळालें . श्रीमंत रविवारींच पुरंदरास गेले. श्रीमंत सौभाग्यवती पार्वतीबाई अद्यापि पुण्यांतच आहेत. एक दोन दिवसांत जातील. तशीच श्रीमंत मातुश्री सगुणाबाईही जातील. फार करून पुण्यांतील लोक गेले. रविवार इंदुवार दोन दिवस मोठी गडबड होती. आतां भाडेंही हलकें जाहलें. थोडे थोडे जातात. हैदरखानाकडील पत्रें वरचेवर येतात. काल महिन्याचीं पत्रें आलीं, त्यांत खुशीचीच खबर आहे. हैदरखानानें फरांचिसांशीं राजकारण करून त्यांचा जमाव आणिला आहे. मोरसबंदर आहे तेथें फरांचिसाचीं सत्तावीस पलटणें आलीं आहेत ह्मणोन हैदरखान याचे पत्रीं आहे. एकूण त्याणें चांगलीच जरब इंग्रजावर बसविली आहे. इकडूनही बिघाडच आहे. " भोंसले याणीं व नबाबानीं कांहीं केलें नाहीं. चौघांनीं मिळून मसलत ठरविली असतां उभयतां मागें घेतात. काय चिंता आहे ! इंग्रजाचें पारिपत्य करून श्रीकृपेकडून यांचेंही पारिपत्य होईल " ह्मणोन हैदरखानानें लिहिलें आहे. हैदराचे खातरेंत नबाब निजामअल्ली नाहीं असें जालें आहे; सामानही तसेंच त्याजवळ आहे. नबाब शास्त्रार्थच सांगत आहेत. परंतु अद्यापि काम कांहीं करीत नाहींत. गाडराची मोठी धमक पुण्यास येऊन याच वाटेनें हैदरखानावर खुष्कीनें जाईन ही आहे. श्रीकृपेंकडून घडेल तें खरें. ! "

नं. २५८६. ( माघ व० १०-१८ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस रवाना छ० २४ सफर मुक्काम किवळें नजीक चिंचवड येथून-

" गाडर खासा खोपवलीस आहे, सामान घांटमाथां आहे, अशीही वातमी आहे. राजश्री हरीपंततात्या त्यांजवर तोफा लागू करितात. फिरोन गोटास येतात. गोळा लागू होत नाहीं असें वाटतें. घाटाखालीं फौज नाहीं. सारी वर आली. आतां फिरून रास्ते यांस ' तुमचे पथकाशिवाय तीन हजार फौज जाजती बरोबर देतों. जावें. ' म्हणतात. ते ऐकत नाहींत. दहा हजार फौज दिली तर जाऊं म्हणतात. राजश्री हरीपंततात्या व बाजीपंत व होळकर शत्रूचे तोंडावर चार पांच कोसांचे तफावतीनें आहेत. चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादांस घांटाखालीं पाठवावें असें ठरलें. त्याजवरून आज चिरंजीवांची रवानगी पांच हजार फौजेनिशीं केली. सावध राहण्याविशीं सांगितलें आहे. "

नं. २५८७. श्री. ( माघ व. १२–२० फेब्रु० )

पै॥ छ० ४ रबिलावल सन इहिदे.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री वासुदेवपंत दिवाणजी स्वामीचे सेवेशीं. पो॥ बाळाजी महादेव भिडे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० २६ सफर पावेतों मुक्काम तळेगांव येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान इंग्रजांचा मुक्काम बोरघांटावर तळें आहे तेथें आहे. पुढें अद्यापि येत नाहीं. इकडील फौजा तोंडावर आहेत. श्रीमंत राजश्री रघुनाथरावदादा आज कोंकणांत फौजेसुद्धां जाणार. त्यांजबरोबर आपलें पथक जाणार, त्याजबरोबर आम्ही जातों. आमचें खासगत माने गंगापाकडे येणें त्याचें खत वजिन्नस पाठविलें आहे. घेऊन त्याजकडे पाठवून रुपये आणान रा. जिवाजीपंत फडके यांचे घरीं हरिपुरास पावते कृपा करून द्यावे. थोर काम आहे हें कृपा करून करावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. २५८८. ( माघ व. १०—१८ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र-पै।। छ० २९ सफर.

" इंग्रजाचीं पलटणें दहा व दोन तोफा चेनापटणच्या पुढें आल्याची बातमी येतांच हैदरखानानें दहा पंधरा हजार फौज रवाना केली; त्यानीं तीं पलटणें कापून दोन तोफा पाडाव आणिल्या. तमाम बुनगें लुटलें. हें हैदरखानास वर्तमान येतांच अर्काटाहून आपण कूच करून चेनापटणाकडे गेले. फरांचीसांचीं पलटणें सत्तावीस हैदरखानाचे कुमकेस फुलचेरीस येऊन दाखल जालीं. तूर्त हैदरखानाची जरब इंग्रजांवर चांगली बसली आहे. फरांचीस व हैदरखान एकत्र जाल्यावर मनाजोगतेंच काम करितील. याजप्रमाणें ५ सफरचीं पत्रें हैदरखानाचीं रवाना जालीं तीं छ० २३ मिनहूस काल येथें आलीं."

नं. २५८९. ( माघ व. १४—२२ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र रवाना छ० २७ सफर नजीक चिंचवड येथून—

" राजश्री नाना काल आमचे डेरियास आले होते. आम्ही राजश्री हरीपंततात्यांजवळ जावें, त्यांचे व आमचे विचारें जें कर्तव्य तें करावें, असें ठरलें. आज शिवरात्र. उद्यां अमावास्या. परवां मासिक निवृत्ति करून द्वितीयायुक्ततृतीया रविवारीं कूच करून पुढें जातों."

नं. २५९०. श्री. ( २४ फेब्रुवारी. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत स्वामीचे सेवेशीं—

पोष्य गोविंद बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ता।। फाल्गुन शुद्ध १ गुरुवारपर्यंत मुक्काम बुनगें नजीक राजमाची घाटमाथा येथें सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहीत

जावें. विशेष. आपणाकडून पत्रें सरकारांत हमेशा येतात. पर आम्हांस पत्र लिहावयास अनुकूल पडेना! बरें! काल महिमा! त्यास आपणास स्मरण न व्हावें, परंतु पूर्वींपासून ऐसा विचार घडत नव्हता. कालपरत्वें ऐसें घडों लागलें. बरें. असो. थोर असा. उभयतां चिरंजीव आपणापाशीं आहेत त्यांस वरचेवर दबावीत असावें. खेळों न द्यावें. कोंकणांत कोणी माणूस पाठवून तिकडील कागदपत्र आणून आम्हांकडे पाठविणें. श्रीमंत सडे स्वारीस घाटाखालीं फौजांसुद्धां गेले. शत्रूचा जोरा भारी आहे. घटा चढोन कुली तळ्यावर आला. भाऊंची स्वारी तळकोंकणांत जाहली आहे. शत्रू तोशीनें जोरीनें चालोन येत आहे. फाजांचा काट किमपि चालत नाहीं. त्याच्या सभोंवते हरीपंत व होळकर व बाजीपंत तोफखानासुद्धां आहेत. त्यावर लाग बसत नाहीं. देशांत आल्यावर येक वेळ संग्राम होईल. कळावें. बहुत काय लिहिणें कृपालोभ असों द्यावा हे विनंती.

नं. २९९१. ( फाल्गुन शु० ५—२८ फेब्रुवारी. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र. पै॥ छ० ६ रबिलावल.

" इंग्रज झाडून वरता आला ही बातमी राजश्री हरीपंतांकडून आली. याजकरितां उदईक आम्ही रविवारीं कूच करून म॥ निल्हेकडे जातों. चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा यांस घांटाखालीं पाठवावें ही राजश्री नानांची मर्जी, उपाय नाहीं, याकरितां चिरंजीवास घांटाखालीं लावून दिल्हें. काल चिरंजीव दोन कोस कूच करून गेले. पुढें आज पुढें जातील. मासिकनिवृत्ति काल जाली. ' इंग्रज एक मजल पुढें आला म्हणून एकाएकीं पुण्यांतील थारा मोडूं नये. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें त्याचें पारिपत्य लोकांची खातरजमा करून केल्यास होईल. गुंता

---

१ सर्व.

नाहीं, ' म्हणून तुह्मी लिहिलें तेंच पत्र नानास दाखविलें. त्यांनीं आपण लिहिलें त्यास रुकार दिला. ”

नं. २५९२. ( फाल्गुन शु० ५—२८ फेब्रुवारी. )

गंगाधरराव यांस पत्र. परशुरामभाऊंचें छ० ४ रबिलावलचें. मुक्काम कारलें नजीक बोरघांट सहा कोस येथून—

“ आह्मी हरीपंतांकडे यावयासाठीं निघालों त्या दिवशीं तुम्हांकडे पत्रें पाठविलींच आहेत. म॥निल्हेची व आमची भेट सोमवारीं जाली. इंग्रज घांटमाथां मुक्काम करून आहे. त्याचे सभोंवतीं जागा सर्व पाहिली. अडचणीची जागा धरून मोर्चेबंदीनें जागा कायम करून आहे. सरकारचे तोफांची मारगिरी होत आहे. व तिकडीलही तोफा होत आहेत. आम्ही जागा पहावयास गेलों ते दिवशीं रखमाजी जाधव सिलेदार याची घोडी गोळा लागून ठार जाली. घांटाखालीं कोणी नाहीं याजमुळें तिकडून रसद बेफिकीर इंग्रजांकडे येती. ती बंद करावी याजकरितां चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा यांस लावून द्यावें असें ठरावांत आणून चिरंजीवांस घांटाखालीं रवाना केलें असें लिहिलें होतें. त्यास चिरंजीवास एकटयास खालीं पाठवून निभाव नाहीं. सारेच फौजेनें गेल्यास दाब बसेल. रसदही येणार नाहीं. रसद बंद जाल्यांशिवाय गाडर पेंचांत येत नाहीं. सर्वांचे विचारें आम्हींच घांटाखालीं जावें असें ठरोन आम्ही आज बुधवारीं सा घटका रात्र असतां मुहूर्तानें निराळे जालों. कोळंब्याचे घांटानें खालीं जातों. बुनगें याच घांटमाथां ठेवितों. गाडर लवकर कूच करील असें दिसत नाहीं. मसलत लांबणीवर पडली. सर्वांची खातरजमा करून घोडीं घालावयाचा लाग दिसत नाहीं. घांटमाथां आहे तोंपर्यंत इलाज नाहीं. पुढें तळेगांवचे सुमारें गुदस्तां आल्याप्रमाणें मैदानांत आल्यानंतर श्रीगजानन हिंमत देऊन करील तें करो ! फौजही कमी नाहीं. परंतु

काम नेटानें होत नाहीं. फौजेंत पोटाचाच गवगवा मोठा, तेथें काम कसें होईल ? सर्व भार श्रीवर आहे.

नं. २५९३. ( माघ व०–फेब्रु० दु० पंधरवडा.)

व्यंकटराव नारायण घोरपडे यांचें पत्र परशुरामभाऊंस—

" आपलें पत्र छ० २६ सफरीं पावलें. आपण लष्करांत येऊन पोंचलां येणेंकडून बहुत उत्तम जालें. ' इंग्रज बोरघांटावर चढून आला तो तेथेंच आहे. त्याचे तोंडावरी राजश्री हरीपंततात्या व राजश्री तुकोजी होळकर हे फौजसुद्धां आहेत. त्यास इंग्रज अडचणींत आहे, तो अलीकडे मैदानांत आल्यावर त्याचें पारिपत्य होईल ' म्हणून लिहिलें, त्यास हें शिवशाई राज्य आहे. केवळ यवनाक्रांत होतें असें नाहीं. मैदानांत इंग्रज आल्यावर आपण त्यांचें पारिपत्य करितील ही खातरजमा सर्वांची आहे. "

नं. २५९४. ( फाल्गुन शु० ७—२ मार्च.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र रवाना छ० ६ रबिलावल मुक्काम घाट कोळंबें येथून—

" चिरंजीव राजश्री दादा अघाडीस अरुणोदयींच घांट उतरावयास लाविले. ते व ती॥ राजश्री बापू व वासुदेवकाका चिरंजीवांकडील निशाणासह उतरले.आम्हांस वाट उतरावयाची होईना. एकानें हातांत घोडें घेऊन जावें अशी अडचणीची वाट; यामुळें लोक उतरावयास लावून मध्येंच घांटमाथां मुक्काम केला. आज पुढें जातों. चिरंजीव राजश्री दादाची व आमची आज गांठ पडेल. घांटाखालीं वैरणीचें नांव नाहीं. कसा निभाव होतो पहावें. लमाणांस रस्त आणावयास ताकीद केली आहे. लमाण येऊन धारण ठरेल ती लिहून पाठवूं. सुरंज भेलसेकडे इंग्रजांचीं पांच सात पलटणें आलीं. भूपाळवाल्याकडे पहिलें भेलसें होतें तें श्रीमंत नानासाहेब कैलासवासी यांनीं सरकारांत

घेतलें. त्यास भेलसें घेऊन द्यावें, तीन लाख रुपये देतों, असें भूपाळवाल्यानीं इंग्रजांजवळ कबूल केलें आहे. सांप्रत भेलसें रा. महादजी शिंदे यांजकडे आहे. व शिंदे उज्जनीहून पुढें कूच करून गेल्याचीं पत्रें आलीं."

नं. २५९५. ( फाल्गुन शु० ९- ४ मार्च. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र रवाना छ० ८ रबिलावल.

" गार्डर घांटावर आला. याउपर लौकरच कूच करील असें दिसतें. त्याजवळ सरंजाम भारी आहे. सरकारच्या फौजेची निकड होत नाहीं. लोकांचा पोटाचाच गवगवा, तेथें काम होणें कळतच आहे!"

नं. २५९६. ( फाल्गुन शु० १०-५मार्च. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र पै॥ छ० १२ रबिलावल.

" काल चिरंजीव राजश्री दादा पुढें गेले. त्यांजसमागमें फौजेंतील लुगारी गेले ते खोपवलीपावेतों जाऊन हजार दीड हजार बैल इंग्रजांकडील भरताडाचे घेऊन आले. 'आणखी लोक पुढें धांवले आहेत,' म्हणून चिरंजीवांची चिठी भोजनाचे पूर्वीं आली. आह्मी भोजनें करून घांट उतरावयास आलों."

नं. २५९७. ( फाल्गुन शु. १०-५ मार्च. )

परशुरामभाऊंचं गंगाधरराव यांस पत्र पै॥ छ० १२ रबिलावल.

" ऐवज पुण्यास पाठवून द्यावा. तूर्त आम्ही घांटाखालीं सडे होऊन गेलों. खर्चाची वोढ पडेल याजकरितां लवकर ऐवज पुण्यास पाठवावा. दोन महिन्यांचे बेगमीचा ऐवज पाठवावा."

---

१ फौज घांटमाथां ठेवून स्वतः खोपवलीस घांटाच्या पायथ्याशीं राहिला होता तो घांटावर आला.

नं. २९९८. ( फाल्गुन शु १०–५ मार्च. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र पै॥ छ० १२ रबिलावल. फाल्गुन मास.—

" चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार यांस सरकारांतून पालखीचीं वस्त्रें देविलीं. "

नं. २९९९. ( फाल्गुन शु० ११—६ मार्च. )

परशुरामभाऊ यांचें गंगाधरराव यांस पत्र छ० १० रबिलावलचें मुक्काम भालवडी पा॥ नसराबाद पेंज नदी येथून—

आह्मीं घांटाखालीं जावें असें ठरोन कोळंबा येथील घांटमाथां मुक्कामास आलों. घांट उतरावयास लागलों ते दिवशीं तुम्हांकडे पत्र पाठविलेंच आहे. घांट सवघड तो अवघड. ती कोस हातीं घोडें धरून एकामागें एकानें उतरावें; याजकरितां आधीं चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादांस उतरावयास लाविले. दाटीमुळें ते दिवशीं आह्मी घांटावरच मुक्काम करून राहिलों. दुसरे दिवशीं घांट उतरलों. चिरंजीव दादा उतरले ते दिवशींच लुगारी यांनीं हजार दीड हजार बैल इंग्रजांचा आणिला हें लिहिलेंच आहे. आम्ही येथें आल्यानंतर आणखी पांच सातशें बैल व तट्टें व उंटें दोन तीन व एक राहुटी; त्यांत भरताडाचे बैलही आणिले. तुपाचे बुधले व साखरेच्या गोण्याही आणिल्या. तूर्त लुगारी बरेच सोकले आहेत. पनवेल व कल्याणपावेतों लुगारी जाऊन येतात. पनवेल येथून सोळा कोस. कल्याण दहा कोस आहे. पनवेल किल्ला नव्हे. बंदर किनारा. माल तेथें उतरून अलीकडे येतो. आम्ही घांट उतरूं लागलों तेच दिवशीं तिकडून रस्त दोन पलटणें व दोन तोफांसमागमें खोपवलीस येत होतीं. खोपवलीपासून चार कोसांवर चौक म्हणून एक गांव आहे तेथें मुक्कामास

येतात. कांहीं उतरले, तों लुगारी याणीं गांठ घातली. पहिले दिवशीं. त्या दिवसापासून लुगारी रात्रंदिवस सभोंवते फिरतात. लाग भाग पाहून गोटांत शिरून गुरेंढोरें आणीतच आहेत. आम्ही दोन वेळ तळाव्यास गेलों होतों. दोन तीन पलटणें अजमास तयार होऊन उभीं होतीं. (त्यांबरोबर) तोफा दोन तीन आहेत. एक दोघे त्यांचे गोटालगत जाऊन येतात त्यांजवर झटोन येत नाहींत. याचें कारण (ते समजतात,) एका दोघानीं काय करावयाचें ? याजकरितां त्यांजवर बार देखील टाकीत नाहींत. शेंपन्नास पाहिल्यानंतर हुशारीनें राहतात. गाडर खासा वरता गेला. खोपोलीस सामान अद्यापि आहे तें घांट चढून वर जातें. चौकावर पलटणें दोन तीन आहेतच. त्यांचे लष्करचीं दोन माणसें धरून आणिलीं. त्यांचे जबानीचें वर्तमान—" मागून पनवेलीस आणखी रस्त यावयाची, याजकरितां चौकावर पलटणें आहेत. खोपोलीहून सामान वरतें जातें. गाडर वर गेला. सारें सामान वर गेल्यानंतर मग कूच करून पुढें जाणार. गाडराचे कोठीचा बैल दहा हजार भरताडाचा, शिवाय लष्करचा–याप्रमाणें आहे. बोरघांटास पाहिले चौकीचे लोक मात्र होते. सरंजाम सारा खोपोलीस होता. आतां सामान फार करून वर गेलें. ' वर घांटीं सामान व माणूस पोक्तें दिसतें, ' म्हणून राजश्री हरीपंततात्यांचें पत्र आलें होतें. आमचे चित्तीं चौकावर पलटणें दोन तीन आहेत हीं लागभाग पाहून पारिपत्य करावें असें मनापासोन आहे. यांत श्रीगजाननानें लहानमोठयांस हिंमत दिली तर पारिपत्य होईल, लौकिक चांगला होईल, असें आहे. यांत सर्वांचे विचारें होईल तें करितों. पायच्या माणसांची सलाबत फौजेवर

१ पायदळांपेक्षां स्वार अनेकपटींनीं श्रेष्ठ असा प्राचीन कालापासून अनुभव असतां आतां या इंग्रजी पायदळानें आमच्या घोडेस्वारांच्या फौजेवर जरब बसविली, असा भाऊंचा अभिप्राय.

अशी कालमहिमा ! काय ल्याहावें ! सर्वांनीं मिळोन खामखा काम करावें हा उल्हास नाहीं, असे दिवस ! फौज चांगली मातबर असोन काम होईना ! कालापुढें उपाय नाहीं. जें करणें तें युक्तीनें करावें, हा बुद्धिवाद सर्वांचा ! असो. घांटाखालीं फौज नव्हती तेव्हां इंग्रज बेफिकीर जात येत होते. 'त्यांस आंवळून असावें.' (असें त्यांस आतां वाटूं लागलें.) मोकळे फिरावयाचे राहिले. खालीं आल्यावर दोन हजार पावेतों रस्तेचे बैल ( आम्हीं ) आणिले. मागून रस्त येणार त्यास पेंच आहे. "

नं. २६००. ( फाल्गुन व० १–११ मार्च. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र—पै॥ छ० १८ रबिलावल.

" हैदरखान याणे इंग्रजांस बरीच तंबी दिली आहे. तिकडून फरांचीसही आले. आजला ते हे मिळोन सामील जालेच असतील. पुढें काय करितात पहावें. इकडेही इंग्रज जागा सोडून येत नाहीं असें वाटतें. जागा बळावून मजबूद करून आहे. खासा खालींच आहे. वर चार पांच पलटणें मात्र आहेत. येथेंच राहिला, कूच न केलें, तर मोठाच पेंच आहे. "

नं. २६०१. ( फाल्गुन व० २–१२मार्च. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र छ० १६ रबिलावलचें मुक्काम कंडव परगणे नसराबाद येथून—

" गाडर घांटमाथांच आहे. येथें चौकावर दोन पलटणें होतीं तीं रस्त गाडराजवळ खोपोलीस पोंहचवून फिरून पनवेलीकडे रात्रींचींच रस्त आणावयास चौकावर मुक्काम करून पनवेलीकडे गेलीं. त्याजवरून तिकडे तलाव्यास फौज पाठविली आहे. मुलूख लुगारी यानीं मारून ताराज केला. गाडर घांटमाथ्यावरून लवकर कूच करून मार्गे पुढें सरकावयाचा सुमार दिसत नाहीं. सरंजाम दाणागोटा रस्तेने

आणून जमा करितात. घांटमाथां बातेऱ्या बांधून जागा कायम करून आहेत. मसलत भारी दिसती. आम्ही घांटाखालीं चहूंकडे तलाव्यास फौजा पाठवून सावधपणें आहों. पैका खर्चून काम होत नाहीं ! पनवेलीहून रात्रीचे इंग्रेज निघतात. मध्यें मुक्काम करून बंदोबस्तानें राहून फिरोन रात्रीचें कूच करून खोपवलीस रस्त पोंचवितात ! निशाचरी विद्या नवीच आरंभिली आहे ! ज्याचा काळ साध्य त्यास जें करावें तें साध्य आहे ! श्रीचित्तेपुढें इलाज नाहीं. राजश्री हरीपंततात्या गाडराच्या तोंडावर आहेत. नित्य तोफांची मारागिरी होत आहे. राजश्री नाना चिंचवडानजीक आहेत. हैदरखानाकडील वर्तमान अलीकडे नवलविशेष नाहीं. "

नं. २६०२. ( फाल्गुन २-१२ मार्च.

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र पै॥ छ० १८ रबिलावल.

" तुम्हांकडे पत्रें लिहून देऊन रवाना केलीं तों इंग्रजाचें सामान चौकावर होतें तें निघोन खोपवलीस आलें. पुढें घांट चढणार म्हणून वर्तमान आहे. हे घांट चढल्यावर खासा गाडर सुद्धां तेथून कूच करितील, यांत संदेह नाहीं. याउपरी पुण्यास येतो. संदेह नाहीं. बरें ! श्रीइच्छा ! गजाननाचे इच्छेस येईल तें खरें ! कांहीं सुचत नाहीं. "

नं. २६०३. ( फाल्गुन व० ३-१३ मार्च )

अंताजी विठ्ठल यादवाडकर याचें गंगाधरराव बाळासाहेबांस पत्र छ० १७ रबिलावलचें—

" भूपाळवाल्यानीं तीन लाख रुपये कबूल करून इंग्रजास आणून भेळसें घेऊन द्यावें या अर्थें इंग्रज आणिले आहेत; म्हणून लिहिलें, ऐशास शिंदळीचे इंग्रज आहेत तरी किती ! जेथें तेथें तेच उद्भवतात, हें काय आहे न कळे ! परंतु शिंदे त्यांजवर गेले म्हणून लिहिलें, त्यास शिंदेच त्यांचें पारिपत्य करितील. तें खूळ मोडेल. "

नं. २६०४. ( फाल्गुन व० ५—१४ मार्च. )

परशुरामभाऊंचे गंगाधररावांस पत्र. पै॥ छ० २० रबिलावल.

" इंग्रजांकडील कागद मुंबईस जात होते ते सांपडले. त्यांतील तात्पर्यार्थ " घांटमाथां गेलों, परंतु खालीं (मराठ्यांची) फौज आहे याजमुळें रस्त येऊन पोंचत नाहीं; रस्त न आली तर निभाव नाहीं. " असें लिहिलें होतें. दुसरें, दोन माणसें त्याचे लष्करांतून पळून आलीं तीं सांगत होतीं कीं, " पांच शेरांची धारण आहे. तूर्त कूच करीत नाहीं. दोन दोन गज खंदक खणतात. व छपरें बांधावयास लाविलीं आहेत. सरकारच्या तोफा लागू होतात तेव्हां दहा पांच माणूसही जायां होत असतें. " रस्तेचें पलटण एक दुसरें कापल्याशिवाय जरब बसत नाहीं, व रस्त बंद जाल्याशिवाय आयां एकाएकीं येणार नाहीं. पलटण रस्तेच कापून काढावें हेंच मनापासोन आहे. याजकरितां त्यांचे पिछावर पनवेलपावेतों फौज चिरंजीव राजश्री बळवंतराव यांजसमागमें रवाना केली आहे. ते बंदोबस्तीनें येत असले तरी त्यांस पाठीवर घेत (बळवंतरावांनीं) पुढें यावें व आम्हांस वर्तमान कळवावें, सर्वांनीं मिळोन गांठ घालून पारिपत्य करावें, असें (मनांत) आहे. यांत श्रीसत्ता प्रमाण. चौकावर पलटण होतें तें कापून काढावें म्हणून भालवडीहून कूच करून कंडव येथें दीड कोस आलों तों पलटण रात्रींच निघून गेल्याची वातमी आली. याकरितां येथेंच मुक्काम करून खोपवलीपर्यंत जाऊन आलों. खोपवली येथून सहा कोस आहे. ती. रा. बापू व चिरंजीव राजश्री दादा दोन कोस पुढें आहेत. "

नं. २६०५. श्रीगणपति. (फाल्गुन व० ११–२० मार्च. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यासी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० १४ रबिलावल-भौमवार

मुक्काम कडत्र पा। नसरापूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. इंग्रज रस्त आणावयास पनवेलीस गेले होते ते रस्त भरून खोपोलीस जावयासाठीं आले. फिरून चौकावरच मुक्कामास आले. बातमी साठीं नेहमीं फौज तिकडे ठेविली होती. बातमी येतांच आह्मी फौजसुद्धां गेलों. फाल्गुन व॥ ७ भृगुवारीं प्रहर दिवसास गांठ पडली. लोकांनीं गोटापावेतों घोडीं घातलीं. तीन टोळ्या—एकीकडे डावे बाजूस चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा, उजवे बाजूस तीर्थस्वरूप राजश्री मेघश्यामराव बापू, मध्यें चिरंजीव राजश्री बळवंतराव, येणें-प्रमाणें तिनी तोंडें फौज उठली. गोटापावेतों जाऊन मारामार करून शें दोनशें माणूस जायां जखमी केलें. चिरंजीव राजश्री दादाचे तों-डावर एक कुंपणी. कुंपणी ह्मणजे शंभर माणसांची जमेत. त्यांत एक निशाण. तें माणूस अवल ज्वान, शिरा[1] माणूस, चिरंजीवावर चालून गेलें! तोफांची मारगिरी होतच होती. तों चिरंजीवांनीं निकड करून लोक उठविले. तेव्हां ती एक कुंपणी कापून काढिली. याशिवाय आणखी शेंपन्नास माणूस मारून बंदुखा आणिल्या. आणखी लोक थोडीशी निकड करिते तर गोट झाडून लुटून लोक मारिले असते. फौजही त्यांचे पारिपत्यापुर्ती होती. परंतु श्रीच्या इच्छेस आलें तितकेंच पारिपत्य ते वेळेस जालें. तों दोन प्रहर जाले. पाण्याची वेळ जाली. लोक निघूं लागले, तोफांची मारगिरी फिरून होऊं लागली, तेव्हां दहा वीस घोडे स्वार,-शेंपन्नास जखमी जाले. पुन्हां त्यांजवर राऊत उठले तेव्हां तोफा बंद जाल्या. माघारे निघाले तेव्हां माणूसही शेंपन्नास जायां जखमी जाहलें. श्रीकृपेंकरून सर्व मंडळी खैर आहे. चिरंजीव राजश्री बळवंतराव यांस गोळ्याचा कपरा फुटून उजवे कुशीखालीं तीन चार बोटांवर लागला, परंतु मोठी खैर जाली. ती जागा सुजली आहे.

---

१ उत्तम.

तिडकत आहे. आठा दिवसांत उपशम होईल. जखम शेकीत आहेत. चिंता नाहीं. ते दिवशीं त्यांचा मुक्काम चौकावरच होता. आह्मी चार कोस पाण्यामुळें माघारे घेऊन राहिलों. त्यांचे तोंडावर चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार यांस ठेविलें. तों चंद्रोदयीं उजाडतां अष्टमी मंदवारीं ( त्यांनीं ) कूच केलें, तों चिरंजीवांनीं पिछाडीस तोंड लाविलें. आम्हाकडे बातमी आली व तोफेचा आवाज ऐकूं आला. तसेच आम्ही कूच करून खोपोलीच्या रस्त्यानें त्यांच्या तोंडावर जाऊन उभे राहिलों. पुढें चिरंजीव राजश्री दादास पाठविलें, अघाडीस व पिछाडीस फौजेचा पायबंद बसला. तेव्हां चहूंकडून राउतांनीं हिरिरी केली. तेव्हां तीन चारशें बैल भरताडांचा आणिला. त्यांत दारू व गोळे व तांदूळ हरभरा बाजरी हरयेक जिन्नस होता. पांचशेंपावेतों गोणी आणिली. निकड जाली तेव्हां इंग्रज गोण्या टाकून बैल चालवींत. त्यांत लुगारी व पेंढारी आंत शिरून रात्रीचेच बैल आणिले. रस्तेची खराबी बरीच जाली. तों घांटावरून दोन तीन पलटणें कुमकेस आलीं, याजकरितां आह्मी त्यांचे तोंडावर होतों ते सरकून राहिलों, व चिरंजीव दादासही सूचना केली. तेही निघाले. आणखी चार घटका कुमक न येती तर रस्त झाडून लुटून माणूसही मारावयाचा लाग होता. असो. इंग्रजास (आमच्या) फौजेचें भयच नव्हतें. शेंपन्नासानिशीं वाटून यावें अशी शोखी त्याची होती ती तूर्त मोडली ! रैच बराच मोडला. फौज उठली तेव्हां फौजेस आसरा खावयास जागा चांगली होती म्हणून फार बचाव जाला त्याजवर (आमचे) फौजेंची सलाबत बसली. याउपर ( इंग्रजानें ) रस्तेस जावें तर आणखी पोख्ते सामानानिशीं जावें तर निभाव, असा त्यांस पेंच पडला आहे. गाडर घांटमाथां मुक्काम करून आहे. राजश्री हरीपंतांची मारागिरी

१ निकराचा हल्ला.

होत आहे. गाडर कूच करावयाचा सुमार दिसत नाहीं. सुरंज भेलसें-कडे इंग्रज आले होते त्यांजवर राजश्री महादजी शिंदे गेले. त्यांस मागें सारलें. लढाई चांगली जाली. नामोहरम करून सुरंजेपुढें दोन कोस झाले होते ते मागें सरकून राहिले. त्यांचें पारिपत्य करून देशीं गाडराचे पारिपत्यास येतों म्हणून सरकारांत शिंद्यांचीं पत्रें आलीं होतीं. राजश्री गणेशपंत बेहेरे नवापुरास होते त्यांजवर चार पलटणें दगा करावयास आलीं होतीं. ही बातमी कळतांच मा।निल्हे सावध होऊन कोंडाई बारी चढून खानदेशांत आले. चहूंकडे इंग्रज प्रबळ जाले आहेत. या प्रसंगीं सर्व भार श्रीगजाननावर आहे. घोडयामाणसांची जायांजखमी झाल्याची याद मागाहून पाठवितों. आम्ही काल बुनग्यांत आलों. चार दिवस सडे तिकडेच होतों याजमुळें याद आकारली नाहीं. दोन तीन दिवस चहूंकडील यादी यावयास पाहिजेत. ईश्वरें सर्वांची खेर केली. चिरंजीव रा० बळवंतराव यासीं थोडा धबका लागला आहे. लौकरच बरे होतील, चिंता नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद. पै।। छ० ३० रबिलावल. सन इहिदे समानीन.

नं. २६०६. ( फाल्गुन व० ११–२० मार्च. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र. पै।। छ० ३० रबिलावल.

" रस्त भरावयास फिरून इंग्रज पोक्ते सामानानिशीं येतीलच. तेव्हां आम्हांसही आणखी इतकी फौज, पायदळ पांच हजार, दोन तीन तोफा असाव्या तेव्हां दोनी तोंडें फौज सारखी निकड करावयास पाहिजे. तेव्हां रस्त बंद होईल तर न कळे. दुसरी फौज कारभारी यांजकडून यावयाचा विचार समजलाच आहे. तत्राप राजश्री नानास लिहिलेंच आहे. तिकडून सामान जरूर येईल. तोफेपुढें (आमची) गोडी फौज झटल्यानें फौजेचाच नाश होतो. ते जागा धरून उभे राहून

लढूं लागल्यानंतर फौजेचा काट चालत नाहीं. नासाडीच होईल. घांटाखालीं एवढी फौज आली, (तरी) रस्त बंद होईना! कांहीं करावें असें सर्वांचे चित्तीं याजमुळ घोडीं घातलीं. ते दिवशीं भृगुवार-आमचा वर्ज्यवार—म्हणून निशाणाचे पाठीमागेंच उभे समजोनच होतों, तों चाळीसपन्नास घोडे ठार! चाळीस पन्नास जखमी जाले! आह्मी लोकांबरोबरच उठून निकड करितों तर फारच जायां होते. घोडीं इरेनेंच जायां जाहलीं. अशीं आणखी एक दोन वेळ इरेनें म्हटलें तर सरदारी बसावयाचा प्रकार!!! कूच करून (इंग्रजाची) लांबण पडल्यानंतर मग साधेल त साधेल. जाग्यावर असतांच घोडीं घालूं म्हटलें तर काम होणार नाहीं. अशी अडचण. असो. आणखी एक मास येथें क्रमावयाचा. चैत्र सरतांच येखादा पाऊस पडल्यानंतर येथें रहावयाची सोय नाहीं. 'श्रीमंतांस देवी लक्षणयुक्त चांगल्या आल्या आहेत, पाणी भरतात,' म्हणून पत्र आलें होतें. श्रीकृपेकडून लौकरच बरे होतील असें आहे. श्रीगजानन कृपा करील."

नं. २६०७. श्री. (फाल्गुन व० ३०—२४ मार्च.)

राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं—

विनंती उपरी. कल्याणचे रोखें दोन चार कोस कूच करून जातों म्हणोन आपण पत्र पाठविलें होतें, त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर वरचेवर पत्र पाठवीत जावें. सुरंजेहून पलटणें माघारीं जातांच राजश्री महादजी शिंदे याणीं जाऊन लढाई केली. बुनगें वगैरे लुटून आणिलें. इंग्रजांकडील माणसें मारिलीं. हें पूर्वीं लिहिलेंच होतें. त्यावर हल्लीं उज्जनीचीं राजश्री नारो शिवदेव यांचीं छ० १९

१ पत्र नानाफडणीस यांचें.

रबिलावलचीं पत्रें आलीं.त्यांत “ इंग्रजाचें दोन हजार माणूस शिंद्यानीं कापून काढिलें. दहा हत्ती वगैरे पाडाव आणिले. इंग्रज कोंडले आहेत. लवकरच फडशा करितील. ” म्हणोन लिहिलें आहे. लोभ करावा हे विनंती.

रवाना छ० २८ रबिलावल.

नं. २६०८. (फाल्गुन व० ११–२० मार्च.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र पै॥ छ० ३० रबिलावल.

“ इंग्रजांचा तह परिछिन्न करूं नये; इंग्रजाचें पारिपत्य करून आह्मीच तिकडे येऊन वसई व साष्टी घेऊन देतों; अशीं(हैदरखानाचीं) पत्रें आलीं होतीं. हैदरखानाचा गायबंद इंग्रजास चांगला बसला आहे. गाडराचे लष्करांत तीन शेराची धारण आहे, म्हणून माणसें दोन चार त्यांतून आलीं तीं सांगतात. ”

नं. २६०९. (फाल्गुन व० १३–२२ मार्च.)

वासुदेव धोंडदेव पटवर्धन यांजकडून बाळासाहेबांस पत्र—

हल्लीं लष्कर दहींवली परगणे नसरापूर येथें कोंकणांत क्षेम आहे. येथून कल्याण तेरा कोस. पनवेल दहा कोस. बोरघांट चार कोस. बोरघांटचे पायथ्यास इंग्रजांची जिनसी व दाणादुणा गूळ तेल वगैरे जिन्नस तोफखाना तीन पलटणें बारूदखानासुद्धा राहिले आहेत. पांच पलटणें पनवेलीस आहेत तीं बारवईचे वाटेनें मौजे चौकावरून बोरघांटास रस्ता भरून नेत असतात. इंग्रजांची रसद बंद होणें कठिण पडलें आहे. काल श्रीमंत राजश्री नाना फडणिसांचीं पत्रें

---

१ शिंद्यानीं दोन हजार माणूस मारल्याचें लिहिलें आहे तें बहुधा बुनग्यापैकीं असावें. इंग्रजाचें दोन हजार लढाऊ माणूस शिंद्यानीं एक दोन लढायांत कापून काढल्याचा संभव फार कमी आहे. खरोखरीच इंग्रजाचें इतकें नुकसान झालें असतें तर मागून लवकरच कर्नल क्यामक यानें शिंद्यांवर छापा घातला तो घालण्याचें धाडस त्याचे हातून झालें नसतें.

भाऊसाहेबांस आलीं जे, ' तुह्मी दहा बारा हजार फौजेनिशीं घांटा-खालीं गेलां असतां पलटणें रस्त घेऊन जातात हे काय गोष्ट आहे? "

पै॥ छ० २९ रबिलावल. इहिदे समानीन.

नं. २६१०. श्रीगणराज. ( २८ मार्च. )

पै॥ छ० १७ रबिलाखर इहिदे समानीन.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती वासुदेव धोंडदेव. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ चैत्र शुद्ध ३ पावेतों मुक्काम मौजे दहिंवली यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. बहुत दिवस पत्र पाठविलें नाहीं म्हणून लिहिलें, ऐशास आम्ही चिरंजीव[1] राजश्री रघुनाथरावदादासमागमें सडे स्वारींत आहों. चिरंजीव राजश्री भाऊसाहेब व रावसाहेब यांजकडून जासूद हमेशा जातात. परंतु आमची गांठ पडत नाहीं. आह्मी दोन कोशांचे अंतरानें राहतों. यास्तव अंतर पडलें. इतःपर वरचेवर पत्रें पाठवीत जाऊं. इकडील वर्तमान तर छ० २० रबिलावलीं इंग्रजाची लढाई चौकाचे मुक्कामीं जाहली ते दिवशीं आपलेच[2] पयकास एक टेकडी नेमून दिल्हीच होती. तेथें सारे लोकानीं मोठी कस्त केली, आणि घोडे चालविले. टेकडीचे माथ्यास मोठे मोठे दगड. एक भाल्याचें अंतर राहिलें. घोडयांचा यत्न नाहीं. त्याहीमध्यें लोकानीं निकड केली त्यांपैकीं धाकटा राणोजी ठेले व माधवराव बिन दौलतराव शेंडगे हे दोघे इंग्रजाचे बुरजांतच ठार जाहले. हत्यार कारागार जाहलें नाहीं. एक तास भालेचे अंतरानें मार ! पांच हजार पावेतों गोळी उडे तोंपावेतों मार खादला. मग माघारे निघालों. आसऱ्यास आलों. घोडें माणूस जखमी जाहलें त्याची याद पेशजीच रावसाहेबानीं पाठविली आहे त्याजवरून कळेल. आमचे टेकडीचा मार जाह-

१ हरिहरराव. २ मिरजकरांचें.

लेनंतर मग चिरंजीव राजश्री दादाकडील लोक उठले. त्यांजकडे एक कुंपनी साठ माणसांची गोलांतून उठोन आली होती त्यांजवर उठले. त्यास मैदान चांगलें होतें. वीस गाडदी जिवें मारिले. वीस पंचवीस जखमी जाहले. परंतु जगदेवराव नाईक निंबाळकर यांचे लोकानींच फार मेहनत केली. मध्यें रस्त्यावर हुजुरात खाशीं निशाणें गाडदी रोहिले सारे होते. त्यांत बळवंतराव होते. जनोबा तों गोटांतच होते. दोहीं-कडून लगट जाहला तसाच मधील हुजुरातेचा होता तर इंग्रज लुटला जाता. तीनशें उंट व आठ हजार बैल रस्त होती. दोहीं बाजूस पल-टणें जाहलीं. मध्यें गोटांत एकट दुकट माणसें कामाठी ऐसें होतें. हुजुरात नच उठे तेव्हां साऱ्यांनीं निकड केली. उठतां बळवंतराव उठला. त्याजसमागमें पंचवीस चाळीस लोक गोटास मैदान रस्त्याचे वाटेनें गोटापावेतों गेले. बळवंतराव यांस गोळा फुटोन धक्का लागला. एका वेळेस सारी लगट जाहली नाहीं. येरवीं तो दिवस मोठा यशाचा होता. विस्तारें चिरंजीव राजश्री भाऊसाहेबानीं व रावसाहेबानीं लिहिलें असेल त्याजवरून कळेल. हजार बाराशें इंग्रजांचा टेंकडीवर बुरूज होता व दोन तोफा. त्या सामानावर एकटे आपले पथकास (भाऊनीं) चाकरी सांगितली; सारे फौजेच्यानें काम न व्हावें तेंच सांगितलें. परंतु आपले कदीम लोक मायेचे म्हणूनच असा मार खाऊन टिकले. मोठी शर्थ लोकानीं केली. पन्नास हजार हुजरात होती परंतु असें (इंग्रजाचे) गोटावर कोणी चालून घेतलें नाहीं ! सविस्तर भेटीअंतीं कळेल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २६११. ( चैत्र शु० – मार्च. दु० पंधरवडा. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र–पै॥ छ० ७ रबिलाखर.

" चासेस राजश्री गोविंदभट निदसुरे यांचे घरीं लग्न जालें. रासन्हाण्याच्या दिवशीं गुलालाच्या खेळांत पांच सात नायका जळून

मेल्या. याशिवाय आणखी दहा पांच जायां जाहल्या, असें ऐकिलें. समारंभ या प्रकारचा जाहला. बायकांचें एक पलटण जायां जखमी जालें ! "

नं. २६१२. श्रीगणपति. ( चैत्र शु० ७–१ एप्रिल. )

पै॥ छ० १६ रबिलाखर.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. छ० ३ रबिलाखरीं तुह्मांकडे पत्रें लिहून रवाना करावीं तों इंग्रज खोपोलीहून रस्त भरून आणावयासाठीं चौकाजवळ आल्याची बातमी गुरुवारीं अडीच प्रहर दिवसास आली. आह्मीं तयारी करून दोन घटका दिवस असतां निघून गोटापासून तीन साडेतीन कोसांवर येऊन चिरंजीव राजश्री दादास चौकाचे सुमारें दोन कोस पुढें लावून दिले. व खोपोलीचे रस्त्यावर चौकीस लोक ठेऊन आह्मी तेथेंच तीन प्रहर रात्र पर्यंत राहिलों. चिरंजीवांनीं दोन प्रहर रात्रीनंतर इंग्रजांचें कूच होतांच बातमी राखून त्यांजवर बाण टाकिले, तेव्हां त्यांचे लष्करांत गलबल जाली. ते समयीं लुगारी यांणीं बैल ओढावयास पुढें धावून चौकापासून बारवईचे खिंडीपावेतों इंग्रज सांभाळून येतां येतां दोन हजार बैल लुटून आणिला. याशिवाय तीन उंटें व पांच सात छकडे व तोफेचे गोळे टाकून इंग्रज चालिले तेव्हां गाडे छकडे जाळून धान्य लुगारी यांनीं आणिल्या. कनाता डेरियांच्या व राहुटींच्या कनाता आणिल्या. बारवईच्या खिंडींत चिरंजीवाची व आमची गांठ उजाडतां पडली. खिंडींत घोडीं इंग्रजावर लोकानीं घातलीं. तेथें दहा पांच माणूस जिवें

१ यावेळीं परशुरामभाऊंस रात्रंदिवस पलटणांखेरीज कांहींच दिसत नव्हतें, तेव्हां या दृष्टीनें पाहिलें तर त्यांनीं स्त्रियांच्या समूहास पलटण म्हटलें हा विनोद वावगा नाहीं. पण प्रसंगाच्या दुःखपर्यवसायित्वाकडे नजर दिली तर तो अनुचित वाटतो. २ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस मिरजेस.

मारिलें; व दहा पांच जखमी केलें, त्यांच्या बंदुका आणिल्या. इतकियांत दोन घटका दिवस आला. तो बारवईच्या तळ्याचीं पाळ धरून जमून उभा राहून तोफा मारूं लागला. फौजेस आसरा होता यामुळें कोणी जायां जालें नाहीं. चार प्रहर रात्र त्यास उजगारा पडून खराबी जाली. प्रहर दिवस आला. चिलपालें ( ? ) फौजेची चिकाटी लांबण पडल्यावर बसेल हें समजून त्यानें बारवईस मुक्काम केला. आह्मी तोंडावर चौकीस फौज ठेवून मध्यें पाणी नाहीं याजकरितां एक कोस माघारे चौकाजवळ भोजनें करावयास आलों. आज इंग्रजास गनिमी कावा पुरता समजला ! आणखी इतकी फौज, हजार पांचशें बाण, दोनी बाजूनें चिकाटी सारखी बसल्यास त्यास चालावयाचें कठिण पडेल ! यद्यपि चालों लागला तर निकड केल्यानें उभाही करूं. याजकरितां आणखी फौज, तोफा व बाण पाठवून द्याव्या, ह्मणजे रस्त आणावयास पलटणें जातात त्यांचें पारिपत्य करूं; असें राजश्री नानास लिहून पाठविलें आहे. पाठविल्यास उत्तम जालें. नाहीं तर आम्ही करावयाची खटपट ती करीतच आहों. आह्मी भोजनें करून फिरून बारवईजवळ गेलों. त्यांचा बारवईच्या तळावर छ० ४ रा॥खर भृगुवारीं मुक्काम जाला. रात्रीचे त्यांचे तोंडावर चिरंजीव राजश्री दादा व ती॥ रा॥ बापूस ठेवून आम्ही खोपोलीहून कुमक येईल म्हणून चौकाजवळ आलों. फिरून त्यानें रात्रींचें कूच केलें. फौजेची चिकाटी होतीच. यामुळें लुगारी यानीं व पेंढारी यांनीं निकड करून आणखी बैल आणिले. एकूण बैल चार हजार पावेतों आणिले. यांत दोन चारशें कमी असले तर न कळे. दारूचे छकडे दोन रात्रींचे राहिले त्यांस आगी देऊन ( इंग्रज ) चालों लागले. बारवईस पनवेलीस तीन कोस. तेथपावेतों जावयास काल सकाळापासोन तीन कोस जमीन चालून त्यास जाववेना ! आह्मी काल जेवावयास चौकाजवळ आलों

तेव्हां तोंडावर इंग्रज उभे राहून बुनगें पनवेलीकडे लावून दिलें. तों लुगारी डावे उजवे बाजूस होऊन जाऊन बैल अघाडीचे आणिले. या खेपेस इंग्रजाची खराबी फार जाली. गनीमी जरब त्यास समजली. त्याचे लष्करचीं माणसें सांपडतात; व राजश्री हरीपंततात्याकडे उठूनही येतात. छावणीचा डौल त्याचा दिसतो. होळकरांस आम्हांकडे पाठवितों म्हणून तात्यानीं लिहिलें आहे. दोनी बाजूनें सारखी निकड बसल्यानंतर रस्त पोंचणार नाहीं. जरब बसल्यानंतर त्यास विचार पडेल. भृगुवारीं प्रातःकाळीं चिरंजीव राजश्री हरिहरराव यांजकडील लोक तीर्थस्वरूप राजश्री बापू बरोबर होते त्यानीं निकड चांगली केली. चिरंजीव राजश्री दादाच्या निकडीस तर पार नाहीं. चिरंजीवानें फारच खस्त केली. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २६१३. ( चैत्र शु० ७-१ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र-पा। छ० १६ रबिलाख़र.

" इंग्रजाची व आमची गांठ गुरुवार दोन प्रहर रात्रपासून शनवार दीड प्रहरपावेतों रात्रंदिवस होती. फौजेची चिकाटी बसली म्हणून त्याची खराबी फार जाली. त्यानें बारवईचे तळ्यावरून रात्रौ कूच केलें तेव्हां लोकांनीं चहूंकडून रात्रीची आरोळी केली. तेव्हां फिरून आंवळून उभा राहिला. गाडयांची व तोफांची मारागिरी फार जाली. परंतु आमचे लोक जायां फार जाले नाहींत. श्रीनें मोठी कृपा केली. दहा पांच घोडे माणूस जायां जखमी जालें. उजाडतां बाणही लाविले.त्याजकडील दारूस बाणाची आग लागली याजमुळें दारूगोळा उडाला. तेव्हां त्याजकडील माणूस व घोडें फार जळालें. राहिलें सामान जथून पनवेलीजवळ गेलें. आह्मी काल मंदवारीं संध्याकाळीं सडे बुनग्यांत आलों. याजउपर रस्त किती दिवसांत येती पहावें. आह्मी जपत बसलों आहों. या खेपेस त्याची खराबी फार जाली. पुढें-

ही श्रीकृपेंकरून व्हावी. होळकरासही पाठवितों म्हणून राजश्री हरीपंततात्याचें पत्र कालच आलें. आणि होळकरानींही राजश्री नानास लिहिलें होतें कीं, " आह्मी येथें घांटमाथां रिकामे आहों. याजकरितां भाऊंकडे जातों. ते आम्ही मिळोन खालीं खटपट करूं " असें लिहिलें होतें. ते आलेवर दोनी तोंडें निकड केल्यास कांहीं तरी होईल. इंग्रजांची कही मारल्याशिवाय लौकिक होत नाहीं. "

नं. २६१४. ( चैत्र शुं० ८–२ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र छ० ७ रबिलाखरचें भालवडी मुक्कामचें—

" इंग्रज आपले जागीं स्वस्थ आहेत. लढाई होऊन पंधरा दिवस जाले. रस्त आणावयास फिरून कोणी आलें नाहीं. कल्याण-पनवेलपावेतों आमची फौज तलाब्याकरितां फिरत आहे. गाडराचे लष्करांतून वीस माणूस तांबडे कुडतीचें पळोन राजश्री हरीपंततात्याचे लष्करांत आलें त्यांचे जबानीचें वर्तमान—लष्करांत महागाई, चार महिने पोटास नाहीं, यामुळें उठोन आलों. याउपर रस्त आणावयास इंग्रज जाणार असें राजश्री हरीपंततात्यानीं लिहिलें होतें. आम्ही घांटाखालीं येऊन महिना जाला. एक वेळ रस्त गेली. फिरून आज पंधरा दिवस रस्त नाहीं. ( इंग्रजाचे लष्करांत ) महागाई असेल यांत संशय नाहीं. ' श्रीमंतांस देवीचें दुखणें आलें होतें. त्यास सांप्रत चांगला उतार पडला. ' म्हणून पत्रें आलीं. "

नं. २६१५. श्रीगणराज. ( ३ एप्रिल. )

पै॥ छ० १९ रा॥खर. सन इहिदे समानीन. चैत्रमास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती वासुदेव धोंडदेव. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ चैत्र शु० ९ पावेतों मु॥ मौजे

कंडव परगणे नसरापूर प्रांत कल्याण यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. चिरंजीव राजश्री श्रीपतराव आले हें संतोषाचें वर्तमान लिहिलें, तेणेंकरून परम संतोष जाहला. इकडील वर्तमान तरी छ० ३ रबिलाखरीं इंग्रजांची रस्त भरून आणावयाकरितां तीन पलटणें, सात आठ हजार बैल व उंटें दोनशें येणेंप्रमाणें तोफा सहा घेऊन इंग्रजाचा भाचा[1] चौकाचे मुक्कामास आला. बातमी कळतांच फौजेची तयारी करून रात्रीची गडबड इंग्रजांवर करावी या अर्थें चिरंजीव राजश्री भाऊसाहेब निघाले. अघाडीस चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा, आपली फौज, व भवानजी पाटील वगैरे होते. इंग्रजाचें कूच प्रहर रात्रीस जाहलें ते समयीं बाण लाविले. गडबड जाहली. पेंढारी व लमाण व फौजेंतील लुगारे स्वार याणीं लगट करून फौजेचे बळावर अडचण पाहून निकड करून बैल आणूं लागले. उंटें चार पांच आणिलीं. खाशाचे डेरे दांडे कनाता वगैरे सहा छकडे राहिले. प्रातःकाळपावेतों अडीच तीन हजार पावेतों बैल आणिले. दोन घटका पहांटेचे रात्रीपासोन इंग्रजाचे पिछाडीवर सारी फौज होती. अघाडीस राजश्री आपाजी दामोदर, बाळाजीपंत, आमची निसबत, आपाजी व पिराजी कदम मंडळीसुद्धां बोलेकर, रामजी पाटील, येणेंप्रमाणें व दादाकडीलही[2] लोक होते. इंग्रजाच्या पिछावर लागभाग पाहतां आपलेच लोकानीं घोडीं घातलीं. ते समईं इंग्रजाचा खाशाचाच सामानाचा छकडा राहिला, दोन चार हजार रुपयेचीं भांडीं लुटलीं गेलीं. कांहीं महमुद्या लुटींत सांपडल्या. व शंभर सवाशें पावेतों इंग्रज जखमी जाहले, त्यांच्या बंदुका आणिल्या. पंचवीस चाळीस बंदूक आपलीं तीन चार पथकें होतीं यांजमध्यें

---

१ जनरल गाडर्ड याचा भाचा कर्नल ब्राउन. २ अक्कलकोटकर शहाजी भोंसले यांचा बंधु.

आली. मोठें यश आलें. टुलीची परी शिंगी इंग्रजाकडे गेली. माणकोजी चोपडे गु॥ रुमणीकर याची घोडी ठार पडली. त्यास पायास गोळा लागला. वरकड कोणी पिराजी जाधव याचे घोडीस दोन गोळ्या लागल्या. दहा बारा असामीनीं शिपाईगिरी चांगली केली. मौजे बारवईचे तळ्यावर इंग्रजाचा मुक्काम जाहला ते दिवशीं रात्रींचे इंग्रजापासोन आदकोसावर राहिलों. मागती मध्यरात्रीस गोटावर बाण लाविले तेव्हां ही गडबड जाहली. लागलेच इंग्रजानें कुच केलें. जागा अडचणीची आणि चिकाटी बसली. बंदुकांचा मार व तोफांचा मार इंग्रजाकडून सुरू जाहला. शेंदोनशें बैल आणिले. वारवईपासोन दीड कोस बारी पार होई तोंपावेतों दीड प्रहर दिवस आला. इंग्रजानें मोठी मारगीर केली. परंतु आमची खैर जाहली. जानोजी शिंदे याचा वळू[1] घोडा जखमी जाहला. वांचेलसें वाटतें. येणेंप्रमाणें आजपावेतों पांच लढाया लहान मोठ्या जाहल्या, परंतु आपली फौज अघाडीसच असोन लोकांनीं कामकाजें केलीं आहेत. परस्परें लौकिक ऐकणेंत येईल. इकडील सविस्तर चिरंजीव राजश्री भाऊसाहेब व रावसाहेब लिहितील त्यावरून कळेल. इंग्रज पनवेलीस गेला. पुढें रस्त भरोन येईल तेव्हां जें होईल तें लेहून पाठवितों, बहुत काय लिहिणें कृपा कीजे लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २६१६. ( चैत्र शु० १५– एप्रिल. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र छ० १३ रबिलाखरचें मुक्काम कंडव पा॥ नसरापूर येथून—

" इंग्रजाशीं दुसरी लढाई जाली त्या दिवसापासोन रस्त मा घारीं फिरली नाहीं. पनवेलीस रस्त भरंतात. इंग्रजाचा मुक्काम ते। आहे ही बातमी रोज येती. होळकरही खालीं आले. दहा हजा। फौज त्यांची आहे. आतां लांब राहूं नये, पनवेलीहून रस्त खोपोली।

---

१ हें घोडीचें नांव.

जावयास इंग्रज घेऊन आले तर जवळ असावें, गांठ चालतां चालतां रात विरात पाहून घालावी, असें ठरून काल छ० १२ रबिलाखरीं भालवडीहून कूच करून कंडव येथें आलों. येथून दोन कोस अघाडीस चिरंजीव राजश्री दादा आपल्या पहिल्या जाग्यावर आहेत ते व होळकर एक जागांच आहेत. येथूनही कूच करून दोन कोस उदईक पुढें जाणार. चिरंजीव राजश्री दादा व होळकरांनीं मिळोन चौकापासोन बारवई पावेतों रहावें. तेथून पनवेल तीन कोस राहती. रानही मैदान पनवेली पावेतों आहे. पनवेलीच्या मैदानांत रहावें अशीही योजना आहे. तिकडे दाणादुणा फौजेस मिळावयाजोगा आहे. बदलापूर, रुजू बेलापूरपट्टी व कल्याणपट्टी जाळून मोकळी करावी हें राजश्री नानाचें मानस. यांत पनवेलीहून रस्त आली तर यांशींच खटपट करावी लागेल. न आले तर बेलापूर पावेतों जाऊन यावें लागेल. रस्तही भरतात. येणार अशीही बातमी येती. याकरितां चौक धरून बारवईपावेतों नेहमीं फौज असल्याशिवाय रातविरात गांठ घालावयास ठीक पडणार नाहीं असें समजून पुढें आलों. रस्त आलीच तर दोनी तोंडें चिकाटी बसवावी असें आहे. गाडराचे लष्करांतून बोरघांटाचे मुक्कामाहून दोन तुरुप स्वार पायउतारा होऊन पळोन आले. त्यांचे जबानीचें वर्तमान—" लष्करांत महागाई. (रुपयास) कणीक तीन शेर. उकडे तांदूळ वसईचे सा सातशेर मिळतात. वैरणीचा भारा गवताचा—रुपयास एक भारा. लोकांस आज पांच सा महिने पोटास देत नाहीं. कैद भारी, त्याजमुळें लोक टिकून आहेत. आज पावेतों शें-पन्नास माणूस उठोन आलें आहे. पेशजी चौकावरून रस्त घेऊन जातांना लढाई जाली तेव्हां एक सरदार जायां जाला, व शें दोनशें माणूस जायां जालें. फिरोन रस्त भरून आणावयास कोणी धजेना; याजमुळें गाडर खामाच रस्त भरून आणावयास ( या वाटेनें पन-

वेलीस) गेला हें तुरुत स्वारांचें जबानीचें वर्तमान. गाडर रिताड घेऊन गेला, बैल वगैरे सामान फार आणिलें, ते दिवशीं एक माणूस त्याचे लष्करांतील सांपडला. तोही ‘ गाडरच गेला ’ असें सांगत होता. सामानही खासेंच होतें. डेरे, कनाता व दागिने, रुप्याचे पेले, चमने व तबकें व ताटें वगैरे चार पांच हजार रुपयांचें सामान लोकांस सांपडलें. याशिवाय रुपजस्ती दागिनेही सांपडले. गाडराशिवाय इतकें सामान दुसऱ्याजवळ असणार नाहींसें वाटतें. गाडरच असला तर तो अभिमानानें आला, त्यासही जरब चांगलीच बसली ! खोपवली व बोरघांटांत माणसास शेर पाणी मोजून देतात. राजश्री हरीपंततात्यांचे तोफांचे गोळेही त्यांच्या गोटांत चांगले लागू होतात. राजश्री हरीपंत पहिलेच होते, तेथें पाणी नाहीं याजमुळें खडकाळें इंद्रायणी नदी येथें मुक्काम करून आहेत. सा कोस पाणी नाहीं म्हणून माघारे आले. लांब पडलें, याजकरितां एका दिवसाआड तलावा करीत आहेत. इंग्रजा-कडील माणूस उठोन वरचेवर येत आहे. ”

नं. २६१७. श्रीव्यंकटेश. ( चैत्र व० १०–१८ ए[illegible] )

तीर्थरूप मातुश्रीबाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें दादानें चरणावरी मस्तक ठेवून सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ. २३ रा॥ खर बुधवार मुक्काम दहिंवली प॥ कल्याण. वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. वडिलीं शेखू गाईकवाड व विठू शिंदा याजबरोबर दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. इकडील इंग्रजाचें वर्तमान तरी बोरघांटाहून इंग्रजाचीं पलटणें भरताड आणावयास पनवेलीस गेलीं होतीं. तीं माघारीं येते समयीं इकडून राजश्री भाऊ व तुकोजी होळकर फौज-सुद्धां पनवेलीकडे गेले. तीन रोज त्यांचे पाठीवर होते. तो गुजतच

१ व्यंकटराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर यांचें अनूबाईस पत्र.

खोपोलीस आला. आमच्या पथकापैकीं दोन घोडीं ठार जाहलीं. व गोसजी भोंसले ठार जाहले व आणखी जखमी आहेत ते बरे आहेत. वडिलांस कळावें करितां लिहिलें असे. पुण्याकडील कारकुनाच्या उपद्रवाचा मजकूर लिहिला, त्यास राजश्री भाऊंकडून राजश्री नानांस पत्रें वरचेवर पाठवितों, परंतु अद्याप ( मना ) चिठी येत नाहीं. काल आणखी निकडीनें लिहिलें आहे. मना चिठी येतांच पाठवून देतों. याउपर चिठी यात्रीशी आहे. श्रीमंत राजश्री सेनापतीकडील मजकूर लिहिला, त्यास त्यांचा करार मदार भिलवडीचे मुक्कामीं जाहला आहे, परंतु राजश्री भाऊंचें व राजमंडळाचें बोलणें अद्याप उलगडलें नाहीं. सध्यां या प्रांतीं शहास गुंतले आहेत. वरघांटास चढोन आल्यावर करारप्रमाणें बंदोबस्त करून देऊं ऐसें[२]–

नं. २६१८. श्रीगणपति. (चैत्र व. १२–२० एप्रिल. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० २५ रबिलाखर मुक्काम पोसरी परगणें नसरापूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. आमची व होळकरांची भेट जाल्यानंतर सडे होऊन चौकावरून बारवईकडे जातों व गेलों म्हणून कंडव येथील मुक्कामाहून तुह्मांकडे पत्रें पाठवून कूच करून बुनगें सडें मध्यें ठेवून सर्वेच सडे होऊन चौकावर रात्रीं मुक्काम करून बारवईच्या तळ्यावर होळकराकडील राजश्री पाराशरपंत व चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार यांस पांच सात हजार फौजेनिशीं ठेवून चौकावर एक दोन मुक्काम करून तेथून कूच करून मोहपाडानजीक कर्नाळा किल्ला येथें दोन मुक्काम केले. तों छ० १७ रबिलाखरीं इंग्रज पनवेलीहून कूच करून बारवईस आला. तळ्याशि-

१ कापशीकर. २ हें पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें.

वाय दुसरें पाणी तेथें नाहीं. याजकरितां अगोदरच दोन दिवस आह्मीं तळें फोडिलें होतें. थोडें खडूळ पाणी राहिलें होतें. तेथेंच ( इंग्रजानें ) मुक्काम केला. ते दिवशीं झटपट जाली. ते दिवशीं मोहपाडनजीकच ( आमचा ) मुक्काम जाला. फौजा चौकीस होत्याच. दुसरे दिवशीं छ० १८ रविलाखरीं (इंग्रजानें) तेथून कूच केलें. ते दिवशीं पिछाडीस होळकर, अघाडीस आह्मी, तळापासोन चिकाटी दोनीं तोंडें बसलीं. लढाई चांगली जाली. होळकरांनीं पिछाडीस फौज उठवून एक दोन वेळ निकड चांगलीच केली. त्यांजकडील चाळीस पन्नास घोडे व चाळीस पन्नास माणूस जायां जखमी जालें–इंग्रजही शें दोनशें मारिले. अघाडीस आगीचा मार भारी. अडचणीची जागा. तोंड लागेना. उगाच मार खातच दहा पांच घोडे व दहा पांच माणूस जायां जखमी जाले. ते दिवशीं इंग्रजांचा मुक्काम चौकापुढें येक कोसावर अडचणीची जागा पाहून (त्यानें) मुक्काम केला. आह्मी येक कोसाचे तफावतीनें चार प्रहर रात्र जवळच होतों. सकाळीं छ० १९ रा॥खरीं त्यानें कूच केलें. खोपोलीस रस्त दाखल जाली. होळकर, आह्मी पिछाडीस होतों. चिरंजीव राजश्री बळवंतराव यांनीं पिछाडीस घोडीं घातलीं तेव्हां आम्हांकडील वीस घोडे जायां जखमी जाले व तसेंच माणूसही सेडेंच (?) जायां जखमी जाले, त्याची याद अलाहिदा पाठविली आहे. चिरंजीवाचे घोड्याचे कपाळास गोळा फुटून कपरा लागला. घोडा खैर आहे. या खेपेस रस्तेचा बैल भारी नव्हता. हजार दीडहजार जरूर होईल. शें दोनशें उंट होते. जंगी सामान भारी होतें. लढाई चांगली जाली. ते खोपोलीजवळ जातांच आम्ही सड्या बुनग्यांत आलों. इंग्रजाचे लष्करांत धारण तीन चार शेरांची आहे. लोकांसही ( पगाराचा ) पैका देत नाहींत, असें तिकडून माणसें येतात तीं सांगतात. कालचे खेपेंत पैका गेला आहे. याजउपर काय

मसलत करितात पहावें. छावणीचा तर डौल त्याचा दिसतो. (छावणी) जाली तर सरकारचे मसलतीस पेंच भारी. यांत श्रीसत्ता प्रमाण. कोहज किल्ला येथून आठ गांव. किल्ला नामी. वसईच्या उरावर. त्याचे बंदोबस्ताविषयीं सरकारांतून पांडुरगपंत गोडबोले पेशजी पाठविले होते. त्याजवर कोळी व इंग्रज कवाइती लोक मिळून मा।निल्हेवर छापा घातला. तेव्हां मा।निल्हे मात्र सांभाळून किल्ल्यावर गेले. वरकड लोक चहूंकडे निघून गेले. बाडबिशात त्यांचे हातास लागली. तसेच किल्ल्याचे माचीस घेरून माची घेऊन किल्ल्यास चौकी देऊन बसले. आम्ही घांटाखालीं आलों तेच दिवशीं हें वर्तमान आलें. सरकारांत लिहून पाठविलें. पैका सरकारांत नाहीं. पैका देऊन कुमक करावयाचा प्रकार कळतच आहे. सरंजामी लोक आम्हांजवळ भोंसले व बारामतीकर वगैरे आहेत त्यांस पाठवून वेढा उठवावा; अशीं आम्हांस पत्रें येत. सरंजामी कोणी जाईनात. कुमक न जाली तर नामी किल्ला जातो; इतलाख फौज पाठवावी तर पैका द्यावा लागतो; अशा युक्तीनेंच एक महिना गेला. हजार गाडदी सरकारांतून मोठ्या प्रयासें राजश्री नानांनीं आम्हांकडे रवाना केले. घांटाखालीं येत तों शें दोनशें गाडदी पळून गेले. पुढेंही जाणारच, सरकार काम बिघडतें, असें समजोन आम्हीं आम्हांकडील हजार दीड हजार राऊत, पांच सातशें गाडदी व सरकारचे गाडदी राजश्री बाळाजीपंत फाटक नि।। फडणीस सरकार यांसमागमें लोक देऊन रवानगी केली. ते लांब लांब मजली करून जाऊन पोंचले. वेढा उठला. लोक पळों लागले. तेव्हां राउतानीं निकड करून कांहीं मारिले. कांहीं मनोहर किल्ल्याचे आसरेस गेले. तेथपावेतों फौज गेली. तोही किल्ला घेतला. तेथून लोक पळों लागले. खाडींत उड्या टाकून जाऊं लागले. तेथें घोडीं घालून शें पन्नास माणूस जिवें मारिलें. शें दोनशांचीं हत्यारें घेतलीं. तीनशेंपावेतों

माणूस जायां जखमी केले.गलबतें इंग्रजांचीं खाडींत तीन होतीं त्यांस आगी दिल्या. व बंदरांत दोन तीनशे खंडी धान्य होतें त्यासही आगी देऊन काम फत्ते करून फौज कोहजेस आली. आज उद्यां फौज येथें येईल. राजश्री नानांचीं पत्रें येतात कीं," कोहजेकडे फौज गेली याजमुळें किल्ल्याचा वेढा उठला. तिकडील तालुक्यांत दहशत बसली. तुम्ही तिकडे गेलां तर सुरतेकडून रस्त मुंबईस जाती ती बंद होईल, फौजेस लूट मिळेल, अशीं पत्रें येतात. पैसा खर्चास मागितला तर देत नाहींत. कारकुनानीं ऐवजाविशीं पुशिलें तर ' आमचा अंत घेतां कीं काय ! ' हे जाबसाल ! काय करावें ? दोन महिने घालविले. आणखी मासपक्ष गुदरान करावयाचें, तेव्हां आतांच कां उतावळी करावी, म्हणून कर्जवाम करून गुदराणी करितों. कर्जही मिळत नाहीं. उपाय नाहीं. कारभारी यांस याजउपर ' तुम्हीं खर्चास पाठविलें नाहीं तर खालीं आमचें राहणें होत नाहीं. ' म्हणून साफ लिहून पाठविलें आहे. गाडर या रस्तेसमागमें होता असें दोघाचौघांनीं सांगितलें. खरें लटकें देव जाणे ! नबाब निजाम अल्लीखान यांजकडील जाबीतजंग मेले म्हणून राजश्री हरीपंततात्यानीं लिहिलें होतें. नबाबाचे पदरीं मातबर बरोबरीचा माणूस होता. पत्रें लिहिलीं तों मंगळवारीं रात्रीं इंग्रज घांटाखालीं उतरला. कल्याणाकडे जाणार म्हणोन बातमी आहे. बुधवार, गुरुवार दोन मुक्काम त्यानें केले. आज भृगुवारीं कूच केलें आहे. पनवेलच्या अथवा कल्याणच्या मार्गें जाईल असें वाटतें. सारांश या वेळेस मागें सरकलासा जाला आहे. रा. हरीपंततात्या घांटतोंडीं आले आहेत. ते, आज खालीं उतरतील असें वाटतें. ( इंग्रज ) पाण्याच्या तोट्यामुळें तर उतरला नाहीं. परंतु रस्तच बंद जाली, यास्तव मागें सरकला असें वाटतें. हिंदुस्थानांत शिंद्यावर इंग्रजाचा छापा पडला म्हणून वर्तमान आलें आहे

पक्के आल्यावर लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे. हे आशीर्वाद.

नं. २६१९. ( वैशाख शु० ४—२७ एप्रिल. )

रामचंद्र परशुराम ऊर्फ आपासाहेब यांजकडून बाळासाहेबांस पत्र रवाना छ० २ जमादिलावलचें—

" तहवारजंग सुरापुराकडे येऊन सुरापुरकरांचा व त्यांचा तीन लक्षांवर तह जाला असतां मागती तहवारजंग यांजकडील उंटें व तट्टें लुटलीं, याजकरितां मागती मुक्काम होऊन उभयतांची लढाई जाली. उभयतांकडील घोडीं माणसें जायां जालीं. लढाई समान होऊन बेनकरीवर मुक्काम आहे. फिरून तहाचें बोलणें लागलें आहे. बाजीराव बर्वे, व नरसिंगराव, वेंकापा, सुरापूरचे आसऱ्यास राहून मोगल गेलियावर पुढें दंगा करावा असा मानस आहे. सटवाजी भोंसलाही त्यांत मिळाला. पिराजी नाईक निंबाळकर याचा पुत्र यशवंतराव नाईक याचें कर्ज रंभाजी बाजी निंबाळकर याजकडे येणें, म्हणून यशवंतराव दोन तीन हजार फौज जमा करून निंबाळकराच्या मुलखांतून खंडण्या घेत घेत सिनेच्या पाण्यावर आला आहे. काडापा देसाई यास मुधोळकरांनीं आसरा दिला थास्तव आह्मी मुधोळानजीक आलों आहों, सध्या मुधोळ प्रांतांतूनच कही भरून आणीत आहों. मुधोळकरांचें बोलणेंही लागलें आहे. "

नं. २६२०. **श्रीगणपति.** (वैशाख व० ७—३० एप्रिल.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र, आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० ५ जमादिलावल मुक्काम नजीक चौक वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान गाडर रस्त पनवेलीहून घेऊन खोपोलीस जातांना लढाई जाल्याचा मजकूर पेशजी तुम्हांस लिहिलाच आहे त्याजवरून वर्तमान कळलेंच असेल.

इंग्रजास रस्त जाऊन पोंचण्याचें कठीण पडलें. दोन शेर तीन शेरांची धारण, निभाव नाहीं, हें एक. दुसरें हवा मानेना, घोडीं, उंटें, माणसें मरूं लागलीं. तिसरें, विलायतेहूनही पत्रें माघारें येणें म्हणून आलीं. त्याजवरून माघारें जावें यांतच बचाव अशी मसलत करून घांट उतरून खोपोलीस मुक्काम करून तेथून छ० २६ रबिलाखरीं कूच करून खालापुरास मुक्काम केला. ते दिवशीं ( त्यानें ) दोन कोशांचें कूच केलें. आम्ही होळकर, तोंडावर उभे होतों. राजश्री हरीपंततात्याही खोपोलीहून इंग्रज निघतांच खालीं सडे फौजेनिशीं जिलेबीच्या तोफा घेऊन उतरून खालापुरचे मुक्कामींच तोफा पिछाडीस लाविल्या. इंग्रज काईल जाला. दुसरे दिवशीं छ० २७ रबिलाखरीं तेथून कूच केलें तो चौकाजवळ आला तों पिछाडीस सरकारच्या तोफा लाविल्या. अघाडीस आम्ही व होळकर होतों. हरीपंतानीं तोफांची निकड चांगली केली व लोकही उठले. इकडील व तिकडील माणूस जायां जखमी बरेंच जालें. चौकावर मुक्काम जाला ते दिवशीं आम्हांस पाण्याकरितां चार कोस माघारें जावें लागलें. छ० २७ रबिलाखरीं चौकावर त्यानें मुक्कामच केला, छ० २८ रबिलाखरीं इंदुवारीं चौकावरून कूच केलें रात्रीसच; तों आम्हीं उजाडतां येऊन गांठ घातली. ते दिवशीं सारी फौज पिछाडीसच होती. पहिल्यानें तोंड आमचें व होळकराचें लागलें. गाडदी व रोहिले व करोल पाईंचे करून मारगिरी चांगली केली. तों हुजरातही आली. तोफांची मारगिरी करीत बारवई पावेतों तीन कोस लढाई होत होती. ते समयीं इंग्रजांची मारागिरी तोफांची व गाडद्यांची सलख होत होती ती बेन्याहत मारगिरी होत होती। ते दिवशीं आम्हांकडील गाडदी व भले लोक मिळोन शें सवाशें जखमी व दहा वास ठार जाले. शिवाय हुजरात व होळकर निराळे. बारवईपावेतों लढाई करीत आले. तों पाण्याची वेळ जाली

याजमुळें फौज चहूंकडे पाण्यासाठीं फांकली. इंग्रजासही बारवईच्या तळ्यास पाणी नाहीं, याजकरितां ( इंग्रज ) बारीच्या तोंडीं सडे उभे राहून बुनगें पनवेलीकडे लावून देऊन लोकही मागून सांभाळीत पनवेलीस छ० २८ रबिलाखरीं दाखल जाले. इंग्रजाकडील माणूस शेसवाशें ठार व दोनचारशें जखमी. मोठ्या हलाखीनें पनवेलीस गेले. चौकाचे तळावर दारू व तोटे व चाळीसपन्नास बंदूख पुरलेली होती ती लष्करच्या लोकांस सांपडली. श्रीमंतांचे पुण्येंकरून तूर्त इंग्रज नामोहरम होऊन गेला. पनवेल व बेलापूर या दोनी बंदरांतून सामान उतरून वसईकडे जातें. गाडरही वसईकडे जाणार म्हणून आवई आहे. पनवेलीस फौज तलाव्यास गेली होती. तोफांची मारगिरी करून गोटास आलों. गोळ्यानें एक उंट व पांच चार माणसें जायां जाहलीं. कर्नेल पारखेल[1] गाडराचे बरोबरीचा सरदार. गाडरास बरें वाईट जालें तर कर्नेल पारखेल यानें सरदारी करावी अशी ठिकाणची[2] नेमणूक. तो कर्नेल पारखेल बारवईजवळच ठार जाला. दुसरा गाडराचा भाचा, तोफखान्याचा दरोगा—चौकाजवळ लढाई जाली ते दिवशीं ठार जाला. पीरखान मोळेकर नि॥ आपाजी दामोदर याजकडील, खोपोलीकडे पेशजी ती॥ रा॥ बापू तलाव्यास गेले होते ते दिवशीं इंग्रजाकडे घोडेंसहीत पाडाव गेला होता; तो ( त्यानीं ) पनवेलपावेतों नेला होता. आठ दिवस त्यांचे लष्करांत होता. पीरखानाचे समाचारास त्याचा भाचा येयून त्यांचे लष्करांत समाचारास गेला. तोही तेथें होता. त्यास पनवेलीहून वस्त्रें व खर्चास देऊन घोडेंसहीत ( गाडरानें ) लावून दिला. त्याजसमागमेंच गाडराचा निरोप आला कीं, आम्हांकडील फिरंगी चौकाचे लढाईंत पडला, जिवंत

१ कर्नेल पार्कर. २ मुख्य ठिकाणचा म्हणजे कलकत्त्याचा अथवा मूळ ठिकाणचा म्हणजे विलायतचा.

असला तरी त्यास लावून द्यावा; म्हणून निरोप आला. तो ठारच जाला. जिवंत असता तरी लावून दिला असता. तूर्त श्रीमंतांचे पुण्यें-करून इंग्रज नामोहरम होऊन घांट उतरून जरब खात पनवेलीस गेला. पुढें बाजत बरसात काय घडेल तें पहावें. " देशांत आल्यानें जरब बसेल. फौजेचें बळ भारी. त्यांत समोर उभे राहून लढाई होत नाहीं. गोळा मारतांच चार चहूंकडे जातात. फिरून या फौजेस जमा कोण करितो ? ही कवाईत कोणा तऱ्हेची ? या कवाइतीनें ( मराठी ) फौज आम्हांस सांपडत नाहीं. " असा अंदेशा आपल्या जागां करितात म्हणून बातमींतलें वर्तमान आहे. आम्ही कर्नाळा-नजीक होतों. तेथें पाणी नाहीं, याजकरितां कूच करून माणिकगडा-नजीक एक कोस मागें चौकानजीक एक कोस मुक्कामास आलों. राजश्री हरीपंततात्या आम्हापासून पुढें एक कोस आहेत. आम्ही व ते मिळूनच होतों. कूच करून पुढें आलों म्हणून एक कोस मागें राहिले. आतां तूर्त येथें फौजेचें काम नाहीं, त्यास खर्चासही नाहीं. आजपावेतों सरकारांतून पाउणलाख रुपये दिले. आणखी पंचवीस हजार रुपये देऊं म्हणतात ते हातास येत तोंपावेतों लाख रुपये खावे लागतील. रोजमुरेस ठाव नाहीं; तेव्हां नालबंदीचा प्रकार समजलाच आहे. त्यांत इंग्रजही आपल्या जाग्यास गेला. या मसलतीमुळें कर्जदार जालों ते जालों. आतां उगाच खर्च खात बसून कांहीं काम नाहीं. याकरितां उद्यीक येथून कूच करून बोरघांटानें वर जाणार. बुनगेंही तळे-गांवाजवळ आणविलें आहे. बुनग्याची व आमची तेथें गांठ पडेल. तेथून राजश्री नानाशीं बोलून निरोप घेऊन तिकडे यावें असा मनसबा आहे. इंग्रज घांटाखालीं उतरल्यावर त्याचें पांचसहाशें माणूस ठार व हजार दीड हजार जखमी असें दोन लढायांत जाहले. दहा वास गोरे सरदार मेले. दोन मातबर चांगलेच पडले. सारांश त्याचा

नाश फारच जाला. याउपर येथें कांहीं काम नाहीं. यास्तव लौकरच कूच करून सुरापूर प्रांतीं यावें असें आहे. ठराव होईल तो मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २६२१. (वैशाख व० ७–३० एप्रिल.)

परशुराभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र–पा॥ छ० १० जमादिलावल.

" करवीरकर मानाजी शिंद्यास निरोप देत नाहींत. इंग्रजाकडील वकील तर नेहमीं तेथें ठेविलेच आहेत. करार करून सरकारची याद घेतली त्याप्रमाणें त्यांनीं आपली द्यावी. पेशजी तुम्हांकडे कलमबंदीची यादी पाठविली आहे त्याचे जाबसाल व्हावे ते कांहींच होत नाहींत येथें सरकारांत निराळींच बोलणीं बोलतात. शिरोळ गुंतलें आहे तें सोडवून घ्यावें, लबाडी करावी, असा त्यांचा विचार आहे. "

नं. २६२२. श्री. (वैशाख शु० ११–४ मे.)

यादी येसाजी बाबूराव शिलेदार यांजकडील खंडोजी शिंदे यांची घोडी बोर छ० ३० रबिलावलीं तोफेचा गोळा लागून उजवे मागील फऱ्यावर जखम लागली होती. ती ज्याची त्यास दिली. छ० ९ जमादिलावल. सु॥ इहिदे समानीन मय्या व अल्लफ. यास पंच असामी

१ बाजी जाधव येळूरकर.

१ बाळापा बागमोडे

१ संताजी हेंगाडकर

१ निंबाजी कोळेकर

—

५

पंचांचे साक्षीनें चांगली बरी जाली म्हणोन कबूल करून घोडी घेऊन गेले. फिरोन बोलावयास समंध नाहीं.*

नं. २६२३. (वैशाख व० १–८ मे.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र छ० १३ जमादिलावलचें मुक्काम पिंपरी नजीक चिंचवड येथून—

" राजश्री हरीपंततात्यांची मिठी भारी ! परंतु निकाल काढून आल्याशिवाय निर्वाह नाहीं याजकरितां मा॥निल्हेजवळून छ० ७ जमादिलावलीं सकाळीं चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा व हरिहरराव यांस फौजसुद्धां घांटावर लावून दिलें. आम्ही चार घटका रात्रीस निघून घांटमाथां आलों. दुसरे दिवशीं बोरघांटांतून निघून इंदोरली तळेगांवानजीक बारा चवदा कोस मुक्कामास आलों. छ० ९ जमादिलावलीं मुक्काम मजकुरास आलों.आमचा वर्ज्यवार होता म्हणून राजश्री नानाचे भेटीस न जातां परभारेंच मुक्कामास आलों. उपरांतिक राजश्री नानाच आमचे डेऱ्यास आले. भेट जाली. आगतस्वागत चार घटका बसोन बोलणें जालें. येथेंही गुंताच आहे, परंतु कारभारी यांस देणें नाहीं व आम्हांस मागणें नाहीं; याकरितां निकाल काढून यावयास चिंता नाहीं ! काल वैधृत रुजू मृत्युयोग, म्हणून मुक्काम केला. याउपर कूच करून लवकरच तिकडे येत आहों, राजश्री हरीपंततात्या व होळकर अद्यापि घांटाखालींच आहेत. राजश्री बाजीपंत यांस सुरत अठ्ठाविशीकडे पाठविल्यास चांगलें. तिकडील तालुका लुटून फस्त केल्यास इंग्रजास पेंच बसेल. परंतु बाजीपंतास दहा हजार फौजेस एक रोजमुरा दिल्यास रवानगी होईल. परंतु पैका नाहीं, त्यामुळें काम

*बोरघाटाखालीं इंग्रजांशीं (जनरल गॉडर्ड यांच्या फौजेशीं) पटवर्धनांच्या चकमकी झडल्या त्या प्रकरणीं असल्या पुष्कळ यादी कुरुंदवाडच्या जुन्या दप्तरांत आहेत. त्यांपैकीं कांहीं मासल्याकरितां येथें घेतल्या आहेत.

लवकर होत नाहीं. आम्हांसही आणखी दहा हजार फौज घेऊन सुरतेकडे जावें असें म्हणत होते. आम्हांस पैका द्यावयाचा नाहीं म्हणत होते. तिकडे जाऊन पैका मेळवावयाचे दिवस थोडे राहिले याजकरितां आम्ही निकाल काढून येथें आलों."

नं. २६२४. ( वैशाख व० १–८ मे. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र— पै।। छ० १६ जमादिलावल—

"दहकाच्या मागील फडशासाठीं ( कारभारी आम्हांस ) बहुतच म्हणतात. मागील एक वेळ फडशा व्हावा हें चांगलें. रोज उठून किरकीर हें चांगलें नाहीं. हल्लींच्या कर्जपट्टीविशीं बोलणें आहे; परंतु आम्हीं साफ सांगितलें जे, आम्हांस द्यावयास गांठ पडत नाहीं. तेव्हां " तर आम्हांजवळ तुम्हांस फौजेच्या खर्चास द्यावयास काय? सर्वांपासून ऐवज घेतला. शिंदे होळकर देखील देतात. येथें लहान थोर सर्वांनीं दिला. तुम्हीं द्यावा," हें बोलणें फार आहे. आम्हीं साफ सांगितलें कीं, " आम्हांस कांहीं द्यावयास गांठ पडत नाहीं. मग फौजेस खर्चास मिळालें तर द्या, नाहीं तर न द्या! आम्ही तर जातों." तें त्यांस मान्यच आहे!"

नं. २६२५. श्री. ( वैशाख व० २–९ मे. )

यादी येसाजी निकम दि।। येसाजी बाबूराव शिलेदार हुजुरात यांची घोडी बोर चिंतोडी[1] कमरेंत तोफेचा गोळा लागोन ठार जाली. त्याचे मोबदला पंचाइतानीं पागेपैकीं देविली घोडी—

यास पंचाईत—

---

1 हें घोडीचें नांव.

१ जिवाजी क्षीरसागर नि॥ पांडुरंग बाबूराव.
१ बाजी जाधव.
१ कृष्णाजी जाधव.
—
३

१ चुडापा जाधव.
१ राजजी माने नि॥ फडतरे.
—
२

—
५

किंमत रु॥
५००

छ० १४ जा॥ वल. सन इहिदे समानीन. वैशाख मास. मु॥ नजीक चिंचवड.

नं. २६२६. श्री. (वैशाख व० २—९ मे.)

यादी धुळोजी वागमोडे शिलेदार याची घोडी बोर इंग्रजाचे लढाईंत पुढील उजवे पायाचे खुब्यांत गोळी लागोन ठार जाली. सबब पागेपैकीं मोबदला घोडी पंचानीं देविली कृष्णी कुमाईत. सु॥ इहिदे समानीन.

पंच असामी—

१ बाळापा वागमोडे.
१ संताजी जाधव.
१ बाजी जाधव.
१ भिवाजी वोलेकर.
—
४

१ निंबाजी कोळेकर.
१ नूरखान गोरी.
१ आनंदराव मोहिते.
—
३

—
७

१ बारामतीकर.

किंमत रुपये ६००

छ० १४ जमादिलावल. सन इहिदे समानीन.
वैशाखमास मु॥ चिंचवड.

नं. २६२७. श्री. ( वैशाख व० ३–१० मे. )

यादी.अर्जुनराव हेंगाडकर शिलेदार याचा घोडा जर्दो.उराखालीं पुढील पायाखालीं गोळी लागोन जखम लागली होती. घोडा पागेस आणिला होता तो बरा जाहला. पंचानीं ज्याचा त्यास देविला. सु॥ इहिदे समानीन.

पंच आसामी–

१ बाळापा वागमोडे. १ संताजी हेंगाडकर
१ बाजी जाधव.

—

३

छ० १५ जमादिलावल. वैशाखमास.

घोडा उरांत जखम लागली आहे ती फिरोन आजपासून दोन महिनेंत उपट खाऊन पायांत लंगडो लागल्यास सरकारांत माघारा आणून द्यावा. बरा चांगला जाल्यास मशारनिल्हेनीं घ्यावा.कांहीं गुंता नाहीं.

नं. २६२८. श्री. ( वैशाख व० ३–१० मे.)

यादी खंडोजी मोहिते दि॥ संताजी फडतरे शिलेदार यांची घोडी बोर कपाळीं टिका इंग्रजाचे लढाईंत उजवे बाजूस दांडीजवळ गोळी लागली ती डावे बाजूचे कुशीवर कापून काढिली. घोडी जखमी जेर सबब मोबदला पागेपकीं निळी ठिंगळी[1] पंचांनीं म॥ निल्हेस देविली. सु॥ इहिदे समानीन मया व अलफ.

---

1 ठिंगळी हें घोडीचं नांव.

पंच असामी—

१ बाळाजी जाधव नि॥ म॥ निल्हे.[1] १ माधवराव मोहिते नि॥ म॥ निल्हे
१ राणोजी पोळ नि॥ म॥ निल्हे. १ मल्हारजी खराडे नि॥ म॥ निल्हे.
१ बाळकोजी शिंदे नि॥ म॥ निल्हे १ रघुनाथ घाटगे नि॥ म॥ निल्हे.
१ पिलाजी जाधव नि॥ म॥ निल्हे.—

———

७

किंमत २०० रुपये.

छ० १५ जा॥ वल वैशाख मास मु॥ पिंपरी.

नं. २६२९. श्री. (वैशाख व० ४–११ मे.)

यादी केदारजी कदम दि॥ जगदेवराव राव नाईक निंबाळकर. सु॥ इहिदे समानीन मय्या व अल्लफ. मशारनिल्हेची घोडी कर्डी[2] इंग्रजाचे लढाईंत ठार झाली. खासपागेपैकीं मोबदला महताब दिली. यास पंच असामी.

निसबत नाईक.

| | |
|---|---|
| १ चिमाजी पिसाळ. | १ बाळापा वागमोडे. |
| १ दिनाभाई. | १ बाजी जाधव. |
| १ राणोजी सावंत. | १ संताजी हेंगडकर. |
| — | |
| ३ | १ नूरखान गोरी. |
| | — |

— ४

७

किंमत रुपये ८५०

छ० १६ जमादिलावल.
वैशाखमास.

---

१ फडतरे. या पंचाइतींत सारे पंच फडतऱ्याचे पथकांतले खरे पण डाव्याबाजूचे खंडोजीच्या वतींचे व उजवे बाजूचे पंच सरकारच्या वतींचे आहेत. २ हें घोडीचें नांव.

नं. २६३०. श्री. ( वैशाख वद्य– मे प० पंधरवडा. )

शिलेदार आदा ———————— रुपये.

| | | | |
|---|---|---|---|
| ५४३॥।-॥ | जखमी इंग्रजांच्या लढाईत झाले त्यांस खर्चास जखमेबा॥ रुजूंची. रुपये | १७८≡ | भुजंगराव देवकर. |
| | | ६॥।≈ | येसाजी पुर्णेकर. |
| | | ११ | रामराव चवाण. |
| | | ६॥।≡ | यशवंतराव दरेकर रुजू जाधव. |
| ४१॥।≡ | नि॥ हजारी. | | |
| ५१॥।≈ | नि॥ बेडगकर. | ३० । | नागणे मंडळी. |
| ३० ॥≡ | बाणदार. | ३ ।≡ | मानाजी वागमोडे. |
| ४॥।- | येसाजी बाबूराव. | ३५ | जगदेवराव नाईक निंबाळकर |
| ६॥।≈ | नारो मल्हार. | ८६॥।≡॥ | सखो रुद्र. |
| ३७॥।- | थोरात मंडळी. | ४॥।० | धोंडो अनंत. |
| ९२८≈ | व्यंकटराव घोरपडे दादा. | ४४ ॥≡ | मोहिते मंडळी. |
| २॥। | वेंकाजी कोरे. | १ ।≈ | नूरखान गोरी. |

१ पथकाच्या मुख्य सरदाराकडे कारकुनांनीं याद आकारून नेली तींतलीं जीं कलमें त्यास रुजू म्हणजे मान्य झालीं त्या कलमांमागें त्यानें रुकार दिला म्हणजे रु. हें अक्षर लिहिलें. अशीं रुकार मिळालेलीं कलमें निवडून ही याद तयार केलेली आहे. अर्थात् हींत लिहिल्याप्रमाणेंच शिलेदारांस जखमपट्टीचा पैका मिळावयाचा. मराठींत रुकार म्हणजे संमति अशा अर्थाचा शब्द आहे त्याची उत्पत्ति ही अशी आहे । इंग्रजांशीं युद्धप्रकरणीं कुरुंदवाडच्या दप्तरांत जखमपट्टीच्या यादी पांच सहा आढळल्या त्यांतीलच ही लहानशी बघून येथें नमुन्याकरितां घेतली आहे.

नं. २६३१. श्री. (वैशाख व० मे० प० पंधरवडा.)

यादी घोडीं ठार जाहलीं त्यांची किंमत सु॥ इहिदे समानीन मय्या व अल्लफ.

२०० खंडोजी मोहिते दि॥ संताजी फडतरे. घोडी बोर. रास. १

५०० मुंजाजी भोसले दि॥ येसाजी बाबूराव. घोडा तिलया बोर. रास. १

किंमत रुपये

८५० केदारजी कदम दिमत जगदेवराव नाईक निंबाळकर. घोडी कर्डी. रास १ एकूण रुपये.

६५० गोविंदराव पवार नि॥ जगदेवराव नाईक निंबाळकर. घोडा खंडोजी शिंदे नि॥ येसाजी बाबूराव.

२०० शेठिबा गोडे दि॥ गणपतराव कोन्हेर. घोडी कर्डी. रास. १ येकूण किं. रु.

६०० धुळाजी वागमोडे दि॥ गणपतराव कोन्हेर. घोडी बोर. रास १. येकुण रु.

५०० येसाजी निंकम. घोडी बोर चितोडी. नि॥ येसाजी बाबूराव. येकूण किं. रु.

८०० पिराजी जाधव दि॥ अर्जुनराव हेंगाडकर. घोडी बोर. पथक गणपतराव कोन्हेर.

७५० दि॥ वेंकटराव नारायण घोरपडे यांजकडील,

किं. रु.

५०० लुमाजी बेंके. घोडी कुमेत.

२५० मल्लापा सलगर. दि॥ सुभराजजी गायकवाड. कुमेत.

७५०

१२०० पथक गणपतराव कोन्हेर.

७०० जिवाजी हेंगाडकर यांची घोडी बोर.
घोडी तळावरी राहिली.

५०० संताजी वागमोडे घोडा बोर छ० मजकुरीं
तळावरी राहिला.

———

१२००

३०० हरजी निकम दि॥ शिदोजी खराडे. पथक गणपतराव कोन्हेर.
घोडी, कुमैत.

———

६५५० १३

१५०० संताजी सावंत. घोडा.

———

८०५०

नं. २६३२. ( वैशाख. व० ८—१५ मे. )

पत्र परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस १० जमादिलावलचें—नजीक सासवड येथून—

" आम्ही राजश्री नानाचा निरोप घेऊन पुण्यास जाऊन तेथून येथें रविवारीं आलों. तेच दिवशीं मंडळीसहवर्तमान श्रीमंतांचे दर्शनास गेलों. सर्वांस निरोप देविला. आम्ही व चिरंजीव राजश्री हरिहरराव किल्ल्यावरच राहिलों. सोमवारीं सोळा घटकांनंतर श्रीमंतांचा निरोप घेतला. श्रीमंतही कालच पुण्यास गेले आहेत. बरोबर चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा गेले होते. रविवारीं आम्ही घरास येऊं. तेच दिवशीं चिरंजीव राजश्री हरिहररावही मिरजेस येतील. चिरंजीव राजश्री हरिहरराव यांस शिरपेंच, चिरंजीव राजश्री दादास

मोत्यांचा तुरा व गणपतराव यांस चवकडा, आम्हांस एक मोत्यांची कंठी, येणेंप्रमाणें श्रीमंतांनीं बहुमान केला. राजश्री दौलतराव हिंदुराव घोरपडे यांस शिरपेंच, हत्ती, वस्त्रें देविलीं. ”

नं. ३६३३. श्री. (वैशाख व० ३०–२३ मे.)

पै॥ छ० २८ जमादिलावल इहिदे समानीन प्रातःकाळचा पावणे दोन प्रहर दिवस.

सेवेशीं सदाशिव गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २८ जमादिलावल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. फौजेचा आज मुक्काम आहे. होळकरांचा मुक्काम खडकाळ्यांजवळ आहे म्हणोन काल विनंतीपत्र लिहिलें होतें. त्यास लिहिलेंप्रमाणें बातमी आली होती. काल प्रातःकाळीं होळकर कूच करून घांटावर येतात कीं खालींच मुक्कामावर आहेत याची बातमी आणावयास जासूद पाठविला होता तो सायंकाळीं आला. त्याणें सांगितलें कीं, व्याहाराजवळ मुक्काम आहे. घांट चढोन आज आले. याप्रमाणें सांगितलें. फौजेचे दुमाही रोजमुऱ्याचा व आंठवड्याचा आकार एकंदर करितात. दोन दिवस वैरण घोड्यांस वगैरे अगदीं मिळाली नाहीं. ज्याणें घांटाखालून तळावरील गळाठा आणिला त्याचे मात्र घोड्यांस एक दिवस मिळाली. आज सायंकाळीं कही वैरण घेऊन येईल कीं रिकामी येईल हें न कळे ! कांहीं लोकांनीं काल तळेगांवाहून कडबा विकत आणिला. आज बहुत आणितील. इंग्रज पनवेलीहून कल्याणास गेला हें वर्तमान तात्या जांबुळपाड्यास असतांच आलें. सेवेशीं यावयाची आज्ञा झाल्यास येईन. मजजवळ घोडें आहे त्यास कहीची वैरण मिळत नाहीं. यास्तव विकत घेऊन चारितों. रवाना

१ होळकर व फडके यांच्या लष्करांतील बातमीसाठीं नानाफडनविसांनीं कारकून ठेविला होता त्याचें हें नानांस पत्र.

चार घटका दिवस प्रातःकाळचा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. होळकराचें कूच मुक्कामाचे बातमीस जासूद पाठविला आहे. बातमी आल्यावर लिहीन हे विज्ञापना.

नं. २६३४. श्री. ( आषाढ शु० ३–२४ जून. )

यादी. अर्जुनराव हेंगाडकर. पथक दिमत गणपतराव कोन्हेर. सु॥ इसन्ने समानीन मय्या व अल्लफ, साल्गुदस्तां घांटाखालीं इंग्रजांचे लढाईंत घोडी कुमाईत. त्रिनख्याल. राष. मशारनिल्हे यांजकडील जिवाजी जाधवाची. छ० ५ रबिलाखरीं नजीक बारवाईचा तळ रस्तेचे बैल लुटले ते दिवशीं मानेंत गोळी लागोन ठार झाली. सबब छ० १६ जमादिलाखरीं कुरुंदवाडचे मुक्कामीं खंडून पंचांचे विद्यमानें दिली.

१ बाळापा वागमोडे.
१ नूरखान गोरी.
१ संताजी हेंगाडकर.
१ जिवाजी हेंगाडकर.
१ बाजी जाधव येळूरकर.

पंचांचे विद्यमानें दिली. खंडून. नक्त रुपये ८००

छ० १ रजब. आषाढ मास.

नं. २६३५. ( आषाढ शु० ७–२८ जून. )

मेघश्यामराव कृष्ण याजकडून बाळासाहेबांस पत्र. मंगळवेढ्याहून ५ रज्जबचें–

" बाबूराव तुकदेव याणीं माइणीकडून फौजेचा जमाव करून मानाजी फांकडे आलेवर इकडे क्षेत्र पंढरपुरास आले. दुसरे दिवशीं

१ गेल्या फसली सालांत. पावणे तीन महिन्यांपूर्वी. २ पहा काव्येतिहाससंग्रह. पत्रें, यादी वगैरे. लेखांक ३१६. सदर पत्रांत बाबूराव तुकदेव यांचें नांव माधवराव तुकदेव असें लिहिलें आहे.

क्षेत्रांत येऊन श्रीच्या देवालयांत कांहीं लोक सुद्धां बसोन सावकार धरोन पैका घ्यावा हे मसलत केलेवर लोकांस धीर न पुरवे. (डावाडुळ) जाले. त्यावर राजश्री सदाशिवपंत खाडीलकर प्रतिनिधीकडील फौज घेऊन तालुक्याच्या बचावाबद्दल आले ते पंचमी मंगळवारीं क्षेत्राजवळ उतरतात तों बाबूराव व फांकडे चालोन पदमाळ्याकडे पश्चिमेस क्षेत्राच्या आले. तेथें चवथे प्रहरीं लढाई जाली. ते तीन हजार व हे दीड हजार होते. तोंड लागतांच दहा वीस घोडें माणूस खालीं आलें. फांकडे वगैरे यांचीं तोंडें माघारीं जालीं. पायचे माणूस व गाडदी होते ते मारले गेले. खासा बाबूराव यांस जखमा लागून पाडाव जाले. फौज पाठीशीं नदीपार लागली. संध्याकाळ जाला याजमुळें मानाजी फांकडा शें दोनशेंनिशीं पळून गेला. गोट लुटला. तीनचारशें घोडे पाडाव जाले. याप्रमाणें वाताहत जाले. बखेडेखोरांचें पारिपत्य जालें."

नं. २६३६. **श्री.** ( श्रावण शु० २—२३ जुलई. )

राजश्री नारो शिवदेव गोसावी यांसी—

दंडवतें विनंती उपरी. राजश्री नानांचें पत्र तुम्हांस आलें तें तुम्ही पहावयास पाठविलें त्यांतील मजकूर कीं, "सरकार व नबाब निजामअलीखान व हैदरखान व भोंसले चौघांनीं मिळोन इंग्रजांची मसलत करावयाची तिगस्तां ठरली. त्यास निजामअलीखान तो स्वस्थ भागानगरांत राहून इंग्रजांचा वकील मातबर आपणाजवळ ठेवून घेतला. आपण मसलतीचा नक्षा ठराविला असतां मसलत नेमिली ही गोष्ट येकीकडे ठेवून सरकारांत नवेंच बोलणें पहिल्या कराराखेरीज स्वराज्याचें बोलतात. भोंसल्यांनीं तो [२] पैसा इंग्रजापासून घेऊन फौज

[१] पत्र महादजी शिंदे याचें. हें व शिंद्यांनीं लिहिलेलीं दुसरीं एक दोन पत्रें या प्रकरणांत छापिलीं आहेत त्या सर्वांच्या नकला आम्हास इचलकरंजीच्या दप्तरांत जतन करून ठेवलेल्या आढळल्या. त्या पेशवाईतच लिहिलेल्या आहेत. २ तर.

आपली माघारी आणिली. त्यांनीं पैका घेतला तेव्हां आंतून करार इंग्रजाशीं कांहीं केले असतील. दोघांनीं तो याप्रमाणें केलें. पुढें चाल कोणती धरतील हें पहावें. राहतां सरकार व हैदरखान यां-जवरच मसलत पडली. त्यांत चेनापट्टणाकडे[1] इंग्रजाचा मुलख भारी. हैदरखानानें आपला मुलूख आपले पाठीशीं घालून इंग्रजाचे मुलखांत जाऊन मुलूख काबीज केला. पैकाही खंडण्या घेऊन मिळविला. पहिला पैका पदरीं फार, यामुळें त्यास या मसलतीची हुशारी. सरकारांत पैका नाहीं. मसलत वीस कोसांवर पुण्यापासून. आपलाच मुलूक मारावा, जाळावा, तेंही आजपावेतों जाहलें! परंतु अशानें मसलतीचा शेवट लागून जरबेनें तह व्हावयाचा नाहीं. ओढीमुळें दौलत सरकारची पेंचांत आली. पुढें लांबल्यास अगदींच पेंच बसेल. याकरितां इंग्रजावर जरब विना-बंगाल्याचा मुलूख मारल्याखेरीज-बसत नाहीं. हा मनसबा मात्र आम्हांस समजतो. परंतु याची तरतूद फौजेची करावी तर येथीलच तरतूद ओढीमुळें कशी होईल हें समजत नाहीं. पाटीलबावांनीं जाऊन बंगाला मारावा तरी शिंपरी कोलारासच पलटणांचा जमाव भारी होत चालला. तेव्हां एक वेळ मसलतीस गुंतणें त्यांस प्राप्त. त्यास नजबखान वगैरे राजेरजवाडे यांशीं राजकारणें पक्कीं करून दसऱ्यापावेतों जमाव आपलेजवळ पाडून या पलटणांचें पारिपत्य करून बंगाल्याची मसलत होईल असें निश्चयात्मक असल्यास चांगलेंच आहे. परंतु हरप्रयासी राजकारणें, भरंवसा काय? याकरितां फौजेची तरतूद होऊन गेली तर इंग्रजाचे घरांत मसलत पडेल. तेव्हां हीं पलटणें आहेत तींच माघारीं तिकडे जाऊं लागतील. मुलूख त्याचा मारिला जाईल. आयांस येतील. त्यास बंगाल्याकडील राजकारण येकाचे विद्यमानें आहे कीं "फौज आम्ही चार

---

[1] मद्रासेकडे.

रुपये खर्च करून ठेवून जातों. परभारें (पोटास) मिळवून मसलत करितों" त्यास या काळीं ही गोष्ट वरी आहे. परिणामास जाणें ईश्वराधीन. करून पहातों." म्हणोन, त्यावरून सविस्तर कळलें. ऐशियास चौघां-मिळोन तिगस्तां इंग्रजाचे पारपत्याची मसलत ठरत होती तेव्हांच आम्हीं सर्वांस सांगितलें कीं " भोंसले याचा व इंग्रजाचा दांडोमेंडा आहे. यांच्यानें इंग्रजाची मसलत होणार नाहीं. नबाबाकडून होणें दुरापास्त. सरकार व हैदरखान दोहींकडेच मसलत पडेल. याजकरितां भोंसले व सरकार मिळोन गाडर इंग्रजाची मसलत सांभाळावी. हिंदुस्थानांत जाण्याचा निरोप आम्हांस द्यावा. बंगाल्याची मसलत करणें जिम्मा आमचा. त्यावेळेस तें नानांच्या चित्तास न आलें. त्या समयीं आम्हांस हिंदुस्थानांत जाण्याचा निरोप दिल्हा असता तरी इतका फैलाव इंग्र-जाचा न होता. बंगाल्यास ताण बसता म्हणजे देशींही मसलत भारी न पडती. उभयतांनीं त्या मसलतीचा नक्षा ठरविला असतां त्याप्र-माणें निदर्शनास आणून न दाखविलें. हैदरखान हा इतका....... .......नव्हता, परंतु त्याणें कराराप्रमाणें करून दाखविलें. इंग्रजावर जरब चांगलीच बसविली. उभयतांनीं मसलतीचा असा प्रकार धरि-ल्यामुळें इकडे व सरकारांत मसलत इंग्रजाची भारी पडली. विना बंगाला मारल्याशिवाय इंग्रजाची मसलत आटोपत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. नजबखान वगैरे राजेरजवाडे यांचीं राजकारणें कागदपत्रीं होतीं. (आम्ही) हल्लीं इंग्रजाचे छातीवर छावणी सडे फौजेसह लगती केली. अलीकडे लढाया दहा बारा जाहल्या तरी लढाईंत इंग्रजावरी जरब बरीच बसत गेली. मुडदे त्याचे पडले व जखमी जाहले ते लढाईंतून टाकून माघारे मुक्कामावरी गेले. आजपावेतों त्याजकडील तेलंग प्यादे पंधरा सोळाशें व गोरे चाळीस पन्नास व तुरुपस्वार पन्नास साठ व चार

१ शीवशेजार. २ भोंसले व निजामअल्ली यांनीं. ३ मद्रास इनफंट्रीचे लोक.

पांच पलटणांचे सरदार ठार मारिले, पडले. कमपेश दोन पलटणें कमी जालीं. पलटणांतील तेलंगे व तुरूपस्वार बेजार जाहले आहेत. इकडे तेलंगे व गोरे व तुरूपस्वार निघोन आले. कित्येक बंदुका घेऊन व टाकून पळोन अंतर्वेदींत जातात. नरवराकडून व शिकंद्राकडून इंग्रजास रस्त गोहदकर जाट व नरवरकर त्यांस मिळाल्यामुळें येती, त्याचे बंदोबस्तास लाव्हेरीयाकडून नरवराकडे जाऊन रस्त मारावी म्हणोन राजश्री सदाशिव मल्हार व गंगाधर गोविंद बुंदेले व शिव-राम हरी झांशीकर ऐसे पाठविले ते लाव्हेरियानजीक जाऊन राहिले. तिकडे स्वारी करून रस्तेचा बंदोबस्त करितील. शिकंद्राकडे राजश्री अंबोजी इंगळे यांजकडील फौज पाठविली आहे. आम्ही चार पांच महिने सडे फौजेनिशीं आहों तसेच इंग्रजाचे लगत मुक्काम करून आहों. इंग्रज जाग्याचे आसऱ्यानें आहेत. "छावणीस मागें न जातां इंग्रजासभोंवते बरसातींचे दिवसांत दक्षणी राहिले, तेव्हां बाजतबर-सात इंग्रजाचें पारपत्य करितील." हें इकडील राजेरजवाडे वगैरे सर्वांस समजलें. त्याजवरून वकील नजबखानाकडील वगैरे आले आहेत. या मसलतीस येऊन सामील व्हावें अशा तऱ्हेनें सर्वांशीं बोलणीं होत आहेत. बोलतां गोड बोलतात. पर्जन्यकाळांत तरी कोणाचेंच येणें होत नाहीं. बादबरसात कोण अनुकूल होतो, कोण न होतो, हें कळेल. नबाब भोंसले यांचा स्नेह सरकाराशीं असतां त्याणीं प्रकार असा केला ! पुढें कोणती चाल धरितील हा अंदेशा येऊन पडला आहे. तरी हिंदुस्थानी आहेत[1] ! असो. भरंवशावर आहों असा अर्थ.................गुजरायचे स्वारीमुळें सरदारी.........
.........उज्जनीस छावणीस आलों. त्यावेळेस लिहून पाठविलें व तुम्हांस सांगितलें त्याप्रमाणें इकडे येणें जाहलें असतें तरी इतके

1 आमच्या देशचेच आहेत.

भारी न होते. देशीं जावयाचें याकरितां फौजेचा भरणा नव्हता. अकस्मात् मसलत येऊन पडली. तेव्हां येणें प्राप्त जाहलें. हे मसलत आमचे माथां आहे. श्रीमंतांचे पायाशीं आमची निष्ठा आहे तरी या पलटणांचें पारिपत्य करून बंगाल्यांत ताण बसवावा हेच तरतूद आहे. सरकारांतून उपराळा व्हावयाचा प्रकार तुम्हांस पत्रें येतात त्याजवरून समजला ! असो. चिंता नाहीं. मसलत आम्हावरी आहे तरी त्यापक्षीं यावर प्राण मेहनत करणें आम्हांकडे. होण जाणें श्रीमंतांचा प्रताप ! हैदरखानास पत्रें सरकारचीं वरचेवर जाऊन त्यास इंग्रजाचे मसलतीवर हमवार राखावा. गाडर इंग्रजाचा मनसबा काय याची पैरवी आतांपासून असावी. नबाब व भोंसले यांजकडील अर्थ समजान चुकला. परंतु कागदोपत्रीं आजपावेतों स्नेहाचा शिलशिला चालला तसा चालावा. बोलण्यांत व लिहिण्यांत वांकडें तूर्तचे प्रसंगीं दाखवूं नये. इंग्रजाचें पारिपत्य जाहल्यानंतर मग चिंता नाहीं. इंग्रजास हैदरखानाकडून ताण बसला व या पलटणांसही जरब बसल्यामुळें अंदेशांतच आहेत. या पलटणांचें पाऊल मागें पडलें म्हणजे बंगाल्यापर्यंत मोकळें; याकरितां इंग्रज सलोख्याचा संदर्भ लावतील त्याजवर जाऊं नये. इंग्रज दगाबाज आहेत. त्यांचा विश्वास धरूं नये. इंग्रजाशीं बोलणें लागलें म्हणजे हैदरखान हातचा गेला असें समजावें. इंग्रजांचा व त्याचा दांडामेंडा आहे. दोघे येक होऊन सरकाराशीं विरुद्ध करितील तेव्हां दौलतीस मोठाच पेंच पडेल. याकरितां जें करणें तें समजोन करावें. बंगाल्याकडील प्रकार लिहिला त्यांस ही गोष्ट कोणं[१] करणार तें समजलें. त्याच्यानें बंगाल्याची मसलत होणें व घरचा पेंच संभाळणें होणार नाहीं. यास्तव भोंसले यांचें संधान आहे तेंच असावें. तूर्तचे काळीं करणें ठीक नाहीं. हें केल्यास उघड होऊन भोंसले

---

१ हे कोण असावे ? हरीपंत फडके कीं तुकोजी होळकर ?

भडकतील व नबाब व ते एक होऊन वांकडी चाल धरल्यास ठीक नाहीं. जे बोलतात त्यांस लावून मात्र ठेवावें. रवाना छ० १ साबान बहुत काय लिहिणें हें विनंती. मोर्तबसूद.

महादजी शिंदे. बहुत काय लिहिणें येथून खास दस्तूर.

नं. २६३७. श्रीगणराज.(श्रावण व० ६–१० आगस्ट.)

संताजी सावंत दि॥ व्यंकटराव थोरात. शिलेदार. सु॥ इसन्ने समानीन मय्या व अल्लफ. सालगुदस्तां सन इहिदे समानीन इंग्रज खोपवलीहून पनवेलीस रस्त आणावयास जातांना छ० ५ रबिलाखरीं लढाई झाली. ते समयीं मशारनिल्हेचा घोडा कुल्यांत डावे फऱ्यावर गोळी लागून उजवेकडे पाठीवर कापून काढली. घोडा मृत्यु पावला. घोडा रास. सदरहू घोड्याचे मोबदला घोडा पागेपैकीं दिला. विठोबा घोडा वि॥ बाळापा वागमोडे ता॥ बहिरजी शेवाळे. घोडा पागेकडे प्रोक्त. नक्त रु० १५००

पंधराशें रुपयेचा जमाखर्च करावा. करणें.

छ० १९ साबान. श्रावणमास–

नं. २६३८.[1] (भाद्रपद शु० १३–३१ आगष्ट.)

बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे व विसाजी नारायण वाडदेकर यांजकडून बाळासाहेबांस पत्र छ० ११ रमजानचें पुण्याहून—

" श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडील व इंग्रजांकडील माणसांची कटकट होऊन श्रीमंत त्या रोषावरी रुसून सुरतेहून गळ्याकांवळ्याच्या मुक्कामास आले. हें वर्तमान गाडरास कळल्यानंतर मुंबईहून गाडर येऊन श्रीमंतांची समजूत पाडून मागती अश्विनीकुमारावरी जाऊन मुक्काम केला आहे. शिबंदीपैकीं तूत दीड लाख रुपये

1 हा नक्कल करणाऱ्याचा शेरा.

खर्चास द्यावे, पुढें फौज ठेवावयासीं सहा लक्ष रुपये द्यावे; याप्रमाणें ठराव करून समजूत पाडिली आहे. शिंद्याकडील वर्तमान तरी अंतर्वेदींतील पलटणें शिपरीच्या पलटणास सामील होणार; त्यापेक्षां तिकडील जथ भारी पडला आहे. शिंद्याचे हातून मसलत शेवटास जाईलसें दिसत नाहीं. तूर्त त्या शहावरी छावणी करून राहिले आहेत. भोंसल्याकडील पत्रें दिवाकरपंताचा काल जाल्यावरी दोन चार वेळां आलीं. पत्रीं स्वच्छता बहुतच लिहितात. त्याप्रमाणें अंतर शुद्ध असल्यास चांगलें. नबाबाचीं पावलें वांकडीं दिसतात, म्हणून भोंसलेही लिहितात ! राजश्री कृष्णरावही नबाबाकडे गेले आहेत. काय घडेल पहावें. होळकराचे घरचा बखेडा पडला आहे. त्याच्या साधनास सरकारांतून बाबूराव वैद्य पाठविले होते ते कालच सायंकाळीं आले आहेत. अद्यापि बोलणें समजलें नाहीं. इंग्रज लढाऊ सामान तयार करीत आहे. कोंडाईबारीकडे मसलत पाडावी असा ( त्याचा ) मनसबा दिसतो. ”

नं. २६३९. श्री. ( भाद्रपद व० २–४ सप्टेंबर. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंति सेवक रामचंद्र कृष्ण दातार साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ० १५ रमजानीं स्वामीनीं हैदर नबाब याचे बंदिखान्यांतून सुटोन आलेचें वर्तमान लिहून देणें म्हणोन आज्ञा केली, त्याजवरून हा करीना लिहून दिला बीतपशील—आम्ही हैदर नबाब याचे बंदि-

---

१ सावशीच्या लढाईंत पांडुरंगराव गोविंद, श्रीपतराव मोरेश्वर, रामचंद्र कृष्ण दातार, वासुदेव धोंडदेव, नीलकंठराव शिंदे मनोळीकर व बहिरजी घोरपडे गजेंद्रगडकर, इतकी मंडळी हैदराकडे पाडाव सांपडली होती. त्यांपैकीं पांडुरंगराव वारल्यानंतर बाकीच्या बंदीवानांनीं शत्रूस खंड भरून आपली सुटका कशी करून घेतली हें रामचंद्र कृष्ण यानीं या जबानींत लिहून दिलें आहे.

खान्यांत होतों ते समयीं श्रीपतराव यांजपाशीं वासुदेवपंत व आम्ही मिळोन बोलिलों जे, आम्ही येथें चाकरीस राहूं या. त्यास ते बोलिले जे, आम्ही चाकरीस राहूं नये. सुटकेचा . प्रकार करणें. त्याजवरून वैद्य याचे गुजारतीनें राघवेंद्र नाईक याजकडे बोली लाविली. त्यास दो चहूं दिवसांनीं नायेर याजबरोबर लोहार देऊन 'बेडी तोडून कैद्यांस घेऊन येणें' असा (हैदराचा) हुकूम झाला. त्याजवरून त्याणीं येऊन बेडी तोडून श्रीमंत राजश्री श्रीपतराव यांसीं व आम्हास बोलावून घेऊन गेले. उभयतां गेलों. ते दोनप्रहरापासून मार्गशीर्ष शु. एकादशीचे दिवशीं दहा तास पात्रेतों नरसी देवाचे दरवाजेपुढील चौकींत बसविलें. तेथून अकरावे तासीं पट्टण चौकीस घेऊन गेले. तेथें गेल्यावर राघवेंद्र नाईक नवाते आले. येतांच आम्हास पाहून रडला. मग बोलिला जे "तुमची उभयतांची सुटका करितों. कां म्हणाल तरी श्रीपतराव याचे आजीनें आमचा मुतालीक पुण्यास गेला होता त्याजपाशीं सांगोन पाठविलें जे, लक्ष दीड लक्ष रुपयेपावेतों पडिले तरी कबूल करून माझे नातवास सोडवणें. व तुमचे बंधूनींही लिहिलें होतें जे, पांच चार हजार रुपये पडले तरी कबूल करून आमचे भावास सोडवणें. त्यास आतां त्या बेरजेवर तुमची सुटका होत नाहीं. श्रीपतराव यासीं चार लक्ष, तुम्हास पंचवीस तीस हजार, याप्रमाणें मागतात. ते समयीं रदबदली करून निदान श्रीपतराव यांसीं सवा दोन लक्ष रुपये (पडतील). तुजला वीस, निदान पंधरा हजार रुपये. त्यास नवलगुंदकर देसाई याजवर तुझें कर्ज येणें आहे त्याजवर चिठ्ठी लिहून देणें. मी पैका उगवून घेईन." याप्रमाणें बोलणें होऊन घरास आलों. येऊन श्रीपतराव

१ हा हावेरी जिल्हा धारवाड येथें राहणारा धनाढ्य सावकार असून म्हैसूर राज्याचा मराठ्याशीं द्रव्याचा व्यवहार होत असे तो सर्व याचेमार्फत होत असे. पुढें टिपूची यावर गैरमर्जी होऊन त्यानें यास फांशी दिलें.

यांणीं सर्वांस सांगितलें आणि राव बोलिले जे, मी आबाचा लेंक. मी कोणाजवळून पैसा घेत नाहीं. सर्वांस सोडवून घेऊन जातों. त्याजवर दुसरे दिवशीं उभयतां गेलों. तेथें गेलेवर अंची[1] शामय्या याजपाशीं व नाइकापाशीं फार बोलिलों. ते समयीं त्याणें राव यासीं सांगितलें जे, नबाबानीं[2] आम्हास तोडे दिले आहेत हे पाहणें. आम्ही तुमची आशा केली नाहीं. याप्रमाणें शिव्यागाळी होऊन कांहींच ताळेवर गोष्ट आली नाहीं. रात्री मागती माघारे गेलों. तों तिसरे दिवशीं हुकूम आला जे सारेच येणें. त्याजवरून साऱ्यांच्या बेडया तोडून घेऊन गेले ते नरसोबाचे दरवाजेपुढील चौकींत संध्याकाळपर्यंत बसविलें संध्याकाळीं माघारें आणिलें. चवथे दिवशीं प्रातःकाळीं बोलावणें आलें ते समयीं रायानीं सांगितलें जे, आज मी येत नाहीं. तुम्ही जाणें. ते समयीं मीं सांगितलें जे, मी एकटा जाणार नाहीं. तुम्ही येणें नाहीं तरी तुमचा कोणी विश्वासू देणें, तरीच मी जाईन. त्याजवरून वासुदेवपंत यांसीं दिलें. ते व मी मिळोन गेलों आण सांगितलें, एकंदर मंडळीचे सुटकेचा प्रकार करणें. त्याजवरून हुजूर जाऊन अर्ज करून याद घेऊन राघवेंद्र नाईक आला. आण सांगितलें जे, आठ लक्ष रूपये येकंदर पडतात. त्यास पूर्वीं गोसावी दौलतरावें[3] याजकडून दीड लक्ष रूपयेचें जवाहीर घेऊन आले होते. मीं अर्ज केला. परंतु त्या समयीं गोष्टी निवडली नाहीं. व कृष्णाबाई[4] शिंदी यांजकडून भगवंत-

---

१ टपालखात्यावरचा दरोगा शामय्या. अंची म्हणजे टपाल. म्हैसूरच्या राज्यांत प्राचीनकाळापासून सरकारच्या उपयोगाकरितां अंचीची पद्धत सुरू झाली होती. अंची शामय्या यास हैदरानें गुप्तपोलीस खात्यावरचाही मुख्य अधिकारी नेमिलें होतें. त्या कामांत तो फार पटाईत असल्यामुळें हैदराची त्याजवर मर्जी होती. शामय्या मोठा दुष्ट असल्यामुळें त्यानें अनेकांचे घातपात केले होते. त्याचें नांव निघतांच लोकांच्य अंगाचा थरकांप हे" असे. २ हैदराकडे. ३ बहिरजी घोरपड्याचा बाप. ४ नलिकंठराव शिंद्याची आई.

राव आले आहेत ते आपले रुपये देतात. तुमचें काय जातें ? याजप्रमाणें राघवेंद्र नाईक बोलले. रदबदल करितां निदानीं तीन लक्ष साठ हजार एक रुपये याजवर करार जाला. त्याजवरोन निघोन येत असतां नाइकानीं सांगितलें जे, याजशिवाय दहा हजार होन पडतील. याजप्रमाणें सांगोन निरोप दिला. तेथून स्वगृहास आलों. सर्वांस निवेदन वासुदेवपंतानीं व आम्हीं केलें. राव मान्य जाले. त्याणीं ऐवज पुशिला, याणीं सांगितला. त्याजवर बहिरजी घोरपडे यांजवर एक लक्ष पांच हजार व निळकंठराव यांजकडे बेचाळीस हजार याजप्रमाणें रात्रौ करार करून निद्रा केली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं स्नानसंध्या करून भोजन केलें, उपरांतिक तेथून हरकारे वगैरे हजामास घेऊन आले. ' डोया बोडून हुजर येणें. ' त्यास आम्हीं सांगितलें जे, आम्ही जेऊन डोई करीत नाहीं. वासुदेवपंत हजामत करून जाऊं याप्रमाणें बोलले, आम्हीं कबूल केलें नाहीं. त्याजवरून ते निघोन गेले. दुसरे दिवस मागती बोलावणें आलें तेव्हां निघोन गेलों. वासुदेवपंत व मी निघोन गेलों. हुजूर घेऊन गेले. तेथें कुरनीस केली. ( हैदरानें ) बसा म्हणोन सांगितलें. इकडील वर्तमान पुशिलें. कळलें तसें (आम्हीं) सांगितलें. तेव्हां नाईक बोलले जे, ' आम्हाकडे ऐवज आला. ' ' तो शीखान्यास जमाखर्च करणें ' याजप्रमाणें नबाबानीं उत्तर दिलें. आम्हां दोघांस दोन शाला दिल्या. तेथें अर्ज केला जे, " आम्हीं होन पोटास खादले आहेत. ते माफ करावी व पुढें सुटका होई तों (पोटगी) द्यावी. बेडया काढाव्या. न्हावी परीट यांस परवानगी द्यावी. " त्याजप्रमाणें हुकूम केला. बाहेर आलों. आलेवर बिडारीं येऊन श्रीमंत राजश्री राव यांसी घेऊन गेलों नाईक यांचे घरीं. तेथें ऐन नव्वद हजारांचा कतबा दुहोत्रेचा लिहून दिला. नाणें बट्टा व होन पाडा-

१ हैदराकडून.

वयाचा कतबा साडेचार हजार होनांचा लेहून दिला. दरबार खर्चाचा पांच हजार पांचशें होनांचा मागत होते त्याची याद लेहून देणें म्हणजे देतों याजप्रमाणें सांगितलें. पोटशीं निमित्तास दोघांचे कतबे घोरपडे शिंदे यांचे दिले. बिडारास आलों. आठ दिवशीं आम्ही निघोन येऊं लागलों ते समयीं त्याणें कतबा लिहून मागों लागला. आम्ही हट्ट धरून बसलों. ते समयीं मागती बंदिखान्यांत घालावयासी घेऊन चालिले. ते समयीं नाईक बोलिला जे, तुम्हीं दोघे ब्राह्मणाचे पायावर हात ठेवणें जे, 'हा ऐवज उगवून देतों, दिक्कत करीत नाहीं.' त्याजवरून शपथ दिली. तरी सांगितलें जे, याद मागून तरी पाठवून देणें. त्याणें सांगितलें जे, तुम्ही माघारें येतां त्या समयीं देऊं. याजप्रमाणें सांगोन निरोप दिला. तेथून कारवानांत आलों. सर्व साहित्य करून सावनुरास आलों. तेथून वासुदेवपंत यांस मी जामीन होऊन पुढें लावून दिलें. मागून दोन महिनेनें संतू पट्टणाहून आला त्यासही सांगितलें जे, बावीस हजार रुपयेपैकीं तीन हजार रुपये तीन घोडीं सावकारास देऊं केलीं यासीं द्यावयाचे आहेत. बाकीचे रुपये द्यावयाचे नव्हे, ते तुमचे, म्हणोन मातुश्री काशीकाकीस सांगणें. याजप्रमाणें सांगोन पाठविलें. श्रीमंत यांचे कानावर घालणें म्हणोन बोलिलों. त्याणें उत्तर दुसरे खेपेस सांगितलें जे, बाईस सांगितलें. याजप्रमाणें बोलिलों. उपरांतिक आज उद्यां म्हणतां— *

नं. २६४०. **श्रीगणराज.** (आश्विन शु० ६–२३ सप्टेंबर.)

राजश्री नारोपंत व वासुदेवपंत स्वामी गोसावी यांस—

विनंती उपरी. शिरटीकर देसाई यांजकडील माणसें असामी २ दोन देसाईण कैदेंत आहे तिचे चाकरीकारितां आलीं. नांवनिशी बीतपशील—

---

* ही जबानी इतकीच अपुरी सांपडली.

| कोमारी | चेनवीरा |
|---|---|
| १ | १ |

येणेंप्रमाणें दोन असामी आली आहे. रुजू पाहून देसाइणीजवळ अटकेंत असों देणें. याशिवाय देसाइणीचे माहेरचा जंगम असामी एक समाचारास आला त्यास येऊन समाचार घेऊन जाऊं देणें. छ० ४ सवाल इसन्ने समानीन. मय्या व अल्लफ. हे विनंती.

नं. २६४१. ( आश्विन व० १०–२७ सप्टेंबर. )

बाळासाहेबांस पत्र. रवाना छ० १९ सवालचें. बेळगांवाहून रामाजी अनंत याचें—

" सावंताचे वाडीकडील गृहस्थ कालच येथें आले. त्याणीं तहकीक वर्तमान सांगितलें कीं, जिवाजी विश्राम आठ हजार प्यादे व कांहीं पागेचे स्वार घेऊन रांगणेजवळ चौकी देऊन तीन महिने बसला आहे. रांगणा एकाएकीं हस्तगत होत नाहीं. करवीरकर शिंदा याचें व गोंवेंकर यांचें मत एक आहे. त्याणीं डिचाळी व चिखली वाडीकरांचा प्रांत घेऊन ठाणीं घातलीं आहेत. राजश्री विठ्ठल विश्राम याणीं श्रीमंत राजश्री दादासाहेबांचें नांव करून मुंबईस वकील पाठवून तिकडील फिरंगी इंग्रज दहा जण व कारकून दोघे ऐसे मातबरास आणविले होते. विठ्ठल विश्राम याणीं वरघांटचे राऊत पांच हजार व प्यादे पांच हजार येणेंप्रमाणें ठेवावे, त्यांसीं खर्चास जें लागेल तें इंग्रजानीं पुरवावें, येणेंप्रमाणें करारमदार करून फिरंगी इंग्रज पांच जण व येक कारकून टाकोटाक दहा लक्ष रुपये आणावयास मुंबईस गेले. वेंगुर्लें वगैरे दोनी ठाणीं तूर्त इंग्रजांस द्यावीं व वाडीमध्यें जुना वाडा देसाई यांचा आहे तो जागा इंग्रजांस कोठीस द्यावा, येणेंप्रमाणें करार करून इंग्रज गेले आहेत. विठ्ठल विश्राम याणीं तमाम स्वारांचे वकिलांस वाडीस आणविले आहेत. तहनामे लिहून देऊन राउतांस

आणावयाचें काम तडका चालू केलें आहे. प्यादे तो तडका जाऊं लागले आहेत. याकरितां आतांपासून खानापुरापासून बावडेचे घांटापर्यंत बारीचा बंदोबस्त करून घांटावरील राऊत व प्यादे घांटाखालीं येकंदर जाऊं देऊं नयेत. इंग्रजाचीं पलटणें पाण्यांतून वाडी प्रांतीं यावीं हेही मसलत आहे. ( इंग्रजानीं ) पुण्याकडून मसलत येक दोन वेळ केली ती सिद्धीस गेली नाहीं, याकरितां ही मसलत केली आहे. मिरजेपासून बागलकोटपर्यंत ठाणीं व प्रांत काबीज करून पुण्याकडे वेध लावावा असा इंग्रजांचा विचार आहे. ”

नं. २६४२. श्री. ( भाद्रपद व० ५—७ सप्टंबर. )

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव गोविंद स्वामी गोसावी यांस पो॥ माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. विरापा देसाई संस्थान कित्तूर हा किल्ले मिरज येथें अटकेंत होता तो मृत्यु पावला. त्याचें शव कित्तुरास नेऊन सार्थक करणार म्हणोन देसाई याजकडील गुरुनाथ महिपती व भिमाजी बाबूराव कारकून यानीं विनंती केली कीं, शव न्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे. त्याजवरून हें पत्र तुम्हास लिहिलें असे. तरी बरोबर पंचवीस प्यादे देऊन शव पत्र पावतांच कित्तुरास रवाना करणें. जाणिजे. छ० १८ रमजान. सु॥ इसन्ने समानीन मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

बार.

पै॥ छ० १९ रमजान सन मजकूर भाद्रपदमास.

नं. २६४३. श्रीगणपति. ( भाद्रपद व० ७–९ सप्टंबर. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुह्मीं

पत्र पाठविलें तें पावलें. " कित्तूरकर देसाई याचें शव कित्तुरास रवाना केलें. त्याची वस्तभाव त्याजबरोबर गेली व माणसें होतीं त्यांचीं चिरगुटपांघरूणें त्यांचीं त्यांस दिलीं " म्हणोन लिहिलें तें कळलें. व "भांडीं वगैरे किरकोळ जिन्नस देसाई याजकडील होता त्याची मोजदाद करून याद लिहोन ठेविली आहे. उत्तर येईल त्याचे जिमेस करितों " म्हणोन लिहिलें, त्यास भांडीं वगैरे मोजदाद करून ठेविलीं, उत्तम केलें. तेथेंच असों द्यावीं. छ० २० रमजान हे आशीर्वाद.

नं. २६४४. श्रीगणपति. (आश्विन व० ९–११ अक्टो०)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जावें. विशेष. कित्तूरकर देसाई मृत्यु पावला त्याची वस्तभाव किल्ले मिरज येथें राहिली होती त्याची तुह्मीं मोजदाद करून दागिन्यांची याद लिहून दागिने पाठविले. सनगें वगैरे सुमारी. सुमार.

| | |
|---|---|
| २४ सनगें वगैर— | १६ लांकडी— |
| १ लोड | १ शिशी चंदनाचे तेलाची. |
| १० रूप्याचे दागिने. | १ पोतें चंदनाचे पुडीचें. |
| ४७ भांडीं | ४ पालें पडमी. |
| १७ तांब्याचीं | |
| १७ पितळेचीं | |
| ६ कांशाचीं | |
| ७ लोखंडी | |
| —— | |
| ४७ | |

एकूण सुमारी. सुमार एकशेंचार तुमचे यादीप्रमाणें पावलीं. छ० २२ सवाल सु॥ इसन्ने समानीन मय्या व अल्लफ. हे आशीर्वाद.

नं. २६४९. श्री. ( पौष शु० ९–२४ दिसेंबर. )

राजमान्य राजश्री अंताजी शंकर कमाविसदार परगणे गोकाक दिम्मत परशराम रामचंद्र गोसावी यांस सेवक माधवराव नारायण प्रधान. सु॥ इसन्ने समानीन मय्या व अल्लफ. वे॥ बाळंभट बिन शंकरभट उपनाम फणसळकर याणीं हुजूर विदित केलें कीं, " आपणास पेशजी सरकारांतून परगणे मजकुरीं शंभर रुपयांचे कमाल आकाराची जमीन नूतन इनाम करार करून देऊन परगणे मजकुरीं हरएक गांवीं सदरहूप्रें॥ जमीन आपले दुमाला करणें; म्हणोन सन समानीनांत राजश्री त्रिंबकराव यशवंत माजी का॥ दार पे॥ मा॥र यांस सरकारची सनद सादर जाली आहे. त्यास तिगस्तां पा॥ मा॥र किचरकर देसाई याचा अमल होता, सबब जमीन आमचे दुमाला जाहली नाहीं. ऐशीयास हल्लीं सरकारचा परगणा सरकारांत आला, याकरितां पेशजींचे सनदेप्रें॥ आपली जमीन आपणाकडे चालेल तें केलें पाहिजे. " ह्मणोन, त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी तुम्ही येविशींचें मनास आणून पेशजी सरकारची सनद त्रिंबकराव यशवंत माजी का॥-दार परगणे मजकूर यांस " बाळंभट बिन शंकरभट यांजला परगणे मजकुरीं हरएक गांवीं शंभर रुपयांचे कमाल आकाराची जमीन इनाम नेमून देणें " ह्मणोन सादर झाली असेल त्याप्रें॥ तुह्मी पा॥ मा॥र हरएक गांवीं सनदेबरहुकूम जमीन भटजींचे दुमाला करून यांजकडे सुरळीत चाले तें करणें. जाणिजे. छ० ८ मोहरम. आज्ञा प्रमाण.

( लेखनसीमा. )

नं. २६४६. ( --३० डिजंबर. )

गंगाधर सदाशिव जोशी यांचें राजापुराहून पौष शु॥ पौर्णिमेचें पत्र बाळासाहेबांस—

" आपण जिनसाविशीं लिहिलें, त्यास सध्यां जिन्नस समुद्रांतून बहुतसा येत नाहीं. व इकडीलही जिन्नस बाहेर जाऊं देत नाहींत. सरकारचे कारकून राजापुरीं येऊन बसले आहेत जे, मुंबईस माल सावकार नेतील; यास्तव कैद केली आहे. यामुळें बंदरीं सावकारी चालत नाहीं. हिंग मात्र मिळाला तो पाठविला आहे. दर कच्च्या मणास रुपये ४६ प्रमाणें आहे. इंग्रजी लोखंडही सध्यां नाहीं. किरकोळी दर शिसें कच्च्या मणास रुपये ११ व इंग्रजी शिसें दर मणीं रु० १३ प्रमाणें दर आहे. "

नं. २६४७. ( आश्विन व० ९--११ आक्टोबर. )

निरख बाजार पेठ चिकोडी. सु॥ इसन्ने समानीन. मय्या व अल्लफ. माहे सवाल. छ० २२ रोज.[1]

| वजनी वजन. | | वजनी वजन. | | वजनी वजन. | |
|---|---|---|---|---|---|
| रु० | | रु० | | रु. | |
| २ | कुंकूं | ४। | साखर चिनी | ० | खजूर |
| २॥।⁄ | हळद | ८ | नावत साखर | १। | पोहे |
| ३॥ | सुपारी वडवदार (?) | २॥। | खारीक | १। | चिंच |
| | | ३॥ | जिरें | १। | आंबसोल |
| ३।⁄ | कोंकणी सुपारी | ६॥ | मिरें | १। | ताग |
| ३। | खोबरें निवड | ३।⁄। | सुं | १॥ | वाक |
| ३ | रास खोबरें | ३ | काजू | १॥ | काथ्या |

---

१ याप्रमाणें सवालापासून जिल्हेजपर्यंत तीन महिन्यांचे निरख बंद आहेत. त्यांत दर कमीजास्ती मानानें असेच आहेत; सबब येथें एकच निरख बंद घेतला आहे. यांत वजनी जिनसांचा दर लिहिला आहे तो दरमणीं समजावा.

| वजनी वजन. | वजनी वजन. | वजनी वजन. |
|---|---|---|
| रु० | रु० | रु० |
| २॥ पांढरा कात | ४ गंधक | २॥ गूळ |
| २। डिंक | १॥ सोरमीठ | ३ मध |
| १॥ खसखस | ८ शिसें | ६ तूप |
| २ तंबाखू | १ फुटाणे | ३॥ चंदन |
| १ भांग | २ धोंडफूल | २। तेल |
| १ लसूण | १।॥≈ लाख | ३ पेंड खंडी |
| २ बडीशेप | ४।॥ लोखंड | २। रूई कापूस |
| ३।≈। नागकेशर | १॥ वेखंड | |

| कैली जिन्नस. | कला जिन्नस. | कली जिन्नस. |
|---|---|---|
| ϭϭ३। तांदूळ मोठे | ϭ।·१ मीठ वडागर (?) | ϭ।≈ एरंड्या |
| ϭϭ३ तांदूळ बारीक | ϭ।२।॥ बारीक मीठ | ϭ।२॥ तांदूळ राळ्याचे |
| ϭ॥· जोरी | ϭ।१॥ मूग | ϭ।१ मटक्या |
| ϭ॥·, ·॥≈ बाजरी | ϭ। तीळ पांढरे | ϭϭ३ तीळ |
| ϭ।·॥ हरभरे | ϭ। मोहऱ्या | ϭ॥१ धणे |
| ϭ।१। गहूं | ϭϭ३ मेथ्या | ϭ।·।· उडीद |
| ϭ।·।॥ तुरी | ϭ॥ करडे | ϭϭ३॥ मसुरा |
| ϭ। डाळ तुरीची | ϭ१ चुरमुर | ϭ॥·॥· नाचणे |

| सव्वाशेरी जिन्नस. | सव्वाशेरी जिन्नस. | सव्वाशेरी जिन्नस. |
|---|---|---|
| ४। लवंग | ϭ≡॥ गांजा | ϭ≡ दालचिनी |
| ·।≈ पत्री | ·।≈ नवसागर | ·।· शाजिरें |
| ϭ≈॥ मायफळ | २।॥ पारा | ·।·। मोर्चूद |
| ·॥· पिंपळी | ·।− शेंदूर | ϭ−॥ बोळ |
| ·॥− पिंपळमोड | ·॥· ऊद | १। अफू |
| २ हिंग | १ϭ≈ कापूर | ·।≡ कारळे |

| सुमारी | जिन्नस. | सुमारी | जिन्नस. | सुमारी | जिन्नस. | सुमारी | जिन्नस. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नारळ | सुमार १८१ | कोरे कागद[1] | ।॥ ~ | निंबें | १०० | ३॥ खास रेजीम. |

नं. २६४८. ( १२ नोव्हेंबर. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र पुण्याहून कार्तिक व॥ ११ चें.

" बिवलकरांचे कित्ते पाठविणेविसीं आज्ञा, त्यास त्याप्रमाणें बाळाजीपंतानीं कित्ते पाठविले आहेत. आपण ८ फर्मे लांकडी पाठविले त्या फर्म्यांप्रमाणें इंग्रजी कानशी पाठविल्या आहेत; परंतु त्यांतील एक नमुन्याची कानस येथें मिळत नाहीं. त्याचा शोध येथें बोहारी व लोहार यांजपाशीं केला. येथें त्या नमुन्याप्रमाणें कानस तयार करितात, परंतु इंग्रजी कानसाप्रमाणें होत नाहीं. " छताचे कामास चांगला शहाणा सुतार पाहिजे. यादो ठाकूर सुतार पेशजी पुण्यांतील वाड्याचे कामावर होता तो चांगला शहाणा आहे. त्याचे भाऊ पुरुषोत्तम व रघुनाथ मागें येथें व कुरुंदवाडीं कामें करून गेले आहेत तेही कसबी आहेत, त्यांस पाठविणे"विसीं आज्ञा; त्यास यादो ठाकूर व पुरुषोत्तम व रघुनाथ आपले देशास गेले. गुजराथी सुताराचाही शोध केला, परंतु छताचें काम करी असा नाहीं. पांच सात असामी आहेत ते सरकारांत व श्रीमंत राजश्री नानाकडे नेहमीं चाकरीस आहेत. पुण्यांत धारण जोरी साडेसात पायली व गहूं पांच पायली व बाजरी सहा पायलीप्रमाणें दर आहे. "

नं. २६४९. ( २३ डिसेंबर. )

विसाजी नारायण वाडदेकर यांचें श्रीपतराव मोरेश्वर यांस पुण्याहून पत्र पौष शु॥ ८ चें.

" दुर्बिणीविसीं लिहिलें, त्यास पुण्यांत चांगल्या उंच दुर्बिणी हल्लीं मिळत नाहींत. आहेत त्यांतून कोशीं दोन कोशीं दिसतें तेंही अंधक दिसतें. साफ दिसत नाहीं. त्यांची किंमत १७ रुपये पडती. तुम्हीं लिहिल्याप्रमाणें पांच कोसांवरील दिसत नाहीं. हल्लीं इंग्रजांशीं

---
1 एक रुपयास कोरे कागद किती हें लिहिलेलें नाहीं.

बिघाड जालेला आहे यामुळें माल येत नाहीं. दोन दुरबिणी होत्या; परंतु माल चांगला नाहीं आणि किंमत फार आणि संजाईत देत नाहीं यास्तव पाठविली नाहीं. तुम्हीं रुपये २५ पाठविले त्यांपैकीं केशर वजन पक्कें ८८। दर शेरीं रुपये ३२ प्रमाणें रुपये ८ व ०।० पावल्याची पेटी येणेंप्रमाणें पाठविलें आहे बाकी पावणेसत्रा रुपये संताजी जासुदाबरोबर पाठविले आहेत."

नं. २६५०.

यादी कारकुनी नाना फडणीस. सन सलास सबैन ता॥ सन तिसां सबैन. बा॥ याद.

३४७५७ हुकेरी.
१३४७५ जुने.
२८८८७।≈ होनांचे.
———
७७११९

पैकीं नक्त पावले रुपये.
१९९९८॥। झाडा गु॥ बापूजी बल्लाळ जोशी मुक्काम पुणें रुपये. २५००० चिठ्ठी छ० २० सफरपैकीं आदा होन धारवाडी ५३३३ दर ३॥। प्रमाणें.
३३२५७८≡॥ मौजे बेबळें परगणे करकंब दरोबस्त इ॥ सलास सबैन. ता॥ तिसां सबैन सालें ७ दरसाल रुपये ४७५१८॥ प्रमाणें नक्त जुने रुपये.
———
५३२५५॥।≡॥

१ पटवर्धनांच्या जहागिरींतून नाना फडनवीस यांची कारकुनीची मिळकत सात वर्षांत ७७११९ रुपये होती. याप्रमाणें भोंसले, गायकवाड, अक्कलकोटकर, प्रतिनिधि, सचिव व इतर किरकोळ राजपथकी सरदारांच्या मुलुखाखेरीज म्हणजे खुद्द पेशव्यांच्या अंमलाखालीं असलेल्या सर्व राज्यांत नानांस फडणिशीच्या दरकाबद्दल कारकुनीची मिळकत होत होती. सर्व पेशवाईंत प्रत्येक महालचे व किल्ल्याचे फडणीस नेमण्यांचा हक्क नानांचा होता. ती देखील त्यांच्या किफायतीची बाब होती.

बाकी देणें रुपये.
१४९७५।.॥ नक्त.
८८८८॥= होनांचे.

——————

२३८६३।॥=॥

नं. २६५१.

मोरो आपाजी परांजपे व धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र. चैत्र वद्यांतील.

" पेशजी केशर आपणाकडे पाठविलें त्या मासल्याचें येथें मिळतें. त्यापेक्षां उंच दराचें मिळत नाहीं. आठ रोजांनीं भरणा मुंबईचा यावयाचा आहे तेव्हां चौकशी करून घेतों. आज्ञेप्रमाणें गुलाबपाणी वजन पक्के ८८३ तीन शेर दर शेरीं रुपये ३ प्रमाणें खरेदी करून पाठविलें आहे. श्रीमंत राजश्री नाना फडणीस देवाची अर्चा करावयास मेणवलीस गेले आहेत. शिंदे होळकर जेजुरीनजीक आहेत. श्रीमंत राजश्री रावसाहेब ( पेशवे ) यांचा व्रतबंध वैशाख शुद्धांत होण्याचें ठरलें आहे. तीन लक्ष रुपये खर्च करण्याचा निश्चय जाला आहे. साहित्य व्हावयास लागलें. पुण्यांत धारण जोंरी साडेपांच पायली निटवें. व बाजरी सव्वापांच. हरभरे सव्वाचार साडेचार. तांदूळ महाग. सव्वातीन पायली मध्यम. चांगले तीन पायली. हत्तीभोग पावणेचार पायली, परंतु ते मोडतात. तूप सव्वादोन शेर. तेल साडेपांच शेर. वरकडही जिन्नस सवंग आहेत. सिंहगडास वृद्ध आहेत तेथें हजार प्यादे व गाडदी आहेत. कारकून नेहमीं आहे. वृद्धाची धमक भारी आहे. केव्हां कोणीकडे काय करितील न कळे ! "

१ हें व यापुढचें अशीं हीं दोन पत्रें स० १७७९ सालांतलीं असून त्या सालच्या कागदांत छापावयाचीं राहिलीं सबब येथें छापिलीं. २ सखारामबापू कैदेंत आहेत.

नं. २६५२.

बापूजी बल्लाळ याचें श्रावण शु॥ ११ चें पत्र पुण्याहून बाळा-साहेबांस.

" वडिलांकडे पेशजी मिन्याचीं भोंकरें जोड २ पाठविले त्याचा खर्च.

११॥। सोनें वजन मास ८॥।१ दर तोळा रुपये १६ प्रमाणें.

४ मेहनत दर जोडयास रुपये २ प्रमाणें.

---

१५॥।

# स्वस्थतेचीं दोन वर्षें.

हीं दोन वर्षें म्हणजे सन १७८२ व १७८३ हीं होत. या दोन वर्षांच्या अवधींत मराठी राज्यांत नसली तरी निदान महाराष्ट्रांत तरी स्वस्थता होती. इंग्रज व मराठे या उभयतांसही युद्धाचा कंटाळा आला होता व सलोख्यानें तंटा कायमचा मिटवून टाकण्याकडे उभयतांच्याही मनाची प्रवृत्ति झाली होती; त्यामुळेंच महाराष्ट्रास ही स्वस्यता लाभली. इंग्रज व मराठे यांत या वेळीं जो तह झाला त्याला सालबाईचा तह म्हणतात. हा तह कसा घडून आला हा वृत्तांत प्रथम वर्णन करूं.

सन १७८१ च्या पावसाळ्यांत महादजी शिंदे व कर्नल मूर हे आपापल्या फौजांसह माळव्यांत लढाईच्या इराद्यानें एकमेकांसमीप छावणीस राहिले होते हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. पावसाळ्याच्या अखेरीस म्हणजे ऑक्टोबर महिन्यांत उभयतांमध्यें तह होऊन असें ठरलें कीं, कर्नल मूर यांनीं लढाई बंद करून यमुना उतरून अंतर्वेदींत परत निघून जावें, आणि मुंबईसरकारास लिहून त्यांजकडून दक्षिणेंतील लढाई बंद करवावी. उलटपक्षीं महादजी शिंद्यानीं स्वतः लढाई बंद करून शिवाय पुण्यास नाना फडनवीस यांस लिहून त्यांजकडूनही इंग्रजांशीं युद्ध करण्याचें बंद करवावें. गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स यांजकडून शिंदे यांजकडे तह ठरविण्यास वकील येईल तेव्हां शिंद्यानीं मध्यस्थीची खटपट करून पेशवे व ईस्ट इंडिया कंपनी यांमध्यें तहाचा पक्का ठराव घडवून आणावा. या कराराप्रमाणें कर्नल मूर फौजेसह तत्काळ निघून अंतर्वेदींत गेले व शिंदे यांशीं

आपण काय ठराव केला आहे हें मुंबई, सुरत वगैरे ठिकाणच्या अधिकाऱ्यांस लिहून त्यांनीं कबूल केल्याप्रमाणें इंग्रजांतर्फे लढाई बंद करविली. त्याचप्रमाणें शिंद्यानींही पुण्यास पत्रें पाठवून मराठ्यांच्या बाजूनें लढाई बंद करण्याची तजवीज केली. यामुळें सन १७८२ हें वर्ष सुरू झालें तेव्हां दर वर्षास होणारी सैन्याची जमवाजमव व हालचाल व पुढें होणाऱ्या युद्धाच्या मसलती वगैरे सर्व बंद झालें. शिपाई व सरदार लोक यांस विश्रांति मिळून वकील व दरबारी यांस आपलें कौशल्य दाखविण्यास अवसर सांपडला. पुढें वॉरन् हेस्टिंगस् यांजकडून मि० अंडरसन् हा वकील तह ठरविण्यासाठीं शिंद्यांच्या दरबारीं आला. शिंदे व मि० अंडरसन या उभयतांत चर्चा होऊन तहाचीं कलमें ता. १७ मे सन १७८२ या दिवशीं उभयतांच्या मंजुरीनें निश्चित होऊन त्यांची याद ठरली. त्यावेळीं शिंद्याच्या लष्कराचा मुक्काम सालबाई येथें असून तेथील गढीस त्यांनीं मोर्चे दिले होते. तेथें असतां मूळ तहाची याद ठरली म्हणून या तहास सालबाईचा तह म्हणतात. ती तहाची याद कलकत्त्यास जाऊन जून महिन्यांत वॉरन हेस्टिंगूस यांनीं ती मान्य करून तीवर आपलें शिक्का मोर्तब ठोकिलें. आतां तह पुरा होण्यास पुणें दरबाराची मखलाशी मात्र व्हावयाची राहिली.

तहावर मखलाशी करण्यास नाना फडनवीस यांनीं पुष्कळ आढेवेढे घेतले व दिवसही पुष्कळ घालविले. याचें कारण असें कीं, इंग्रजांशीं तह व्हावा हें शिंदे व नाना या उभयतांसही मान्य होतें तरी या तहापासून उभयतांसही भिन्नाभिन्न कार्यें साधून घ्यावयाचीं होतीं. शिंद्यांच्या मनांत दिल्लीस पुनरपि मराठ्यांचें वर्चस्व होऊन बादशहा व त्याची दौलत आपले हातीं रहावी व बादशहाचें नांव पुढें करून त्या बळावर दुसरीं मोठमोठीं कामें करून घ्यावीं असें होतें. बाद-

शहाचा वजीर नजबखान जेथपर्यंत जिवंत होता तेथपर्यंत मराठ्यांचा तेथें प्रवेश होण्याचा संभव नव्हता; परंतु तो इमानी व पराक्रमी वजीर सन १७८२ च्या एप्रिल महिन्यांत मृत्यु पावला, त्यामुळें पुष्कळ दिवस मनांत घोळत असलेला आपला बेत आतां तडीस न्यावा असें शिंद्यांच्या मनांत आलें. हा त्यांचा बेत हाणून पाडण्याचें जर इंग्रजांच्या मनांत असतें तर तें त्यांनीं सहज केलें असतें. कारण कीं, त्यावेळीं दिल्लीच्या तख्तावर आरूढ असलेला शहाअलम बादशहा पूर्वीं पुष्कळ वर्षें इंग्रजांचें पेन्शन खाऊन त्यांच्याच आश्रयास राहिला होता. बंगाल, बहार, अयोध्या व रोहिलखंड या सर्व प्रांतांत इंग्रजांची सत्ता कायमची स्थापित झाली होती. बादशहास हातीं घेऊन दिल्लीच्या प्रांतांत व राजधानींत आपला अंमल बसविणें त्यांस अगदीं सुलभ होतें व तसें त्यांनीं इतर प्रसंगीं केलेंही असतें; परंतु हल्लीं वॉरन् हेस्टिंगस यांनीं महादजी शिंद्यांस स्पष्टपणें सुचविलें कीं, तुह्मी पुणें दरबाराशीं आमचा तह ठरवून द्या आणि दिल्लीस जाऊन वाटेल तसा बादशहाच्या दौलतीचा बंदोबस्त करा. आपण कांहीं त्यास आड येणार नाहीं.

आपल्या राष्ट्राचें दिल्लीस वर्चस्व असावें हें नानांसही पाहिजेच होतें; परंतु तहांतल्या दोन कलमांमुळें तो तह कबूल करण्यास शिंद्याइतके नाना फडनवीस आतुर झाले नव्हते. तीं दोन कलमें साष्टी व दादासाहेब यासंबंधाचीं होतीं. इंग्रजांचें ह्मणणें कीं वसई, अहमदाबाद व इतर सर्व मुलूख तुमचा आह्मीं घेतला आहे तो तुह्मांस परत देऊं. पण साष्टी मात्र परत देणार नाहीं. शिंद्यांचें म्हणणें दिल्लीस आपली मसलत साधते तर साष्टीसाठीं अडून बसावें हें ठीक नाहीं. नानांचें म्हणणें कीं साष्टीसुद्धां सर्व मुलूख परत मिळाला पाहिजे. नानांचें म्हणणें इंग्रजांनीं दादासाहेबांस आधीं हवालीं करावें आणि मग तहाची गोष्ट

बोलावी. इंग्रजांचें म्हणणें कीं, आमच्या आश्रयास आलेल्या दादासाहेबांस आह्मीं तुमच्या हवालीं करावें तर कंपनीच्या इभ्रतीस बट्टा येतो. आह्मी त्यांस तुमच्या हवालीं करणार नाहींच, पण शिवाय त्यांवर कोणत्याही प्रकारची सक्तिही करणार नाहीं. ते स्वेच्छेनें तुह्मांकडे जातील तर खुशाल जाऊं द्या. आह्मी त्यांस आडकाठी करणार नाहीं. शिंद्यांचें म्हणणें दादासाहेब पुण्यास जात नसले आणि आह्माकडे येत असले तरी हरकत नाहीं. त्यांस स्वाधीन करण्याविषयीं इंग्रजांशीं आग्रह धरण्याचें कारण नाहीं. श्रीमंतांस आह्मी परस्परच आपणाकडे आणवितों. या दोन कलमांसंबंधें तिघांचे तीन भिन्न अभिप्राय पडले होते. त्यांची आपल्या मनाप्रमाणें एकवाक्यता व्हावी याकरितां नानानीं शिंद्यांशीं पत्रव्यवहार करण्यांत सहा महिने घालविले.

या टाळाटाळीच्या वर्तनांत नाना फडनवीस यांस आणखी एक फार महत्वाचा मुद्दा साधावयाचा होता. सालबाईच्या तहांत एक कलम असें होतें कीं, हैदरअल्लीनें इंग्रजांचा मुलूख घेतला आहे तो सोडून देण्याविषयीं मराठ्यांनीं त्यांस सांगावें. तो त्यांचा मांडलिक असल्यामुळें तो हें म्हणणें मान्य करीलच. न करील तर मराठे व इंग्रज यांनीं एक होऊन त्यास इंग्रजांचा मुलूख परत देणें भाग पाडावें. आपण व हैदर एक झालों आणि हैदरानें मद्रासप्रांतीं इंग्रजांस बेजार केलें; यामुळेंच ते तहास उत्सुक होऊन हैदराची व आपली जूट फोडूं पहात आहेत हें नाना फडनवीस यांस पक्कें कळलें होतें. यामुळें ते इंग्रजांशीं बोलतांना असा रोंख दाखवीत कीं, हैदराची व आपली कायमची दोस्ती झालेली आहे; तेव्हां त्याला सोडून आम्ही तुम्हांशीं एकट्यानीं तह कसा करावा ? तथापि साष्टी व दादासाहेब यासंबंधें आमचें ह्मणणें तुम्ही मान्य करीत असाल तर आम्ही तह करूं. नाहीं तर आम्ही तह करीत नाहीं व हैदराची दोस्तीही सोडीत नाहीं. इकडे हैदराशीं

बोलतांना ते असा रोख दाखवीत कीं, शिंद्यांच्या विद्यमानें इंग्रजांशीं तह ठरला आहे तो आम्हास नाकबूल करितां येत नाहीं. तिगस्तां कृष्णा व तुंगभद्रा यांमधला धारवाड, बदामी वगैरे प्रांत आम्हीं तुह्मांस दिला आहे तो परत देत असाल तर मात्र आम्ही इंग्रजांशीं तह कबूल करणार नाहीं ! याप्रमाणें एकाला एक व दुसऱ्याला दुसरेंच सांगून दोघांसही अडचणींत पाडून दोघांकडूनही आपलें म्हणणें मान्य करवावें, असें हें नानांचें कारस्थान होतें. कारण मराठ्यांच्या मैत्रीची इंग्रज व हैदर या उभयतांसही या वेळीं अत्यंत अवश्यकता होती. अशा स्थितींत हें तहाचें घोंगडें बरेंच दिवस भिजत पडलें असतां हैदरअल्ली मरण पावल्याची वार्ता नानांच्या कानीं पडली. तेव्हां आतां यापुढें आढेवेढे घेण्यापासून कांहीं निष्पन्न होण्याजोगें नाहींसें जाणून ता. २४ फेब्रुवारी सन १७८३ रोजीं नानानीं तहाच्या कागदावर पेशव्यांकडून मखलाशी करून शिक्के मोर्तब करून तो कागद इंग्रजांच्या हवालीं केला.

ता. ७ डिसेंबर सन १७८२ या दिवशीं मद्रासप्रांतीं हैदरअल्लीचें देहावसान झालें. त्या वेळीं त्याचें सर्व लष्कर इंग्रजांशीं युद्ध करण्याच्या मसलतीवर तिकडे गुंतलें होतें. मरणाचे वेळीं हैदरअल्लीचें वय साठ वर्षें होतें. त्याला राजस्फोट या नांवाचा असाध्य व्रण झाला होता त्यांतच त्याचें देहावसान झालें. त्याचा प्रतिस्पर्धी माधवराव बल्लाळ पेशवे यास राजयक्ष्मा होऊन मृत्यु आला होता हें प्रसिद्धच आहे. राजयक्ष्मा व राजस्फोट हीं दोन्ही क्षयाचींच रूपें आहेत. या क्षयानें हे दोघे अद्भुत कर्तृत्वाचे पुरुष मृत्यु पावले आणि त्यांच्या मृत्यूमुळें म्हैसूर व महाराष्ट्र या दोन्ही राज्यांस जो एकदांचा क्षय लागला तो तीं दोन्हीं राज्यें नाहींशीं होतपर्यंत थांबला नाहीं ! हैदरास टिपू सुलतान व अबदुल करीम असे दोन पुत्र होते. पैकीं अबदुल करीम

हा वेडसर होता त्यामुळें हैदर मेल्यावर त्याचें सर्व राज्य बिनतक्रार टिपूच्या हातीं आलें.

सवाई माधवराव पेशवे यांची मुंज झाल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. त्यांचें लग्न करण्याविषयीं पार्वतीबाई व सगुणाबाई या पेशव्यांच्या घरांतील स्त्रियांनीं चर्चा सुरू केली व ती गोष्ट नानांच्याही मनास आली होती. परंतु इंग्रजांशीं पक्का तह झाला नव्हता त्यामुळें आजपर्यंत ती गोष्ट त्यांनीं मागें टाकिली होती. आतां तह करावयाचा असें ठरल्यावर त्यानीं श्रीमंतांच्या लग्नाचीही योजना ठरविली. केशव नाईक थत्ते टोंकेंकर यांची कन्या वधू निश्चित केली होती. हें लग्न ता. १० फेब्रुवारी सन १७८३ ( माघ शु० ९ श. १७०४ ) या दिवशीं झालें. पेशव्यांच्या पत्नीचें नांव रमाबाई असें ठेविलें होतें. समारंभाचा थाट नानानीं फारच अपूर्व केला होता. गंगाधरराव गोविंद व परशुरामभाऊ व रघुनाथराव वगैरे सर्व पटवर्धन मंडळी या समारंभास हजर होती. श्रीमंतांच्या लग्नांत पटवर्धनांची योजना पाणी भरण्याच्या कामावर झाली होती! श्रीमंतांच्या लग्नाच्या निमित्तानें राज्यांतले प्रमुख लोक, मुख्य सरदार व स्नेही शेजारी संस्थानिक या सर्वांस पुण्यास बोलावून आणावें, व सर्वांची संमति घेऊन सालबाईचा तह पक्का करावा, व आपला एकोपा किती आहे हें इंग्रज व टिपू सलतान यांस दाखवावें, असा हा टोलेजंग समारंभ याच वेळीं करण्यांत नानांचा अंतस्थ राजकीय हेतु होता तो अंशतः मात्र सिद्धीस गेला. निमंत्रित मंडळीपैकीं महादजी शिंदे व मुधोजी भोंसले व फत्तेसिंग गायकवाड हे कोणी आले नाहींत. नवाब निजामअल्ली यावयाचे होते; परंतु आयते वेळीं त्यांच्या राज्यांत बंड उत्पन्न झाल्यामुळें तें मोडण्यांत ते गुंतले गेले. तथापि त्यांनीं आपले पुत्र पोलादजंग यांस पाठविलें होतें. समारंभास श्रीमंत महाराज शाहु छत्रपति यांची स्वारी सातान्याहून आली

होती. वरकड सरदार तुकोजी होळकर, रास्ते, पटवर्धन, हरीपंत फडके, व पाटणकर, दरेकर, घोरपडे वगैरे हुजरातीपैकीं प्रमुख मानकरी हे सर्व आले होते. तात्पर्य, हें एकप्रकारें राष्ट्राचें कौन्सिलच नानानीं बोलाविलें होतें ! या सर्व मंडळीस कळवून नानानीं इंग्रजाशीं सालबाईचा तह पक्का ठरविला.

तहाप्रमाणें मराठ्यांपासून घेतलेला मुलूख इंग्रजांनीं दोन महिन्यांत परत द्यावयाचा करार झाला होता; पण ती मुदत संपण्याच्या आधींच एक गोष्ट घडून आली, तीमुळें पुन्हां इंग्रजाशीं बिघाड होतो कीं काय, ही पुणें दरबारास काळजी पडली. ती गोष्ट अशी कीं, इंग्रजाचीं तीन व्यापारी व एक लढाऊ अशीं चार जहाजें मुंबईहून मलबाराकडे जात असतां वाटेंत त्यांची व आनंदराव धुळप यांच्या आरमाराची गांठ पडून लढाई झाली. त्या लढाईंत धुळपानें तीं चारीं जहाजें व त्यावरचे तिघे सरदार व चारपांचशें माणूस कैद करून विजयदुर्गास नेलें. तह झाला असतां तो न कळल्यामुळें धुळपानें याप्रमाणें आपले हुकुमाशिवाय लढाई केली असें इंग्रजांस सांगून पाठवून व मालमत्ता व चारपांचशें माणूस कैदेंत सांपडलें होतें त्यासुद्धां चारी जहाजें परत इंग्रजांस देऊन नानानीं त्यांची समजूत काढिली. मग इंग्रजांनींही साष्टीखेरीज वसई, अमदाबाद व इतर सर्व घेतलेलीं ठाणीं पुणेंदरबारच्या हवालीं केलीं.

सालबाईचा तह झाल्यावर दादासाहेब सुरतेस होते त्यांस इंग्रजांनीं खर्चास देण्याचें नाकारिलें व पुणें दरबाराशीं कसा तरी समेट करून आपले राज्यांत जाऊन रहाण्याविषयीं त्यांस सल्ला दिला. तेव्हां श्रीमंतांचा निरुपाय होऊन इंग्रजांस सोडून देण्याचा त्यांनीं निश्चय केला. महादजी शिंदे त्यांस आपणाकडे बोलावीत होते; परंतु तिकडे जाण्याविषयीं त्यांच्या मनाची प्रवृति होईना. गोदावरीतिरीं जाऊन

रहावें असें त्यांच्या मनांत होतें व नानानीं तशीं त्यांस पत्रेंही लिहिलीं होतीं; परंतु नानांचा तरी त्यांस भरंवसा कोठें येत होता ! शेवटीं केवळ नानांच्या शब्दावरच न विसंबतां परशुरामभाऊ, हरीपंत फडके व तुकोजी होळकर यांपासून पृथक् पृथक् इमानपत्रें व बेलभंडार घेऊन श्रीमंत दादासाहेबांची स्वारी सन १७८३ च्या जुलै महिन्यांत कोंडाई बारी चढून खानदेशांत आली. त्यांस आणावयास होळकर, फडके व रास्ते गेले होते त्यांची व श्रीमंतांची गांठ पडून बोलणीं झालीं, त्यावरून श्रीमंत दादासाहेब निःसंदेह होऊन गोदावरीच्या तीरीं कोपरगांव येथें दरमहा पंचवीस हजार रुपये नेमणूक घेऊन राहिले. तेथें राहिल्यावर नोव्हेंबर महिन्यांत त्यांची प्रकृति फार बिघडली. मध्यें कांहीं दिवस त्यांस आराम वाटल्यासारखा झाला होता. परंतु पुन्हां त्यांचें दुखणें बळावून ता. ११ डिसेंबर सन १७८३ ( मार्गशीर्ष व॥ ३ गुरुवार श० १७०५ ) या दिवशीं त्यांचें देहावसान झालें. मरणाचे वेळीं त्यांचें वय ५४ वर्षांचें होतें. त्यांस तीन स्त्रिया होत्या. पहिली जानकीबाई गोपाळराव गणेश बर्वे यांची कन्या. ती मेल्यावर दुसरी आनंदीबाई राघो महादेव ओक मळणकर यांची कन्या. अलीकडे इंग्रजांचें आश्रयास गेल्यावर सुरतेस असतां श्रीमंतांनीं तिसरें लग्न केलें होतें. ती मथुराबाई भिकाजीपंत पेंडसे यांची कन्या. या तिसऱ्या स्त्रीचें नांव कोठें फारसें ऐकण्यांत नाहीं, यावरून ती मूलबाळ न होतां लहानपणींच वारली असावी. पूर्वीं माधवराव पेशव्यांचे कारकीर्दींत भुसकुटे यांच्या घराण्यापैकीं एका मुलास दादासाहेबांनीं दत्तक घेऊन त्याचें नांव अमृतराव असें ठेविलें होतें. औरस पुत्र बाजीराव साहेब यांचा जन्म सन १७७५ च्या प्रारंभीं धार मुक्कामीं झाला. त्यांस हल्लीं नववें वर्ष संपत आलें होतें. दादासाहेब वारले तेव्हां आनंदीबाई चार महिन्यांची गरोदर होती, ती पुढें प्रसूत होऊन

पुत्र झाला. त्याचें नांव चिमाजीआप्पा ठेविलें. याखेरीज दादासाहेबांस पहिल्या बायकोपासून झालेली दुर्गाबाई नांवाची कन्या होती ती पांडुरंगराव बारामतीकर यांस दिलेली होती.

हैदरअल्ली मेल्यावर टिपूचें मनांतून इंग्रजांशीं मद्रासप्रांतीं युद्ध सुरू ठेवावयाचें होतें, परंतु इंग्रजांनीं बिदनुरावर स्वारी केल्याचें वर्तमान ऐकतांच तो तिकडून सर्व फौजेसह निघून टाकोटाक बिदनुराकडे आला. त्यास कारोमांडल किनाऱ्यावरून हुसकून लावण्यासाठींच इंग्रजांनीं ही बिदनूरच्या स्वारीची मसलत योजिली होती, व तींत त्यांस प्रथम चांगलें यश आलें. सन १७८३ च्या जानेवारींत मुंबईहून जलमार्गानें जनरल माथ्यूस हा सरदार इंग्रजी सेनेसह निघाला तो फेब्रुवारीच्या प्रारंभीं होनावर येथें उतरला. लगेच त्यानें होनावर व मंगलोर हीं ठाणीं घेऊन घांटाखालचा सर्व प्रांत ताब्यांत आणिला. नंतर त्यानें घांट चढून हैदरगड व अनंतपुर व दुसरीं बारीक सारीक ठाणीं घेऊन खुद्द बिदनुरासच वेढा घातला, व ता. १६ फेब्रुवारी या दिवशीं तें स्थळ स्वल्प प्रयासानें काबीज केलें. या इंग्रजी सैन्यास ८१ लक्ष होन, शिवाय पुष्कळ जवाहीर, अशी अतोनात लूट मिळाली. त्यावेळीं हैदरअल्लीचा आवडता चेला शेख अयाज म्हणून होता तो बिदनूर प्रांताचा सुभेदार होता. टिपूचा व त्याचा पूर्वींपासून द्वेष होता. टिपू आतां गादीवर बसल्यामुळें आपली धडगत नाहींसें समजून तो शेख अयाज इंग्रजांस अनुकूल झाला आणि ह्मणूनच इंग्रजी सेनेची वर सांगितल्याप्रमाणें फत्ते होत गेली. परंतु आतां त्या सेनेवर मोठें दुर्धर संकट ओढवलें. कारण कीं, टिपू सुलतान लाख फौज व जंगी तोफखाना घेऊन इतक्या त्वरेनें आला कीं इंग्रजांस ठाणीं टाकून पळून जाण्याची सुद्धां संधी सांपडली नाहीं. टिपूनें येतांच केवलदुर्ग, हैदरगड व अनंतपूर हीं ठाणीं पुन्हां काबीज करून बिदनुरास वेढा

घातला व तें शहर ता. ३० एप्रिल रोजीं घेतलें. त्या ठाण्यांत काळे व गोरे मिळून साडेतीन हजार इंग्रजी सैनिक व त्यांवरचे जनरल माथ्यूसुद्धां मोठमोठे गोरे अंमलदार त्यास सांपडले. त्या सर्वांस बिडया ठोकून त्यानें श्रीरंगपट्टणास पाठवून दिलें. नंतर त्यानें त्वरेनें घांटाखालीं उतरून समुद्रापर्यंतचा प्रदेश पुन्हां काबीज केला व होनावरचें ठाणें घेऊन ता. ४ मे रोजीं मंगलोरास वेढा घातला. त्या ठिकाणचे इंग्रज तीन महिनेपर्यंत इतक्या शिताफीनें व इतक्या शौर्यानें लढले कीं, टिपूजवळ लाख फौज असतांही त्याचा कांहीं उपाय चालेनासा झाला. आगष्टच्या प्रारंभीं उभयपक्षाच्या संमतीनें गोळागोळी बंद होऊन तहाचा करार ठरला; परंतु तोही करार टिपूकडून मोडला गेल्यामुळें पुन्हां निकराची लढाई सुरू झाली, ती पुढल्या वर्षाच्या जानेवारी अखेरपर्यंत चाललीच होती. शेवटीं त्या पराक्रमी इंग्रजांनीं उपासमारीमुळें निरुपाय होऊन तें ठाणें टिपूच्या हवालीं केलें. मंगलोरास दुसरें नांव कोडयाळ असें आहे व प्रस्तुत प्रकरणांत पत्रें छापिलीं आहेत त्यांत हेंच नांव आलें आहे. टिपूच्या सरदारांपैकीं या पुस्तकाच्या वाचकांच्या विशेष ओळखीचा सरदार महमदअल्ली कुमदान यावर या मंगलोरच्या वेढ्यांतच कांहीं तोहमत येऊन टिपूनें त्यास ठार मारविलें.

करवीरकरांसंबंधें या दोन सालांत विशेष कांहीं घडलें नाहीं. त्यासंबंधें या प्रकरणांत थोडे उल्लेख आले आहेत त्यांत महादजी शिंद्यांशीं मागें तह झाला त्यावेळीं महाराजांचा अकरा लक्ष रुपयांचा कतबा व दुसऱ्या कांहीं चिठ्ठ्या शिंद्याकडे अडकल्या होत्या, त्या करवीरकरांनीं सोडवून घेतल्या; पण त्याच्या मोबदला म्हणून करारपत्रें पेशव्यांस लिहून द्यावीं तीं दिलीं नाहींत; अशा अर्थाचे उल्लेख आहेत. पुढच्या वर्षाच्या प्रारंभीं परशुरामभाऊनीं सामानगडाकडे स्वारी केली तिचें कारण हेंच असावें. या दोन वर्षांतली

विशेष गोष्ट म्हटली म्हणजे ता. २१ ऑक्टोबर १७८३ रोजीं भूधरगड परशुरामभाऊंच्या हातीं आला ही होय. भूधरगडच्या गडकऱ्यांनीं महाराजांच्या सरकाराशीं विरुद्ध होऊन बंड केलें होतें. पुढें त्या गडकऱ्यानीं बंडांत आपला निभाव लागणार नाहींसें पाहून तो किल्ला चिकोडीचे जमीदार आपाजी शामजी यांचे हवालीं केला, आणि त्यानीं तो परशुरामभाऊंच्या हवालीं केला. या किल्ल्यावर सन १७६३ पासून गोविंद हरींचा डोळा होता असें या पुस्तकाच्या पहिल्या भागांत नं.१८८ चें पत्र छापिलें आहे त्यावरून दिसतें.ती त्याची इच्छा त्याच्या पुतण्यानें म्हणजे परशुरामभाऊनीं वीस वर्षांनीं तडीस नेली !

या प्रकरणाच्या अखेरीस बंदिखान्यांतील बंदिवानांची याद व बंदिवानासंबंधाच्या कांहीं चिठ्ठया छापिल्या आहेत त्या मनोरंजक असून ऐतिहासिक दृष्टीनें फारच महत्वाच्या आहेत. याद मात्र स० १७८३ सालांतली आहे. पण बाकीच्या चिठ्ठया त्या वर्षीं लिहिलेल्या आहेत असें नाहीं. त्या १७८० पासून १७९० पर्यंतच्या दहा सालांत निरनिराळ्या वेळीं लिहिलेल्या आहेत. त्या यादींत व चिठ्ठयांत मोठ्या टाइपांत छापलेला मजकूर आहे तो सर्व गंगाधरराव गोविंद उर्फ बाळासाहेब यांच्या हातचा आहे. त्या मजकुरावरून मनांत अनेक प्रकारचे विचार सुचतात व त्या वेळची लोकस्थिति डोळ्यांपुढें उभी राहते. सरकारी सारा देण्याला चुकवाचुकव करणारे रयत व वसूल झालेल्या ऐवजाची अफरातफर करणारे गांवकामगार यांजवर बाळासाहेबांची फार करडी नजर होती. हें त्या चिठ्ठयांवरून दिसून येईल. पण त्याबरोबर हेंही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, त्या वेळीं कुळांच्या नांवानें खातीं केलेल्या जमिनी नव्हत्या. सर्व जमिनी सरकारी होत्या. त्याकरितां घरदार, जंगम इस्टेट विकण्याचा ह्या काळीं संप्रदाय नव्हता. जमिनीवर कुळाची मालकी नाहीं व त्याची जंगम इस्टेट

विकावयाची नाहीं; मग कुळापासून सारा वसूल करावयास मामलेदाराजवळ देहदंडाशिवाय कोणचें साधन राहिलें? फौजदारी गुन्हे करणाऱ्यांना जें शासन केल्याचें या चिठ्ठ्यांतून दाखविलें आहे त्यावरून सुद्धां मन अनेक दिशांनीं विचार करावयास लागतें. असो. या प्रकरणांत चिठ्ठ्या छापल्या आहेत तशाच मासल्याच्या किल्ल्याचा व तालुक्याचा बंदोबस्त, हशम ठेवणूक, दळणवळणाचे मार्ग, व्यापारधंदे, सामाजिक स्थिति, विद्या व तिचा प्रसार, ग्रामण्यें, धार्मिक समजुती, जातिनिर्बंध वगैरे अनेक विषयांवर आणखी पुष्कळ चिठ्ठ्या आम्हांजवळ आहेत, त्या सवडीसवडीनें आम्ही छापून काढूं.

---

नं. २६५३. श्री.

*यादी भागव(ता)चे श्लोक ल्याहावयाची.

१४ कपिलोक्तध्यानं—संचिंतये- १ निवृत्ततर्षैरुपगीय
 द्भगवतश्च (स्कं. १० अ. १ श्लो. ४)
 (स्कंध ३ अध्याय २८ श्लोक १ विष्णोर्नुवीर्यगणनां
 २१ ते ३४) (स्कं. २ अ. ७ श्लो. ४०)
१४ कुमारस्तुति—एवं तदेव. १ अशेषसंक्लेशशमं
 (स्कं. ३ अ. १५ श्लो. ३७ ते ५०) (स्कं. ३ अ. ७ श्लो. १४)

* सवाई माधवरावांच्या लहानपणीं त्यांच्या वाचनाकरितां नानाफडनवीस यांनीं बापूजी गोविंद गोखले नांवाच्या व्युत्पन्न कारकुनाकडून भारत व भागवत यांच्या सारांशरूपानें बखरी लिहविल्या होत्या व भागवताच्या बखरींत घालण्याकरितां त्या ग्रंथांतले श्लोक निवडून त्यांची याद स्वतः तयार केली होती, ती ही याद होय. ही सर्व याद नानांच्या स्वदस्तुरची असून मोडी लिपींत आहे. प्रत्येक श्लोकाखालीं स्कंध, अध्याय व श्लोक दिले आहेत ते मूळ यादींत नाहींत. वाचकांस स्वतः ग्रंथ काढून तो तो श्लोक पहातां यावा म्हणून ही सोय आम्हीं केली आहे; व ही आम्हांस करतां आली याचें सर्व श्रेय श्री. रा. बाळासाहेब मिरजकर यांस आहे.

( पृष्ठ ३६६५ पहा. )

| | |
|---|---|
| १ पुंणश्च कामाय विवि ( ? ) | १ न नाकपृष्ठं नच. |
| (पूर्णकामावपि युवां. स्कं. १० अ० ८९ श्लो. ६० ) | ( स्कं. ६ अ. ११ श्लो. २५ ) |
| १ तेनस्मरंत्यतितरां | १ अजातपक्षाइव |
| ( स्कं. ४ अ. ९ श्लो. १२ ) | ( स्कं. ६ अ. ११ श्लो. २६ ) |
| १ सकृन्मनःकृष्ण | १ ममोत्तमश्लोक. |
| ( स्कं. ६ अ. १ श्लो. १९ ) | ( स्कं. ६ अ. ११ श्लो. २७ ) |
| १ नैवंविधःपुरुषकार | १ न निष्कृतैरुदितैर्ब्रह्म |
| ( स्कं. ५ अ. १ श्लो. ३५ ) | ( स्कं. ६ अ. २ श्लो. ११ ) |
| १ यत्पादपंकजपलाश | १ नैकांतिकं तद्धिकृतेपि |
| ( स्कं. ४ अ. २२ श्लो. ३९ ) | ( स्कं. ६ अ. २ श्लो. १२ ) |
| १ कृच्छ्रो महानिह. | १ यन्नाम श्रुतमनु |
| ( स्कं. ४ अ. २२ श्लो. ४० ) | ( स्कं. ५ अ. २५ श्लो. ११ ) |
| १ अहंहरे तवपादैक. | १ मन्येधनाभिजनरूप |
| (स्कं. ६ अ. ११ श्लोक. २४) | ( स्कं. ७ अ. ९ श्लो. ९ ) |

---

( पृष्ठ ३६६४ वरून समाप्त. )

कारण कीं श्रीमंतांनीं भागवतांतल्या श्लोकांची सूचि तयार करविलीं आहे, ती पाहूनच या यादींतल्या श्लोकांखालीं आम्ही स्कंध, अध्याय व श्लोक दिले आहेत. श्रीमंतानीं भागवताप्रमाणेंच भारत, रामायण, अध्यात्मरामायण, योगवासिष्ठ, गणेशपुराण यांतल्या व मराठी कवि मोरोपंत, तुकाराम, मुक्तेश्वर, एकनाथ यांच्या ग्रंथांतल्या पद्यांच्या सूची तयार करविल्या आहेत. वर भागवतांतल्या श्लोकांची याद दिली आहे, हींतले बहुतेक श्लोक भगवत्प्रार्थनापर व कांहीं ध्यान व भक्तिमाहात्म्य वर्णन करणारे आहेत. सर्व श्लोक उत्कृष्ट आहेत हें सांगणें नकोच. हे श्लोक नानांच्या नित्यपाठांतले असावे असें वाटलें. पूर्वी असे निवडक श्लोक लहानपणींच मुलांस शिकविण्याची वहिवाट होती.

१ मोडीवरून हा श्लोक असा दिसतो, पण असा श्लोक भागवतांत नाहीं. या पाठाला सर्वांत जवळचा श्लोक वाटला तो येथें दिला आहे.

१ त्रिप्रादीषद्गुण
( स्कं. ७ अ. ९ श्लो. १० )
१ नैवात्मनः प्रभुरयं
( स्कं. ७ अ. ९ श्लो. ११ )
१ सोहं प्रियस्य सुहृदः
( स्कं. ७ अ. ९ श्लो. १८ )
१ यत्पादपद्ममकरंद
( स्कं. ८ अ. २३ श्लो. ७ )
१ चित्रंतवेहितमहो
( स्कं. ८ अ. २३ श्लो. ८ )
१ यत्पादयोरशठधी
( स्कं. ८ अ. २२ श्लो. २३ )
१ ततःसुपर्णांस
( स्कं. ८ अ. १० श्लो. ५४ )
१ तस्मिन्प्रविष्टे
( स्कं. ८ अ. १० श्लो. ५५ )
१ असदाविषयमंघ्रिं
( स्कं. ८ अ. १२ श्लो. ४७ )
१ एतन्मुहुः कीर्तयतो
( स्कं. ८ अ. १२ श्लो. ४६ )
१ त्वय्यंबुजाक्षाखिल
( स्कं. १० अ. २ श्लो. ३० )
१ स्वयंसमुत्तीर्य सुदुस्तरं
( स्कं. १० अ. २ श्लो. ३१ )
१ येन्येरावेंदाक्ष
( स्कं. १० अ. २ श्लो. ३२ )
१ तथान ते माधव तावकाः
( स्कं. १० अ. २ श्लो. ३३ )
१ सत्वं न चेद्धातरिदं
( स्कं. १० अ. २ श्लो. ३५ )
१ शृण्वन् गृणन्संस्मरयंश्च
( स्कं. १० अ. २ श्लो. ३७ )
१ मत्स्याश्वकच्छपनृसिंह
( स्कं. १० अ. २ श्लो. ४० )
१ तमद्भुतं बालकमंबुजेक्षणं
( स्कं. १० अ. ३ श्लो. ९ )
१ महार्हवैडूर्यकिरीट
( स्कं. १० अ. ३ श्लो. १० )
१ इत्थं सतां ब्रह्मसुखानुभूत्या
( स्कं. १० अ. १२ श्लो. ११ )
१ यत्पादपांसुर्बहुजन्म
( स्कं. १० अ० १२ श्लो. १२ )
१ यशः श्रियामेव परिश्रमः
( स्कं. १२ अ. १२ श्लो. ५३ )
१ अविस्मृतिः कृष्णपदारविंदयोः
( स्कं. १२ अ. १२ श्लो. ५४ )
१ वाणीगुणानुकथने
( स्कं. १० अ. १० श्लो. ३८ )

| | |
|---|---|
| १ नैतद्विचित्रं मनुजार्भमायिनः (स्कं. १० अ. १२ श्लो. ३८) | १ अंतर्भवेनंतभवंतमेव ( स्कं. १० अ. १४ श्लो. २८) |
| १ सकृद्यदंग (स्कं. १० अ. १२ श्लो.३९) | १ अथापि ते देवपदांबुज (स्कं. १० अ. १४ श्लो. २९ ) |
| १ बिभ्रद्वेणुं जठरपटयोः (स्कं. १० अ. १३ श्लो. ११) | १ तदस्तुमेनाथ (स्कं. १० अ. १४ श्लो.३० ) |
| १ नौमीड्यतेभ्रवपुषे ( स्कं. १० अ. १४ श्लो. १ ) | १ समाश्रिता ये पदपल्लव (स्कं. १० अ. १४ श्लो. ५८) |
| १ अस्यादिदेववपुषो ( स्कं. १० अ. १४ श्लो. २ ) | १ तवावतारो यमधोक्षजेह ( स्कं. १० अ. २७ श्लो. ९ ) |
| १ ज्ञानेप्रयासमुदपास्य ( स्कं. १० अ. १४ श्लो. ३ ) | १ यर्ह्यंबुजाक्षतवपादतलं (स्कं. १० अ. २९ श्लो. ३६) |
| १ श्रेयःसृतिं भक्तिमुदस्यते ( स्कं. १० अ. १४ श्लो. ४ ) | १ श्रीर्यत्पदांबुजरजश्चकमे ( स्कं. १० अ. २९ श्लो. ३७) |
| १ पुरेहभूमन्बहवोपि ( स्कं. १० अ. १४ श्लो. ५ ) | १ राजन्पतिर्गुरुरलं ( स्कं. ५ अ. ६ श्लो. १९ ) |
| १ तथापि भूमन्महिमागुणस्य ( स्कं. १० अ. १४ श्लो. ६ ) | १ कुतोशिवंत्वच्चरणांबुजासवं ( स्कं. १० अ. ८३ श्लो. ३ ) |
| १ गुणात्मनस्तेपि ( स्कं. १० अ. १४ श्लो. ७ ) | १३ मुचकुंदाची स्तुति (स्कं.१०अ.५१श्लो.४७ ते ५९ ) |
| १ तत्तेनुकंपां सुसमीक्षमाणो ( स्कं. १० अ. १४ श्लो. ८ ) | १ येतुत्वदीयचरणांबुज ( स्कं. ३ अ. ९ श्लो. ५ ) |
| १ अत्रैव मायाधमनावतारे ( स्कं. १० अ. १४ श्लो. १६ ) | १ सोहंतवांघ्र्युपगतोस्म्यसतां ( स्कं. १० अ. ४० श्लो. २८) |

१ दृष्टं तवांघ्रियुगुलं
( स्कं. १० अ. ६९ श्लो. १८)
१ तद्देवदेवभवतश्चरणारविंदं
( स्कं. १० अ. ७२ श्लो. ५)
१ त्वत्पादुके अविरतं
( स्कं. १० अ. ७२ श्लो. ४ )
१ न ब्रह्मणःस्वपरभेद
( स्कं. १० अ. ७२ श्लो. ६ )

नं. २६५४. श्री.

राजश्री वासुदेवपंत मुक्काम मिरज गोसावी यांसी–

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित सुभराऊ निंबाळकर रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. बहुता दिवशीं पत्र पाठविलें तें पाहून लिहिला मजकूर सविस्तर निवेदन जाहला. तेथें लिहिलें जे, " राजश्री सरदेसाई कांहीं जमाव करून फिरंगी यांची कुमक आणवून श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांच्या तालुक्यास उपद्रव करावा ऐसा मनसबा योजिला " म्हणून लिहिलें, तर लिहिला मजकूर आज दिवसपर्यंत दृष्टीस पडोन आला नाहीं. उगाच अभाव मानावा ऐस नाहीं. श्रीमंतांचा व इकडील घरोबा असतां अशा गोष्टी घडोन येतील हा भरंवसा आम्हास दिसत नाहीं. उगेच संशय वागवावा ऐसा अर्थ नाहीं. घडीघडी पत्र पाठवून वर्तमान कळवीत असावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं. २६५५. –२३ जानेवारी. )

वापूजी बल्लाळ जोशी यांचें पुण्याहून मिरजेस गंगाधरराव यांस पत्र. माघ शु॥ ९ चें–

---

१ पत्र सावंतवाडीहून.

" इंग्रजाचे वकील आले आहेत. प्रथम दिवसच आहे. अद्यापि बोलणें चालणें याचा नाद बाहेर फुटला नाहीं. दोन वेळ खलबत जालें. नाना लष्करांत गेले होते. सरकारच्या चौक्या बाहेरून गणेशखिंडीपावेतों बसविल्या आहेत. राजश्री भवानी शिवराम यांस काशीचे राजाचे मदतीस रवाना केलें. ते काल संगमावर डेरेदाखल जाले. " पांच लाख रुपये राजानें निघावयाचे समयीं सरंजामाचे तयारीसाठीं द्यावे, पुढें फौजा जमा जाहल्या म्हणजे रुपये खर्चास द्यावे" याप्रमाणें वर्तमान ऐकिलें तें लिहिलें आहे. "

नं. २६५६. श्रीगणपति. ( माघ व० २–३१ जाने० )

चिरंजीव[1] राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. छ० १६ सफर वर्तमान यथास्थित असे विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. " पश्चिमेकडील घांटास धर लागत नाहीं. वाळू लागली. तेव्हां येथील कारेगार चुन्याच्या कळ्या भाजून पायांत घालून मोठे मोठे चिरे घालून काम उठवावें म्हणतात. त्यास याचा शोध तेथें चार कारेगार असतील त्यांस पुसोन करावा " म्हणून लिहिलें, त्यास पंढरपुरीं होळकराचा वाडा बांधला व रामचंद्रपंतमामा कैलासवासी यानीं देऊळ बांधिलें त्यास वाळवेचा धर लागला तेव्हां चुन्याच्या कळ्या भाजून मोठे मोठे चिरे घालून काम उठविलें असें सांगतात. आपणही तसें केल्यास चिंता नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें तासगांवाहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

नं. २६५७. श्री.

यादि बारगीर.

| | |
|---|---|
| २३२० गोविंद सखदेव. | २५५० खंडेराव फराटे. |
| १२०० खासा तैनात सालिना. | १३५० खासा तैनात सालिना. |
| १००० पालखीस. | १००० पालखीस. |
| १२० कापड आंख ३००. | २०० कापड आंख ५००. |
| २३२० | २५५० |

१ ही मिरजकर पटवर्धनांच्या खास मागेच्या बारगिरांची याद आहे. या बारगिरांना बसायला घोडीं सरकारचीं, हत्यारें यांचीं असलीं तरी दारूगोळी सरकारची, व पोषाखाबद्दल कापडही सरकारचेंच. शिवाय यांस तैनात मिळून कोणाकोणास गडी, आचारी, ब्राह्मण दिलेला होता. ही याद अपूर्णच आहे, परंतु जेवढी येथें दिली आहे तेवढीवरून सुद्धां मराठी सैन्याच्या रचनेची कल्पना होण्याजोगी आहे. या यादींत ६८ बारगीर असून त्यांस कापड वगैरे सुद्धां तैनात २२४०० रु. देण्यांत येत होती. या हिशेबावरून माणशीं सरासरीचें प्रमाण तीनशें साडेएकूणतीस रुपये वसतें. या ६८ लोकांत तीन असामी मानकरी सरदार आहेत त्यांची तैनात प्रत्येकीं अडीच हजारांवर आहे. त्यांत दोन मराठे व एक ब्राह्मण आहे. बाकी पासष्ट असामींत १० ब्राह्मण, २३ मराठे, ४ रजपूत, २६ मुसलमान व २ मांग आहेत. तैनातींच्या वांटणीचें प्रमाण या पासष्ट असामींपुरतें पाहिलें तर यांत पांचशेंपासून आठशेंपर्यंत तैनात घेणारे तिघे आहेत ते सर्व ब्राह्मण आहेत. चारशेंपासून पांचशेंपर्यंत घेणारे सहा आहेत त्यांत १ ब्राह्मण, ४ मराठे व १ मुसलमान आहे. तीनशेंपासून चारशेंपर्यंत घेणारे ५ आहेत त्यांत २ मराठे व ३ मुसलमान आहेत. दोनशेंपासून तीनशेंपर्यंत घेणारे १७ आहेत त्यांत २ ब्राह्मण, ६ मराठे, ७ मुसलमान व २ रजपूत आहेत. शंभरापासून दोनशेंपर्यंत तैनात घेणारे ३० आहेत त्यांत ४ ब्राह्मण, ८ मराठे, १४ मुसलमान, २ रजपूत व २ मांग आहेत. शंभरांखालीं

( पान ३६७१ पहा. )

२६८० उतराजी गोडसे.

१००० जाजती सालिना नालबंदी.

१००० पालखीस.

४८० रोजमुरा दरमहा रुपये ४० प्रमाणें.

२०० कापड आंख ५००.

———

२६८०

७८० कान्हो माणकेश्वर ८०७.

६०० खासा तैनात सालिना.

१०० माणसें असामी २ एकूण.

८० कापड आंख २००.

———

७८०

२७ शेत जमीन ।·

२६९ अमृतराव वेंकाजी.

१२५ नालबंदी सालिना

१४४ रोजमुरा दरमहा १२ रु. एकूण.

———

२६९

१०७ गंगाधर सदाशिव.

४६० गोविंदराव सोसकर.

२०० नालबंदी सालिना.

१८० रोजमुरा दरमहा रु० १५.

८० कापड आंख २००.

———

४६०

---

( पान ३६७० वरून पुढें चालू. )

तैनात घेणारे ४ आहेत त्यांत ३ मराठे व १ मुसलमान आहे. हे मराठी पागेचे ६८ बारगीर आहेत. यांत २५ मराठे आहेत तर २६ मुसलमान आहेत! तरी हिला मराठ्यांची पागा हें नांव आहेच! पटवर्धनांच्या पागांचे व पथक्याचे तैनात जाबते, गोटगणत्या, शिलेदारांच्या यादी, हशमांच्या व गारद्यांच्या हाजिऱ्या; वराता वगैरे सहस्रावधि कागद आम्हीं वाचून पाहिले आहेत त्यावरून आमची खात्री झाली आहे कीं, ज्यांना मराठी फौजा म्हणतात त्या फौजांत निदान एकचतुर्थांश तरी

( पान ३६७२ पहा. )

१४५ बचाजीराम.
१२५ सालिना नालबंदी.
२० कापड आंख ५०.
———
१४५

५१६ आपाजी दामोदर.
२०० सालिना तैनात.
१५६ रोजमुरे. दरमहा रु० १३ प्रमाणें.
६० कापड आंख १५०.
१०० माणसें असामी २ एकूण.
———
५१६

१५० सदाशिव राम.

१५० भगवंत टिकदेव.

४०० गंगाजी शिंदा.

३५४ कालेखान मंगळवेढेकर.
१५० नालबंदी.
१४४ रोजमुरे १२.
६० कापड आंख १५०.
———
३५४

१६५ चांदखान.
७५ नालबंदी.
६० रोजमुरे १२.
३० कापड.
———
१६५

---

( पान ३६७१ वरून पुढें चालू. )

मुसलमान होते. बाजारबुणग्यांत तर ते याहीपेक्षां अधिक असले पाहिजेत. मुसलमानांची वस्ती महाराष्ट्रांत सर्वत्र आहे. हिंदूंपेक्षां मुसलमानांत लष्करी पेशाचे लोक अधिक. त्या लोकांनीं त्या त्या देशच्या फौजांत चाकरी न धरावी तर कोठें जावें ? यावरून पानपतच्या मुक्कामीं मराठे व मुसलमान यांमध्यें युद्ध झालें तें धर्मयुद्ध म्हणून वर्णन करणाऱ्यांची केवढी चूक झाली आहे हें ध्यानांत येईल. हिंदूंच्या फौजेंत चौथाई मुसलमान लढत होते ते हिंदुधर्मासाठीं लढत नव्हते आणि प्रतिपक्षाकडे रोहिल्यांच्या फौजेंतले तद्देशी रांगडे रजपूत व सुजाउद्दौल्याच्या फौजेंतले गोसावी वगैरे दहा पंधरा हजार हिंदु लढत होते ते मुसलमानी धर्मासाठीं लढत नव्हते ! हे रजपूत व गोसावी लढतांना ' दिन् दिन् ' म्हणून गर्जत नव्हते आणि होळकराचे पठाण व इब्राहिमखानाचे गारदी हेही ' हरहर महादेव ' म्हणून आरोळी ठोकीत

( पान ३६७३ पहा. )

४१२ देवजी मल्हार.
३०० तैनात सालीना.
२० कापड आंख ५०.
९२ शेत सनदी.
———
४१२

२०२ मल्हारराव देवाजी.
१०० नालबंदी.
१२ रोजमुरे १२.
५० माणूस.
४० कापड आंख १००.
———
२०२

८३ शिवाजी पवार.
३५ नालबंदी.
४८ रोजमुरे १२.
———
८३

२४६ मनाजी नगारजी.
११० नालबंदी.
९६ रोजमुरे १२.
४० कापड आंख १००.
———
२४६.

२४६ इमाम नगारजी.

५८८ रामचंद्र रुद्र.
१६८ रोजमुरे १२.
२०० नालबंदी.
६० कापड आंख १५०.
१०० माणसें २.
६० ब्राह्मण.
———
५८८

---

( पान ३६७२ वरून समाप्त. )

नव्हते ! दिल्लीच्या बादशहाची दौलत रोहिले, सुजाउद्दौला वगैरे हिंदुस्थानी उमरावांनीं बळकावावी, कीं पेशवे, शिंदे, होळकर वगैरे दक्षिणी उमरावांनीं बळकावावी हा काय तो तंटा. त्यांत रोहिले वगैरे मुसलमानधर्मी नसते तरी एवढ्या मोठ्या प्रमाणावर पानपतचें युद्ध झालें नसतें असेंही नाहीं आणि द्रव्याच्या व लुटीच्या आशेनें काबुलाहून अबदाली त्यांच्या कुमकेस आला नसता असेंही नाहीं ! असो. या विषयावर आणखी किती तरी लिहावेंसें मनांत येतें; परंतु विषयांतर होईल म्हणून आमच्या मताचें इतकेंच दिग्दर्शन येथें केलें आहे. ज्या घरचे सगळे पुरुष मराठी फौजेंत होते अशीं मुसलमानांचीं घरें गांवोगांव होतीं. अशा एका घराण्याची थोडी हकीकत पुढच्याच नंबरांत छापलेल्या पत्रांत आहे.

१२५ हैबती हुलसार.
४५ नालबंदी.
६० रोजमुरे १२.
२० कापड आंख ५०

---

१२५

१२५ शेटी हुलस्वार.

३५१ इभरामजी हवालदार.
९६ रोजमुरे १२.
१०० माणसें. ( २ ? )
४० कापड.
११५ नालबंदी.

---

३५१

२७४ मनाजी हवालदार.
८४ रोजमुरे १२.
१०० नालबंदी.
४० कापड आंख १००.
५० पोरगा.

---

२७४

१३० दाऊदभाई हवालदार.
६० रोजमुरे १२.
५० नालबंदी.
२० कापड आंख ५०.

---

१३०

२८५ नूरखान हवालदार.
१२५ नालबंदी.
१२० रोजमुरे.
४० कापड आंख १००.

---

२८५

२७४ जनाजी माने.
८४ रोजमुरे १२.
१०० नालबंदी.
५० माणूस.
४० कापड आंख १००.

---

२७४

---

१ बिनी म्हणजे अघाडीची टोळी. बिनीची जी बिनी ती हूल. या हुलींत चालणारे जे स्वार ते हूलसार अथवा हूलस्वार. हे नेहमीं मांग व महार या जातींचे असत. 'हूल उठली' या मराठी वाक्याचा वास्तविक अर्थ "हुलीच्या स्वारांनीं हल्ला केला. तेव्हां आतां बिनी लगेच येणार, मागून लष्करही आलेंच समजावें. तात्पर्य, हें लहान अरिष्ट पुढच्या मोठ्या अरिष्टाचें सूचक आहे" असा व्हावा, पण हल्लीं अशा अर्थी या वाक्याचा प्रयोग करीत नाहींत.

९० जिवाजी लांडगे.
३६ रोजमुरे १२.
४० नालबंदी.
१४ कापड आंख ३५.
———
९०

९६ बहिरजी तोवा.
४० नालबंदी.
४२ रोजमुरे १२.
१४ कापड आंख ३५.
———
९६

१३० जिवाजी जाधव.
६० रोजमुरे १२.
५० नालबंदी.
२० कापड आंख ५०.
———
१३०

१०० उदाजी देशमुख.
४८ रोजमुरे १२.
५२ नालबंदी.
———
१००

१०० संताजी पांढरे.

१३० घुढणखान.
२० कापड ५०.
५० नालबंदी.
६० रोजमुरे १२.
———
१३०

२४८ जोरावरसिंग.
१०८ रोजमुरे १२.
१०० नालबंदी.
४० कापड आंख १००.
———
२४८

३१३ दत्ताजी पवार.
१०८ रोजमुरे १२.
१७५ नालबंदी.
३० कापड ७५.
———
३१३

१५५ मोरोजी जाधव.
६० रोजमुरा.
७५ नालबंदी.
२० कापड आंख ५०.
———
१५५

१४२ इमामखान सोलापूरकर.
७२ रोजमुरे.
२० कापड आंख ५०.
५० नालबंदी.
———
१४२

१४० रसूलखान.
६० रोजमुरे.
५० नालबंदी.
३० कापड.
———
१४०

१८९ महमद हुसेन.
८४ रोजमुरे.
७५ नालबंदी.
३० कापड आंख ७५.
———
१८९

१०० सैदखान नालबंदी व रोजमुरे.

७३ अबूशहा.
३६ रोजमुरे.
१२ कापड आंख ३०.
———
४८
२५ नालबंदी.
———
७३

१६७ मियाभाई.
७२ रोजमुरे.
७५ नालबंदी.
२० कापड आंख ५०.
———
१६७

१६५ सुभानजी कवडे.
६० रोजमुरे.
७५ नालबंदी.
३० कापड आंख ७५.
———
१६५

१०० राजेखान. सरसाल.

३३५ सर्ज्याराव जाधव.
१२० रोजमुरे.
१७५ नालबंदी.
४० कापड.
———
३३५

४४८॥ भिकनखान मंगळवढेकर.
२०० नालबंदी.
९६ रोजमुरे १२.
५० माणूस.
८० कापड आं. २००.
२२॥ शेत जमीन ।.
———
४४८॥

२३६ सखाराम रजपूत.
१०० नालबंदी.
९६ रोजमुरे १२.
४० कापड आंख १००.
———
२३६

२४८ महादजी भापकर.
१०० नालबंदी.
१०८ रोजमरे १२.
४० कापड आंख १००.
———
२४८

२२६ गंगाजी खैरे.
९० नालबंदी.
९६ रोजमुरे १२.
४० कापड आंख १००.
———
२२६

४१२ संताजी पांढरे.
२०० नालबंदी.
८० कापड आंख २००.
१३२ रोजमुरे १२.
———
४१२

२१४ पुनाजी पांढरे.
१०० नालबंदी.
८४ रोजमुरे १२.
३० कापड आंख ७५.
———
२१४

२८६ महमदखान बारशीकर.
१०० नालबंदी.
९६ रोजमुरे.
६० माणूस अबदागिऱ्या.
३० कापड आंख ७५.
———
२८६

२३६ फत्तेखान बारशीकर.
१०० नालबंदी.
९६ रोजमुरे १२.
४० कापड १००.
———
२३६

२३६ इमामखान मनोळीकर.
१०० नालबंदी.
९६ राजमुरे १२.
४० कापड १००.
———
२३६

२२४ महम्मदखान मनोळीकर.
१०० नालबंदी.
८४ रोजमुरे १२.
४० कापड आंख १००.

---

२२४

४०० सुलतानजी जगथाप.
२०० नालबंदी.
१२० रोजमुरे १२.
८० कापड आंख २००.

---

४००

३३० इभरामभाई.
१५० नालबंदी
१२० रोजमुरे १२.
६० कापड आंख १५०.

---

३०

२८३ हसमदुल्ला..
१२५ नालबंदी.
१०८ रोजमुरे १२.
५० कापड १२५.

---

२८३

१४२ सुलतानजी इतबारराऊ.
५० नालबंदी.
७२ रोजमुरे १२.
२० कापड आंख ५०.

---

१४२

१५४ मल्हारजी गाइकवाड.
८४ रोजमुरे १२.
५० नालबंदी.
२० कापड आंख ५०.

---

१५४

१३८ मानसिंग.
७२ रोजमुरे १२.
५० नालबंदी.
१६ कापड आंख ४०.

---

१३८

१५० गोविंदराव जगथाप.
६० नालबंदी.
६० रोजमुरे १२.
३० कापड आंख ७५.

---

१५०

१४४ भवानजी रजपूत.

७० रोजमुरे १२.

५० नालबंदी.

२४ कापड आंख ६०.

---

१४४

१३७ महमदखान अजगरेंकर.

६५ नालबंदी

४८ रोजमुरे १२.

२४ कापड आंख ६०.

---

१३७

१५७ मानेखान सरदार.

७२ रोजमुरे १२.

५५ नालबंदी.

३० कापड आंख ७५.

---

१५७

१६२ मोहिदीनखान वझरेंकर.

६० नालबंदी.

७२ रोजमुरे १२.

३० कापड आंख ७५.

---

१६२

१५० लाडखान.

६० रोजमुरे १२.

६० नालबंदी.

३० कापड आंख ७५.

---

१५०

१३७ हसनखान वरवडेंकर.

५५ नालबंदी.

६० रोजमुरे १२.

२२ कापड आंख ५५.

---

१३७

नं. २६५८. श्री. ( ज्येष्ठ–जून. )

करीना वे॥ बाबादीन मिरजकर सु॥ सलास समानीन मया व अल्लफ. कारणें लिहोन दिला करीना ऐसा जे. महमदूभाई व मिराभाई व अलीभाई व आम्ही व इमामदीन असे पांच जण भाऊ व एक बहीण एकत्र होतों. येकेरीचे सालीं लष्कराहून घरास आलों. मिराभाई जातीनें महादोबा बाबांस पुण्यास घालवून माघारे वसगडेंचे मुक्कामास

---

१ म्हणजे स० १७५५ या वर्षी. एकेरी हें म्हैसूरच्या राज्यांत विदनूर सुभ्यापैकी ठाणें होतें तें मराठ्यांनीं या वर्षी घेतलें होतें. २ पुरंदरे.

आले. अल्लीभाई लष्कराहून घरास येतांच वसगडेस जाऊन राहिले होते. त्यांणीं सुजालखानाचा आसरा करून मिराभाईस आपले वांटणीचा फडशा करून मिरजेस जाणें म्हणोन द्वाही घालोन राहविलें. तेव्हां मिराभाईनें आम्हास बोलावूं पाठविलेवरून आम्ही तिघे भाऊ व आमची आई व मिराभाईची बाइको व घोडीं घेऊन महमदूभाईचे बाइकोस मात्र घरीं ठेवून वसगडेस गेलों सुजालखान जमादार यानीं गांवकर चवघे बसवून आमच्या वांटण्या करून दिल्या. ते वेळेस आम्हांजवळ दोन मातबर घोडीं व पांच मदभरण्याचीं एकूण सात घोडीं आम्हांजवळ होतीं. पांचपैकीं एक महमदूभाईस व एक मिराभाईस-दोघांस दोन घोडीं दिलीं व अल्लीभाईस एक वांटणीचें व एक त्याचे लग्नाचें, एक बहिणीचें लग्न तुम्हींच करून देणें म्हणून, ऐशीं पांचपैकीं तीन घोडीं अल्लीभाईस दिलीं. आम्हास व इमामदिनास लग्न व वांटणी मिळून दोघांस दोन मातबर घोडीं दिलीं, तशीच चीजवस्त वांटून दिली. अल्लीभाई वसगडेस घर बांधून राहिले. आम्ही चौघे भाऊ आईस घेऊन मिरजेस आलों. मिराभाई व महमदूभाई वेगळे वेगळे राहिले. आम्ही उभयतां आईजवळ राहिलों. पुढें महमदापुरची चाकरी आली. तेव्हां महमदूभाई यानीं इमामदीन थोर होय तोंपावेतों अर्धेवळ[2] तुम्हास देत जाऊं म्हणून आईजवळ घोडीं मागून घेतलीं. मिराभाई व सातापा आरगे याची या राना बहुत बसणें उठणें एका जागां. त्यांजकडे देणें घेणें करून नालबंदी त्यास देऊन पुढें उभयतांच्या घरचा खर्च आरग्यानीं चालवावा, असा करार करून महमदपुरास गेले. तेथून बागलकोट घेऊन सावनुरास गेलों. तेव्हां मिराभाई व महमदूभाई व अल्लीभाई वेगळेवेगळे राहुटी देऊन लष्करांत राहत होते. आम्ही एक घोडी घेऊन शिलेदाराप्रमाणें मिराभाईजवळ राहत होतों. हें सारें मिरज मंडळीचे शिलेदार

१ मध्यम प्रतीचीं. २ अर्धेली. अर्धी तैनात.

थानीं पाहिलें आहे. इमामदिनाची घोडी महमदूभाईजवळली चोरीनें गेली. पुढें श्रीमंतांनीं सावनूर घेतलें. आम्ही घरास आलों. 'घोडी चोरीनें गेली म्हणोन फिकीर न करणें. इमामदिनाचें लग्न करून घोडी घेऊन देऊं,' म्हणून महमदूभाईनीं आईची खातरजमा केली. पुढें आम्ही चौघे भाऊ सातापा आरग्यास घेऊन पुण्यास गेलों. नालबंदी घेऊन सातापा आरग्या व मिराभाई घरास आले. आम्ही व अल्लीभाई व महमदूभाई लष्कराबरोबर ( श्रीरंग ) पट्टणास गेलों. मिराभाईनें सातापा आरग्याचा हिशेब करून नालबंदी देऊन आमची घोडी त्यास द्यावी असा करार करून त्याचा गडी घेऊन पट्टणास येऊन मिळाले. 'आम्ही घोडी देत नाहीं,' म्हणोन चार दिवस आमची त्याची बोलाबोली जाहली. "रान वाईट. नाहक इमामदिनाच्या घोडीची गत होईल. चारशें रूपयेस तुमचें लग्न करूं. दोनशें रूपयेस घोडी घेऊन देऊं" म्हणून सांगून घोडी माणसाचे हवालीं करून आम्हास आपला घोडा बसावयास दिला पुढें कडप्यावर बळवंतरायाचे निसबतीस छावणीस राहिलों, पुढें देशास फौजेबरोबर दोन वर्षांनीं माघारे आलों. येडूरचे मुक्कामास सातापा आरग्यानीं येऊन गांठ घातली. शिलेदाराची आमची मिळोन रवानगीचे रुपये एकवीसशें घेऊन आले होते. ते आमचे हवालीं करणें. आम्हाकडूनच लोकांस देवणें म्हणून ऐवज हाताखालीं घेऊन मिरजेस आला. येथें रूपये मागितलेवर आमचा 'फडशा करून देऊन बाकी ऐवज राहील तो देऊं' ऐसें म्हणतांच शिलेदारांची कटकट पडली. तेव्हां मिराभाईची व आरग्याची पंचायत जाहली. एकोणतीसशें रुपये देणें ठरलें. त्यांत एकवीसशें रुपये वजा करून बाकी आठशें रुपयेची निशा सेकुभाईकडे करून देऊन आरग्याचा तनखा तोडून बसापा महाजन याजपाशीं कर्ज घोडीं दोन घेऊन पुण्यास गेले. एक सालीं स्वारी राहिली. दुसरे सालीं निजामअलीची लढाई होऊन पानपतावर जाऊन

---

१ मेहेंदळे. सन १७५७ सालीं. २ उद्गीरची लढाई.

बुडाले. अशास आम्ही वेगळे जाहल्यावर तीन वर्षांनीं बसापाजवळ कर्ज घेतलें याचा दाखला बी तपशील—

१ सुजालखान जमादार व चौघे गांवकर मिळोन वांटण्या करून दिल्या हें खरें कीं खोटें, पुढें किती वर्षांनीं पाणपत जाहलें, हें शपथपुरःसर वसगडयाहून लिहोन आणवावें. कलम.

१ आम्ही वेगळे जाहल्यावर सावनूर व पट्टण व कडप्याची छावणी ऐशा तीन मुलुखगिऱ्या जाहल्या, तेथें महमदूभाई व अल्लीभाई व मिराभाई वेगळे राहत होते. याची साक्ष शिलेदार ते वेळचे जे असतील त्यांचे हातून पुरवून देऊं. बसापाचें कर्ज घेतल्यावर कांहीं कर्नाटकांत स्वारी गेली नाहीं. बसापाचें कर्ज घेतल्यावर दोन महिन्यांत आमची व हसनखान पठाण याची कलागत होऊन पुण्यास गेले ते फिरोन मिराभाई कांहीं मिरजेस आले नाहींत. महमदूभाई इसलामपुरास व अल्लीभाई वसगडेंत आणि आम्ही व इमामदीन मिरजेंत राहिलों. कलम.

---

२

येणेंप्रमाणें जाहला करीना सेवेसीं लिहिला आहे. विदित होय. याखेरीज आमचे घरचें कच्चें वर्तमान साताणा आरगे यास माहीत आहे. त्याजवळ उचापतीच्या वह्याही असतील त्या आणून पहाव्या. वेगळे जाहले होते कीं नव्हते हें शपथपूर्वक विचारावें.

नं. २६५९. श्रीगणराज. ( चैत्र शु० १–१४ मार्च. )

राजश्री वासुदेव सदाशिव स्वामी गोसावी यांसः—

विनंति उपरी. शिरहट्टीकर देसाई याचीं मुलेंमाणसें वगैरे किल्ले मिरज येथें अटकेंत होतीं तीं बाहेर शहरांत मल्लापा त्रिन होनापा पुर्वे

याच्या वाड्यांत ठेवावीं येविशींचा जिवाण्णा नाईक नरगुंदे यांचे विद्यमानें करार जाहला; त्यावरून बाहेर पाठविलीं. नांवनिशी बी तपशिल—

| देसाई याजकडील | किता असामी. |
|---|---|
| ३ बाइका | ७ मुरराव वगैरे ब्राह्मण मंडळी |
| १ पुत्र | ७ नि॥ केंचाप्पा दळवाई खुद्दसुद्धां |
| ४ देसाई याचे शरीरसंबंधी | २ किरकोळ असामी |
| ३ बाइका | १ तिमाण्णा |
| १ मूल | १ केंच बसाप्पा |
| — | — |
| ४ | २ |
| १ कुणबीण | १ हुसेन तेली. लक्ष्मेश्वर |
| ३ चाकरमाणसें | —— |
| —— | १७ |
| १२ | |

येणेंप्रमाणें असामी एकूणतीस बाहेर नेऊन मल्लापाचे वाड्यांत चौकशीनें अटकेंत ठेवणें. चौकी पहाऱ्याची बंदोबस्ती पक्की असों देणें. किल्ल्याचे दरवाजास चिठी अलाहिदा आहे. रा॥ छ० २९ रबिलावल. ॥ इसन्ने समानीन मय्या व अल्लफ. चांगली बंदोबस्ती करून कैदेंत बाहेर सदरहू लिहिलेप्रमाणें ठेवणें हे विनंती.

नं. २६६०. ( १९ मार्च. )

विसाजी नारायण वाडदेकर याचें पुण्याहून चैत्र शु० ५ चें पत्र बाळासाहेबांस मिरजेस:—

" इंग्रजाचा वकील वस्त्रें घेऊन परत गेला. तह जाहला नाहीं. आजच वर्तमान ऐकिलें कीं, दुसरा वकील सख्य करावयास येतो.

श्रीमंतांचें लग्न वैशाख मासीं होणार होतें, परंतु राहिलेंसें जाहलें आहे. कोण मजकूर जाहला हें न कळे. परंतु तर्क माझ्या दिसतें कीं, इंग्रजाचा बिघाड, व अविंध फौजसुद्धां लग्नास येणार, व भोंसले लग्नास फौजसुद्धां येणार. कोण दिवस कसा आहे, यास्तव राहिलेंसें केलें असेल. लोकही असेंच बोलतात. राजश्री बहिरोपंत मेहंदळे टोंक्यास थत्ते यांची मुलगी पहावयास गेले आहेत. "

नं. २६६१. श्री ( ज्येष्ठ-जून. )

याद[1] ऐवज सरकारांत घ्यावयाचा. पथक राजश्री रघुनाथराव नीलकंठ सुरूसन सल्लास समानीन मया व अल्लफ.

| | | |
|---|---|---|
| १९१३२४॥÷ | सरंजाम दुसाली इं॥ सन इसन्ने समानीन तां॥ सन मजकूर. येकंदर रुपये ९५०००० पैकीं | बाकी रुपये २५७१८९८॥ |
| ३००० | जातीच्या तैनाता सन सबा[2] सबैनच्या. | पैकीं वजा हरी बल्लाळ फडके यांजबाबद रद कर्ज २८१२५ रुपये |
| ४८३९२।॥ | दहक. | बाकी रुपये २२९०६४८॥ |
| ३०५८० | लग्नपट्टी. | दरबारखर्चाची वांटणी रुपये ८९३२॥।॥ |
| | २४९२१ पथकाची. | पैकीं वसूल आले रुपये १३७७४॥ |
| | ५६५९ खास.सरंजाम. | |
| | ३०५८० | |

१ ही याद अपूर्ण आहे. कारण दिलेल्या हिशेबावरून सुद्धां सरकारी बाकी २३२४०५॥।' निघते ती येथें काढून दाखविलेली नाही. २ इस्तकबिल. ३ तागायत

२०१४ नहरपट्टी.
६२१४०॥ खास सरंजाम.
२३३१॥≡। दादासाहेब पट्टी रु. २५००० पैकीं.

३३९७८३८॥।
तपशील—
६७७९९॥ खास सरंजाम.
२९१९८३॥-॥। पथक मजकूर सरंजाम.

३३९७८३८॥।
पैकीं सरकारांतून मंजुरा आले रुपये.
५०००० सन तिस्सा सब्बैनांत परशुराम रामचंद्र यांसी देविले ते दिल्हे.
३०५८० लग्नपट्टी.
२०१४ नहरपट्टी.

८२५९४

बाकी येणें. फाजील येणें रुपये
० ४८४१॥≡॥
वजा पुण्यांत ठेविले मोघम आहेत.
१५००

३३४१॥≡॥

नं. २६६२ श्री. ( जून. )

यादी सरकारांत ऐवज घ्यावयाचा. पथक राजश्री परशुराम रामचंद्र. सुरूसन सलास समानीन मय्या व अलफ.

| | |
|---|---|
| | रुपये |
| २३३४१२।÷ | सरंजाम दुसाला इ॥ सन इसन्ने समानीन ता॥ सन मजकूर. एकंदर रुपये ९५०००० पैकीं |
| २८५०० | जातीच्या तैनाता सन सब्बां सबैनच्या. |
| १०००।· | कसबे अष्टें येथें कारकून आहे त्याच्या तैनाता. |
| २४५६॥। | नहरपट्टी रुपये १०००० पैकीं. |
| २६८३९।~॥। | दहक. |
| २७४०३॥ | लग्नपट्टी. |
| ३४७५ | जप्ती देशमुखी जमखिंडीकर. |
| १०००। | सन सीत सबैनांत हुजूर ऐवज पाठविला. महालाचे कारकुना हस्तें. |
| ५४२२५॥ | सुरापुरची बाकी. |
| ५०००० | परशुराम रामचंद्र यांची पांच सालां तैनात. |
| ५००० | जवाहिराबद्दल. |
| ६८१ | इनामगांव वगैरे याचा ऐवज दहकाचा मजुरा घेतला |
| २०००० | रामचंद्र नारायण. |
| ४५००० | सुरापुरचा ऐवज दुसाला सरकारांत दिल्हा. |
| २००० | रामचंद्र भास्कर यांची तैनात. |
| २५९२००।॥· | |

११२७७॥ तैनातेस गांव लावून दिल्हे त्याचा ऐवज बेहेडयांत धरावा तो धरिला नाहीं स॥.

३६७६॥÷ दादासाहेब पट्टी इ॥ सन तिस्सा सबैन पोतें चाल पुणें.

२९४७५ कमावीस नजर गु॥ रामचंद्र नारायण रुपये ३०००० पैकीं.

२००० मौजे पाटखल.

१२००० मौजे भतकुणकी.

६८४४९॥= सं॥ कित्तूर.

१०८९७॥≡ कि॥ वांटणी. किरकोळ.

---

४६०८६४।-॥।

पैकीं सरकारांतून मजुरा आले ते रुपये

२५२९४ रद कर्ज.

५६००० रामचंद्र परशुराम वगैरे यांच्या तैनाता.

२८६०२ रद कर्ज गु॥ हरी बल्लाळ फडके रुपये

२८१२५ रुजुवात.

४७७ रुजुवात होणें रु०

---

२८६०२

---

२८७८०२॥।

बाकी रुपये

१७३०६१।-॥।

तपशील—

२९८६०। भरणा केला रुपये.

२७४०३॥ लग्नपट्टी.

२४५६॥। नहर पट्टी.

---

२९८६०।

१३२३९॥। कि॥ वसूल किरकोळी.

| | |
|---|---|
| १२९९६१॥-॥ हल्लीं भरणा करावा. | येकंदर भरणा रु० |
| ६८४४९॥= संस्थान कित्तूर. | १३२७८०।=॥ |
| ६१५११॥≡॥ पथकाकडे बाकी. | ता॥— |
| ३६७६॥- पोतें चाल पुणें. | ४७७ वजा घातले होते ते. |
| ५७८३५८=॥ हुकेरी. | २३४१॥- सरकार खर्चाची वांटणी होऊन जाजती वसूल आले तें. |
| —————— | १२९९६१॥-॥ किरकोळ खेरीज वरची. |
| ६१५११॥≡॥ | —————— |
| —————— | १३२७८०।=॥ |
| १२९९६१॥-॥ | |
| —————— | |
| १७३०६१॥-॥ | |
| ४७७ कि. | |
| —————— | |
| १७३५३८॥-॥ | |

नं. २६६३. **श्रीगणपति.** (ज्येष्ठ शु० १५-२५ जून.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं परशुराम रामचंद्र आशीर्वाद. उपरी छ० १३ रज्जब यथास्थित असे. विशेष. " कुसाजी हजारी याची बाइको राघोपंत कुळकर्णी मौजे वसगडें यानें अडकावून ठेविली आहे, तिची चौकशी करावी लागती. याजकरितां कुळकर्णी मजकूर व हजारी याचे बाइकोस पाठवून देणें " म्हणून तुम्हीं गांवास रोखा केला आहे म्हणून कळलें. ऐसीयासी पेशजी हजारी मजकूर यास

बाइकोसुद्धां गांवांतून बाहेर घालविला तेव्हां खटावच्या शिवेंत जाऊन बाइकोस मारूं लागला. तेव्हां रानांत बाइकोस मारावयाचें कारण काय, म्हणून खटावकरानीं हजारीस बाइकोसुद्धां वसगडेस आणून पोंचविली. तेव्हां वसगडेकरांनीं बाइकोस मारूं नये असा जामीन देऊन बाइकोस घेऊन जाणें म्हणून सांगितलें. असें असतां जामीन न देतां तुम्हांकडे फिर्याद गेला. ऐसीयास हजारी मजकुरासच येथें पाठवून देणें. याची चौकशी करून जामीन घेऊन बाइको त्याचे स्वाधीन करूं. तुमचीं माणसें वसगड्यास रोखा घेऊन आलीं आहेत त्यांस मनाचिठ्ठी पाठवून उठवून नेणें. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २६६४. श्रीगणपति. (आषाढ वद्य ४–२८ जुलई.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. नरसिंगराव धायगुडे कैलासवासी जाहले. याउपरी दशाहांत क्रिया जाहली पाहिजे, त्यास कृष्णातीरीं चिखल फार जाहला आहे. जातां येतां मार्गाचें संकट फार पडतें. यास्तव ब्रह्मनाळास राजश्री महिपतराव यांस अस्थि समागमें देऊन घोडीं माणसेंसुद्धां रवानगी करावी. समागमें मराठे लोक, मावळे रजपूत द्यावे. गारदी देऊं नयेत. उदईक सहावा दिवस आहे. तरी तृतीय प्रहरास पोंचतसे रवाना करावे. पत्राचें उत्तर येतांच येयून रा. हरबोंची रवानगी करून देतों. रवाना छ० १६ साबान रविवासर. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १६ साबान सन सलास समानीन.

नं. २६६५. श्री. ( मार्गशीर्ष व० १–२० दिसेंबर. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना दामले स्वामींचे सेवेशीं.

---

१ नरसिंगराव धायगुडे मिरजेच्या किल्ल्यांत कैदेंत वारले तेव्हां त्यांचे पुत्रांपैकीं महिपतराव त्यांजजवळ होते व हरबाजीराव परशुरामभाऊंजवळ फौजेंत नाकरीवर होते.

पो॥ बहिरो पांडुरंग. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० १४ मोहरमपावेतों मुक्काम तासगांव यथास्थित असे. विशेष. राजश्री विसाजीपंत नेहेरे यांणीं ज्येष्ठमासीं राजश्री कृष्णाजीपंत वर्तक यांजपासून राजापुरचा कुलकर्णी याची कुणबीण येथें आणिली होती ती विकत घेऊन वांईस पाठविली. तिचा सोयरा मुदगौंडा पाटील नांदरेंकर याचा गुलाम, त्याणें तेथून काढून नेली. एक महिना जाहला. त्याजवर त्याचा शोध नांदऱ्यांत घेतला. तो पाटलाचे घरून पळोन कुणबीण घेऊन गेला ऐसा शोध लागला. पाटलास पुसिलें, परंतु जाबसाल धटाईचे करितो. तर येविशीं राजश्री बाळासाहेबांस लिहिलें आहे, तर आपण वर्तमान समजावून पाटील मजकूर यास ताकीदपत्र घेऊन पाठवावें जें, 'तुझ्या गुलामानें कुणबीण काढून नेली आहे त्याचा जाब तोफखान्यांत जाऊन करून देणें, म्हणोन ताकीद पाठवावी. जरूर जाणोन लिहिलें आहे. शंभर रुपये बुडाले आहेत. आपण चित्तावर धरिलें तर ठिकाण लागेल; अथवा कांहीं तरी पैका उगवल. त्याचा गुलाम एक वेळ वांईस गेला होता त्यास पाटील याच्या माणसांनीं जाऊन मार देऊन घेऊन आले. त्याजवर फिरोन गेला होता त्या वेळेस कुणबीण काढून आणिली आहे. आपणास तपशीलवार वर्तमान कळावें म्हणोन लिहिलें आहे. आपलेकडील नवलविशेष ल्याहावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं. २६६६. —२४ डिजेंबर. )

विसाजी नारायण वाडदेकर यांचें बाळासाहेबास पत्र पुण्याहून पै॥ २१ मोहरम—

" राजश्री आनंदराव धुळप यांनीं साल गुदस्तां तरांडे धरिलें त्याजवर रेशीम सांपडलें. तें राजापुरीं धुळपानीं रेशीम विकलें. त्याजवर हुजूर कोणी तसकरा केला कीं, चार लाख रुपयाचा माल असतां

लाख दीड लाखास विकला म्हणोन समजाविलें. त्याजवरून राजापुरचा मुर्ज- ( ? ) याणें साराच माल विकत घेतला. धुळपांजवळून त्यास येथें आणिला. त्याची चौकशी होऊन लिहून घेतलें. त्याणें विकलें तीं कुळें आणून रुजुवात करीत आहेत. त्यांपैकीं पंढरपुरचे ४ व मंगळवेढेंचे दोन मिळून सहा असामी उदमी आपल्या तालुक्यांतील आहेत. त्यांच्या नांवाची याद अलाहिदा पाठविली आहे. त्यांस पाठवून देण्याविषयीं राजश्री नाना व तात्या यांनीं सांगितलें आहे. "

नं. २६६७. ( –३१ डिजंबर. )

नानाफडणीस यांचें गंगाधरराव बाळासाहेबांस पत्र–

" श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे लग्नाचा निश्चय माघ शु॥ ९ स जाहला आहे. तरी आपण सहपरिवारें लग्नसमारंभास यावयाचें करावें. रवाना. छ० २९ मोहरम. "

नं. २६६८. –८ जानेवारी. )

काळो बहिरव पेठे यांचें नरगुंदाहून बाळासाहेबांस पत्र पौष शु॥ ६ चें–

" हैदरखान मार्गशीर्ष शु॥ ७ स देवाज्ञा पावला. पेशजी व्रणाची व्यथा जाली होती तद्दत्त व्यथा प्रबळ होऊन निधन पावल्याचें वर्तमान येथें येऊन आठ दिवस जाले. पेशजी वर्तमान उठलें होतें तें मिथ्या जाहलें, सबब पुर्तें आल्यावर लिहावें म्हणून वाट पाहिली. त्यास टिपू सुलतान यांचे नांवाचा परवाना कृष्णराव शिवमोघे यांस आला कीं,ठाण्यांची बंदोबस्ती करून सावध राहणें, वरकड मागाहून लिहून पाठवूं त्याप्रमाणें करणें, म्हणून लिहिलें आल्यानंतर निश्चयवृत्त समजून मुजरद पत्र लिहिलें आहे. शककर्ता, परंतु पृथ्वीक्षोभ बहुतच

१ उभयतां कारभारी नानाफडनवीस व हरीपंत फडके योणीं.

जाहला श्रीस मानलें नाहीं ! लौकर विल्हेस लागला ! इंग्रज प्रबळ बहुतच होऊन बिदनूरच्या सदरेचीं ठाणीं घांटाखालील तमाम घेतलीं. बंदरें तमाम गेलीं. इंग्रज समीप आले आहेत. बिदनूरचा जमाव कुमकेस गेला तो सर्व लढाईंत विल्हेस लागला ! हलाखी लष्करची व जागजागां बहुतच आहे. याप्रमाणें समय[1] येणें दुर्लभ आहे."

नं. २६६९. श्री. ( पौष शु० १५-१८ जाने० )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेसीं.

विनंती सेवक रामचंद्र कृष्ण दातार साष्टांग नमस्कार विज्ञापना. आम्ही हैदरखानाचे बंदींतून सुटोन आलियावर एके दिवशीं दिवाणखानेंतलि खोलींत आपण व श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व श्रीमंत हरिहरराव बसोन वासुदेवपंतकाका व श्रीपतराव व मला बोलावून वासुदेवपंतांस पुसिलें कीं, तुम्ही हैदरखानाचे बंदींतून सुटलां तेव्हां सावकारास खत किती जणांचे नांवें दिलें आहे ? त्यास वासुदेवपंतांनीं सांगितलें कीं, खत श्रीपतराव यांचे नांवें व उगवणी माझी व रामचंद्रपंत यांची आहे. त्यास श्रीपतराव याणीं सांगितलें कीं, खत माझें नांवें व बहिरजी घोरपडे व निळकंठराव शिंदे व वासुदेवपंत व रामचंद्रपंत ऐसें पांचजणांचे नांवें आहे. तेव्हां वासुदेवपंत याणीं म्हटलें कीं, पांचजणांचे नांवें खत नाहीं, ऐसें बोलिले. तदोत्तर श्रीमंत भाऊसाहेब बोलिले कीं, बेवसिशें होन राघवेंद्र नाईक याचें देणें राहिलें आहे तें तुम्हीं देणें. खत सोडवून आणावितों. तेव्हां वासुदेवपंत बोलिले कीं, स्वामीनीं ऐवज देऊन खत आणावें. खतांत पांचजणांचीं नांवें आहेत. ऐसें जाहलियास मी कोणाची गुलामगिरी करून स्वामींचा ऐवज देईन. त्यावरून मलाही पुसिलें कीं, खत किती जणांचे नांवें आहे ? त्यास मीं सांगितलें कीं, श्रीपतराव यांचे नांवें व उभयतांची उगवणी खतावर

1 हैदराच्या ताब्यात गेलेला मुलूख पुन्हां सोडवून घेण्याचा समय.

आहे. त्यास हल्लीं स्वामींनीं खत सोडवून आणून आम्हास दाखविलें त्या खतांत श्रीमंत श्रीपतराव, बहिरजी घोरपडे, निळकंठराव शिंदे, व वासुदेवपंत व माझें नांव ऐसीं पांचजणांचे नांवें खत आहे. तेव्हां आम्हांस पुसिलें कीं पांच जणांचे नांवें नव्वद हजार होनांचे एकेरींचें खत आहे. त्यापैकीं तुमची व वासुदेवपंतांचीं फोडवून निराळीं खतें दोघांचीं वेगळालीं दिलीं आहेत किंवा उभयतांचें खत फोडीचें एकच आहे हें लिहून देणें; त्यास आमचा कांहीं तरी दस्तऐवज सावकारा-जवळ निराळे फोडीचा असेल. हें पत्र लिहून दिलें सही. तारीख छ० १४ सफर आर्बा समानीन मया व अल्लफ हे विज्ञापना.

नं. २६७०. श्रीगणपति. ( माघ शु० ३—२ फेब्रुवारी. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी.

प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १ रबिलावलपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आदगौंडा पाटील कसबे शिरहट्टी याजपाशीं आपण गल्ला व कडबा खरेदी केला आहे. हेविशीं आपलीं माणसें पाटलाचे शेतांत बसून मळणी करवितात म्हणोन कळलें. ऐशीयास पाटील मजकूर याजकडे जमिनीचा व एकसालीचा ऐवज येणें; यास ऐवज सदरहूच आहे. खरेदीचा ऐवज त्याजपाशीं दिल्यास खर्च करील, तो लबाड आहे. सरकारचा ऐवज उगवला पाहिजे, यास्तव खरेदीचा ऐवज पाटील मजकुराचा जो असेल तो येथें पाठवावा. त्यास न द्यावा. हे आशीर्वाद.

पैवस्ती छ० ५ रबिलावल. सन आर्बा समानीन. माघमास.

नं. २६७१. श्रीगणराज. (माघ शु० १३—१५ फेब्रु० )

राजश्री नारोपंत दामले स्वामी गोसावी यांस.

विनंती उपरी. तुम्हीं द्राक्षें पाठविलीं होतीं त्या माणसाबरोबर कालच पत्राचीं उत्तरें पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर कळेल.

रुसुमाचे ऐवजाचा झाडा वगैरेविशीं राजश्री केसोपंत गोरे यांस अला-हिदा पत्र लिहिलें आहे. या कामास मुजरद सांडणीस्वार पाठविला आहे. तर मशारनिल्हे-कागदपत्र देतील ते सत्वर पाठवून देणें. काल अस्तमानीं साडे जाले. श्रीमंत चौदा घटका रात्रीस वाड्यांत आले. दारूचा वगैरे बहुतच अपूर्व समारंभ जाला. कळावें. रवाना छ० १२ रबिलावल. सन सलास समानीन. व राजश्री नारोपंत दातारासही पत्र लिहिलें आहे. प्रविष्ट करून उभयतांकडील कागदपत्र घेऊन पाठवणें. चौकी पाहरेची बंदोबस्ती उत्तम प्रकारें असावी. बंदीखानांची चौकी चांगली असावी. शिरहट्टीकर यांजकडील मजकूर पेशजी लिहिला आहे त्याजप्रमाणें जाल्यास उत्तम. नाहींतर किल्लेंत ठेवणें. वसुलाची जलदी करावी. मोरोहरीचें पत्रच येत नाहीं. त्यास फावत नसेल! हरणाचे दाणा, वैरणपाणी याची खबर उत्तम घेत जाणें, म्हणून निळकंठा जाधव खिजमतगार तेथें आहे त्यास ताकीद करावी. बहुत सावधपणें असावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० १९ रबिलावल सलास समानीन. माघमास.

नं. २६७२. **श्रीगणराज.** ( माघ व० ४–२१ फेब्रुवारी. )

राजश्री नारोपंत दामले स्वामी गोसावी यांसी. विनंती उपरी. तुम्हाकडे परवां खिजमतगार व जासुदाबरोबर पत्रें पाठविलीं आहेत. पावलींच असतील. काल कुरुंदवाडाहून चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादाकडे राजश्री महादजीपंत कोलटकर यांचें पत्र आलें. त्यांतील मजकूर कागवाडकर शिलेदार हैदरखानाकडे चाकरीस बिदनुरीं होता. बिदनूर व सोंदे इंग्रजानीं घेतलें. सावनूर–धारवाडपर्यंत गडबड जाहली आहे. म्हणून लिहिलें आहे. याजकरितां मुजरद खिजमतगाराची जोडी बातमीकरितां पाठविली आहे. तर तिकडील वर्तमान सविस्तर लिहून

पाठविणें. बातमीस माणसें तेरदळ व शहापूरपर्यंत जलद चालणारीं ठेवावीं आणि वरचेवर बातमी येईल तें इकडे लवकर लिहून पाठवित जाणें. तुम्हीं बहुत सावधपणें राहणें. रवाना छ० १८ रबिलावल. तुम्हीं बहुत बहुत सावधपणें चौकी पहारा व बातमी राखून वरचेवर लिहित जाणें. आम्हांस श्रीमंतांचा निरोप होतांच येतों. येथें कामाकाजासाठीं तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब राहणार आहेत. हेंच पत्र उभयतां मातुश्रीस वाचून दाखविणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. २६७३. **श्रीगणराज.** ( माघ व० १३-१ मार्च. )

राजश्री नारोपंत दामले स्वामी गोसावी यांसीं—

विनंती उपरी. तुम्हीं कामाठी व प्याद्याबरोबर छ० २० रबिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं कालच दोन प्रहरीं पावलीं. द्राक्षेंही लिहिलेप्रमाणें प्रविष्ट जाहलीं. दुसरीं पत्रें जासूदजोडीबरोबर छ० २३ रबिलावलचीं पाठविलीं तीं काल प्रथम प्रहर रात्रीस पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. शिवराव घोरपडे व खंडोजी घोरपडे यांचें वर्तमान त्यांजवळ गडी होते ते आले त्यांनीं सांगितल्याचें व इंग्रजाकडील व टिपूकडील वगैरे वर्तमान तपशिलवार लिहिलें तें कळलें. शिवराव व खंडोजी घोरपडे दुष्टाचे कारागृहीं निवर्तले, वाईट जाहलें. होणारास उपाय नाहीं. नरगुंद वगैरेकडे बातमीविशीं तुम्हीं लिहून पाठविलेंच आहे. वर्तमान अधिकोत्तर येईल तें वरचेवर कळवीत जावें. द्राक्षांची पाटी रिकामी करून खादीसुद्धां माघारी कामाठ्याबरोबर पाठविली आहे; पावेल. निरखबंद पाठविला तो पाहून माघारा पाठविला आहे;

---

१ पत्र गंगाधरराव यांचें पुण्याहून. २ दोघेही मुरारराव घोरपडे सेनापति यांचे पुतणे. सेनापति कपालदुर्गावर हैदराच्या कैदेंत होते तेथेंच हेही होते. खंडोजी घोरपडे मुररावाबरोबरच कैदेंत सांपडले होते व सावशीच्या लढाईंत शिवराव घोरपडे शत्रूकडे पाडाव सांपडले होते.

वरकड पत्रांचीं उत्तरें मागाहून पाठवितों. रवाना छ० २६ रबिलावल. नबाबाचे पुत्र काल कवडीपलीकडे मुक्कामास आले. आज शिवरात्र, यास्तव भेटीस श्रीमंत तर जात नाहींत. उदईक भेटी होणार. भेटी जाहल्यानंतर मागाहून सविस्तर लिहिलें जाईल. रवाना छ० मजकूर. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. हेंच पत्र उभयतां वडिलांस वाचून दाखवावें. नबाबाचे पुत्राच्या भेटी उदईक होणार. मध्यें डेरे देऊन इकडून श्रीमंत, तिकडून ते, येऊन डेरेंत भेटी होणार. भेटी जाहलेनंतर लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें हे विनंती. सावधपणें असावें हे विनंती. ती॥ सदाशिवपंत वैद्य यांस माघ वद्य चतुर्थी गुरुवारीं अस्तमानीं देवाज्ञा जाहली. होणारास उपाय नाहीं. परवांचे पत्रीं लिहावयास विसरलों. इंग्रजासी सलुखाचें बोलणें राजश्री महादजी शिंदे यांचे विद्यमानें होतें. त्यास सोंदें, बिदनूर ( इंग्रजा फौजेनें ) घेतलें ही बातमी जातांच ते वकील ठीक बोलेनासे जाहले. कलकत्तेस लिहून जाब आणूं, मग बोलणें तें बोलूं, म्हणाले. असे वर्तमान येथें सावकारींत आलें आहे. दरबारीं अद्याप नाहीं. हे विनंती.

राजश्री मैराळ नारायण चिटणीस यांसीं आशीर्वाद. तुमचे पत्र राजश्री लक्ष्मणराव चिटणीस यांस प्रविष्ट करून उत्तर आणून पाठविलें आहे. पावेल. हे विनंती.

पै॥ छ० २ रबिलाखर. सन सलास समानीन.

नं. २६७४. श्री. (फाल्गुन शु० ९–११ मार्च.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

पोष्य अंताजी शंकर, कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील

---

१ साळू आका व लक्ष्मी वहिनी यांस. २ वांईकर. ३ तेरदाळचे फडणीस.

कुशल तागायत छ० ७ रविलाखर भौमवार जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. बातमीचें वर्तमान दक्षिणेकडील आणून लिहून पाठवणेविसीं श्रीमंतांची आज्ञा, त्याजवरून नरगुंदास माणसें पाठविलीं होतीं तीं काल संध्याकाळीं आलीं. त्यांत वर्तमान बिदनूर अगोदरच इंग्रजानें घेतलें हें पेशजी आपणास लिहिलें होतें. ठाणें घेऊन सवा महिना जाहला. त्यानंतर अनंतपुरचें ठाणें घेतलें. बिदनुरापासून तीन गांव आहे. त्यानंतर उडगणी मादापुराकडे जमाव पाठवून तिकडील ठाणीं घेऊन सध्यां जमाव अनंतपुरावर आहे. टिपू सुलतान बहादर याची फौज शिवमोघेवर आहे. कांहीं त्याचा जमाव मागाहून येणार. भारी जमाव जमल्यानंतर त्याची व इंग्रजाची लढाई होणार अशी वदंता आहे............धरून त्यारोखें आहेत. याप्रमाणें वर्तमान. आणखी......................खिजमतगार व येथील माणसें नरगुंदास गेलीं आहेत. लवकरच येतील. आल्यावर येईल वर्तमान तें सविस्तर लिहीन. सध्यां सावनुराकडे कांहीं इंग्रजाची गडबड नाहीं. सागवानी तुळयांविसीं आपण लिहिलें, त्यास गो.................गाडे विकावयास आले होते ते घेतले आहेत. दर गाड्यास पांच तुळया आहेत. लांबी अकरा बारा हात व जाड पांच तसू याप्रमाणें आहेत. त्यास दर गाड्यास रुपये ३५ प्रमाणें खरेदी केले आहेत. इकडे सागवानी लांकूड महाग फार. चहूंकडील गिऱ्हाईक व सरकारची खरेदी यामुळें लांकूड महाग पडतें. सध्यां सदरहूप्रमाणें तुळया सिद्ध आहेत. न्यावयाची तरतूद करावी. श्रीमंतांचे पत्राचें उत्तर पाठविलें आहे तें पुण्यास रवाना करावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

नं. २६७५. श्रीगणराज. ( माघ व० ८–२४ मार्च. )

राजश्री नारोपंत दामले गोसावी यांसीं–

विनंती उपरी. तुम्हीं छ० १२ व छ० १३ व छ० १६ रबिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळला. बिदनूर व सोंदे इंग्रजांनीं घेतल्याचें वर्तमान कुरुंदवाडाहून राजश्री महादाजीपंत कोल्टकर यानीं चिरंजीव राजश्री दाजीस पत्र लिहिलें तें पत्र पाठविलें तें पावलें. याच अन्वयें मशारनिल्हेनीं चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा यांस लिहिलें आहे. तिकडील बातमीविसीं तेरदळास व शहापुरास पत्रें रवाना करावयाविसीं तुम्हास परवांच लिहिलें आहे. नरगुंदपर्यंत बातमी राखोन वरचेवर येईल तें वर्तमान लिहित जाणें. पागेकडे हरभऱ्यांचे खरेदीस दोन हजार रुपये कानोपंताकडे व रोजमुऱ्यास एक हजार रुपये एकूण तीन हजार रुपये कानोपंताकडे दिले म्हणून लिहिलें, उत्तम केलें. इमारतीच्या कामाचा मजकूर व घांटाकडील वगैरे तपशीलवार लिहिला तो कळला. याच अन्वयें वरचेवर समाचार घेऊन लिहून पाठवीत जाणें. ' वसुलाची निकड लाविली आहे. व चौकी पहाऱ्याची बंदोबस्ती उत्तम प्रकारें आहे. ' म्हणोन लिहिलें तें कळलें. सावधपणाविसीं आळस करूं नये व वसुलाविसींही निकड वरचेवर करीत जाणें. तीर्थस्वरूप मातुश्री सगुणाआका परवां येथें येऊन पावली. आम्हा निरोप घेऊन यावें, त्यास मोंगलाचे पुत्र येणार ते अद्याप आले नाहींत. चार दिवसांत यावे असें आहे. त्यांची भेटी जाहलियानंतर मग आम्हांस निरोप होईल. माघ वद्यांत येणें होत नाहीं. बहुत खबरदारीनें राहान तिकडील वर्त-

---

१ पत्र गंगाधरराव यांचें पुण्याहून मिरजेस. २ मिरज येथें कृष्णेवर घांट बांधण्याचें काम चालू होतें त्यासंबंधीं.

मान लिहिणें. वरचेवर येथून पत्रें तुह्माकडे रवाना होतच आहेत. रवाना छ० २१ रबिलावल इंदुवार. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. २६७६. श्रीगणराज. ( २० मे. )

पैवस्ती छ० २४ रज्जब. सन आर्बा समानीन ज्येष्ठ मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब पटवर्धन यांप्रती.

रामभट्ट भुस्कुटे अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल चैत्र वद्य ३ मुक्काम श्री अविमुक्त क्षेत्र येथें समस्त सुखरूप असों. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्रीं परामर्ष होत नाहीं. तरी ऐसें नसावें. सदैव येणाऱ्या वार्तिकासमवेत पत्रद्वारें संतोषवावें. यानंतर पुढें कार्तिक मासीं मातुश्री वहिनींचें महायात्रेस येणें निश्चयात्मक घडलियावर श्रीमंतांचीं पत्रें महादजी शिंदे पाटील यांस ऐसीं असावी जे, " निरंजहून यात्रेस गृहस्थ अमुक संख्यापूर्वक आले आहेत. तर त्रिस्थळीं यात्रा करून सुखरूप सर्व यात्रा येतशी करावी ऐसा बंदोबस्त करून देणें; " म्हणोन सरकारचें लिहिणें असलिया शिंदे यांचे संनिधानीं इष्टिण साहेब कलकत्तेकर यांचे भाचे इंद्रसेनसाहेब सैन्यांत पाटिलांजवळ आहेत. पाटील इंद्रसेन यांस सांगतील व आपलीं पत्रें व इंद्रसेन यांचीं पत्रें इष्टिण साहेबांस लिहितील जे, " सरकारचे गृहस्थ महायात्रेस आले आहेत. तर यांसी कोणी मुजाहेम न होणें. " याप्रमाणें या उभयतांचीं हुजूरचीं माणसें व माफीचीं दस्तकें असलिया त्रिस्थळीं यात्रा हुकमानें घडोन कार्य होईल. याप्रमाणें पुण्याहून बंदोबस्त करून द्यावा. यंदां मकरास [3]पाटिलांकडून राजश्री शिवाजी बापू हे हुकमतीनें प्रयागास आले.

---

१ काशी. २ गोपाळराव गोविंद यांची स्त्री सरस्वतीबाई. ३ महादजी शिंद्याकडून. ४ शिवाजी विठ्ठल विंचूरकर.

समागमें पन्नास राऊत व इंग्रजाकडील एक पलटण व एक कारकून घेऊन आले. त्या तेजापुढें सर्वेही पादाक्रांत होऊन त्यांचे मर्जीनुसार तेथील अमीलसह वर्तले. स्वारीस दक्षिणा ३० व सड्यास ७ याप्रमाणें बहिरंग जाहलें; अंतरंगीं तेथील्या हकमींची पूजा किंचित् करावी लागली ऐसें लौकिकीं ऐकितों. परंतु प्रयागीं हुकूम सर्वस्वी बापू यांचाच होता. यावर्षीं या गृहस्थानें श्रीमंतांचे प्रतापें मोठा शक केला ! ऐसा सुभिता कधींच घडला नाहीं. इकडून अनुभवी गृहस्थ कित्येक देशीं आले आहेत त्यांचे मुखें श्रुत वृत्त होईल. वहिनींचें पुण्याहून पुढें येणें जाल्यावर परस्पर जासूद जोडी शिंद्यांकडे जाऊन तेथील कागद, दस्तक व कांहीं लोक इंग्रजांचे परभारें प्रयागीं येऊन पोंचत; अशी तरतूद करावी. येणेंप्रमाणें परभारें साहित्य तेथें येऊन पोंचल्यावर सर्वेही सुभीता होऊन येईल. यास्तव सूचना लिहिली असे. यंदां राजश्री कृष्णापा नाईक याणीं कर्जें आम्हाकडून यात्रेकरू यांस देवविलीं आहेत, आणि खताच्या नकला राजश्री घेऊन गेले आहेत. एकंदर याद आपणाकडेही पाठविली आहे. ऐवज सत्वर उगवून येथें प्रविष्ट होय तो अर्थ आपण करणार समर्थ आहेत. आपले आधारावर जें करणें तें करितों. वहिनी येथें आलियावर सेवा घडोन येईल त्यास चुकणार नाहीं. आम्हावर आपण जी प्रीति करितां ती श्रीस पोंचते; हेविशीं साक्ष अंतर्ध्यानीं श्रीहरि आहे. आम्हाकडील सविस्तर राजश्री देवरावजी देशपांडे व वे॥ भगवंतभट्ट लिमये हे सांगतां कळेल. आमचा वृद्धापकाळ. सारांश विनंती हीच जे, मुलांचा मान, अभिमान आपणास मिळाला आहे. सुज्ञाप्रत बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

---

१ मुख्य अंमलदाराची, २ स्वस्थता, सोय.

नं. २६७७. श्रीगणपति. ( १५ जून. )

पै॥ छ० ११ रज्जब सन आर्बा समानीन. ज्येष्ठ मास.—

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रघुनाथरावदादा यांसी आशीर्वाद उपरी. कारभारी यांचें व आमचें बोलणें जालें. त्यांतील मुख्यत्वें मात्र हाच कीं, श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडील दोघे शिष्य स्वदस्तुरचें पत्र राजश्री हरीपंततात्या यांस घेऊन आले कीं, याजउपर तुम्ही याद करार करून पाठवाल त्यास आम्हा मान्य. येविशींचा अखत्यार तुम्हांवर. म्हणून निखालस पत्र व दरम्यान निभावणीस होळकर ( यांस ) व आम्हांस द्यावें असें लिहिलें होतें. त्याजवरून इकडूनही निखालस याद व पत्रें गेलीं आहेत. त्यांचीं उत्तरें चहूं दिवसांत यावयाचीं आहेत. समर्पक उत्तरें ' येतों ' अशीं येतांच होळकर व आम्ही निभावणीचें पत्र पाठवून देऊं. राजश्री हरीपंततात्या व होळकर श्रीमंतांस आणावयास जाणार. श्रीमंतांचे पत्राचें उत्तर येतांच आम्हीही निभावणीचें पत्र देऊन निघून लवकरच येत आहों. इंग्रजांचा तह पक्का जालाच आहे. त्यांत गुंता नाहीं. श्रीमंत इकडे येणार त्याजमुळें ठाणीं बसावयास दिवसगत जाली. ठाण्यांच्या चिठ्या पाठवून देणें म्हणून सरकारचीं पत्रें शिंद्यांकडे व इंग्रजाकडे गेलीं. भडोचेंत शिंद्याचें ठाणें बसलें. सुरतेंत पेशजीप्रमाणें सरकारचा अंमल बसला. याजउपर अमदाबादेंत व वसईत ठाणें पडेल. गुंता नाहीं. श्रीमंतांच्या येण्यामुळें चार दिवस अधिकउणे लागतील. नहोन बोलण्यांत ठरावांत लढा राहिला नाहीं. पेशजी धुळपानें इंग्रजाकडील चार जहाजें व तिघे सरदार व चारपांचशें माणूस पाडाव केलें तें आजपावेतों जप्तच होतें. तह जाला सबब मालसहित जहाज व सरदार तिघे व लोक सर्व झाडून सोडून दिले. हैदरखानाकडील वकिलास सरकारांतून सांगितलें कीं,

१ पत्र परशुरामभाऊंचें.

" इंग्रजाचा व सरकारचा तह जाला. त्यांत तुमचाही तह. त्याचा मुलूख तुम्हीं घेतला आहे तो सोडून द्यावा व सरकारचा तालुका तुम्हांकडे आहे तो सरकारांत द्यावा. " हें टिपूकडे लिहून पाठवून देणें म्हणून सांगितलें. त्याजकडील उत्तर अद्यापि येथें आलें नाहीं. आल्यानंतर कळेल. रवाना छ० १४ रज्जब. शिंद्याकडील रामजी पाटील आले आहेत. शिंद्याकडील केसोपंत श्रीमंतांजवळ सुरतेस आले आहेत. त्यांचे मतें तिकडे घेऊन जावें. यांचे मतें इकडे आणावें असें आहे. यांत काय घडेल तें पहावें. येथून खर्चासही ८० हजार रुपये पाठविले आहेत. बहुतकरून इकडेच येतील असें दिसतें. यांत श्रीसत्ता प्रमाण. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. करवीरचे मसलतीचेंही बोलत आहेत. यांचे मतें सर्व[1] हस्तगत जाहल्यास चांगलें असें आहे. आम्हीं त्यांस एकही जाबसाल केला नाहीं. आणखी एक दोन वेळ बोलणें जाहलें म्हणजे जसा यांचा सुमार दिसेल तसें सांगूं. हे आशीर्वाद.

नं. २६७८. श्रीगणपति. ( -१६ जून. )

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं.—

विनंती. सेवक परशुराम रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ० १५ रज्जब जाणून स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे[2] दर्शनास व गोदातीरीं रहावयाचा निश्चय करून खातरजमेविशीं राजश्री हरीपंतांस पत्रें पाठविलीं त्याजवरून सविस्तर कळलें.

---

१ येथें नक्कल घेतांना कांहीं चूक झाल्याचें दिसतें. 'सर्व' हेंच पद मूळ पत्रांत असल्यास त्याचा उलगडा होत नाहीं. करवीरकरांनीं पूर्वीं काय देऊं केलें होतें व त्यापैकीं हल्लीं काय देत नव्हते ? नाना फडणविसांस सर्व हस्तगत व्हावयास पाहिजे सर्व काय ? सर्व ठाणीं कीं सर्व बंदिवान ? कीं सर्व खंडणी ? २ गोपिकाबाईच्या

ऐशास स्वामीं कृपा करून स्वच्छचित्तें गोदातीरीं स्नानसंध्या करून राहणार. त्यारशीं फिरोन संशयास कारण व लौकिकास विरुद्ध गोष्ट होऊं नये. कोणीं कसेंही सांगितलें तरी मनांत आणूं नये. श्रीमंत राजश्री माधवरावसाहेब यांचे व आपले कराराच्या यादी परस्परें ठरल्या आहेत त्याप्रमाणें घडावें; श्रीमंतांस व दौलतीस कल्याण ती गोष्ट आपणाकडून घडावी. म्हणजे कोणेविशीं संशयाचें कारण नाहीं. खातरजमा असावी येविशीं बेलभंडार पाठविला आहे. येविशीं श्रीगणपतीची शपथ आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २६७९. **श्रीगणपति.** ( ज्येष्ठ व० ६–२० जून. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब व राजश्री दादा यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील पेशजी शिष्ये आले होते. बोलून गेल्याचा मजकूर पेशजी लिहिलाच आहे. त्यांजकडील पत्रे यावयाचीं होतीं तीं परवां आलीं. "निश्चयें येतों. कोणेविशीं लढा राहिला नाहीं. राजश्री हरीपंत व होळकर यानीं लौकर यावें," म्हणोन आलीं. आमची खातरजमा व बेलभंडार द्यावा म्हणून पत्र आलें. त्याजवर निश्चय जाहला कीं, हरीपंतानीं निघावें. त्याजवरून राजश्री हरीपंततात्या काल गुरुवारीं डेरेदाखल जाहले. कोंडाईबारीस यांनीं जावें. सुरतेकडून श्रीमंतानीं यावें. तेथून गंगातीरास कचेश्वर कोपरगांवाजवळ वाडा बांधिला आहे तेथें रहावें. हरीपंततात्याबरोबर रास्ते यांचें पथक व होळकर दोन हजार फौजेनिशीं खासा, याशिवाय हुजुरातचीं पथकें व फिरकोळ सरंजामी मिळोन दोन तीन हजार, गाडदी हजार, दोन जिलिबीच्या तोफा, याप्रमाणें सरंजाम जात आहे. दोन चार दिवसांनीं येथून कूच होऊन

१ गंगाधरराव गोविंद व रघुनाथरावदादा कुरुंदवाडकर यांस पत्र.

जातील. श्रीमंतांचा कारभार ! विश्वास धरावयाचा नाहीं, परंतु कागदीं पत्रीं लिहिण्यापुसण्यांत बोलण्यांत कांहीं लढा दिसत नाहीं. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. बहुत करून नेमल्या स्थलास घेऊन येतील असें दिसतें. माझें खातरजमेचें पत्र व बेलभंडार द्वितीया इंदुवारींच दिल्हें. आम्हांस रा. हरीपंततात्या चला म्हणत होते. मीं सांगितलें कीं, " माझें प्रयोजन नाहीं. माझें कामकाज मागें आहे तें सारें राहील. सर्वांनीं जावें हेंही चांगलें नाहीं. " त्याजवरून राहणें जाहलें. परंतु राजश्री नानांच्या विचारें " राजश्री हरीपंततात्या जातात, त्यांची श्रीमंतांची भेट होऊन गंगातीरास येत तोंपावेतों येथें आम्हांजवळ राहणें. घरास जाणें ठीक नाहीं. कोणे समयीं कसें प्रयोजन पडतें कळत नाहीं; यास्तव पुण्यांतच राहणें. " असें म्हणतात. माझें म्हणणें मागील फडशे जाहले आहेत ते आपल्या आपल्यांत समजावून फडशे जाहले पाहिजेत, यास्तव निरोप द्यावा. परंतु त्यांचे चित्तास येत नाहीं. तत्रापि आमचे चित्तीं निरोप मागावासा आहे. हरीपंतांचें कूच होईपर्यंत खटपट करून पाहतों. निरोप जाहल्यास लौकरच येतों. नाहीं तर महिनाभर रहावें लागेल असें दिसतें. यांत ठराव होईल तो मागाहून लिहितों. राजश्री पांडुरंगराव बारामतीकर यांसही बोलाविलें आहे. येथूनही बोलावणें गेलें. येतात न येतात पहावें. धुळपांनीं वेटी म्हणोन इंग्रजांचें जहाज धरलें होतें त्यांत तीन सरदार व तीनचारशें माणूस सांपडले तें इंग्रजांचा तह ठरला तेव्हां सोडावें असें जाहलें. त्याजवरून त्यांस सोडून दिल्हें. त्यांत यानीं पत्र लिहिलें जे आम्हीं हें सोडून दिल्हें. परंतु अद्यापि ठाण्यांच्या चिठ्या येत नाहींत, तर लौकर पाठवाव्या. त्यावरून त्यानीं वसई, अमदाबाद आदिकरून सारीं ठाणीं देण्याविशीं अंमलदारास चिठ्या पाठवून दिल्या येथें दाखल जाहल्या. त्याही लौकरच रवाना होतील. वसईस

अशेरीस जगन्नाथपंत होते त्यांचे पुत्रास पाठविणार. अमदाबादेकडे राजश्री बाजीपंतअण्णा अथवा भवानी शिवराम उभयतांतून एकास रवाना करावें असें घाटत आहे. अद्यापि निश्चय नाहीं. याउपर इंग्रजांच्या सलुकांत लढा राहिला नाहीं. हैदरखानाकडील वकिलांसही "इंग्रजाशीं तह जाहला. आम्हांस करणें जरूर आहे," म्हणोन स्पष्ट सांगितलें. पुढें काय घडतें पहावें. भडोचेंत शिंद्याकडील ठाणें पडलें. फारकरून इंग्रजांकडील कारभार ठरला असा दिसतो. यांत हरिसत्ता प्रमाण ! छ० १९ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २६८०. (आषाढ शु० ४—३ जुलई.)

परशुरामभाऊंचें पत्र बाळासाहेबांस पै॥ ४ साबानचें—

"राजश्री हरिपंततात्या, रास्ते, होळकरसुद्धां गंगातीरास गेले. याउपर श्रीमंत संकेताप्रमाणें कोंडाईबारीस आल्यास लवकरच भेटी होतील."

नं. २६८१. (आषाढ शु० ४—३ जुलई.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र. पै॥ छ० ४ साबान.—

"टिपूकडून छ० ९ रज्जबचें पत्र रवाना जाहलें तें छ० २४ रज्जबीं महमदखान वकील मशारनिल्हेकडील याणीं दाखविलें. त्यांत "बिदनूर घेऊन कोडच्याळ घेतलें. याउपर बंदोबस्त करून लवकरच चेनापट्टणाकडे घांटाखालीं जात आहों. तिकडून मुसा भुसी आला आहे. वलंदेजही पन्नास जहाजें येत आहेत. लौकरच येतील. आपण इंग्रजांशीं तह केला हें ठीक नाहीं. आम्ही खराबीखालीं आलों आहों. आम्ही इकडे झुंजतों, सबब त्यानीं तुम्हांशीं पैगाम लाविला आहे. पेशजी असाच आम्हांशीं लाविला होता, परंतु आम्हीं कबूल केला नाहीं. अर्थे प्राणे खर्चे जालों. याउपर इंग्रजास पुरती तंबी द्यावी

हेंच मनांत आहे, तर आपण हरगीज तह करूं नये. कितेक बोलणें आहे याजकरितां रा. कृष्णराव नारायण यांस पाठवून द्यावें." म्हणोन पत्र आलें आहे. यांचा तर इंग्रजाशीं तह जाला. ठाणींही याउपर लौकरच पडतील असें आहे. टिपूकडे हैदरखान मेल्याचीं वस्त्रें घेऊन रा. काकाजी रास्ते गेले होते. तिकडून श्रीमंतांस लग्नाचीं वस्त्रें, हत्ती, जवाहीर दोन दागिने, शिरपेंच, जेगा, घेऊन आले. वद्य एकादशीस गुदरला. रा. नानासही हत्ती होता."

नं. २६८२. (आषाढ शु० ४–३ जुलई.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र. पै॥ छ० २ साबान.—

"श्रीमंत राजश्री दादासाहेब नवापुऱ्यास आले. लौकरच पिंपळनेरास येणार होते. आले असतील. राजश्री हरीपंततात्या टोंक्यावर गेले. तेही लवकरच पुढें जातील. बहुतकरून आषाढ शुद्ध ७ स भेटी होतील. मी रविवारीं सप्तमीस निरोप घेऊन श्रीक्षेत्र पंढरपुरावरून घरास येतों. निरोप देतों म्हणून नाना बोलले आहेत."

नं. २६८३. (आषाढ शु० ८–७ जुलई.)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र पै॥ छ० ६ साबान.—

"श्रीमंत राजश्री दादासाहेब कोंडाईबारी चढून छ० २ (?) रुजवीं पिंपळनेरास आल्याचीं पत्रें राजश्री हरीपंततात्यांचीं काल आलीं. तात्याही गंगा उतरतात. याउपर लवकरच भेटी होतील."

नं. २६८४. श्री. (९ जुलई.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवसीं,

पोष्य कोन्हो बहिरव. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत आषाढ शु॥ १० जाणोन स्वकीय लिहीत असलें

---

१ पत्र नरगुंदाहून.

पाहिजे. विशेष. आपण पत्रें जासुदाबरोबर पाठविलीं त्याचें उत्तर पावलेंच असेल. अलीकडे अधिकोत्तर वर्तमान कांहीं आलें नाहीं. कोडयाळ बंदर झुंजत आहे. मोर्चे टिपूनें लाविले आहेत. पर्जन्य फार. चार पांच हजार घोडे मेले. उंट, बैल तो मनस्वी खराब जाहले. पट्टणास फौज बार पाठवून खासे जमावसुद्धां कोडयाळास आहेत म्हणून वर्तमान आलें. कळलें पाहिजे. आपणाकडे उत्तरेकडील वर्तमान आलें असेल. श्रीमंत दादासाहेब यांस आणावयास राजश्री हरीपंततात्या व होळकर गेले होते; ते आले कीं काय हें वर्तमान लिहावें. सदैव पत्रीं परामर्ष करावा. आह्मी आपले आहों. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २६८५. श्री. ( आषाढ शु० १५-१४ जुलई. )

राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामींचे सेवेशीं.—

विनंती उपरी. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांच्या व राजश्री हरीपंत व तुकोजी होळकर यांच्या भेटी धोडपेनजीक जाल्या. प्रस्तुत बोलण्यांत व करण्यांत सरळता फार चांगली आहे म्हणोन हरीपंतांचीं पत्रें आलीं. भेटी आषाढ शु० १२ स भृगुवारीं जाल्या. श्रीमंतांचा मनोदय आनंदवल्लीस राहावयाचा, आणि येथून तीन चार पत्रें लिहिलीं कीं कचेश्वरचें राहणें करावें. येविशीं हरीपंतानीं लिहिलें कीं, " भेट जाली. याउपर बोलून हेंच घडावें असें चित्तापासोन आहे. ठरेल तें लिहून पाठवूं. " असें लिहिलें आहे. हें वर्तमान आपणास कळावें म्हणून लिहिलें आहे. आपण कधीं तासगांवास पोंचलां तें लिहून पाठवावें. रा। छ० १३ साबान हे विनंति.

---

१ मंगलोर. २ हें पत्र नानाफडणिसानीं लिहिलेलें आहे.

नं. २६८६. ( १४ जुलई. )

परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस पत्र. रवाना छ० १३ साबान—

" आह्मीं आषाढ शु॥ सप्तमीस रविवारीं निघून वानवडीस मुक्काम केला. दुसरे दिवशीं थेउरास आलों. तेथून निघून भुलेश्वराचें दर्शन घेऊन मोरेश्वरास आलों. तेथून पुलावरून निरापार होऊन फलटणावरून क्षेत्रास चतुर्दशी रविवारीं प्रातःकाळीं आलों. येथें त्रिरात्र राहून मंगळवेढ्यास आंब्यास जाऊन वद्य अष्टमीं रविवारीं तासगांवास येत आहों. "

नं. २६८७. श्री. ( २२ जुलई. )

पैवस्ती छ० २१ साबान. सन आर्बा समानीन. आषाढ मास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामींचे सेवेसीं.—

पोष्य काळो बहिरव. साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करावें. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लेखन करावें. यानंतर दक्षिणेकडील वर्तमान तर टिपू सुलतान बहादर अद्यापि कोडियाळावर पायदळसुद्धां आहे. कोडियाळ जुजत आहे. हस्तगत कांहीं जाहलें नाहीं. फौज घांटावर पट्टणच्या सुमारें आली. खालीं पाऊस फार, यामुळें फौजेचा टिकाव होत नाहीं. यास्तव फौज घांटावर रवाना केली. पायदळ व खासा खालीं आहे. कळावें याकरितां लिहिलें आहे. आपणाकडून सविस्तर लिहिलें पाहिजे. यंदां महायात्रेस जाणारांची रवानगी करणार किंवा काय तें लिहून कळवावें. अगोदरच कळविलें ह्मणजे जाणारे यात्रेकरू आपले उद्योगांत असतील. यास्तव सूचना लिहिली आहे. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

नं. २६८८. श्रीगणपती. ( भाद्रपद शु० ५–१ सप्तंबर. )

चिरंजीव राजश्री दादा यांस प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी " चिरंजीव राजश्री विठ्ठलराव बापू यांस श्रीमंतांकडे नेऊन निरोप देविला. चिरंजीव राजश्री नानाकडे गेले. त्याणीं वस्त्रें दिलीं. चिरंजीव राजश्री सुभेदार श्रीमंतांची आज्ञा घेऊन आले आहेत. राजश्री रामजी पाटील करवीर प्रकरणीं बोलावयास आले होते जे, चिठ्या दिल्या, परंतु त्यांत दिक्कती येतात यास्तव पारिपत्य होऊन काम लौकर ठरावें. तोफखाना लौकर पाठवावा म्हणोन बोलले. तोफखान्याची रवानगी लवकरच होईल. मीं निरोपाविशीं विनंती केली, परंतु विचारास येत नाहीं. चिरंजीव राजश्री उभयतां श्रीमंतांकडे निरोपास गेले ते समई मी व विसाजीपंत बरोबर होतों. तसेंच राजश्री नानाकडे गेलों. राजश्री तात्याकडे जावें; त्यास बागेंत भोजनास गेले होते. नाना दादा घाणेकर यांचे घरीं मेजवानीस गेले होते. व मी राजश्री आपाबळवंत यांचे घरीं बागेंत भोजनास गेलों होतों, म्हणोन लिहिलें तें कळलें. चिरंजीव राजश्री सुभेदार समयासच आले. चिरंजीव राजश्री विठ्ठलराव बापू व चिरंजीव लक्ष्मीबाई प्रतिपदेस मिरजेस आलीं. र॥ छ० ३ सवाल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २६८९. श्री. (आश्विन शु० १५–१० आक्टो.)

पैवस्ती छ० ३ जिल्काद. सन आर्बा समानीन. आश्विन. श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांसीं.—

प्रती सुंदरदास बैरागी मुक्काम इचलकर्नी. जयगोपाळ विनंती विज्ञापना तागायत छ० १३ जिल्काद प्रातःकाळ वर्तमान यथास्थित

---

१ महादजी शिंदे यांजकडून पुणें दरबारीं वकील.

असे. विशेष. आम्ही आपला निरोप घेऊन आलों ते येथें आहों. श्रीमंत राजश्री दादासाहिब यांस उतार पडला. अद्यापि निखालस जाहले नाहींत. आम्हीं निरोप मागितला, त्यास ते तो फारच झटीं पडले. आठ रोज निरोप देत नाहीं, सदरेस बाहेर फिरावयास लागल्यावर आपणास निरोप देईन याप्रमाणेंच काकुळतीस येतात. याकरितां चार रोज राहणें जाहलें, काय करावें ? उपाय नाहीं. दिवसेंदिवस उतार पडतो. कांहीं चिंता नाहीं. आपल्यास बोलिलों त्याप्रमाणें समंधाचा बंदोबस्त करून धरावर आणले. श्रीव्यंकटेशाच्या मूर्ति आम्हांस दिल्या. मिरजेस घेऊन जाणें; अथवा येथें मठ बांधून देतों, येथें ठेवाव्या, याप्रमाणें म्हणतात. त्यास येथें मळ्यामध्यें देवालय बांधोन श्रीची स्थापना करितों. मठ तयार होईतों मिरजेस मूर्ति पालखींत घालून घेऊन येतों. श्रीमंत राजश्री दादा म्हापणास श्रीदेवास दर्शनास जाणार. निखालस आरोग्य जाहलें म्हणजे जातील. कळलें पाहिजे. आपली शरीरप्रकृत कशी आहे ती लिहावी. त्याप्रमाणें एका दिवसाचे अवकाशें निरोप घेतों. येऊनं बंदोबस्त करून देईन. धण्यास खंडेराजुरीकराकडील रुपयेविशीं विनंती केली, त्यास स्वामीनीं कृपा करून परवानगी मजमदाराकडेस सांगितली असतां अद्याप रुपये आले नाहींत. आम्हांस तो खर्चाची निकड भारी. मजमदार तो आलस्यावर घालितात. ऐसीयासीं मजमदारास ताकीद करून कुळास जरब देऊन रुपये येत ते करावें म्हणजे धण्यानीं दिलेसे होतील. माझी चिंता धण्यास आहेच. परंतु सूचना लिहिली आहे. मी यावयाचे पूर्वीं रुपये येईसें करावें. खर्चाची निकड जाणोन विनंती लिहिली आहे. मजमदारास आज्ञा केल्यास चित्तावर घेऊन फडशा लवकर होत नाहीं ! सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ व्यंकटराव घोरपडे.

नं. २६९०. श्री. ( ११ आक्टोबर. )

पैवस्ती छ० २२ जिल्काद. सन आर्बा समानीन. आश्विन मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेसीं.—

पोष्य विष्णो हरि भावे. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत आश्विन वदि प्रतिपदा, मुक्काम नरगुंद जाणून स्वकीय कुशल लिहावें. विशेष. इकडील वर्तमान कोड्याळ जुजतें. फिरंग्यांनीं टिपूस मारून कोसभर माघारे सारिलें. राजश्री आपाजीराम फुलचेरीस विवेक करावा म्हणन गेला. त्यास तेथें अटक केली. कडपेकर वगैरे तिकडले पाळेगार पांच सात हजार फौज मिळून गुरमकोंडें घेतलें म्हणन येथें बाजार वर्तमान आहे. सावनूर, गदग, नवलगुंद या प्रांतीं फौजा पाठवून तमाम लुटावें असें बाजारी वर्तमान. सध्यां गदगच्या उमळी गांवांस पांच सात खेड्यांस ठाणीं घातलीं परंतु इकडेस त्यांचीं ठाणीं आहेत तीं बेदील आहेत. वरकड वर्तमान राजश्री काळोपंत लिहितात त्यावरून श्रुत होईल. मी येथें येणें जाणेंचा कांहीं उगाव होईल म्हणून आलों. कांहीं कार्य होतां दिसत नाहीं. आठ पंधरा दिवस राहून आपल्या चरणासंनिध येतों. बहुत काय लिहिणें कृपालोभ असावा हे विज्ञापि.

नं. २६९१. श्री. ( आश्विन व० ४–१४ आक्टोबर.)

पैवस्ती छ० १९ जिल्काद सन आर्बा समानीन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेसीं.—

विनंती सेवक माणको चिंतामण मुक्काम ठाणें नागज कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना तागायत छ० १७ जिल्कादपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. ठाणें मजकुरीं पेठेंत सदाशीव ढोले सांगोलेकर यांचे घरीं छ० १६ जिल्काद मध्यरात्रीच्या सुमारें चोर येऊन मशारनिल्हेच्या मुलास मारामार

केली. चार जखमा लागल्या. व त्याचे आईस जखम एक येणें प्रमाणं मारामार केली. तों गलबा जाहला व चोर पळाले. तेव्हां वर्तमान कळल्यावर रात्रींच मशाला लावून बेरडाकडून माग काढविला तों मौजे अरेवाडी कर्यात ढालगांव येथील शिंवेंत दोन तीन घटका दिवस आला तों माग गेला. तेथून गांवकरी यांस सांगून पाठविलें. तेव्हांच गांवकरी याणीं यावें ते दो प्रहरा मागावर आले. ढालगांवकर बेरडानीं मागाची काडी हातीं घेऊन माग पुढें चालवावा, इतकियांत आपाजी पाटील मन मानेसें भाषण करूं लागला. तेव्हां आम्हांकडील गृहस्थ बोलिले कीं, " तुम्हांस कांहीं संशय असला तर मूळ माग व येथील शिंवेवरील ताडून पाहून तिराइताचे गुजारतीनें पदरीं घेणें. " असें म्हणत असतां आपाजी साफ बोलिला कीं, आम्ही माग पदरीं घेत नाहीं. ऐसें बोलोन माघारा गेला. तेव्हां चोरीचा जाबसाल त्याजकडे लागला. हेविसीं विनंतीपत्र लिहिलें आहे. तरी मौजे मजकुरास ताकीदपत्र देऊन याचा फडशा होय तें करावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभाची वृद्धि कीजे हे विनंती.

नं. २६९२. श्रीजगदंब. (आश्विन व० १२–२३ आक्टो०)

पैवस्ती छ० २८ जिल्काद. सन आर्बा समानीन. आश्विन मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

सेवक आबाजी गोपाळ फडके. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ जिल्काद. गुरुवार. मुकाम किल्ले भूधरगड. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींची आज्ञा घेऊन निघालों तों कणगल्यांस आलों. तों करवीरकरांचे लोक आमचे वाटे डावे उजवे कोस दोन कोसीं आहेत म्हणून बातमी आली. लाडगांव भैरववाडीपासून एक कोस आहे. तेथें त्यांजकडील चार पांचशें माणूस व शंभर राऊत होते. म्हणून एक मुक्काम करून वाटेची पक्की बातमी

आणून मध्यरात्रीस तयारी करून भैरववाडीवरून नीट सरळ वाटेनें किल्ल्याचे माचीस तिसरे प्रहरीं दाखल जाहलों. दुसरे दिवशीं मुकाम जाहला. तिसरे रोजीं गडकरी भेटीस आले. त्यांचें बोलणें चालणें बेलभंडार होऊन छ० २४ रोज मंगळवारीं प्रातःकाळीं लोकसुद्धां किल्लेवर चढलों. स्वामीचे पुण्यप्रतापें योजिलें कार्य सिद्धीस गेलें. चिकोडीकरांचे लोक झाडून खालीं उतरले. जुने गडकरी वरती आहेतच; व मीं पहाऱ्याचा बंदोबस्त आमचे लोक ठेऊन केला. आणखी भरतीस दोनशें माणूस निदान पाहिजे. याविषयीं यजमानांस विनंती लिहिली आहे. फारकरून लवकरच पागा व पायचें माणूस यावेंसें आहे. चिकोडीकरांचें माणूस फार चांगलें, आठशें नऊशेंपर्यंत व पावणाशें असामी एकांडे शिलेदार, याप्रमाणें होतें. त्याप्रमाणेंच आमचें माणूस येऊन बंदोबस्त झाला पाहिजे. सेवेसी सूचना लिहिली आहे. किल्ल्यावर सवा कोसीं चौफेर आहे. जागा फार थोर आहे. किल्ल्यावर हवाशीर जागा चांगली नाहीं. झाड तों अगदींच नाहीं. सारखा कातळ आहे. वायु फार आहे. पेठेंत जागा रोशनाईची चांगली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २६९३. श्री. (कार्तिक शु० १–२६ आक्टो० )

पैवस्ती छ० २ जिल्हेज. सन आर्बा समानीन. कार्तिक मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक रामोजी अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० २९ जिल्कादपावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. "परगणे तेरदळ येथें कलाल आहेत म्हणोन कळलें; त्याजवरून हें पत्र लिहिलें असे. तरी त्यांजकडील दस्त न आला तरी चिंता नाहीं, या उपरी कसबे मज-

---

१ पत्र तेरदाळाहून.

कुरीं व गांवगन्ना कलालांचीं दुकानें असतील तीं बंद करणें. दारू करूं नये अशी ताकीद निक्षून करणें. ताकीद जाहली असतां अतःपर दारू जाहल्यास त्यांचें पारिपत्य होईल; व तुह्मास जाबसाल पुसावा लागेल. " म्हणून पत्रीं आज्ञा, त्यास पहिलेपासून दारू करूं नये अशी कलालांस ताकीदच आहे. प्रस्तुत आज्ञेप्रमाणें कसबेचे कलालास आणून दारू करूं नये अशी ताकीद करून जामीन घेतले. कोठें गांवगन्ना असतील त्यांसही आणवून निक्षून ताकीद करितों. बहुत काय लिहिणें सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २६९४. श्री. ( २८ आक्टोबर. )

पैवस्ती छ० ९ जिल्हेज. सन आर्बा समानीन. कार्तिक मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

पोष्य विष्णो हरि भावे. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत कार्तिक शु॥ ३ मुक्काम नरगुंद जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा करावी. विशेष. इकडील अंतर्यामींचें वर्तमान टिपून वीस रोजाखालीं गोळी लागून मृत्यु पावला म्हणून वर्तमान सिदराम सेटी नागप्पा तेथें बंदीस आहे त्याकडून मनुष्य आला तो सांगत होता. आणखी एक दोन ठिकाणचीं वर्तमानें याच प्रकारचीं आलेलीं आहेत. परंतु कागदींपत्रीं प्रसिद्ध नाहीं. कागदपत्र चालत नाहीं. सध्यां कागदपत्राकरितां म्हणून त्याचा भाऊ आहे त्याच्या नांवीं होत असतात. या प्रांतीं धारवाडास दुसरा किल्लेदार व दुसरा सुभेदार येणेंप्रमाणें रवाना केले म्हणे. राजश्री कृष्णराऊ आहे तो मराठेचें सूत्र राखितो म्हणून त्यास दुसरे पाठविणार. येणेंप्रमाणें वर्तमान आहे. ऐकिलें वर्तमान श्रवण व्हावें या अर्थें लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपालोभ असावा हे विज्ञप्ति.

नं. २६९९. श्री. ( २८ आक्टोबर. )

पैवस्ती छ० १२ जिल्हेज. सन आर्बा समानीन. कार्तिक मास.

सेवेसीं विनंती सेवक भिवराव गोपाळ कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत कार्तिक शु॥ ३ पावेतों स्वामीचे कृपावलोकनें क्षेम असे. विशेष. आमचे शरीरीं समाधान नव्हतें, सबब तीं॥ राजश्री जिवाजीपंत स्वामीची आज्ञा घेऊन आले. भेटी जाहली. स्वामीचे कृपेंकरून आरोग्य जाहलें. इकडील वर्तमान नबाब टिपू सुलतान बहादर कोडयाळास मोर्चे देऊन चार पांच मास होत आले. अद्याप कोडयाळ हस्तगत नाहीं. तहाचा ठराव होऊन इंग्रजांचे कागदपत्र कलकत्त्यास गेले आहेत. त्यांचीं उत्तरें येईतोंपर्यंत गोळागोळी होऊं नये. इंग्रजाकडील दोनशें लोक बहादरांनीं आपल्या लष्करांत आणून पहाऱ्यांत ठेविले आहेत. यांजकडील दोनशें लोक इंग्रजानीं कोडयाळांत ठेऊन पहारा दिला आहे. तहाचा मजकूर इंग्रजांचा मुलूख बहादरानीं घेतला तो झाडून सोडून द्यावा व पुढें पूर्ववत्प्रमाणें आपलाले हद्द बरहुकूम रहावें. दुतर्फा लढाई करूं नये. याप्रमाणें निश्चयांत आलें आहे म्हणोन लष्करचीं एक दोन पत्रें आलीं. परंतु इंग्रजांचीं उत्तरें आल्यावर काय ठरेल तें पहावें. इकडील सलुकाचा मजकूर " सुरतवाल्यांस तुम्हीं ताण दिला नाहीं, याजमुळें सारी मसलत आह्मावर झुकोन आली. तीन वर्षें मसलत जातीवर पडली. दोन तीन करोडी खालीं आलों. दौलत खराबीस आली. " म्हणून आम्हाकडील गृहस्थ तेथें आहेत त्याजपाशीं तावाच्या गोष्टी बोलतो. परंतु अंतरंगें श्रीमंतांसीं बिघाड केल्यास दौलतीस अपाय घडेल, हें पुर्ते ध्यानांत आलें आहे. कैलासवासी थोरले नबाबाचे ताले सिकंदर. प्राक्तनवान् पुरुष. त्यांचा बंदोबस्त यास येणार नाहीं. हे समयीं पन्नास हजार फौज आ-

ल्यास तमाम प्रांत सुटतो यांत संदेह नाहीं. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. स्वल्प दिवसांत तेंही घडेल ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २६९६. श्री. ( २० नोव्हेंबर. )

पैवस्ती छ० २८ जिल्काद. सन आर्बा समानीन. कार्तिक मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

पोष्य विष्णो हरि भावे. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक वद्य ११ जाणून स्वकीय कुशल लेखन आज्ञा करावी. विशेष. इकडील वर्तमान टिपूची बाजार आवाई येत होती ती लटकी. तो आहे. बाहेर फिरत नाहीं. फिरंग्यांचा जोरा भारी आहे त्या शहास गुंतला आहे. चिरंजीव राजश्री विनायकपंतास मजकडील मजकूर लिहिला आहे तें श्रुत करितां कळेल सर्व गोष्टीस आधार आपलाच आहे. बहुत काय लिहिणें कृपालोभ असो द्यावा हे विज्ञप्ति.

नं. २६९७. श्रीगणपति. ( मार्गशीर्ष शु० ३–२७ नो० )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद. उपरी. येथील कुशल ता॥ छ० २ मोहरमपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस फारच समाधान नाहीं म्हणोन राजश्री बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचें पत्र आलेलें आपणास पाहावयास पाठविलेंच आहे. हल्लीं " उतार पडला . स्नान करून चार घटका ध्यान धरून बसतात. व राजश्री बाजीराव बर्वे यांस तीन चार हजार रुपयेचा गांव द्यावयाचा करार होऊन त्यांस पुणियास आणिलें " म्हणोन

---

१ पत्र नर्मदाहून.

बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांचें पत्र काल आलें. आपणांस कळावें म्हणून लिहिलें आहे. हे आशीर्वाद.

नं. २६९८. **श्रीगणपति.**

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. कृष्णाबाई शिंदे येथें[1] आहेत. त्यांस काय उत्तर सांगावें म्हणून लिहिलें, त्यास राजश्री निळकंठराव शिंदे येथें[2] आहेत तेही नित्य येऊन आम्हांस पुसतात. त्यांस आम्ही सांगतों कीं, " घरचे घरांत मायलेंकरांनीं समजून असावें. सरकारांत येविशींचा बोभाट सांगूं नये " असें सांगितलें. आपणही कृष्णाबाईस याचप्रमाणें सांगावें. कृष्णाबाईनीं आपला आप्त असेल तो लेंकाकडे पाठवून घरचे घरांत मायलेंकरांनीं समजावें हे ठीक. जघन्यतेंत आणूं नये असें सांगावें. महिना दोन महिने राहिल्याशिवाय दोघांचा दम जिरणार नाहीं. अशा जाबसालांत ते आपआपल्यांत आपणच समजतांत[3]. कळावें हे आशीर्वाद.

नं. २६९९. **श्री**[4]. ( मार्गशीर्ष व० ६–१५ दि० )

राजश्री बाळाजीपंत नाना गोसांवी यांसीं--

सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥

तुकोजी होळकर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत दादासाहेबांचे शरीरीं समाधान नव्हतें, मध्यें चांगलें

---

१ मिरजेस. २ तासगांवास. ३ आई व मुलगा भांडून सरकारांत फिर्याद घेऊन आली त्यांची आपसांत समजूत पाडण्याची ही खाशी युक्ति ! ४ हें होळकरांचें नानाफडनवीस यांस आलेलें पत्र पूर्वी एकदां आम्हीं नानाफडनवीस यांच्या चरित्रांत छापिलें आहे.

आरोग्यही झालें होतें, फिरून ज्वर होऊन मार्गशीर्ष वद्य तृतीयेस गुरुवारीं अवशीचे सहा घटका रात्रीस कैलासवास झाला, म्हणोन लिहिलें. ऐकून चित्तास बहुत खेद जाहला. जी गोष्ट घडणार त्यास यत्न कोणाचाही नाहीं. श्रीसत्ता प्रमाण. राजश्री विसाजी आपाजी यांची रवानगी श्रीमंत मातोश्री आनंदीबाई व श्रीमंत राजश्री बाजीराव यांचे समाधानार्थ केली, उत्तम आहे. रवाना चंद्र २० मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे ही विनंती.

नं. २७००. श्री. (मार्गशीर्ष व० ९--१८ दि०)

पैवस्ती छ० २३ मोहरम. सन आर्बा समानीन. मार्गशीर्ष मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक जिवाजी केशव नेने. दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम तागायत मार्गशीर्ष व॥ ३ पावेतों मुक्काम पुणें येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित जाणोन लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष. बहुत दिवस स्वामीकडून पत्रें येऊन सेवकाचा सांभाळ होत नाहीं. त्यास सदैव पत्र पाठवून सांभाळ करावयाची आज्ञा केली पाहिजे. विशेष. मी रहिमतपुराहून इंदोली महाल येथील मामलतीचे हिशेबास पुण्यास येऊन दोन मास जाहले. हिशेब विल्हेस लाविला. सालमजकुरीं मामलत सरकारांतून सेवकाकडे ठरली. स्वामीस कळावें. तीर्थस्वरूप राजश्री धोंडोपंतदादा शहापुराहून मिरजेस हिशेबास येणार आहेत. आले म्हणजे मी स्वामींचे भेटीस महिना पंधरा दिवसांनीं येईन. येथील वर्तमान तरी नवलविशेष लिहावें ऐसें नाहीं. श्रीमंत राजश्री हरीपंततात्या यांचा मुक्काम गारपिरावर होता, तो काल मंगळवारीं कूच करून वानवडीवर गेले. फौज समागमें दोन हजार आहे. शरीरीं तात्यांचे किंचित समाधान नाहीं.

पोटांत दुखत असतें. राजश्री भवानी शिवराम यांचें कूच होऊन दोन कोसावर राहिले आहेत. समागमें दोन चार हजार फौज आहे. अमदाबाजेस जातात. स्वामीस कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७०१. श्री. ( २८ दिसेंबर. )

पैवस्ती छ० ८ सफर. सन आर्बा समानीन पौषमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं. पोष्य राघो विष्णु भावे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम तागायत पौष शु॥ ५ जाणून स्वकीय कुशल लेखन आज्ञा करावीं. विशेष. स्वामीकडून बहुत दिवस पत्रागमन होऊन सांभाळ होत नाहीं. तेणेंकरून चित्त सापेक्षित असे. ऐसें नसावें. सदैव पत्रानीं संतोषवावयास खावंद आहां. इकडील वृत्त राजकी कोडच्याळचा किल्लेदार महमदअल्ली कुमदान याजपाशीं आठ नऊ महिने होता. त्यास टिपू याणीं पाठवून देणें म्हणून सांगून पाठविल्यावरून पाठवून दिलें. त्यास टिपू याणीं गळास दिलें. हें वर्तमान कुमदान याणीं ऐकून याची चाकरी करूं नये म्हणून आपली जमातसहित निघून जाणार होता. हें वर्तमान टिपूस कळोन फौजसहित त्यास वेढून कैद करून बेडी घालून कपालदुर्गास पाठवीत असतां वाटेंत जीभ उपटून घेऊन मेला. कोडच्याळ अद्यापि ठाणें पडलें नाहीं. व इंग्रज टिपू यांचा सल्लाही अद्याप नाहीं. नगरापासून आठ कोसावर आनंदपुर गांव आहे तेथें तोफा सुमार ५० व बार दोन हजार आणविले आहेत. इकडे यावयाची मसलत आहे. त्याच्या लष्करांत रास्ते यांचे राऊत होते ते माघारे आले; त्यानीं वर्तमान सांगितलें. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपालोभ असावा हे विज्ञापना.

नं. २७०२. श्री.( भाद्रपद शु० ६–२ सप्टेंबर. )

*यादी बंदीवान अटकांत[1] किल्ले मिरज. सुरुसन आर्बा समानीन मय्या व अल्लफ. माहे सवाल. छ० ४ रोज ऊर्फ भाद्रपद मास. जमा–

४ गु॥ खंडापा[2] कोळी.

२ दुधोंडीकर कदम. डबीराच्या वादाकरितां. बेडी. पोटास सरकारचें.

१ तुकोजी पाटील.

१ राणोजी कदम.

—

२

बेड्या घालाव्या.

२ माजे कुकटोळीकर कुड व लालगे पाटीलकीच्या वादाकरितां.

मयत. { १ जेठयापा.

{ १ पिराजी.

—

२

मोकळे. पोटास घरचें.

—

४

---

* या यादींत मोठ्या टाइपांत छापलेले शब्द गंगाधरराव बाळासाहेब यांचे हातचे आहेत. त्यांचें लिहिणें झाल्यावरं मागून बंदिखान्यावर देखरेख करणाऱ्या कारकुनानें जे बंदिवान सुटले अगर मयत झाले त्यांच्या नांवामागें 'सुटला', 'मयत' वगैरे शेरे लिहिले आहेत ते बारीक टाइपांत छापिले आहेत. याद सवाल महिन्यांत झाली असून तींत कारकुनाच्या हातची सर्वांत शेवटची तारीख २० रबिलाखर ही आहे. म्हणजे सवालपासून रबिलाखरअखेरपर्यंत निदान सात महिने तरी बंदिवानांची संख्या मयत व सुटलेले खेरीजकरून यादींत वर्णिली आहे तशीच होती असें दिसतें.

१ येथें अटक शब्द पुल्लिंगी केला आहे. २ खंडापा कोळी याच्या ताब्यांत असलेले चार बंदिवान. याचप्रमाणें पुढेंही समजावें.

५ गु॥ कृष्णाजी भोंसला.

| | |
|---|---|
| बेडी घालावी. | १ आपाजी मैंद देवरअष्टेकर. मोऱ्याच्या वादाकरितां. मोकळा. पोटास सरकारचें. |
| बेडी घालावी. | १ आपाजी शिंदा पाटील कुंडलापूरकर. पाटीलकीचे वादामुळें खोटा होऊन मोकळा. पोटास सरकारचें. बेडी. |
| | १ भीमगौडा अंकलीकर पाटीलकीचे वादामुळें खोटा होऊन मोकळा. पोटास घरचें. |
| मार द्यावयाचा. रुबरू[1] आणावें. | १ गेनगौडा पाटील माज दिगरज. जाजती जमिनीचे रुपयेकरितां. बेडी. पोटास सरकारचें. |
| नासिक छेदन करावें. | १ पार्वती. सत्यागा मगदुम सलगरेकर याची स्त्री. इमामखान बंडगर मोळेंकर याजबरोबर कुकर्म केलें सबब. पोटास सरकारचें. |

५

१ आम्हासमोर.

३ सखाराम रजपूत याजकडे.

३ नवल्यालकर चेनबसापा याणें पेशजी ऐनापूरचे बाजारकरी यांस नागवून घेतलें. चेनबसापास धरून आणून हात तोडला. तो बाहेर जाऊन दावे मौजे कित्तूर का। मजकूर येथें दावे केले, म्हणून चेनबशा याचा बाप व भाऊ. मोकळे. पोटास सरकारचें.

मार द्यावयाचा आहे. रुबरू आणावें.

सुटले.
१ बसापा बाप.
१ धुळापा भाऊ.
१ आपण्णा भाऊ.

---

३

१ गु॥ भरमाणा अथणीकर. देवजी बाबाजी कुलकर्णी येळावीकर. वादामुळें खोटा होऊन मोकळा. पोटास घरचें.

२ गु॥ शेखजी बाणेकरी.

१ मोहदीन साहेब हाड्या कुडचीकर. बेडी. पोटास घरचें.

१ देवजी पाटील सावळज-
कर. बाबाजी पाटील
सावळजकर याचे वादा-
मुळें. बेडी. पोटास घरचें.

१ निंबाजी मखदुम कुकटो-
ळीकर पाटीलकीचे वा-
दाचे रुजुवातीस आणिला.
मोकळा. पोटास घरचें.

---

३

२ गु॥ मिराखान काळा. खंडेरा-
जुरीकर पाटीलकीचे वादामुळें
खोटे म्हणून. मोकळे. पोटास
घरचें.

बेड्या घालाव्या.

बेडी घातली. { १ येसाजी.
१ राणोजी. }

१ गु॥ वडेखान. बाळ्या बेरड
कौजलगीकर यादवाडाहून पा-
ठविला. चोरीच्या कज्याकरि-
तां. बेडी. पोटास सरकारचें.
असामी तीन पैकीं.

१ शेळ्या मयत किल्लेमजकुरीं.
१ शिव्या जंगम. सुटला.

---

२

बाकी बाळ्या.

२ गु॥ निंबाजी पाटोळा.

१ जयाजी भोंसला खंडेराजुरीकर. पाटीलकीचे वादामुळें खोटा होऊन. मोकळा. पोटास घरचें. बेडी.

१ पत्राडी कोरे दिगरजकर. बाहेर जाऊन दाव्याची चिठ्ठी बांधली सबब. मोकळा. पोटास घरचें.

---

२

२ गु॥ देवण्णा दळवाई.

मार देणार.

१ सातापा माळी मिरजकर याणें आपली लेंक मिरजकर माळ्याचे घरीं देऊं केली असतां तेरदाळकर माळ्याचे घरीं दिली सबब. बेडी. पोटास घरचें.

बेडी घालावी.

१ चिलोजी पाटील मौजे भोसेंकर. वादामुळें खोटा म्हणून. मोकळा. पोटास घरचें.

---

२

२ गु॥ राणोजी खेळजी. नागराळें-
कर जाधव रणनवरेच्या वा-
दाकरितां. मोकळे. पोटास
घरचें.

बेड्या घालाव्या.
{ १ म्हसाजी जाधव
पाटील.
१ शिवाजी पाटील.

—
२

३ गु॥ लक्ष्मण कैकाडी. सावळज-
कर पाटील. बनापाचे वादा-
करितां. पोटास सरकारचें.
१ शिदापा. बेडी.
२ शिदापाची भावजय व
मुलगी.

—
३

बेडी घालावी.
१ गु॥ शेख मोहिद्दीन. गुरापा
तिरगुळ मालगांवकर मळ्याचे
कज्याकरितां. मोकळा. पोटास
घरचें.

२ गु॥ इरापा मल्लापा. मालगांवकर
जंगम. मोकळें. पोटास घरचें.
फटामुळें खोटे होऊन.

बेड्या घालाव्या.
{ १ गंगाधर अय्या.
१ बसलिंगा.

—
२

१६ गु॥ अजमखान शीक. नवा दारूखाना.

१ स्वरूपजी आऱ्या.घाट नांदरेकर. जरडीक (?) मौजे मजकूरचे शिवेचे कज्याकरितां.जामीन घेणेबद्दल. मोकळा. पोटास घरचें.

( त्यानें ) जामीन द्यावा. नाहीं तर मार देऊन बेडी घालणार असें सांगावें.

१ लिंगापा बिन सदाशिव पाटील दिगरजकर.बाकीकरितां. पोटास घरचें.

मार देणार. नंतर बेडीची परवानगी होईल.

१ चोरोचीकर पाटील. जामिनाकरितां. मोकळे. पोटास घरचें.

१ सुलतानजी.
१ हणमंता.

—

२

बेड्या घालाव्या.

१ सावंता जैन दिगरजकर बुद्रुकचे चौगलपणाचे वादाकरितां खोटा होऊन. मोकळा. पोटास घरचें.

१ करकंबकर शेटे आवटेपणाच्या वादाकरितां.मोकळे. पोटास सरकारचें.

| | |
|---|---|
| १ मिंबाजी.<br>१ सुभानजी. | अप्रादिक[1] आहे. सुटतील. |
| -- | |
| २ | |
| ३ कवठें पिरानीं बाकीकरितां. मोकळे. पोटास घरचें. | |
| १ पिराजी पाटील.<br>१ बापूजी.<br>१ सुभानजी संताजी पाटील. बाकीकरितां. बेडी. पोटास घरचें. | मोकळे असतील त्यांस बेड्या घालाव्या. मार देणार. रुबरू आणावे. |
| -- | |
| ३ | |
| १ संताजी जिनगर. कुणाबिणीचे कज्याकरितां. मोकळा. पोटास घरचें. | |
| ४ जांब प्रांत खटाव. | |
| १ येसाजी शिंदे.<br>१ मालोजी शिंदे.<br>१ मोरोजी शिंदे.<br>१ कुसाजी शिंदे. | चार दिवसांत सुटतील. |
| -- | |
| ४ | |

[1] अजून काय करावें हें ठरलेलें नाहीं.

गुन्हेगारी घ्यावी. जामीन चांगला घ्यावा. न दे तर शासनाची आज्ञा होईल.

१ येल्लापा रुजू मल्लापा वाणी. गुरुवार पेठेंत महादापा वाणी याचें दुकान फोडलें. बेडी. पोटास घरचें.

---

१६

१४ गु॥ शेख मोहिद्दीन गाडदी. चुन्याच्या चाकाजवळ.

१३ देवरअष्टेकर. मोकळे. पोटास घरचें. रुजू सरकारचे.

१ गोंदजी सुभानजी.
१ येलोजी.
१ पिराजी लक्ष्मण.
१ राणोजी कुसाजी.
१ बाळोजी.
१ सुभानजी लक्ष्मण.
१ राणोजी संभाजी.
१ रघोजी गोंदजी.
१ स्वरूपजी मानाजी.
१ पदाजी सुभानजी.
१ दारकोजी संभाजी.
१ नरसोजी बाळोजी.
१ महादजी बाळोजी.

---

१३

| | |
|---|---|
| बेडी घालावी. | १ महादशेट शेट्या राहिमतपुरकर. मोकळा. पोटास घरचें. |
| | —— |
| | १४ |
| | ७ गु॥ कित्ता शेख मोहिद्दीन. |
| | ४ मंगळवेढेंकर देशमुख. |
| (त्यानीं) जामीन द्यावे. सोडून देऊं. बेरडाप्रमाणें जामीन द्यावे. | १ ईश्वरा.<br>१ महिपतराव.<br>१ शेटी शाजानी.<br>१ जखापा शाजानी. |
| | —— |
| | ४ |
| | मोकळे. पोटास घरचें तूर्त. |
| | १ गोंदजी बुदगांवकर पाटील. मोकळा. पोटास घरचें. |
| | २ धुळगांवकर कुकटोळ्ळीकरांचे जामीन. मोकळे. पोटास घरचें. |
| जामीन जाहलेप्रमाणें वर्तणूक करवावी. नाहीं तर पारिपत्य होईल. | १ मानाजी चौगुला.<br>१ सुलतानजी पाटील. |
| | —— |
| | २ |
| | पागेंत शिरटीकरांचे जागेवर. |

1 ज्याला जामीन राहिले आहेत त्यांजकडून.

१२ शिरटीकर देसाई. चौकी खास पथक. पोटास सरकारचें.

४ देसाई नि॥ खुद.
२ बाइका.
१ पुत्र.
--
४

३ कारकून.
१ व्यंकटराव.
१ तुको रंगदेव.
१ भीमराव बाळकृष्ण.
--
३

२ कुणबिणी
१ केंच बसापा जामदा.
१ तेली हुसेन.
१ चाकरीचा माणूस.
--
१२

पोटास सरकारचें. मोकळे.

१४ खास पथक गाडदी.
जिभींत.

जामीन घ्यावा. — सुटला. — १ रामजी पाटील तुपारीकर. भाऊपणाचे कजियेबद्दल. जामिनाकरितां. मोकळा. पोटास घरचें.

४ प्रांत नांदरे येथील पांच चावरे.

१ सोमाण्णा.
१ तमाण्णा.
१ पासापा.
१ भोबाणा.

---
४

२ रामबा शेणवी याचे देणेकरितां खंडेराजुरीकर.

छ० १५ रविलावलीं परभारें रामबाची समजूत काढिली सबब सुटलीं.[1] पा। रवरू.

१ शिवापा चौगुला. मोकळा. पोटास घरचें.
१ आपाजीची स्त्री. पोटास घरचें.

---
२

[1] परधानणी समक्ष झाली सबब.

७ मिरजकर मांग. ह्माराचे क-
जियेकरितां.
१ सुभाननाक.
१ भरमनाक.
१ परसनाक.
१ बाळनाक.
--
४
१ गंगनाक.
१ घाटनाक.
१ ताननाक.
--
३
---
७
---
१४
२ शेख मोहिदीन याचे
चवकींत. बाहीर.
२ कथीलगार.
तुकापा.
फकीरा.
--
२

त्यानीं गुन्हेगारी द्यावी.
जामीन द्यावा.

| | |
|---|---|
| | १ सातापा जैन शिरगोपीकर याजकडे गाई मारल्याचा आळ आला सबब. मोकळा. पोटास घरचें. |
| हात तोडावा. बाजारचे[1] दिवशीं. | |
| बेडी घालावी. त्यानें बाकी वारावी. | १ शहाजी पाटील कवठेएकंद. बाकीकरितां. फतुल्ला बग याजकडे. मोकळा. पोटास घरचें. |

६४ बंदीखान्यांत.

| | |
|---|---|
| | १ अवधूता कोष्टी करकंबेकर याणें आपली बाइको मारिली म्हणून आळ आला सबब. खोडा. पोटास सरकारचें. |
| | १ देवजी बेरड. रहिमतपूरकर देशपांडे यांचे घरीं चोरी केली म्हणून. खोडा. पोटास सरकारचें. |
| | १ झाडनाक महार शिरगांवकर. वादामुळें खोटा झाला. मोकळा. पोटास सरकारचें. |
| मार दे[2]णार. नंतर बेडी घालावी. | १ काळोजी पाटील नागराळेकर. बाकीकरितां. मोकळा. पोटास घरचें. |

१ बाजार भरल्यावर तेथें नेऊन. २ एकवचन.

१ देवजी तेली इचलकरंजी-
कर. सोइरीकीचे कज्या-
करितां. मोकळा. पोटास
सरकारचें.

६ मौजे कुपवडें लांकडें मो-
टेचीं वगैरे चोरिलीं. पो-
टास सरकारचें.

१ पुनाजी बेरड.
१ एल्या. बेडी.
१ पुनाजीची भावजई
लगमी.
१ लगमीची लेंक लहान.
बया.

त्यांनीं गुन्हेगारी द्यावी.
जामीन द्यावा.

२ म्हार याणीं पेशजी
बेरडाचे घरीं चाक-
रीस होते ते रुपये
मागावयास आले
होते. बेरड मजकुरास
धरून आणिले तेव्हां
म्हारांस आणिले
बेड्या.

१ जया.
१ म्हाद्या.
—
२
—
६

| | |
|---|---|
| | २ दुधोंडीकर. डबीराचे वादाकरितां. पोटास सरकारचें. |
| बेडी घालावी. | १ सूर्याजी. मोकळा. पोटास सरकारचें.<br>१ पिराजी. बेडी. पोटास घरचें. |
| | — |
| | २ |
| त्यानें जामीन द्यावा. | १ नरोजी मखदुम सिपूरकर. मळ्याचा वाद देसाई याचा. मोकळा. पोटास सरकारचें. |
| त्यानें वाद वाजवी बोलून घ्यावा. | १ मल्हारजी शिंदा पाटील हरोलीकर. दावे केले सबब. बेडी. पोटास सरकारचें. |
| | १ राणोजी पाटील कारलेकर. सुलतानजी मारोळेकर यास जामीन जाला होता सबब बेडी. पोटास सरकारचें. |

१ पंचांमार्फत काय वाद असेल तो तोडून घ्यावा, दावे करीत असतो ते करूं नये, म्हणजे सोडून देऊं; असा अभिप्राय.

| | |
|---|---|
| गुन्हेगारी द्यावी[1]. जामीन द्यावा. | १ संतनाक मांग मंगसोळीकर. केंपवाडचे म्हशीचे चोरीबद्दल. बेडी. पोटास सरकारचें. |
| गुन्हेगारी द्यावी. जामीन द्यावा. | १ संतनाक मांग देगांवकर याणें मौजे दुधोंडी येथें कापुरकर कुळवाडी याचे घरीं चोरी केली. तांब्या व थाळा चोरिला. सबब बेडी. पोटास सरकारचें. |
| जामीन द्यावा. गुन्हेगारी द्यावी. | १ लिंबनाक मांग सांगोलेंकर. प्रां। ढालगांव येथील म्हशी चोरून घेऊन जात होता सबब. बेडी. पोटास सरकारचें. |
| गुन्हेगारी द्यावी. जामीन द्यावा. | १ मलनाक मांग आळतेंकर. कसबे सांगली येथें चोरीस आले होते असामी २ पैकीं सुटला १ बाकी १ बेडी. पोटास सरकारचें. |

१ 'गुन्हेगारी द्यावी,' 'जामीन द्यावा,' या वाक्यांत प्रत्येक स्थळीं 'गुन्हेगारानें' हा अध्याहृत कर्ता समजावा.

| | |
|---|---|
| | २ कसबे दिगरजकर मांग. देशपांडे याचे घरीं चोरी केली सबब. बेड्या. पोटास सरकारचें. |
| गुन्हेगारी द्यावी. जामीन द्यावा. | १ संतनाक मांग.<br>१ शेटनाक मांग.<br>—<br>२ |
| जामीन द्यावा. गुन्हेगारी द्यावी. | १ गोसजी जमदाडया मणेराजुरीकर. कवठेयेकंद येथें दावा केला. बेडी. पोटास सरकारचें. |
| गुन्हेगारी द्यावी. जामीन द्यावा, नाहींतर हात तोडावा. | १ माणिकभाई मळणगांवकर मौजे मजकुरावर शिंदे यांणीं दावा केला त्यांजबराबर होता सबब. मोकळा. पोटास सरकारचें. |
| गुन्हेगारी द्यावी. जामीन द्यावा. | १ केरोजी बेरड. आंधळीकर भोई याचे घरीं चोरी केली त्याजबद्दल. बेडी. पोटास सरकारचें. |
| | १ मलेवाडीकर घोरपडे याचे घरीं चोरीबद्दल आक्कोपंताचे सोबती. बेडी. पोटास सरकारचें. |

| | |
|---|---|
| पोटगी देऊन सुटावें. | १ हंसाजी.<br>१ सुभानजी.<br>१ भीकनाक मांग.<br>—<br>३ |
| | १ नाईकजी चव्हाण भडकंबेकर. दाव्याकरितां. बेडी. पोटास सरकारचें. |
| गुन्हेगारी घ्यावी. जामीन घ्यावा. | १ केरनाक मांग रायेवाडीकर. जायगव्हाण येऊन म्हशी मांग चोरून घेऊन जात होते त्यांस भाकरी घातली सबब. बेडी. पोटास सरकारचें. |
| गुन्हेगारी घ्यावी. जामीन घ्यावा. | १ भरमाण्णा जैन तेरदाळकर. वीरगौंडा पाटील मालगांवकर याचे घरीं रात्रीं शिरला सबब. बेडी. पोटास सरकारचें. |
| | १ शेषापा चौगुला शिरगोपीकर दाव्यास आला होता, धरून आणून बेडी. पोटास सरकारचें. |

१ बंदिखान्यांत असतां सरकारांतून पोटास दिलें आहे तें.

| | |
|---|---|
| गुन्हेगारी घ्यावी. जामीन घ्यावा. | १ आबापा धनगर अल-कुडकर याणें घोड्याच्या कळावा सोडून नेत होता सबब. बेडी. पोटास सरकारचें. |
| गुन्हेगारी घ्यावी. जामीन घ्यावा. | ३ कसबे दुधगांव येथील मांग मौजे वाडी का॥ सांगली येथें हरभरेची चोरी केली सबब. बेडी. पोटास सरकारचें. <br> १ लिंबनाक. <br> १ उमनाक. <br> १ व्यंकनाक. <br> — <br> ३ |
| गुन्हेगारी घ्यावी. जामीन घ्यावा. | २ मौजे बामणी कर्यात वांगी येथील बेरड याणीं मौजे नागांवनजीक हेरलें येथील बैल चोरून नेत होते ते उदगांवीं सांपडले. बेड्या. पोटास सरकारचें. <br> १ विडया. <br> १ लक्षा. <br> — <br> २ |

| | | |
|---|---|---|
| | | २ कुकटोळीकर पाटलाचे रुजुवातीस आणिले. मोकळे. पोटास घरचें. |
| गुन्हेगारी द्यावी. जामीन द्यावा. | | १ शिदराम चांभार.<br>१ ताननाक म्हार.<br>—<br>२ |
| बेडी घालावी. | मुटला. | १ जिवाजी पाटील नागराळेकर रणनवरेचे बाकीकरितां. मोकळा. पोटास घरचें. |
| बेडी घालावी. | | १ मिराभाई लंगरपेठकर. नवांत खोडा. मौजे मजकुरीं तोडातोड केली सबब. पोटास सरकारचें. |
| | | २ कवठेंपिरान येथील बाकीकरितां. |
| | | १ मानाजी पाटील. मोकळा. |
| बाकी द्यावी, जामीन द्यावा. नाहींतर मार देणार. रुबरू आणावें. | मयत छ० २९ रबिलाखर आर्बा. | १ काळसापा मुडच्या. रयत. बिडी. मोकळे. पोटास घरचें. |
| मार देणार. बाकी न दिली तर बेडी घालणार. | | १ नरसगौडा पाटील दुधगांवकर. बाकीकरितां. मोकळा. पोटास घरचें. |

३ मौजे केडें प्रांत सांवडें पाटीलकीचे लढेंबद्दल बापभावांचे वादाबद्दल.

बेड्या घालाव्या.

- १ कृष्णाजी पाटील.
- १ डांकोजी.
- १ मलाई म्हातारी.

---
३

पोटास घरचें.

सुटला.

१ आपाजी पाटील मांजरडेंकर तांबोळीण मेली तिचे चौकशीबद्दल. मोकळा. पोटास घरचें.

२ खंडेराजुरीकर माळी. बाळापा वाणी सलगरे याच्या चोरीबद्दल. पोटास सरकारचें. बेड्या.

- १ जोग्रोजी माळी.
- १ गंगाजी वाणी.

---
२

गुन्हेगारी घ्यावी. जामीन घ्यावा.

२ कोलापूरकर मांग कवटें एकंद येथील म्हस चोरून आणीत होते सबब. पोटास सरकारचें.

१ सुलताना. १ भावापा.

२ मोळें प्रांत ऐनापूर बसापा मल्लापा याचें घर फोडिलें सबब. राजश्री श्रीपतराव याणीं पाठविले. बेड्या. पोटास सरकारचें.

१ धुळापा. १ निळापा.

—

२

जामीन द्यावा. गुन्हेगारी द्यावी.

१ बाहिरू यादव याणें मंगळवार पेठेंत चोरी केली सबब. तांब्या वगैरे चोरलें. बेडी. पोटास सरकारचें.

४ मालगांवकर म्हार शेतांतील कणसांचे चोरीबद्दल. मोकळे. पोटास घरचें.

गुन्हेगारी द्यावी जामीन द्यावा.

१ राणनाक.
१ भीमनाक.
१ मसनाक.
१ मदनाक.

—

४

१ हेंगडी माळी सलगरेकर शिंदळकीचे खटल्याकरितां. मोकळा. पोटास घरचें.

१ सातापा पाटील धामणीकर याचा भाऊ नरसगौडा पाटील याणीं दावा केला सबब. पोटास सरकारचें. मोकळा.

मुटली. १ मौजे डोरलें येथील म्हारीण घुरंपी तांबोळीण माजरडेंत मेली तिचे चौकशीबद्दल. पोटास घरचें.

मुटला. १ सातापा जैन कवठेंपिरान येथील रयत. पेशजी शिरोळांत होता बैलाचे लढेकरितां. पोटास घरचें. बिडी.

---

६४

मयत छ. १० रबिलावल. सन आर्बा. १ बाळोजी शिंदा. घोडीचे चोरीकरितां. कोंडवाडेंत वस्ती. सोनारी नजीक दिव्याचा घाट पुण्याजवळील घोडी थेऊराहून आणून मळणगांवावरून जात होता ता

मळणगांवीं घोडी-
वर जखमी हो-
ऊन सांपडला तो.

१ भिकाजी मान्श म्हसवड-
कर रहिमतपुराहून धरून
आणून अटकेंत ठेविला. मा-
नसिंग जमातदार यांजकडे.
दावा म्हसवडावर केला होता
सबब अटकेंत.

१ संतू मैंद देवरअष्टेकर याणें
मौजे मजकुरावर दावे करून
गुरें वगैरे नेलें सबब धरून
पाठविला तो. छ० ५ रबि-
लाखर सन आर्बा.

१ खेमाजी वल्लद भरमाजी ह-
वेदे हल्लीं वस्ती अंजनी. म-
नेराजुरीवर दावे केले म्ह-
णून अटकेंत. छ०२० रबि-
लाखर सन आर्बा.

किल्लेंत छ० २० रबि-
लाखर. कोंडवाड्यांत
( दाखल झाला ).

१ चेनबसापा मौजे कित्तूर का॥
ऐनापूर पेशजी बाजारकरी
यांस लुटलें म्हणून धरून
आणून हात तोडिला. मा-
गती मौजे मजकुरावर दावे
केले, कृष्णाबाई शिंदे यां-
जकडील गांवावर दावे
केले, सबब त्याणीं आणि-
ला. त्यांजकडून.

नं. २७०३. **श्री.**

राजश्री नारोपंत व वासुदेवपंत स्वामी गोसावी यांसः—

विनंती उपरी. नाइकू व लक्ष्मण बिन आपाजी मोहिता पाटील मौजे कर्नाळ असामी दोन कैदेंत आहेत त्यांणीं जामीन बिसूरकर मोकदम यांस दिले, त्यावरून मोकळीक केली असे; तर बाहेर जाऊं देणें. दरवाजास चिठी अलाहिदा आहे. छ. १२ जमादिलाखर सन आर्बा समानीन मय्या व अल्लफ. दोन असामींपैकीं एकच असामी कैदेंत आहे तो जाऊं देणें.

नं. २७०४. **श्रीगणराज.**

राजश्री वासुदेव सदाशिव स्वामी गोसावी यांस---विनंति उपरी. आवाई जाधव पाटील मौजे रेटरे यांनी बाकीचे रुपयांकरितां कैदेंत होती. तिला माणको मल्हार कुलकर्णी सोनोकर जामीन जाले त्यावरून मोकळीक केली असे. तर माणको मल्हार याचे हवालीं करणें. दरवाजास परवानगी चिठी अलाहिदा आहे. छ. १९ सफर इहिदे समानीन हे विनंती.

नं. २७०५. **श्रीगणराज.**

राजश्री नारोपंत व वासुदेवपंत स्वामी गोसावी यांस--विनंती उपरी. देवर अष्टेकर कैदेंत आहेत त्यांकडे बोलावयास चिरंजीव राजश्री केसोपंत काळे यांजकडून राणोजी चव्हाण आले आहेत, त्यांस एक वेळ बोलोन येऊं देणें. रा॥ छ. १८ साबान सल्लास समानीन हे विनंती.

---

१ चिठ्ठी गंगाधरराव गोविंद यांणीं लिहिली आहे. सदरहुप्रमाणें पुढच्या दोन नंबरांच्या.

नं. २७०६. श्री.

विज्ञापना—बंदिवान बहुत जाले आहेत. एक वेळ छानपिछान जाल्यास कांहीं कमी होतील. आज्ञा असावी.

**उदईक यादी घेऊन येणें. छ० ३ जिल्हेज. खमस.—**

नं. २७०७. श्री.

विनंति उपरी—कितूरकर देसाई याजकडे जाणार रा॥ गुरूनाथपंत व यादापा व बहिरोराम तिघेजण बाहेर आहेत ते आंत येणार. देवापा व शिदलिंगय्या दोघे. एकूण पांच असामींची परवानगी देवावी. हे विनंती.

नं. २७०८. श्री.

विज्ञापना—शिरहटीकरांकडील याद पाठवावयास आज्ञा असावी. कृष्णापा नाईक आला आहे.

**यादी पाठवावी. नाइकास दाखवावी. दाखविल्यावर तासगांवास लिहोन जाब आणूं. मग शिवराव यास दाखवावी. एक कलम निराळें बोललोंच आहें. छ० २३ साबान हे विनंती.**

नं. २७०९. श्री.

नरसिगराव धायगुडे यांस पेशजी तुमड्या लाविल्या त्यासमई तुमडीवाल्यास काय पावलें ? मोघमच दिलें अगर दर तुमडीस दर लावून लिहिलें, हें कळवावें. उत्तर पाठवावें.

माहे रबिलाखर ईहिदेंत देणें तबीब. पावला दिला आहे.

·।·

१ मोठ्या टाइपांत छापलेले शब्द या व पुढच्या सर्व चिठ्ठ्यांत आढळतील ते सर्व गंगाधरराव गोविंद ऊर्फ बाळासाहेब यांचे हातचे आहेत. २ बहुधा दरबारखर्चाचें. ३ इहिदे समानीनच्या रबिलाखरांतल्या देणें यादी पहा. त्यांत तबीबास म्हणजे शस्त्रवैद्यास चार आणे दिलेले आढळतील; असा अर्थ. हें प्रश्नोत्तर कारकुनाकारकुनांत झालेलें आहे.

नं. २७१०. श्री.

विज्ञापना—हणमाजी शिवराम वाकनीस आज दोन रोज उपाशीं आहेत. जेवित नाहीं. आज्ञेप्रमाणें सांगों.

**कां नाहीं जेवीत ? समाचार घ्यावा. उपोषणें केलियानें कैदेंतून कोणी सोडीत नाहीं. समजून सांगावें. छ० ३ रजब इहिदे समानीन. हे विनंती.**

नं. २७११. श्री.

भीमाण्णा नाईक हावेरीकर दोन असामी उपाशीं कालपासून आहेत. माणूस घेऊन बाहेर जेवणास जात नाहीं. आज्ञेप्रमाणें सांगों.

**किल्लेंतच स्नान करून फराळ करा असें सांगावें.**

नं. २७१२. श्री.

छ० २ जिल्हेज सन सब्बा. भीमाण्णा नाईक हावेरीकर व त्याचा गुमास्ता दोन असामी ब्राह्मण अटकेंत आहेत त्यांस आजचा चवथा दिवस. दोन दिवस स्नान देखील नाहीं. आज त्यांचें बोलणें " चौघे ( पंच ) नेमून देऊन मनास आणावें. चौघे सांगतील त्याप्रमाणें ऐकूं. अगर थळ द्यावें. " म्हणतात. आजचा दिवस कसेंही करून भोजन घालावें. घरचीं देखील माणसें उपाशीं ( आहेत ) म्हणतात. आज जेवणाची आज्ञा ?

**जेवण करावें. न केल्यास जबरदस्तीनें धोटें लावून अन्न घालावें लागेल. दोन कंठाळांची वाट करावी असें स्पष्ट**

---

१ सरकराचा शिपाई. २ या ठिकाणीं आपणास वाजवी न्याय मिळणार नाहीं असें वादी अगर प्रतिवादी यांस वाटल्यास ते एखाद्या दूरच्या ठिकाणाचें नांव घेऊन तेथच्या पंचांनीं आपला न्याय करावा असें म्हणत. अशा ठिकाणास थळ ही संज्ञा होती. कोठच्याही थळानें निवाडा केला तरी त्याची अंमलबजावणी जेथें मूळ फिर्याद झाली तेथच्याच अधिकाऱ्यांनीं करावयाची असे.

**सांगावें. उत्तर लौकर पाठवावें म्हणजे जेवण घालवितों. छ० २ जिल्हेज.**

नं. २७१३. श्री.

बाबूराव रानडया आज उपाशीं आहे. त्याचा मूल औपाचे घरीं[1] आहे. अटकेंत कांहीं दिवस ठेवावयाचा झाल्यास दोघांस एक जागां केल्यानें नरसोबाच्या देवळीं अगर बाहेर कोठें करून खातील. आज्ञे-प्रमाणें सांगों.

**याची बंदोबस्ती सर्वही उदैक प्रातःकाळींच होईल.**
मामाकडील अथणीकर ब्राह्मणही तसाच आहे. आज्ञा काय ?

नं. २७१४. श्री.

छ० १८ साबान. सन सीत समानीन. चिटकंभट—रामभट जोशी याचा पुत्र—प्रातःकाळापासून स्नान भोजन फराळाचें देखील नाहीं. आतां बोलावून आणून बहुताप्रकारें सांगितलें. आग्रह भारी दिसतो. ब्राह्मण आहे. केवळ आततांईपण करावयास चुकावयाचा नाहीं. वाटेवर येणेंचें दिसत नाहीं. विदित व्हावें. आज्ञेप्रमाणें करूं.

**जीव देण्याच्या गोष्टी लांब आहेत ! वांकडें बोलण्यानें परिणाम लागणार नाहीं म्हणून सांगावें. फराळास डाळ गूळ आणून देवणें. बंदोबस्तीनें ठेवणें. छ० १९ साबान.**

नं. २७१५. श्री.

छ० २० साबान. सन सीत समानीन. रामभट जोशी याचा लेंक चिटकंभट आज दोन रोज स्नान संध्या आचमन देखील नाहीं. हजामत करीत होता तसाच स्नान केल्याखेरीज आणिल्यापासून अटकेंत आहे. ब्राह्मण आततांई. बहुताप्रकारें सांगोन पाहिलें. सांगावयाची

---

[1] भास्कर हरी पटवर्धन यांचे घरीं.

रीत राहिली नाहीं. भिऊन विनंती लिहितों असा अर्थ नाहीं. जाहला मजकूर कळण्यास्तव विनंती लिहिली आहे. आज्ञेप्रमाणें करूं.

**आज घरास लावून देणें. छ० २० साबान.**

नं. २७१६. श्री.

छ० २३ साबान. सन सीत. वडगांवकर यास जेवणाची आज्ञा छ० २० साबानीं जाली. त्या दिवशीं रात्र जाली म्हणून छ० २१ साबानीं प्रातःकाळीं जेवला होता. कालपासून तसाच आहे. याउपरी मुलाजा व्हावयाचा नाहीं म्हणून सांगितलें. सोमवाराअलीकडे चौरोजांत वाट करितों असें बोलतो. आज्ञेप्रमाणें करूं.

**बुकशेटीचे लेंकास जेऊं द्यावा. सोमवारीं रुपये न दिल्यास पारिपत्य होईल म्हणोन सांगणें. छ० २३ साबान.**

नं. २७१७. श्री.

विज्ञापना. दारकोजी पाटील तसाच मुसक्या बांधलेला आहे. पोटास घालून मागती आज्ञेप्रमाणें करूं.

**लोहारास पाठविणें. बेडीची परवानगी सांगतों. छ० ७ रमजान खमस समानीन. हे विनंती.**

नं. २७१८. श्री.

अंकलीकर आज दोन तीन दिवस जेवीत नाहीं. सरकारांतही बोलत नाहीं. येविशींची आज्ञा काय ? जेवीत नाहीं हें सरकारांत समजलें पाहिजे. येविशींची आज्ञा ?

**बोलत नाहीं, जेवीत नाहीं, चांगलें आहे ! सावंताबरोबर सांगून पाठविणें ( कीं ) ' जेवणें. सरकारांत बोलावयाचें असेल तर विनंती करूं. ' न आइकेल तर दोघांस**

१ भयनें जिकलें म्हणायचें ! मागच्या नंबरची चिठ्ठी पहा.

**निराळे निराळे फोडून ठेवावें. भेट परस्पर होऊं नये. मग सांगूं तसें करणें. छ० १९ सफर.**

नं. २७१९. श्री.

सोनीकर कुळकर्णी निराळे निराळे आज्ञेप्रमाणें बसविले. त्यांस जेवणाची सोई नरसोबाजवळ जाली पाहिजे. एकत्र मिळाल्याशिवाय जेवण करवावें अगर जशी आज्ञा होईल तसें करूं.

**एकत्र न होऊं देतां जेवण आज होऊं द्यावें. सायंकाळीं त्यांसीं बोलवितों[1]. छ० २१ मोहरम.**

नं. २७२०. श्री.

विज्ञापना. शिरगांवकर पाटील कुळकर्णी म्हणतात कीं, 'आजचा दिवस बेड्या काढाव्या. सणाचा दिवस आहे. भोजन करून मागती घालाव्या.' आज्ञेप्रमाणें सांगों.

**आजच दुसरा मार देणार होतों, परंतु सणाचा दिवस म्हणून देत नाहीं. 'सरकारचे ऐवजाची वाट काय ती लौकर करणें, नाहीं तरी माराखालीं वांचत नाहीं,' ह्मणून सांगणें. बेडीची रदबदली कशास पाहिजे? हे विनंती.**

नं. २७२१. श्री.

काल रहिमतपुराहून ह्मलवडकर मान्या बंदिवान आला त्यास पोटाची चिठ्ठी कोणाकडून द्यावयाची त्याप्रमाणें आज्ञा.

**तूर्त किल्लेकडूनच चिठी देवावी[2].**

---

१ 'बोलवितों' हा पंचाक्षऱ्याचा शब्द आहे! कोणाला भुतानें पछाडलें म्हणजे त्याच्या अंगांत आलेल्या भुताला पंचाक्षरी कोणच्या उपायांनीं 'बोलवितो' हें सर्वांस ठाऊकच आहे! २ किल्ला व जहागीर यांचे सरंजाम पृथक् पृथक् होते. म्हसवडकर मान्या हा मिरजप्रांतांतला गुन्हेगार नसल्यामुळें मिरज किल्ल्याच्या खर्चांत त्याची पोटगी भरणें वाजवी नाहीं; म्हणून पृच्छा.

नं. २७२२. श्री.

छ० १८ जिल्काद. सन सब्बा. काल रात्रौ ब्राह्मणास जखम लागली तो बैरागी अटकेंत ठेविला आहे. उपाशीं आहे. बैरागी याचें बोलणें ' माझी अशरफी व एकमुखी रुद्राक्ष वगैरे कांहीं गेलें आहे. मी अन्याई आहें. ' कज्याच्या ब्राह्मणासही लागलें नाहीं. सोडवावयास आलेल्या ब्राह्मणास लागलें आहे. येविशींचें कांहीं मनास आणावयाचें जाल्यास कोणास तरी सांगोन आज्ञा करणें ती करावी. त्याप्रमाणें करूं.

**चिरंजीव दाजीस[1] व देवरांव[2] व बाळाजीपंत यांस सांगितलें आहे. हणमंताचे देवळाजवळ चौकीचे प्याद्यांसुद्धां पाठवून देणें. छ० १८ जिल्काद.**

नं. २७२३. श्री.

जीवगौडा पाटील एरंडोलीकर जोशी याचे कज्याकरितां आणिला होता. जोशी ( व ) ते ( आपसांत ) समजतात. पांच रुपये मसाला[3] बुडवावा. निरोप द्यावा. फिरोन कज्या बोभाट आल्यास गुन्हेगारी घेऊन पारिपत्य करावें. एक वेळ माफ करावें.

---

१ वासुदेव भास्कर पटवर्धन यांस. २ हा विश्वासू जुना मराठा शिलेदार. आड नांव शिंगाडे. ३ गुन्ह्याची चौकशी होण्यापूर्वीच हा परगांवच्या गुन्हेगारास ' मसाला ' या स्वरूपानें भुर्दंड पडला ! गुर्मा करणारा गबर गुन्हेगार परगांवाहून पकडून आणावयाचा झाला म्हणजे त्या कामावर ढालाईत व गारदी पाठविण्यांत येत व त्यांवरोबर गुन्हेगारास निघून येण्याविषयीं पत्र दिलेलें असे, त्यांतच अमुक रुपये मसाला तुजवर केला आहे असें लिहिलेलें असें. त्याप्रमाणें मसाला वसूल करून आरोपीस घेऊन येण्याच्या कामीं ढालाईत व गारदी पराकाष्ठेची सक्ती करीत. आरोप नाशावीत झाला अगर आपसांत फिर्यादीची समजूत निघाली तर मसाला परत मिळे. पण या उदाहरणांत कोर्टानें मसालाही परत दिला नाहीं व फिर्यादीची समजूतही होऊं दिली नाहीं !

**मसाला तो सरकारांत आलाच आहे. परंतु ब्राह्मणी राज्य असतां ब्राह्मणास मारहाण केली याची गुन्हेगारी-शिवाय साफ पाटलास निरोप नाहीं. एक वेळ धास्त बसली म्हणजे ब्राह्मणाचे वाटेस कोणी जाणार नाहींत.**

नं. २७२४. श्री.

आज[2] प्रातःकाळीं उंडगी रांड एका प्याद्यानें घरांत घातली होती. घरचे कलहामुळें रांडेस मारल्याचा अजमास दिसतो. रांड फिर्याद आली[1]. प्यादा बोलावून आणिला. दोघेंही बसलीं आहेत. त्यांची वाट आज्ञेप्रमाणें करूं. रांड फिरस्ती आहे. प्यादाही लबाड आहे. आज्ञे-प्रमाणें करूं.

**रांडेचा दादला मेला असतां काजीचे विद्यमानें निका लावून घ्यावा तें न केलें, तेव्हां गरतीशीं शिंदळकी केली. गुन्हेगारी दहा रुपये घेणें. रांडेस लावून देणें. अगोदर पंच-वीस ह्मणावे. दहा देईल.**

नं. २७२५. श्री.

जुड्या[3] मलवेल गोलंदाज अटकेंत आहे त्यास आजपावेतों पोटास त्याजवळ दहा रुपये होते ते जाले. त्याजवळ आतां कांहीं राहिलें

---

१ फिर्याद काय होती आणि निकाल काय झाला हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. दंड वसूल करण्याची तऱ्हा मात्र हंसूं येण्याजोगी आहे ! २ 'आज प्रातःकाळीं' या शब्दांचा संबंध 'फिर्याद आली' या शब्दांकडे. 'घरांत घातली होती' या शब्दांकडे नाहीं. ३ हा युरोपियन गोलंदाज पोर्च्युगीज जातीचा असून पुष्कळ वर्षे मिरजेच्या किल्ल्यांत गोलंदाज म्हणून नऊ रुपये पगारावर नोकरीस होता. आणखीही कांहीं युरोपियन याच नोकरीवर कमीजास्ती मानानें इतक्याच पगारावर राहिले होते ते सारे पोर्च्युगीज होते. त्यांच्या बायका कांहीं विलायतच्या व कांहीं इकडच्या गोव्या-च्या वगैरे व त्यांचे सोयरेधायरे आप्त व पोरेंबाळें किल्ल्याबाहेर रेवणीवर रहात असत. त्यांचीं धर्मकार्ये वगैरे चालविण्याकरितां आजऱ्यांहून पाद्री येत असत. आजरें येथें रोमन क्याथोलिक पंथाच्या ख्रिस्ती लोकांचा मठ व वस्ती फार जुनी तीन चारशें वर्षांपासूनची आहे.

नाहीं. पोटास पाहिजे. त्याचा दागिना सोन्याच्या पाटल्या आहेत त्या देविल्यास पोटास खाईल. नाहीं तरी सरकारांतून दिलें पाहिजे. आज्ञे-प्रमाणें सांगों.

**समक्ष सांगूं.**

नं. २७२६. श्री.

विज्ञापना. कळंबीकर महाराची चौकशी केली. साक्ष मोझ्या-निशीं लबाडी लागू होती. परंतु ती रांड सुरळीत बोलत नाहीं, याज-करितां ( तिला ) चार जेरबंद मारिले पाहिजेत. येविशींची आज्ञा ?

**माराविणें.**

नं. २७२७. श्री.

पुर्‍या[1] चोर उरसांत[2] सांपडला त्यास खोडयांत घालून बहुत दिवस जाले. भाकर तुकडा खात नाहीं. जेर जाला आहे. आज्ञा काय ?

**बरेंच आहे. खाईल. उपास किती दिवस काढील ?**

दं. २७२८. श्री.

विज्ञापना. आज्ञेप्रमाणें आज उगारकर व कुसनाळ कोळेवाड-कर दहा असामीस जेऊं दिलें नाहीं. तैसेच गाडद्यांचे पहाऱ्यांत आहेत. आजच्या दिवस जेवणाची आज्ञा जाल्यास सांगों. सरकार खातर-जमेचा निशेदार कोणी होत नाहीं. आज्ञेप्रमाणें करूं.

**जेऊं देऊं नये. उदैक मारच देणार. ब्राह्मणांस संध्या करूं देणें. फराळ[3] करूं देणें. छ० ६ सफर आर्बा समानीन.**

---

१ पुरभय्या. रांगडा. २ मिरजेस शत्रामीर नांवाचा प्रसिद्ध पीर असून त्याचा दरवर्षी उरूस भरत असतो त्यांत. ३ ओंजळभर हरभऱ्याची डाळ व दोन किंवा तीन पैसेभार गूळ हा बंदिवानांचा फराळ ठरलेला होता. कांहीं ब्राह्मण व इतर मिळून हे तीन गांवचे पाटील कुळकर्णी सरकारी बाकीच्या वसुलीकरितां धरून आणलेले होते.

नं. २७२९. श्री.

छ० १२ जमादिलाखर. सन सब्बां. भिवाजी नारायण याचे घरीं श्राद्ध दिवस उद्यांचा आहे. 'उद्यां श्राद्ध होत नाहीं. त्यास कृष्णा-स्नानास जाऊन येणार. परवां श्राद्ध होईल.' याप्रमाणें सांगोन ( त्यांनीं ) पाठविलें. उत्तर सांगावयाचें त्याप्रमाणें सांगों. दरवाजापावेतों जाबसालास येतों म्हणतो.

**तुह्मींच तेथवर जावें. सामग्री नसल्यास देवितों. श्राद्ध करावें.**

स्नानास जाण्याची आज्ञा काय ?

**जाऊं द्यावें. पैहारा[1] बरोबर द्यावा.**

नं. २७३०. श्री.

सावंता[2] निळकंठ याजकडील गडेकरी[3] महार सुरापुरवाल्याकडील हत्तीवर आहे त्यास शिवाशिव जाली म्हणोन चौकीवर बसविला. बांधोन ठेविला आहे. आज तीन रोज जाले आहेत. त्यास सुटकेची आज्ञा काय ?. कानडा गैरमाहीत. क्षमा करावी. पारिपत्य जालें. याउपरी सोडावा.

**त्याला सोडावयाची परवानगी कालच जाली आहे. त्यास सुरापूरकर कारकून हत्तीजवळ असेल त्याचे हवालीं करावें. म्हारानें आपले पायरींनें असावें. अतःपर असें जाहलीयास मुलाजा होणार नाहीं. ह्मणून ताकीद करणें. हे विनंती. छ० १३ जिलकाद. हे विनंती.**

---

१ सहा, आठ किंवा दहा गारदी. २ हें जमादाराचें नांव. याच्या ताब्यांत केलेला कैदी म्हार. ३ हत्तीची चाकरी करणारा गडी. त्याचा धनी सुरापूरकर संस्थानिक बेरड. त्याच्या घरीं म्हार वावरत होता तसा मिरजेच्या किल्ल्यांत ब्राह्मण यजमानाच्या घरींही वावरूं लागतांच संकटांत पडला! सुरापूरवाल्यानें मिरजकरांस हत्ती नजर म्हणून पाठविला होता.

नं. २७३१. श्री.

आनंदराव भाऊ यांजविशीं काल रामाजीपंतांस विनंती करणें-विशीं चिठ्ठी लिहिली होती. ब्राह्मण आग्रहास पडला आहे. चार रोज अन्न खात नाहीं म्हणतात. कोणास तरी एक वेळ त्यांजकडे जावयाची आज्ञा.

**लबाड आह्मास बोलावयास येत नाहीं. चौघे तुह्मी जाऊन आलां. ' बाराशेंची निशा द्यावी. तूर्त निमेची रुजुवात होऊन ठरेल ऐवज तो द्यावा. पुढें राहिले गांवचे ऐवजाची निशा द्यावी. हिशेब मनास आणून ठरेल तो ऐवज द्यावा, असें तुह्मी चौघे मिळून ( आह्मास ) विनंती केली. ती मान्य केली असतां लबाड नित्य नवें बोलणें कामाचें नाहीं. आह्मीं उपाशीं बैसविलें नाहीं. बदअमली करून बसल्यास रुपये श्रीमंतांचे सुटतात असें नाहीं. भें दाखविल्यानें वाजवीस आह्मी भीत नाहीं. कळावें हे विनंती. छ० ९.**

नं. २७३२. श्री.

नरसिंगराव आपाजी याचे गुजरातीचीं येरंडोलीचे बाकीचीं कुळें आणून देतात. कुळें नादान. रुपया न मिळे व जामीनही तूर्त कोणी होत नाहीं अशीं येतात. त्याची आज्ञा काय ?

**रुपये बेजरब चापां ( ? ) लावून घ्यावे. मजुरी घ्यावी.**

नं. २७३३. श्री.

विज्ञापना. सुलतानजी पाटील मोरोळेंकर याची आई केवळ वृद्ध आहे. लेंकास पाहून जाईन म्हणत्ये. आज्ञा जाल्यास समागमें

---

१ हा कोणी वजनदार मामलेदार तालुक्याच्या वसुलांत अफरातफर केल्यामुळें कैदेंत पडला होता. २ पेशवेसरकारचे.

एक माणूस देऊन तेथवर पोंचवून गांठ घालून मागती माघारी आणील.

**ह्मातारीची व त्याची तुह्मी आपले रुबरू गांठ घालून लागलीच लाऊन देणें. हे विनंती.**

नं. २७३४. श्री.

मौजे बोरगांव कसबे दिगरज येथील खुनाच्या मोझ्याकरितां रांड अटकेंत ठेविली तीस बहुत दिवस जाले. नेसावयास अगदीं नाहीं. याजकरितां एक रुपया सवा रुपयांत एक छीट अगर दुसरें कांहीं तरी दिलें पाहिजे.[1] येविशीं आज्ञा काय ?

**देविणें. बंदिवानांची यादी तयार करणें. पहावयाची आहे.**

---

१ हल्लींच्या काळांत स्त्रियांस नेसतां येण्याजोगें 'छीट अगर दुसरें कांहीं तरी' वस्त्र रुपया सवारुपयांत मिळणें स्वप्नांत सुद्धां दुर्लभ !

# काशीयात्रा.

सांप्रत या देशांत चोहोंकडे आगगाडीचा रस्ता झाल्यामुळें कितीही दूर अंतरावर जावयाचें असलें तरी त्याबद्दल कांहींच अवघड वाटत नाहीं. काशीची यात्रा ही तर आजकाल फार सुलभ गोष्ट होऊन बसली आहे. पेशवाईत काशीयात्रा करून सुरक्षित परत येणें ही मोठी सुदैवाची गोष्ट समजत असत. यात्रेकरूंवर मार्गांत नानाप्रकारच्या दैवी व मानवी आपत्ति गुदरत असत. सर्व प्रवास पायमार्गानेंच करावा लागत असे, आणि त्या काळीं सामान्यतः नेहमीं अस्वस्थता व दंगेधोपे चालू असत. त्यांपासून उद्भवणारे अनर्थ यात्रेकरूंवरसुद्धां ओढवल्याशिवाय राहत नसत. मार्गांत चोरी व वाटमारी यांचा उपद्रव नेहमीं होत असल्यामुळें एकटें दुकटें जाण्याचें तर राहोच, पण शेपन्नासांनीं एकत्र होऊनसुद्धां यात्रेस जाणें धोक्याचें होतें. याकरितां कोणी माणूस यात्रेस निघाला म्हणजे कुटुंबांतल्या माणसांची पुनः भेट होणार नाहीं असें गृहीत धरून सर्व निरवानिरव करून जात असे व यात्रा संपादून सुरक्षितपणें तो परत आला तर तो मोठा दैववान् व पुण्यवान् समजला जात असे. दूर देशची यात्रा करणें त्या काळीं इतक्या धोक्याचें कां असावें याची कल्पना त्या काळची लोकस्थिति कशी होती हें समजल्यावांचून चांगलीशी ध्यानांत येणार नाहीं. चालू प्रकरणांतलीं पत्रें इतकीं तपशीलवार माहितीचीं आहेत कीं, तीं वाचल्याबरोबर त्या काळची लोकस्थिति व विशेषतः यात्रेकरूंवर येणारीं संकटें यांचें चित्र वाचकांच्या डोळ्यांपुढें हुबेहुब उभें राहीलच राहील.

ही काशीयात्रा गोपाळराव गोविंद पटवर्धन यांचें कुटुंब सरस्वतीबाई यांनीं केली असून त्याबद्दल सविस्तर हकीकतीचीं पत्रें या प्रकरणांत छापिलीं आहेत त्यांपैकीं बहुतेक त्यांनींच आपले धाकटे दीर गंगाधरराव गोविंद ऊर्फ बाळासाहेब यांस यात्रेतून वेळोवेळ लिहिलेलीं आहेत, व कांहीं पत्रें बाळासाहेबांस यात्रेतील इतर मंडळींनीं लिहिलेलीं आहेत. सरस्वतीबाईंच्या तीन दिरांपैकीं आतां वामनराव व पांडुरंगराव स्वर्गस्थ झाले होते, व एकटे गंगाधरराव मात्र हयात होते. पांडुरंगरावांच्या कारकीर्दींत सरस्वतीबाई दिरांपासून एक लक्ष रुपये घेऊन मिरज किल्ल्यांतून निघून तेथून जवळच हरिपुर म्हणून क्षेत्र आहे तेथें जाऊन राहिल्या होत्या. हरिपुर येथें कृष्णा व वारणा या नद्यांचा संगम होतो. त्या स्थळीं राहून स्नान, दान, व्रतें, उपोषणें करून व पुराणकीर्तनादि श्रवण करून सरस्वतीबाई कालक्षेप करीत असत. काशीयात्रेस जाण्याचा संकल्प त्यांच्या मनांत बरींच वर्षें घोळत होता, पण तो योग शके १७०५ इ. स. १७८३ या वर्षीं घडून आला. त्या बाई यात्रेस जाणार ही वर्दी चोहोंकडे आगाऊच कळली होती; त्यामुळें त्या यात्रेस निघाल्या तेव्हां सांगली, कुरुंदवाड गणेशवाडी, हरिपुर, तासगांव, इचलकंजी, जमखिंडी, तेरदाळ येथून —किंबहुना मनोळी, नरगुंद, रामदुर्ग या दूरच्या ठिकाणांहून सुद्धां— यात्रेकरू मिरजेस गोळा झाले होते व खुद्द मिरजेच्या बऱ्याच लोकांनींही यात्रेस जाण्याची तयारी केली होती. शके १७०५ या वर्षाच्या आश्विन महिन्यांत म्हणजे सन १७८३ च्या आक्टोबरांत सरस्वतीबाई यात्रेस निघाल्या तेव्हां वर सांगितलेली ही पांचचारशें यात्रेकरू मंडळी त्यांबरोबरच मार्गस्थ झाली. शिवाय दर मुक्कामास आणखी यात्रेकरू येऊन मिळतच होते. या समुदायास यात्रा हें नांव जितकें योग्य होतें तितकेंच स्वारी हें नांव सुद्धां योग्य होतें ! कारण

कीं, बाळासाहेबांनीं सरस्वतीबाईबरोबर त्यांच्या योग्यतेनुसार लवा-जमा म्हणजे उंटें, घोडीं, डोल्या, स्वार, शिपाई, शागिर्द-पेशा वगैरे सर्व यथास्थित दिला होता. मार्गांत जागोजाग त्यांचें साहित्य कर-ण्याबद्दल परशुरामभाऊनीं महादजी शिंदे यांस पत्रें लिहिलीं होतीं इतकेंच नाहीं, तर पुणें दरबारास लिहून खुद्द पेशव्यांचीं पत्रें शिंदे, होळकर व तद्देशीय राजेरजवाडे व कमाविसदार यांस यात्रेचा यथास्थित परामर्ष घेण्याविषयीं आणवून सरस्वतीबाईकडे पाठवून दिलीं होतीं.

आक्टोबर अर्धा होऊन गेल्यावर सरस्वतीबाई मिरजेहून नि-घाल्या त्या रहिमतपूर, बारामती, गारदौंड या मार्गानें टोंक्यास गेल्या. तेथें त्यांचा मुक्काम सात आठ दिवस झाला. त्या अवधींत मिरजेच्या बाजूचे राहिलेसाहिलेले व पुणें, तळेगांव, नाशिक, वांई इत्यादि ठिकाणचे यात्रेकरू तेथें येऊन जमा झाले. दक्षिणेंतून यात्रा निघाव-याची म्हणजे ती कार्तिकमासीं कायगांव टोकें येथें प्रथम जमा व्हाव-याची, व राचसा समुदाय जमला म्हणजे ती यात्रा पुढें खानदेश, बागलाणा, न ड इत्यादि मुलखांतून काशीकडे जावयाची, असा मूर्वींपासून प्रघात होता. त्या अनुरोधानेंच यंदा सरस्वतीबाई यात्रेस निघाल्याचें ऐकून बहुत यात्रेकरू जमा होऊन कायगांव, टोकें व प्रवरासंगम या तिन्ही क्षेत्रांतून घरोघर येऊन राहिले होते. या वेळीं यात्रेचा समुदाय अजमासें चार हजारपर्यंत जमला होता. त्यांत मिर-जेच्या बाजूची मंडळी होती त्यांपैकीं निलकंठराव पटवर्धन कुरुंद-वाडकर यांची स्त्री म्हणजे सरस्वतीबाईंची धाकटी चुलत भावजय भवानीबाई व तिचा दुसरा पुत्र शिवराव सुभेदार वाडीकर, बळवंतराव यादवाडकर, गोविंद सखदेव ऊर्फ गोविंदपंत मामा ही मंडळी आ-मच्या वाचकांच्या ओळखीची झालेली आहे. कारण, यांचें नांव या पुस्तकाच्या कितीएक भागांत वेळोवेळ आलेलें आहे. असो.

ता. १० नोवेंबर रोजीं वर सांगितलेल्या सर्व यात्रेसह सरस्वतीबाई टोंक्याहून निघाल्या त्या कासारबारीचा घांट उतरून जळगांव, भडगांव, वरणगांव या मार्गानें खानदेशांतून ता. २६ नोव्हेंबर रोजीं बऱ्हाणपुरास पोंचल्या. तेथें महादजी शिंद्यांचा अंमल नुकताच सुरू झाला होता. शिंद्यांच्या कमाविसदारांनीं यात्रेचा परामर्ष चांगल्या रीतीनें घेतला. सरस्वतीबाईंच्या मनांत जातांजातां ओंकारेश्वराचें दर्शन घ्यावें असें होतें; परंतु तिकडे भिल्लांची गडबड सुरू झाली होती. रामपूरवाला म्हणून भिल्ल राजा होता त्यानेंही बंड केलें होतें. ही भिल्लांची सर्व गडबत शांत व्हावी म्हणून अहल्याबाई होळकर यानीं भिल्लांवर पांचचार हजार पेंढार रवाना केलें होतें व मागून आपण स्वत: सैन्य घेऊन भिल्लांच्या बंदोबस्तास गेल्या होत्या. असा तिकडे युद्धप्रसंग सुरू असल्यामुळें ती वाट सोडून सरस्वतीबाई अशीरगड, शिवणें देवळें या मार्गानें डिसेंबरच्या ९ व्या तारखेस महेश्वरास जाऊन उतरल्या. तों भिल्लांचा बंदोबस्त करून अहल्याबाईही महेश्वरास येऊन दाखल झाल्या.

या वेळीं यात्रेचा समुदाय दहा हजारांवर जमा झाला होता. इतकी यात्रा परदेशांतून निभावून नेण्याची जोखीम सरस्वतीबाईंच्या शिरावर होती. कारण, त्यांचा नांवलौकिक ऐकूनच हे सारे लोक त्यांभोंवतीं आश्रयाकरितां गोळा झाले होते. त्यांत पटवर्धन भाऊबंद मंडळी व ऋणानुबंधी यांचीं कुटुंबें यात्रेंत होतींच; शिवाय शास्त्री, पंडित, भिक्षुक, हरिदास, पुराणिक अग्निहोत्री अशीही मंडळी होती. श्रीमंत व गरीब गृहस्थही पुष्कळ होते. अठरापगड जात यात्रेंत मिसळलेली होती. इतक्या सर्वांच्या अडचणी व संकटें जाणून सर्वांशीं यथायोग्य वागावयाचें, सर्वांचें संरक्षण व सोय जेणेंकरून होईल अशा तजविजी योजावयाच्या, जागोजाग कमाविसदार, जमीदार,

संस्थानिक यांजकडे पेशवेसरकारचीं व आपलीं पत्रें देऊन वकील पाठवावयाचे, व त्यांचे साहाय्यानें यात्रेचा मार्ग सुलभ, सुखकर व निर्वेध करावयाचा, हीं सर्व कामें सरस्वतीबाईस पहावीं लागत होतीं व तीं कामें त्या दक्षतेनें व समाधानवृत्तीनें पहात होत्या.

महेश्वरास पोंचल्यावर उत्तर हिंदुस्थानांतून बातम्या आल्या त्यांत त्या प्रांतीं पर्जन्य नसल्यामुळें दुष्काळ पडून पराकाष्ठेची महागाई झाली आहे व हजारों कंगाल लोकांच्या झुंडी झांशीपासून उज्जनीपर्यंत जागोजाग येऊन राहिल्या आहेत, दरोडेखोर लोकांच्या टोळ्या यात्रेच्या वाटेवर हिंडत आहेत, अशीं वर्तमानें आलीं. यामुळें सर्व यात्रा गडबडून गेली. जो तो पुढें आपली निभावणी कशी होईल या विवंचनेंत पडला. महेश्वरापुढें पाऊल टाकण्याची कोणाची छाती होईना. त्या वेळीं सरस्वतीबाईनीं सर्वांस धीर देऊन सांगितलें कीं, उज्जनी, भेलसें हा मुलूख आपल्या राज्यांतला असल्यामुळें महेश्वरास राहिलें काय, आणि तेथें राहिलें काय, दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. याकरितां तेथपर्यंत जाऊं, म्हणजे तितका मार्ग सहजच आक्रमिला जाऊन प्रयाग, काशी या स्थळांस तितकें जवळ पडेल. ती गोष्ट सर्वांस मान्य झाली व अहल्याबाईंना सुद्धां ही मसलत पसंत पडली व त्यांनीं उज्जनीपर्यंतच्या आपल्या जागोजागच्या कमाविसदारांस व पुढच्या मार्गासाठीं महादजी शिंदे यांस यात्रेचा समाचार घेण्याविषयीं पत्रें लिहून दिलीं आणि आपले शंभर राऊत बरोबर पोंचवावयास दिले. नंतर दिसेंबरच्या ११ व्या तारखेस यात्रा तेथून निघाली ती उज्जनीस आली. तेथें शिंद्यांचे कमाविसदार होते ते सरस्वतीबाईंच्या भेटीस आले व यात्रेची उत्तम प्रकारें सरबराई करून त्यांनीं पुढच्या मार्गाचा बंदोबस्त ठेवण्याविषयीं जागोजागच्या लोकांस पत्रें व स्वार, पायदळ पोंचवावयास देऊन यात्रा भेलशाच्या रोखानें मार्गस्थ केली. भेलशांचा

जमीदार तरवारसिंग हा पटवर्धनांच्या फौजेंत चाकरीस होता. सरस्वतीबाई भेलशाअलीकडे एक मजल आल्या तों तरवारसिंगाचा भाऊ प्रतापसिंग हा पन्नास स्वारांनिशीं यात्रा न्यावयास आला. भेलशांस यात्रेचे पांचचार मुक्काम झाले. भेलशांच्या सुभेदारानें पंचवीस स्वार नगारानिशाणसुद्धां यात्रा पोंचवावयास सागरपर्यंत दिले. वाटेंत कंगालांचा उपद्रव फार लागला. गोरगरीब भाकरी करूं लागले म्हणजे कंगालांनीं हल्ला करून भाकरी बेलाशक ओढून न्याव्या, उष्टया पत्रावळी हातांतून हिसकून घ्याव्या, असें होत होतें, परंतु पुढें उत्तम पर्जन्यवृष्टि झाल्यामुळें कांहीं पीकपाणी होईल, धारण स्वस्त होईल, असा संभव दिसूं लागतांच कंगालांच्या झुंडी जागोजाग थबकून राहिल्या. यात्रा सागरच्या मुक्कामास पोंचल्यावर तेथें पांचचार दिवस मुक्काम झाला. सागरचे सुभेदार बाळाजी गोविंद बुंदेले यांनीं पन्न्याच्या राजास पत्रें लिहून दिलीं तीं घेऊन यात्रा पन्न्यास गेली. पन्न्याच्या राजास पेशवेसरकारचेंही पत्र होतेंच. त्यानें मार्गाचीं साहित्य-पत्रें लिहून देऊन व आपलीं माणसें बरोबर देऊन यात्रा यमुनापार करून दिली. भेलशांपासून पन्न्यापर्यंत पाऊस पुष्कळ लागला त्यामुळें यात्रेचे हाल झाले व यात्रेंत पटकी उद्भवली होती तीमुळें दररोज पांचचार माणसें मरावीं असें चाललें होतें. परंतु पन्न्यापासून पुढें पाऊस लागला नाहीं व पटकीचा आजारही शांत झाला.

प्रयाग, काशी व गया हीं तिन्हीं स्थळें इंग्रजसरकारच्या हातीं होतीं. प्रयागास अर्धा अंमल सुजाउद्दौला याचा व अर्धा इंग्रजांचा होता; पण काशी व गया या ठिकाणीं इंग्रजांचा अंमल पूर्ण होता. पांचचार मजलींच्या अंतरावर प्रयाग राहिला तेव्हां सरस्वतीबाईनीं प्रयागच्या इंग्रज अंमलदारास पेशवेसरकारचें पत्र होतें तें वकिलाबरोबर पुढें पाठवून दिलें. त्या इंग्रज अंमलदाराचें नांव 'मेजर लॅरेंट'

असें होतें. तें पत्र त्या अंमलदारास पोंचतांच त्यानें " रहदारीचे दस्तक व तेलंगे टोपीकर असामी तीन व हरकारे जोडी " याप्रमाणें यात्रा आणावयास पाठवून दिले. प्रयागच्या मुक्कामास यात्रा आल्यावर इंग्रज अंमलदारानीं गांवांत ताकीद केली कीं " यात्रेकरू आले आहेत यांशीं कोणी भांडण जास्तीजलाल करूं नये. " या ताकीदीचा तत्काळ अंमल होऊन यात्रेस मोठें सुख झालें. यावेळीं दक्षिणी यात्रेकरूंचे आणखी तीन संघ प्रयागास आले होते. एका संघांत महादजी शिंद्यांचे दिवाण भाऊ बक्षी यांची मातोश्री मुख्य होती. दुसरा संघ मुधोजी भोंसले नागपूरकर यांची कन्या बाळाबाई यांचा होता. तिसरा संघ गणपतराव दीक्षित नाशिककर यांचा होता. सरस्वतीबाईनीं या तिन्ही संघांच्या लोकांस सांगून पाठविलें कीं, प्रत्येक संघाशीं प्रयागवळ निरनिराळा करार करून यात्रेची बजबज करितील; याकरितां चारी संघांनीं मिळून प्रयागवळांशीं एकच करार करावा. ती मसलत त्या तिन्ही संघांतल्या लोकांस पसंत पडून प्रयागवळांशीं एकच करार झाला कीं, दर स्वारीस वीस रुपये व सड्यास तीन रुपये याप्रमाणें प्रयागवळांनीं घ्यावे, आणि दर स्वारीमागें तीन माणसांस माफी करावी. याप्रमाणें करार झाल्यामुळें व इंग्रज अंमलदारांची ताकीद असल्यामुळें प्रयागवळांनीं यात्रेस त्रास दिला नाहीं. यात्रेवर इंग्रजसरकारचा कर होता तो त्यांनीं पेशवेसरकारच्या स्नेहावर नजर देऊन या यात्रेस माफ केला होता.

सरस्वतीबाई प्रयागाहून निघून एक मजल आल्या तों पुढें वाटेंत " दहा बारा कोसांवर गव्हार दोन तीन हजार जमा जाहले आहेत " म्हणून बातमी आली. ती बातमी त्यांनीं ' मेजर लरेंट ' यांस सांगून पाठवितांच त्याणें " मार्गाचें दस्तक व चकती व तेलंगी टोपीकर असामी दोन व हरकारे जोडी" येणेंप्रमाणें मार्गाचा बंदोबस्त

करून दिला. त्यामुळें गव्हार वगैरेचा मार्गांत कांहीं एक उपद्रव झाला नाहीं ! जसा भुतांखेतांस रामनामाचा मंत्र तशी गव्हारांना इंग्रजांची चकती! प्रयागाहून निघाल्यापासून चार मजलींनीं सर्व यात्रा निर्विघ्नपणें काशीक्षेत्रास माघ व. ११ ता. १६ फेब्रुवारी रोजीं येऊन पोंचली. काशीचा सुभा ' फोकसाहेब ' म्हणून होता त्यानें सरस्वतीबाई यात्रेसह येणार ही वर्दी येतांच त्यांस आणण्याकरितां हरकारे जोडी व वकील सामोरे पाठविले होते.

काशीस यात्रा येऊन पोंचल्यावर प्रयागच्या अंमलदाराप्रमाणेंच काशीच्या अंमलदारानींही यात्रेकरूंस अधिकउणा उपद्रव न देण्याविषयीं गंगापुत्रांस सक्त ताकीद केली. दहाबारा दिवसांत याप्रमाणें तीनदां ताकीदी केल्या; त्यामुळें यात्रेशीं गंगापुत्र नमून होते. काशींत स्नान–दान–तीर्थ–श्राद्धादि यात्रेचीं सर्व कृत्यें उरकल्यावर गयेस जाण्याचा विचार सुरू झाला. काशी व प्रयाग येथें यंदां या दक्षिणी यात्रेस कराची माफी झाली याचें कारण, यासंबंधें पेशव्यांनीं व परशुरामभाऊनीं महादजी शिंद्यांस पत्रें लिहिलीं होतीं. शिंद्यांचे दरबारीं वॉरन हेस्टिंग्स् यांच्या तर्फे मि. अंडरसन् हा वकील नेहमीं रहात असे. शिंद्यानीं अंडरसन् याजकडून यात्रेचा परामर्ष घेण्याविषयीं व तिला कर माफ करण्याविषयीं वॉरन हेस्टिंग्ससाहेब यांस पत्रें लिहविलीं होतीं. काशी व प्रयाग येथें कर माफ झाला व इतर प्रकारें अंमलदारांकडून मदत झाली तशी सर्व सोय गयेस गेल्यावरही व्हावी असें सरस्वतीबाईच्या मनांत होतें; म्हणून त्यांनीं फोकसाहेबांकडे शिवराव सुभेदार व बळवंतराव यांस भेटीस पाठविलें व त्यांजकडून गयेस जाण्याबद्दलची गोष्ट त्यांजवळ काढविली. त्यांनीं उत्तर केलें कीं, स्वतः वॉरन हेस्टिंगस् साहेबच शिमगा पौर्णिमेच्या सुमारास सहजांत काशीस येणार आहेत त्या वेळीं त्यांशीं बोलून तुमचें काम करून देतों. त्या-

प्रमाणें वॉरन हेस्टिंगस् साहेब तेथें आले तेव्हां सरस्वतीबाईनीं पुनः त्या लाटसाहेबांच्या भेटीस वरील दोन गृहस्थ व गोविंदपंत मामा यांस पाठविलें व त्यांबरोबर त्या साहेबांस देण्याकरितां वस्त्रें व दोन हजार रुपयांचें जवाहीर दिलें. वॉरन हेस्टिंगस् यांनीं वस्त्रें व जवाहीर कांहीं घेतलें नाहीं. पटवर्धन म्हणजे कोण, परशुरामभाऊ कोण, हें सर्व शिंदे व मि. अंडरसन् यांच्या द्वारें त्यांस कळलें होतें इतकेंच नव्हे, तर गेल्या युद्धापासून देखील तें त्यांस माहीत होतें. शिंद्यांचें पत्र येतांच काशी–प्रयागाप्रमाणें गयेच्या अंमलदारासही पत्र व यात्रेच्या रहदारीचें दस्तक तयार करून त्यांनीं शिंद्यांकडे कधींच पाठविलें होतें, पण तें शिंद्यांकडून सरस्वतीबाईच्या हातीं अद्याप आलें नव्हतें. हल्लीं त्यांनीं पुनः दुसरें रहदारीचें दस्तक व गयेचा कर माफ केल्याबद्दलची चकती लिहून सरस्वतीबाईकडे पाठविली. नंतर फाल्गुन व० ११ स यात्रा बरोबर घेऊन सरस्वतीबाई निघाल्या त्या १४ व्या मजलीस गयेस येऊन पोंचल्या. तेथचा अंमलदार तामरकन (?) साहेब म्हणून होता. त्याजकडे त्यांनीं दस्तक व माफीची चकती पाठवितांच त्यानें उत्तर केलें कीं " मिरजेचा संघ असेल त्याची माफी करूं. बाकी यात्रेचा शिरस्तेप्रमाणें ऐवज घेऊं " पण तें त्या उदार बुद्धीच्या बाईंना कसचें पसंत पडणार ! वॉरन हेस्टिंगस् साहेब त्या वेळीं तेथून वीस दिवसांच्या वाटेवर लखनौस होते. सर्व यात्रेचा कर माफ करण्याबद्दल बाईनीं पुनः त्या साहेबांकडे लखनौस पत्रें व वकील पाठविले. तेव्हां त्या साहेबानीं बाईंच्या पत्राचा मान करून पुनः सर्व यात्रेचा कर माफ केला म्हणून चकती करून दिली. ती घेऊन वकील परत आले तों महिना दीड महिना सहजच गुदरला. तेथपर्यंत सरस्वतीबाईनीं सर्व यात्रा खोळंबवून धरिली होती. खोळंबा झाला, लाट साहेबांच्या दरबारीं थोडाबहुत दरबार–खर्चही पडला, परंतु

बाईनीं आपला उद्देश तडीस नेलाच ! कराची माफी मिळाल्यावर सर्व यात्रेचीं गयावर्जनें दररोज तीनशें चारशेंप्रमाणें होतां होतां तीन महिने लागले. सर्वांमागून सरस्वतीबाईनीं आपल्या घरच्या मंडळीचीं पांच गयावर्जने केलीं. त्यांत स्वतः एक केलें व बाकीचीं चार दुसऱ्यांकडून करविलीं. त्यांत गोविंद हरि व त्यांची स्त्री यांचें गयावर्जन गणपतराव पटवर्धन भिलवडीकर यांजकडून करविलें. या पांच गयावर्जनांबद्दल साडे आठ हजार रुपये देण्याचा त्यांनीं गयावळांशीं ठराव केला होता. गयावळ एक गांव बक्षीस मागत होते, परंतु बाईनीं त्यांस साफ सांगितलें कीं, गांव सरकारचे असल्यामुळें ते देण्याचा आम्हांस अखत्यार नाहीं. इतकें झालें तरी वटश्राद्धाचे दिवशीं गयावळांनीं फारच अडवून धरिलें तेव्हां दरसाल शंभर रुपये आकाराची जमीन इनाम देऊं असें बाईनीं कबूल केलें. गयेंत तीन महिने यात्रेचा मुक्काम झाला होता. त्या अवधींत पटकीची सांथ पुनः जारीनें सुरू झाली होती.

याप्रमाणें गयावर्जनें आटपल्यावर आषाढ शु० ७ स यात्रा परत निघाली ती व. ९ स काशीस येऊन पोंचली. गयेंत आठ शेरांची धारण झाली होती त्यामुळें गरीब लोकांचा निभाव लागणार नाहींसें पाहून सरस्वतीबाईनीं काशीहून निघतांना बाजारचीं शेंदोनशें दुकानें बरोबर नेलीं होतीं व हे दुकानदार यात्रेकरितां माल आणितील त्यांस इंग्रजांकडून जकातीची माफी मिळविली होती. त्यामुळें यात्रेंत अकरा बारा शेरांची धारण राहून गरीब लोकांचा बचाव झाला. टोंक्याहून निघाल्यापासून यात्रेंत चोऱ्या होऊं नयेत म्हणून शेंदोनशें शिपाई सरस्वतीबाईनीं नवे चाकरीस ठेविले होते. शिवाय त्यांच्या स्वतःबरोबरचे स्वार, शिपाई होतेच. त्या लोकांकडून गस्त पहारा करवून त्यांच्या कामावर देखरेख करण्यासाठीं त्यानीं आपले कारकूनही

नेमिले होते, त्यामुळें यात्रेस चोरीचा उपद्रव कधीं लागला नाहीं. गयेहून परत आल्यावर सर्व यात्रा काशीमध्यें चातुर्मास्य संपेपर्यंत राहिली व नंतर यात्रा फुटण्यास आरंभ झाला. त्यापैकीं कोणी अयोध्येकडे, कोणी हरिद्वाराकडे, कोणी मथुरा, गोकुळ, वृंदावन, इकडे स्वेच्छेप्रमाणें आणखी तीर्थयात्रा करण्यास निघून गेले. निम्मेशिम्मे यात्रा राहिली ती बरोबर घेऊन सरस्वतीबाई पूर्वीच्या मार्गानेंच परत निघून आल्या. वाटेंत लक्षांत ठेवण्याजोगी कांहीं विशेष गोष्ट न घडल्यामुळें त्यांच्या परत येण्याची हकीगत आम्हीं येथें दिली नाहीं.

याप्रमाणें या यात्रेची हकीगत आहे. ही वाचून ज्या कांहीं गोष्टी मनांत येतात त्या येथें नमूद करून ठेवाव्याशा वाटतात. त्यांपैकीं पहिली गोष्ट सरस्वतीबाईसंबंधाची. या बाईचे भ्रतार गोपाळराव गोविंद यांनीं पेशवेसरकारच्या हुकुमावरून प्रसंगवशात् पंचवीस पंचवीस हजार सैन्याचें सेनापत्य करून शत्रूच्या मुलखांत वर्षानुवर्ष स्वाऱ्याशिकाऱ्या केल्या व आपल्या पराक्रमाची कीर्ति दिगंत पसरून स्वराज्याची अभिवृद्धि केली. ते दिवंगत झाल्यावर त्यांच्या स्त्रीनेंही वैधव्यधर्मास अनुसरून परमार्थसंपादनाकरितां या यात्रेचें अग्रणीत्व पतकरून दिगंत कीर्ति पसरिली व स्वधर्माची अभिवृद्धि केली; हें पाहून सरस्वतीबाईविषयीं मनांत पराकाष्ठेचा पूज्यभाव उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. दुसरी गोष्ट या यात्रेंत मिसळलेल्या एकदोन योद्ध्यांसंबंधाची आहे. ते योद्धे म्हणजे गोविंद सखदेव व बळवंतराव पटवर्धन यादवाडकर हे होत. शत्रूवर चालून जातांना नेहमीं अघाडीस असणारे गोविंद सखदेव हल्लीं यात्रेच्या अघाडीस चालत असत! शत्रूवर घातलेल्या छाप्यांत, भर लढाईत, मोर्चांत अथवा किल्ल्याचे तटावर निशाण रोवतांना बळवंतरावाच्या हातून अनेक पराक्रम घडले व जखमाही पुष्कळ लागल्या. तेच बळवंतराव आतां नेहमीं सर्व यात्रेच्या पिछा-

डीस राहून थकल्या भागल्यांना व अपघातानें जायां झालेल्यांना गाड्यांवर घालून मजलीस पोंचवितांना पाहून कौतुक वाटतें ! या दोघांनीं आजपर्यंत दाखविलेलें क्षात्रतेज जितकें रमणीय भासतें तितकीच या वेळची त्यांची सात्विक वृत्तिही रमणीय भासते ! तिसरी गोष्ट लढाई व समेट यांच्या योगानें होणाऱ्या चमत्कारिक उलटा-पालटीच्या संबंधाची होय. जनरल गॉडर्ड याच्या फौजेचे प्राण घेण्यास तीन वर्षांपूर्वी ज्या या दोन सरदारांनीं कठोर वैरभावानें प्रेरित होऊन रात्रंदिवस टपून असावें, त्यांनींच आतां इंग्रजांचे पाहुणे होऊन त्यांच्या आदरसन्मानाचा उपभोग घ्यावा, इंग्रज अंमलदारांनींही नुकत्याच संपलेल्या लढाईविषयींच्या व राजकीय प्रकरणीं व इकडच्या तिकडच्या गोष्टी त्यांशीं मोकळ्या मनानें बोलाव्या, ही किती मौजेची गोष्ट आहे ! चवथी गोष्ट धर्माभिमानासंबंधाची. आमचें ठाम मत असें आहे कीं, आमच्या देशाच्या इतिहासांत धर्म हा राजकीय स्वार्थसाधनाच्या आड कधींही आलेला नाहीं. कित्येक मुत्सद्यांस, सरदारांस व राजेरजवाड्यांस धर्मवृद्धीचें ढोंग करणें प्रसंगवशात् सोईचें वाटलें असेल, पण वस्तुस्थिति पहातां धार्मिक उन्नतीपेक्षां प्रापंचिक उन्नतीकडेच त्यांची विशेष ओढ होती ! खरें पाहिलें असतां त्या काळांत मूठभर इंग्रज इकडे आले होते त्यांनीं काशी, गया व प्रयाग हीं हिंदूंचीं अत्यंत पवित्र क्षेत्रें बळकाविलीं होतीं. तीं क्षेत्रें कांहीं झालें तरी त्यांच्या हातून सोडवून घ्यावयाचीं हा निश्चय मोठमोठ्या बलाढ्य हिंदू राजांच्या—ब्राह्मण राजांच्यासुद्धां—हातून कधीं घडला नाहीं ! पांचवी गोष्ट सालबाईचा तह नुकताच झाल्यामुळें मित्रभावानें यात्रेकरितां आलेल्या मराठी पाहुण्यांशीं इंग्रजांनीं दाखविलेल्या सौजन्यासंबंधाची आहे. हें सौजन्य त्यांस अनुरूप नव्हतें असें आम्ही म्हणत नाहीं. पण पटवर्धनांच्या नांवावरून—पेशव्यांच्या शिफारसपत्रांवरून—

अथवा महादजी शिंद्यांच्या रदबदलीवरून–कसें कां होईना, पण काशी, गया व प्रयाग या तीन ठिकाणीं दक्षिणी यात्रेस या खेपे-पुरता कर माफ करण्यांत वॉरन् हेस्टिंग्स् यानीं जी झीज सोसिली व यात्रेची बरदास्त करण्यांत जी तत्परता दाखविली, ती त्यांच्या विशाल राजकीय चातुर्याची खूण होय ! आम्हांशीं वैरभाव केला असतां काय नुकसान होतें व सलोखा केल्यानें किती उत्तम फायदा होतो, याची महाराष्ट्रांत घरोघर दौंडी पिटविण्यास यापेक्षां उत्तम संधि इंग्रजांस कधीं मिळाली नसती !

---

नं. २७३५. श्री. ( आश्विन–अक्टो० )

विनंती सेवक बापूजी बल्लाळ जोशी, शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. " श्रीकाशीस हुंड्या करून घेतल्या त्यांची पेठ असावी. त्यास ज्यांच्या हुंड्या केल्या असतील त्यांची पेठ घेऊन तीर्थ-स्वरूप मातुश्री वहिनीकडे पाठवून देणें. " म्हणोन वडिलीं लिहिलें, ऐशास साहुकाराकडे आपण गेलों. त्यास त्यांणीं सांगितलें कीं, "आमची रीत अगोदर पेठ द्यावयाची नाहीं. कदाचित् हुंडी हरवली तरी पेठ द्यावी याप्रमाणें रीत आहे. आम्हीं येथें हुंड्या केल्या त्यांची पेठ लेहून श्रीकाशींत अर्जुनजी नाथजी यांजकडे पाठविली. कदाचित् एखादी हुंडी गैरविल्हेस लागल्यास ऐवज पेठाप्रमाणें यात्रेकरास द्यावा याप्रमाणें लिहिलें आहे. ऐवजास चिंता नाहीं. " म्हणोन सांगि-तलें. आम्ही समक्ष श्रीकाशींत जोडी रवाना केली आहे. याप्रमाणें रीत आहे. वडिलांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. तीर्थस्वरूप मा-

---

१ पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेब यांस.

तुश्री वहिनीस यात्रेंत याप्रमाणें लेहून पाठविलें आहे. कदाचित् एखादी हुंडी गैरविल्हेस लागल्यास ऐवज श्रीकाशींत पेठाप्रमाणें येईल. तों इतक्यांत आम्ही पेठही पाठवूं. वडिलीं चिंता न करावी. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असों दिला पाहिजे हे विज्ञापना.

अपत्यें मोरोबाचे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. सविस्तर वर्तमान ती॥ राजश्री बापूजीपंत मामानीं लिहिलें आहे. त्यावरून श्रुत होईल. बराणपुराहून थोरलें पागोटें व शेला कच्चे रंगाचा रंगोन आला. महमुद्या व फेटे मोतादी व बचकणी, शेले, याद लेहून पठेस दिली होती त्याप्रमाणें सनगें आलीं. ऐवजाची हुंडी दलालानें केली त्यास ऐवज दिला. राजकी वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादासाहेब कचेश्वरीं स्वस्थ आहेत. गुजरायचा सुभा राजश्री भवानी शिवराम यांस सांगितला. अद्यापि येथेंच आहेत. बहुत खराबींत आहेत. उभयतां मुख्य कारभारी, त्यास मुख्यांकडून पायमल्ली आहे. रविवारांतील गृहस्थांची ममता आहे, परंतु कांहीं चालत नाहीं. याप्रमाणें वर्तमान आहे. जो बंदोबस्त करणे तो भवानी शिवराम याणीं जातीवर करून जावें. त्यांस तों उचापतीच्या लोकानीं फार हैराण केलें आहे! पुढें काय घडेल तें प्रमाण. सालमजकुरीं अद्याप स्वारीचा रोख श्रीमंतांचा कोठें दिसत नाहीं. नबाबाकडे यांचे वकील गेले आहेत. तिकडून आल्यावर कळेल. पुण्यांत धारण चांगली आहे. या प्रांतीं होतेंभातें बरींच आहेत हे विज्ञापना.

नं. २७३६. श्री. ( १० नोवेंबर. )

पैवस्ती छ० ११ जिल्हेज. सन आर्बा समानीन.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती सरस्वतीबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक वद्य २ इंदुवार प्रातः

---

१ नानाफडनविसांकडून. २ हरीपंत फडक्याची.

काल पावेतों मुकाम कायगांव श्रीगोदा उत्तरतीर सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. तुम्ही पत्रें शु॥ ६ स पाठविलीं तीं शु॥ पौर्णिमा दोन प्रहरां येऊन पावलीं. लिहिला मजकूर कळला. ऐसेंच सदैव पत्र पाठवून संतोषवीत गेलें पाहिजे. यानंतर "तीर्थस्वरूप मातुश्री भवानीवहिनी येऊन मिळाली किंवा नाहीं तें लिहून पाठवावयास आज्ञा करावी. इकडील वर्तमान यथास्थित आहे." व "बारामतीच्या तळावरून दुसरें पत्र पाठविलें तेंही पावलें. तीर्थस्वरूप मातुश्री गंगाबाई गणेशवाडीहून येथें आली. काल तासगांवास गेली. तेथून मजल दरमजल येतील. चिरंजीव राजश्री आपाचा[1] ज्वर राहिला. स्नान करूं लागले. चिरंजीव राजश्री श्रीपतराव यांस ज्वर अद्याप येतच आहे. घेरांत ज्वर येत होता. प्रस्तुत राहिला आहे. तीर्थस्वरूप मातुश्री साळूआकास उपशम आहे. वरकड सुखरूप आहेत. यात्रा कोण कोण येऊन मिळाली तें लिहून पाठवावें" व दुसरें पुरवणीपत्र पाठविलें तें पावलें. करवीरकर यांजकडील मजकूर लिहिला तो कळला. "तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब सरकार आज्ञेवरून फौज ठेवीत आहेत. व चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा मुहूर्तेकरून निघोन भूधरगडावर सरकारचें निशाण चढलें" तें सविस्तर कळलें. आम्ही बारामतीहून गारदौंडच्या मुकामास जातों म्हणोन पत्र लिहिलें होतें. पावलेंच असेल. गारदौंडाहून निघालों तें बेलवाडीस आलों. तेथें बाहेरची झाल्यानंतर दोन मुकाम जाहले. वे॥ राजश्री व्यंकटाचारी बरोबर आहेत, त्यांस बारामतीपासून फारच बरें वाटेनासें झालें; तेव्हां डोलींत घालून आणिलें. अनूबाई[2] शिंदी शिरसोफळच्या मुकामाहून निघत्येवेळेस प्रातःकाळींच तळावर घोड्यावरून पडोन उजवा हात मणगटापाठीमागें चार अंगुळावर मोडला. हाताचें हाड जायां जाहलें.

---

१ चिंतामणराव अप्पांचा. २ बाळासाहेबांची स्त्री उमाबाई यांस.

घोड्यावर बसावयाची शक्त नाहीं. तेव्हां आमची डोली त्यांस देऊन आम्ही घोड्यावर बसोन शिरसोफळाहून बेलवाडीस येऊन तसे दोन दिवस घोड्यावरच बसोन आलों. तेथें दोन मुकाम जाहलेच. ,तेथून आम्हास डोली बसावयास नाहीं. तेव्हां आचारी यांस डोली करून देणें प्राप्त जाहलें. मजुरीचीं माणसें पाहत होतों. माणसें न मिळत. तेव्हां चिरंजीव सखूआका त्याच तळावर येऊन मिळाली. त्याणीं भोई वांईहून नवे ठेवून आणिले होते. दोन भोई मात्र कमी होते. त्यास दोन भोई आम्हाकडील देऊन मिरजेहून भोई आकास पाठवावयास दिले होते ते भोई भटजींचे डोलीस देऊन भटजींस येथपावेतों घेऊन आलों. व आम्हीही डोलींतच बसोन आलों. येथें कार्तिक शु॥ ९ दोन प्रहरां आलों. ते दिवशीं तीर्थे उपास जाहला. दुसरे दिवशीं तीर्थश्राद्ध केलें. तिसर दिवशीं एकादशी. द्वादशीस चाळीस ब्राह्मणांची समाराधना केली. चिरंजीव यमुनाआका व सगुणाआका व राजश्री त्रिंबकराव टकले[1] व सौ॥ ठकूआका येथें येऊन मिळालीं. चिरंजीव राजश्री सुभेदार व राजश्री गोविंदपंत मामा व आम्ही येथें एकच दिवशीं आलों. राजश्री बाबूराव राम दातीर येथें अगोदरच आले होते. सर्वत्रांच्या भेटी येथें जाहल्या. आज सात मुकाम केले. वरचेवर यात्रा चोहीं-कडून येतच आहे. यात्रा तपशीलवार लिहून पाठवावी तर प्रवरासंगम व टोकें व कायगांव तीन क्षेत्रांत यात्रा घरोघर उतरली आहे. आ-णखी वरचेवर येतच आहे. याजकरितां तपशीलवार लिहून पाठविलें नाहीं. परंतु यात्रेचा अजमास चार हजार पावेतों होईल. येथून येरु-ळास गेलों म्हणजे यात्रा एकत्र होईल. तेथून एक जोडी जासुदांची येईल त्यांजबरोबर तपशीलवार लिहून पाठवूं. पुण्याहून यात्रा चार

---

१ शिवराव निळकंठ कुरुंदवाडकर.

पांचशें आली आहे. परंतु मातबर कोणी दिसत नाहीं. चिरंजीव सौ॥ बच्याबाईचा सासरा व सासू आलीं आहेत व राजश्री वासुदेवपंत जोशी कानूरकर यात्रेस जावयास आले आहेत. बरोबर चिरंजीव कोनेरराव यांची[1] लेंक सौ॥ चिमाबाई भ्रतारसह आहेत. विसाजीपंत लेले यांची स्त्री आली आहे. हरिपूरचे विद्यार्थी असामी तीन पळोन आले ते आम्हास येथें भेटले. ज्वर तिघांस येतो. टोंक्यांत ब्राह्मणाचे घरीं आहेत. संगत पाहून पाठवून देणार होतों, परंतु त्याणीं जात नाहीं म्हणोन सांगितलेवरून राहिले. त्यांत हरी खाडीलकर याचा भाऊ आहे. वे॥ राजश्री महादेव भट गोडसे यांचा भाऊ गेला तो येथें आम्हास भेटला नाहीं. वे॥ महादेव भटजी येथें आले आहेत. चिरंजीव सा॥ ठकूआकास जाळ थोडथोडा येत आहे म्हणून डोली केली आहे. राजश्री अंताजपंत गोखले यांस क्षेत्रीं गेल्यावर शंभर रुपये मागितल्यास द्यावे म्हणोन पेशजीच्या पत्रीं तुम्हीं लिहिलें होतें, त्यास त्या ऐवजाच्या पुतळ्या शंभर रुपयांच्या पेशजी सांडणीस्वार याजबरोबर आल्या आहेत त्या पुतळ्या शंभर रुपयांच्या क्षेत्रीं गेल्यावर मशारनिल्हेस देऊं. चिरंजीव सौ॥ ठकूबाई जोगळेकर व सौ॥ चिटकाबाई उभयतां आम्हास भेटावयाकरितां आल्या आहेत. चिरंजीव यमुनाआकांनीं बरोबर दाजीबा व मोरोबा दोघे घेतले आहेत. व सगुणाआकानीं बाळ्या-दाजीचा भाऊ-बरोबर घेतला आहे. श्रीकाशीक्षेत्रांत महागाई पर्जन्यामुळें पडली आहे, म्हणोन कायगांवकर दीक्षितांचे घरीं व टोंक्यांत पत्रें आलीं आहेत; म्हणून यात्रा गोरगरीब गडबडली आहे. वीस शेर तांदूळ जाहले आहेत. पुढें आणखी महागाई होईल किंवा नाहीं तें न कळे. यात्रा तो जातच आहे. श्रीमंत सौ॥ पार्वतीबाई पेशवी यांच्या अस्थि ब्राह्मणाबरोबर

---

१ वसईचे माजी सुभेदार.

पाठविल्या होत्या, त्यास चाळीस पन्नास माणूस येऊन लुटून घेत-ल्याची आवई आज दोन रोज बोलतात. परंतु खरें लटकें न कळे. ऐकींव वर्तमान लिहिलें आहे. राजश्री विठ्ठलपंत लेले[१] बंदोबस्तानेंच आहेत. एक माणूस मार्गानेंच नेहमीं बरोबर असतो. पार पाडणार विश्वे-श्वर आहे. हुंड्यांच्या पेठा लेहून आणवायाकरितां पुण्यास पत्र राजश्री बापूजी बल्लाळ यांजकडे गेलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, हुंड्या हरवल्याशिवाय पेठा साहुकार देत नाहींत. पुण्याहून पत्र आलें तेंच पाठविलें आहे त्याजवरून कळों येईल. चिरंजीव गंगाबाई अद्याप आल्या नाहींत. येथें एक दोन दिवस पर्जन्य पडला. गंगेस पाणी थोडेंसें आलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा, हे आशीर्वाद.

नं. २७३७. श्री. ( १७ नोवेंबर. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीः—

प्रती सरस्वतीबाई. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक व॥ ८ इंदुवासर प्रातःकाळ मुक्काम वाकळें सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष. कायगांवचे मुक्कामाहून पत्रें गेलीं त्याजवरून सविस्तर कळलेंच असेल. पत्रीं आज निघून पुढें जातों म्हणोन लिहिलें होतें; परंतु गंगेस पाणी आलें, यात्रा पली-कडे राहिली, याजमुळ ते दिवशीं मुकाम केला. यात्रा थोडीबहुत अलीकडे आली तेव्हां दुसरे दिवशीं कूच करून गाजगांवास आलों. दुसरे दिवशीं क्षेत्र वेरूळास आलों. यात्रा मागाहून यावयाची होती याजकरितां दोन मुक्काम केले. यात्रा मागाहून आली तेव्हां कूच करून देवगांवास आलों. तेथून निघालों ते काल मुक्काममजकुरास आलों. आज निघोन कासारबारी उतरोन जळगांवास जातों. सात

---

१ लेले यांजबरोबर पटवर्धनांपैकीं कोणातरी खाशाच्या अस्थि होत्या असें यावरून दिसतें.

कोसांची मजल आहे. वेरूळच्या मुक्कामाहून यात्रा तपशीलवार लेहून पाठवितों म्हणोन लिहिलें होतें; त्यास यात्रा वरचेवर येतच आहे. आणखी यात्रा वेरूळास दोन चारशेंपावेतों आली आहे म्हणोन कळलें. त्याजवरून लहान मजली करून पुढें जातों म्हणजे यात्रा दोन चार रोजांत येऊन मिळेल. सध्यां यात्रेची गणती लागत नाहीं. पुढें बऱ्हाणपूरचे सुमारें गेलों म्हणजे तपशीलवार लिहून पाठवूं. राजश्री येसाजी गोविंद राजश्री गोविंदपंतमामाबरोबर आले होते ते येथून माघारे गेले आहेत. सविस्तर सांगतां कळों येईल. चिरंजीव राजश्री गणपतराव कुलकर[1] वेरूळच्या मुक्कामीं आले. आज चार दिवस जाहले. वरकड मजकूर सविस्तर मागाहून लिहून पाठवूं, कळावें, बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे आशीर्वाद.

पैवस्ती छ० ४ मोहरम. मार्गशीर्ष. सन आर्बा.

नं. २७३८. श्री. ( ३० नोव्हेंबर. )

पैवस्ती छ० २५ मोहरम. सन आर्बा समानीन. मार्गशीर्षमास. चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसः—

प्रती सरस्वतीबाई. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शु॥ ७ रविवासर प्रातःकालपावेतों मुक्काम बऱ्हाणपूर सुखरूप जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी ऐसें न करावें. सदैव पत्र पाठवून संतोषवीत गेलें पाहिजे. यानंतर वाकळ्याहून कासारबारी उतरोन जातों म्हणोन पेशजी लिहिलें होतें त्याजवरून कळलें असेल. अलीकडील वर्तमान तर वाकळ्याचे मुक्कामाहून निघालों ते भडगांव वरण-

---

१ गणेश बाजीराव. यांचें मूळ उपनांव चिपळूणकर. हे मिरजदौलतींतले सरंजामदार असून यांची पागा पूर्वी पटवर्धनांच्या फौजेंत चाकरीस असे.

गांवावरून बारावे दिवशीं शु॥ ३ गुरुवारीं दोन प्रहरा येथें आलों. वरणगांवावर एक मुक्काम अग्निहोत्री यांजकरितां जाहला होता. येथें मुक्काम दोन केले. यात्रा अजमासें सहा सात हजारपावेतों आहे. यात्रेंत डोल्या सुमार ऐशीं आहेत. यात्रेची गणती लेहून पाठवावी तर कोणाचे मर्जीस येईल न येईल, याजमुळें लेहून पाठविलें नाहीं. मार्गीं चालतांना अडचणीची वाट लागली म्हणजे यात्रेचा खोळंबा फार वेळ होतो. दररोज एक दोन माणसें घोडयावरून पडोन अथवा लाथ लागोन जायां होत असतात. अघाडीस राजश्री गोविंदपंतमामा व राजश्री चिंतोपंत चालतात. मध्यें राजश्री कानोपंत राहतात. पिछाडीस मागाहून चिरंजीव राजश्री बळवंतराव राहत असतात. कोणी थकलें भागलें तर गाडे भाडयाचे करून झाडून यात्रा आली म्हणजे सायंकाळच्या चार सहा घटका दिवसास येतात. यात्रेंत फारकरून कंगाल आहे. राजश्री महादजी शिंदे यांस सरकारचीं व चिरंजीव राजश्री भाऊंचीं पत्रें जासुदाबरोबर पाठवावीं तर कोणाच्या मर्जीस न ये. सर्वांच्या मतें कीं, कोणी काशीकर पाठवावा. परंतु काशीकर पाठविल्यानें त्याची आस्था भारी. याजमुळें तो प्रकार राहिला. आणि बाबूराव रामे यांस घोडें व नवीं माणसें ब्राह्मण एक व जासुदाच्या जोडया दोन व माणूस एक एकूण सहा असामी ठेवून दिलीं. श्रीनर्मदापार होऊन गेलों म्हणजे मशारनिल्हेची रवानगी करून देतों. चिरंजीव राजश्री सुभेदार याणीं सरकारचीं पत्रें राजश्री महादजी शिंदे यांस वगैरे तिकडील संस्थानिकांस आणिलीं होतीं. तीं पत्रें जिकडील तिकडे रवाना करावीं लागलीं तेव्हां चिरंजीवांस सांगितलें. त्याजवरून चिरंजीवानीं उत्तर

---

१ परशुरामभाऊंचीं. २ पैसा फार मागतो. ३ दातीर पागा फडणीस. ४ शिवराव नीलकंठ पटवर्धन कुरुंदवाडकर.

केलें कीं; पत्रें मात्र आम्हीं आणिलीं आहेत. पत्रें रवाना करावयाचा खर्चवेंच पडेल याजकरितां आम्हास रवाना करावयास गांठ पडत नाहीं म्हणून सांगितलें! त्यास आम्हीही त्याप्रमाणेंच जाब-साल करूं म्हटल्यास यात्रेची निभावणी होणार नाहीं, असें समजोन पत्रें रवाना करणें प्राप्त जाहलें. यात्रेचा समाचार वगैरे सोय करणें ती आम्हांसच करावी लागत्ये. न करूं म्हटल्यास परिणाम नाहीं. आम्ही म्हणत होतों कीं; बरोबर चिरंजीव राजश्री सुभेदार आहेत तेव्हां आम्हास कांहीं पहावें लागणार नाहीं. परंतु त्याणीं अगदींच अंगाबाहेर टाकिलें तेव्हां जें पाहणें तें आम्हीं पहावें. यात्रेंत चोरीचा उपद्रव भारी आहे याजमुळें नवे प्यादे असामी २५ ठेविले आहेत. यात्रेंत चारी प्रहर घस्त करावी लागते. घस्ती न करूं म्हटल्यास चोऱ्याही बहुत होतील. याजमुळें राजश्री कानोपंत व चितोपंत व विठ्ठलपंत यांसीं रात्रीच्या घस्ती नेमून दिल्या आहेत. त्याप्रमाणें रात्रीं करीत असतात. इंग्रजांचीं पलटणें तीन सुरतेहून आलीं. कलकत्यास जातात. त्यांचा कालचा मुक्काम बहादूरपुऱ्यावर होता. आजचा मुक्काम आमच्या तळावर होणार आहे. पुढें कोणते मार्गें जातील न कळे. येथून पुढें हांडयाचे घांटानें जाणार होतों, त्यास रामपूर म्हणून भिल्लाचें ठाणें आहे तें अहिल्याबाईनीं मारिलें. रामपूरकर भिल्ल हांडयाचे घांटाकडे गडबड करितात. याजकरितां तो मार्ग सोडून महेश्वराचे घांटानें जातों. अहिल्याबाई होळकर श्रीओंकारेश्वरास कार्तिकमासीं आलीं आहेत तीं अद्याप वर तेथेंच आहेत. त्यांजकडे बातमीस माणसें पाठविलीं आहेत. तीं तेथेंच असल्यास ओंकारेश्वराच्या दर्शनास जाणार. तीं महेश्वरास गेलीं असलीं तर महेश्वराकडे जात नाहीं. तिकडेही भिल्लांची गडबड आहे. श्रीओंकारेश्वराची पूजा भिल्लांची होती ती अहल्याबाईनीं दूर केली. याजकारितां भिल्ल चोहींकडे गडबड

करितात. याकरितां अहिल्याबाईनीं पांच चार हजार पेंढार भिल्लांवर रवाना केले आहे तें आमचे वाटेवर आहे. परवां पुढें कांहीं यात्रा गेली ती थोडी बहुत पेंढारी याणीं झाबडाझाबड केली म्हणोन वर्तमान कळलें. इतकीं संकटें प्राप्त झालीं आहेत. निभावणी करणार श्रीविश्वेश्वर आहे. वऱ्हाणपुरीं दोन मुक्काम होते. तेथील कमावीसदारानीं चौकी पहाऱ्याचा वंदोबस्त उत्तम प्रकारें केला. भेटीस आले होते. तेथून माणसें देऊन अशेरीपावेतों पोंचवून दिलें. आम्हाबरोबर जासूद जोडी होती त्यापैकीं सुभानजी कदम जासूद माघारा पाठविला आहे. व बापू डास जासूद आम्ही बरोबर घेऊन गेलों. सुभानास रवानगी जिल्हेज मोहरम दुमाही चार रुपये येथें पावले आहेत. पत्र वऱ्हाणपूरचे मुक्कामाहून पाठविणार होतों, परंतु पत्रें सारीं तयार जाहलीं नव्हतीं; म्हणून अशेरीच्या मुक्कामास घेऊन आलों. येथून रवाना केलीं आहेत. येऊन पावतील. उदईक खिरडीच्या मुक्कामास जातों. येथून बरोबर पावावयास प्यादे दिले आहेत. कळावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

वऱ्हाणपुरी छीट चिरंजीव सा।। मयाबाईस पाठविलें आहे हें तीस द्यावें.

राजश्री नारोपंत दामले व नारोपंत पोंक्षे व गोविंदरावमामा व चिंतोपंत सहस्त्रबुद्धे व बाळाजी विठ्ठल व श्रीधरपंत गोखले व बाबूराव गोखले व नारोपंत पटवर्धन व राघोपंत जोशी उभयतां व वासुदेवपंत मराठे व जिवाजीपंत फडके व गंगाधरपंत पटवर्धन व बाळाजीपंत गोडबोले व बाजीपंत काळे व विसाजीपंत करमरकर व रामाजी

१ वऱ्हाणपुरास महादजी शिंद्यांचा अंमल होता. २ हीं मिरजदौलतींतल्या कारकूनमंडळीचीं नांवें सरस्वतीबाईच्या बऱ्याच पत्रांत आहेत तीं येथें एखाद्या एके पत्रांतलीं मात्र दिलीं आहेत.

नाईक गोखले व मोरो हरि अभ्यंकर व विठ्ठलपंत भिडे व नारोपंत दातार व नारोपंत वेडेकर व आपाजी नाईक सहस्रबुद्धे व कृष्णाजीपंत पटवर्धन व बाळाजीपंत लेले व बाबाजी विठ्ठल गोखले व राघो देवजी व मल्हारराव देवजी यांसी आशीर्वाद सांगावे.

राजश्री जाखोपंत व धोंडो खंडो यांस आशीर्वाद.

राजश्री रामभट नातू व विठोबा लेले व सर्व मंडळीस आशीर्वाद.

वे॥ राजश्री विष्णुभट यांस नमस्कार. शेवतीचीं फुलें गणपतीस नित्य वाहत असतां त्याप्रमाणें नित्य वाहत जाणें हे विनंती.

नं. २७३९. श्री. ( ११ डिसेंबर. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी.

प्रती सरस्वतीबाई. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत मार्गशीर्ष व॥ ३ प्रातःकालपावेतों मुक्काम महेश्वर नर्मदा उत्तर तीर सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. अशेरीहून निघालों ते खिरडीच्या मुक्कामास आलों. ते दिवशीं त्या गांवचे प्यादे व राऊत सातपुड्याचे घांटास भिल्लांवर पारिपत्य करणेंविशीं गेले होते. गांठ पडली कीं नाहीं हें न कळे. तेथून निघालों ते शिवणेच्या मुक्कामास आलों. तेथून देवळ्यांच्या मुक्कामास आलों, तेथून कचराबाच्या मुक्कामास आलों. तदनंतर राजश्री बाबूराव राम अहिल्याबाईकडे पाठविले. अहिल्याबाई मर्दान्या घांटावर रेवातीरीं होती. रामपूरवाल्या भिल्लाच्या पारिपत्याकरितां गेली होती; म्हणून पेशजी लिहिलें होतें. आम्ही श्रीओंकारास जाणार होतों, व पुढें यात्रेची निभावणी होणें व सरकारचीं पत्रें ( अहल्याबाईस ) आणिलीं होतीं; अशा दोन तीन मजकुरांकरितां मशारनिल्हेस पाठविलें होतें. आमच्या

मुक्कामापासोन सात आठ कोसांवर होती. त्यास मशारनिल्हेची रवानगी करून आम्ही कचरायचे मुक्कामाहून कूच करून महेश्वरानजीक रेवा दक्षिणतरीं तीन कोस मजल होती तेथें मुक्काम केला. इतकियांत अहिल्याबाईकडून इजऱ्या महेश्वरीं आहे त्यास त्यांचीं पत्रें आलीं कीं, नावा जमा करून यात्रा उतरणें. त्याजवरून त्याणीं नावांची तरतूद करून तेच दिवशीं दोन प्रहरापासोन यात्रा उतरों लागली. आम्ही सर्व यात्रा उतरल्यावर दुसरे दिवशीं मंदवारीं त्रयोदशीस तिसरे प्रहरीं रेवा उत्तरतीरीं येऊन मुक्काम केला. राजश्री बाबूराव अहिल्याबाईकडे गेले होते त्यांचें बोलणें चालणें होऊन दक्षिणतरींच आम्हाजवळ आले. श्रीओंकारास जाऊं नये; तेथें भिल्लांचा दंगा आहे, म्हणोन सांगितलें. वरकड कागदपत्रांचा जाबसाल व पुढें यात्रा निभावणी होणेंविसीं पत्रें देणें, त्यास राजश्री महादजी शिंदे यांस एक पत्र व आपल्याकडील कमावीसदार जांब म्हणून गांव घांटावर आहे तेथें आहे त्यास एक पत्र, ऐसीं दोन पत्रें दिलीं. तीं पत्रें घेऊन मशारनिल्हे आले. आम्ही मंदवारीं उत्तरतीरीं आलों. त्या दिवशीं तीर्थविधि करून उपोषण केलें. दुसरे दिवशीं चतुर्दशी रविवारीं तीर्थश्राद्ध केलें. पौर्णिमा इंदुवारीं कूच करावें, त्यास सर्वांच्या मतें कीं पौर्णिमा गंगातीर सोडून पुढें जावें आणि दुसरे दिवशीं प्रतिपदेस अग्निहोत्री यांकरितां मुक्काम करावा, त्यास एक मुक्काम येथेंच करावा; असें सर्वांच्या मतें जाहलें. इतक्यांत अहिल्याबाईकडीलही बातमी आली कीं, आपण इंदुवारीं सायंकाळीं यात्रेच्या दर्शनास येणार. त्याजवरूनही राहिलों. अहल्याबाई इंदुवारीं प्रहर रात्रीस घरास आली. ते समयीं तोफा जाहल्या. दुसरे दिवशीं भौमवारीं (त्यांनीं) ब्राह्मणांस व गोरगरिबांस शिधा व एक एक रुपया दक्षिणा ऐसें दिलें. दुसरे दिवशीं द्वितीयेस बुधवारीं आम्ही कूच करणार, इतक्यांत भौम वा

झांशीहून राजश्री मोरोपंत पारोळेकर आले. त्यांणीं बातमी सांगितली कीं, तिकडे महर्गता फार जाहली आहे. काल्पीकडे व प्रयाग वगैरे प्रांतांत सात आठ शेरांची धारण जाहली आहे. कंगाल तिकडून बहुत झांशीपासोन उज्जनपावेतों येऊन राहिले आहे. तिकडून यात्रा जातेसमयीं अन्नाविषयीं यात्रेची निभावणी होऊं देणार नाहीं. ऐसें वर्तमान सांगितल्यावरून आणखीही चोहींकडून वर्तमानें आलीं त्यावरून यात्रा बहुत गडबडली. तेव्हां सर्व यात्रेंतील मातबर गृहस्थांस बोलावून आणून सांगितलें कीं, हीं वर्तमानें आलीं. त्यास कूच करून पुढें जाणें आणि उज्जनीच्या सुमारास गेल्यावर असे दंगे जाहल्यास आम्हांवर शब्द सर्व आणितील. याजकरितां काय मनसबा करणें तो सर्वत्रांनीं मिळोन करावा. मग पुढें अमक्यानें यात्रा नेली आणि फसविलें असें न व्हावें, असें कित्येक प्रकारें सांगितलें. त्यास किती एक म्हणों लागले कीं, जावें न जावें; किती एक म्हणूं लागले कीं आपण जातील तिकडे जाऊं, किती एकांचे मतें महेश्वरीं कार्तिक मास पावेतों राहावें. ऐसें नानाप्रकारें म्हणों लागले. कोणाचाही पक्का मनसबा न ठरे. तेव्हां आम्हीं सांगितलें कीं, येथें राहावें तर पुढील बातमी समजणार नाहीं. माणसें पाठवून बातमी आणावी, परंतु भरंवसा नाहीं. याकरितां उज्जन भेलसें हे अमल सरकारचे व भेलसेंपर्यंत बहुत महर्गताही नाहीं, याकरितां श्रीमहाकाळाचें दर्शन घेऊन भेलशापर्यंत जावें. भेलशास गेल्यावर तिकडील सर्व मजकूर समजेल आणि पुढील पल्लाही समीप. कदाचित् चार महिने राहणें जाहलें तत्रापि पुढें जाण्यास समीप पडेल. असें सर्वत्रांस सांगितलें. त्यावरून सर्वांच्या विचारास आलें. तेव्हां कूच करून जावें असा निश्चय जाहला. नंतर अहिल्याबाईकडेही सांगोन पाठविलें. त्यांणींही या मनसब्यास रुकार दिला व आपणाकडील शंभर राऊत उज्जनीपर्यंत दिले. जागोजाग कमा-

वीसदार त्यांचे आहेत; त्यांसही पत्रें दिलीं आहेत. हा सर्व मनसबा काल बुधवारीं करून आज तृतीया गुरुवारीं कूच करून चोळीच्या मुक्कामास तीन कोस गेलों. वाटेस तर महागाई फारच सांगतात. वे॥ राजश्री जिऊभट पुराणीक नरगुंदकर यांचा पुतण्या लक्ष्मणभट हे पळोन घराहून गेले होते. तीन वर्षे जाहलीं. त्यास वे॥ राजश्री तिमण्णाचारी लोकापूरकर यांची व त्यांची भेट येथें जाहली. त्याणीं आम्हाजवळ आणून भेटविलें. त्यांस आम्हीं सांगितलें कीं, आमचीं माणसें मिरजेस जातात, सोबत चांगली आहे. तुम्हीं निघोन घरास जावें. याप्रमाणें सांगितल्यावर त्याणीं उत्तर केलें कीं आम्ही श्रीमहायात्रेस गेलों होतों. गयावर्जन जाहलें नाहीं. आणखी एक वेळ काशीस जाऊन गयावर्जन करून मग घरास जाऊं. आतां घरीं जात नाहीं म्हणोन सांगितलें. येथें अन्नछत्रांत भोजन करून आहेत. याप्रमाणें वर्तमान भटजींस सांगावें. आपणास महेश्वरी धोतरजोडा एक व चिरंजीव सौभाग्यवती उमाबाईस खण एक येणेंप्रमाणें शीक व गाडदी रवाना केले आहेत यांजबरोबर पाठविले आहेत. घेऊन पावलियाचें उत्तर पाठवावें. हीं पत्रें अजुरदार जासुदांची जोडी नवी ठेवून " मिरजेहून पत्राचीं उत्तरें आणून द्यावीं आणि विसा कोसांचा एक रुपया जोडीचा " याप्रमाणें करार करून पाठविले आहेत. यांस येथें तूर्त दहा रुपये दिले आहेत. हे आपणाजवळ पत्रें घेऊन आल्यावर आपण तेथें दहा रुपये द्यावे. पत्रांचीं उत्तरें घेऊन आल्यावर हिशेब करून बाकीचा पैका येथें देऊं. बापू जासूद आम्हीं बरोबर घेतला म्हणून पेशजीच लिहिलें आहे. त्यास नालबंदी पावली नाहीं. त्यांस वरकड गड्यांस नालबंदी पावली असेल त्याप्रमाणें नालबंदी तुळाजी नाईक जासूद याजवळ द्यावी म्हणजे त्याचे घरीं पावती

होईल. येथून पत्रें घेऊन बारावे दिवशीं मिरजेस पोंचावें याप्रमाणें करार केला आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

सारांश गोष्ट कीं, जी गोष्ट करणें ती सावधगिरीनेंच करीत आहों. पार पाडणार श्रीकाशीविश्वेश्वर आहे ! हे आशीर्वाद.

नं. २७४०. श्री. ( मार्ग० व० ३-१३ दिसेंबर. )

आशीर्वाद उपरी. अहिल्याबाई यानीं भेटीविशीं फार आग्रह केला. वे॥ राजश्री बाळदीक्षितांस व कारकून पाठविले होते. त्याजवरून आम्ही व चिरंजीव भवानी वहिनी व चिरंजीव राजश्री सुभेदार व चिरंजीव राजश्री बळवंतराव व राजश्री गोविंदपंतमामा ऐसे भेटावयास गेलों होतों. भेट जाहली. बोलणें चालणें चार घटका जाहलें. आम्ही व भवानी वहिनी वस्त्रें देत होतों परंतु त्यानीं घेतलीं नाहींत. व आम्हांसही देत होतीं, आम्हीं घेतलीं नाहींत. त्याणीं सांगितलें कीं, प्रयागांत व काशींत महागाई फारच जाहली आहे. कंगाल भारी आहे. वाटेनें रात्रीचीही झुलड करितात. फार सावधपणें जावें म्हणून सांगितलें आहे. कोणी येतात ते सांगतात कीं, कंगालांचा उपद्रव भारीच आहे. परिणाम लागेल तेव्हां खरें. अशीं संकटें प्राप्त जाहलीं आहेत. प्रसंग पडेल त्याप्रमाणें शेंपन्नास माणसें पल्ल्यास पोंहचे तोंपर्यंत ठेवावीं लागतील. सध्यां चाळीस पन्नास माणूस ठेविलें आहे. यंदां श्रीप्रयागास जाणें होत नाहींच. मार्ग फुटला तर श्रीकाशीसच जाऊं. राजश्री व्यंकटराव घोपरडे यांचे वहिणीस बरें वाटत नाहीं. ज्वर येतो आहे. कठीणच आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

पैवस्ती छ० ८ सफर सन आर्बा समानीन. पौषमास.

नं. २७४१. श्री. ( २७ फेब्रुवारी. )

पैवस्ती छ० ३० जमादिलावल. सन आर्बा समानीन. वैशाख मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती सरस्वतीबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन शु॥ ७ भृगुवारपावेतों मुक्काम श्रीक्षेत्र काशी सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. आपणाकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें, त्यास हल्लीं पौष शु॥ त्रयोदशीचीं पत्रें पाठविलीं तीं फाल्गुन शु॥ ६ स येऊन पावलीं. यानंतर आपणांकडून पत्रें यावीं त्यास बहुत दिवस न आलीं याजमुळें...[1]..........घेऊन आले त्याजवरून बहुत संतोष जाहला. आम्हीं महेश्वरच्या मुक्कामाहून पत्रें पाठविलीं होतीं. त्या अलीकडे महेश्वराहून अहिल्याबाई होळकर यांणीं राऊत व प्यादे उज्जनीपावेतों पावावयास दिल्हे होते. व आपणाकडील कमाबीसदार यांसही पत्रें दिलेलीं होतीं. त्यांणीं आपलाली हद्द पार करून देत गेले. उज्जनीस येऊन एक मुक्काम केला. उज्जनींत शिंद्यांकडील दानप्पा होते. त्यांस सरकारचें पत्र होतें तें त्यांस दिल्हें. त्यांणीं यात्रेचा समाचार उत्तम प्रकारें घेतला व आम्हास भेटावयासही आले होते. त्यांणीं पुढील बंदोबस्ताचीं पत्रें व राऊत प्यादे भेलशापावेतों पावावयास दिल्हे होते. एक मजल भेलसें राहिलें तों राजश्री तरवारसिंग यांचा भाऊ प्रतापसिंग पन्नास राऊतांनिशीं यात्रेस न्यावयास आले होते. भेलशास आल्यानंतर चार पांच मुक्काम जाहले. आमचे शरीरीं समाधान नव्हतें. व पर्जन्य बहुत लागला, व पुढील मार्गाचा बंदोबस्त करून घेणें, येविशीं मुक्काम जाहले. राजश्री खंडेराव सुभे-

१ टिंबें दिल्याठिकाणीं मूळ पत्र जीर्ण झाल्यामुळें फाटून अक्षरें गेलीं आहेत. येथें काळजी वाटत होती पण जासूद पत्रें ' इतक्या अर्थाचे शब्द असावे.

दारही आम्हास भेटावयास आले होते. त्यांणीं यात्रेचा समाचार उत्तम प्रकारें केला. पुढें सागरपावेतों मार्गीं पत्रें कमावीसदार ( यांस ) व स्वार पंचवीस नगारा निशाणसुद्धां पावावयास दिले होते. मार्गीं भेलशापुढें कंगालांचा उपद्रव भारी लागला. गोरगरीब भाकरी करूं लागल्यास वर पडोन न्यावी व उद्या पत्रावळी टाकावयास गेलें तर हातांतून घ्याव्या. याप्रमाणें कंगालांच्या झुंडी जागां जागां जमा झाल्या होत्या. मार्गानें चालों लागलें म्हणजे एकीकडून यात्रेची रव व एकीकडून कंगालांची रव पडावी ! याप्रमाणें पांच पांच हजार मिळोन देशाकडे जाऊं लागले. तेव्हां पर्जन्य भारी लागला. दोन दोन दिवस सूर्यदर्शन नाहीं अशी पावसाची झडी लागली. तेव्हां पीकपाणीही थोडेंबहुत होईल, व धारणही चांगली होईल, समजोन कंगाल जागांजागांच राहिले. पर्जन्य पडला नव्हता तेव्हां धारण महाग होती. अन्न अगदीं मिळेना असें जाहलें होतें. पर्जन्य पडला याजमुळें दहा बारा शेरपावेतों धारण जाहली. सागर येथें आल्यानंतर राऊतांस निरोप दिल्हा. सागरकर यांसीं सरकारचीं पत्रें होतीं तीं त्यांस दिलीं. राजश्री बाळाजीपंत बुंदेले तेथें नव्हते. काल्पीस गेले होते. त्यांचे चिरंजीव व कारभारी होते ते आम्हास भेटावयास आले होते. (त्यांनीं) यात्रेचा समाचार उत्तम प्रकारें घेतला. चिरंजीव भवानी वहिनीस बरें नव्हतें, व पुढील मार्गाचा बंदोबस्त करून घेणेंविशीं पांच चार मुक्काम जाहले. संक्रांत तेथेंच जाहली. तेथून पुढें आपले कमावीसदारांस पत्रें व स्वार पंचवीस नगारा निशाण देऊन पर्णेपावेतों ( त्यांनीं आम्हास ) पावून दिल्हे............नंतर राजास पत्रें सरकारचीं होतीं तीं.........दिवाण व सरकार निसबत राजश्री राघोपंत तेथें होते ते भेटावयास आले होते. त्यांस चार गोष्टी सांगोन पुढील मार्गाचा बंदोबस्त करून घेतला. त्याणीं एक चोपदार व हरकारे जोडी

एक येणेंप्रमाणें यमुनेपावेतों पावावयास दिले होते. मार्गी तीन चौक्या होत्या त्यांस घोड्यास दोन पैसे, माणसीं एक पैसा, याप्रमाणें पडत होतें. परंतु आम्हाबरोबर राज्ञाचा चोपदार व दस्तक होतें, सबब एक पैसा न पडतां निघोन गेलों. पुढें पांच मजली श्रीप्रयाग राहिला. तेव्हां सरकारचें पत्र प्रयागच्या इंग्रजास होतें तें जासूदजोडीबरोबर पुढें रवाना केलें. इंग्रजास थैली पावतांच रहदारीचें दस्तक व तेलंगे टोपीकर असामी ३ व हरकारे जोडी येणेंप्रमाणें आम्हास आणावयास त्यानीं रवाना केले ते दोन मजल प्रयाग राहिला तों आम्हास येऊन भेटले. यमुना उतरल्यानंतर दोन चौक्या होत्या परंतु आम्हास पैसा पडला नाहीं. मागें सागरास थोडीबहुत यात्रा राहिली होती ती पाठीमागून आली. त्यांस मार्गीच्या चौक्या पडल्या. श्रीप्रयागीं आल्यानंतर येथील इंग्रजानें गांवांत ताकीद केली कीं, यात्रेकरू आले आहेत यांस कोणी कज्ज्या भांडण व जाजती जलाऊ करूं नये. याप्रमाणें ताकीद केली व त्यांजकडील मुनसी.........आमचे अगोदर पंधरा दिवस महादेवबावा गोसावी वडगांवकर आले होते त्यांस क्षौर करावयास पंधरा रुपये पडले. मकराचीं स्नानें दहा आम्हास घडलीं. मार्गी यात्रेकरू कोणी म्हणत कीं, परभारें श्रीकाशीस जावें. मकर पुढले वर्षी करावा. परंतु यात्रा बहुत, थोडाबहुत मकर सांपडला तरी चिंता नाहीं परंतु प्रयागींच जावें, असें समजोन प्रयागींच आलों. राजश्री भाऊ बक्षी शिद्याकडील यांची मातुश्री व मुधोजी भोंसले यांची लेक बाळाबाई व राजश्री गणपतराव दीक्षित नाशिककर—मोरो विनायक यांचे पुत्र—या तिघांचे तीन संगे आले. ते तीन संग मातबरच. आमचे

१ मूळ संस्कृत शब्द संघ. आतां हा शब्द प्रचारांतून गेला आहे. पण पेशवाईत याचा प्रयोग समुदायार्थी पुष्कळ होत असे. फार प्राचीन काळीं बौद्ध भिक्षूंच्या समुदायास संघ हेंच नांव होतें.

अगोदरच आले होते. प्रयागवळांचें बोलणें लागलें तेव्हां त्यांजकडे ( आम्हीं ) कारकून पाठवून सांगितलें कीं चारी संग मातबर आहेत. बोली करणें ती चार संग मिळोन एकच व्हावी. असें सांगितल्यावरून त्याणीं मान्य केलें. इतकें करावयाचें कारण चोहों संगांत चार दर पडतील आणि यात्रेची बचबच होईल. याजकरितां चार संगांची एकच मसलत करून दर स्वारीस रुपये वीस व सड्यास रुपये तीन येणेंप्रमाणें प्रयागवळांचा गुंता उरकोन दिल्हा. स्वारी खालीं माणसें तीन सुटलीं. प्रयागवळांस निम्मे ऐवज पावला. बाकीचा ऐवज गयेहून आल्यानंतर फडशा करून देऊं म्हणोन त्यांस सांगितलें, कंगाल एक हजारपावेतों लेहून दिल्हें आहे. सरकारचे..................फारशी र फशी जाहली नाहीं. गयेहून आल्यावर त्याचें थोड्या बहुतानें उरकोन आम्हासच द्यावें लागेल. प्रयागाहून आमचे भिडवर मोघमच सोडून दिलेलीं आहेत. प्रयागांत चार दिवस अधिक उणे रहावें तर सुज्याउद्दौला याजकडील किल्लेदार जुना होता त्याची तगिरी होऊन दुसरा येणार, तेव्हां प्रयागवळ वगैरे भलतीच मसलत समजाऊन कांहीं गडबड करतील. याकारितां त्वरेनें उतरोन आलों. अलीकडे झुशीस येऊन प्रयागवळांच्या बोलण्याकारितां दोन मुक्काम जाहले होते. प्रयागच्या इंग्रजाकडे चिरंजीव राजश्री सुभेदार व चिरंजीव जर्श्र बळवंतराव यांस भेटीस पाठविलें होतें. व वस्त्रेंही दिलीं. त्यांजकडील दिवाणास व मुनसी व खाशास वस्त्रें दिलीं. झुशीहून कूच करून पुढें जावें तों बातमी आली कीं दहाबारा कोसांवर गंव्हार दोन तीन हजार जमा जाहले आहेत म्हणोन बातमी आल्यानंतर फिरोन भागीरथी उतरोन इंग्रजाकडे कारकून पाठविला. तेव्हां त्याणीं मार्गाचें दस्तक व चकती व तेलंगे टोपीकर असामी २ व हरकारे जोडी येणेंप्रमाणें मार्गाचा बंदोबस्त करून श्रीक्षेत्रांत माघ व॥ एकादशीस आलों. तीर्थ-

श्राद्ध जाहलें. प्रयागाहून येथील इंग्रजास..................वकील व हरकारे दोन मजली पुढें न्यावयास आले होते. क्षेत्रांत आल्यानंतर (येथील इंग्रजानें) गंगापुत्रांस वगैरे ताकीद केली कीं, यात्रेकरू आले आहेत यांसीं कोणी कज्जा भांडण ज्यास्ती जलाल करूं नये. याप्रमाणें ताकीद केली. आज दहाबारा दिवसांत याप्रमाणें तीन ताकिदी केल्या. गंगापुत्रांची दक्षिणा अजमासें स्वारीस पंधरा रुपयेपावेतों होईलसें दिसतें. त्याचा ठराव अद्याप जाहला नाहीं. गयेहून आल्यानंतर प्रयागवळांचे बाकीचा व गंगापुत्रांचा गुंता उरकोन देऊं. गंगापुत्रांचा काय ठराव होईल तो मागाहून लेहून पाठवूं. मार्गी खर्चास नाहींसें जाहलें तेव्हां तरवारसिंग यांचा भाऊ प्रतापसिंग याजपासोन हजार रुपये खर्चास घेतले. ते तूर्त पाठवून द्यावे तर येथेंही खर्चास नाहीं. याजकारितां मागाहून हुंड्या आल्या म्हणजे ऐवज पावता करावयास येईल. येथें आल्यानंतर जलदीनें गयेस जावें तर येथील बंदोबस्त केला पाहिजे. त्यास हेष्टिंग कलकत्याचा सुभा येथें येणार आहे. तो आल्यानंतर त्याजकडून बंदोबस्त करून देतों म्हणोन इंग्रजाकडील वकिलानें कबूल केलें आहे. येथील इंग्रजास चिरंजीव राजश्री सुभेदार व चिरंजीव राजश्री बळवंतराव यांस भेटीस पाठविलें होतें. त्यासही चार गोष्टी वकिलाकरवणें सांगितल्या आहेत. कलकत्याचा सुभा येणार म्हणोन..................गेला आहे तो आल्यानंतर बंदोबस्त होईल. व चिरंजीव लक्ष्मण याचा व्रतबंध करणें आहे त्यास फाल्गुन शु॥ १२ स मुहूर्त पाहिला आहे. द्वादशीस व्रतबंध करून वद्य पंचमीस निघोन गयेस जाणार. हुंड्या येतील म्हणोन वाट पाहिली. त्यास कालच्या पत्रांत हुंड्या पाठविल्याचा प्रकार नाहीं. त्यास

१ 'तेथील इंग्रजानें पत्र पाठविलें होतें त्यावरून त्याचा' अशा अर्थाचे शब्द येथें असावे. २ गव्हर्नर जनरल वॉरेन हेस्टिंग्स.

गयेस जातांना ऐवज कर्ज काढोन न्यावा लागेल. इतक्यात हुंड्या आल्या तर उत्तमच जाहलें. कदाचित् हुंड्या आजपावेतों जाहल्या नसल्यास लौकर हुंड्या पाठवाव्या. राजश्री बाबूराव राम दातीर यांस बरोबर जासूद जोड्या २ व खिजमतगार, एक ब्राह्मण, घोडें, माणूस येणेंप्रमाणें सरंजाम देऊन शिंद्यांकडे रवाना केले होते. ते दोन मजली पुढें जातांच दुखणें लागलें. डोली करून लष्करांत गेले. त्यावर दुखणें भारीच जाहलें. दुखणेकरीच एकाचे राहुटीस होते. दरबारास दुखण्यामुळें गेले नाहींत. त्यांजकडील कारकून मातवर मातबर होते त्यांसही पत्रें लिहून दिल्हीं होतीं. त्याणीं शिंद्यांस सांगोन कलकत्यास पत्रें पाठवून थोडा बहुत बंदोबस्त करून दिल्हा. शिंद्याकडील बक्षी याणीं वैद्याकरवणें राजश्री बाबूराव यांस औषध देत होते. थोडा बहुत गुण पडला तेव्हां फिरोन डोली करून लष्करांतून प्रयागास पाठवून दिल्हे. शिंद्यांची व मशारनिल्हेची भेट जाहली नाहीं लष्क........................यंदांचे यात्रेचा चमत्कार जाहला. सारांश वडिलांचा पुण्यप्रताप भारी, याजमुळें सारे गोष्टीची निभावणी जाहली. यंदां परदेशी व स्वदेशी यात्रा चाळीस पन्नास हजारपावेतों मिळाली आहे. श्रीगयेहून जाऊन आल्यानंतर एक वाडा पांच चार हजार रुपयांमध्यें सोयीकर पाहून घेणार. क्षेत्रांत वाडा असावा. आपणास कळावें म्हणोन लिहिलें आहे. व्रतविषयीं जयसिंहकल्पतरु पुस्तकाविषयीं लिहिलें, त्यास आपण लिहिल्याप्रमाणें जुनें पुस्तक मिळाल्यास घेऊन येतों. अगर नवें लेहून घेऊन येतों. मार्गानें कंगालाचा वगैरे चोरीचा उपद्रव आयकोन मार्गीं बऱ्हाणपुरापासोन प्यादे भेलशापावेतों दीडशें ठेविले. व भेलशाहून प्रतापसिंग यांचे गुजरातीनें पन्नास असामी ठेविली. एकूण दोनशें प्यादे ठेऊन प्रयागापावेतों आलों. प्रयागाहून

---

१ महादजी शिंद्यांकडील.

भेलशाचे प्यादे यांस निरोप दिल्हा. बाकीचे श्रीक्षेत्रांत आल्यानंतर झाडून निरोप दिला. येथून गयेस जाऊं लागलों म्हणजे आणखी ठेवावे लागतील. गयेहून आल्यानंतर निरोप देऊं. येथें राजमंदिर ब्रह्मघांटीं मोहल्यांत उतरलों आहों. वाडा मोठा आहे. राजश्री जिवाजीपंत पोंक्षे व राजश्री सदाशिवपंत जोशी व विनोबा शिंदोरे व गोविंद शामराव व गणपतरावकाका व अंताजीपंत गोखले व अनूबाई शिंदी येणेंप्रमाणें घोडीं माणसें सुद्धां एकाच वाडयांत आहों. दुसरे एक दोन वाडे पाहिले परंतु घोडीं एकीकडे, व माणसें एकीकडे, व आपण एकीकडे रहावें; असे वाडे मिळत होते ते आमचे सोयीस येईना. याजमुळें या वाडयास भाडें दररोज अडीच रुपयेप्रमाणें कबूल करून राहिलों. दररोज अडीच रुपये पडोन वाडा फारच चांगला मिळाला. भाडें वर्गतीप्रमाणें साऱ्यानीं द्यावें यांप्रमाणें केलें आहे. भेलशापसून पर्णेपर्यंत पर्जन्य मार्गीं बहुत लागला व यात्रेंत मरी आली होती. पंधरा दिवसपावेतों दररोज पांच चार माणसें मरावीं याप्रमाणें पंधरा दिवस जाहले होतें. पर्णेपुढें पर्जन्य थोडा बहुत लागला, परंतु मरीचा उपद्रव राहिला. राजश्री गिरमाजीपंतास ताकीद करून त्याचे घरचें सविस्तर वर्तमान लेहून पाठवीत जावें. हुंडयांचा मजकूर सविस्तर लिहिला तो कळला. हल्लीं येथून आपणावर परत हुंडी करावी तर शेंकडा अकरा रुपये पडतात. याजकरितां हुंडी केली नाहीं. तूर्त साहुकारी.........ही येतील. हुंडया आल्या म्हणजे साहुकारांचा ऐवज द्यावयास येईल. चिरंजीव राजश्री सुभेदार यांची स्त्री गरोदर आहे याजकरितां ते तूर्त राहिले. पुढें भाद्रपदमासीं ( गयेस ) जाणार. त्यांजबरोबर राजश्री गोविंदपंत मामाही जाणार. चिरंजीव राजश्री बळवंतराव व आम्ही सर्व यात्रा घेऊन जाणार. तीर्थस्वरूप कैलास

वासी नाना ताईचें गयावर्जन करणेंविशीं चिरंजीव राजश्री सुभेदार यांसीं सांगितलें होतें, परंतु ते तूर्त जात नाहींत. याजकरितां चिरंजीव गणपतराव भिलवडीकर बरोबर आहेत यांजकरवणें करवितों. चिरंजीव राजश्री सुभेदार यांजकरवणें करवावें तर मागती जातील तेव्हां बरोबर कारकून वगैरे सरंजाम द्यावा लागेल. याजकरितां आम्ही आपले देखत करवितों. राजश्री विठ्ठलपंत लेले यांजवळ विषेश होता त्याचें विसर्जन यथासांग केलें. वे॥ राजश्री पेरंभट तेलंग यात्रेबरोबर आले नाहींत. राजश्री माणकोपंत यांस राजश्री महादजीपंत...... ............रुपये माणकोपंतास पावते केले त्याचें उत्तर पाठविलें आहे. माणकोपंत देवभात खाऊन होते; दुसरें कांहीं खात नव्हते. त्यास राजश्री कान्होपंताची भेट जाल्यावर आग्रह करून पारणें करविलें आतां भोजन करूं लागले. सोन्याचा भाव पुतळी तोळा साडेसतरा, मोहोर चवदा पावणेचवदा, सोनें साडेसोळा पावणेसतराप्रमाणें आहे. तोळ्यास आमचे साडेतेरा मासे लागतात याजमुळें तोटा येतो. क्षेत्रांतील निरखबंद अलाहिदा पाठविला आहे त्याजवरून कळों येईल. शिंदे यांचे लष्करांत राजश्री बाबूराव राम एक जासूदजोडी ठेवून आले होते ती जोडी आजच आली. त्यांजबरोबर कलकत्याच्या इंग्रजाकडील चकत्या येथील व श्रीगयेच्या बंदोबस्ताविशीं आल्या आहेत. बंदोबस्त होईल. चिंता नाहीं. कळावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २७४२. श्री. ( फाल्गुन शु० ७–२७ फेब्रु० )

पैवस्ती छ० ३० जमादिलावल. सन आर्बा समानीन. वैशाख मास.

---

१ गोविंद हरी व त्यांचें कुटुंब सत्यभामाबाई. २ अस्थि. कोणाच्या? गोपाळरावाच्या?

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस.

आशीर्वाद उपरी. यंदां सरकारच्या[1] कराची माफी जाहली. याचें कारण यंदां मातबर मातबर गृहस्थ यात्रेस आले त्यांणीं सरकारचीं पत्रें शिंद्यांस आणिलीं होतीं. व शिंद्यांचे लष्करचेही गृहस्थ होते, त्याजवरून शिंद्याचे भिडेवर कोणाची हजार दोन हजार पावेतों माफीचिठी इंग्रजानें दिली. त्याजवर आमचींही पत्रें आठ हजार यात्रेचीं गेलीं. त्याजवरून शिंद्यानें कलकत्यास पत्रें पाठवून बंदोबस्त करून दिला. मातबर यात्रा माफीचिठी घेऊन गेले, आणि गोरगरिबांजवळून कर काय घ्यावा, म्हणून यंदां अगदींच झाडून सान्यांचा कर ( इंग्रजानीं ) सोडून दिला ! तस्मात् वडिलांचा पुण्यप्रताप विशेष आहे. गुलाल उंच पाठवून द्यावा म्हणून अजुर्यांच्या[2] जोडीनें सांगितलें, त्याजवरून गुलाल वजन गवशेर पाठविला आहे. महादेवबावा गोसावी वडगांवकर प्रयागीं भेटले होते. पुढें श्रीबदरीकेदारचे यात्रेस जाऊं लागले ते समयीं बोलिले कीं, आम्हाजवळची खर्ची जाहली, आम्हास खर्ची पाहिजे, म्हणून बोलिले. त्याजवरून दोनशें रुपये दिले. वे॥ राजश्री गोविंदभट्ट गाडगीळ यांचे घरचा लखोटा पाठविला आहे म्हणून ( तुम्हीं ) लिहिलें, परंतु त्यांचे घरचा लखोटा येथें आला नाहीं. त्यांचे स्त्रीचें वर्तमान लिहिलेंवरून कळलें. भटजींचे घरचे पत्र आणवून पाठवून देणें दुसरे जोडीबरोबर पत्रें रवाना केलीं तें पौष शु॥ १४ बुधवार दोन तास रात्रींचीं पत्रें फाल्गुन शु॥ ६ गुरुवारीं सायंकाळीं येथें पत्रें घेऊन आले. व दुसरी जोडी अगोदर रवान

1 पेशवे सरकारची रयत यात्रेस आली तिला इंग्रजसरकारांतून कराची माफी मिळाली. २ अजुरे अथवा अजूरदार आणि जासूद यांमध्यें अंतर इतकेंच कीं, जासूद हे पत्रें नेणारे बारमहाचे नोकर असतात आणि अजूरदार हे अमुक मुदतींत पत्र पोंचविल्यास अमुक रुपये मिळतील अशा शर्तीवर कामावर मुद्दाम लाविलेले असतात.

केली तीं फाल्गुन शु॥ ५ स पत्रें पावलीं. अजुऱ्यांची जोडी पाठविली त्यांस आपण लिहिल्याप्रमाणें दहा रुपये दिले. व बापू जासूद याची नालबंदी दिली म्हणोन लिहिलें तें कळलें. उत्तम जाहलें. राजश्री व्यंकटराव घोरपडे यांचे वहिर्णीस बरें वाटत नव्हतें, त्यास हल्लीं आरोग्य चांगलें जाहलें. वे॥ राजश्री व्यंकटाचारीही चांगले बरे जाहले. चिंता नाहीं. चिरंजीव सौभाग्यवती मनाबाई व सौ॥ मथुराबाई व सौ॥ ताराबाई प्रस्तुत सासऱ्यांस गेलीं आहेत म्हणून लिहिलें तें कळलें. वरकड घरांत दुखणीं आलीं होतीं; परंतु सध्यां आरोग्य जाहलेचें वर्तमान लिहिलें तें कळलें. वरकड पत्रांतील मजकूर कळला. इकडे महर्गता बहुतच होती परंतु आम्ही निघाल्यापासोन पर्जन्य पडों लागला, याजमुळें इकडे धान्याचा सुभत्ता जाहला म्हणोन मार्ग फुटला, नाहीं तर मार्गींच राहणें जाहलें होतें ! परंतु वडिलांचें पुण्येंकरून निभावणी जाहली. लष्करें बाहेर निघाल्याचें सविस्तर वर्तमान लिहिलें तें कळलें. आम्हाविशीं चिंता न करावी. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

पत्रें तुम्हीं लिहिल्याप्रमाणें ज्यांचीं त्यांस पावतीं केलीं. येथून पत्रें रवाना जाहलीं आहेत तीं जिकडील तिकडे पावतीं करावीं हे आशीर्वाद.

नं. २७४३. श्रीगणेशाय नमः ( २८ फेब्रु०. )

पैवस्ती. छ० ३० जमादिलावल. सन आर्बा समानीन. वैशाख मास.

स्वस्ति श्रीमत्सकल-गुणसंपन्न सौजन्य-सिंधु-शिरोमणि परोपकार-धर्ममूर्ति गोब्राह्मण-प्रतिपालक सदाराजमान्य राजश्री गंगाधरराव पंडित महाप्रभुषु—

श्रीमदाश्रितांतर्गत वाराणसीवासी काशीस्थपुरोहित सदाशिव भट्ट दामले यांचे अनेकमन्ये वाक्कायविहित वेदोक्त आशीर्वाद. तथाच आशीर्वाद मंत्रः—अद्धीदिंद्र प्रस्थितेमाहवींषि चनो दधिष्व पचतोत सोमं॥ प्रयस्वन्तः प्रतिहर्यामसि त्वा सत्याः संतु यजमानस्य कामाः॥ विनंती उपरी. येथील क्षेम कुशल जाणोन स्वकृपासूचक कुशल क्षेम कागद लिहावयास आज्ञा केली पाहिजे. तेणेंकरून स्वानंद आश्वासन होईल. विशेष सरस्वतीबाई महाराजांची आज्ञा घेऊन काशीयात्रेस निघाली. सर्व मंडळीसहित प्रयागयात्रा सांग करून श्रीकाशीस आली. चैत्र व॥ ५ स गयेस जायाचा उद्योग आहे. इंग्रजें आठ दिवसांत काशीस येणार आहे. त्याची भेट करून बंदोबस्त करून सत्वर जातील. सांगातें दहा सहस्र यात्रा आहे. आपले पुण्येंकरून सर्व कार्य सिद्ध होईल. आम्ही महाराजांचे शुभचिंतन अहर्निश विश्वेश्वरापाशीं करीत असतों. कळलें पाहिजे. समर्थांप्रति विशेष काय लिहावें! हे आशीर्वाद. १००००००००

शुभंभवतु मिति फाल्गुन शु॥ अष्टमी.

---

१ हा ऋग्वेदाच्या आठव्या अष्टकांत अ० ६ व० २१ मं० १० मध्यें मंत्र असून नेहमींच्या आशीर्वादमंत्रापैकींच आहे. "हे इंद्रा, पूर्व वेदींत सिद्ध होऊन तुला समर्पण होण्यासाठीं उत्तरवेदीकडे निघालेलीं हीं हवी भक्षण करच. हें दुग्धघृतादि अन्न तूं उदरांत ठेव. तसेंच पुरोडाशादि शिजविलेलीं अन्नें उदरांत ठेव. सोमाचें प्राशन कर. तेणेंकरून अन्नवान् होत्साते आम्ही तुजजवळ धनादिकांची याचना करूं. यज्ञ करणाऱ्याचे मनोरथ सत्य होवोत." असा या मंत्राचा अर्थ आहे. यांत प्रकृतार्थाला उपयोगी वाक्य 'सत्याः संतु यजमानस्य कामाः' एवढेंच आहे. २ वॉरन् हास्टंग्स.

नं. २७४४. श्रीगणराज. (फाल्गुन शु० ८-२८ फेब्रु०)

पैवस्ती छ० ३० जमादिलावल. सन आर्बा समानीन. वैशाखमास.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें बाळानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ६ रबिलाखरपावेतों क्षेत्र काशी येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पौष शु॥ त्रयोदशीचें पत्र पाठविलें तें फाल्गुन शु॥ ५ स पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. " चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादा व आपली फौज व तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांकडील फौज इचलकरंजीवर आहेत........................जनोबा सुभेदार कांहीं फौजसुद्धां कोंगनोळीवर आहेत " म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान तर प्रयागेस आलों. मकराचीं अकरा स्नानें जाहलीं. वीस दिवस तेथें होतों. प्रयागवळांचा उपद्रव किमपि लागला नाहीं. कलकत्तेहून माफी जाहली आहे. स्वारीस रुपये वीस व सडे माणसास रुपये तीन येणेंप्रमाणें घ्यावें ऐसें जाहलें. त्याचप्रमाणें गंगापुत्रानीं रुपये दरस्वारीस दहा घ्यावे याप्रमाणें ताकीद केली आहे. वडिलांस कळावेंकरितां लिहिलें आहे. वडिलांचीं पत्रें इकडे येतात तेव्हां यादवाडचीं[1] पत्रें आणवून पाठवीत जावीं. आम्हीं येथून ती॥ राजश्री तात्या[2] व भाऊसाहेबांस पत्रें पाठविलीं आहेत. वडिलीं प्रविष्ठ करावीं. आणि वडिलांचीं पत्रें इकडे येतील तेव्हां उत्तरें आणवून पाठवीत जावीं. फाल्गुनी पौर्णिमा जाहली म्हणजे गयेकडे जाणार. कलकत्त्याचा हेष्टिन येथें येणार आहे तो आला म्हणजे गयेचा बंदोबस्त करून जावें असें

१ बळवंतराव यादवाडकर पटवर्धन यांचें हें पत्र. २ पत्र लिहिणाराचे वडील अंताजीपंततात्या.

केलें आहे. कसा प्रसंग घडतो पहावें. परंतु वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व संकटें दूर जाहलीं. गयाही करून निर्विघ्नपणें येतों. कांहीं चिंता नाहीं. सदैव पत्र पाठवून सांभाळीत जावें. वरकड मजकूर तीर्थस्वरूप ................दादवाडाला............पिटाली. मीं लिहून कळवावेंसें नाहीं. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

नं. २७४५. श्रीगणराज. ( फाल्गुन शु० ९–२९ फेब्रु० )

पैवस्ती. छ० ३० जमादिलावल सन आर्बा समानीन. वैशाख मास.

अपत्यें शिवरामानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ० ७ माहे रबिलाखरपर्यंत मुक्काम श्रीकाशीक्षेत्र वडिलांचे आशिर्वादेंकरून समस्त सुखरूप असों. विज्ञाप्ति. वडिलीं छ० १० माहे सफरचीं पत्रें पाठविलीं तीं छ० ४ रबिलाखरीं येऊन पावलीं. मस्तकीं वंदून सनाथ जाहलों. सदैव आशीर्वादपत्रीं सांभाळ करणार वडील समर्थ असा. यानंतर इकडील वर्तमान सविस्तर सागरच्या मुक्कामाहून लिहिलें आहे. त्या अलीकडे वर्तमान तरी सागराहून पन्नास स्वार समागमें घेऊन मजल दरमजल पर्ण्यासीं आलों. पर्णेकर राजास सरकारचें पत्र होतें तें पावतें केलें. त्यानींही आपला जिल्हापार होईपर्यंत एक इजन्या नेहमीं दिला होता. त्यांनीं आपले अमलांतून चौकी वगैरे कांहीं न घेतां सुरक्षित यमुनापार करून दिलें. पर्णेकराचे अमलांत दोनी जागां चौकी ( परंतु ) कांहीं घेतलें नाहीं. आणि यमुनापार होतां समयीं नावाडियासीं ताकीद करविली जे, यात्रेकरू यांसीं पार करून देणें, ज्यांनीं आपले संतोषेंकरून पैसा अधेला देतील तो घेणें. जाजती उपद्रव केलेस पारिपत्य होईल. ऐसी इजन्यानें ताकीद करून महूचे

---

१ शिवराव नीलकंठ कुरुंदवाडकर यांचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र. हे टिंबें दिलेल्या ठिकाणीं फाटून अक्षरें गेलीं आहेत.

घाटास पार करून दिलें. त्यानंतर रथसप्तमी यमुनातीरीं करून अष्टमीस अकबरपुरास मुक्काम केला. तेथून कूच करून प्रयागास माघ शु॥ ९ स आलों. नवमीपासोन माघ वद्य तृतीयापर्यंत मकरसंक्रांतीचीं स्नानें दहा जाहलीं. यात्राही सांग संपादिली. उपरांत मेजर लरेंट इंग्रज प्रयागचा सुभा त्याची भेटी घेतली. वस्त्रें दिलीं. त्यांनीं प्रयागवळांस ताकीद केली जे, यात्रेकरांसी सरकारी कर व चौकी वगैरे हांसील घेत होतों तो यंदां कलकत्त्याहून माफ जाहला आहे. कांहीं एक उपद्रव व्हावयाचा नाहीं. त्यासीं तुमचा खंड दरस्वारीस कांहीं आहे तोही तुम्हीं न घेणें. यात्रेकरांनीं आपले संतोषें........ .........म्हणोन कांहीं ठराव करून दिलेस............. उपद्रव करून घेतलेस सरकारची गुन्हेगारी घेतली जाईल. याप्रमाणें निक्षून ताकीद कराविली आणि आम्हास भागीरथीपार करून देविलें. समागमें तेलंगांचा पहारा काशीपर्यंत दिला. भागीरथीपार होऊन चार मजलीनें श्रीक्षेत्रीं माघ वद्य एकादशीस पावलों. येथील यात्रा यथासांग संपादिली. येथील इंग्रज फोक साहेब सुभा आहे त्याची भेटी घेतली. सहाचार घटका बैठक होऊन राजकी वगैरे बोलणें जाहलें. तदोत्तर येथील यात्रा जाहली. पुढें गयेस जावयाचा मजकूर त्यांसीं सांगितला. त्यांनीं ह्मटलें जे, आपला साहेब हेष्टिन कलकत्त्याचा सुभा येथें शिमगी पौर्णिमेस येणार आहेत. ते आल्यानंतर त्यांची भेटी करवूं आणि पुढें गयेस जावयाचा निश्चय करून देऊं. त्याप्रमाणें जावयाचें करावें. हेष्टिन साहेब कलकत्त्याहून येथें लवकरच येतील. त्यांची भेटी घेऊन पुढें गयेस जावयाचा मजकूर सविस्तर लिहून कळवूं. यंदां यात्रा खोळीमहेश्वराचे मुक्कामास आली तेथलें वर्तमान कीं मार्गीं व क्षेत्रीं महर्गता भारी, दहा शेरांची धारण. तेव्हां वर्तमान ऐकोन यात्रा फारच घाबरी जाहली. तैसेच उज्जनीस आलों. तों मार्गीं पर्जन्य विपुल

होऊन पिकें चांगलीं दिसूं लागलीं, तेणेंकरून धारण पांच चार शेर चढली. नेहमीं धारण वीस शेर पंचवीस शेर मिळाली. आणि मार्गाचा कांहीं वसवसा चौकीचा वगैरे कांहीं पडला नाहीं. तेणेंकरून यात्रा यथासांग संपादिली. प्रयाग व काशीची यात्रा यथासांग जाहली. पुढें गयेचीही याचप्रमाणें घडेल. यात्रा पेशजी बहुत दिवस सालोसाल येसच होती, परंतु सालमजकुरीं यात्रेस सुभत्ता जैसा घडला ऐसा पेशजी कोणाचाच घडला नाहीं. आणि पुढेंही घडणें दुरापस्त आहे. हा योग श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून घडला. हीं कीर्ति दिगंतरीं जाहली. वरकड वर्तमान तीर्थरूप काकूनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७४६. श्री. (फाल्गुन शु० ९—२९ फेब्रुवारी.)

* यादी टोक्याहून काशीपर्यंत मजला. कोस पुणें प्रांताप्रमाणें.

| | किता | कोस | | किता | कोस |
|---|---|---|---|---|---|
| १ | गाजेगांव | १० | १ | बेरनर | ५ |
| १ | वेरूळ | ८ | १ | नसराबाद | १२ |
| १ | देवगांव | ४ | १ | वरणगांव | १० |
| १ | पिंपरखेड | १० | १ | अयनपूर | ९ |
| १ | चाळीसगांव | १० | १ | बऱ्हाणपूर | १० |
| १ | टाकळी | ७ | १ | असेर | ६ |
| १ | भडगांव | ४ | १ | खेरडी | ७ |
| १ | उत्रण | ७ | १ | शिरणें | ९ |
| ८ | | ६० | ८ | | ६८ |

* यादी शिवराव हुमेदार याणीं बाळासाहेबांस लिहून पाठविली.

शा. १७०६ महेश्वरापासून काशीपर्यंत. इ. स. १७८४

| कित्ता | | कोस | कित्ता | | कोस |
|---|---|---|---|---|---|
| १ | देऊळगांव | ९ | १ | आटाशेब्रोर | १० |
| १ | कचराप | ११ | १ | तीवर्दे | ८ |
| १ | महेश्वर | ४ | १ | रादगड | ७ |
| १ | चोळी | ४ | १ | शिवर्णे | ६ |
| १ | जाव | ६ | १ | सागर | ७ |
| १ | इंदूर | ७ | १ | सनोदा | ५ |
| १ | सावेरी | १० | १ | पथरीया | ९ |
| १ | उज्जनी | ८ | १ | नरशींगड | ७ |
| १ | तराणे | ११ | १ | हर्टे | ८ |
| १ | साजापूर | १० | १ | घेसाबाद | १० |
| १ | गुलाणा | ६ | १ | अमानगंज | ११ |
| १ | सुजालपूर | ८ | १ | कंकरहटी | १० |
| १ | खोकरा | ८ | १ | पर्णे | ६ |
| १ | दुराई | ८ | १ | शिंगपूर | ६ |
| १ | इस्मालनगर | ११ | १ | कालिंजरगड | ९ |
| १ | गुलगांव | १२ | १ | फत्तेगंज | ८ |
| १ | भेलसें | ५ | १ | हड्या | ९ |
| १ | चित्रकोट | ८ | १ | गोर्पागंज | ७ |
| १ | बगरही | ७ | १ | तमाचाबाद | ९ |
| १ | मऊ यमुनातीर यमुना उतरोन | ११ | १ | श्रीकाशीक्षेत्र भागीरथीतीर | ११ |
| १ | अकबरपूर | ११ | २० | | १६३ |
| १ | श्रीप्रयाग | ६ | | | |
| २२ | | १८१ | कोस ३६१ सुमार. | | |

मजली अठ्ठावन, कोस सुमार चारशें एकसष्ट.[1] आम्ही टोक्याहून कार्तिक वद्य चतुर्थीस निघालों ते प्रयागास माघ शु॥ ९ चौपन्नावे मजलीस पावलों. वाटेंत मुक्काम सवीस सत्तावीस जाहले. प्रयागास पंधरा मुक्काम जाहले. येणेंप्रमाणें वाटेनें आलों. नीट वाटेनें दरमजल चालतों असतों तर पंचेताळीस दिवसांनीं पावतों. कळावें विदित होय हे विज्ञापना.

नं. २७४७. श्री. ( १५ जुलई. )

पैवस्ती छ० १८ जिल्काद. सन खमस समानीन आश्विन मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती सरस्वतीबाई. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत आषाढ व॥ १३ पावेतों मुक्काम श्रीक्षेत्र काशी सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुह्माकडून पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें, त्यास हल्लीं जासुदांबरोबर पत्र वैशाख शु॥ एकादशीचें पाठविलें तें आषाढ व॥ दशमीस येऊन पावलें. लिहिला मजकूर कळला. सदैव पत्र पाठवून संतोषवीत गेलें पाहिजे. यानंतर फाल्गुन वद्य एकादशीस गयेस जातों म्हणोन लिहिलें होतें त्याजवरून कळलेंच असेल. गयेस जावयाचे पूर्वी इंग्रजाकडे पत्रें लिहून पाठविलीं होतीं. तों सहजांत इंग्रज हेष्टिण साहेब—गयेचा व क्षेत्रांचा[2] अंमल त्याजकडे—तो येथेंच आला होता. त्याचे भेटीस चिरंजीव राजश्री सुभेदार व चिरंजीव राजश्री बळवंतराव व राजश्री गोविंदपंत मामा वस्त्रें व जवाहीर दोन हजार रुपयांचें देऊन पाठविले होते. त्यांणीं वस्त्रें व जवाहीर घेतलें नाहीं. त्याणीं रहदारीचे दस्तक व गयेच्या महसुलाची माफी चक्ती करून दिली, त्याजवरून फाल्गुन वद्य एकादशीस निघोन गेलों. मजल दर मजल बारावे

---

१ परंतु कोसांची बेरीज ४७२ भरते. २ काशीक्षेत्राचा.

दिवशीं पुनःपुनातीरीं गेलों. तेथून गया दोन मजली राहिली. तेव्हां माफीची चक्की व दस्तक होतें तें देऊन वकील गयेच्या इंग्रजाकडे पाठविले. त्याणीं चक्की पाहून उत्तर केलें कीं, " मिरजेचा संग असेल त्याची माफी करूं. बाकी यात्रेचा शिरस्तेप्रमाणें ऐवज घेऊं; " म्हणोन सांगितलेवरून आम्ही गयेस जाऊन श्रीविष्णुपदासन्निध दंडिबागेंत यात्रेसहित राहिलों. गांवामध्यें रहावें तर यात्रा बहुत-दहा हजारपावेतों-याजमुळें गांवांत रहावयाची सोय नाहीं. याजमुळें बाहेरच राहिलों. मिरजेच्या यात्रेची माफी बाकी यात्रेचा ऐवज द्यावा तर लौकिकीं ठीक दिसेना. याजकरितां फिरोन पत्रें लिहून इंग्रज हेष्टिण साहेब याजकडे वकील लखनौस रवाना केले. त्यानीं बोलणें चालणें ठरावून सर्व यात्रेची माफी करून घेऊन आले. दरबारखर्च दहा हजारपावेतों रुपये पडले तेव्हां माफीची चक्की जाहली. वकील पत्रें घेऊन येत तोंपावेतों यात्रेसुद्धां तशींच राहिलों होतों. गयावर्जनेंही कोणास करूं दिलीं नाहींत. माफीचिठ्ठी आल्यानंतर सर्व यात्रेचीं गयावर्जनें चालूं लागलीं. नित्य तीनशें चारशें चिठ्या दररोज गयावर्जनांच्या इंग्रजाकडील घेऊन येत होतों. या कामास दोन कारकून नेहमीं चिठ्या आणावयास पाठवीत होतों. खापरें तीन हजार व पंचगया व एकोद्दिष्ट मिळोन दोन हजार येणेंप्रमाणें जाहलें. इतकें करावयाचें कारण म्हणावें तर यात्रेंत कंगालभरणा भारी, याजमुळें करणें प्राप्त. माफीचा प्रकार नसता तर यात्रेची गणती घेते. गणती घेतली नाहीं म्हणोन कंगालांची निभावणी जाहली. यात्रेच्या लोकांस गयावळांनीं फारच अडविलें, याजकरितां तीन मास लागले. आणि यात्राही बहुत, याजमुळें चार दिवस जास्ती लागले. सर्व यात्रेचीं व गोरगरी-

---

१ यात्रेकरूंनीं आपला कराचा ऐवज द्यावयाचा.

बांचीं गयावर्जनें जाहल्यानंतर मागाहून आम्हीं प्रारंभ केला. व आणखी चार गयावर्जनें करावयाचीं तीं वे॥ राजश्री गोविंदभट गाडगीळ व वे॥ राजश्री चिंतामणभट खाडीलकर व राजश्री अंताजीपंत गोखले व चिरंजीव राजश्री गणपतराव भिलवडीकर एकून चार असामी बरोबर घेऊन गयावर्जनें यथासांग केलीं. त्यांजपैकीं तीं॥ कैलासवासी नानांचें प्रसिद्धच केलें. बाकीचीं गुप्तरूपें केलीं. घरचीं पांच व घरांतील मंडळींचीं नऊ एकूण चौदा खापरांची बोली खंड एकत्र साडेआठ हजार रुपयांचा, त्याजपैकीं पातीदार गयावळांस साडेपांच हजार व पातीदार गयावळ असामी शंभर त्यांस शंभर पितांबर एकूण एक हजार रुपये. आमच्या गयावळास विष्णूचे पूजेसहित दोन हजार द्यावे, त्यापैकीं सोन्याचीं कडीं दोन शेरांचीं व सांखळी एक शेराची व कुडक्या, चांदीचें ताट १ व वाट्या २, चंबू, पंचपात्री, पळी, हे रुप्याचे दागिने व शालजोडी व पितांबर व विष्णुपद पूजासहित दोन हजार रुपये. एकूण साडे आठ हजार दिले. गांव बक्षीस द्यावा म्हणोन गयावळांनीं अड घातला होता. त्यांस साफ सांगितलें कीं, " गांव सरकारचे. आम्हास द्यावयास अनुकूळ पडत नाहीं, " म्हणोन सांगितल्यावरून वटश्राद्धाचे दिवशीं वटाखालीं फार अडविलें, त्यावरून शंभर रुपयांची जमीन इनाम करून देतों म्हणून उदक सोडलें व एक घोडें दिलें. गयावर्जनें वगैरे कामें उरकोन आषाढ शु॥ ७ स निघालों, ते आषाढ वद्य ६ गुरुवारीं क्षेत्रांत आलों. चिरंजीव राजश्री दाजीबा परचुरे याची स्त्री गरोदर होती याजमुळें

१ पेशवे सरकारांतून लष्करी नोकरीकरितां जहागीर म्हणून वहिवाटीस असलेल्या मुलुखापैकीं इनाम देतां येईना, सबब मिरज जहागिरीपैकीं मोडलिंब तालुक्यांतली गोविंद-हरीच्या खासगत इनामापैकीं शंभर रुपये आकाराची जमीन गयावळास इनाम देण्यांत आली ती अद्यापि त्याच्या घराण्यांत चालत आहे.

त्याजेकरवणें अगोदरच गयावर्जन करवून पुढें क्षेत्रास रवानगी करून दिली, परंतु मार्गींच प्रसूत जाहली. बारा दिवसपावेतों मार्गींच राहणें जाहलें. उपरांत क्षेत्रास आली. क्षेत्रीं आल्यानंतर कन्या जाहली होती ती मृत्यु पावली. चिरंजीव राजश्री सुभेदार यांची स्त्री गरोदर होती. प्रसूत जाहली, कन्या जाहली. दोन मास जाहले व बाळंभट लेले याची स्त्री प्रसूत जाहली, पुत्र जाहला. व वे॥ राजश्री बाळ दीक्षित यांची स्त्री प्रसूत जाहली. कन्या जाहली. एक मास जाहला. आम्हीं येथें आल्यानंतर चिरंजीव राजश्री सुभेदार यांची गयेस आषाढ व॥ ८ स रवानगी करून दिली. बरोबर राजश्री गोविंदपंतमामा व वे॥ राजश्री बाळ दीक्षित बरोबर दिले आहेत. राजश्री बाळंभट लेलेही बरोबर दिले आहेत. चिठीविशीं गयेंत माफीचा बंदोबस्त करून आलों आहोंत. तेही दोन महिन्यांचे आंतच गयावर्जनें करून येतील. इकडे पर्जन्य अद्याप नाहीं, याजमुळें महागाई जाहली आहे. क्षेत्रांत कंगालही बहुत जमा जाहलें आहे. पुढें पाऊस पडला तर उत्तम आहे. नाहीं तर महर्गता बहुतच होईल. क्षेत्रांत आल्यानंतर प्रयागवळांस बोलावयास पाठविलें आहे. ते आले म्हणजे गंगापुत्रांचा व प्रयागवळांचा फडशा करून देऊं. गयेंत महागाई आठ नऊ शेरांची आयकोन बरोबर बाजारचीं शेदीडशें दुकानें नेलीं होतीं, तेव्हां अकरा बारा शेरांची धारण जाहली. बाजारचे वाणी यांस जकात माफ करून दिली तेव्हां वरचेवर भरती येऊन आबादानी जाहली. 'ती॥ साळूआकाची जाऊ तेथें आहे, तीस अडीचशें रुपये द्यावे ' म्हणून लिहिलें, त्यास वे॥ राजश्री बाळंभट लेले गयेहून आले म्हणजे त्यांचे गुजारतीनें आपण लिहिलेप्रमाणें अडीचशें रुपये पदरीं घालून पावलियाचे कबज घेतों. आक्काची जाऊ ती बद्रीच्या यात्रेस गेलीं आहेत. तिच्या भावास देऊन कबज घेतों. केशर

अर्धा शेर पाठविले तें पावलें. चांगलें आहे. वाड्याचा मजकूर लिहिला त्यास आपण लिहिल्याप्रमाणें सोयकर पाहून मिळाल्यास घेतों. "घरांत सूर्याचें अनुष्ठान होत आहे यास्तव स्फटिकावर सूर्ययंत्रें क्षेत्रांत मिळतात. यास्तव लिहिलें......सूर्याचें यंत्र चांगलें पाहून घेऊन यावें." म्हणून लिहिलें त्याप्रमाणें शोध करून मिळाल्यास घेतों. शाळिग्रामाचा मजकूर सविस्तर लिहिला तो कळला. आपण लिहिल्याप्रमाणें शोध करून चौकशी करून घेतों. लखोटे एकशें एकतीस पाठविले आहेत म्हणोन लिहिलें, त्यास आम्हीं आमचे घेतले. बाकीचे ज्यांचे त्यांस पावते केले. महादेव बाबा गोसावी वडगांवकर प्रयागाहून हरिद्वारास गेले. तेथून पत्र आलें कीं, इकडे महागाई बहुत आहे. पांच शेरांची धारण आहे. याजकरितां शंभर रुपये आम्हास खर्चास पाठवून यावें, म्हणोन पत्र आलें. त्याजवरून शंभर रुपयांची हुंडी करून हरिद्वारास पाठविली. आपणास कळावें. हुंड्यांच्या मजकुराचें पत्र अलाहिदा आहे त्याजवरून कळों येईल. जयसिंहकल्पतरूच्या पोथीविशीं पेशजी (तुम्हीं) लिहिलें होतें त्याजवरून गयेस जातांना लेखकास पुस्तक व कागद देऊन गेलों होतों. आजपावेतों बहुतकरून पोथीचें काम होत आलें आहे. आणखी एक मास लागेल. पुण्याहून लोकांचीं पत्रें येतात ते जासूद एक महिन्यांत येतात; आणि आपणाकडील जासूद येतात त्यांस दोन अडीच महिने लागतात ! याजकरितां जासुदांस ताकीद असावी म्हणजे जलदीनें पत्र घेऊन येतील. बारामतीचे पत्राचीं उत्तरें मागाहून पाठवून देतों म्हणून लिहिलें तें कळलें. वे॥ राजश्री चिंतामणभट खाडीळकर यांस रुपये तीनशें देऊन पावलियाचें कबज घेऊन पाठवावें म्हणून लिहिलें, त्यावरून भटजींस तीनशें रुपये देऊन पावलियाचें कबज घेऊन पाठविलें आहे. या पत्रांबरोबर

---

१ या खेपेस तुमच्या पत्रांबरोबर.

कृष्णाबाई शिंदीचें पत्र आलें नाहीं. कळावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २७४८. श्री. (आषाढ व० १३-१५ जुलई.)

पैवस्ती. छ० ८ जिल्काद. आश्विन मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती सरस्वतीबाई. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २६ साबान सुखरूप जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. राधाबाई दाती गजेंद्रगडकर यांस गयेंत दुखणें लागोन देवाज्ञा जाहली. एक मास जाहला. गयेंत मरीचा उपद्रव बहुतच जाहला होता. पंधरा दिवसांमध्यें यात्रेंतील ब्राह्मण स्त्रिया अग्निप्रवेश केल्या. याप्रमाणें बहुत माणसें जायां होऊं लागलीं होतीं. वे॥ राजश्री धर्णाधरभट यांचे बंधु मुरलीधरभट गयेंत होते त्यांस देवाज्ञा जाहली. दीड मास जाहला. क्रिया जाहली नाहीं म्हणोन सांगोन पाठवावें. वे॥ राजश्री विश्वनाथभट भुस्कुटे यांचे तीर्थरूप रामभट भुस्कुटे यांस आम्ही गयेस गेल्यांवर देवाज्ञा जाहली. विश्वनाथभट यांचे पुत्र दोघे तेही एक सातवे व एक बारावे दिवशीं एकूण दोनी पुत्रांस देवाज्ञा जाहली ईश्वरें मोठा घात केला. राजश्री गोविंदपंत लेले यांची बहीण दिवेकरीण वाटेगांवची यात्रेबरोबर होती तीं गयेहून येतांना मार्गी चालतांना झळ लागोन देवाज्ञा जाहली म्हणून वाटवे याचे घरीं सांगून पाठवावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

हेच पत्रीं मल्हारी व केदारी व आबाजी व खेत्रोजी व पुरणसिंग व बक्तराम व बापू जासूद व मोतद्दार मंडळी यांचे समस्तांचे दंडवत. विज्ञापना. साहेबानीं आशीर्वाद पाठवून दिला त्याजवरून खुशाल आहों, मातुश्रीच्या आज्ञेंत आहों. हे विज्ञापना.

नं. २७४१ श्री.( आषाढ व० १३-१५ जुलई. )

पैवस्ती छ० १८ जिल्काद. सन खमस समानीन. आश्विन मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती सरस्वतीबाई. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २६ साबान सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. सदैव पत्रीं संतोषवीत गेलें पाहिजे. यानंतर " तीर्थस्वरूप भाऊसाहेब बाहेर निघाले आहेत. करवीरकरांचा तह ठरला. खंडणीचा ऐवज कांहीं दिला व कांहीं द्यावयाचा आहे. " त्याखेरीज कित्तूरकराकडील मजकूर विस्तारेंकरून लिहून पाठविल्यावरून कळलें. " नबाब निजामअल्ली यांचे पुत्राची शादी होणार आहे. त्याणीं काडलूर संगमाचे सुमारें यावें. इकडून राजश्री नाना फडणीस याणीं जावें. संगमाचे सुमारें नबाबाच्या भेटी व्हावयाचें ठरोन राजश्री नाना फडणीस पंढरपुरावर आले आहेत. राजश्री हरिपंततात्याही त्या सुमारें आले आहेत. आम्हास भेटीकरितां यावें म्हणोन राजश्री नानांचीं पत्रें आलीं. त्याजवरून बाहेर निघालों. राजश्री आपाजी गोविंद तीा। राजश्री भाऊसाहेबांजवळ फौजसुद्धां होते तेही आणविले. तेही येऊन मिळाले. तीा। राजश्री भाऊसाहेब व चिरंजीव राजश्री दादा एकत्र होऊन नाना फडणीस असतील तेथें जाऊन मिळतों. चिरंजीव माधवराव यांसीं देवी येऊन उत्तम प्रकारें आरोग्य जाहलें व चिरंजीव बापूस आल्या आहेत; बसों लागल्या. आरोग्य होईल. चिरंजीव सौ।। कुसाबाई व सौ।। मनाबाईस लखोटा पाठविला तो यांईस रवाना केला. चिरंजीव सौ।। आवडाबाई व सौ।। मथाबाई व सौ।। ताराबाई सासऱ्यांसच आहेत. चिरंजीव राजश्री वासुदेव दीक्षित याचे स्त्रीस रजोदर्शन फाल्गुन वद्य सप्तमीस जाहलें. व राजश्री रामचंद्र दीक्षित यांस पुत्र जाहला. त्यांचीं पत्रें अलाहिदा आहेत त्याजवरून कळेल.

बोलवाडाहून कूच करून मजल दर मजल रामतीर्थानजीक जातों. नगारखाना बरोबर आहे. नबाबाच्या व नानाच्या भेटी वैशाख वद्यांत व्हाव्याशा आहेत. भेटी जाहलियावर नबाब माघारे जातील व नाना पुण्यास जातील; व आम्हीही स्थळास येऊं. किल्ल्यांत मुलें व राजश्री नारोपंत दामले वगैरे ठेवून बंदोबस्त करून निघालों आहों. चिरंजीव राजश्री श्रीपतरावही बरोबर आहेत. व चिरंजीव राजश्री शिवाजीपंतअण्णा मजलीस येतील अथवा उदईक येतील. चिरंजीव सौ॥ दुर्गाबाई कोंकणांत गेली होती ती आली म्हणोन चिरंजीव मागें चार दिवस राहिले. चिरंजीव राजश्री दाजींनें व आपानें पत्रें मिरजेहून[१] पाठविलीं आहेत तीं पाठविलीं आहेत. वरकड मंडळी सुखरूप आहेत. वडिलांचें पत्र यात्रा सुगम जाहली म्हणोन पत्र आलें, परम संतोष जाहला. श्रीमंतांचें पुण्य विचित्र; वडिलांचें पुण्य विचित्र; तेणेंकरून अशा गोष्टी घडल्या." म्हणोन सर्व मजकूर विस्तारेंकरून लिहिला, त्याजवरून कळलें. हुंडयांचें पत्र अलाहिदा पाठविलें आहे त्याजवरून कळलें असेल. आजपावेतों येणें जाहलेंच असेल.[२] त्रिस्थळी यात्रा यथासांग घडणें हें वडिलांचे पुण्यप्रताप भारी याजमुळें यात्रा सांग घडली. वरकड मजकूर अलाहिदा पत्रावरून कळों येईल. बहुत काय लिहिणें लाभ करावा. हे आशीर्वाद.

नं. २७५०. श्री. (१५ जुलई.)

पैवस्ती छ० १८ जिल्हेज. सन खमस समानीन. कार्तिकमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहिब स्वामीचे सेवेसीं.

पोष्य त्रिंबकराव आबाजी टकले कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ व॥ १४ गुरुवार-

१ मिरजेस. २ निजामअल्लीची भेट होऊन परत आलांच असाल. ३ परंतु गुरुवारीं त्रयोदशी पडली आहे.

पर्यंत मुक्काम श्रीवाराणसीक्षेत्र यथास्थित जाणून कुशल स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. स्वामींनीं वैशाख शु॥ ११ भृगुवारचें पत्र पाठविलें तें आषाढ वद्य दशमी इंदुवारीं पावलें. लेखनाभिप्राय सविस्तर कळों आला. श्रीमंतांचा व नबाब निजामअल्लीखान यांचा सलूख होऊन राजश्री नाना फडणीस फौजसुद्धां श्रीपंढरीस मोंगलाचे भेटीस गेले. आपणास व राजश्री भाऊसाहेबांस येणेंविशीं पत्रें आलीं त्यावरून मुहूर्तेकरून डेरे दाखल जाहलियाचें वृत्त विस्तारें लिहिलें व कित्तूर व करवीरकरांचा तह होऊन खंडणी जाहिलयाचें वृत्त लिहिलें तें कळोन बहुत संतोष जाहला. " चिरंजीव अमृतराव अथणीस आहे. पिंपळनेरास श्वशुराचे घरीं लग्नास सहकुटुंब गेले होते ते माघारे आले. त्यांचें पत्र त्यांस पावतें करून उत्तर आणून पाठविलें आहे " म्हणोन आज्ञापिलें, त्यास चिरंजीवाचें पत्र पावलें, हुंडी एक सहस्राची करून पाठविली ती पावली. हुकेरीस बट्टा हुंडणावळ साडेसतरा रुपये पडले, म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐवज मोठे समयास येऊन पावला. श्रीक्षेत्रीं विनियोग होऊन स्वामीस श्रेय घडेल. इकडील वृत्त पेशजी गयेस जाण्याच्या अगोदर सविस्तर सेवेसीं लिहिलें तें, पत्र पावून उत्तरें आलीं. त्या अलीकडील वर्तमान तरी फाल्गुन व॥ ११ स श्रीक्षेत्रींहून निघोन चैत्र शु॥ १२ स श्रीगयेस गेलों. मातुश्री सरस्वतीबाई याणीं वाटेचा बंदोबस्त यथास्थित करून चौकी जकात कोठें एक पैसा वाटेस न पडतां सर्व यात्रासुद्धां मुरारपुरचे चौकीवर अटक न होतां क्षेत्रांत प्रवेश जाहला. यात्रा भारी. गांवांत स्थळ सर्वांस होणार नाहीं. यास्तव बाहेर श्रीविष्णुपदाचे दक्षिणेस पाव कोसावर फल्गुतीरीं फल्गूचे पश्चिमतटास दंडीबाग आंबराई बहुत सुंदर स्थळ होतें तेथें पालें देऊन राहिलों. छाया निबिड होती. कोणास उष्णाचा उपद्रव

जाहला नाहीं. तीन मास क्षेत्रवास जाहला. सर्वत्रांचीं गयावर्जनें जाहलीं. यावर माघारे श्रीस आषाढ वद्य पंचमीस आलों. गयेंत तीन मास रहावयास कारण प्रयाग व काशीचा कर माफ जाहला त्याप्रमाणें गयेस कर माफ व्हावा एतन्निमित्त लखनौस इंग्रज मुख्य हेष्टिन साहेब म्हणून आहे त्याजकडे वकील पाठविला होता. त्यास दोन मास जाबसाल आणावयास लागले. गयेहून विसा दिवसांची वाट लखनौ यामुळें फार दिवस उत्तर यावयास लागलें. गयेचा सुभा तामरकन (!) साहेब इंग्रज होता त्यास माफीचीं पत्रें आलीं तेव्हां गयावर्जनें चालतीं जाहलीं. गयावळांनींही दाक्षिणेचा खंड करावयास महिनाभर लाविला. सर्व गयावळ यात्रेबरोबर होते; त्यांणीं गयेस येऊन पाती केली, एकशें चार गयावळांची पाती जाहली त्यामुळें खंड लवकर न होत. पैका कोणास भारी पडला, कोणास हलका पडला. व गयेंत महर्गता होती. पोटास पैका फार लागला. परंतु श्रीकृपेनें वडिलांचे आशीर्वादें मातुश्री वहिनींनीं मोठा लौकिक यश संपादन केलें. चार रुपये दरबारखर्च वगैरे जाहला, परंतु याप्रमाणें यश कोणासही आलें नाहीं. कैलासवासी तीर्थरूप नाना व ताईचा पुण्यप्रताप थोर, म्हणोन अशा गोष्टी परराज्यांत घडोन आल्या. राजश्री शिवराव व मातोश्री भवानीबाई व राजश्री गोविंदपंतमामा व आणखी कुरुंदवाडकर मंडळी पंन्नास गयेस जावयाची राहिली होती ती आम्ही सर्व यात्रा श्रीक्षेत्रास आलियावरी आषाढ वा॥ ८ भृगुवारीं निघोन गयेस गेली. त्यासही माफीचा परवाना आणून दिला आहे. त्रिस्थळीं यात्रा यथासांग जाहली. या उपर चातुर्मास श्रीक्षेत्रीं वास करून दानधर्म आपले शक्त्यानुरूप करावयाचा तो करितील. गंगापुत्राचा मात्र गुंता उरकला नाहीं. तोही स्वल्पांतच उरकोन येईल. कार्तिकस्नानें जाहलियावरी देशास यावयाची योजना पडेल. राजश्री शिवराव याची स्त्री सगर्भ होती ती वैशाख

मासीं प्रसूत होऊन कन्या जाहली. त्यांजकडील सर्व मंडळी सुखरूप आहे. चिरंजीव राजश्री दाजी परचुरे यांची स्त्री गयेचें वाटेनें येतांना प्रसूत जाहली. कन्या जाहली. कन्या जाहली होती ती काशींत आलियावरी निवर्तली. बाळंतीण सुखरूप आहे. त्यांजकडील व आम्हाकडील व सगुणाबाई व मातुश्री वहिनीकडील मंडळी सर्व सुखरूप आहेत. सेवेसीं श्रुत होय. इकडे धारण प्रस्तुत दहा शेर तांदूळ व गहूं तेरा चौदा शेर व हरभरे पंधरा शेर व साखर आठ शेर मध्यम; उंच पांच शेर, तूप पावणेपांच शेर येणेंप्रमाणें आहे. बहुत काय लिहिणें कृपावृद्धि केली पाहिजे हे विनंती.

नं. २७५१. श्री. ( ४ सप्तंबर. )

पैवस्ती. छ० २ जिल्हेज. सन खमस समानीन. कार्तिक मास. चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती सरस्वतीबाई आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत भाद्रपद वद्य ५ पावेतों मुक्काम श्रीक्षेत्रकाशी सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हाकडून पत्र येऊन अलीकडे वर्तमान कळत नाहीं, तर सदैव पत्र पाठवून संतोषवीत गेलें पाहिजे. यानंतर इकडील मजकूर तर चिरंजीव राजश्री सुभेदार आम्ही आल्यावर गयेस गेले होते ते यात्रा करून भाद्रपद शु॥ १३ स येथे आले. तीर्थस्वरूप अंताजीपंततात्यांचें वर्तमान कळल्यानंतर चिरंजीव राजश्री बळवंतराव गयेस दुसऱ्यानें गेले होते. तात्यांचें गयावर्जन करून आले. वरकड मिरजेची मंडळी सुखरूप आहेत. वरकड वर्तमान मागाहून लिहून पाठवूं. कळावें, बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों द्यावा हे आशीर्वाद.

नं. २७५२. श्री. ( १३ आगस्ट. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक बाबूराव राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान श्रावण वा॥ १३ गुरुवार[1] यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं कृपा करोन पत्र पाठविलें तें पावलें. हुंडी तीनशें अडतीस रुपये ऐवजाची पाठविली ती पावली. त्याप्रमाणें ऐवज उगवला. गयेस पेशजीच्या पत्रीं विनंती गेलों म्हणोन लिहिलें होतें. त्यास स्वामीच्या कृपेंकरून यात्रा संपादून आषाढ शु॥ ५ स काशीक्षेत्रास आलों. स्वामीच्या कृपेंकरून त्रिस्थळीची यात्रा जाहली. शरीरीं प्रस्तुत समाधान आहे. क्षेत्रींच्या मुक्कामास........[2] तर यात्रा आयुघेस[3] जा............... यमुना उतरोन देशास जावें असें आहे. त्यास ईशसत्तेनें घडेल तें खरें. प्रस्तुत काशीस यात्रा आलियावर महर्गता जाहली. पर्जन्य नाहीं. मृगाचा पर्जन्य मात्र एक दोन या प्रांतीं जाहले. तूर मूग सावे कोद्रव यांची पेरणी जाहली. प्रस्तुत पर्जन्य नाहीं. याजमुळें पेरलें धान्य वाळून गेलें. हल्लीं धान्य तपशील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| //९ | तांदूळ बारीक | तूप | //४।. | //४॥. |
| /।. | ,, मोठे | तेल | /।. | /।.॥. |
| गहूं /।५ /।६ | | हरभरे | /।५ | /।६ |
| डाळतुरीची /।४ /।४॥. | | कणीक | /।१ | /।२ |

येणेप्रमाणें तूर्त धारण आहे. वरकड इकडील वर्तमान श्रीमंत मातुश्रीच्या पत्रावरून विदित होईल. चिरंजीव उभयतांचा सांभाळ करावा. श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ परंतु वद्य त्रयोदशीस शुक्रवार पडला आहे. २ टिंबें दिलेल्या ठिकाणीं पत्र फाटलें आहे. ३ अयोध्येस.

# करवीरकरांचा बंदोबस्त व तह.

स. १७८४ जानेवारी ते एप्रिल.

स. १७७८ त महादजी शिंद्यानीं करवीरकर महाराजांशीं तह केला त्यांत महाराजानीं पेशव्यांस लढाईच्या खर्चाबद्दल पंधरा लक्ष रुपये द्यावयाचें ठरलें होतें. हा कायमचा तह म्हणून ठरविलेला होता त्याअर्थी पंधरा लक्ष रुपये दिल्यावर चिकोडी मनोळी तालुक्यांतल्या ठाण्यांखेरीज बाकीचीं सर्व ठाणीं पेशव्यानीं करवीर राजमंडळाकडून घेतलेलीं पुनः परत द्यावयाचीं होतीं. हीं ठाणीं म्हणजे अळतें, वडगांव, कोडोली व अलीकडे परशुरामभाऊनीं घेतलेलें शिरोळ हीं होत. अकीवाट, हुकेरी, सेंडूर हीं चिकोडी मनोळीपैकीं असल्यानें तीं तूर्त परत द्यावयाचीं नव्हतीं. वर सांगितलेल्या तहांत पंधरा लक्षांची रक्कम नमूद आहे तिचा अर्धामुर्धा फडशा केल्यावर करवीरकरानीं आपलीं ठाणीं परत मागितलीं व पेशव्यानीं अळतें, वडगांव वगैरे ठाणीं त्यांस परत दिलीं. त्यानंतर बाकी रकमेचा फडशा व्हावा तों करवीरकरानीं त्यांत आणखी कांहीं लढे घातले. पेशव्यांच्या वतीनें परशुरामभाऊनीं भूधरगड घेऊन तंट्यास आणखी एक कारण उपस्थित केलें. खंडणीच्या बाकीचा फडशा करवीरकर करीत नाहींत हें पाहतांच पेशव्यानीं परशुरामभाऊंस फौज ठेवून करवीरच्या राज्यावर स्वारी करण्याचा हुकूम केला. आपण भूधरगड घेतला व सामानगडाच्या घेऱ्यांतलीं ठाणीं कापशीकर सेनापतीस बळजबरीनें घेऊन दिलीं, या गोष्टी करवीरकरांस नापसंत आहेत, त्याअर्थी आतां बऱ्या बोलानें करवीरकर तह करणार नाहींत, व सन १७८० त त्यानीं खंडणीची बाकी म्हणून सात लक्ष रुपये देण्याचा करार केला आहे ती रक्कम

लढाईखेरीज सुरळीतपणें हातीं येणार नाहीं, हें सर्व परशुरामभाऊ समजूनच होते, व त्याप्रमाणें त्यानीं लढाईची तयारीही केली होती. करवीरकरांवर स्वारी करण्याविषयीं पेशव्यांचा हुकूम होतांच भाऊनीं रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस करवीरच्या रोंखें कूच करून जाण्याचा हुकूम केला. रघुनाथराथरावांबरोबर त्यांचें स्वतःचें व मिरजकरांचें पथक व भाऊंच्या पथकांपैकीं थोडे लोक मिळून सुमारें पांच हजार स्वार, शिवाय हजार पंधराशें पायदळ व कांहीं तोफा असें सामान होतें. बाकीची फौज भाऊंजवळ तासगांवासच होती.

करवीरकरांजवळ फौजफांटा फारसा नव्हता. जो काय होता तो गोळा करून सटवोजी भोंसला पन्हाळ्याच्या माचीस जाऊन राहिला होता रघुनाथराव फौजेसह इचलकरंजीवरून येऊन चंदूर व रुई या दोन खेड्यांच्या मध्यें मुक्कामास राहिले व तेथून पन्हाळ्याच्या रोंखानें टोप संभापुरापर्यंत तलावा करूं लागले. त्यांशीं लढाई करण्याच्या भानगडींत न पडतां सटवोजीनें बत्तीसशिराळ्याकडे स्वारी केली व तिकडचे गांव लुटून फस्त करण्याची सुरुवात केली. तो दूर गेलासें पाहतांच रघुनाथरावानीं कोडालीच्या ठाण्यास वेढा घालून तें काबीज केलें. त्या अवधींत सटवोजीचा पाठलाग करण्याकरितां बत्तीसशिराळ्याकडे भाऊनीं तासगांवाहून फौज पाठविली. तेव्हां सटवोजी पन्हाळ्यास परत आला व तेथें आठ पंधरा दिवस विश्रांति घेऊन पुनः त्यानें लांब दौड करून मायणीपर्यंत जाऊन तिकडचे गांव लुटण्याचा प्रारंभ केला ! तें वर्तमान येतांच परशुरामभाऊ स्वतः फौज घेऊन त्याच्या पाठीस लागले. तेव्हां तो ती दिशा सोडून मायणीहून अथणीकडे गेला. तेथून तो संकेश्वराकडे जाऊन वाटेनें जाळपोळ लुटालूट करीत सामानगडाकडे आला. बत्तीसशिराळें, मायणी, अथणी,

संकेश्वर हीं स्थळें परस्परांपासून बऱ्याच अंतरावर असून तीं स्थूलमानानें अनुक्रमें करवीरच्या पश्चिम, उत्तर, पूर्व व दक्षिण या दिशांस आहेत आणि हें सर्व क्षेत्र करवीरापासून पन्नास कोसांतलें आहे. सटवोजीचा घाला येणार हें माहीत नसल्यामुळें प्रत्येक स्थळीं त्याचा डाव साधत गेला.

सामानगडाकडे सटवोजी गेल्याचें वर्तमान येतांच रघुनाथराव सर्व फौजेचें कूच करून तिकडे गेले व स्वतः परशुरामभाऊ दुसरी फौज घेऊन संकेश्वराकडे येऊन राहिले. आतां चोहोंकडे सावधपणा झाला असून पेशव्यांची सर्व फौज गोळा होऊन जागोजाग राहिली आहे, त्या अर्थीं आपण स्वारीस गेलों तर ती फौज आपणास गांठल्याशिवाय राहणार नाहीं हें स्पष्ट दिसूं लागल्यामुळें आतां पेशव्यांच्या मुलखांत स्वाऱ्या घालण्याचें बंद करणें सटवोजी भोंसल्यास प्राप्त झालें. रघुनाथराव सामानगडाकडे गेले होते, त्यानीं हलकर्णीचें ठाणें हल्ला करून घेतलें व खुद्द सामानगडासच शह दिला. उभय पक्षीं दररोज बारीकसारीक झटापटी चालल्याच होत्या. अशा लढाईनें आपला परिणाम लागणार नाहींसें समजून करवीरकरानीं बाळ जोशीराव व शिवराव सुरनीस यांस तहाचा ठराव करण्याकरितां परशुरामभाऊंकडे पाठविलें. ते येऊन तहाचीं कलमें ठरत होतीं त्या अवधींत कित्तूरची खंडणी वसूल करण्याकरितां परशुरामभाऊनीं त्या संस्थानावर स्वारी केली, व देसनूरचें ठाणें हल्ला करून घेतलें; आणि खुद्द कित्तुरास वेढा घालण्याची तयारी केली. इतकें होतांच कित्तूरची देसाईण शरण आली व तिनें खंडणीचा जाबसाल चुकता करून दिला. इकडे करवीरकरानींही भाऊंच्या म्हणण्याप्रमाणें तह कबूल करून खंडणीचा कांहीं ऐवज रोख दिला व बाकी पांच लक्ष रुपये हप्तेबंदीनें फेडण्याचें कबूल करून मनोळी व अळतें

या तालुक्यांचा वसूल या रकमेच्या फेडीस लावून दिला.*रकमेची फेड झाल्यानंतर मनोळी व अळतें तालुका पुनः करवीरकरांच्या स्वाधीन करण्याचें पेशव्यानीं कबूल केलें. या व मागच्या कित्येक प्रकरणांत या तहासंबंधें जे उल्लेख आले आहेत ते संदिग्ध आहेत, व त्यांच्या धोरणानें आम्ही हा तहासंबंधाचा मजकूर लिहिला आहे. तहाच्या अस्सल यादी व कच्चा पत्रव्यवहार जेव्हां कधीं कोणास सांपडेल तेव्हां आम्ही लिहिलेल्या मजकुरांत कांहीं फेरबदल होण्याचा संभव आहे.

या वर्षीं निजाम अल्ली व नाना फडनवीस यांच्या भेटी यादगीरचे मुक्कामीं होण्याची मसलत ठरली होती व तीस अनुसरून निजाम अल्ली भागानगराहून आणि नाना फडनवीस व हरीपंत फडके पुण्याहून फौजेसुद्धां निघाले होते. नानानीं आपणास येऊन मिळण्याविषयीं त्रिवर्ग पटवर्धन सरदारांस पत्रें लिहिलीं होतीं. त्याप्रमाणें कित्तूरचा व करवीरचा उलगडा होतांच परशुरामभाऊ व रघुनाथराव नानांच्या लष्करास मिळण्याकारितां निघून गेले आणि त्याच उद्देशानें मिरजेहून गंगाधररावही निघून पंढरपूरच्या रोखें कूच करून चालले.

नं. २७५३. श्री. (पौष व० १३–२० जाने० )

पैवस्ती छ० २७ सफर. आर्बा समानीन. पौषमास.

सेवेसीं आपाजी गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० २६ माहे सफर पावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं आज जासुदासमागमें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. श्रीमंत राजश्री दादासाहेब काल तलाव्यास गेले होते. हेरल्याचे अलीकडे खासे उभे राहिले होते; पुढें फौज कांहीं टोप संभापुरापावेतों गेली होती. त्यांजकडील स्वार कोठें आढ-

---

* काव्येतिहास संग्रह. पत्रें, यादी वगैरे ले. ४३०—४३१. १ हा गोविंद सखदेव यांचा पुत्र, मिरजकरांच्या पथकावरचा मुख्य सरदार.

ळले नाहींत. मग तिसरे प्रहरीं माघारे फिरोन गोटास आले. येथें आल्यानंतर बातमी तिकडील कळली. राजश्री सटवोजी भोसला गोटांत नव्हता. आणखी स्वारीस शिराळें प्रांतांत गेला होता, म्हणून वर्तमान कळलें. दुसरे दिवशीं स्वारीस गेले होते. कोणीकडे गेले होते, काय वर्तमान, हें कांहीं अद्यापि कळलें नाहीं. कळल्यानंतर सेवेशीं लिहून पाठवीन. केळाचें आयतवडें (सटवाजीनें) मारलें म्हणून परवां वर्तमान आलें होतें, त्यास गांव मारिला नाहीं. गांवावर स्वारी गेली होती; ( परंतु ) गांवांतून गोळ्या मारिल्या; मग गांवचीं कांहीं घरें जाळलीं; कडब्याचीं बुचाडें व उंसाचे फड कांहीं जाळले आणि गांवचीं गुरें २५।४० पावेतों घेऊन गेले. पुढें इसलामपुरापावेतों स्वारीस गेले होते. दहा पांच गांवचे पाटील धरून आणिले व गुरें दोन चारशें घेऊन सटवोजी भोसले परत आले. दुसरे दिवशीं आणखी स्वारीस गेले त्याचें वर्तमान कळलें नाहीं. काल श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचें पत्र श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस आलें होतें जे "तुम्हाजवळ फौज आहे त्यापैकीं हजार दीड हजार फौज शिराळ्यास पाठवून द्यावी. तिकडे राजश्री सटवाजी भोसले स्वाऱ्या करितात; याजकरितां पत्र पावतांच फौज शिराळ्यास पाठवावी." याप्रमाणें लिहिलें होतें. त्याचें उत्तर श्रीमंत राजश्री दादासाहेब यांणीं लिहून पाठविलें आहे; ( कीं ) कोणास पाठवावें याची आज्ञा करावी, त्यास पाठवून देऊं. याप्रमाणें उत्तर पाठविलें आहे. कोणाचे पथकास जावयाची आज्ञा येईल तें सेवेसीं लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय. कृपा असावी हे विज्ञापना.

नं. २७५४. श्री. ( माघ व० ६–१२ फेब्रुवारी. )

पैवस्ती. छ० २० रबिलावल. सन आर्बा समानीन. माघ व॥ ६. सेवेसीं आपाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना.

तागायत छ० २० माहे रबिलावल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं काल मोतीबा कदम याजसमागमें पत्र पाठविलें तें पावलें. शिलेदारांचे रोजमऱ्यास ऐवज पाठविला तो पावला. त्याची पावती अलाहिदा पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. " कोडोलीच्या तोफा ऐकावयास येतात. त्यास मोर्च्यांचें वर्तमान व मुक्काम कोणे ठिकाणीं हें सविस्तर लिहून पाठविणें " म्हणून आज्ञा, ऐशीयास परवांचे दिवशीं इचलकरंजीहून येऊन येथें चंदूर व रुईमध्यें मुकाम जाहला. राजश्री जनोबा सुभेदारही येथें परवांच आले. ते दिवशीं फौज मात कोडोलीपावेतों जाऊन संध्याकाळीं गोटास आली. मग काल प्रातःकाळींच जाऊन तोफा लावल्या. दोनप्रहरपर्यंत तोफाची मारगिरी जाहली. मग तिसरे प्रहरीं गांवांतील बोलावयास आले होते; परंतु त्याचें बोलणें लबाडीचें. कसेंही करून बोलावयास दिवस घालवावा, रात्रीं करवीराकडून कुमक येईलच, असे अर्थें लबाडीचें बोलणें बोलत होतें. मोर्चे बसवून तेथें रहावें तरी करवीर जवळ. त्यापक्षीं रात्रीं राहणें ठीक नव्हे. शेवटास बोलणें ठरलें नाहीं, संध्याकाळ होत आला, याजकरितां मोर्चे उठवून तोफा गोटास आणिल्या. मागाहून फौज प्रहर रात्रीचे सुमारास आली. कोडोलीजवळ छबिना ठेविला होता. आज आणखी तोफा घेऊन जाणार. याप्रमाणें कालचें वर्तमान जाहलें. काल कोडोलीस मोर्च्यांत इकडील गाडदी चाळीस पावेतों जखमी जाहले व चार पांच असामी ठार गाडदी जाहले. फौज मोर्चास नव्हती. आज होईल वर्तमान तें मागाहून लिहून पाठवितों. श्रीमंत राजश्री दादांस पत्र पाठविलें होतें तें त्यांस प्रविष्ट केलें. उत्तर मागाहून आणवून पाठवून देतों. ' कृष्णाजी बोलेकर याची पालखी कामगारीस पाठ-

---

१ कोडोलीच्या ठाण्यास लाविलेल्या तोफा मिरजेस ऐकूं येत होत्या। २ घोडदळ.

वावयास पाहिजे. याजकरितां पाठवून देणें ' म्हणोन आज्ञा, आज्ञेप्रमाणें ताकीद करून पाठवून देतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७५५. श्री. (माघ व० ६–१२ फेब्रुवारी.)

पैवस्ती छ० २० रबिलावल. सन आर्बा समानीन.

पु॥ सेवेसीं विज्ञापना. कोडोलीस स्वारी आज आणखी जाणार होती म्हणोन पत्रांत लिहिलें आहे, त्यास रात्रीं कोडोलीजवळ छबिना ठेविला होता. कोडोलींत प्यादे होते ते रात्रीं पळोन गेले. इकडील दोन तीनशेंपावेतों गाडदी कोडोलींत ठेविले. याप्रमाणें वर्तमान जाहलें. राजश्री केसोपंत काळे तासगांवाहून परवां येथें आले आहेत. याजउपरी राजश्री जनोबा सुभेदार बावडें विशाळगड प्रांतांत जाणार आहेत. येथून कूच करून गेलियानंतर सेवेशीं लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७५६. श्री. (माघ व०११–१७ फेब्रु०)

पैवस्ती छ. २९ रबिलावल सन आर्बा. माघ मास.

सेवेसीं विज्ञापना. स्वामींनीं नरसू खिजमतगार या समागमें इंदुवार तीन तास रात्रीचें पत्र पाठविलें तें पहांटेच्या चार घटका रात्रीस पावलें. " राजश्री सटवाजी भोंसले हजार बाराशें स्वारानिशीं वांगी डावी सोडून पूर्वेस गेला. कोणीकडे तोंड टाकितो पहावें. तेथेंही बातमी आलीच असेल. " म्हणून स्वामींनीं लिहिलें, त्यास स्वामीचे पत्र आलें हेंच वर्तमान. त्याखेरीज अगोदर येथें बातमी कांहीं आली नव्हती. काल संध्याकाळीं माणसें बातमीचीं आलीं, परंतु हें वर्तमान कांहीं कळलें नाहीं. राजश्री सटवाजी भोंसला गडावरच पंधरा वीस दिवस पावेतों जाऊन राहिला होता. तेथून परभारें स्वारीस गेला

१ पन्हाळ्यावर.

असेल तर न कळे. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस पत्र पाठविलें तें प्रविष्ट केलें. राजश्री सटवाजी भोंसले तिकडे स्वारीस गेले; याज-करितां श्रीमंत राजश्री भाऊसाहेब निघोन मायणीकडे गेले. राजश्री जनोबा सुभेदार यांस तोफखाना चावरेच्या सुमारें पाठवून देणें म्हणोन श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस ( भाऊसाहेबांचें ) पत्र आजलाच दोन घटका दिवसास आलें. त्याजवरून राजश्री जनोबा सुभेदार तोफखाना घेऊन चालले. राजश्री रामचंद्रराव यांचें[1] पथक व आमचें पथकही चावऱ्याकडे जावयास जातों. सेवेसीं श्रुत होय. आणखी होईल तें वर्तमान मागाहून लिहून पाठवितों हे विज्ञापना.

नं. २७५७. श्री. ( फाल्गुन—फेब्रु० )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेशीं.

विनंती आज्ञाधारक नाईक व मोकदमानी मौजे उगार खुर्द. दोनी करकमळ जोडून शिरसाष्टांग नमस्कार विनंती व दंडवत विज्ञापना. प्रार्थना ऐसी जे, साहेबीं सटवोजी भोंसलेच्या बातमीचा मजकूर ( विचारिला, ) तरी हळी इंगळीनजीक नदीपार होऊन एबारहट्टी व धरोगिरीचे.........रानांत लुटालूट करून नागवून आजी भृगुवारीं भिरडीचे मुक्कामास किंवा चिकोडी तालुक्यांत जाणार. दोन हजार जमाव आहे. परंतु फार थकले आहेत. फौज कोणाची म्हणून विचारलें तर श्रीमंत राजश्री हरीपंततात्यांची म्हणून सांगत जातात ! याप्रमाणें बित्तिम वर्तमान खेमलापूरकरांनीं श्रीमंत राजश्री दादासाहेब कुरुंदवाडकर यांस लिहून पाठविलें. साहेबांचे सेवेशीं कळावेंस्तव विनंती लिहिली आहे. भृगुवारीं दोन प्रहरां शेडबाळचे ऐनापूरचे आडमार्गानें मंगसुळीचे शिवेकडले आमचे रानांतील घोंगड्या वगैरे व मंगसुळीचे

---

१ रामचंद्र भास्कर पटवर्धन मिरजकर.

रानांतील याप्रमाणें स्वारांनीं लुटून घेऊन गेले. आम्हास वर्तमान कळतांच आम्ही स्वार व प्यादे मंगसुळींचे व केंपवाडचे शिवेपर्यंत गेलों. परंतु गांठ पडली नाहीं. सेवेशीं कळावेंस्तव लिहिलें असे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे स्वार काल गुरुवारीं रात्रीं बातमीकरितां २५ कुडचीस येऊन राहिले आहेत. बहुत काय लिहिणें कृपालोभ करावा हे विज्ञापना.

नं. २७५८. **श्रीगणराज.** ( माघ व० १३–१९ फेब्रु० )

विनंती सेवक महादजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ० २७ रबिलावलपावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. सटवोजी भोसला मायणीकडे गेल्याचें वर्तमान ऐकोन श्रीमंत राजश्री भाऊसाहेब देवरअष्ट्याकडे गेले म्हणोन लिहिलें तें कळलें. त्याजकडून स्वामीस पत्र आलें त्याची नक्कल पाठविली ती पावली. वर्तमान समजलें. पत्र आलें त्यांतील वर्तमान लिहिलें...... तेरदाळ ऐनापूर उगार वगैरे गांवांनीं......... स्वामीनीं पाठविल्या म्हणोन लिहिलें, उत्तम केलें. आम्हींही इकडून गांवगन्ना लिहून पाठविलें आहे व अथणीकडे माणसें बातमीस पाठविलीं आहेत. परंतु भादोल्याहून मिणच्यावरून एक माणूस आतांच आला. त्याणें वर्तमान सांगितलें कीं, सटवोजी भोसला तुलाचें ( ? ) गोडाकडून पन्हाळ्यास गेला, याप्रमाणें सांगितलें. खरें कीं लटकें नकळे. आज उद्यां तहकीक वर्तमान काय तें कळेल. चरणविलासीवरून पन्हाळेस गेला म्हणोन माणसानें जबानी सांगितलें. तस्मात् गेला असेल. अथणीवरून गेला असला तर आज वर्तमान येईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.–कुडची रायबागेकडे बातमीस दूत पाठविले आहेत. हे विज्ञापना.

नं. २७५९. श्री. (फाल्गुन शु० १–२१ फेब्रु० )

पैवस्ती छ० ३० रबिलावल. सन आर्बा समानीन. फाल्गुन शु॥ २

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती[1] सेवक राभाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २८ रबिलावल मंदवार प्रथम प्रहर दिवसपावेतों यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर सटवोजी भोंसले याची बातमी आणवणेविसीं स्वामीचें आज्ञापत्र गुरूवारीं प्रहर रात्रीस आले तेव्हां इकडे भोंसल्याची आवाई कांहींच नव्हती. अथणीस व डफळापुरास व कोकटनुरास बातमीस माणसें पाठविलीं तों काल दोन प्रहरीं अमृतराव डफळे यांचें पत्र आलें. तों ( सटवोजीची ) फौजही कोकटनुराहून निघोन शूर्पालानजीक कृष्णा उतरोन जमखंडी परगणे यांतून आसंगीस आले. तेथें श्रीमंत राजश्री तात्यासाहेब[2] असतात ही बातमी त्यास होती. परंतु तात्या यादवाडास पूर्वींच गेले होते यास्तव सोईस पडलें. ( सटवोजीनें ) आसंगीस तात्यांचा शोध केला. ते तेथें नाहींत असें कळलियावर निघोन मौजे हाळीइंगळी तेरदळ परगणे यांतील खेडें येथें आले. तेथें श्रीकृष्णेस लोक स्नानास गेले होते त्यांचें कांहीं चिरगूट पांघरूण लुटलें व घोडीं धुवावयास लोकांचीं गेलीं होतीं तीं पांच सात घेऊन तेरदळ व सेगुणसीचे मधून निघोन मौजे ऐबरहट्टीवरून हारोगिरीचे रानांतून अडगल परगणे यांत मौजे अलगवाडी म्हणोन खेडें आहे तेथें गेले. हारोगिरींत शिलेदारांचीं घोडीं चार पर्यंत ( सटवोजीस ) रानांत सांपडलीं. त्याचीं दोन घोडीं थकलेलीं हारोगिरीकरांस सांपडलीं. दोन प्रहरां आमचे शिंवेस फौज आली. तेव्हां श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे येडूरास बातमी पाठविली होती. परंतु लष्कर येडुरावरून कूच होऊन कबूरचे वोढयावर गेलें म्हणोन वर्तमान आलें.

---

१ पत्र तेरदाळाहून फडणीस याचें. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांजकडे.

तेव्हां दोन तास रात्रीस दुसरीं माणसें कबूरास रवाना केलीं. कालचे रात्रीमध्यें आमचीं माणसें लष्करास पोंचलीं असतील. आणखीही सरकारच्या बातम्या अथणी वगैरे जागां जागां होत्या. भोंसले यांचीं घोडीं फारच थकलीं. जागां जागां उभें राहोन थकलेले स्वार पुढें घालोन जात होत. याप्रमाणें लोक पाहून आले. कबूरावर फौज आली तेव्हां अलगवाडीस त्यास पांच सहा कोस अंतर. आज फौजेची व भोंसले याची गांठ पडावी ऐसें आहे. येईल वर्तमान तें मागाहून लिहितों. ( सटवोजीचे लोक ) रानांतून जातां गोरगरीब लोकांचे वाटेस गेले नाहीं व खेडयांचेंही नांव काढलें नाहीं. गांव सोडून मैदानांतून गेले. याप्रमाणें वर्तमान सेवेशीं कळावें याकरितां विनंती लिहिली असे. बहुत काय लिहिणें, सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २७६०. श्री. ( फाल्गुन शु० १–२१ फेब्रु० )

पै॥ छ० २९ रबिलावल. प्रातःकाल मंदवार.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २८ रबिलावल भृगुवारपावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. सटवोजी भोंसले याच्या बातमीविशीं आज्ञा, त्यास भोंसले याची आवई काल इकडे कांहींच नव्हती. जतेस डफळे यांकडे बातमीस माणसें पाठविलीं होतीं. आतांच दोन प्रहरीं आलीं. तों इतक्यांत म्हैसवडगीचे उतारानें आसंगीवरून हाळइंगळीचे रानांत आले. तेथें दहा पांच माणसें तोडिलीं. गांवचे लोक कांहीं कृष्णेस आज गेले होते तेथें कांहीं घोडीं दोन चार सांपडलीं तीं लुटून घेतलीं. आणि स्वार शेगुणशीचे व तेरदळचे मधून गेले.

---

१ तेरदाळाहून फडणीस यांचें पत्र.

स्वार सडे आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेबांचा मुक्काम येडुरास आहे, तेथेंही डफळेचें पत्र बातमीचें आलेलें पाठविलें आहे. आज सायंकाळास प्रहर रात्र पावेतों लष्करास पत्र पोंचेल. तोंपर्यंत स्वार कोठें जातात पहावें. बातमीचे पत्राची तालीक पाठविली आहे. गांवगन्ना आज्ञेप्रमाणें हुशार राहून जागां जागां खबरदार राहणेविशीं ताकीद केली आहे. कळावें, बहुत काय लिहिणें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २७६१. श्री. ( फाल्गुन शु० ५–२४ फेब्रु० )

पैवस्ती छ० ३ रबिलाखर. सन आर्बा समानीन. फाल्गुन मास.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवशीं.

अपत्यें समान नारायणानें[1] दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २ रबिलाखर मुक्काम चिकोडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. सटवोजी भोंसले याजकडील संकलितार्थ बातमी आपणास लिहून कळविलीच आहे. सांप्रत वित्तीम वर्तमान आणविलें त्याचा तपशील–भोंसला मायणीस गेला. तेथें फौजा पाठशीं लागल्या हें वर्तमान कळतांच तेथून निघून रातबिरात करून अथणीस येऊन उतरला. गांवकरांस आम्ही श्रीमंतांकडून[2] आलों याप्रमाणें आवई घालून अवसान घेऊन तेथून निघाला तो आसंगीवरून हालींइंगळी व हारोगिरीस आवाडाव करून पुढें बस्तवाडास कंकणवाडी तालुकियांत मुक्काम केला. बस्तवाडाहून मंदवारीं पहांटेचे प्रहर रात्रीस उठून चिकोडी तालुक्यांतील कतुरावरून लहान दोन चार खेडीं मारून जाळून नासाडी केली आणि गुरें नेलीं. उपरांत तिसरे प्रहरचे सुमारें नेरली–आपाजी शामजी याजकडील–नेथील गुरें कांहीं पुढें घातलीं. त्यांची याची गोळागोळी

---

१ नारायण हरी लागू. २ परशुरामभाऊंकडून.

होऊन तेथून संकेश्वराजवळून नदीपार होऊन नूल प्रांतांत खणदालचे आसऱ्यानें उतरला आहे. मायणीपासून एकदर लुटीचीं घोडीं पन्नास पर्यंत आणिलीं. शिवाय गांवोगांवचीं कुळें धरिलीं व गुरें नेलीं. आमचे तालुक्यांतील खेड्यांची खराबी फार केली. सरकारच्या फौजा पाटशीं लागल्या, या धास्तीमुळें रातबिरात खपून पल्लयास पोंहचला. फौज अगदीं थकून राहिली आहे. इकडून गेला त्या वेळेस पांचशें स्वार जर करितां या रोखास असते तर त्याचा गळाटाच झाला असता. परंतु कोणी मुजाहीमच नाहीं, त्यापक्षीं निभावून गेला. अद्याप ज्या स्थळीं राहिला आहे तेथें गांठ घातलियास खामीस आणावयाचा लाग आहे. येविसींचें वर्तमान टाकोटाक आम्ही श्रीमंतांकडे लिहून पाठविलेंच आहे. राजश्री रघुनाथरावदादांकडेही[1] पत्र पाठविलें आहे. परंतु त्यांचा मुक्काम कोणते स्थळीं आहे याचा थांग लागत नाहीं. या समयीं फौज आलियास फार उपयोगीं आहे. तर आपणापाशीं जमाव असेल तो पाठविला पाहिजे. आणखी तालुकीयांत आवाडाव करावयास चुकणार नाहीं. करवीरकरांनीं परभारें सदलगेच्या रोखें एक गांव भाट नागनूर मारून नेला. याप्रमाणें नित्य शिळशिऱ्यांसीं गांठ पडली आहे. भोंसला आज आणखी कोठें निघून जातो कळेना. आमचीं माणसें बातमीस आहेत. आलियानंतर लिहून कळवूं. सामानगड तालुकियांतील प्यादे व राऊत वरचेवर येऊन भोंसल्याचे फौजेंत मिळत आहेत. याप्रमाणें बातमी आतांच आली. आपणास कळावें यास्तव लिहिलें असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७६२. श्री. ( फाल्गुन शु० ६–२६ फेब्रु० )

पैवस्ती छ० ४ रबिलाखर. फाल्गुन मास. दोन तास रात्र आवशीची. सन आर्बा समानीन.

---

१ परशुरामभाऊंकडे.

( ३८२५ )

## श. १७०५ सटवोजी भोंसल्याचा धुमाकूळ. इ. स. १७८४

अपत्यें समान नारायणानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विनंती तागायत छ० ४ रबिलाखर गुरुवार तृतीय प्रहर मुक्काम चिकोडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण सांडणीस्वाराबरोबर दोन तास दिवसाचें पत्र पाठविलें तें पावलें. तेथें " सटवाजी भोसला मंगळवारीं संकेश्वराहून निघोन शहापुराकडे गेला म्हणून मुतमाळची बातमी आली. तुम्हास कळलें असेल ते पक्की बातमी आणून लिहून पाठविणें, " म्हणोन आज्ञा; त्यास काल सायंकाळीं भोंसल्याचे फौजेंतन बातमीचीं माणसें आलीं. संकेश्वरानजीक भोसला नदीवर उतरला होता. तेथून कूच करून माघारे कोसावर हिटणी रामापुरावर जाऊन उतरला. याप्रमाणें कालचें वर्तमान. आज सकाळीं फिरोन बातमीचीं माणसें आलीं. त्यांतील वर्तमान जे, सटवोजी भोंसला कालचे मुक्कामास सारी फौज ठेऊन तीन चारशें राउतांनिशीं निघून सडा कडगांवास गेला. पुढें कापशीपर्यंत धांवणें केलें. तेथें लाग साधला नाहीं. दोन प्रहर रात्रीं फिरोन कडगांवास येऊन राहिला. करवीराकडील जमाव येऊन कालचे रात्रीस मुरगूडची पेठ मारून जाळून गेले. जातां जातां आणखी एक दोन गांवची खराबी केली. याप्रमाणें तहकीक वर्तमान आहे. वरकड जमाव रामापूर हिटणीवर घनश्याम यशवंत सुद्धां आहे. शहापुराकडील गुरें आणिल्याचा मजकूर तर घनश्याम यशवंत याणीं बेळगांव प्रांतीं जाऊन दोन चारशें गुरें स्वारी करून आणिलीं त्यास चार रोज जाहाले. अलीकडे कांहीं अधिकोत्तर नाहीं. आणखी बातमी येईल ती लिहून पाठवूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

नं. २७६३ श्री. ( फाल्गुन व० ४–११ मार्च. )

पेवस्ती छ० १९ रबिलाखर सन आर्बा समानीन. फाल्गुन मास,

शा. १७०५ **करवीरकरांचा बंदोबस्त व तह.** इ. स. १७८४

सेवेसीं आपाजी गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० १८ रबिलाखर मुक्काम हल-कर्णीनजीक सामानगड येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ० १६ तेरिखेचें पत्र जासुदासमागमें पाठविलें तें आज छ० मज-कुरीं आतांच पावलें. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब द्वितीया इंदुवारीं मुहूर्तंकरून डेरेदाखल होणार होते. निघालेच असतील. " महा-यात्रेकडून श्रीमंत राजश्री सुभेदारांचीं पत्रें सागरचे मुक्कामाचीं आलीं. श्रीमंत मातुश्री वहिनीचीं पत्रें आम्हास नव्हतीं सुभेदारांचें पत्र मात्र आम्हांस होतें. तुमचीं पत्रें होतीं तीं पावलींच असतील. वर्तमान लिहून पाठविणें " म्हणून आज्ञा, त्यास वडिलांचें पत्र सागरचे मुक्का-मचें आलें होतें. तेंच पत्र तिकडे पाठवावें तरी तीं पत्रें कुरुंदवाडास पाठविलीं आहेत. वर्तमान " महेश्वराहून यात्रा निघोन उज्जनीस आली. तेथें त्रिरात्र होते. तेथून भेलशांस जावयास निघाले तों मार्गीं पर्जन्य लागों लागला. तीन दिवस झड होती. तसेच भेल-शास गेले. भेलशांत पांच सहा मुक्काम जाहले. याचें कारण लो-कांस दुखणीं फार आलीं होतीं. यात्रेतील दहावीस माणूस मृत्यु पावले. श्रीमंत मातुश्री वहिनीस व भवानीबाई यांस हगवण लागली होती. याजमुळें सागरीं चार मुक्काम जाहले आतां आरोग्य जाहलें. याजउपरी येथून कूच करून पुढें जातों. सागराहून प्रयागेस जाण्यास पंधरा वीस दिवस पाहिजेत, तेव्हां मकर सांपडणार नाहीं, याजकरितां सालमजकुरीं तूर्त काशीस जावें. पुढील मकरास प्रयागेस यावें असें आहे. त्यास कोणी म्हणतात जे आतांच प्रयागेस जावें, तीन स्नानें सांपडलीं तरी पुरेत, याप्रमाणें म्हणत आहेत. त्यास काय घडतें पहावें. "

---

१ गोविंद सखदेव यांचें.

याप्रमाणें वडिलांचे पत्रांत लिहिलें होतें. वरकड इकडील वर्तमान लिहून पाठविलेंच आहे त्याजवरून विदित जाहलेंच असेल. त्यानंतर मुतनाळाहून कूच होऊन कडगांव वगैरे दोन चार ठाणीं घालावयाचीं होतीं तिकडे जाऊन ठाणीं घालोन काल कूच करून येथें मुक्कामास आले. हलकर्णी ठाणें होतें त्यास काल संध्याकाळपावेतों तोफा लाविल्या होत्या. अस्तमानीं प्यादे कौलानें उतरून लावून दिले. ठाणेंत गाडदी घातले. आज आतांच स्वारी तयार होऊन रामानगडास तलाव्यास गेली. होईल वर्तमान तें मागाहून लिहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३७६४. श्री. (फाल्गुन व० ४–११ मार्च.)

पैवस्ती. छ७ १९ रबिलाखर, सन आर्बा समानीन, फाल्गुनमास,

पु॥ विज्ञापना. घोडीं बारा जखमी जाहलीं. त्या समयीं श्रीमंत राजश्री दादासाहेब यांणीं शिलेदारांस घोडीं बसावयास दिलीं; येथें एक दोन मुक्काम आहेत. येथून कूच होईल ते समयीं इतक्या असाम्यांस बसावयासीं घोडीं पाहिजेत. त्यास येथें पागेंत तीन घोडीं आहेत. येविसींची काय ती आज्ञा करावी. वरचेवर पत्रीं स्वामींची आज्ञा सावधतेविषयीं येत असतां ही गोष्ट घडली, उपाय नाहीं! वरकड फौजेंतील जायां जखमी बहुत कांहीं जाहले नाहींत. आमचे फौजेनेंच बहुत निकड केली. असी गोष्ट तो घडली. स्वामी कृपा करणार समर्थ आहेत. आणखी वर्तमान मागाहून होईल तें पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ रघुनाथराव कुंदगोळकर सर्व लष्करासह आले.

नं. २७६५. श्री. ( फाल्गुन व० ६–१३ मार्च. )

पैवस्ती छ० २० रबिलाखर. सन आर्बा समानीन. फाल्गुनमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती. सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १९ रबिलाखर जाणोन सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. कसबे तेरदळ येथील पाटीलकी नाडगौडा याची. त्यास कसबेचे रयत व प्यादे शिमगे पोर्णिमा जाहल्यावर दुसरे दिवशीं शिकारीस जावयाची पद्धत सालाबाद आहे. त्यास नाडगौडा याणीं पाटीलकी आपली, विडे रयतेस देणें ते आम्ही देऊं, तुम्ही सरकारांतून द्याल तरी कजिया करूं, म्हणोन सांगितलें, त्याजवरून मनास आणितां खटला पडतोसा समजोन सरकारांतून प्याद्यांस विडे व जमीदारांस दिले. रयतेस सांगितलें कीं, तुम्हास विडे वर्षप्रतिपदेस देऊं म्हणोन सांगोन समाधान करून लावून दिले. रयत म्हणतात जे, पाटिलाकडून विडे देविल्यास आम्ही घेणार नाहीं. सालगुदस्तां याप्रमाणें खटला पडला होता तेव्हां सरकारांतूनच विडे देवविले. उपरांत चैत्र शु॥ प्रतिपदेस लावणीचे विडे द्यावयाची पद्धत आहे त्यासही खटला केला. लावणीचे विडे सरकारांतून दिले, याप्रमाणें मजकूर आहे. हल्लीं सालमजकुरीं लावणीच्या विड्यास नाडगौडा कजिया करणार आहेत; जाणून सेवेसीं विनंतीपत्र लिहिलें असे. तरी येविषयीं आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. बहुत काय लिहिणें सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २७६६. श्री. ( फाल्गुन व० ६–१३ मार्च. )

पैवस्ती छ० २२ रबिलाखर. सन आर्बा समानीन. फाल्गुन.

सेवेसीं आपाजी गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती

विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० २० माहे रबिलाखर मुक्काम हलकर्णीनजीक सामानगड येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीस काल श्रीमंत दादासाहेब यांचे सांडणीस्वारासमागमें पत्र लिहून सवेसीं पाठविलें आहे तें पावलेंच असेल. रामा जासूद यास येथून पाठविला त्यास सात दिवस जाहले. अद्यापि आला नाहीं. त्यास उत्तर देऊन पाठवावयासीं आज्ञा करावी. परवां गुरुवारीं फौज सामानगडास तलाव्यास गेली होती त्याचें वर्तमान सांडणीस्वारासमागमें लिहिलेंच आहे. त्यानंतर भृगुवारीं श्रीमंत राजश्री दादासाहेब फौज घेऊन आणखी गेले होते; गडाचे पश्चिमेकडे टेंकडी होती तेथें गेले. पेठेवर घोडीं घातलीं. ते समयीं त्यांजकडील घोडीं तीन ठार झालीं व पांच सात जखमी जाहलीं. त्याशिवाय बारगीर व दोन तीन असामी जखमी जाहले आहेत. याप्रमाणें काल वर्तमान जाहलें. काल आमची फौज तलाव्यास गेली नाहीं. मल्लिकभाई हिरजकर याजकडील घोडा जेर आहे म्हणून लिहिलें होतें, त्यास काल दोनप्रहरों तो घोडा मेला. घोडीं हलक्या जखमांचीं होतीं त्यांस खर्चास दिलें. भारी जखमांचीं पांच घोडीं आहेत तीं ज्यांचीं त्यांजकडेच ठेविल्यास लवकर बरीं होणार नाहींत. याजकरितां येथें पागेंत ठेविलीं. त्यांस दाणा रतीब येथून देववीत आहें. बरीं होतील. येथून कूच होईल तेव्हां सहा सात घोडीं शिलेदारांस बसावयास दिलीं पाहिजेत. त्यास येथें पागेंत तीन घोडीं कोतवाल आहेत. आणखी तीन चार पाहिजेत. येविसींची काय ती आज्ञा करावी. राजश्री महिपतराव फराटे यांजकडे रंभा घोडी आहे ती सबर आहे. आणखी महिना पंधरा दिवस उपयोगीं पडेल. पुढें बसावयाचे उपयोगाची नाहीं. घोडी जल्द आहे. याजकरितां विनंती लिहिली आहे. विदित होय. निशाणाचे शेल्याविषयीं व लघीचे तापत्याविषयीं पेशजी विनंती लिहिलीच

आहे त्याप्रमाणें पाठवावयासीं आज्ञा करावी. महिपतराव फराटे यांचे अबदागिरीस शेला वर्षप्रतिपदेस पावत असतो म्हणोन ते सांगतात. त्यास पावत असल्यास पाठवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७६७. श्री. ( फाल्गुन व० ६–१३ मार्च. )

पैवस्ती छ० २२ रबिलाखर. सन आर्बा समानीन. फाल्गुन मास.

सेवेसीं विज्ञापना. कोंकणचे स्वारीस इंग्रेजाकडील दारू चांगली तोटयाची सांपडलेली संदुका कोठींत आहेत त्यापैकीं रसूलखान यानें मिरजेहून येतसमयीं चार शेर दारू आणिली होती ती जहाली. आणखी त्या दारूपैकीं चार शेर दारू पाठवावी म्हणून स्वामीस विनंती ल्याहावी म्हणून रसूलखान यानें सांगितलें. त्यावरून सेवेसीं विनंती लिहिली आहे. पाठवावयाची असल्यास पाठवावयासीं आज्ञा करावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७६८. श्री. ( फाल्गुन व० १४--२० मार्च. )

पैवस्ती छ० २८ रबिलाखर सन आर्बा समानीन. फाल्गुन.

सेवेसीं आपाजी गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० २७ माहे रबिलाखर मुक्काम हल्कर्णीनजीक सामानगड येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं जासुदासमागमें एक व चंदा सांडणीस्वार याजसमागमें पत्र एक अशीं दोन पत्रें पाठविलीं तीं काल पावलीं. लघीचा तापता, व निशाणाचे शेले दोन, व फराटे यांचे अबदागिरीचा शेला एक, व त्यांची आंखांची यादी दप्तरची, येणेंप्रमाणें सांडणीस्वार याजसमागमें

१ जनरल मांडर्ड याचें लष्कर लुटलें तेव्हां लुटींत सांपडलेलो.

पाठविलें तें पावलें. ऐवज मोतिबा कदम याजसमागमें पाठविला तो पावला. त्याची पावती कदम याजबरोबर लिहून पाठविली आहे. पोंचली असेल. शिलेदारांचीं घोडीं जखमी जाहलीं आहेत त्यांस बसावयास घोडीं दिलीं पाहिजेत; याजकरितां चार घोडीं पाहिजेत; म्हणून सेवेसीं विनंती लिहून पाठविली होती. त्यावर स्वामीनीं उत्तर पाठविलें जे, 'तेथेंच कशी तरी तोड पाडावी. घोडीं जास्ती नाहींत.' म्हणून लिहिलें, त्यास उत्तम आहे. स्वारी तळाव्यास श्रीमंत राजश्री दादासाहेब यांची गेली होती ते समयीं चार घोडीं मागून आणिलीं होतीं. याप्रमाणें आहे. येथें मुक्काम आहेत तोंपर्यंत कांहीं चिंता नाहीं. येथून कूच होईल ते दिवशीं कसें घडतें पहावें. शिलेदारांस घोडीं बसावयास दिल्याविना तोड पडण वळतच आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचा मुक्काम काल भृगुवारीं संकेश्वराचे पलीकडे एक कोसावर निडसोसी म्हणून गांव आहे तेथें मुक्काम जाहला. येथून तीन कोस आहे. आज तेथून कूच करून येथें येतात किंवा तेथेंच मुक्काम होईल पहावें. " करवीरकरांचे तहाचें बोलणें बोलून राजश्री बाळ जोगीराव व शिवराव करवीरास गेले आहेत. अद्यापि बोलिल्याप्रमाणें ऐवज आला नाहीं व त्यांजकडून पत्रही आलें नाहीं; " म्हणोन लिहिलें तें कळलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७६९. श्री. (फाल्गुन व० १४–२० मार्च.)

पैवस्ती छ० २८ रबिलाखर. सन आर्बा समानीन. फाल्गुन मास.

सेवेसीं विज्ञापना. अर्जुना खासबारदारासमागमें स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. कोरे कागद व शाईचा चंबू भरून पाठविलेप्रमाणें पावलें. काल सांडणीस्वारासमागमें लघीचा तापता व शेले बांधून तेथून खादीचा रुमाल पाठविला होता तो हल्लीं सांडणीस्वार

यासमागमें माघारा पाठविला आहे, पावेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७७०. श्री. (फाल्गुन व० १४-२० मार्च.)

पैवस्ती. छ० २८ रबिलाखर. सन आर्बा समानीन. फाल्गुन.

पु॥ सेवेसीं विज्ञापना. राजश्री सटवाजी भोंसले हजार दीड हजार स्वारांनिसीं सामानगडास कांहीं सामान दारू वगैरे घेऊन परवां गुरुवारीं रात्रीं आला म्हणून बातमी येथें आली. त्याजवरून काल भृगुवारीं श्रीमंत राजश्री दादासाहेब फौजसुद्धां तलाऽयास सामानगडाचे उत्तरेकडे नूल म्हणोन गांव एक कोसावर आहे तेथें गेले होते. तेथून पुढें गडाकडे राजश्री महिपतराव आबाजी शंभर दीडशें स्वार घेऊन गेले, तों गडाचे माचीकडून दोन तीनशें स्वार व पांचशें प्यादे येऊन टेंकडीवर उभे राहिले. त्यांची व इकडील दहा वीस स्वार पुढें गेले त्यांची गोळागोळी होऊं लागली. श्रीमंत राजश्री दादाकडील एक घोडें व दोघे शिलेदार जखमी जाहले. त्यांजकडील स्वार प्यादे आश्रयास होते. मग राजश्री महिपतराव निघोन माघारे आले. मंडळी गोटास आली. सटवाजी भोंसला काल संध्याकाळपावेतों गडास होता म्हणून वर्तमान आहे. रात्रीं माघारा गेला कीं गडास राहिला तें वर्तमान कळलें नाहीं. याप्रमाणें वर्तमान आहे. श्रुत होय. राजश्री महिपतराव फराटे यांचे वडील बंधु निंबाजी फराटे यांस शिंगराचे जाबसालाकरितां पुण्यास घेऊन गेले; याजकरितां महिपतराव याणीं सेवेसीं विनंती लिहिली आहे त्याजवरून विदित होईल. लघीचा तापता आला, परंतु लघीचे भाल्यास सखलाद मढवावयाची आली नाहीं. त्यास पाठवावयाची आज्ञा करावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७७१. श्री. (१४ एप्रिल.)

श्रियासह चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस प्रती बळवंतराव कृष्ण आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत चैत्र व॥ नवमी बुधवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. सालमजकुरीं आमची पागा चाकरीस आपले पथकांत आहे त्यांत अधिकारी चिरंजीव लक्ष्मण विठ्ठल म्हैसकर पाठविला होता. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांची स्वारी फौजसुद्धां कित्तूर प्रांतीं होऊन देसनुरावर हल्ला केला. ते समयीं चिरंजीव लक्ष्मण यास वर्मस्थानीं गोळी लागून मृत्यु पावला. ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. हल्लीं पागेंत कोणी नाहीं. याजकरितां येथून राजश्री महिपता भुजंगे यास पाठविलें आहे. तर आपण राजश्री आपाजी गोविंद जोशी यांस पत्र देववून पूर्ववत्प्रमाणें कामकाज घ्यावें. बरकड सविस्तर लिहून कळवावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २७७२. श्री. (चैत्र व० १४–१८ एप्रिल.)

पैवस्ती छ० २७ जमादिलावल. सन आर्बा समानीन. चैत्रमास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेसीं.

पोष्य काळो बहिरव साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करावें. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें नसावें. सदोदित पत्र पाठवून संतोषवीत असलें पाहिजे. दक्षिणेकडील वर्तमान टिपू सुलतान बहादर याची फौज फिरंगीपेठेस आहे. पट्टणास जाणार म्हणोन वर्तमान आहे. विवेकाची गोष्टही उरकण्यांत आली आहे म्हणून वर्तमान आहे. कळावें याकरितां लिहिलें आहे. आपणाकडील वर्तमान

१ पत्र मद्रासेहून मिरजेस. २ इंग्रज व टिपू यांमध्यें तह होण्याची.

राजकी स्वकीय लिहिलें पाहिजे. हसनबेळुरास तमाम फौज घाटावर आली. खुद्द टिपू लष्करास येऊन दाखल जाहले. इंग्रजाचा सल्ला जाहला म्हणोन वर्तमान आलें आहे. आपणांकडे पुण्याहून वर्तमान आलें असेल तें कळवावें. निरंतर पत्रीं संतोषवावें. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

नं. २७७३. श्री. ( वैशाख शु० १–२० एप्रिल. )

पेवस्ती. छ० ३० जमादिलावल. सन आर्बा समानीन. वैशाख मास.

विज्ञापना. राजश्री रामचंद्रपंतआपा कित्तुरकरांचें बोलणें बोलत होते. त्यास द्वादशीस भृगुवारीं कित्तुरास गेले. तेथें एकाएकीं त्यांचा फारच वाखा जाहला. वमनाचा व शौचाचा उपद्रव फार जाहला. आणि मनुष्याची ओळख मोडली. याप्रमाणें एक दिवस जाहलें. मग दुसरे दिवशीं किंचित् उतार पडला. मग परवांचे दिवशीं तेथून लष्करांत आणिले आहेत. परंतु अद्यापि निःशेष आरोग्य नाहीं. भ्रम पडला. मनुष्याची ओळखही अद्यापि पुरत नाहीं. याप्रमाणें वर्तमान जाहलें आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. २७७४. श्री. ( वैशाख शु० १–२० एप्रिल. )

पेवस्ती छ० ३० जमादिलावल. सन आर्बा समानीन. वैशाख मास.

सेवेसीं आपाजी गोविंद[1] कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ० २९ माहे जमादिलावल भौमवार मुक्काम कोटबागीनजीक कित्तूर एक कोस येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं छ० २६ तेरिखेचें सांडणीस्वारासमागमें पत्र पाठविलें

१ परशुरामभाऊंचे प्रधान.

तें काल दहा घटका दिवसास पावलें. राजश्री नानाफडणीस यांणीं नबाबांच्या भेटीकरितां स्वामीस यावें म्हणून पत्र पाठविलें, त्याजवरून स्वामीनीं वैशाख शु॥ ३ स बाहेर निघावयाचा मुहूर्त पाहिला आहे. त्यास " तुम्हीं फौजसुद्धां श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांची आज्ञा घेऊन खिळेगांव पांडेगांवचे सुमारें चतुर्थी पंचमीस यावें. आम्ही तृतीयेचे मुहूर्तें बाहेर निघणार. आणि तेथून सप्तमीस कूच करून पुढें जाणार. याजकरितां तुम्ही चतुर्थी पंचमीचे सुमारें येऊन पोंहचावें; " म्हणून पत्रीं आज्ञा. आज्ञेप्रमाणें श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांस विनंती केली. त्यास उदईक तुम्हीं जावें म्हणून आज्ञा केली. त्याप्रमाणें आम्हीं फौजसुद्धां उद्यां कूच करून खिळेगांव पांडेगांवचे सुमारें आज्ञेप्रमाणें सेवेसी येतों. " कित्तूरकर देसाई भेटीस आला त्यापक्षीं आजपर्यंत येथील गुंता उरकलाच असेल. त्यास तेथून लष्कर कूच कधीं होणार, कोणते मार्गें व कोणत्या सुमारें जाणार, हें लिहून पाठवावें " म्हणून आज्ञा, ऐसीयास देसाई येऊन भेटून गेला. त्यानंतर राजश्री रामचंद्रपंतआपा यांचे विद्यमानें बोलणें होतें. त्यास दोन तीन दिवस मार्ग पाहिला. परंतु कराराप्रमाणें घोडीं व वोली न येत. व ऐवजाची निशा न होय. याजकरितां मुरमुरीवरून कूच करून येथें आले. स्वारी कित्तुराजवळ जाऊन उभी राहिली. आणि गांवांत सांगोन पाठविलें जे, कराराप्रमाणें आज फडशा करावा. नाहीं तर तोफा लावितों. त्याजवरून देसाईण पालखींत बसून बाहेर निघोन आली व दीडशें घोडे तेच समयीं आले. बाकी वोलीचीं कुळें पांच सात यावयाचीं तीं संध्याकाळपावेतों घेऊन येतों याप्रमाणें त्या दिवशीं करार जाहला. मग स्वारी गोटास आली. देसाईण वोलींत ऐवजाच्या राहिली आहे. आणखी वोली यावयाच्या आहेत. त्या ह्या वेळेपर्यंत आल्या

नाहींत. आज अगर उदईक येथील गुंता उरकून कूच होणार, आणि मुरगोडचे बारीनें विजापूरचे सुमारें जाणार आहेत. याप्रमाणें वर्तमान सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

शिलेदारांचें कापड आंख द्यावयाचे आहेत, त्यास कापड स्वामीनीं बरोबर घ्यावें लागेल, यास्तव विनंती लिहिली आहे. हे विज्ञापना.

नं. २७७५. श्री. (वैशाख शु० १–२० एप्रिल.)

पैवस्ती छ० ३० जमादिलावल. सन आर्बा समानीन. वैशाख.

विज्ञापना. दोडवाडचें ठाणें सावनूरकरांकडे आहे. येथून चार कोस. तेथें ठाणें घालावयाकरितां श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याणीं पन्नास स्वार पाठविले आहेत. गांवकरांनीं ठाणें दिल्यास उत्तम. नाहीं तर येथून कूच होऊन तेथें जाऊन दोडवाडचें ठाणें घालणार याप्रमाणें श्रीमंतांनीं सांगितलें आहे. स्वार जाऊन दोन दिवस जाहले. अद्यापि आले नाहींत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७७६. श्री. (२० एप्रिल.

श्रीमंत राजश्री गंगाधररावजी स्वामींचे सेवेसीं.

पोष्य हरी लक्ष्मण साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत वैशाख शु॥ १ पावेतों मुक्काम तासगांव यथास्थित असे विशेष. आम्ही पुण्याहून निघोन रहिमतपुरास आलों. तेथून तासगांवास द्वादशीस आलों. तृतीयेस येथून स्वामींचे दर्शनास यावें, त्यास येथें बातमी ऐकिली कीं " श्रीमंत राजश्री भाऊंचें लष्कर कित्तूरचे मुलखांतून निघून मुरगुडावर आलें. तेथून मुधोळ प्रांतीं येणार. पुढें मजल दरमजल जातील." याजकरितां ऐनापुरचे मार्गानें जातों. चिरंजीव आनंद-

---

१ लागू.

राव यासीं चिकोडीस मिरजेवर पाठवितों. श्रीमंत राजश्री बापूस देवी आल्या म्हणोन काल वाड्यांत ऐकिलें, याजकारितां सेवेसीं पत्र लिहिलें आहे. त्यास उगवण कसें आहे, दाट किंवा पातळ, हें वृत्त लिहावें. आपलें पुण्य थोर. श्रीदेवी कृपा करितील. आपली स्वारी लष्करांत जाणार. भेटही होईल. चिरंजीव सौभाग्यवती मथुरा व ताराबाई सुखरूप आहेत. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विनंती.

# अधिकार-योग

अथवा

## नाना फडनवीस यांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास.

'खूब शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नाना फडनविसांनीं राज्य बुडविणाऱ्या एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठीं लढविलेलीं कारस्थानें, तीं लढवितांना त्यांवर आलेलीं दुर्धर संकटें, त्या संकटांतून पार पडतांना त्यांनीं प्रकट केलेली निस्सीम स्वामिभक्ति, उज्ज्वल देशाभिमान व अलौकिक चातुर्य यांचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ पटवर्धन वगैरेंच्या लेखांतून जागोजाग भरपूर उतारे देऊन या ग्रंथांत केलें आहे. किं. ८१०, पोस्टेज ८१.

---

# हरिवंशाची बखर

अथवा

## पटवर्धन सरदारांच्या हकीकती.

या पुस्तकांत पेशवाईंतील पटवर्धन वगैरे प्रसिद्ध सरदार व थोर थोर मुत्सद्दी यांचे अद्भुत पराक्रम, चातुर्य, धाडस, स्वाभिमान, गुरुजनांविषयीं आदर, मानसिक औदार्य व निस्सीम स्वामिभक्ति वगैरे सद्गुणांचे उत्तम प्रकारें आविष्करण करणाऱ्या आणि वीर, करुण व हास्य या रसांनीं ओथंबिलेल्या आख्यायिका असून लढाईंतले, छावणींतले, दरबारचे व नानाप्रकारचे घरगुती प्रसंग फार मनोरंजक प्रकारें वर्णिले आहेत. किं. ८१०, ट. ख. ८१.

# ऐतिहासिक-लेख-२.

**भाग २।३।४।५।६ प्रत्येकीं किंमत ३ रुपये. साही भाग एकदम घेतल्यास व्ही. पी. नें १३ रुपये. भाग सहावा व सातवा घेतल्यास व्ही. पी. नें ५ रुपये.**

या पुस्तकांत पटवर्धन सरदारांच्या जुन्या दफ्तरांतील ऐतिहासिक महत्त्वाचे अस्सल कागदपत्र प्रसिद्ध होत आहेत. हे कागदपत्र आम्हीं मोठ्या श्रमानें मिळवून यांची सालवारी व प्रकरणवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनुक्रमानें छापीत आहों. प्रत्येक पत्रावर तारीख, महिना व सन घालून पत्रांतील मजकूराचें दर पृष्ठावर हेडिंग दिलें आहे व खालीं अर्थाची फोड करण्याकरितां भरपूर टीपाही दिल्या आहेत. शिवाय प्रत्येक प्रकरण छापतांना त्यांतील विषयांचें सुसंगत विवेचन करून एक एक प्रस्तावनाही जोडली आहे. पानिपतच्या युद्धापासून तों तहत बाजीरावीच्या अखेरीपर्यंतचा इतिहास या पुस्तकांत येणार असून तो त्या त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्याच शब्दांनीं वर्णिला जाणार आहे ! मराठी इतिहासाची हौस बाळगणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें व महाराष्ट्रांतील प्रत्येक लायब्ररीनें या पुस्तकाचा अवश्य संग्रह करावा. या पुस्तकाचे पहिले तीन भाग बारा बारा सुटे अंकांचे असून चवथा, पांचवा, सहावा व सातवा भाग यांचीं एकत्र बांधलेलीं निरनिराळीं पुस्तकें आहेत. पहिल्या भागाच्या आतां प्रती शिल्लक नाहींत.

याशिवाय आम्हीं केलेलीं पुस्तकें आम्हांकडे विक्रीस आहेत तीं—
**यशवंतराव महाकाव्य.** किं. १ रुपया. **गुणोत्कर्ष नाटक.** किं. ॥८. **नाना फडनविसांचें चरित्र.** किं. १॥८. **हैदरअलीवर पहिली स्वारी** ( ऐ. ले. संग्रहापैकीं हें प्रकरण फक्त कथानकरूपानें लिहिलेलें असून यांत हैदरअलीचें मनोवेधक चरित्रही दिलें आहे. ) किं० ॥१२.

**वासुदेवशास्त्री खरे, मिरज.**

# [illegible]

## विषयानुक्रम.


भाग पहिला—सन १७६० [illegible] नाना [illegible] पेशव्यांना [illegible] हैदराची अंमल-माधवराव [illegible] शी युद्ध [illegible] स्वारी-लढाया [illegible] माधवराव व [illegible] इनदा [illegible] पेशव्यांची पट-वर्धन [illegible] सरदार [illegible] [illegible] वेढा [illegible] [illegible] [illegible]

[illegible] दुसरा [illegible] १७६८ [illegible] हैदर [illegible] [illegible] अनवटी, हावेरी येथील लढाया—सावनूरचे रक्षण—धारवाडचा वेढा. इ. अ. पृ. ४८०.

भाग तिसरा—सन १७६४ [illegible] ते १७६९ [illegible] [illegible] अलीशी लढ—भोसल्यावर पहिली स्वारी—तानयाप्रकरणाचा [illegible] स्वारी—[illegible] हैदरअलीवर दुसरी स्वारी—[illegible] [illegible] येथील लढाया—नाना—माधवराव व [illegible] यांची आनंदवल्लीस भेट—[illegible] स्वारी व तबेलास केदू—भोसल्यावर दुसरी स्वारी. इ. अ. पृ. ४८०.

भाग चवथा—सन १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्टपर्यंत. [illegible] हैदरअलीवर तिसरी स्वारी कल्हार, [illegible] टिपूशीं [illegible] [illegible] [illegible] अनेक [illegible] स्थापना—[illegible] इ. अ. पृ. ६००.

भाग पांचवा—स. १७७३ ऑगस्ट ते १७७६ जुलईपर्यंत. [illegible] निजाम अलीशी लढाई व भेट—[illegible] स्थापना—[illegible] पलायन—[illegible] लढाया—[illegible] [illegible] [illegible] सुरुवात.

भाग [illegible] [illegible] लढाई व [illegible] [illegible] महादजी शिंदे [illegible] [illegible] इ. [illegible] ६००.

भाग सातवा—सन १७७८ एप्रिल ते १७८१ एप्रिलपर्यंत. [illegible] (उत्तरार्ध) व [illegible] [illegible] [illegible] लढाया [illegible] [illegible] [illegible]


[illegible] पुरवणी [illegible] [illegible]

---

[illegible] कार्य [illegible] [illegible] यांनी [illegible] येथे प्रसिद्ध केले.